UNIVERSAL
LIBRARY
OU_192567
UNIVERSAL
LIBRARY

# दत्तोपंत आपटे लेखसंग्रह

दत्तोपंत आपटे स्मारक मंडळ

यशोदा-चिंतामणि निधि-पुरस्कृत ग्रंथमाला, क्रमांक १३ वा

# दत्तोपंत आपटे लेखसंग्रह

इतिहास-संशोधक कै. दत्तात्रय विष्णु आपटे, बी.ए.,
यांच्या इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, ज्योतिष
इत्यादि विविध विषयक ३३ निवडक लेखांचा संग्रह

संपादक

दत्तोपंत आपटे स्मारक मंडळ, पुणे.

किंमत ५ रुपये
भा. इ. सं. मंडळाचे
सभासदांस रु. ४०८

शके १८६७
इ. स. १९४५

मलपृष्ठाचे चित्रकार :

श्री. राजा बेवरकर, नाशिक.

ग्रंथ मिळण्याचें ठिकाण

पुणें अ. वि. गृह प्रकाशनखातें, ६२४ सदाशिव, पुणे २.
भारत इतिहास संशोधक मंडळ, ३१३ सदाशिव, पुणें २.

मुद्रक-प्रकाशक-वि. गं. केतकर, लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव पुणें.

यशोदा-चिंतामणि निधि
पुरस्कृत ग्रंथमाला

क्रमांक १३ वा

# दत्तोपंत आपटे लेखसंग्रह

# माझे दोन शब्द

**'दत्तोपंत आपटे लेखसंग्रह'** या ग्रंथाच्या प्रकाशनाचें काम मी हातीं घेतलें तें कै. दत्तोपंत आपटे यांचा मी पूर्वाश्रमींचा यवतमाळच्या राष्ट्रीय विद्यालयांतील सहकारी व स्नेही म्हणून. अशा मित्रकार्यांत एक विशिष्ट प्रकारचें समाधान असतें. हा ग्रंथ त्यांच्या द्वितीय स्मृतिदिनीं प्रसिद्ध होत आहे याचा मला आनंद वाटतो. या ग्रंथाचें प्रकाशन माझ्या वैयक्तिक जबाबदारीवर व्हावें असें मला वाटत होतें, पण माझ्या सहकाऱ्यांचा आग्रह आडवा आला. त्यांनीं तें 'पुणें अनाथ विद्यार्थी गृहा'चें प्रकाशन म्हणून घेण्याचें ठरविलें. दुसरीही एक अडचण होती. सध्यांच्या कायद्याच्या निर्बंधांतून मला व्यक्तिशः ग्रंथ प्रकाशनास अनुमति मिळणें दुरापास्त होतें. पुणें अनाथ विद्यार्थी गृहानें यापूर्वी कै. आपटे व प्रा. ओतुरकर यांनीं संपादित केलेला 'महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास' प्रसिद्ध केलाच आहे. पूर्वाश्रमीं राष्ट्रीय विद्यालय चालविणाऱ्या कै. दत्तोपंत आपटे यांच्या लेखसंग्रहाचें पुस्तक त्याच धोरणानें चालणाऱ्या संस्थेकडून प्रकाशित होत आहे हा योगायोग आहे. संस्थेनें ग्रंथप्रकाशनाची जबाबदारी हातीं घेतांच 'यशोदा चिंतामणि निधी'च्या विश्वस्तांकडून या ग्रंथाच्या प्रकाशनास साह्य मिळालें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

सोमवार ता. २९–१०–४५
आश्विन व. ९ शके १८६७

**वि. गं. केतकर**
अ. वि. गृह प्रकाशन, पुणें

# प्रस्तावना

दत्तोपंत आपटे स्मारकमंडळाने कै. आपटे यांच्या स्मारकार्थ हातीं घेतलेल्या कार्यापैकी 'दत्तोपत आपटे लेखसग्रह' प्रसिद्ध करण्याची योजना सिद्धीस जात आहे याबद्दल आनद वाटतो. त्यांच्या स्मारकासाठी हाती घेतलेल्या योजनांत अनेकाचे आपलेपणाने साहृय होत आहे हे कै. आपटे यांच्याबद्दल सर्वासच वाटत असलेल्या आदराचें, व महाराष्ट्रीय समाजांत इतिहास संशोधनाबद्दल वाटत असलेल्या प्रेमाचे एक गमक आहे यात शका नाही.

कै. दत्तोपत आपटे याच्या आयुष्याचा उत्तर भाग म्हणजे इ. स. १९१५ साली ते पुण्यास आल्यापासूनचा काल इतिहास सशोधनाच्या अहर्निश व्यासगांत गेला. या उद्योगात ते स्वतःस विसरून जात, बाहृय उपाधीस मागे सारीत एकच एक विषयाचा बारकाईने पिच्छा पुरवीत व आपले विचार अभ्यासकासमोर माडीत यासाठी त्यानी भारत इतिहास सशोधक मडळाच्या समेलनातून निबध वाचले, व्याख्याने दिली, ग्रंथाचे सपादन केले, दुसऱ्याच्या ग्रथास प्रस्तावना लिहिल्या, अनेक साधने पाहून शकावल्या तयार केल्या, भा. इ स. मंडळ त्रैमासिक, चित्रमयजगत्, सहृयाद्रि, विविधज्ञान विस्तार, ज्ञानप्रकाश इत्यादि नियतकालिकातून विविध लेख लिहिले, वाद केला, हर्षामर्षाची क्षिति बाळगली नाही, आणि एकच एक सत्यसशोधनाचा ध्यास धरला. त्यानी अनेक मासिकातून लिहिलेले स्फुट लेख एकत्र करण्याचा उद्देश उघड आहे विविध पुष्पे एकत्र गुफण्यांत मालेचे सौदर्य प्रतीत होते, तसे स्फुट लेख एकत्र करण्यांत अस्फुट विचारसरणी स्पष्ट होते. किवा निरनिराळे स्फुट लेख हे शिलाखड कल्पिले तर त्याच्या एकत्र रचनेनें व्यक्तीचे विचारमदिर नजरेसमोर येण्यास साहृय होतें इतिहास मंडळाच्या सशोधन पद्धतीचे मूर्त प्रतीक जर कोठे पहावयास सापडणार असेल तर ते प्रामुख्याने कै. दत्तोपत आपटे यांच्या लेखातच, अशी खात्री वाटत होती म्हणून हा लेखसंग्रह प्रसिद्ध करण्याचे मनात आणले.

मनात धरलेल्या योजनेस प्रत्यक्ष स्वरूप प्राप्त होण्यास कै दत्तोपताचे पूर्वाश्रमीचे सहकारी व स्नेही श्री. वि. ग. केतकर यांची मदत झाली त्यानी प्रकाशनाची सर्व जबाबदारी अंगावर घेतली. ती जबाबदारी अशतः हलकी करण्यास यशोदाचिंतामणि निधीच्या विश्वस्तांनी साहृय केले. या उभयताचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. श्री केतकर यानी तर 'कै. आपटे यांचा स्नेही म्हणून मी व्यक्तिशः या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी पत्करतों. पुणें अ. वि. गृहानें हा बोजा घ्यावा किवा माझ्या मित्रप्रेमाखातर संस्थेनें तो

पसकरावा अशी माझी इच्छा नाही. यात तोटा आलाच तर माझी मुलें छापखान्यांत काम करून तो भरून काढतील असा आग्रह धरला. शेवटी या मुद्यावर पुणें अ. वि. गृह व श्री. केतकर हे आपआपले पाहून घेतील असें आम्ही समजून त्याबद्दल अधिक खल न करतां ग्रथ छपाईस प्रारंभ केला.

हल्लीच्या महागाईच्या दिवसात छपाईच्या खर्चाचा अदाज घेऊन हा ग्रथ ३०० पृष्ठांत संपवावयाचा असे ठरविले. कै. आपटे याचे ग्रथरूपानें उपलब्ध लेखन येथे पुनर्मुद्रित केलेले नाही. त्या त्या ग्रथातील महत्त्वाच्या व विषयाम धरून असलेल्या भागांकडे पृष्ठांकाचे आकडे देऊन वाचकाचे लक्ष तेवढे वेधलें आहे. तसेंच कै. आपटे चित्रमयजगत्चे सपादक असताना प्रचलित राजकीय चळवळीचा आढावा घेण्याच्या स्वरूपाचे बरेच स्फुट लेखन त्यांनी केले आहे, तें तात्कालिक महत्त्वाचें असल्याने त्याचा यात समावेश केलेला नाही. उलट, सार्वजनिक विषयाची चर्चा करणारे एक खाजगी पत्र प्रा पोतदार यांनी मिळवून दिले ते प्रसिद्ध केले आहे. याखेरीज एकाद दुसऱ्या अप्रकाशित लेखाचें हस्तलिखित आम्हाजवळ आहे तें पुढील वर्षी प्रसिद्ध होणाऱ्या 'इतिहास शास्त्र व ऐतिहासिक तत्त्वज्ञान' या दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथांत घालण्यासारखे आहे असें वाटून या ग्रथांत ते प्रसिद्ध करण्याची घाई केलेली नाही भा. इ. स. मडळाच्या त्रैमासिकाच्या अंकातून प्रसिद्ध झालेले टिपण स्वरूपाचे त्याचे स्फुट लेखही बरेच आहेत, पण त्या योगानें कै दत्तोपताच्या व्यक्तिदर्शनास विशेष साहय होण्यासारखें आहे असे न वाटल्यामुळे बाजूस ठेवले त्याच्या साहित्य सेवेची त्रोटक नोद 'सह्याद्रि' कारानी केली होती, तीत अगत: भर घालून या ग्रथांत स्वतत्रपणें दिली आहे. एकवार प्रसिद्ध झालेले लेख पुनर्मुद्रित करण्यास त्या त्या नियतकालिकाच्या सपादकानीं आम्हास अनुमति दिल्याबद्दल आम्ही त्यांचे मन पूर्वक आभार मानतो.

लेख प्रसिद्ध करताना बरीच कोशीस केली. प्रस्तुत पैकी बरेच लेख आमचे साहाय्यक श्री. गाडगीळ यानी त्या त्या मासिकाच्या सपादकीय कचेरीत बसून तेथून ते नकलून आणले. अशा वेळी नकलेचा कागद मुळाशी जरूर तेथे तपासला. कित्येक वेळां लेख प्रथम प्रसिद्ध होताना तेथेच चुकीची अवतरणें दिली गेली असें वाटले. अशा ठिकाणी मुळांतून अवतरण शोधून दुरुस्त केले, व अपुरे संदर्भ पूरे केले. एवढे करूनही चुका राहिल्या असतील व काही पुन. मुद्रण दोषानें झाल्या असतील, नाही असें म्हणता येत नाहीं

प्रस्तुतचा लेखसंग्रह विषयवारीनें वर्गीकरण करून छापलेला आहे. या वर्गीकरणाबद्दल मतभेद होणे शक्य आहे. तसेच भाग छापताना पाळलेला अनुक्रमही मतभेदार्ह होईल. 'ऐतिहासिक घडामोडीची विचिकित्सा' हा पहिला भाग अनुक्रमानें तिसरा छापला असता, तर तें विषयाच्या विकासास धरून झाले असतें.

या ग्रंथांत प्रसिद्ध झालेले सर्वच लेख निवडक व महत्त्वाचे असे आहेत. पण कुणास कै. आपटे यांचे आपटेपण कुठें केंद्रित झालेलें पहावयाचें असेल तर तें 'इतिहास लेखन व संशोधन' या दुसऱ्या भागांत आढळेल.

कै. आपटे याच्या लेखाचे संपादन चालू असता त्याच्या मूळ लेखांत कोठे बदल केलेला नाही. एकदोन ठिकाणी त्यांचीं विधानें चुकली आहेत असें वाटते. उदाहरणार्थ; पृ. ८७ वर शिवभारतांत शिवजन्मतिथी वारासह दिली आहे असें म्हटले आहे पण शिवभारतात शिवजन्मतिथीचा वार दिलेला नाही.

तसेंच, पृ. ८५ वर शक १५८२ माघ शु. १४ ही काहारतलबखानाच्या उंबरखिंडीत झालेल्या पराभवप्रसंगाची मिती देऊन त्यावरील आक्षेपास उत्तर देताना नुसते 'पौष पाहिजे' अशी दुरुस्ती सुचविली आहे. पण तेथें 'पौष शु. ४' असे पाहिजे. ह्या मितीविषयी पूर्ण निर्णय व्हावयास पाहिजे.

कै. आपटे याच्याबद्दल आम्हास आदर वाटत असला तरी त्यांचीं सर्वच मते सदा मान्य होण्यासारखी आहेत असें कोणी मानून चालत नाही.

कै. आपटे यांच्या लेखांचें संपादन चालू असतां त्याच्या उद्योगाचें स्वरूप ध्यानी आले. रजपुताच्या पराभवाची मीमांसा किंवा इतिहास-तरंगिणी हे लेख वाचून लक्षात आले की, इतिहासविषयक परभाषेत प्रसिद्ध झालेल्या विचारांचा परिचय करून देण्याचे महत्त्वाचे काम ते करीत असत; ते हल्ली मागे पडले आहे. तसेच काही लेख त्यांनी कुणाच्या लेखाचे किंवा ग्रंथांचें परीक्षण करण्या-करतां लिहिले असले तरी त्यातील लेखक-व्यक्ति ही केवळ निमित्त मात्र; ती मागे पडून हाती असलेल्या विषयावर कै. दत्तोपंत आपलेच विचार एकसारखे लिहीत. दत्तोपंत मोठे चिवट व चिकट टीकाकार होते. शिवशाहीच्या अस्सल साधनांचे परीक्षण करताना वंगदेशीय विद्वान् प्रा. सरकार व हा तपस्वी ब्राह्मण याच्यांत एकप्रकारे एक पिढीभर पाठशिवणीचा खेळ चालू होता. त्यात प्रा. सरकार यांनी शब्दाने पराभव कबूल केला नाही खरा पण कै आपटे यानी दाखवून दिलेल्या अस्सल साधनाचा त्यानी अखेर उपयोग केला व शब्दाने नाही तरी कृतीने पराभव कबूल केला. यात विजयाच्या आनंदापेक्षाही तपश्चर्येचें समाधान अधिक मोठे आहे. संशोधनांत सत्याचा आग्रह धरून दत्तोपंतानी अखिल भारतीय विद्वत्तेच्या क्षेत्रात आम्हा मराठ्यांना मानाचे स्थान प्राप्त करून दिले, त्याचा योग्य उपयोग करावा हे काम पुढीलांचें आहे.

कै. दत्तोपंतांबरोबरच त्यांची चार अभ्यासक एकत्र आणून त्याच्याकडून काम करून घेण्याची पद्धति मागे पडली आहे. शिवचरित्रप्रदीप, शिवाजी-निबंधावलि वगैरेसारख्या ग्रंथप्रसिद्धीचे प्रसंगी कै. दत्तोपत 'परगुणपरमाणून् पर्वती कृत्य' अशा पद्धतीचा उपयोग करून तरुण अभ्यासक आपल्या भोंवती खेळते ठेवीत असलेले दिसतात. गाढ विद्वत्ता ही एकाच व्यक्तीच्या परिश्रमाचे

फल असलें तरी सदर्भ वर्गीकरणाचे असें काही सांघिक काम बौद्धिक फलश्रुतीस आवश्यक असते. त्यानें विद्वानाचे काम सोपें होतें व त्याच्या कार्याचा उठाव होतो.

प्रस्तुत ग्रथांत प्रा. शेजवलकर यांनी लिहिलेला 'दत्तोपंत आपटे व्यक्ति-दर्शन' हा लेख समाविष्ट केला आहे. कै. आपटे यांचें चरित्र लिहिणें आवश्यक होतें. त्यासाठी जी साधने जमविण्यास हवी होती ती जमा करण्यास त्यांना व आम्हांस वेळ झाला नाही. प्रा. शेजवलकरांनी लिहिलेल्या आपटयाच्या व्यक्ति-दर्शनांत खुद्द लेखकाचेही व्यक्तिदर्शन झाले आहे. लेख मनापासून लिहिला म्हणजे असें होणें अपरिहार्य आहे पण साहित्यात जो गुण तो दोषही होतो. कै. आपटे यांच्या व्यक्तिदर्शनात लेखकांनीं कांही दोषरेषा अधिक ठळक काढल्या असे त्याचे टीकाकार म्हणतील. आम्हीही म्हणतो. कै आपटे मराठयाच्या इतिहासांतून गणिता-कडे वळले याबद्दल प्रा शेजवलकर यानी केलेली मीमासा (त्याचा लेख पृ. १२) आमच्या मीमासेहून (पृ. २३५) भिन्न आहे पण हे चालायचेच. प्रा शेजवलकर यानी मनापासून लिहिलेले लिखाण मौलिक स्वरूपाचे व विचारास धक्का देणारे असते. तसाच हा लेख आहे यात शंका नाही. त्यानी तो वेळेवर लिहून या ग्रंथात समाविष्ट करण्यास दिल्याबद्दल आम्ही त्याचे आभार मानतो. सहज असा एक विचार मनांत येतो की, समकालिन स्नेही हे कित्येक वेळा व्यक्तीचे यथार्थ गुणग्रहण करू शकत नाहीत. व्यक्तीच्या विश्वरूपदर्शनास स्नेहाची माया केव्हां केव्हां आडवी येते.

हा लेखसंग्रह प्रकाशित करून आम्ही कै. दत्तोपत आपटे याच्याबद्दल आपला आदर व्यक्त करीत आहोंत हे खरे, पण स्वर्गस्थ आपटे याची हें पाहून काय स्थिति झाली असेल याची आम्हास कल्पना आहे.

पूज्यता डोळा न देखावी । स्वस्तुति कानी नायकावी । हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ।। हा ज्यांचा बाणा त्याची 'तै गजबजो लागे कैसा । व्याधे रुधला मृगु जैसा । का बाही तरता वळसा । दाटला जेवी ।। अशी स्थिति झाली असेल. व ते साश्रुलोचन हा सर्व प्रकार पहात असतील; पण आम्ही हे सर्व करतों ते त्याच्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या सुखसमाधानासाठी आहे हे जाणून स्वर्गस्थ आपटयानी आम्हास क्षमा करावी

संपादक

# कै. दत्तोपंत आपटे

## आयुष्यांतले ठळक प्रसंग व वाङ्मयसेवा

**१३ मार्च १८८१**, जन्म (फा. शु १३, श. १८०२)

**१८९७** मॅट्रिक परीक्षा.

**१८९८–९९** कॉलेज शिक्षण, राजाराम कॉलेज, कोल्हापूर

**१९०२** बी. ए फर्ग्युसन कॉलेजातून, गणित विषय ऐच्छिक रँ. परांजपे याचे विद्यार्थी

**१९०४–७** खाजगी शिक्षक, यवतमाळ. नंतर बंगालच्या फाळणीच्या चळवळीत तेथेच निघालेल्या राष्ट्रीय शाळेचे तीन वर्षे मुख्याध्यापक.

यवतमाळच्या 'हरिकिशोर' पत्रात संपादक हरिकिशोर बंद पडले (इ. स. १९०८)

मुंबई येथील 'राष्ट्रमत' दैनिकाचे सहा महिने संपादक. (इ. स १९०९)

गोमांतकात जाऊन गोवा येथील 'आलमैद कॉलेज' ही संस्था चार वर्षे चालविली. त्यांत श्री. हरीभाऊ फाटक हे त्याचे सहकारी होते. या अज्ञातवासाच्या कालांत 'सिद्धांत कौमुदी'चे मदतीशिवाय वाचन.

**१९१५** गोव्याहून पुण्यास आगमन. चित्रमय जगत्‌चे सात वर्षे संपादक.

**जानेवारी १९२४,** आनंदाश्रमाचे व्यवस्थापक. आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते या जागेवर होते.

२७ **ऑक्टोबर १९४३,** बुधवार आश्विन शु १३ श. १८६५ सकाळी ७ वाजतां मृत्यु. स्थल : आनंदाश्रम.

### कै. आपटे यांची वाङ्मयसेवा

स्व-निर्मित ग्रंथ

(१) **ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी,** भा. १ व २ (द्वि आ. १९४२, १९३६) प्र –चित्रशाळा, पुणे. पृ. १२२ व १०६; किं प्रत्येकी ८ आणे

(२) **दोस्तांची श्रीरंगपट्टणवर मोहीम–अथवा सवाशे वर्षांपूर्वीचा दक्षिण हिंदुस्थान** (१९२१) प्र –चित्रशाळा, पुणे पृ २४८, किं १॥ रु.

(३) **बर्थडेट ऑफ् शिवाजी**–(अेम्. आर. परांजपे मिळून) (१९२७) प्र –महा. पब्लि हाउस लि, पुणे पृ. २४, किं १० आणे.

(४) **महाराष्ट्र अितिहासमंजिरी अथवा निवडक ऐतिहासिक अुतारे, पूर्वार्ध** (१९२३) प्र –चित्रशाळा, पुणे पृ. ३१६ + ८; किं २ रु

(५) **संशोधकाची छोटी जंत्री**–(१९२१) प्र.–भारत अिति स. मंडळ, पुणे. पृ. ११; किं. ४ आणे

संपादित ग्रंथ

(१) **करणकौस्तुभ**–(१९२७) प्र.–आनंदाश्रम, पुणे पृ ३९; किं. ९ आणे.

(२) **गोलाध्याय** -पूर्वार्ध व उत्तरार्ध

(३) **ग्रहगणित**–भा. १ व २–(१९३९ व १९४१) **प्र.–आनंदाश्रम, पुणें.** पृ. २३६, १७६; कि २॥ रु. व १ रु. १३ आणे.

(४) **चंद्रचूड दप्तर**–(कला पहिली) गगोबा तात्याची कारकीर्द (१९२०) **प्र.**–भारत अि.सं.म. पुणें १७४ + १५; कि. ३ रु.

(५) **बीजगणीत**–(१९३०) प्र – **आनंदाश्रम,** पुणे. पृ. २०७, कि. २ रु.

(६) **म रा ठ्यां च्या इ ति हा सा चें साहित्य**– (शेजवलकर, सरदेसाअी, वाकसकर मिळून). (१९२४) पृ. ३९ कि. २ आणे

(७) **मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास** (१९३४) प्र – आर्यभूषण,पुणे. १८७ + २६४ + १८८; कि. ५ रु.

(८) **लीलावती** भा. १ व २ (१९३७) पृ. १२६, २९५; कि. १। रु. व १॥। रु. प्र.–आनंदाश्रम, पुणे

(९) **लीलावतींतील सार्थ वेंचे**— (१९४१ दु. आ ) प्र.–के भि. ढवळे, मुंबई. पृ. १६; कि. १ आणा.

(१०) **शिवकालीन पत्रसारसंग्रह** भा. १ व २ (१९२९) प्र.–शिवचरित्र-कार्यालय, पुणे. पृ. ७३८; कि. ७ रु (अेकत्र)

(११) **शि व च रि त्र नि बं धा व लि**–(१९२९) प्र.–श्रीशिवचरित्र-कार्यालय, पुणें. पृ ८०० + १२; किं. ३॥ रु.

(१२) **शिवचरित्रप्रदीप**–(स. म. दिवेकर मिळून) (१९२५) प्र.–भा.अि. सं. मं., पुणें. पृ. ३३१; कि. ३॥ रु. कागदी, कापडी ४ रु.

(१३) **शिवाजीनिबंधावलि**–भा. १, २–(१९२९) प्र.–शिवचरित्र-कार्यालय, पुणे. पृ २२५ + ९७ व १५४ + १३८; कि. प्रत्येकी ३॥ रु.

(१४) **सुवचनानि**–(१९३३) प्र – के भि. ढवळे, मुंबअी. पृ. ३२; किं. २ आणे.

(१५) **साधन परिचय अर्थात् महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास**–सहसंपादक प्रा. ओतुरकर (१९४१) प्र.–अ वि. गृह, पुणे. पृ. ३४७; कि. ७॥। रु

ग्रंथांना प्रस्तावना

---

(१) **दुर्दैवी मोहरा !** (२) **प्रतिनिधि घराण्याचा अितिहास,** ग्रंथांक २ (३) **शिवचरित्रसाहित्य,** खं १ (४) **शिवभारत** (५) **श्रीमंत थोरले माधवराव पेशवे** (६) **श्रीशिवकाव्य.**

लेख

(१) बाजीरावाचे राजकारण व विकास पद्धति (१९४१) फर्ग्युसन कॉलेज इतिहास अर्थशास्त्र मंडळ रौप्य महोत्सव ग्रंथ.

लेखनसाहय व मार्गदर्शन

---

(१) **कुलग्रंथ**–गोळे, चितळे, थत्ते, पराजपे, लिमये वेलणकर, सोमण.

(२) **खरे जंत्री.**

# अनुक्रमणिका


दत्तोपंत आपटे : व्यक्तिदर्शन १–२९

ले. प्रा. त्र्य. शं. शेजवलकर

## भाग १ ला : ऐतिहासिक घडामोडींची विचिकित्सा

१ इतिहास-तरंगिणी २

सह्याद्रि इ. स. १९३५ पृ. ११३

२ रानडे यांचे मराठयांच्या इतिहासाविषयी विचार १३

सह्याद्रि इ. स. १९४२ पृ १६

३ रजपुतांच्या पराभवाची मीमांसा २९

लेखाक १ ला

,, २ रा

,, ३ रा

चित्रमयजगत्, इ. स. १९३२ पृ ३२७, ३६९, व ४१५

## भाग २ रा : इतिहास लेखन व संशोधन

४ इतिहास लेखन व संशोधन ५०

चित्रमयजगत् इ. स. १९३७ पृ ३७

५ शिवाजीचरित्र व चिकित्साशास्त्र ६०

चित्रमयजगत् इ. स. १९२७ पृ. २३०

६ शिवाजीमहाराजांची खरी जन्मातिथि ६९

शिवचरित्र प्रदीप पृ. २५४–२८९

७ शिवभारत व रा. वाकसकर १०९

विविज्ञानविस्तार नोव्हेबर १९२८

८ शिवाजी महाराजांचीं वसतिस्थानें १११

विविधज्ञानविस्तार सप्टेंबर १९३७

९ शिवकालीन मित्याबद्दल एक प्रश्न ११४

भारतइतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक
वर्ष ३ अं. २।३।४ प. २१–२२

१० कर्नाटकांत शिवपूर्वकालीं मराठीचा प्रवेश ११६

भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष ६ पृ. १८४–१८५

११ ज्ञानेश्वरकालीन गोमांतकी ताम्रपट ११७

भा. इ. सं. मडळ वार्षिक इतिवृत्त शके १८३७ पृ. ८३–८६

१२ शक हें दूषण, सन हें भूषण १२०

लोकशिक्षण, ऑगस्ट १९२९ पृ. ५७४

**भाग ३ रा : मराठ्यांच्या इतिहासावरील स्फुट विचार**

१३ शहाजीच्या जन्मापूर्वीची परिस्थिति व निजामशाहीचा अंत १२४

चित्रमयजगत् इ. स. १९२७ पृ. ३

१४ थोरल्या बाजीरावाच्या ध्येयाची मीमांसा १३०

लोकशिक्षण, मार्च १९३६ पृ. ५८८

१५ पाणिपतचा फेरविचार १३७

भा. इ. स. मडळ त्रैमासिक वर्ष ६ पृ ९७–१०६

१६ मराठेशाहींतील उत्तर दक्षिण वाद १४६

भा. इ स. मडळ त्रैमासिक वर्ष १८ अ. ४ पृ. ११६–११८

१७ सखारामबापू, माधवराव व राघोबा १४८

श्री. स. अ. सहस्रबुद्धेकृत थोरले माधवराव चरित्र प्रस्तावना पृ. ११–१६

१८ पाटीलबावांचें दिल्ली येथील राजकारण १५३

भा. इ. सं मंडळ त्रैमासिक वर्ष ४ पृ. २१–३४

१९ उत्तरेकडील राजकारणांत होळकरांचें स्थान १६७

मालवसाहित्य इंदूर विशेषांक वर्ष ५ अ. १
भाद्रपद श. १८५५; पृ. १७९–१८२

२० मराठी रियासत, उत्तर विभाग, भाग १ व २ पुस्तकपरीक्षण १७२

लेखांक ४ था
लेखांक ५ वा
लेखांक ६ वा
ज्ञानप्रकाश इ. स. १९३० जानेवारी १७, २४ व फेब्रुवारी २

## भाग ४ था : समाजशास्त्र व राजकारण

२१ परांजपे घराण्याच्या अभ्यासावरून सुचणारे महाराष्ट्रीय समाजासंबंधीं स्फुट विचार १८७
श्री. वि. वि. पराजपे कृत परांजपे घराण्याचा इतिहास पृ. ३०९–३५२

२२ स्वराज्याची अखंड आकांक्षा २१२
सह्याद्रि इ स. १९३९ पृ. ४०६

२३ पाश्चिमात्यांची यादवी व आमच्यापुढील प्रश्न २२०
केसरी ता. ६ सप्टेंबर १९४०

२४ लोकमान्यांचें स्मरण (संक्षिप्त) २२५
चित्रमयजगत् इ स. १९२० पृ ३०६

२५ एक अप्रकाशित पत्र २३१

## भाग ५ वा : गणित व ज्योतिष

२६ ज्योतिर्विन् शंकरशास्त्री दीक्षित २३५
चित्रमयजगत् इ स. १९३२ पृ २८७

२७ भारतीय ज्योतिर्गणिताचा अभ्यास २४०
ज्योतिष तत्त्वदर्शन पृ. ९४–९८

२८ अंकगणित व भास्कराचार्य २४८
सह्याद्रि इ. स. १९३७ पृ. ९२५

२९ पाश्चात्त्य पंचांगाची सुधारणा २५४
सह्याद्रि इ स. १९३५, पृ. ५५५

३० भास्कराचार्यांचीं कोष्टकें २५८
भा. इ स. मडळ त्रैमासिक वर्ष २४ अ. २ पृ ५१–५३

३१ शिवकालीन पंचांगशुद्धि २६०
शिवचरित्र प्रदीप पृ. २१९–२२१

३२ शिवकालीन ग्रहसाधन २६२
शिवचरित्र प्रदीप पृ. १३४

३३ पेशवाईतील कालगणनेविषयीं टिपणें २६४
भा. इ. स. मंडळ त्रैमासिक वर्ष २० अं. ४ पृ. १३३–१३६

सूचि २६९

इतिहास-संशोधक

# कै. दत्तात्रय विष्णु आपटे, बी.ए.



जन्म : मि. फाल्गुन शु. १३ श. १८०२ ता. १३ मार्च १८८१

मृत्यु : मि. आश्विन व. १३ श. १८६५ ता. २७ ऑक्टोबर १९४३

## दत्तोपंत आपटे यांचें हस्ताक्षर



### एकश्लोकात्मकं श्रीशिवछत्रपतिचरित्रम्

आदौ तातविमुक्तिरफजलवधः पर्णालतो निर्गमः ।
पश्चादुम्बरखिण्डिराजपुरयोः ताम्रांग्लविद्रावणम् ॥
शास्ताहस्तनिकृन्तनंच सुरतस्याऽऽलुण्ठराग्रापुरान् ।
मुक्तिः, सिंहगडार्जनं नृपपदाप्तिर्दक्षिणे दिग्जयः ॥

'सह्याद्रि'काराच्या अनुमतीनें

# भाग १ ला

# ऐतिहासिक घडामोडींची विचिकित्सा

[प्रस्तुत ग्रंथांत के. आपटे यांनीं लिहिलेल्या विविध लेखांचा संग्रह वर्गवारीनें एकत्रित केला आहे. पहिल्या भागांत आलेल्या लेखांखेरीज के. आपटे यांनीं इतरत्रही ऐतिहासिक घडामोडींची विचिकित्सा केलेली आहे. 'मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास' या त्यांनीं संपादन केलेल्या ग्रंथास जी एक अभ्यासपूर्ण व विवेचक प्रस्तावना लिहिली आहे त्यांतील पृ. १५–२० व पृ. १३१–१३९ हीं अवश्य वाचण्यासारखीं आहेत. पृ. १५ पासून 'ईश्वरी संकेताचें खूळ' या शीर्षकाखालीं के. आपटे यांनीं इतिहासाचें अज्ञान व कलियुग अवतरल्याचा भ्रम या दुहेरी कारणांनीं रजपुतांची मति कशी गुंग झाली त्याचें विवेचन केलें आहे. पुढें पृ. १३१ पासून 'इतिहासलेखकाची मनःस्थिति' या परिच्छेदांत वर्तमानकालीन हकीकतीची मीमांसा करतांना इतिहासलेखकास कोणत्या अडचणी भासतात, औरंगजेबाचा कीर्तिसूर्य उदयाचलावर असतांना त्या काळांत केलेलें विवेचन उत्तरकालीन विवेचनावरून कसें भिन्न असूं शकतें, सारांश ऐतिहासिक घडामोडींची विचिकित्सा सापेक्ष असणें कसें अपरिहार्य आहे याचें सुंदर विवेचन केलें आहे. किंबहुना, के. आपटे यांची ही सर्वच प्रस्तावना फार काळजीपूर्वक अभ्यासण्याजोगी आहे. या प्रस्तावनेंतील इतर महत्त्वाच्या उताऱ्याकडे त्या त्या भागाचे प्रारंभीं वाचकांचें लक्ष वेधिलें आहे. –सं.]

# १

## इतिहास—तरंगिणी

[ गेल्या सहा हजार वर्षांतील एकवीस मानवी सुधारणांचें तुलनात्मक समालोचन. प्रो. टॉइनबी यांच्या 'ए स्टडी ऑफ हिस्टरी' या ग्रंथाच्या पहिल्या तीन खंडांचा परिचय. ]

इंग्लडातील सुप्रसिद्ध विद्वान् लेखक प्रोफेसर आर्नाल्ड जे टॉइनबी यानी इतिहासविषयक वाङमयात उत्तम प्रकारे भर घालणारी अशी एक ग्रथमाला प्रकाशित करण्यास गतसाली सुरुवात केली आहे भारतासारख्या या प्रचड ग्रथाची तेरा पर्वे असून त्यातील पहिल्या तीन पर्वाचा एक हप्ता नुकताच प्रसिद्ध झाला; आणि बाकीचा ग्रथ आणखी दोन हप्त्यानी प्रसिद्ध होणार आहे कौरव-पाडवामधील युद्धाचें वर्णन देण्याच्या मिषाने भारतकाराने ज्याप्रमाणे "भारतोच्छिष्ट जगत् सर्व" ही म्हण प्रचारात येण्याजोगा सर्वांगसुदर ग्रथ निर्माण केला, त्याप्रमाणे सुधारणाचरित्र हा वर्ण्य विषय पुढे करून यच्चयावत् ऐतिहासिक वाङमयातील, पाश्चात्य विद्वानाच्या मते निघणारे, सार वाचकाना उपलब्ध करून देण्याची योजना या नव्या ग्रथाने होईल असे दिसते. अनेक लेखकानी श्रमविभागाच्या व सहकार्याच्या तत्त्वावर निरनिराळचा राष्ट्राचे व निरनिराळचा कालखडाचे इतिहास लिहून त्याची एक कोशवजा ग्रथमाला गुंफण्याचे प्रयत्न गेल्या पचवीस वर्षांत बरेच झाले; पण एकाच लेखकानें सर्व ज्ञात कालखडाचा व सर्व देशाचा इतिहास लक्षांत घेऊन तो एका सूत्रांत गोवण्याचा फारसा प्रयत्न कोणी केला नव्हता. नाही म्हणावयास या दिशेने एच्. जी. वेल्स याचा एक (धि औटलाईन ऑफ हिस्टरी) नाव घेण्याजोगा ग्रंथ लोकांपुढे आहे पण त्यात देखील कालानुक्रमाने माडणी केली गेल्यामुळे विषयाच्या बाबतीत लेखकाला एकसूत्रता साधता आली नाही; आणि वाचकालाहि अनुसधान ठेवणें जड जाते. पण 'इतिहासाचा अभ्यास' (ए स्टडी ऑफ हिस्टरी) या ग्रथाचे लेखन, काल किंवा देश याच्या अनुसधानाने न करता तत्त्वज्ञानाच्या पायावर केल्यामुळें वाचकाला क्रमाक्रमाने पुढच्या पायरीवर जाण्यास अडचण पडत नाही. कीर्तनकार ज्या पद्धतीचें एकादे तत्त्वप्रतिपादक लहानसे वाक्य, नमनापासून आरतीपर्यंत, कायम ठेवतो आणि हे पालुपद उकलून सागताना अनेक सिद्धान्ताची व लहान-

मोठ्या कथानकांची ओळख श्रोत्याना करून देतो त्या पद्धतीनें टॉइनबीने आपल्या ग्रथाची रचना केलेली दिसते. आता हें खरे की, पालुपद अद्वैतपर असावे कीं द्वैतपर असावे, आणि भक्तिपर असावे की कर्मपर असावें, याविषयी नियम सागता येणार नाही, त्याची निवड कीर्तनकाराने आपल्या इच्छेप्रमाणें करण्यास हरकत नसते; पण एकदा निवड केल्यानंतर ते तत्त्व चराचर सृष्टीत सर्व व्यवहाराच्या मुळाशी असते असें प्रतिपादन करण्याची पद्धति त्याने अंगिकारिली पाहिजे या न्यायाने प्रो टॉइनबी याच्या मते ऐतिहासिक घडामोडीच्या किवा मानवी व्यवहाराच्या मुळाशी भरतीओहटीचे किंवा चढउताराचें (ऱ्हिदम्) तत्त्व दिसते व आजवर होऊन गेलेल्या व चालू असलेल्या सर्व सुधारणा म्हणजे समुद्रावर एकामागून एक येणाऱ्या लाटाचा किंवा तरगाचा देखावा आहे, असा या ग्रथातील प्रतिपादनाचा ओघ आहे तो लक्षात घेतला असतां या ग्रथाचा उल्लेख ‘ इतिहास–तरगिणी ’ या सामासिक शब्दाने करण्यास हरकत नाही.

## सुधारणांचा जन्म व विकास

आजपर्यंत रूढ असलेली कालानुक्रमपद्धति सोडून इतिहासाच्या मांडणीसाठी तरगिणीकाराने कीर्तनपद्धतीचे अवलबन केलें असून त्याला सुधारणा-चरित्र वर्णन करावयाचे आहे. अर्थात् व्यक्ति अगर राष्ट्र याचे महत्त्व सागण्याचा त्याचा हेतु नाही. सुधारणा जन्मास कशी येते, ती कशी वाढते आणि निरनिराळ्या अवस्थातून जाऊन तिला मृत्यु कशाने येतो, याचें सोपपत्तिक विवेचन करणे हा या ग्रथाचा प्रतिपाद्य विषय आहे मनुष्य समाजाची प्रथमावस्था सपून त्यांत पहिली सुधारणा फक्त सहा* हजार वर्षापूर्वी जन्मास आली व तेव्हापासून आजतागायत एकवीस सुधारणा जन्मल्या. त्यापैकी चौदा मरण पावल्या. व दोन मुमूर्षु स्थितीत आहेत अर्थात् आज जगात नाव घेण्याजोग्या पाचच सुधारणा नादत आहेत इतक्या गोष्टी गृहीत धरून निरनिराळ्या सुधारणाचा उत्कर्षापकर्ष व त्यांचे परस्पराशी सबध कसे येतात व त्याचें एकमेकाशी नाते काय असते यांचा विचार या ग्रंथात केलेला आहे.

सुधारणा जन्मास येण्याच्या वेळी कोणती परिस्थिति असावी लागते व तिची वाढ होण्यास अगर वाढ खुटण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत होते याचा विचार, विद्यमान सुधारणा कशा जन्मल्या, वाढल्या अगर खुटल्या याच्या विवेचनापासून या ग्रंथांत केला आहे, आणि या विवेचनांतून निघणारे सिद्धान्त

---

* सर जेम्स जीन्स याने यासबधी दिलेले आकडे असे आहेत.–पृथ्वीचें वय २ अब्ज वर्षे; पृथ्वीवर प्राणोत्पत्ति होऊन ३० कोटी वर्षे; मानवोत्पत्ति होऊन ३ लाख वर्षें आणि सुधारणोत्पत्ति होऊन ६ हजार वर्षे झाली. ( धि युनिव्हर्स अरौंड अस, पा. ३३.)

माजी सुधारणांना लागू करीत करीत ग्रंथकाराने नवीन सिद्धान्ताचें प्रस्थापन केलें आहे.

उदाहरणार्थ, आज पांच सुधारणा विद्यमान आहेत; त्यांची नांवें १ पाश्चात्य, २ पुराणवादी, ख्रिस्ती, ३ इस्लामी, ४ हिंदु आणि ५ पौरस्त्य (फार ईस्टर्न) अशी सांगतां येतील. आणि या पांच सुधारणा जन्मास येऊन हजार बाराशें वर्षांपेक्षां अधिक काळ लोटला नाही. त्यापैकी हिंदु सुधारणेचा विचार केल्यास तिचा जन्म वैदिक किंवा आर्य सुधारणेच्या पोटी झाला. मोहेंजोदारो येथील उत्खननानें ज्ञात झालेली पांच हजार वर्षांपूर्वीची सुधारणा वेदपूर्वकालीन असली तरी ती वैदिक सुधारणेची जननी नव्हे. आर्य लोक चार हजार वर्षांपूर्वी पंजाबांत आले व त्या वेळी वैदिक सुधारणेचा जन्म झाला पुढे या सुधारणेविरुद्ध बुद्धाने बंड उभारून पहिला धक्का दिला. आणि अशोकादि सम्राटाच्या मनावर बौद्ध-मताची छाप बसल्यानंतर वैदिक समाज विस्कळित झाला. बौद्धमताचे साम्राज्य सातशें वर्षें टिकलें. त्यानंतर त्यास उतरती कळा लागून बौद्धमतविरोधी अशा गुप्तांचे साम्राज्य उभारण्यांत आले. या साम्राज्यावर हूणादि परकीय रानटी लोकाचे हल्ले होऊन गुप्त साम्राज्य लयास गेले. त्यानतर धर्मदृष्ट्या समाजाचे एकीकरण करण्याचा प्रयत्न झाला. त्यांत हिंदु सुधारणा जन्मास आली. तिचा पहिला प्रवर्तक ऋषि म्हणजे आद्य शंकराचार्य. अर्थात् हिंदु सुधारणा तेव्हा-पासून आतांपर्यंत हजारबाराशें वर्षे हिंदुस्थानात नांदत आहे. या ठोकळ हकीकती-वरून सुधारणेच्या जन्मकालीन परिस्थितीविषयी सामान्य सिद्धान्त निघतात ते असे :—हिंदु संस्कृति आर्य संस्कृतीला मानणारी असली तरी या दोहीच्यामध्ये बौद्धमताचा सुमारे हजार वर्षांचा खड पडल्यामुळे तिच्यात वैदिक मत व बौद्ध मत यांचे मिश्रण झालेले आहे. उदाहरणार्थ, यज्ञयागाचे महत्त्व वैदिक धर्मांत अतोनात होतें; बौद्धमताने याचा निषेध करून सन्यासाश्रमाची नवी प्रथा पाडली. हिंदु सुधारणेने यज्ञास प्राधान्य दिले नाही व संन्यासाश्रमाच्या स्वीकारास मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणें वैदिक व बौद्ध या दोनही धर्मांत न आढळणारी मूर्तिपूजेची प्रथा हिंदु धर्मांत आढळते. ती तत्बाह्य समाजांतून आली असली पाहिजे. यावरून जुनी सुधारणा नाहीशी होऊन नवी जन्मास येण्याशी, व्यापक धर्म व व्यापक साम्राज्य आणि परकीयांचे आक्रमण, या त्रयीचा सबंध पोचतो. समाजांतील बहुसंख्य भागास धार्मिक जीवन मिळेनासें झाले म्हणजे नव्या बंडखोर धर्माची ध्वजा उभारली जाते. आणि सुधारलेल्या समाजास परकीयांच्या हल्ल्यापासून बचावण्यासाठी साम्राज्याचा अवतार होतो. पण परकी-यांच्या हल्ल्यापासून टिकाव न लागल्यामुळे साम्राज्य मोडलें तरी त्या परकी-यांना आत्मसात् करून नवीन सुधारणा जन्मास येते. गुप्तांचें साम्राज्य मोडून हूणादि परकीयांचीं राज्यें अस्तित्वांत आली. त्यांना पचवून हिंदु सुधारणा

जन्मास आली. यावरून अडचणीच्या परिस्थितीत डोकें वर काढण्याची हिंमत व ताकद ज्या ठिकाणी दिसते तेथें नवी सुधारणा जन्मास येते असें म्हणण्यास हरकत नाही.

## प्रत्याघात न्याय

पाश्चात्य सुधारणेच्या जन्मकालीन परिस्थितीवरूनहि वर सांगितलेल्या सिद्धान्ताचेच दृढीकरण होतें. पाश्चात्य सुधारणा ही ग्रीक सुधारणेच्या पोटांतून निघाली. परतु ती निघण्यापूर्वी मध्यतरी पुष्कळच घडामोडी झाल्या. ग्रीक सुधारणेची वाताहत झाल्यानतर रोमन साम्राज्याचा काळ होऊन गेला; व हें साम्राज्य रानटी अशा परकी लोकानी मोडल्यानतर ख्रिस्ती धर्माच्या व्यापक तत्त्वानुसार समाजाचे एकीकरण करण्याचा प्रयत्न सुरू झाला. परंतु रोमन साम्राज्य मोडल्यानतर युरोपभर समाजात राजकीय दृष्ट्या जी भांडखोरपणाची व कज्जेदलालीची प्रवृत्ति बळावली तिने धर्माच्या व्यापक तत्त्वास बगल देऊन राष्ट्रीयत्वाची कल्पना रूढ केली आहे. वस्तुत: युरोपातील सुधारलेले देश सस्कृतीच्या दृष्टीनें समरस होण्याजो`आहेत; पण राष्ट्रीयत्वाच्या* कल्पनेनें पछाडल्यामुळे या सुधारलेल्या समाजात ऐक्याची कल्पना रुजण्यांत अडचण उत्पन्न झाली आहे; पण युरोपांत ही अडचण असली तरी पाश्चात्य सुधारणा अमेरिका व आशिया या खडांतून झपाट्याने फैलावत आहे. तात्पर्य, ग्रीक सुधारणा मोडल्यानतर साम्राज्याची स्थापना होणें, परकीयांच्या आक्रमणानें साम्राज्य लयास जाणें, नतर व्यापक धर्माची स्थापना होणें आणि पुढे नवी सुधारणा जन्मास येणें हा अनुक्रम पाश्चात्य सुधारणेच्या बाबतीतहि दिसतो.

अडचणीच्या प्रसंगी तोड म्हणून प्रत्याघात न्यायाने नवी सुधारणा जन्मास येते, या सिद्धान्ताची सत्यता इस्लामी सुधारणेच्या जीवनचरित्रांतहि दिसून येते. रोमन सुधारणेची छाप अनेक शतकापासून पडल्यामुळे अरबस्थानच्या सरहद्दीवरचा भाग सहाव्या व सातव्या शतकात प्रत्यघातासाठीं उत्सुक बनला होता. अशा वेळी एकेश्वरी वाद व कायद्याचे राज्य या दोन कल्पनांचें महत्त्व जुन्या सुधारणाच्या अवशेषातून महमदाच्या मनास पटलें व त्याच्या अंत:करणांत

---

* राष्ट्रीयत्वाच्या भावनेने युरोपात माजविलेली अहमहमिका लक्षांत घेऊन प्रो. टॉइनबी याने राष्ट्रीयत्वाची व्याख्या सांगण्याच्या कामी पुढे दिलेली शब्दयोजना केली आहे :— The spirit of nationality may be defined ( negatively but not inaccurately ) as a spirit which makes people feel and act and think about a part of any given society a though it were the whole of the society. (Vol. I. p.9)

इस्लामी धर्माची कल्पना उद्भवली. ही कल्पना अरबस्थानांत रुजण्यास अनेक अडचणी होत्या. कारण, तेथे मूर्तिपूजा रूढ होती; व त्याना महंमदाचा निराकार देव पटणें शक्य नव्हतें. महंमदाने बारा वर्षेपर्यंत आपल्याकडून प्रयत्नाची पराकाष्ठा केली; तरी त्याच्या धर्मास फारसे अनुयायी मिळाले नाहीत. या अवधीत मक्केच्या लोकानी चिडून त्याचा निकाल लावला असता. पण महंमदाचा चुलता तेथील टोळीचा मुख्य असल्यामुळे ही गोष्ट घडली नाही. नवी धर्ममतें प्रसृत केल्याबद्दल येशूख्रिस्तास देहान्त प्रायश्चित्त देण्याचें काम तत्कालीन राज्यकर्त्यांनीं केले होते. परतु मक्केस बेबंदशाही असल्यामुळे महंमदाचा निकाल याहि पद्धतीने लागू शकला नाही.

अशा रीतीनें महंमदाचे म्हणणें मक्केच्या लोकांना पटत नाही व लोकानाहि महंमदाचा कायमचा निकाल लावता येत नाही, अशा स्थितीत हे घोगडे बारा वर्षे भिजत पडलें. तथापि महमदाने आपला शांततेचा मार्ग सोडला नाही परतु यानंतर मदीनाच्या बंदरात जाऊन त्याने तरवार हाती घेतली व तो लढाऊ बनला. पुढे तो थोडीच वर्षे जिवत होता.* तरी तेवढ्या अवधीत त्याने पाडलेली युद्धाची प्रथा त्याच्या मृत्यूनंतर अरबस्थानांत झपाट्यानें रुजली व इस्लामी साम्राज्याने युरोप व हिंदुस्थान पादाक्रात केले. पण तात्त्विक दृष्ट्या असें म्हटले पाहिजे की, मदीना येथील लोकानी महमदास बोलावून त्याच्या शांततेच्या उपदेशाची परीक्षा आरंभिली तेव्हां तो त्या परीक्षेत उतरला नाही, व त्यानें शांततेचा मार्ग सोडून मुत्सद्याची भूमिका पत्करली. यात महंमदानें जाणूनबुजून वाममार्ग पत्करला असे म्हणता येणार नाही. पण धर्माच्या संदेशास राजकीय सत्तेची जोड देण्यांत महंमदाने चूक केली व या चुकीच्या विषाने इस्लामी सुधारणेची वाढ राजकीय कल्पनेविरहित स्वतंत्र मार्गाने करणें कठिण करून ठेवले असे प्रो. टॉइनबी यांनी प्रतिपादन केले आहे.*

## राज्य व धर्म

वरील तीन उदाहरणांवरून संस्कृति व सुधारणा याचा जन्म राजकीय व धार्मिक घडामोडींत होत असला तरी राज्य व धर्म यांच्या कल्पनेहून सुधारणेची कल्पना निराळी आहे हे लक्षांत येण्याजोगें आहे; कारण पाश्चात्य सुधारणेच्या कक्षेत ज्या राष्ट्रांचा समावेश होतो ती राष्ट्रे एकछत्री साम्राज्याच्या छायेत

---

* The temporal power with which the Arabian prophet endowed—or encumbered—his Islam at this critical point in his career has proved to be not a vehicle but a poison-house which has cribbed and cabined and confined the spirit of Islam ever since. (vol. III p. 471.)

नाहीत आणि ख्रिस्ती धर्माशीं तर त्यांनी फारकतच केल्यासारखी आहे. त्याअर्थी पाश्चात्य सुधारणेला राजकीय व धार्मिक आधार नसून देखील ती वाढू शकते, असे म्हणावें लागेल. इस्लामी सुधारणेच्या जन्मकाळी धर्म व साम्राज्य यांची जोड त्यास मिळाली होती, तरी इस्लामी साम्राज्याचा अंत झाल्यानंतर इस्लामी राज्यकर्त्यांनी धर्माशी राज्याचा संबंध तोडून टाकण्याचा उपक्रम केला आहे. यावरून त्याहि सुधारणेला एकछत्री साम्राज्य व राजाश्रयी धर्म याची कल्पना सोडून कसें जगावयाचे हा प्रश्न सोडवावा लागेल. आणि हिंदु सुधारणा शंकराचार्यांच्या वेळी जन्मास येऊन धर्मदृष्टया तिला आसन मिळालें आहे असे मानल्यास तिला त्यानंतर मराठ्यांच्या अमदानीत थोडीशी साम्राज्याची छाया लाभली होती. परंतु ती संपल्यानंतर आता पाश्चात्य¶ संस्कृतीच्या विचार-सरणीने येथील हिंदु समाजाचा पाया उखडला जात असल्यामुळे धर्माचा व स्वराज्याचा आसरा नसताहि हिंदु संस्कृति कशी टिकवावयाची हा प्रश्न सोडवावा लागेल.

## नैसर्गिक परिस्थिति व वंश

धर्म, साम्राज्य, देश व राष्ट्र यांच्या आधारावाचून सुधारणा जगू शकते व वाढू शकते हे सांगितल्यानंतर नैसर्गिक परिस्थिति व वंश यांचा संबंध सुधारणेच्या जन्माशी व वाढीशी कितपत पोचतो हें पाहणें अगत्याचें होऊन बसतें. कारण सुधारणेचे अस्तित्व थंड हवेंतल्या वातावरणात व समशीतोष्ण कटिबंधातच शक्य असते आणि सुधारणेची ध्वजा उभारण्याचे सामर्थ्य गोऱ्या कातडीच्या आणि विशिष्ट वंशाच्या लोकांतच आढळते असा समज बऱ्याच मोठ्या प्रमाणावर रूढ करण्यांत आला आहे. प्रो. टॉइनबी यांनी आपल्या ग्रंथांत ही दोनहि मते उत्तम रीतीनें खोडून काढली आहेत. त्यातल्या त्यांत गोऱ्या कातडीचे महत्त्व, साम्राज्यवादी इंग्रजांकडूनच जगभर मांडले गेले आहे असे त्याचे म्हणणे आहे. वंशाची मूळ कल्पना बायबलात असली तरी रोमन क्याथॉलिक धर्मप्रसारावर अधिक लक्ष ठेवणारे व प्रॉटेस्टंट हे राज्यप्रसारावर नजर देणारे होते यामुळे प्रॉटेस्टंट इंग्रजांनी युरोपेतर खंडांतील लोकांशी वाग-

---

¶ पाश्चात्य संस्कृतीचा मारा हिंदुस्थानात समुद्रकांठाकडील भागातून मुख्यत्वेकरून होत असलेमुळे तिला प्रत्युत्तरादाखल उपयोगी पडणाऱ्या कल्पना देखील मुंबई इलाख्यातच निघत आहेत हे सांगतांना हा लेखक म्हणतो :— "It is the Bombay Presidency from Poona to Ahmedabad, that is producing the foremost politicians and industrialists and saints and thinkers in India in our generation. (Vol. II p 128)

तांना कांही नव्या कल्पना रूढ केल्या. उदाहरणार्थ, अमेरिकेंत वसाहत करतांना इंग्रजांनी रानटी जनावराबरोबर तेथील मूळ रहिवाशांचीहि शिकार करून त्यांचा नायनाट केला. आफ्रिकेतील नीग्रो लोकांना त्यांनीं गुलाम बनवून गुरा-ढोरांप्रमाणें त्यांना विक्रेय प्राणी बनविलें आणि गुलामगिरीची पद्धति बंद पाड-ण्याच्या कामी अत्यत निकराचा विरोध कोणी केला असेल तर तो अमेरिकेंतील इंग्रजी भाषा बोलणाऱ्या प्रॉटेस्टंट समाजाने, अशीच इतिहास साक्ष देतो.

हिंदुस्थानांत हे दोनहि मार्ग मोकळे नव्हते. हिंदुस्थानची लोकसख्या फार मोठी व तेथील लोक बरेच सुधारलेले असे असल्यामुळें व हिंदुस्थानच्या हवेंत इंग्रजाना स्वास्थ्य लाभण्याजोगे नसल्यामुळे हिंदी लोकांना नाहीसे करणें अगर त्यांना गुलाम बनविणें या कल्पना इंग्रजांना सोडाव्या लागल्या. पण हिंदी लोकांच्या सपर्कापासून कडक रीतीने अलिप्त राहाण्याच्या बाबतीत इतर सर्व पाश्चात्य राज्यकर्त्यांवर त्यानी ताण केली आहे, आणि हिंदुस्थानात जशी काही जातिभेदाची कल्पना नव्हती व ती आपण नव्यानेच शोधून काढली अशा थाटानें ते या भेदभावास चिकटून राहण्याचा आग्रह धरीत आहेत.*

थड हवा अगर विशिष्ट भौगोलिक परिस्थिति याची आवश्यकता सुधार-णेच्या जन्मास असते हा भ्रम तर तरंगिणीकाराने फारच चांगल्या रीतीनें चुकीचा ठरविला आहे. कारण निरनिराळ्या देशांत जन्मलेल्या एकवीसहि सुधारणांच्या उत्पत्तीचा विचार करू लागतांच हा समज नाहीसा होतो; त्याचप्रमाणें सुधारणेचें मूळ रोपटे युरोपात जन्मले आणि तेथून ते जपानादि देशांत गेले असाच प्रकार इतरत्र नसेल कशावरून, याहि शंकेचे निरसन होतें. कारण गेल्या सहा हजार वर्षांत ज्या एकवीस सुधारणा अस्तित्वांत आल्या त्यांपैकी फक्त पधराचा संबंध जुन्या सुधारणांशी पोचतो; पण सहा सुधारणा अगदी स्वयंभु जन्मल्या व त्याहि जगांतील निरनिराळ्या भूप्रदेशात जन्मल्या असे उपलब्ध माहितीवरून निश्चित-पणें सांगतां येतें. तात्पर्य, सुधारणेचा जन्म विशिष्ट वंशाच्या लोकांत अगर विशिष्ट हवेंत अगर अमूकच भूप्रदेशांत होतो असें मानण्यास यत्किंचित् आधार सापडत नाही. (Vol. I. p. 270)

* The English Protestant rulers of India have distinguished themselves from all other contemporary Western rulers over non-Western peoples by the rigidity with which they have held aloof from their subjects. They took to the Hindu Institution of caste as readily as if they had not found it established in India when they came but had invented it for their own convenience. (Vol. I p. 213)

कित्येक धर्मसंस्थापकांच्या भौगोलिक अज्ञानामुळे आणि साम्राज्यवाद्यांच्या अहंतेमुळे परमेश्वर अमुक धर्माच्या लोकांनाच मुक्ति देतो अगर साम्राज्य चालविण्याची योग्यता अमक्या लोकातच असते असे समज रूढ होतात; पण या अज्ञानमूलक समजुतींना न जुमानता अत्यंत अडचणीतून डोके वर काढणें हेंच सुधारणेचे लक्षण असल्यामुळे तिला कालस्थलाची अगर वंशशुद्धीची कसोटी मुळीच लागू पडत नाही. तिची खरी कसोटी 'आव्हान व जबाब' (चॅलेंज अँड ए रिस्पॉन्स) या दोन शब्दांत समर्पक रीतीने सागतां येते. अडचणीचे स्वरूप ज्या मानाने अधिक खडतर असेल त्या मानाने अधिक कणखर अशी सुधारणा जन्मास येते.

## सुधारणेची वाढ कां खुंटते ?

तथापि सुधारणा जन्मास आली तरी तिची नेहमी वाढ होतेच असे नाही; तिची वाढ खुटल्याचीहि उदाहरणे आहेत उदाहरणार्थ, एस्किमो समाजाने शीतकटिबधात प्रवेश करून तेथल्या हवेशी कसे झगडावे, कोणत्या महिन्यांत कोठें रहावे आणी तेथील माशाची शिकार कशी करावी वगैरे बाबतीत अत्यंत आश्चर्यकारक शोध लावून त्या प्रदेशात जीवन शक्य केले आहे. पण त्यानतर त्यांचें पाऊल पुढे पडू शकले नाही कारण तेथे त्यांना केवळ जगण्यासाठी इतकी यातायात करावी लागते व इतके यत्रवत् रहावे लागते की, त्या आयुष्यक्रमांत नवीन कल्पना सुचण्यास अवसरच रहात नाही. यामुळे या समाजाची सुधारणा खुटली आहे.

वाळवटाच्या मैदानात अगर डोंगरी मुलखात अधून मधून आढळणाऱ्या हिरवळीच्या ठिकाणी मेढरे अगर गुरे चारून उपजीविका करणारे समाज देखील परिस्थितीशी झगडताना एक प्रकारची सुधारणा अस्तित्वांत आणतात. पण त्याना देखील आपले कळप जगविण्यासाठी कोणत्या महिन्यात कोणत्या ठाण्यावर चारा मिळू शकेल व पुढचा मुक्काम कोणत्या दिशेने केला पाहिजे या बाबतीत अत्यंत सावधगिरी बाळगावी लागते. कारण त्यांत यत्किंचित् चूक झाल्यास कळपातील गुरावर व त्याबरोबर गुराख्याच्या कुटुंबातील माणसांवर उपाशी मरण्याची पाळी येते. पण निसर्गाच्या इतक्याहि कडक आव्हानाचा स्वीकार करून माणसे, माणसाळलेली गुरे व कुत्री याच्या सहकार्याने जगणारा समाज चागलीच अक्कलहुशारी दाखवितो. पण पुढे त्यालाहि आपली अक्कल वाढविण्यास अवसर रहात नाही. ऋतुमानाप्रमाणे ठाणें बदलीत त्याला आयुष्य कंठावें लागते; आणि त्या ठिकाणी अवर्षणाचा फेरा आला म्हणजे त्याची धांदल उडते. आधुनिक शास्त्रज्ञांनी ठरविलेला कालचक्राचा फेरा खरा असल्यास दर सहाशें वर्षांनी अशा गोपाल व मेढपाळ समाजाना ( आपल्या परंपरागत प्रदेशांत पाऊस पडत नाही असें पाहून ) देशत्याग करावा लागतो. अर्थात् हे

रानटी समाज मोकाटपणे भटकत सपाट मैदानांत आले म्हणजे त्यांना ( शेतीवर जगणारे ) मऊ वृत्तीचे लोक भेटतात; आणि त्याच्या झटापटीत या कणखर वृत्तीच्या लोकाचा जय होतो व ते राजे बनतात. अशा रानटी लोकाचे हल्ले कृषिप्रधान समाजावर झाल्याची जंत्री देऊन त्यांचा मेळ हवामानाच्या सहाशे वर्षाच्या कालचक्राशी बसतो, हें दाखविण्यासाठी प्रो. टॉइनबी यानी पुष्कळच जागा खर्ची घातली आहे व बारकाईने विवेचन केलें आहे. येथे आपणास विषयानुरोधाने इतकेच लक्षात घ्यावयाचें आहे की, हे रानटी लोक धाडसी व कणखर असल्यामुळे अनेक लोकांना जिंकू शकले. पण त्याना आपले राज्य फार दिवस टिकविता आलें नाही. आणि दर सहाशें वर्षांनी कालचक्राच्या फेऱ्यास अनुसरून मैदानात धावून येणारे हे रानटी पण शूर वृत्तीचे लोक विशिष्ट वंशाचे अगर रक्ताचे अगर भाषेचे होते असे नाही अर्थात शौर्याचा मक्ता अमुक वंशाच्या लोकांना मिळाला होता असें वरील उदाहरणावरून तरी दिसत नाही.

## रानटी लोकांचें आक्रमण

या रानटी लोकाच्या आक्रमणाने प्रस्थापित झालेली राज्ये फारशी टिकली नाहीत असे वर सांगितले त्यास काही अपवाद होते. मुसलमानी धर्माच्या अनुयायांनी केलेल्या आक्रमणाचा समावेश या अपवादात करावा लागतो पैकी इसवी सन १३७१ पासून १७७४ पर्यंत चारशे वर्षे पुराणवादी ख्रिस्ती समाजावर तुर्कांनी साम्राज्य चालविले याचा अर्थ लक्षात घेणे अवश्य आहे या ठिकाणीच या लोकांचे राज्य रुजण्याचे कारण रोमन साम्राज्य मोडून दक्षिण युरोपांत त्या वेळी अराजक माजलें होते; यामुळे राजकीय दृष्टया कोणातरी जबरदस्त क्षात्रवृत्तीच्या लोकाची तेथे जरूरीच होती; व ती अडचण या रानटी लोकाच्या आगमनाने दूर झाली. पण राज्यपद हाती येताच हे लोक शेवटी आपल्या वळणावर गेले. ते रानात वावरत होते तोवर त्यानी कुत्र्यांच्या साहाय्याने बाह्य शत्रूंशी झगडण्याचा क्रम ठेवला होता व आपल्या ताब्यातल्या गुरांनी आपणास बिनबोभाट दूध पुरविलें पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. तीच दृष्टि थोड्या फार फरकाने ते बादशाह बनल्यावरहि कायम राहिली. फरक येवढाच की, कुत्र्यांच्या ऐवजी त्यानी गुलामाची सैन्ये तयार केली व गुरांच्या ऐवजी आपल्या राज्यांत राहाणाऱ्या दोन पायाच्या मानवी प्राण्यानी बिनबोभाट कर देऊन राजवर्गांची पोळी पिकविली पाहिजे असे ठरविले. यामुळे या राज्यांतील प्रजा गाईप्रमाणे गरीब व सैन्यातले लोक कुत्र्याप्रमाणे धन्याखातर जीव देणारे बनले होते. या तुर्की राज्यात सैन्याची भरती करतांना जी पद्धति प्रचारात होती तीहि माणुसकी नाहीशी करणारीच होती. कारण युद्धांत धरून आणलेलीं मुलें प्रथम कोंडून ठेवून आईबापाची आठवण त्याच्या मनांतून गेल्यानंतर त्यांची तपासणी

करण्यांत येई! आणि जे हाडापेराने चांगले दिसतील त्याची गणना दरबारी गुलाम वर्गांत करून इतर मुले सुखवस्तु लोकांना अगदी स्वस्त भावाने विकण्यांत येत. ती मुलें त्या मालकांनी वाढवून त्यांना गुलाम म्हणून वागवावी पण सरकारी मागणी आल्यास त्यानाहि सैन्यांत पाठविले पाहिजे, असा करार असे. खास बादशाही परिवारासाठी निवडलेल्या गुलामांना खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवून लष्करी शिक्षण देण्यात येत असे; व शत्रूशी झगडताना तेहि उत्तम कुत्र्याप्रमाणे धन्याची आज्ञा पाळीत. तात्पर्य, या राज्यांत सर्व सैनिक वर्ग व स्वतः बादशाह यांची गणना 'गुलाम' या नावाने होत असे. पण हेच गुलाम बाप झाले म्हणजे त्याची योग्यता कमी मानण्यात येई व त्याच्या मुलाबाळाना दुय्यम जागांवर समाधान मानावे लागे. कारण नव्या गुलामाकरिता वरिष्ठ जागा राखून ठेवाव्या लागत. तथापि हा क्रम आपोआप खुटणारा होता कारण तुर्कांना जबरदस्तीने आक्रमता येण्याजोगा जो प्रदेश होता तो सारा प्रदेश त्याच्या साम्राज्यात सामील झाल्यानतर व त्या पलीकडील प्रदेशात याच्याहि वरकडी करणारे मारक शस्त्रधारी अवतरले, तेव्हा नवीन गुलामाची भरती करणें अशक्य होऊं लागले एवढेच नव्हे तर त्या शत्रूशी वागतांना पड खाऊन तहाची बोलाचालीहि करावी लागली. यामुळे तरवार न धरणारे असे लेखणीबहाद्दर लोक तुर्की बादशाहाना आपल्या खलबतखान्यात घेणे भाग पडले त्याबरोबर गुलामांच्या व गरीब प्रजेच्या म्हणजे कुत्र्याच्या व जनावरांच्या आधारावर उभारलेले राज्य झपाट्याने कोलमडून पडले.

या उदाहरणावरून सुधारणा जन्मास आली तरी तिची वाढ भलत्या दिशेने झाल्यास पुढे तिचा मार्ग खुटतो, असे ठरते त्या अर्थी सुधारणेची वाढ कोणत्या नियमानुसार होते याचा शोध लावणे शिल्लकच राहते. या वाढीचा विचार या ग्रथाच्या तिसऱ्या खडांत केलेला आहे. त्याचे तात्पर्य असें की, सुधारणेच्या जन्मानंतर अंतस्थ व बहिस्थ प्रश्न उपस्थित होत राहतात; व ते सोडवितांना समाजाला वाचा फुटते, म्हणजे त्याला स्वयनिर्णयाची जरुरी भासते. विशेषेंकरून समाजातील बहुसंख्य भागाला मिळणारे जीवन व त्यांतील निवडक लोकांना मिळणाऱ्या सवलती यांतील भेदामुळे अडचणीचे प्रश्न उद्‌भवतात, तेव्हा बहुतेकांची मति कुंठित होते. अशा वेळी कांही विचारी लोक समाजातून एकीकडे निघून एकांतवास पत्करतात व योग्य मार्ग सुचला म्हणजे तो लोकाना पटवून देण्यासाठी बहुसंख्य लोकांशी व सत्ताधारी वर्गांशी झगडतात. या झगड्यांत सुधारणेचें पाऊल पुढें पडतें. पण अशा रीतीने हा झगडा संपला म्हणजे एक प्रकारचें स्वास्थ्य उत्पन्न होतें. पण या स्वास्थ्याच्या नादी समाज लागला तर त्याची प्रगति बद पडते. कारण सुधारणा ही एकसारख्या धावत सुटलेल्या माणसाच्या कृतीप्रमाणें नेहमी गतिमान असते. एक पाऊल टेकलें तरी दुसरें अधांतरी व गतिमान पाहिजे

आणि दुसरें टेकतांच पहिलें उचललें पाहिजे; तर जो पल्ला गाठावयाचा आहे त्या दिशेने प्रगति होण्याचा सभव असतो. तथापि सुधारणला शेवटचा पल्ला असा गांठताच येत नाही; व केव्हाहि 'याच्यापुढे अजून धावलें पाहिजे', असे नेहमीच भासत राहते. यामुळे एखादी सुधारणा कुठित होईल किंवा तिचा अत होईल, पण सुधारणेची आवश्यकता नाहीशी होणार नाही.

## प्रो. टॉइनबी यांचा उपदेश

या दृष्टीने पाश्चात्य सुधारणेला अडचणीचे दिवस येण्याची लक्षणें दिसतात. ती अशी :—कोणत्याहि समाजात एका तोलाची अशी अनेक राज्ये अस्तित्वांत येतात तेव्हां मध्यवर्ति राज्याचा चोहोंकडून कोडमारा होतो व सभोवारच्या सर्व राज्याच्या रेटारेटीशी त्याला तोड द्यावें लागतें, आणि मध्यवर्ति सत्तेने कितीहि पराक्रम दाखविला व अक्कलहुषारी लढविली तरी तिच्या आक्रमणाला वाव नसल्यामुळे शेवटी या सत्तेची ताराबळ * उडते. या न्यायाने पाश्चात्य सुधारणा आत्मसात् करण्याचा यशस्वी प्रयत्न आशियातील कित्येक देशांनी केला व अमेरिकेतील सत्ता तर प्रत्यक्ष युरोपीय संस्कृतीची साक्षात् मुलगीच आहे. पण ही मुलगी आता मोठी होऊन कोणत्याहि पाश्चात्य देशाला भारी ठरण्याजोगी आहे. त्याचप्रमाणे कानडा, आस्ट्रेलिया, द. अफ्रिका, हिंदुस्थान व चीन यानाहि पाश्चात्य सुधारणेच्या दृष्टीने युरोपांतील अनेक सुधारलेल्या देशसमूहाची बरोबरी करण्यास काही कालावधि लागेल इतकेच; पण तो दिवस येणार यात शंका नाही आणि तो येईल तेव्हा पाश्चात्य सुधारणेच्या युरोपीय मायभूमीभोवती एका अमेरिकेऐवजी दहा राक्षसी सत्तांचा गराडा पडलेला दिसेल. असे चित्र रेखाटून युरोपीय साम्राज्याने यादवी सोडावी असा उपदेश पाश्चात्य संस्कृतीच्या पुरस्कारार्थ प्रो. टॉइनबी यानी केला आहे. (Vol. III p.304)

इतिहासतरंगिणीच्या प्रतिपादनातील काही मासले येथवर सांगितले त्यावरून ऐतिहासिक विषयाला तत्त्वज्ञानाची बैठक देऊन कीर्तनपद्धतीनें त्यास कसें सजवितां येईल हे वाचकांच्या लक्षांत येण्याजोगे आहे. ऐतिहासिक उत्सवांच्या प्रसंगी ऐतिहासिक कीर्तन करतांना विषयाची मांडणी कशी करावी व त्यास दाखले देण्यास उपयोगी उदाहरणें कोठे शोधावी याची जी अडचण भासते, ती या इतिहासतरंगिणीने दूर होईल असे वाटल्यावरून या ग्रंथाचा परिचय मराठी वाचकांना करून देण्याचा हा प्रयत्न केला आहे.

---

* युरोपच्या इतिहासात जर्मनीचे उदाहरण, हिंदुस्थानच्या इतिहासांत मलिकंबराची निजामशाही आणि त्यानंतरची मराठशाही यांची उदाहरणें वरील सिद्धांताच्या स्पष्टीकरणार्थ देता येण्याजोगीं आहेत.

# २

# रानडे यांचे मराठ्यांच्या इतिहासाविषयीं विचार

शभरसवाशे वर्षांपूर्वी या देशात इंग्रजांचें राज्य सुरू झालें. तेव्हापासून किंबहुना त्या पूर्वीपासून देखील अनेक इंग्रजी लेखकांनी प्रांतोप्रांतीचे इतिहास लिहिले. उदाहरणार्थ, ऑर्मने बंगाल व मद्रासेकडील भागाचा, टॉडने रजपुतांचा, विल्क्सने म्हैसूरचा, माल्कमने मध्यहिंदुस्थानचा आणि एल्फिन्स्टनने मोगली राजवटीचा इतिहास लिहिला, तसाच ग्रँट डफने मराठ्यांचा लिहिला.

## मराठ्यांच्या इतिहासाचें महत्त्व

पण त्यांत मराठ्यांच्या इतिहासांत कांही लक्षांत घेण्याजोगें वैशिष्टय आहे असे वरील ग्रंथकारांपैकी कोणी म्हटले नव्हते. ' इंग्रजी राज्य सुरू होण्यापूर्वी या देशात बऱ्याच भागावर मराठ्यांचे राज्य होते ' असें विधान डफने केले होते खरें; पण तो उल्लेख ओझरता होता. या विधानाची मांडणी त्याने सांगोपांग व विस्तारपूर्वक केली नव्हती. यावरून त्यालाहि तो मुद्दा फारसा महत्त्वाचा वाटला असेल असें दिसत नाही. शिवाय त्या काळचा इंग्रजांना फारशी भाषेतील इतिहास वाचण्याचा सराव झालेला असल्यामुळे त्यांच्याकडून दिल्ली–विजापूरचे बादशहा व हैदर टिपू यांची माहिती देणारे अनेक फारशी ग्रंथ इंग्रजीत भाषांतरित करण्याचे जसे पद्धतशीर प्रयत्न झाले, तसे मराठ्यांच्या इतिहाससंबंधी झाले नाहीत. वॉरन हेस्टिंग्सच्या वेळेपासून सैर मुताखरीन, फिरिस्ता यांची भाषांतरे सुरू झाली व ती परंपरा इलियट डाउसनचे प्रचंड आठ खंड छापले जाईपर्यंत (इ. स. १८७७ पर्यंत) अखंड चालली. यामुळे इंग्रजी राजवटीपूर्वी हिंदुस्थानात मुसलमानांचीच राजवट काय ती लक्षांत घेण्याजोगी व अभ्यास करण्यायोग्य आहे; अशी छाप हिंदुस्थानच्या इतिहासांत लक्ष घालणाऱ्यांच्या मनावर उमटलेली होती.

पण हा समज चुकीचा असून मराठ्यांची राजवट ही हिंदुस्थानचा इतिहास अभ्यासूं पाहाणाऱ्यानें विशेष लक्ष घालून मनन करण्याच्या योग्यतेची आहे, ही गोष्ट सिद्धांतरूपानें सांगोपांग विवेचिण्याचे महत्त्वाचें काम न्यायमूर्ति रानडे यांनीं प्रथम केलें. हैदर, बाबर, निजामुल्मुल्क किंवा सुराजउद्दवला अगर आदिलशहा यांनीहि हिंदुस्थानांत लहान मोठी राज्यें उभारली व चालविली; पण शिवाजी महाराजांनीं उभारलेल्या राज्याची योग्यता वरील सर्व राज्यांहून अगदीं

निराळ्या जातीची होती. हैदरानें राज्य स्थापलें यावरून त्याचें शौर्य व चातुर्य व्यक्त होतें; पण त्याच्या राज्यांतल्या लोकांना आपणांवर परक्याचें राज्य आहे असेंच वाटत होतें. याच्या उलट, शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापलें तेव्हां त्या राज्याबद्दल लोकांना ममत्व वाटले व दोनतीनशे वर्षांपासून साधुसंतांनी चालविलेल्या उपदेशाने तयार झालेल्या सामाजिक मनोभूमीवर वेळीच वर्षाव होऊन बीजारोपण झाल्यामुळें, हा स्वराज्याचा वृक्ष सहजच वाढीस लागला. स्वराज्य हे महाराष्ट्रातील समाजांत उत्पन्न झालेल्या महत्त्वाकांक्षा सिद्धीस नेण्यासाठी उत्क्रांति-तत्वाप्रमाणें अस्तित्वांत आलेले असें साधन असून या राज्याची पाळेमुळे लोकांच्या मनांत खोलवर पोचण्याजोगी होती; म्हणून त्याला अनेक अडचणीतून सावरून धरण्याला समर्थ अशा पुरुषाची परंपरा निर्माण होऊं शकली. शिवाजीची कैद, संभाजीचा वध, जिंजीचा वेढा, पानिपतचा पराभव आणि नारायणरावाच्या वधानंतर इंग्रजांनी राघोबास पुढे करून पुण्यावर केलेली चढाई, यापैकी प्रत्येक प्रसंग म्हणजे मराठी राज्यावरचे गंडांतर होते; पण त्या सर्व प्रसंगी योग्य उपाययोजना करून राज्य राखण्यास लागणारे चातुर्य व धैर्य असणारे पुरुष ज्यात सतत दीडशे वर्षेपर्यंत अखंड निर्माण झाले, त्या मराठी राष्ट्राचा इतिहास, मार्मिक अभ्यासकाला चित्ताकर्षक वाटला पाहिजे, असे न्यायमूर्तींनी दाखवून दिले आहे.

## मराठ्यांच्या उत्कर्षाची मीमांसा

तथापि हा स्वराज्याचा बनाव केवळ लोकांच्या मनांतील आकांक्षेने निर्माण झालेला नसून, त्याच्या उत्पत्तीचे श्रेय शिवाजी महाराजांच्या राजकीय समयसूचकतेस दिले पाहिजे याचे कारण असे. दक्षिणेंतील मुसलमानी शाह्यांत कर्त्या मुसलमानांची संख्या नेहमीच कमी असल्यामुळें अनेक मराठे सरदार त्यांत मोठ्या योग्यतेच्या जागावर नांदत होते. त्यांच्या ठिकाणी भरपूर पराक्रम होता; आणि विजापूर व गोवळकोंडें येथील बादशहा नाकर्ते असून, त्यांच्या राज्यांस उतरती कळा लागली आहे, हेहि त्यांना दिसत होतें यामुळे या राज्यांना ओहोटी लागेल तसतसे आपले पारडें आपोआप जड होईल, असें समजून हे सरदार चालू प्रकाराकडे तटस्थपणें पहात राहिले होते. परंतु या दक्षिणेंतील शाह्यांवर शहाजहान व औरंगजेब यांसारखे दिल्लीचे कर्ते बादशहा झडप घालूं लागले तेव्हां त्यांच्याशी टक्कर देण्याचें सामर्थ्य या शाह्यांत नाही आणि त्या बुडवून दक्षिणेंतील मोगली राज्य जर का एकदा कायम झालें तर मागाहून स्वराज्य स्थापणे मराठ्यांना अशक्यप्राय होईल हे शिवाजी महाराजांनी ओळखलें, व हे ओळखून दिल्लीकर व विजापूरकर यांचे भांडण सुरू होतांच, त्या धांदलीच्या काळांतच स्वराज्य स्थापण्याची संधि साधली पाहिजे, असा निर्धार त्यांनीं

केला यांतच त्यांचें वैशिष्ट्य आहे. कारण, यामुळे स्वराज्याच्या वाढीला बालपणी योग्य अवसर मिळाला. आणि नतर औरंगजेब मोठ्या सैन्यांनिशीं दक्षिणेतील राज्ये बुडविण्यासाठी आला, तेव्हां विजापूर व गोवळकोंडा येथील राज्ये जरी त्याला बुडवितां आली, तरी स्वातंत्र्यार्थ वीस वर्षे झगडून मराठी राज्याने मोगली सत्तेला यशस्वी रीतीनें तोड दिले; आणि औरंगजेबाला निराश स्थितीत आयुष्य सपवावे लागलें.

अशा रीतीने अग्निदिव्यातून स्वराज्य जिवंत बाहेर पडले; परंतु त्याचें स्वरूप पार बदलून गेले होते. शिवाजी महाराजांसारखा पराक्रमी व चतुर कर्णधार असताना स्वराज्याची जी घडी बसविलेली होती, ती राजारामाच्या वेळी टिकूं शकली नाही; आणि पहिली पंचवीस वर्षे मोगलाच्या कैदेत घालविलेल्या व बिनलढाऊ वृत्तीच्या शाहूच्या राजवटीत तर राज्याची व्यवस्था पुष्कळच वदलणे आवश्यक होते, आणि त्याप्रमाणे या प्रसंगीहि बरोबर योजना आखून ती अमलात आणण्याचे काम करणारा मुत्सद्दी मराठी राज्यांत निघाला. तो प्रकार असा.

शाहू दक्षिणेत आला, तेव्हां मराठी राज्यांत अनेक जबरदस्त सरदार असून त्याना जिंकण्याइतकी शक्ति शाहूच्या दरबारांत नव्हती. पण त्या सरदाराना केंद्रस्थान लाभले नसते, तर त्याची शक्ति आपसांत भांडण्यांत संपली असती. त्याऐवजी त्या त्या सरदाराना आपापल्या क्षेत्रात पूर्ण स्वातंत्र्य राहून त्यानी मराठी राज्याचे घटक होण्यास मान्यता द्यावी, म्हणजे मराठी राज्यास साघिक घटनेचे स्वरूप प्राप्त होईल. आणि ही योजना मान्य केल्यास प्रबळ असे मराठी साम्राज्य निर्माण होते, नाही तर जुटीच्या अभावी एकएकटा सरदार निर्बल ठरतो, हा व्यापक असा राजकारणाचा सिद्धान्त बाळाजी विश्वनाथाने सरदारांपुढे मांडला आणि त्यांनीहि तो मान्य केला. त्यात बाळाजी व ते सरदार या दोघांनाहि उच्च अशा राजकीय किंवा देशभक्तीच्या विचारांची जाणीव होती असे म्हणण्यास हरकत नाही. या योजनेप्रमाणें दाभाड्यांना गुजरात' आंग्र्यांना कोंकण, फत्तेसिंगास कर्नाटक, भोसल्यांस वऱ्हाड–खानदेश अशी क्षेत्रें वांटून देण्यात आली आणि प्रतिनिधि व सचीव यांना प्रधानमंडळांतलें स्थान देण्यांत आलें. तेव्हां विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही की बाळाजी विश्वनाथाने स्वत.कडे वरिष्ठ अधिकाराची जागा किंवा अधिक उत्पन्नाचा मुलुख घेतला नाही शाहूचा सल्लागार एवढेच नातें त्याने आपणाकडे ठेवले. बाळाजी विश्वनाथाने या वेळी जो हा स्वार्थत्याग केला, त्यांतच त्याचें वैशिष्टय होते आणि याच नि.स्वार्थी प्रवृत्तीमुळे नवीन घटना अमलांत येऊन मराठी राज्यांत एकजूट होऊं शकली. या योजनेमुळे पुढें वीसपंचवीस वर्षांत मराठी राज्यास साम्राज्याचें रूप आले व शाहू जिवंत होता तोंपर्यंत त्याच्या शब्दाला सरदारहि

मान देत असल्यामुळें या राज्याचें संघटित स्वरूप (Confederacy) त्याला टिकवितां आलें.

स्वराज्यांतील सरदारांची जूट घडवून आणणारी संघटना केल्यानंतर, बाळाजी विश्वनाथाने दिल्लीच्या बादशहाकडून स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी यांच्या सनदा आणल्यामुळे, मराठी राज्यास कायदेशीरपणा प्राप्त झाला—बाळाजीची ही कामगिरी त्याच्या संघटना चातुर्याचा परमोत्कर्ष होता; आणि त्याबद्दल शिवाजीच्या खालोखाल मराठ्याच्या संघटित राज्याचा त्याला संस्थापक मानणें योग्य आहे, असें न्यायमूर्तींनी म्हटले आहे. (This achievement must always be his principal claim to be regarded as, next to Shivaji, the principal founder of the Maratha Con-ederacy. – R. O. M. Power, P. 218)

न्या. रानडे यांच्या ' Rise of the Maratha Power ' या ग्रथांत मराठी सत्तेचा उदय व उत्कर्ष यांची मीमांसा कोणत्या पद्धतीने लावली आहे, याचें दिग्दर्शन येथवर केले. यांत साधुसंताच्या शिकविणीचे युरोपातील प्रॉटेस्टट विचारसरणीशी साम्य दाखवून, साधुसत हे सनातनी मताच्याविरुद्ध होते असा जो निष्कर्ष न्यायमूर्तींनी काढला आहे तेवढा इतिहासाचार्य राजवाडे यांनी अमान्य* केला. पण हा अपवाद सोडला असता बाकीची त्याची मीमासा महाराष्ट्रांतील लेखकांना मान्य झालेली आहे.

## अपकर्षाचें विवेचन

यानंतर मराठी सत्तेचा अपकर्ष व अस्त कशाने झाला याचेहि विवेचन करण्याचा त्यांचा मानस होता पण त्यांच्या अकाली निधनामुळे ती गोष्ट घडली नाही; तथापि वाड यानी पेशवे दप्तरातील जे उतारे निवडले होते, ते न्याय-

---

* "न्यायमूर्ति रानडे जी धर्मक्रांति म्हणतात तिचा वाचक 'महाराष्ट्रधर्म' हा शब्द नव्हता. तसेच शिवकालीन धर्मसमजुतीला न्यायमूर्ति धर्मक्रांति म्हणून संज्ञा देतात तेहि निराधार आहे. शिवकालीन धर्मसमजुतीचे स्वरूप न्यायमूर्ति म्हणतात त्याहून अगदीच निराळे होते. हिंदु धर्म, सनातन धर्म, भक्तिमार्ग, उपासनामार्ग ह्याचा (१५ व्या शतकापेक्षा १७ व्या शतकात) मराठ्यांना अत्यंत उत्कट अभिमान उत्पन्न झाला. तो इतका की, हिंदुधर्माचा, सनातन-धर्माचा व भक्तिमार्गाचा पूर्ण द्वेष्टा जो यवनांचा महमदी धर्म तो हांकून लावण्यास मराठ्याना त्यानें उद्युक्त केले. 'सनातन धर्माच्याविरुद्ध भक्तिमार्गाचा उदय होऊन मराठ्यांच्या मनाचा कोतेपणा नाहींसा झाला व तेणेंकरून चोहों-कडून स्वतंत्र होण्याची उत्कट इच्छा मराठ्यांच्या मनांत बाणली व मराठ्यांनी स्वराज्य स्थापलें ' अशी कार्यपरंपरा न्यायमूर्तींनी जोडली आहे. परंतु मुळापासून ती अशास्त्रीय आहे असें मला वाटतें." (खंड ४, प्रस्तावना पृ. १०९, ११०)

मूर्तींनीं बारकाईने वाचून त्याला प्रस्तावनेदाखल जो मजकूर लिहिला आहे त्यांत अपकर्षाच्या मीमांसेचे त्यानी दिग्दर्शन केलें आहे. पेशवे दप्तरांतील कागदांवरून नानासाहेब, माधवराव व नाना फडणीस याच्या वेळी जमीन–महसूल, तगाई, अबकारी, न्यायदान, टाकसाळी, पदव्या, व्यापार, शिक्षण या खात्यांची व्यवस्था लक्षांत घेतली असता समकालीन कोणत्याहि हिंदु किंवा मुसलमानी राज्यापेक्षां पेशवाईंतली व्यवस्था श्रेष्ठ होती. त्याचप्रमाणें माधवरावाच्या मृत्युसमयीं त्याला २४ लाखांचे कर्ज होते, पण नाना फडणिसाच्या व्यवस्थित कारकार्दीत पेशव्याच्या दौलतीचें बहुतेक कर्ज फिटले होते; आणि मराठी राज्यांतील प्रजा इतर राज्यांपेक्षां अधिक सुस्थितीत होती, ही डफची कबूली न्यायमूर्तींनीं उद्धृत केली आहे. पेशवाईतील लोकस्थितीची यथार्थ कल्पना येण्यास न्यायमूर्तींचें हे ३८ पृष्ठांचे चोपडें कायमचे मार्गदर्शक आहे यात शंका नाही.

पण या चोपड्यांत मराठ्यांच्या अपकर्षाचें जे दिग्दर्शन त्यानी केले आहे त्यांत कांही वादग्रस्त भाग आहे. शाहूने मरणसमयी नानासाहेबाच्या हाती राज्य दिलें; त्यानंतर मराठी राज्य दाहा वर्षे वाढत होते, पण पानिपतच्या पराभवानें त्याला धक्का बसल्यानतर पुढच्या ६० वर्षांत मराठ्यांच्या स्वभावातील एकेक दोष जोर धरूं लागला आणि या दोषामुळे इंग्रजांनी १८१८ मध्यें राज्य घेण्या-पूर्वीं मराठ्यांच्या अधःपातास सुरुवात झाली होती; याचें कारण शिवाजीपासून शाहूपर्यंत जी राजनीतीचीं सूत्रे पाळण्यांत आली होती ती उत्तरपेशवाईंत सुटली. यामुळे जातिभेदाची फुटीरपणाची प्रवृत्ति राज्यात वाढली व तिनें मराठ्यांच्या संघराज्याची घडी विस्कळीत झाली––असा न्यायमूर्तींच्या लिहिण्याचा रोख आहे.

## शिवकालीन सूत्रांचें उल्लंघन

शिवकालीन राजकीय सूत्राचें उल्लघन मुख्यतः दोन–तीन बाबतीत झालें असें न्यायमूर्ती म्हणतात. शिवाजीने अष्टप्रधान पद्धति सुरू करून बरोबरीच्या तोलाचे आठ खांब उभे केले होते. आणि बाळाजी विश्वनाथाने नवीन केलेल्या संघाच्या मांडणीत देखील मराठ्यांच्या राज्यास बरोबरीच्या तोलाचे अनेक सर-दार व सल्लागार केंद्रस्थानी होते. परंतु उत्तर पेशवाईत राज्याची इमारत अनेक खांबांच्या आधारावर उभी राहण्याऐवजी एकखांबी बनली; आणि सातार-करांचें महत्त्व कमी करण्याचे काम जसें पेशव्यांनीं केलें, तसेंच पुढें सवाई माधव-रावांच्या वेळीं शिंदे, होळकर हे आपण सत्ताधारी होण्यासाठी झटूं लागले. शिवाजीच्या वेळी प्रत्येक किल्ल्यावर एक मराठा, एक ब्राह्मण, एक प्रभू असें अधिकारी नेमण्यांत येऊन सर्व जातीचें हितसंबंध गोवण्यांत आले होते; तसा प्रकार उत्तरपेशवाईंत न राहतां पुणें दरबारांत रास्ते, पुरंदरे, गोखले, विंचूरकर

वगैरे ब्राह्मणच सरदार दिसू लागले. अर्थात् जातीचा तुटकपणा राजकीय व्यवस्थेत स्पष्ट होत चालला असा याचा अर्थ होता.

शिवकालीन तत्त्वांपैकी उत्तरपेशवाईंत ज्या तत्त्वाचें उल्लंघन झालें, त्यापैकी दुसरा एक मुद्दा न्यायमूर्तींनी सांगितला तो असा की, आनुवंशिक हक्कानें राजकीय पदांचें अधिकार न चालवितां योग्य माणसांची नेमणूक करून पदें चालविण्याचा जो शिरस्ता शिवाजीचा होता तो पुढे राहिला नाही. साताऱ्याहून पुण्यास राजधानीचें ठाणें गेल्यावर अधिकराची पदे वंशपरंपरेनें देण्यांत येऊं लागली; आणि त्या वशांत नाकर्ते पुरुष निघाल्यामुळें नालायक लोकांच्या ताब्यांत पदें व उपन्ने चालू लागली. वस्तुत: बरोबरीच्या नात्यानें वागणाऱ्या अधिकाऱ्याचे सल्लागार मंडळ नेमून शाहूने जशी राज्यव्यवस्था चालविली होती तशी पेशव्यांनी चालविण्यास हरकत नव्हती; पण त्यानी तसे न करता सातारचे राजमंडळ शून्य बनवून आपल्या नोकराच्या हातून सर्व राज्याचा गाडा हाकण्याचें धोरण पत्करलें ही त्यांनी चूक केली.

तिसरा फरक सैन्याच्या घटनेसंबंधीचा. शिवाजीच्यावेळी सैन्यांत मावळे मराठे, प्रभू, ब्राह्मण होते ते सर्व स्वराज्यातले होते. आणि चार महिने घरी राहून आठ महिने कामावर जाणारे होतें. त्याच्या अंत:करणात राज्याविषयी सहजच आपलेपणाची भावना होती. पण प्रथम सदाशिवराव भाऊने आणि नंतर महादजी शिद्यानें कवाइती फलटणी उभारण्याचे 'धोरण पत्करल्यापासून सैन्यांत भाडोत्री शिपयांची भरती झाली, व मराठे लोकांचा सैनिकांचा पेशा बंद पडला यामुळें वेलस्लीच्या सैन्यानें मराठयांच्या भाडोत्री फलटणीचा मोड केल्यावर राज्याच्या संरक्षणास धावून येण्याजोगे मराठी सैन्य अस्तित्वांतच नव्हतें.

मिळून अष्टप्रधानपद्धति मोडणें, जातिमत्सर वाढणें, पदें आनुवंशिक करणें, भाडोत्री सैन्य ठेवणें, भाऊबंदीचीं भांडणें वाढणें—तात्पर्य शिवकालीन पद्धति सुटणें हें मराठी राज्याच्या ऱ्हासाचें मुख्य कारण होतें, असें न्यायमूर्तींचें म्हणणें दिसतें. गेल्या चाळीस वर्षांत वरील प्रश्नांची चर्चा अनेक लेखकांनी केली आहे. पण त्यांच्यांत अद्याप एकवाक्यता झालेली नाही. त्यांची मतें येथें विस्तारानें देतां येत नाही; पण त्यांचें दिग्दर्शन करण्यास हरकत नाहीं.

## आधुनिक अभ्यासकांचें संशोधन

डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी मराठयांच्या इतिहासाचा आस्थेनें अभ्यास केला आहे व त्यांनी आपल्या Military system of Marathas या ग्रंथांत शिवकालीन पद्धति सुटणें व भाडोत्री सैन्य येणें ही न्यायमूर्तींनीं सांगितलेली मराठी राज्याच्या ऱ्हासाचीं कारणें मान्य केली आहेत. सर जदुनाथ यांनी शिवाजी हा असामान्य

पुरुष होता व साऱ्या हिंदुस्थानांत मध्ययुगीन काळांत त्याच्यासारखा कर्ता पुरुष झाला नाहीं वगैरे म्हटले आहे. पण स्वराज्य स्थापून जातिभेद जिवंत असलेल्या मराठी राज्याला ' राष्ट्र ' पदवीस नेण्याचा त्याचा प्रयत्न वाळूचे दोर वळण्यासारखा अशक्य कोटीतला होता (He wove ropes of sand) असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें महादजी शिंद्यानें कवाइती पलटणीचे महत्त्व ओळखून ती पद्धति आत्मसात् करण्याचा जो प्रयत्न चालविला होता त्याच्या युक्ततेविषयी नानाचे मत साशंक होते व त्यानें पुणें दरबारातर्फे सर्व सरदारांवर कवाइती पद्धत लादली नाही ही गोष्ट नानाच्या शहाणपणास कमीपणा आणणारी आहे, असेंही मत त्यांनी (Poona R. R. Vol. II. Preface) व्यक्त केलें आहे. मिळून जातिभेद व युरोपियन युद्धपद्धति घेण्यांत दिरंगाई हीं त्यांच्याहि मतें मराठी राज्याच्या ऱ्हासाची कारणें आहेत.

## अष्टप्रधानांबद्दल खुलासा

प्रथम महाराष्ट्राबाहेरच्या विद्वानांची मतें सांगितल्यानंतर, महाराष्ट्रांतील विद्वानाच्या मतांचा निर्देश करण्यापूर्वी एकदोन गोष्टींचा खुलासा केला पाहिजे. अष्टप्रधानपद्धति बहामनी राज्यातहि होती; पण ती किंवा शिवाजीची अष्टप्रधानपद्धति सल्लागार-मंडळाच्या स्वरूपाची नव्हती. खात्यावरच्या मुख्य अधिकाऱ्याला प्रधान ही पदवी असे, पण तो शिवाजीनें नेमलेला नोकरच होता. विशिष्ट प्रसंगी जरी शिवाजी त्याच्याशीं चर्चा करीत असे तरी तो आपल्या मतानेंच वागत असे. शिवाजीला कठीण प्रसंगी भवानीचा साक्षात्कार होत होता व त्याप्रमाणें तो वागे याचा अर्थ तो बहुधा आपल्याच मतानें वागत होता, दुसऱ्याचीं मतें विचारीत बसत नव्हता. तात्पर्य, त्याचें अष्टप्रधान मंडळ हें ' कौन्सिल ' पद्धतीचे सल्लागार–मंडळ नव्हतें.

तसेंच त्यांतील पदे विशिष्ट घराण्यांत कायम करण्याचा पायंडा पेशवाईंत पडला हेही मत (Intro. to P. D. p. 5.) खरें नाहीं. राज्याभिषेकाच्या प्रसंगीं राजपद भोसले घराण्यांत विधीपूर्वक कायम करण्याचे ठरलें, त्याच वेळी प्रधानांची पदें त्या त्या घराण्याकडे चालवावी किंवा नाहीं असा वाद उपस्थित होऊन तीहि आनुवंशिक पध्दतीने चालावीं, असे शिवाजीनेच मान्य केल्याचा उल्लेख सभासदी बखरीच्या एका हस्तलिखित प्रतीत आहे (शिवच. सा. खं.१ पृ.१०८). आणि शिवाजीने राज्याभिषेकापूर्वी पेशवे व सेनापति या जागा निरनिराळ्या व्यक्तीना दिल्या होत्या हें खरें असलें तरी, राज्याभिषेकानंतर प्रधानांच्या पदांत त्यानें बदल केला नाही; आणि त्याच्या मरणानंतर संभाजीनें मोरोपंत पेशव्यांच्या जागीं त्यांच्या मुलाचीच नेमणूक केली व राजारामाच्या वेळी तर प्रधान-

पदें विशिष्ट घराण्यांतच चालावी ही समजूत अशी पक्की होती की, प्रल्हाद निराजीला त्याच्या कामगिरीबद्दल पद द्यावयाचे, तर प्रतिनिधि हे नवे पद निर्माण करावें लागलें. तात्पर्य, अष्टप्रधानांची पदें विशिष्ट घराण्यांतच चालावी ह्या नियम शाहूच्या वेळी अस्तित्वांत आला नसून, तो मराठी राज्याच्या अभिषेक कालापासून निदान संभाजीच्या वेळेपासूनचा तरी आहे यात शंका नाही.

## जातिभेदाचा अडथळा

दुसरा मुद्दा जातिभेदाचा. जातिभेद शिवाजीच्या वेळेपासून होता, तरी त्याला स्वराज्य उभारता आलें व शाहूच्या वेळी ते विस्तारहि पावू शकले. पण उत्तरपेशवाईंत मात्र जातिभेदाची तीव्रता अशी वाढली की, तिने राज्याचा नाश केला, हे म्हणणें पटण्याजोगें नाही. उत्तरपेशवाईंत यादवीचा प्रसग उद्‌भवला हे खरे, पण त्या यादवीचें मूळ भाऊबंदीच्या कल्पनेंत होते माधवराव व राघोबा याच्यांत तंटा माजला तेव्हां राघोबाने निजामाची मदत घेतली आणि बारभाईच्या वेळी त्याने इंग्रजाची मदत घेतली; तेव्हां त्याच्याशी लढण्यात देशस्थ, कोकणस्थ व मराठे जुटीने वागले. तात्पर्य, त्या तटयाच्या मुळाशी भाऊबंदीच्या हक्काचीच कल्पना होती. आणि ही कल्पना कांही उत्तरपेशवाईंत नव्याने उत्पन्न झाली नाही. खुद्द शिवाजीचे व्यकोजीशी, संभाजीचे राजारामाशी आणि शाहूचे कोल्हापूरकरांशी संबंध कसे होते हे लक्षांत घेतले असता, भावाभावांत राज्याबद्दल तंटा होणें ही गोष्ट स्वाभाविक आहे असेच म्हणावे लागते. आणि ही गोष्ट मराठ्यातच नसून मुसलमानातहि होती हे लक्षांत घेतले पाहिजे. अकबरापासून औरंगजेबापर्यंत व निजामुल्मुल्कापासून सलाबतजगापर्यंतचा इतिहास पाहिल्यास मराठ्याच्या राज्यातला भाऊबंदीचा तटा सौम्य स्वरूपाचा होता असेच म्हणावें लागेल. थोरले बाजीराव व नानासाहेब यांच्या वेळी तर भाऊबदीचा तटा नव्हता एवढेच नव्हे, तर त्या कारकीर्दीत बधुप्रेमाचा व भावाच्या सहकार्याचा जो उज्ज्वल नमुना दिसून आला त्याला तोड सांपडणार नाही. बारभाईच्या वेळी राघोबानें राज्यावर हक्क सांगून इंग्रजांचें सैन्य आणले त्या वेळी मराठी राज्यांतील सरदारांनीं जे युध्द केलें व इग्रजांस जेरीस आणले, तेव्हा देखील जातिभेदाचा किंवा जातीमत्सराचा प्रश्न नसून राघोबाच्या राजकीय हक्काचाच प्रश्न होता.

उत्तरपेशवाईत ब्राह्मण सरदार विशेष पुढें आले. व पुण्याच्या फडांत कोंकणस्थ कारकून होते, इत्यादि मुद्दे विचारात घेऊन पाहू. शहाजीची जहागीर मावळ व पुणें परगणा या भागांत असल्यामुळे शिवाजीच्या उदयकालीं तेथील मावळे, देशस्थ ब्राह्मण व प्रभु वगैरेंची भरती सैन्यात व अधिकाराच्या जागांवर झाली आणि कोकणस्थांची झाली नाहीं, हें सरळच झालें. त्यानंतर राजारामाच्या वेळीं जो वीस वर्षें संग्राम चालला, तेव्हां शिवकालीन कुटुंबें बरीच निर्वंश

झाली. राहिलेल्यांपैकी कोल्हापूरकरांकडे कांहीं गेलीं. यामुळें शाहूला नवीन प्रांतांतील नवीन घराणीं हाताशी घ्यावी लागलीं. त्यांत अर्थात मराठे व देशस्थ ब्राह्मण मुख्यत्वेकरून व थोडे कोंकणस्थ होते. पुढें पानिपतच्या युद्धांत जीं सैन्यें मेली त्यात मराठे व देशस्थ यांचा भरणा बहुतांशीं असल्यामुळें तेथें त्या लोकाचा सहार झाला. आणि त्यानतर पुढच्याच वर्षी माधवरावाला निजामाशीं लढण्याचा प्रसंग आला तेव्हां नवी घराणी मिळतील ती उभी करणें भाग होतें. त्यात कोंकणस्थ समाज न खपलेला शिल्लक होता. त्यांपैकी पटवर्धन, रास्ते, पेठे हे पुढे आले. माधवराव व राघोबा यांच्या तटयांत राघोबाची बाजू कांहीं देशस्थ सरदारानी घेतली व राघोबाचा पराभव झाला, यामुळें कारभाराच्या जागी व विश्वासाच्या जागी कोकणस्थ कारकुनांची भरती झाली.

## भाडोत्री सैन्य

पानिपतच्या सहाराचा दुसरा परिणाम म्हणजे उत्तरेकडे सैन्य पाठविण्यास मराठी राज्यांत लोकसख्येने कमी पडू लागले, यामुळे माधवरावाला कांही वर्षे उत्तरेकडचा व्याप बद ठेवावा लागला. आणि इंग्रजाच्या युद्धानंतर महादजी दिल्लीकडे निघाला तेव्हा त्याचे सैन्य बेताचेंच होतें, आणि काम तर सर्व उत्तर हिंदुस्थान आवरण्याच्या स्वरूपाचे अवाढव्य; यामुळें त्याला भाडोत्री सैन्य ठेवणें भाग होते. शिवाय कवायिती पलटणी ठेवण्याचे जें त्यानें योजलें होतें, ती योजनाहि भाडोत्री सैन्यास मानवण्याजोगी होती. यामुळे शिंद्यांच्या पदरी प्रथम भाडोत्री सैन्य मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आले, त्याबरोबर हेहि खरें कीं, स्वराज्यात शिपाईगिरी म्हणजे घोड्यावरली, असा समज बद्धमूल झालेला असल्यामुळे व ती पद्धति अगवळणी पडलेली असल्यामुळे पायदळी कवायिती पद्धति उचलण्यास स्वराज्यांतले लोक तितकेसे उत्सुक नव्हते. पलटणीचा प्रसार वाढू लागला व नानाच्या शाततेच्या काळांत पुण्याहून दरसाल स्वाऱ्या शिकाऱ्यांसाठी निघणे बद पडले. तेव्हा प्रत्यक्ष युद्धांत युद्धकला शिकण्याचा जो मराठी राज्याचा परपरागत आखाडा तोच बद पडला. जुनी पद्धति सुटून नवी आत्मसात करण्याच्या संधिकालांत असे होणें अपरिहार्य होतें. यामुळें पुढें इंग्रजांशीं युद्धप्रसग आला तेव्हा कवायिती पद्धतीत इंग्रज आणि मराठे हे गुरु आणि शिष्य शोभण्याजोगे श्रेष्ठकनिष्ठ होते व आपली जुनी पद्धति मराठे विसरले होते.

## मराठमंडळांतील ऐक्यभावना

मराठी राज्यांत पदें व सरदाऱ्या आनुवंशिक पद्धतीने चालत असल्या तरी वंशज नाकर्ता निघाल्यास त्याला नामधारी बनवून कर्त्या माणसांच्या हातीं सत्ता जाई. या पद्धतीनें भोसले घराण्यांतून सत्ता पेशव्यांच्याकडे गेली; आणि

पुढें नाना फडणीस व महादजी यांच्याकडे गेली. सत्तेचें सक्रमण अशा रीतीने रक्तपात न होतां होऊं शकले ही गोष्ट महत्त्वाची होती. त्याचप्रमाणें अष्टप्रधान पद्धति जाऊन बाळाजी विश्वनाथाच्या वेळेपासून सघटना पद्धति (Confederacy) आल्यामुळे स्वराज्याचें साम्राज्य झालें व चार पेशवे कर्तृत्ववान असल्यामुळें सत्ता केंद्रीभूत होऊ लागली. पुढे महादजीने दिल्लीच्या बादशाहीचीं सूत्रें हाती घेतली व अहिल्याबाईने माळव्यांत सत्ता कायम केली, तेव्हां मराठी साम्राज्याच्या सत्तेची केंद्रे तीन ठिकाणी झाली व शिंदे, होळकर हे पुणें दरबाराशी नांवाने अंकित पण व्यवहारतः बरोबरीचे नाते सांगत होते. याचा अर्थ तेव्हांची घटना ब्रिटिश साम्राज्यात बरोबरीच्या नात्यानें वागणाऱ्या वसाहतीच्या धर्तीची (Commonwealth) होती. या वेळच्या 'मराठमंडळांत' बरोबरीच्या नात्याचे शिंदे–होळकर होते. याचा अर्थ मराठी साम्राज्याविषयी त्याना आस्था नव्हती असा करण्याचे कारण नाही. ऐक्याची भावना कायम होती. दिल्लीच्या व्यवहारांत महादजी शिंद्यावर अडचणीचा प्रसंग आला तेव्हा नाना व अहिल्याबाई यांनीं त्याच्या मदतीस फौजा पाठविल्या आणि खडर्याच्या युद्धांत मराठी साम्राज्यांतल्या सर्व सरदाराच्या फौजा हजर होत्या. या उदाहरणावरून खडर्यापर्यंत मराठी राज्याची इभ्रत, दरारा व ऐक्याची भावना कायम होती हे रियासतकारांचे म्हणणें योग्य दिसते.

धाकट्या बाजीरावाच्या वेळी देखील तो नाकर्ता असल्यामुळें त्याला नामधारी बनवून कर्त्या माणसाने सत्ता हातीं घेतली असती पण वेलस्लीने मध्यें पडून पुणें दरबारचा अितर सरदारांशी सबंध तोडला व नाकर्त्याच्याच हाती सत्ता राहावी असे घडवून आणलें. या वेळी मराठी राज्यात जातिमत्सराच्या भावनेनें आधीं फूट पडली होती असें म्हणण्यास आधार नाही. अेकसधी दगड देखील घणाचा जोराचा घाव मारून फोडतां येतो व त्याचे तुकडे होऊ शकतात, या न्यायानें वेलस्लीच्या लष्करी सामर्थ्यापुढे मराठे या वेळी कमजोर ठरले अेवढें म्हणतां येअील; आणि मराठी राज्यांत या प्रसगास तोंड देणारा पुढारी निघाला नाही व कवाअिती पद्धतीत इंग्रजांच्या मानाने मराठे कमी सरावलेले होते यामुळें त्यांना हार खावी लागली असा निष्कर्ष सांगतां येअील.

## योजकाचा अभाव

असो. वरील विवेचन लक्षांत घेतलें असता, जातिभेदामुळे किंवा जातिमत्सरामुळें† अुत्तरपेशवाअीत मराठ्यांचें राज्य अधोगतीस पोंचले हें न्यायमूर्तीचें

† अुत्तर पेशवाअीतल्या जातिमत्सरासबंधी न्यायमूर्तींचीं वाक्यें अशी आहेत:–
"The first half of the (18th) century was singularly free from these racial and caste jealousies. In the latter

पुढील पृष्ठावर चालू

म्हणणें महाराष्ट्रांतील अलीकडच्या लेखकांना मान्य नाही. हें म्हणणे प्रथम 'मराठे व अिंग्रज' या ग्रंथांत श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनी खोडले व रियासतकारांनीहि केळकरांच्या म्हणण्यास दुजोरा दिला. शिवाय रियासतकारानी असेहि स्पष्ट विधान केलें आहे की, "सवाअी माधवरावाच्या अखेरीपर्यंत मराठी राज्याची अिभ्रत व चलती कायम होती असे धरून मी चालतों." सर जॉन् शोअरच्या खलित्यावरून पाहतां अि. स. १७९५पर्यंत अिंग्रज मराठ्यांना किती तरी दबकून वागत होते असें दिसतें. गोविंदराव काळ्याच्या पत्रांतील महादजी व नाना याची अेकी व मराठ्यांचा आत्मविश्वास यांचें वर्णन वाचले म्हणजे रियासतकारांचें विधान योग्य आहे, हे कबूल करणें भाग आहे. रियासतकाराच्या मतें, मराठ्यांनी आपला मूळचा गनीमी कावा न सोडतां, पाश्चात्याचे (युद्धविषयक) ज्ञान हस्तगत केलें व अिंग्रजानीहि गनीमी कावा थोडाबहुत स्वीकारला. मराठी राज्यात (धाकट्या बाजीरावाच्या वेळी) लायक माणसाचीहि वाण नव्हती, पण त्यांना वागवून घेणारा 'योजक' नव्हता. तात्पर्य, मराठी राज्याचे सूत्रचालकत्व ज्याच्या हाती आले, तो बाजीराव योग्यतेने कमी ठरला म्हणून राज्य बुडाले, असा निष्कर्ष रियासतकारांच्या म्हणण्याचा आहे.*

## हिंदुस्थानचे सत्ताधारी मराठे होते

शेवटी, न्यायमूर्तींच्या लिहिण्यातला अेक महत्त्वाचा मुद्दा सांगून आटोपते घेतो. हिंदुस्थानच्या अितिहासाचा विचार करतांना, मुसलमानी अमदानीनंतर लगेच अिंग्रजी अमदानी आली नसून, मुसलमानाना जिंकून मराठे हेच सत्ताधारी झाले होते—अिंग्रजानी त्यांचा म्हणजे मराठ्यांचा पाडाव केला, मुसलमानांचा नव्हे,

---

मागील पृष्ठावरून

half, they had attained such prominence that concert was impossible, and each great leader naturally cared to pursue his own interest to the sacrifice of the common weal." (Introduction to the Peshwa's Diaries, p. 10).

* कै. वासुदेवशास्त्री खरे यांचेहि म्हणणे जवळ जवळ असेच आहे. ते म्हणतातः— "मराठी राज्य काबीज करण्यासाठी अिंग्रज लोक अगदी टपून बसले आहेत अित्यादि गोष्टी नानाखेरीज अितर कोणास त्या काळी (अि. स. १७९७) दिसत होत्या असें वाटत नाही . . . . अिंग्रजांच्या वर्चस्वाची आपत्ति टळावी व मराठी राज्याचें स्वातंत्र्य कायम राहावें म्हणून महाडचें कारस्थान नानांनी रचलें. पण त्याचे पर्यवसान विपरीत झाले. याचे कारण नानांच्या अंत अमदानीतले त्याचे साहाय्यकारी हरीपंत, पाटीलबावा हे परलोकवासी झाले होते; आणि ज्या अिसमांशी वागणें नानांच्या कपाळी आले ते बाजीराव व दौलतराव शिंदे हलक्या कानाचे व पाजी लोकाच्या मसलतीत गुरफटलेले होते. या लोकांशी प्रसंग पडतांच त्यांची अक्कल गंग होअून गेली." अै. ले. स. प. ५०४५.

हें विसरूं नये. बरोबरीच्या नात्यानें अिंग्रजांशी लढणें, तहाच्या वाटाघाटी करणें, वकीलामार्फत कराराररमदार करणे किंवा दोस्त या नात्याने सैन्यानिशी अेकमेकांच्या मदतीस जाणें, हे जे दोन स्वतंत्र राज्यांतले परस्परांशी वागणुकीचे प्रकार, ते अिंग्रज व मराठे यांच्यांत पन्नास पाऊणशे वर्षे दरबारी पद्धतीने चालले होते. अर्थात् शेवटी मराठे पराभूत झाले असले, तरी मुसलमानानतर मराठ्यांचें राज्य हिंदुस्थानांत होते, ही गोष्ट अितिहासकाराने ध्यानात घेणे न्यायाचें आहे – हा न्यायमूर्तींच्या म्हणण्याचा आशय आहे. ही गोष्ट महाराष्ट्रांतील लेखकांना अर्थातच मान्य आहे पण अिंग्रज किंवा महाराष्ट्राबाहेरचे अिंग्रजी लेखक अद्यापि ही गोष्ट मान्य करीत नाहीत. केंब्रिज हिस्टरीत प्राचीन काळानंतर मुसलमानी अमल, आणि पुढे अिंग्रजी अमल, असेच हिंदुस्थानाच्या अितिहासाचे विभाग मानतात तसेच, शिवाजी ते राजारामापर्यंतची हकीकत म्हणजे औरंगजेबाच्या विस्तृत चरित्राचा भाग व पानिपतापर्यंतचा पुढचा वृत्तात म्हणजे अुत्तर मोगलाईचा भाग होता, असे सर जदुनाथ याच्या ग्रथाच्या माडणीवरून दिसते यावरून महाराष्ट्राबाहेर 'दिल्लीश्वरो वा' हीच विचारसरणी अद्याप रूढ आहे हे स्पष्ट दिसते. ही समजूत बदलण्यासाठी महाराष्ट्रातील लोकानी मराठ्याचा अितिहास अिंग्रजीत माडावा, असे कित्येकाचे मत आहे, पण ते विवाद्य दिसते. महाराष्ट्राबाहेरच्या लोकानी आणि अिंग्रजानी 'मराठ्याचा अितिहास खरोखर मोठा महत्त्वाचा आहे,' असा शेरा दिला म्हणजे मात्र तो महत्त्वाचा, आणि तसा शेरा मिळाला नाही तोंपर्यंत तो कमी योग्यतेचा, असा समज अुराशी बाळगण्याचें कारण नाही. तो महत्त्वाचा आहे असे मराठ्याना वाटत आहे, तर त्याचा अभ्यास झटून करणे हें त्यांचें कर्तव्य आहे, हे सत्य मराठी लोकाना पटवून देण्याचें कामच अद्यापि पुष्कळ व्हावयाचें आहे. तेव्हा ते काम करण्यात त्यांनी आपली पराकाष्ठा करावी, असे प्रस्तुत लेखकास वाटतें, हे सागून लेखणी खाली ठेवतों.

# ३

## रजपुतांच्या पराभवाची मीमांसा

### लेखांक १ ला

राज्यक्रान्ति होते त्या वेळी एक राजकीय सत्ता अुलथून पडून तिच्या जागीं दुसरी अस्तित्वात येते. या ुळे देशात अगर समाजांत फार मोठें स्थित्यंतर अशा प्रसगाने घडून येत असते. आणि याच कारणास्तव या जातीच्या क्रान्तिकारक पराभवाची मीमांसा इतिहासलेखकास अतिशय विचारपूर्वक करणें आवश्यक वाटते गेल्या हजार वर्षाचा हिंदुस्थानचा अितिहास पाहू गेल्यास त्यांत तीन क्रान्तिकारक प्रसंग प्रमुखपणें आपल्या दृष्टीस पडतात. पहिला रजपुतांची राजवटी सपून मुसल्मानी राज्यास सुरवात झाली तो, दुसरा, मुसलमानी राज्यातून मराठी राज्याचा उदय झाला तो; आणि तिसरा, मराठी साम्राज्याच्या जागी इग्रजाचे साम्राज्य प्रस्थापित झाले तो. याखेरीज अेवढया अवधीत अितरहि अनेक क्रान्त्या झाल्या; नाही असे नव्हे. परतु त्यांची गणना दुय्यम स्वरूपाच्या घडामोडीत करण्यास हरकत नाही. हें मान्य केल्यास हिंदुस्थानच्या राजकीय पटावर गेल्या हजार वर्षात रजपूत, मुसलमान, मराठे आणि अिग्रज हा जो ठोकळ मानाचा अनुक्रम दिसतो त्याची अुपपत्ति आपणास या लेखमालेंत लावावयाची आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

पैकी रजपुताचा पराभव होअून मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाली त्यावेळच्या राज्यक्रान्तीचा विचार स्मिथ या नावाच्या अिग्रज अितिहास लेखकानें केला आहे तो म्हणतो लढाअूपणा या दृष्टीने मुसलमान हे रजपूतापेक्षा निःसशय वरच्या दर्जाचे होते. कारण त्याची रहाणी थंड हवेतली व डोगराळ मुलखातली; ते शरीराने अधिक धिप्पाड व शक्तीने अधिक खंबीर; आणि रजपूत शाकाहारी तर मुसलमान मासाहारी व भयंकर धर्माभिमानी, यामुळें अनन्वित प्रकार करून दहशत उत्पन्न करण्यास ते कचरत नसत. शिवाय रजपुतांची युद्धपद्धती जुन्या पुराण्या थाटाची असून ते युद्धाच्या कामांत हत्तींचें लटांबर आणीत व आपलीच अडचण करून घेत; यामुळे मुसलमानांच्या चलाख घोडेस्वारांपुढें त्यांचा टिकाव लागण्याजोगा नव्हता; इत्यादि.

स्मिथची ही विचारसरणी वरवर विचार करणाऱ्यास खरी वाटण्याजोगी आहे; व तिचा अनुवाद अनेक लेखकांनी केला आहे. परंतु या प्रश्नाचा ज्यांनी सांगोपाग अभ्यास केला आहे आणि ज्याना ऐतिहासिक प्रसंगांची मीमांसा कांही विशिष्ट पूर्व ग्रहदूषित धोरणाने न करतां मोकळया मनानें करावयाची आहे, त्याना स्मिथच्या ग्रंथात नमूद केलेली कारणें समाधानकारक वाटत नाहीत याचे प्रत्यतर भांडारकर प्राच्य संशोधन मदिराच्या अकराव्या वार्षिकं इतिवृत्तांत (Annals, X व XI. part II) डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर याचा ऐक लेख प्रसिद्ध झाला आहे त्यात पहावयास मिळते त्या ठिकाणी त्यानी 'प्राचीन हिंदुस्थानांतील इस्लामी सत्तेची धिम्या स्वरूपाची प्रगति' ( Slow Progress of Islam Power in Ancient India) या मथळयाखाली या प्रश्नाचा ऊहापोह केला असून स्मिथची विचारसरणी खोडून काढली आहे.

थंड हवेंतील रहाणी, धिप्पाड शरीर, मांसाहार, धर्मवेड, आणि घोडदळावरील भिस्त या पाच कारणामुळे मुसलमानाना युद्धात जय मिळणें अपरिहार्य होतें, असे स्मिथच्या लिहिण्याचे तात्पर्य आहे. परतु यातले काही मुद्दे युद्धातील यशापयशाच्या दृष्टीने गैर लागू आणि बाकीचे साफ चुकीचे, अर्थात वस्तुस्थितीस सोडून आहेत, ही गोष्ट उपरिनिर्दिष्ट लेखात मुद्देसूदपणे मांडली आहे. उदाहरणार्थ, मुसलमान मात्र घोडदळाचा उपयोग करीत आणि रजपुतांची भिस्त युद्धात केवळ हत्तीवर असे, हे विधानच खोटे आहे. कारण **गुर्जर**[१] राजांच्या पदरी उत्तम प्रतीचे घोडदळ होते व त्याची श्रेष्ठता मुसलमानी प्रवाशाच्या वृत्तांतांत नमूद केलेली आहे. शिवाय **चाहमान** व **सोळंकी** वंशातील राजांनीं मुसलमानांचा जो युद्धांत सपशेल पराभव केला त्याचें स्वरूप लक्षात घेता हिंदूच्या पक्षांत घोडेस्वारांचा मुळीच तुटवडा नव्हता किवा त्यांचे घोडेदळ हलक्या प्रतीचें नव्हतें, हे पटण्यास अडचण पडणार नाही. उलटपक्षी त्यावेळी युद्धांत हत्तीचा उपयोग मुसलमानहि करीत असत हे दाखविता येतें. उदाहरणार्थ, गजनीच्या महमुदानें तार्तर सरदार अलिखखान याच्याशी बाल्ख नजीक जें

---

१. सुलेमान नांवाच्या व्यापाऱ्याने आपलें प्रवासवृत्त इ. स. ८२१ च्या सुमारास लिहिलेले उपलब्ध आहे. त्यांत त्यानें '**जर्स**' ऊर्फ गुर्जर म्हणजे कनोजचे प्रतिहार राजे यांच्यासंबंधीं दोन विधाने केली आहेत ती अशी, (१) He has great riches and his camels and horses are numerous आणि (2) This king maintains numerous forces and no other Indian Prince has so fine a cavalry, (Elliot Vol I. p. 4). या सुलेमानाने आशिया खंडांतील बरेच देश पाहिले होते, त्यार्थी त्यानें गुर्जर राजाच्या घोडदळाचा केलेला विशिष्ट उल्लेख महत्त्वाचा समजण्यास हरकत नाही.

युद्ध केलें, त्या वेळी त्यानें आपल्या बाजूस ५०० हत्ती सज्ज ठेवले होते; आणि त्यांचा त्याला चांगला अुपयोगहि झाला. कारण हा हत्तीचा अजस्र ताडा पाहूनच विरुद्ध पक्षाचे घोडे घाबरले व त्याची चाल अेकदम बद पडली; यामुळें महमुदास त्यांच्यावर हत्ती चालवून त्यांची धांदल अुडविणें, त्याना पळवून लावणें, आणि त्याना हत्तीच्या पायाखाली तुडविणें या गोष्टी सहज करता आल्या व त्याला जय मिळाला. या युद्धांत अिलाखखानाच्या बाजूचे निशाण धरणाऱ्या घोडेस्वारास महमुदाच्या हत्तीने सोंडेंत धरून मारल्यामुळें तार्तराच्या बाजूचा अेकदम गोंधळ झाला व शेवटी ते पराभूत झाले असें अितिहासकार सांगतात. यावरून रजपूत युद्धांत हत्तींचाच अुपयोग करीत आणि मुसलमान मात्र घोड्याचा करीत हें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून आहे हे निर्विवाद दिसते त्याअर्थी रजपुताच्या पराभवाचे हे कारण निराधार ठरते.

थड हवेंतील रहाणी, धिप्पाड शरीर व मासाहार या गोष्टी जर हिंदबाह्य प्रदेशातील लोकाना युध्दाच्या कामी श्रेष्ठत्व प्राप्त करून देत असतील तर त्याचा परिणाम विशिष्ट काळीच न दिसता सातत्याने दिसला पाहिजे; परतु तसा तो दिसत नाही.

हे तपासून पहाण्यासाठी चार पाचशे वर्षातील अेतत्सबधीच्या अितिहासाकडे नजर पोहोचविली पाहिजे कारण, मुसलमानांनी अेकच स्वारी केली आणि तडाक्यासरशी रजपुतांचा पराभव झाला व राज्यक्रान्ति घडून आली, अशातला मुळींच प्रकार नाही. मुसलमानांची सिधप्रातावर पहिली स्वारी इ. स. ७१२ मध्यें झाली आणि पृथ्वीराजाचा पराभव होअून राज्यक्रान्ति झाली ती इ. स. ११९२ मध्यें. म्हणजे ४८० वर्षेपर्यंत रजपुतांनी मुसलमानांचे हल्ले परतविण्यांत यश मिळविले असा अर्थ होतो. वस्तुतः रजपुतांची ही कामगिरी जगाच्या अितिहासांत नमूद होण्यासारखी आहे. कारण महमद पैगंबराच्या अुदयामुळे जो अिस्लामी समाज अस्तित्वांत आला, त्याची घडाडी कांही शतके अशा कांही विलक्षण स्वरूपांत टिकली की तिच्यापुढे आशियाटिकच काय पण थंड देशांतले पाश्चात्य लोकहि टिकले नाहीत. सिंधपासून स्पेनपर्यंतच्या अफाट प्रदेशावर अिस्लामी चांदाचें निशाण फडकविण्यास पुरी शंभर वर्षे देखील लागली नाहीत [२] अिस्लामी

२. Little more than a century later the successors and followers of the fugitive (Prophet) were ruling an empire which extended from the Atlantic to the Indus and from the Caspian to the cataracts of the Nile and included Spain and Portugal, some of the most fertile regions of

पुढील पृष्ठावर चालू

सैन्य जाअील तेथें यशस्वी व्हावे, व त्याने मनांत आणावा तो देश पादाक्रान्त व्हावा, असा अनुभव त्रिखंडातील अनेक लोकांना आला, तेव्हां अशा या अिस्लामी सैनिकाची दुर्धर्ष वाटणारी धडाडी ज्या रजपुतानी अेक दोन वर्षे नव्हे तर साडे-चारशे वर्षे निष्फळ ठरविली आणि अेवढ्या अवधीत अनेक वेळां अुघड युद्धात ज्यांनी मुसलमानाचा कित्येकदां सपशेल पराभव केला त्या रजपुताची वीरश्री अगर धैर्य मुसलमानांपेक्षां कमी प्रतीचें होते असे प्रतिपादणे केव्हांहि चुकीचेच ठरणार आहे. मुसलमानानी अखेरी साधली आणि राज्यक्रान्ति घडून आली या गोष्टीचा अुलगडा साध्या रीतीने होण्याजोगा आहे. राज्य हे अेका व्यक्तीचें ही समजूत हिंदू समाजात बद्धमूल असल्यामुळे प्रत्येक राजाचा मृत्यु अगर पराभव राज्यात मोठी घडामोड घडवून आणण्यास अुपयोगी पडण्याजोगा होता; आणि अशा वेळी कर्त्या शत्रूशी तोड देण्याचा कुयोग जुळून आला म्हणजे राज्यक्रान्ति घडून येत असे, हे लक्षांत ठेवल्यास शेवटी रजपुताचा पराभव झाला या अेकाकी विधानाप्रमाणे साडेचारशे वर्षे रजपुतांनी अिस्लामियाना अडवून धरले यामुळे जगभर भरधाव दौडत सुटणाऱ्या चादाची हिंदुस्थानांतील प्रगति फारच सावकाशीची व मुगीच्या पावलाने झाली याहि गोष्टी विचारार्ह वाटण्याजोग्या आहेत.

मुसलमानांच्या धार्मिक कडवेपणाने त्याना जय मिळवून दिला हेहि म्हणणें पटण्याजोगे नाही. कारण, या बाबतीतली बरीच हकीगत काल्पनिक व अतिशयोक्तीची आहे असें आता सशोधकाच्या नजरेस येऊ लागले आहे. उदाहरणार्थ, महमूद गझनीच्या स्वाऱ्याची फिरिस्तानें दिलेली हकीगत पहा. महमुदाची सहावी स्वारी अि स १००९ मध्ये झाली. त्या वेळी जयपाळाचा मुलगा अनगपाळ याने सगळीकडे वकील पाठवून उज्जयिनी, ग्वाल्हेर, कालिजर, कनोज, दिल्ली आणि अजमीर येथील राजाना आपल्या बाजूस वळवून घेतले. यामुळे हिंदूच्या दोस्त सघांत पुष्कळ राजे सामील होते असें फिरिस्ता सागतो (ब्रि. व्हा. १ पृ ४६). पण महमुदाच्या पराक्रमाची कहाणी उठावदार भासावी म्हणून पाचशे वर्षांनतरचा लेखक फिरिस्ता यानें ही निव्वळ गप्प नमूद केली आहे असे म्हणावे लागते. कारण या स्वारीची हकीकत देणारा जो जुना सम-कालीन मुसलमानी लेखक अल्अुत्बी त्याच्या लिहिण्यांत हिंदूच्या या सघाविषयी

---

मागील पृष्ठावरून

Southern France, the whole of the northern coast of Africa, upper and lower Egypt, their own native Arabia, Syria, Mesapotamia, Armenia, Persia, Afganistan, Baluchistan, and Transoxiana. (Cambridge History III p. 1.)

अवाक्षरहि नमूद केलेले नाही. शिवाय फिरिस्तानें सांगितलेले ग्वाल्हेरचे अगर दिल्लीचे राजे महमुदाचे वेळीं अस्तित्वातच नव्हते आणि अजमीरचें राज्य तर यानतर १०० वर्षांनीं (अि. स. ११०५-११३९ च्या सुमारास ) स्थापले गेलें. यावरून फिरिस्ताने महमुदाच्या पराक्रमाचे वर्णन भडक रगात करता यावें यासाठी हिंदु संघटणेचा वृत्तांत रचला हे उघड दिसतें. तथापि फिरिस्ताच्या इतिहासावरून पाहिले तरी असें दिसतें की, या युध्दांत रजपुतांनीं उत्तम शौर्य दाखविले; आणि शत्रूच्या घोडदळात पायीं शिरून त्यांनी तीन चार हजार मुसलमान सैनिक कापून काढले. यामुळें महमूद त्यादिवशी युद्ध तहकूब करण्याच्या विचारास लागला होता. इतक्यात आनंगपालाचा हत्ती कांही कारणामुळें बेफाम होऊन पळत सुटला, 'तेव्हा आपणही पिछेहाट करावी असा सेनापतीचा सकेत आहे' असें हिंदु शिपायाना वाटल्यामुळें ते रणांगणावरून निघाले आणि महमुदास जय मिळाला. अर्थात् हा जय महमुदाच्या वरिष्ठ प्रतीच्या पराक्रमाचे फळ नसून तो यदृच्छेनें घडणाऱ्या आकस्मिक गोष्टीचा परिणाम आहे, असें म्हणावें लागेल. सोरटी सोमनाथाच्या स्वारीचाहि असाच प्रकार आहे. 'मूर्ति विकणारा' म्हणविण्यापेक्षा 'मूर्ति भजक' म्हणविणे महमुदास श्रेयस्कर वाटले व त्याप्रमाणें मूर्ति फोडतांच माणकाची व मोत्यांची रास त्याला लाभली वगैरे हकीकत चालू इतिहासात नमूद केलेली आहे परतु सोमनाथाची मुळी मूर्ति नसून लिंग होते; व ते एकसंधी दगडाचे होते. अर्थात वरील वर्णन कादंबरीवजा आहे; आणि ते जुन्या मुसलमानी ग्रथकारांच्या लिहिण्यात आढळत नाही हेहि सरळच आहे. मात्र हे लक्षांत ठेवण्याजोगे आहे की, सोमनाथाची स्वारी आटपून महमूद परत गेला तो सरळ वाटेने न जातां सिंधच्या वाळवटातून हालअपेष्टा सोशीत गेला. यांचें कारण असे होते कीं 'अबू येथील परमदेव नावाच्या जबरदस्त हिंदू राजाने अजमीर गुजराथ कडची वाट अडवून महमुदाशी युद्ध करण्याची चागली तयारी केली आहे, ही बातमी महमुदास कळली होती व त्याला हे युद्ध टाळावयाचे होतें. यावरून महमुदाने हिंदु सैन्यावर जय मिळविले नाहीत असे म्हणावयाचे कारण नाही. मात्र ते जय हिंदु राजे बेसावध असल्यावेळी आकस्मिक स्वरूपाचे छापे घालून त्याने मिळविले. आणि हिंदूची तयारी असेल त्याप्रसगी त्यानें युद्धाचा प्रसंग टाळला. यावरून त्याच्या भरारीची तारीफ करता येईल व त्याच्या धूर्तपणास यशाचें श्रेय देतां येईल. पण तो धर्मवेडा होता व हिंदु सैन्यावर तुटून पडण्यास सदैव उत्सुक असे, यासारखा निष्कर्ष यांतून निघत नाहीं.

यानंतर शहाबुद्दीन घोरीच्यावेळी देखील रजपुतांनीं अनेक वेळां जय मिळविले. इ. स. ११७८ मध्यें गुजराथचा राजा भीमदेव यानें कासहृद येथें मुसलमानांचा पराभव करून अशी कत्तल केली कीं शहाबुद्दीनास घाईनें परत जावें

लागलें. पराभवामुळें शहाबुद्दीनाचा इतका हिरमोड झाला कीं, त्यानें यापुढें बारा वर्षेपर्यंत हिंदुस्थानवर स्वारी करण्याचें नांव काढलें नाही; आणि इ. स. ११९१ मध्ये देखील त्याने स्वारी केली तेव्हां हिंदुपक्षांत फाटाफूट होती तरी पृथ्वीराजाने ठाणेश्वरानजीक त्याचा पुरा पराभव करून मोठा जय संपादन केला. यामुळें इस्लामी सैन्यास पुनः पळ काढणें भाग पडलें.

यावरून थंड हवेंतले म्हणून, अगर कडव्या धर्माचें म्हणून किंवा धिप्पाड व खंबीर शरीराचे म्हणून मुसलमानाना रजपुतांच्यावर जय मिळणे अपरिहार्य होते ही स्मिथची विचारसरणी या राज्यक्रांतीचा समाधानकारक उलगडा करण्यास उपयोगी पडत नाही. तो उलगडा कशानें होतो आणि धर्माच्या बाबतीत मुसलमानाचे धोरण नेहमीच कडवेपणाचें होते हाहि समज कसा चुकीचा आहे इत्यादि मुद्द्याचा विचार पुढील लेखाकांत करतों.

* * * *

### लेखांक २ रा

## धर्मवेड व राजकारण

मुसलमानानी रजपुतांचा पराभव केल्यामुळे, उत्तर हिंदुस्थानांत जी राज्यक्रान्ति झाली तिची उपपत्ती लावताना स्मिथने जीं कारणें दिलीं आहेत, त्यापैकी कांहींचा विचार मागील लेखात केला. हवापाणी, शरिराचा धिप्पाडपणा व आहारविहार याच्या भेदामुळे अगर हत्तीच्या ऐवजी घोडदळ वापरल्यामुळे रजपुताच्यावर मुसलमानाना जय मिळवितां आला; ही विचारसरणी टिकत नाहीं हे तेथे दाखविले. आतां या लेखांत मुसलमानांच्या धर्मवेडानें त्यांना जय मिळवून दिला किंवा काय व या वेडानें ते दिल्लीचे बादशहा होऊं शकले किंवा कसे हा प्रश्न विचारांत घ्यावयाचा आहे.

आपल्या धर्माच्या प्रसारार्थ मनापासून झटणें व या कामांत प्रसंगोपात तरवारीचा उपयोग करण्यास हरकत नाहीं असें मानणें हें निराळें. हे धर्मवेड नव्हें. पण माझा धर्म तेवढा खरा, आणि तो न मानणाऱ्या इतर धर्मीयांची कत्तल करणें, त्यांची देवळें पाडणें, देव फोडणें वगैरे विध्वंसक स्वरूपाचीं कृत्यें करणें हें माझें कर्तव्य आहे व ते बजावीत असतां राजकारण अगर सामान्य व्यवहार याच्याकडे लक्ष पुरविण्याचे कारण नाहीं. ‘एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तलवार’ वागविल्यानें सर्व काम निभेल अशा श्रद्धेनें वागणाऱ्या मनुष्यास ‘धर्मवेडा’ अगर कडव्या धर्माचा अनुयायी इत्यादि नांवें देतां येतील. तेव्हां हिंदूचा पराभव करणाऱ्या इस्लामी वीराची वृत्ति अशा प्रकारची केवळ कडव्या धर्माची होती किंवा त्यांत राजकारणाची व नफ्या–तोट्याची दृष्टि मिसळलेली होती, हें आपणांस येथें पहावयाचें आहे.

प्रथम हे लक्षांत ठेवले पाहिजे की, आपणास यासाठीं जवळ जवळ पांचशें वर्षांतील व हजारो मैलांचें क्षेत्रफळ असणाऱ्या आणि निरनिराळ्या वंशांच्या लोकवस्तीनें भरलेल्या, अशा विस्तीर्ण भूप्रदेशावर घडलेल्या शेकडों घडामोडी-पैकी फक्त तीन चार प्रसंग विचारात घ्यावयाचे आहेत; व ते हे. इ. स. ७१२ मध्यें महमद बिन कासिमच्या नेतृत्वाखाली आरबांनी सिंधचा उच्छेद केला; त्यानंतर जवळ जवळ तीनशे वर्षांनी महमूद गझनीच्या नेतृत्वाखाली इ.स. १००९ च्या सुमारास तुर्कांनीं पंजाबचा उच्छेद केला आणि त्यानंतर पावणे दोनशें वर्षांनी इ. स. १२०० च्या सुमारास महमद घोरीच्या नेतृत्वाखाली अफगाणानीं उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद केला. ( मध्ययुगीन भारत भाग ३ पृ. १६२ ) या तिसऱ्या उच्छेदानंतर मुसलमानी धर्माच्या लोकाची दिल्लीच्या सिंहासनावर स्थापना झाली पहिल्या म्हणजे सिंधच्या स्वारीच्या वेळी किंवा दुसऱ्या म्हणजे महमूद गझनीच्या वेळी दिल्लीचे सिंहासन हस्तगत करण्याची महत्त्वाकांक्षा मुसलमानाच्या मनात उत्पन्न झाली होती असें मुळीच दिसत नाही. सिंधची मोहीम किरकोळ वैयक्तिक तंट्याच्या पायी उत्पन्न झाली व तिच्या प्रीत्यर्थ धर्माच्या नांवाखाली काहीं काही लोकाची कत्तल होऊन देवळाचा विध्वंस करण्यांत आला आणि लहानसें संस्थान मिळून उत्पन्नाची सोय होताच हे धर्मवेड नाहीसें झाले आणि नेतृत्वाची दौड बंद पडली महमूद गझनीचा हेतु देखील हिंदुस्थानांतून लूट नेण्याचा होता. येथे धर्माच्या नावाखाली त्यानें देवळाचा विध्वंस व मुलुखाची नासाडी केली; पण दिल्लीस राज्य स्थापण्याची बुद्धि त्यानें मनांत बाळगिली नाही. महंमद घोरीनें मात्र दिल्लीचें राज्य हस्तगत केलें. परंतु याबाबतीत धर्मवेडानें त्याला मदत केली असें मुळींच म्हणतां येत नाहीं. धर्मापेक्षां राजकारणासच त्यानें आपल्या डोक्यांत प्राधान्य दिलें होतें. तात्पर्य, धर्मवेडानें राज्य मिळवून दिलें नसून राजकीय दृष्टीनें घोरीला दिल्लीचा बादशहा बनविला असें इतिहास सांगतो.

खास हिंदुस्थानांतील घडामोडी लक्षांत घेऊन या प्रश्नाकडे पाहिलें तरी देखील हेंच उत्तर येतें. पैगंबराची हिजरी गणना इ. स. ६२२ मध्यें सुरू झाली. तेव्हांपासून इ. स. ७१२ पर्यंतच्या ९० वर्षांत इस्लामी घोडा बगदाद पासून इराण व मेक्रान प्रांतांतून दौडत निघाला तो सिंधपर्यंतचा पल्ला त्यानें गांठला. म्हणजे एका शतकात त्याला दीड दोन हजार मैलाचा प्रदेश आक्रमण करतां आला आणि तेथून मुलतान व पंजाबच्या मार्गानें दिल्लीपर्यंत पांच चारशें मैलांचा प्रदेश हस्तगत करण्यास पांच चारशें वर्षे लागावी याचा अर्थ काय ? दरसाल पंधरा मैलाचा वेग होता तो वर्षास १ मैल कां झाला ? हें गणित सोडविण्यासाठी या पावणें पांचशे वर्षांचा अवधी दोन खंड पाडून तपासला पाहिजे.

पहिल्या अडीचशें वर्षांच्या अवधीत मुसलमानी घोडा जवळ जवळ थबकला होता. प्रतिहार सम्राटांची जबरदस्त शिपाईगिरी या घोड्याला पुढें सरकू देईना, आणि त्यानतर हे प्रचंड साम्राज्य फुटून त्याची शकले झाली, तेव्हां लहान राज्यें अस्तित्वांत आली; त्यांच्या आपापसातील यादवीच्या काळात हा मुसलमानी घोडा पुन: पुढे ढकलणारे एक दोन नामांकित स्वार निपजले; आणि त्यापैकी एकाच्या हातून पृथ्वीराज मारला गेल्यामुळे या स्वारास दिल्ली गांठता आली. पण या सर्व उलाढालीत हिंदु राजांच्या वीरश्रीचा कमीपणा दिसला नाही अगर इस्लामी धर्मवेडाचा प्रभाव यशस्वी झाला नाही. राजकीय महत्त्वाकांक्षा व सावधानता यानीच राजकीय प्रश्न सोडविला असें दिसते. तो कसा सोडविला ते येथें थोडक्यांत असें सांगतां येईल.

सिंधवरची पहिली स्वारी वालीद हा खलीफ असता महंमद बिन कासीम याच्या हातून झाली. महंमदाच्या मागून जुनैदची नेमणूक त्या कामावर झाली त्याने सिंध प्रांतातला काही भाग घेऊन व हिंदुस्थानांत दूरवर सैन्यें पाठवून आपला वरचष्मा कायम करण्याचा पराकाष्ठेचा यत्न केला. सैन्याचा एक भाग भडोच-पर्यंत रवाना केला, दुसरा उज्जनीकडे पाठविला आणि तिसऱ्या भागाचे आधि-पत्य आपण स्वत: स्वीकारून भिनमाल व गुर्जरवर जुनैदने स्वारी केली. पैकी उज्जनीकडच्या सैन्य भागाचा पराभव प्रतिहारी घराण्यांतील नागभट्ट याने केला. राजपुताना, काठेवाड, गुजराथ यथे धुमाकूळ घालून दक्षिणेकडे जाणाऱ्या दुसऱ्या इस्लामी सैन्याचा पराभव अवनी जनाश्रय पुलकेशी याने केला. हा पुलकेशी बदामीच्या चालुक्य सम्राटांचा एक हस्तक होता. आणि या हस्तकानेंही अर-बाच्या सैन्याची लाट यशस्वी रीतीने परतविली, याबद्दल या पुलकेशीला 'अनिवर्तकनिवर्तयिता' अशी पदवी देण्यात आली. यावरून अरबांचें सैन्य गुजराथेकडील लहान सहान राजाना अजिंक्य वाटलें तरी त्याला हट-विण्याचें काम चालुक्य साम्राज्यातील एका मांडलिकाने केले. त्याअर्थी या अरबांचा चालुक्याच्या सामार्थ्यापुढे टिकावं लागण्याजोगा नव्हता हें उघड झाले. अरबांच्या या स्वारीने भिनमाल येथील चापवशीय राजघराणे जरी मोडकळीस आलें तरी लवकरच प्रतिहारी घराण्यांचा जोर वाढून कनोज येथें त्याने मोठ्या साम्राज्याचे ठिकाण केल्यामुळें उत्तर हिंदुस्थान परक्यांच्या हल्ल्यास भीक घालीनासा झाला.

नवव्या शतकाच्या प्रारंभी कनोजचें साम्राज्य इतके अफाट व बलाढ्य झालें होते कीं मुलतानचे यवन म्हणजे मुसलमानी राजे आणि काबूलचे शाही वंशातील तुर्की राजे हे या प्रतिहारी सम्राटाचे मांडलीक बनले होते. मात्र इ. स.

८५१ च्या सुमारास दक्षिणेंतील राष्ट्रकूट[१] व उत्तरेकडील प्रतिहारी सम्राट यांच्या राज्यांच्या हद्दी एकमेकास भिडल्या व त्यांच्यांत वितुष्ट आले. यामुळे मुलतान्च्या इस्लामी मांडलिकाने कनोजच्या साम्राज्यांतून फुटून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. तेव्हां त्याच्याविषयी दक्षिणेतील राष्ट्रकूटांना सहानुभूति वाटत होती. एवढेंच नव्हे तर प्रतिहारी साम्राज्याशीं राष्ट्रकूटांचे शत्रुत्व असल्यामुळें राष्ट्रकूटांचें राज्यात इस्लामी धर्माला मान होता व त्याच्या वाटेस कोणी जात नसत. बाकी अशा सहानुभूतीने अगर अगच्या जोरावर मुलतानच्या इस्लामी संस्थानिकाचा कनोजच्या सम्राटापुढे टिकाव लागण्याचा मुळीच सभव नव्हता. पण या संस्थानिकांच्या हाती हिंदूचे अेक मर्मस्थान सांपडले होते. तें हे की, मुलतान येथे अेक सूर्याची मूर्ति असून त्याच्या दर्शनासाठी मोठी यात्रा भरत असे; यामुळें ही अेक मोठी अुत्पन्नाची ब.ब होअून बसली होती. मुसलमानांनीं अितर किरकोळ देवालये पाडली व आपला धार्मिक कडवेपणा व्यक्त केला तरी यात्रेकरूंच्या भक्ति-भावामुळे भरपूर अुत्पन्न देणारी ही मूर्ति त्यानी प्रारंभापासून कायम ठेवली होती. आणि अि. स. ९४३ पर्यंत तरी मुलतानच्या अिस्लामी अधिपतीना या मूर्तिमुळे मिळणारे पैसे त्याच्या धर्माभिमानास बाधक वाटले नाहीत. परतु या मूर्तीचा याहीपेक्षा महत्त्वाचा अुपयोग या अधिपतींना होत असे. तो अल्मसूदीच्या शब्दात असा सागता येअील की, "मुलतानावर जेव्हा हिंदुराजे चालून येत आणि अिस्लामियांचा त्यांच्या पुढे टिकाव् लागेनासा होअी तेव्हां 'सूर्याची मूर्ती फोडतो, नाहीतर सैन्य घेअून परत निघून जा अशी ते भीति घालीत व तिचा अुपयोग होअून सैन्ये परत जात." तात्पर्य, प्रतिहारांच्या सैन्यास परतवून लावण्याचे कामी मुसलमान संस्थानिक ज्या शस्त्राचा अुपयोग करीत असत तें हे अशा प्रकारचें होते. अर्थात मूर्तिभंजकत्वाचा[२] बाणा अगर धर्मवेड त्यांना तारक झालें नसून व्यावहारिक नफयातोटयाची व राजकारणी दृष्टीच त्यावेळी त्यांना जीव जगविण्यास अुपयोगी पडली. यावरून जगात अितरत्र

---

१ मुसलमान ग्रथकार सुलेमान याने या वेळच्या राष्ट्रकूट राजांची गणना जगांतील अत्यंत बलाढय सम्राटांत केलेली आहे. बगदादचा खलीफ, चीनचा बादशहा, रूमचा बादशहा, आणि राष्ट्रकूटाचा राजा हेच चार राज्यकर्ते, त्याच्या मतें, सर्वांत नांव घेण्याजोगे. अर्थात अितर राज्यकर्ते याच्या मानाने 'शाकाय वास्यात् लवणाय वास्यात्' या योग्यतेचे.

२ मुलतान येथील सूर्याची मूर्ति शेवटीं अि स. ९८५ मध्ये कार्माटियन लोकांनीं फोडली. हे कार्माटियन शिया पथी असल्यामुळें त्याचे बगदादच्या खलीफाशी वांकडे होतें व त्यानी सूर्याचें देअूळ मोडून मोठी मशीद बाधली. त्याचप्रमाणें त्याच्याजवळ असलेली जुनी मशीद त्यांनी बंद केली; कारण अेवढेंच की ती अुमय्यद खलीफांच्या अमदानीत बांधली गेली होती. पुढें महंमद गझनीनें या

पुढील पृष्ठावर चालू

मुसलमानांना धर्माचा कडवेपणा काय अुपयोगी पडला असेल तो असो; परंतु हिंदुस्थानांतील तर अनुभव असे सांगतो की, अि. स. ७१४ पासून ९४३ पर्यंत निदान सव्वादोनशें वर्षें अिस्लामी राजांचे पाअूल सिंधच्या पलीकडे पडलें नाही; अेवढेंच नव्हे तर ते मोठ्या मिनतवारीने प्रतिहार सम्राटाच्या सैन्यापुढें कसा तरी तग धरून राहिले होते अितकेच. त्याच्या ठिकाणी ताठ्याचा भाग बिलकुल नव्हता. परंतु कनोजच्या साम्राज्यास त्यानंतर अुतरती कळा लागून त्याच्या जागीं चार लहान राज्यें अस्तित्वात आली आणि त्यांच्या राजकारणांत अेकसूत्रीपणा न राहतां परस्परविरोधाची भावना सुरू झाल्यामुळें त्यांची शक्ति विभागली गेली. त्याच सुमारास आणखी अेक योग जुळून आला तो हा की गझनीच्या तख्तावर महमुदासारखा महत्त्वाकांक्षी पुरुष अधिकारारूढ झाला.

अशा रीतीने दहाव्या शतकाच्या अुत्तरार्धात कनोज येथील प्रतिहारी साम्राज्य मोडून राजपुताना व पंजाब येथें चाहमान घराणें, गुजराथ व काठेवाड येथें सोळंखी घराणें आणि मथुरेच्या बाजूस गहडवाल घराणें सत्ताधीश झालें. आणि साम्राज्य सत्तेच्या जागी यादवी युद्धांत गढलेल्या रजपूत राजांवर सबक्तगीन व त्याचा मुलगा महमूद याच्याशी झगडण्याचा प्रसंग आला. मात्र महमुदानें बारा चौदा स्वाऱ्या केल्या तरी लूट मिळविणें अेवढाच त्याचा हेतु दिसतो; पंजाबच्या पलीकडे हिंदुस्थानचे राज्य काबीज करावें हे धोरण त्याने ठेवले नाही. यामुळे महमुदाच्या कारकिर्दीचा राजकीय दृष्ट्या कायमचा असा परिणाम येवढाच झाला कीं, अफगाणिस्थान व पश्चिम पंजाब अेवढा भाग हिंदु सत्ताधीशांच्या हातून सुटला व तो गझनीच्या सत्ताधीशाकडे गेला. यामुळें चाहमान व गहडवाल या रजपूत राजांच्या प्रदेशावर मुसलमानाची धाड येण्याची अेकसारखी भीति निर्माण झाली. या रजपूत राजांना सभोवारच्या हिंदु संस्थानिकांशीं तर युद्ध करावें लागेच; परंतु त्याबरोबर अेका बाजूची हद्द मुसलमानी राज्यास भिडल्यामुळे मोठा पेंच अुत्पन्न झाला. गहडवाल घराण्यांतील गोविंदचंद्राने हंमीराचा[३] म्हणजे गझनीच्या राजांचा दोन वेळा चांगलाच पराभव केला. आणि

मागील पृष्ठावरून
कार्माटियनांचा पराभव करून पहिली मशीद पुन: सुरू केली व दुसरी बंद पाडली यासबधीं अेक महत्त्वाची गोष्ट ही की कनोजचे प्रतिहार घराणे जोंपर्यंत जोरांत होते तोपर्यंत सूर्याची मूर्ति फुटली नाही आणि त्यांचे साम्राज्य मोडकळीस आल्यानंतर कार्माटियन लोकांना सूर्याची मूर्ति फोडण्याची अिच्छा झाली.

३ गझनी येथील तुर्कांचे राज्य सामानी बादशहाच्या छत्राखाली अुत्पन्न होअून वाढलें. या सामानी वंशांतील पहिला बादशहा अि. स. ९०३ मध्ये गादीवर बसला आणि त्यानें बुखारा शहर अुर्जितावस्थेस आणलें. या बादशहाना 'अमीर' ही पदवी होती. सबक्तगीनानें हीच पदवी धारण केली व त्याच्या अनुषंगानें हिंदुस्थानांत हंमीर रूपानें संस्कृत ग्रंथांत झळकूं लागली.

ताम्रपटावरून अेक विशेष गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं, त्यानें **तुरुष्कदंड** नांवाचा अेक कर आपल्या राज्यांत बसविला होता. अर्थात मुसलमान राजे ज्याप्रमाणें जिझिया कर हिंदुप्रजेपासून घेत असत, त्याप्रमाणें **हा गोविंदचंद्र मुसलमान प्रजेपासून तुरुष्कदंड हा कर वसूल करीत असे. हा कर या** घराण्यातील शेवटला राजा जयचंद्र यानें आपणहून उठविला. याचें कारण बहुधा असे दिसते की, त्याचे चाहमान घराण्याशीं वितुष्ट आल्यामुळे त्याच्याविरुद्ध लढण्याचे कामी मुसलमानी राजांचें साहाय्य व मुसलमानी प्रजेची सहानुभूति त्याला संपादन करावयाची होती.

तथापि या थरावर गोष्टी जाण्यापूर्वी चाहमान घराण्यांतील पुरुषांनी इस्लामी सत्तेला आडविण्यासाठी कांही वर्षेपर्यंत करून दाखविलेल्या कामगिरीचा अुल्लेख केला पाहिजे या घराण्यातील अर्णो राजाने मुसलमानी सैन्याचा पराभव करून त्या गोष्टीच्या स्मरणार्थ अेक तलाव बांधला; तो अद्याप **आनासागर** या नावाने अजमीर येथे प्रसिद्ध आहे. या नंतर इ. स. ११६४ मधील शिलालेखावरून असे दिसते की विशालदेव यानें म्लेच्छांचा पुरा पराभव करून **उत्तर हिंदुस्थानास पुनः 'आर्यावर्त बनविलें**. त्याचप्रमाणें ललित विग्नहराज नावाच्या ग्रंथाधारे असे दिसते की, या राजानें हंमीराच्या म्हणजे गझनीच्या अिस्लामी राजाच्या मोठ्या सैन्याशी गांठ पडली होती तरी केवळ शौर्याच्या जोरावर युद्ध जिंकले पुढे आणखी अेका राजाने सतलज नदीच्या कांठी पचपट्टण येथे असलेले ठाणें ताब्यात घेअून सरहद्दीचा बंदोबस्त केला.

यानंतर शेवटच्या पृथ्वीराजाच्या वेळी परिस्थिति बदलली. गझनीच्या सिंहासनावर शहाबुद्दीन महंमद[४] घोरी हा अधिष्ठित झाला; व त्याने स्वाऱ्या करण्यास सुरवात केली त्याचा प्रथम गुजराथच्या राजानें परस्पर पराभव केला. नंतर इ. स. ११७८ मध्यें त्याने चाहमान राज्याच्या हद्दीत न शिरता मारवाडचें रेताड मैदान ओलांडून पुन. गुजराथच्या राजाशी गांठ घातली. त्या वेळी गुजराथचा राजा भीमदेव सोळंकी याने अबू पर्वतानजिक कासहृद येथे **मुहंमदाचा फार मोठा पराभव केला**; त्यांत मुहमद स्वतः जखमी झाला. सारांश, सरहद्दी पलीकडील मुसलमानांचा नेहमीं जय होत असे असा मुळीच प्रकार नव्हता. अुलट रजपुतांनीं त्याचा पराभव केल्याची अनेक विश्वसनीय अुदाहरणे दाखवितां येतात.

या पराभवाने शहाबुद्दीनाच्या मनावर चांगलाच परिणाम झाला; व त्यामुळें त्यानें पुनः तेरा वर्षेपर्यंत हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा विचार केला नाहीं.

---

४ महमूद व मुहमद आणि महम्मद या नांवातील बारीक भेदाचे स्पष्टीकरण करणें जरूर आहे. त्यांचे शुद्ध अुच्चार असे (१) मुहम्मद इब्न कासीम (२) महमूद गझनी आणि (३) घूर येथील शहाबुद्दीन अूर्फ मुहम्मद बिन साम.

परंतु अि. स. ११९१च्या सुमारास अेक योग असा आला की यावेळी गहडवाल व चाहमान घराण्यांत मुलीच्या देवघेवीच्या प्रकरणामुळे वितुष्ट वाढले व जयचंद गहडवाल यानें महमद घोरीस गुप्तपणें निरोप पाठवून स्वारी करण्याविषयीं सुचविले असें दिसतें. तथापि याहि वेळी पृथ्वीराजाने महंमदाचा पराभव केला. परंतु यानंतर पुढच्या वर्षी त्याने पुनः येअून अकस्मात छापा घातला व हाती लागलेल्या पृथ्वीराजास ठार केले; अित्यादि हकीकत मागील लेखात दिलीच आहे. या हकीकतीवरून धर्मवेड अगर सरहद्दीपलीकडील लोकाच्या अंगांतील शौर्यादि गुणांतील श्रेष्ठत्व अित्यादि कारणें रजपुताचा पराभव करण्यास अगर अिस्लामियांचें राजकीय पाअूल पुढे पडण्यास अुपयोगी पडली नाहीत हे अुघड आहे. अशा रीतीनें स्मिथच्या कारणांचा विचार येथवर झाला. वास्तविक कारणें कोणती होती याचा विचार यापुढें करण्यात येअील

* * * *

## लेखांक ३ रा

## एकदेशी राजकारणाचा पाडाव

उत्तर हिंदुस्थानांत रजपुतांच्या जागी मुसलमानाची सत्ता प्रस्थापित करणारी जी राज्यक्रान्ति इ. स. १२०० च्या सुमारास घडून आली, तिचा विचार करतांना मुसलमानांच्या विजयाची जी कारणे स्मिथनें दिली आहेत, तीं कशी चुकीचीं आहेत याचें विवेचन गेल्या दोन लेखात केले आतां स्मिथखेरीज इतर इतिहासकारांनी या प्रश्नाची जी मीमासा केली आहे, तिचा विचार करावयाचा आहे. ही मीमांसा अनेक जुन्या लेखकानीहि केली होती. तरी या प्रश्नाचा विचार करण्यास उपयोगी पडणारी विश्वसनीय सामग्री गेल्या अर्ध शतकात संशोधकाच्या हातून पुढे येऊन तिचें संकलन करण्याजोगी अनुकूल परिस्थिति अलीकडे १०–१२ वर्षांत निर्माण झाली आहे अशा आधुनिक लेखकात डॉ देवदत्त रामकृष्ण भांडारकर, रा. चिंतामणराव वैद्य आणि लेफ्ट. कर्नल सर वूल्स्ले हेग या तिघांचा उल्लेख प्रामुख्यानें केला पाहिजे. डॉ भाण्डारकर यानी अलाहाबाद येथे १९२६ मध्यें भरलेल्या प्राच्यपरिषदेपुढें यासबधीचा एक निबध वाचला आणि त्यांत काही भर घालून या विषयाची मांडणी त्यांनी भाण्डारकर प्राच्य संशोधन संस्थेच्या वार्षिक इतिवृत्ताच्या (Annals) १० व्या व ११ व्या व्हाल्यूममध्यें (इ. स. १९२९–३०) मिळून केली आहे. त्यातील विचारसरणीचा बराच भाग मागील दोन लेखांत आला. आणि इतर मुद्याचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे. रा. चिंतामणराव वैद्य यांनी 'मध्ययुगीन भारत' या ग्रंथाच्या

पहिल्या व तिसऱ्या भागांत (इ. स. १९२६) या प्रश्नाचें विवेचन केलें आहे; आणि तिसऱ्या (सर हेग) ग्रथकारानी 'केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथ-मालेच्या तिसऱ्या खडात (इ. स. १९२८) या प्रश्नाचा ऊहापोह केला आहे. तिघानीहि या विषयाचा विचार स्वतत्रपणें केला असल्यामुळे काही बाबतीत प्रत्येकाची विचारसरणी निराळी असली व प्रधान कारणें ठरविण्यांत प्रत्येकानें निरनिराळ्या मुद्द्यावर भर दिला असला तरी काही बाबतीत तिघांचेहि एकमत आहे ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्याजोगी आहे. अर्थात् हे एकमताचे मुद्दे आजच्या माहितीप्रमाणे सर्वमान्य आहेत असे समजण्यास हरकत नाहीं यासाठी त्याचा उल्लेख प्रथम करून नतर विशिष्ट मतांची युक्तायुक्तता ठरवू.

या बाबतीत सर्वसमत असा पहिला मुद्दा म्हटला म्हणजे मुसलमान योद्धयांनी धार्मिक भावनेचा उपयोग वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठी केला व त्यास त्याच्या धर्मगुरूनीहि मान्यता दिली, हा आहे. वैभवाच्या लोभानें धर्मकल्पनेस विकृत स्वरूप दिले गेले ही हकीकत तिघाही ग्रथकारांनी माडली आहे. सर हेग यानी 'मुसलमानांच्या धोरणात सिंधच्या विजयाने एक नवीन मन्वंतर घडवून आणले.' हा सिद्धात समजावून सागण्याच्या प्रसंगाने असे म्हटलें आहे की 'इस्लामी धर्मग्रथावरून पाहता मुसलमानेतर लोकाचे दोन वर्ग पाडतां येतात. पहिल्या वर्गात ख्रिश्चन व ज्यू लोकाचा समावेश होत असून त्यानी मुसलमानांची राजकीय सत्ता मान्य करून जिझिया कर भरला म्हणजे त्याना आपल्या धर्मा-प्रमाणें वागण्यासहि अडचण पडू नये असें कुराणाधारें दाखवितां येते; परतु 'इस्लामी धर्म स्वीकारणे किंवा तरवारीस बळी पडणें' याखेरीज तिसरा मार्ग मूर्तिपूजकांना कुराणाने मोकळाच ठेवलेला नाही. अशा स्थितीत कांही टीका-कारानीं ओढाताण करून प्रथम इराणांतील मगी लोकाची गणना पहिल्या वर्गांत म्हणजे ख्रिश्चन, ज्यू याच्या जोडीला केली. पण ही मखलाशी इराणांतील अधिकारी हज्जाज याला मुळीच पसत नव्हती; आणि त्यानें मध्य आशियांतून मूर्तिपूजकांची पाळेमुळे खणून काढली. याच्या उलट सिंधवर स्वारी करणाऱ्या मुहम्मद कासिमानें मूर्तिपूजकाना सवलत दिली; एवढेंच नव्हे तर देवळें राहूं देऊन त्यांच्या पूजेसहि प्रतिबध केला नाही. देबुल येथें प्रारभी त्याने कडव्या मुसलमानी धर्माचे आचरण केले. पण त्यानतर अनुभवाने त्यानें आपलें धोरण बदलले व तो हिंदु लोकाशी जमते घेऊं लागला. त्यामुळे त्याचा वरिष्ठ अधिकारी हज्जाज हा मुहम्मदाला 'धर्म प्रसाराच्या कामात कुचराई करणारा' म्हणून दोष देत असे. तरीहि मुहम्मद आपल्या हाताखालच्या लोकाना धार्मिक बाबतींत शक्य तितकी तडजोड करण्याचे धोरण स्वीकारण्याविषयी सांगत होता. अर्थात*

* His Campaign in Sind was not a holy war, waged for the propagation of the faith, but a mere war of

पुढील पृष्ठावर चालू

सिंधमधील त्याची मोहीम हे धर्मप्रसारार्थ चालविलेलें युद्ध न राहतां राज्य-विस्तारार्थ चालविलेले युद्ध बनले; आणि मूर्तिपूजकांच्या झुंडी आपल्याविरुद्ध उठविण्याचें धोरण न स्वीकारता अरबाच्या लहानशा टोळीच्या या पुढाऱ्यानें या बाबतीत जे समेटाचे धोरण पत्करले, ते राजकीय दृष्टीने शहाणपणाचें होते म्हणून पत्करले यात शका नाही.

डॉ. भांडारकर यानी तर असे स्पष्टपणे बजावले आहे की$ मुसलमान जेत्यांनी मूर्तिभंजकत्व व धार्मिक कडवेपणा या नावाखाली जे प्रकार केले त्यास कुराणाचा आधार होता म्हणून केले असे समजण्याचे मुळीच कारण नाही स्वारी करणाऱ्या वीरांच्या मनात लुटीची इच्छा अनिवार असे व त्या इच्छेला पोषक असा अर्थ काढण्यासाठी त्याचे धर्मगुरू ग्रथाची ओढाताण करीत. एवढेच नव्हे तर लूट व क्षेत्रांचा नाश करण्याने इस्लामी धर्माची सेवा केल्याचे पुण्य लाभते असाहि शास्त्रार्थ ते सागत. वस्तुतः कुराणात जुलूम जबरदस्तीला समति देणारे वाक्य कोठेच सापडत नाही, असे तज्ज्ञ लोकाचे म्हणणे आहे.

रा. चिंतामणराव वैद्य यांनी महमूद गझनी याच्या स्वाऱ्यांची वर्णने देऊन त्याला ' लुटारू ' हा शब्द लावणे बरोबर नाही असें म्हटले आहे; व तो राजनीति निपुण नव्हता, हे लेनपूलचें म्हणणे निराधार आहे हें दाखवून 'मुसलमानी राजा या नात्याने आपल्या राज्यालगतच्या व आपल्या अमलाखाली आलेल्या प्रांतांतील लोकांस बाटविण्यात महमूदाचे राजकीय धोरण दिसून येतें

---

मागील पृष्ठावरून

conquest, and it was undoubtedly politic in the leader of a few thousand Arabs to refrain from a course which might have roused swarms of idolators against him. (Vol. III. p 4).

$ When the various instances of Muhammadan iconoclasm and Muhammadan fanaticism have been pointed out here it is by no means to be understood even by implication that they were prompted by any teaching of the Koran. What almost invariably happened was that the passion for plunder was already present in the mind of the Muhammadan invader and that he was helped by the theologian so to interpret, that is, misinterpret, the sacred text as not only to justify his wanton spoliation of the non-Moslem populations and destruction of their places of worship, but deem such vicious courses as a distinct service to Islam. Intolerance and violence, it is rightly contended, are no where preached by the Shariat. (Annals Vol. XI. p. 147).

यांत संशय नाही,' असा खुलासा केला आहे. एवढेंच नव्हे तर 'सर्व लोकांस मुसलमान केल्यास पंजाबांतील पूर्वीचे हिंदु लोक मुसलमानाच्या बरोबरीने हक्क मागतील व बंडहि करतील. तेव्हां सर्वास न बाटविता अर्ध्यांसच बाटवावें व अशा तऱ्हेने दुही कायम राखावी, म्हणून महमुदाने निम्मे लोकांसच मुसलमान केले असावे काय?' असाहि प्रश्न त्यांनी (मध्ययुगीन भारत भाग ३, पृ. १५५ टीप) उपस्थित केला आहे. तात्पर्य, राजकारणाचा डाव खेळण्यास धर्म हे एक साधन म्हणून त्याने काही अशी उपयोगात आणले हाच ध्वनि वरील प्रश्नातून निघतो.

धर्माच्या आस्थेपेक्षां राज्यलोभ अनावर ठरला असे जे तत्त्व या प्रकरणीं सांगितले ते लक्षात ठेवले असता आणखी काही मुद्द्याचे स्पष्टीकरण सहज होते

धाडसी व लोभी असा पुरुष व कल्पनेचा नवीनपणा याची जोड मिळाल्यामुळें समाजात मोठ्या प्रमाणावर हालचाली झालेल्या दिसतात. पण अशा हालचाली फार दिवस टिकत नाहीत धाडसी पुरुषाच्या सान्निध्याने चढणारे स्फुरण फार तर त्या पुरुषाच्या हयातीपर्यंत टिकते; आणि त्याच्या मरणानंतर असला जोर झपाट्याने कमी होऊन साफ सपून जातो कल्पनेच्या नाविन्यालाहि हाच नियम लागू पडतो. नाविन्याचा आकर्षकपणा व त्यामुळे घडवून आणलेली सामाजिक हालचाल शें पन्नास वर्षांपलीकडे कोठेच टिकत नाही. कारण एका काळी जे नवे म्हणून प्रोत्साहक ठरते तेच पुढे जुने म्हणून पुराणे किंवा कंटाळवाणें वाटते; व ते समाजास नवीन बदललेल्या परिस्थितीत तितके चैतन्योत्पादक ठरत नाही

उदाहरणार्थ, महंमद पैगंबरासारखा असामान्य पुरुष व धर्माच्या कल्पनेचें नाविन्य, या जोडीने अरबाच्या हातून अनेक देश पादाक्रांत करण्याचा व धर्मप्रसार करण्याचा कार्यक्रम शे-दीडशे वर्षे चालला; पण पुढे ही अरबाची धडाडी मंदावली त्यानंतर तुर्कांना भारून लोभी अशा महमूद गझनीनें नवे राज्य उभारले आणि पुढे अफगाणिस्तानांत हा धर्म नव्याने आला तेव्हा पहिले साम्राज्य मोडून दुसरें साम्राज्य स्थापण्याची इर्षा धरणारा धाडसी पुरुष निर्माण झाल्यामुळ त्याला अफगाणांच्या हातून पराक्रम करवितां आला. मिळून बगदादपासून अफगाणिस्तानापर्यंतच्या अफाट प्रदेशात पाचशे वर्षांत एतावता तीन कर्ते पुरुष निर्माण झाले व त्याना इस्लामी धर्माच्या प्रसाराची भाषा राज्यविस्ताराच्या कामास उपयोगी पडली. या दोन वाक्यात काही अशी वस्तुस्थितीचे निदर्शन झालें तरी त्यास बरीच मोठी पुरवणी जोडल्यावाचून सबंध वस्तुस्थितीचें वर्णन होऊ शकत नाही वंश, भाषा, देश, राज्य वगैरेच्या विविधतेत गढलेले जग झटक्यासरशी एकधर्मी बनवू पाहणे व तेहि राज्ययंत्र हाती घेऊन त्याच्या जोरावर बनवूं पहाणे, हे कार्य प्रोत्साहक असले तरी त्यात प्रारंभापासून विध्वंसक-

पणाचा भाग अधिक होता. या ओढाताणांत सर्व जगभर इस्लामी धर्माचा प्रसार करण्याची कल्पना तर मागे पडलीच, पण तिनें राजकारणांत जी विसकटा-विसकट केली ती इस्लामी समाजासच जास्तीत जास्त थकवा आणण्यास कारण झाली.

जगभर एका धर्माच्या निशाणाखाली ऐक्य नांदण्याऐवजी इस्लामी धर्म स्वीकारलेल्या देशातदेखील ऐक्य नादेनासे झाले. धर्म प्रसारार्थ परदेशात जाण्याच्या नावाखाली राज्य प्रसारार्थ स्वाऱ्या करण्याचा परिपाठ सुरू झाला. पुढे राज्याच्या सीमा मोडून साम्राज्याचा धिंगाणा सुरू झाला. आणि या धिंगाण्यात ज्या देशांत यदृच्छेने धाडसी व कर्तबगार पुरुष निपजले, त्या देशांतील लोकांनी सभोवारच्या देशात जबरदस्तीने घुसून राज्यविस्तार करण्याची पद्धति पाडली. शेजारधर्म तर पार नाहीसा होऊन राजकारणाचा गाडा 'बळी तो कान पिळी' या तत्त्वावर येऊन बसला. मोठे सैन्य बाळगणे हे तर राजाचे मुख्य काम झाले. अर्थात् या सैन्याच्या पोटापाण्यासाठी कोठे ना कोठे तरी दूरवर स्वारी करून पैसा मिळविणे ओघाने प्राप्त झाले. या स्वाऱ्या राजकीय दृष्टी करण्यांत येत होत्या तरी मूर्तिपूजक लोकाविरुद्ध म्हणून व धर्माच्या नांवाखाली त्या चालविण्यात अधिक सोय होती, यात शंका नाही. पण तात्पुरत्या सोई-पलीकडे या स्वाऱ्यापासून लोकाच्या उन्नतीचा कायमचा विधायक कार्यक्रम निघणें शक्यच नव्हते. मात्र निरपराधी अशा शेजारच्या राज्यातील लोकांवर शस्त्र उगारण्यास धर्माचे नाव उपयोगी पडू लागले व अफगाणिस्थान व इराण येथील राजाना, पजाब, दिल्ली व काठेवाड येथपर्यंत घोडे दौडत नेण्यास उमेद चढली. लढाईची कुरापत काढण्यास पूर्वी काही कारण दाखवावे लागत असे, तो मनु पालटून अकल्पित रीतीने हल्ला करणें हे राजकारणाचें व युद्धनीतीचे प्रधान अंग होऊन बसलें. साम्राज्यवादाला धर्माचा पाठिंबा दिल्याने युद्ध व राजकारण याची नीतीच्या कल्पनेशी अशा रीतीने अजीबात फारकत झाली.

हिंदुस्थानात या पाच चारशे वर्षांत सम्राट बनू पहाणारे काही कर्ते पुरुष निघाले व त्यांनीं देखील मोठमोठी सैन्ये बाळगून सभोवारच्या राजांशी युद्धें केली. आणि इतके विशेष कर्तबगारीचे पुरुष सिंहासनाधिष्ठित नव्हते तेव्हां स्वयंवरासारख्या प्रसगी कुरापत काढून त्यानी यादवी माजविली. पण या युद्धांत सामान्य लोकाना साक्षात् उपसर्ग काहीच पोचत नसे व कोणाहि राजाचा जय झाला तरी सामान्य लोकाचा विशेष नफा अगर नुकसान काहीच होत नसे. यामुळें ते राजकारणाविषयी उदासीन असे प्रेक्षक बनले.

अमुक राज्य अमुक घराण्याच्या मालकीचें ही समजूत देखील लोकांचे राजकीय बाबतीतील औदासीन्य वाढविण्यासच कारणीभूत झाली. शिवाय हिंदुस्थानांत चाललेल्या एकदेशी राजकीय उलाढालीत धर्मप्रसाराची प्रबळ

लागू पडत नसल्यामुळें युद्धात देखील नीतीचे निर्बंध पाळले जात. शरण आले-ल्यास मारणें, बेसावध स्थितीत शत्रूवर हल्ला करणें; पळणाऱ्या शत्रूची कत्तल करणें आणि सामान्य लोकावर दहशत बसविण्यासाठी क्रूरपणाची कृत्ये करणें या गोष्टी खऱ्या वीरपुरुषास कमीपणा आणतात, अशी सर्वसामान्य समजूत हिंदुस्थानात जिवंत राहिली यामुळे दूरवर स्वाऱ्या करून सामान्य लोकांजवळचें द्रव्य हिरावून घेणे, त्याचा प्रदेश जाळणे, किंबहुना इतर राजांना ठार करणें हाहि हिंदुस्थानातील राजाच्या महत्त्वाकांक्षेचा विषय नसे इतर राजांनी आपलें मांडलीक बनून आपणास सम्राट किंवा चक्रवर्ती म्हणावें, एवढीच त्याची इच्छा होती. त्याच्या मनांतील युद्धाची ईर्षा लोभमूलक नसून ते मानाची जागा मिळविण्यासाठी भुकेलेले होते. यामुळे योद्धे या नात्याने ते रणागणांत उभे असतां त्याना मरण पुरवे पण शत्रूशी किंवा लोकाशी वागण्यात आपल्या हातून नीतिबाह्य वर्तन झाले, हा दुर्लौकिक त्याना मरणापेक्षां असह्य वाटत असे.

नव्या धर्माचा प्रसार राजसत्तेच्या साहाय्याने करावा, हे तात्त्विक मत प्रतिपादन करणाऱ्या इस्लामी देशातील युद्धविषयक कल्पना आणि धर्माची सबब न सागता सम्राट किंवा चक्रवर्ती पदाच्या मानासाठी शस्त्र चालविणाऱ्या हिंदुस्थानातील रजपूत राजाची युद्धविषयक कल्पना; यात वर सांगितल्याप्रमाणें मोठाच फरक होता आणि तो इतका मूलग्राही होता की रजपुतानी इस्लामियांची युद्धपद्धति उचलण्यास अगर मुसलमानानी रजपुताची उचलण्यास सहजासहजी एकदम तयार होणे अशक्य होते. इ. स. ११९१ मध्ये शहाबुद्दीन घोरीचा पृथ्वीराजाने रणागणात पराभव केला आणि छातीठोकपणे युद्धास उभे राह-ण्याच्या कित्येक प्रसंगी रजपूत राजे पराक्रमाच्या जोरावर नेहमीच विजयी होत. पण पृथ्वीराजानें जीव बचावण्यासाठी पळत सुटलेल्या शहाबुद्दीन घोरीची कत्तल करून हिंदुस्थानातून त्याचे कायमचे उच्चाटण का केलें नाही? महमूद गझनीने अशा प्रसगाचा फायदा घ्यावयाचे सोडले असते काय? अर्थात् नसते. यावरून विजयाचा पुरा फायदा घेण्याचे बाबतीत रजपूत उदासीन होते व हा मानसिक दोष रजपुताचा पराभव होण्यास व इस्लामी सत्तेचा पाया उत्तर हिंदुस्थानात पडण्यास कारणीभूत झाला, असे डॉ. भाडारकर यानी प्रतिपादन केले आहे आणि आपल्या शौर्यावर फाजील विश्वास ठेवण्याने रजपुताच्या स्वभावामुळे असें घडले असेहि मत त्यांनी व्यक्त केले आहे * यापैकी पृथ्वी-

* The defeat of Shihubuddin was no doubt caused by the bravery of the Rajputs who in fighting were reckless of their life and therefore almost always vanquished their Muhammadan opponents in open, well pitched battles. But the battles of Tarain give us an insight into another

पुढील पृष्ठावर पहा

राजासारख्या शूर अशा रजपूत राजाचा पराभव कूटयुद्धांचा अवलंब करणाऱ्या शहाबुद्दीनाच्या हातून झाला व उत्तर हिंदुस्थानांत राज्यक्रान्ति झाली हें विधान सर्वमान्य होण्याजोगें आहे; पण हा पराभव रजपुताना टाळतां येण्याजोगा असून फाजील अभिमानाच्या भरीस पडून त्यांनी तो अंगावर ओढून घेतला, असे म्हणण्याचा जो या लेखकाच्या लिहिण्यांत ध्वनि आहे, तो वादग्रस्त दिसतो. शौर्य व क्रौर्य यांत महदंतर आहे व पळत्या शत्रूच्या लोकांची कत्तल करण्यानें आपल्या शौर्यास क्रौर्य हे नाव येऊन कमीपणा येईल असें मानणाऱ्या रजपुतांच्या दृष्टीनें हें वर्तन दोषास्पद कसें ठरेल ? युद्धातील तात्पुरत्या विजयापेक्षा नीतीच्या व स्वर्गाच्या कल्पना ज्याना श्रेष्ठ वाटत होत्या त्यानी पळत्या शत्रूचा निःपात करण्यासाठी शस्त्र चालविण्यास तयार होणे ही गोष्ट उत्तम आंब्याच्या झाडास चिंचेचे फळ येण्याची अपेक्षा करण्यासारखे अशक्य होते. कालातराने आंब्याच्या झाडासहि चिंचेसारखे आंबट आंबे आणता येतात. त्याप्रमाणे हिंदूनीहि पुढे मुसलमानांशीं काही प्रसंगी जशास तसें वर्तन करून त्यांचा पराभव केला. पण या कालांतराने घडलेल्या घडामोडींवरून पृथ्वीराजास दोषी किंवा निर्दोषी ठरविणें न्याय्य होणार नाही.

डॉ. भाडारकर यानी या प्रकरणी दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे, तोहि येथे सांगितला पाहिजे. उत्तर हिंदुस्थानात ज्या ज्या वेळी जबरदस्त असें साम्राज्यवादी राजघराणे सिंहासनाधिष्ठित होत असे त्या त्या वेळीं वायव्य सरहद्दीवरून हिंदुस्थानांत परक्यांचा प्रवेश होऊ शकला नाही आणि असा सम्राट नसेल त्यावेळी परक्यांना अडविण्याचें काम किरकोळ राजांच्या हातून पार पडलें नाही. अशा अर्थाचा तो मुद्दा आहे. उदाहरणार्थ, चंद्रगुप्त साम्राज्यवादी होता, तोंपर्यंत सेल्युकस निकेटर सारख्या योद्ध्याला अलेक्झाडरच्या तालमींत तयार झालेल्या ग्रीक सैनिकाचे पाठबळ असूनहि हिंदुस्थान आक्रमण करण्याच्या

---

मागील पृष्ठावरून
trait of Rajput character. The Rajputs were indifferent to improving and strengthening any position of advantage they might have gained through their bravery.........this was a weakness which emanated from their strength. This was due to an overweening confidence in their own bravery. This indifference alone can satisfactorily explain why they were inactive and indifferent to pursuing the enemy after the first battle of their victory. This indifference laid the foundation stone of the Islam power in India and changed the whole history of the country (4th O. C. Vol. II p. 765).

कामीं यश लाभलें नाही. परंतु पुढे अशोकानें साम्राज्यवादाऐवजी 'धर्माचें' महत्त्व मानण्यास सुरवात केली तेव्हांपासून मौर्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली आणि त्यानंतर ग्रीकांनी हिंदुस्थानांत शिरून धुमाकूळ मांडला. यानंतर गुप्तांचें साम्राज्य जोरांत होते तोंपर्यंत, रोमन साम्राज्य आक्रमिण्यांत यशस्वी झालेल्या हूण लोकाची लाट हिंदुस्थानांत येऊं शकली नाही. स्कंदगुप्ताने त्याचा पराभव करून 'सरहद्द ओलांडून येणे अशक्य आहे' हें त्यांच्या प्रत्ययास आणून दिले. परंतु स्कंदगुप्ताच्या मरणानतर साम्राज्य विभागले गेलें व त्यांत एक-सूत्रीपणा राहिला नाही, तेव्हां हूण लोकांना हिंदुस्थानांत प्रवेश करून राज्य प्रस्थापित करण्यांत यश लाभले. त्याचप्रमाणे आरबानी आबासीद खलीफांच्या नेतृत्वाखालीं इ. स. ६२२ पासून ७४८ पर्यंत अनेक प्रदेश जिंकून साम्राज्य वाढविण्यात यश मिळविले होते; आणि त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात त्यानी इ. स. ७१२ मध्ये सिंध प्रांतांत आपले निशाण रोवून हिंदुस्थान आक्रमण्याचा त्यांनीं कसून प्रयत्न केला. पण छत्तीस वर्षे सतत प्रयत्न करूनहि त्याना हिंदी सम्राटाच्या शौर्यापुढे हात टेकावे लागल्यामुळें त्यांची लाट सिंधमध्येच थांबली व आब्बासीद खलीफांना शांततेचे धोरण पत्करणे भाग पडलें. याचाच अर्थ असा कीं, धर्माच्या नावाखाली चाललेला इस्लामी साम्राज्य विस्ताराचा जोर उत्तर हिंदुस्थानातील राजपुती सम्राटांच्या शौर्यापेक्षां कमी प्रतीचा ठरला. तेव्हां ग्रीक, हूण आणि अरब याच्या सैन्याची उत्तर हिंदुस्थानांतील सम्राटांशी गाठ पडली त्या त्या वेळीं हिंदु सम्राटांचे शौर्यच यशस्वी झाले आणि साम्राज्यें मोडून किर-कोळ राज्यें यादवी युद्धात गुंतल्यावेळी बाहेरच्या जेत्यांना हिंदुस्थान आक्रमतां आलें.

डॉ. भांडारकर यांच्या वरील विचारसरणीवरून असें म्हणतां येईल की, अशोकापासून पृथ्वीराजापर्यंत जो दीड हजार वर्षांचा काळ लोटला त्या अव-धीत मौर्य, गुप्त, प्रतिहारी असे तीन साम्राज्यवादी वंश उत्तर हिंदुस्थानांत होऊन गेले व त्यांनीं परक्यांचे हल्ले परतविले; त्याचप्रमाणें इ. सनाच्या सातव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत अरब, गझनी व घोरी हे तीन साम्राज्यवादी लोक हिंदुस्थानापलीकडच्या प्रदेशांत निघून हिंदुस्थानावर चालून आले. पैकी अरबांच्या हल्ल्याचे वेळीं हिंदुस्थानात साम्राज्यवादी घराणें होतें म्हणून इस्लामी राज्याचें पाऊल पुढें पडलें नाहीं. परंतु गझनी व घोरी यांच्या स्वाऱ्या झाल्या तेव्हां उत्तर हिंदुस्थानांत साम्राज्य चालविणारें घराणें अस्तित्वांत नसल्यामुळें इस्लामी सत्ता प्रस्थापित होऊं शकली. अर्थात सरहद्दीचें संरक्षण होणें अगर न होणें हें साम्राज्यवादी राजा हिंदुस्थानांत असणें अगर नसणें व बाहेरच्या प्रदे-शांत त्याचवेळी धाडसी राजा वावरत असणें, या योगावर अवलंबून आहे.

डॉ.भांडारकर यांनीं मांडलेले हें प्रमेय वस्तुस्थिति निदर्शक आहे. पण प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीनें त्यास एक महत्त्वाची पुरवणी जोडणें आवश्यक दिसते. व ती ही कीं हिंदुस्थानांतील सम्राटाचा पराक्रम बचावाच्या स्वरूपाचा होता आणि इस्लामियांचा चढावाच्या स्वरूपाचा होता. त्यामुळें या साम्राज्य वादाचा परिणाम अगदी निरनिराळा झाला. हिंदुस्थानातील सम्राटांनीं इराण, तुर्कस्थान, वगैरे प्रांत जिंकण्याची महत्त्वाकांक्षा केव्हांही धरली नाही. पण अरब, तुर्क व अफगाण या जातीच्या सम्राटांनी हिंदुस्थान जिंकण्याचा कसून प्रयत्न केला; आणि त्यांत यश आल्यावर मूळचा देश सोडून ते हिंदुस्थानांत रमले. हा देश माझा व हा परक्याचा ही भेदभावना इस्लामी जे त्याच्या मनांत नव्हती, यामुळें तरवारीच्या जोरावर व धर्माचे नांव घेत, साधेल तेवढें आक्रमण करीत एकसारखे धांवत पुढें जाण्यास त्याना सकोच वाटला नाहीं. चढाई हा त्याच्या धोरणाचा आत्मा होता; व चढाई अशक्य झाली म्हणजे त्याना धर्म विरहीत व मळमळीत राजकारणाचा आश्रय घेणें भाग पडे. यामुळें राजकारण धर्मप्रसारार्थ असावें हें तत्त्व घोकीत असता, तडजोडीच्या नांवाखालीं, बचावाचे धोरण पत्करून कार्यभाग करण्याचा आचार करीत रहावें असा प्रसंग हिंदुस्थानातील इस्लामी राज्यकर्त्यांवर येत असे.

अशा प्रकारची घोटाळ्याची मनःस्थिति हिंदु राजावर फारशी आली नाही. धर्मप्रसारार्थ त्यानी तरवार हाती घेतलीच नव्हती किंवा राज्यविस्तार करण्याच्या नादी लागून स्वदेश सोडण्याची त्यांनी कल्पना धरली नव्हती. यामुळें ' आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि ' या वचनास अनुसरून क्षत्रियानें वागलें पाहिजे वगैरे नीतीचे निर्बंध पाळणें त्यांना आवश्यक वाटत होतें. परधर्मी लोकांशीं वागतांना नीतीचें निर्बंध पाळण्याचे कारण नाही असे त्यांचे मत बनले नव्हते. तथापि एक गोष्ट खरी कीं, त्याची नीति कालदेशवर्तमानाचा पूर्ण विचार करून ज्ञानाच्या पायावर उभारलेली अशी नव्हती. ती परपरा प्राप्त असून रजपुतांच्या बौद्धिक आलस्याची निदर्शक होती. अर्थात या एकदेशी राजकारणावर भिस्त ठेवणाऱ्या राजांचा पराभव सावधान अशा भिन्न देशीय शत्रूच्या हातून होणें क्रमप्राप्तच होतें. उलट पक्षी, हा जय मिळविणारे लोक नीतीची चाड बाळगीत नव्हते याचा अर्थ देखील त्यांना आपला जय टिकविण्यास काय केलें पाहिजे याचे खरें ज्ञान नव्हतें असाच होता; आणि या नैतिक अज्ञानामुळें इस्लामी योध्दयांनीं मिळविलेले जय ठिकठिकाणी घोटाळ्याची परिस्थिति उत्पन्न करण्यास कसे कारणीभूत झाले तें पाहूं. सिंधमध्यें इस्लामाचें निशाण रोवणारा मुहम्मद बिन कासीम यानें अनेक निरपराधी लोकांची कत्तल केली. पण शेवटी त्याचा स्वतःचा अंत देखील अत्यंत किळसवाण्या प्रकारानें झाला. कातड्याच्या पिश-

वीत त्याला शिवून बंदोबस्तानें पाठविण्याविषयी खलिफाचे आज्ञापत्र आल्यामुळें महमदाला त्या प्रकारचें मरण पत्करावें लागलें. सिंधच्या राजाचा मुलगा जयसिंग याने इस्लामी धर्म स्वीकारला होता. तरीहि जुनैद नांवाच्या सुभेदारानें किरकोळ कामात कुरापत वाढवून जयसिंगास ठार मारलें. इ. स. ७५० मध्यें खलिफाचे अधिकार उमय्यद घराण्याकडून काढून घेऊन आब्बासीद घराण्यानें बळकाविलें. त्याबरोबर हिंदुस्थानांतील पहिल्या सुभेदारांना गचांडी मिळाली. पुढें पन्नास वर्षांनीं खलिफा नामधारी बनून सिंधची सुभेदारी वंशपरंपरेच्या तत्वावर चालू लागली आणि वंशपरंपरेची सुभेदारी म्हणजेच लहानशा संस्थानांची स्थापना. तात्पर्य खलिफाच्या हस्तकानें स्थापलेलें सिंधमधील निशाण शेवटीं लहानशा स्वरूपांत आरबी वंशांतील दोन संस्थानिकांच्या गांवावर फडकत राहिले. आणि राजकीय दृष्टया या संस्थानिकांचा संबंध खलिफाशी राहिला नाही. मिळून शेकडो कर्ते अरब बगदादपासून सिंधपर्यंत धुमाकूळ माजविण्याप्रीत्यर्थ खर्ची पडले आणि शेवटी त्यापासून कायमचा फायदा असा कोणासच झाला नाही. आरबस्थानापासून बलुचिस्थानापर्यंत कत्तली व जाळपोळ होऊन नाश झाला. आणि हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यांत किरकोळ स्वरूपांत जीव धरून राहणारी दोन संस्थानें अस्तित्वांत आलीं. त्याचा परिणाम एकंदर हिंदुस्थानच्या राजकारणावरहि कांही विशेष झाला नाही.

यानतर गझनी व घोरी वंशाचा उत्कर्षापकर्ष पाहिला असतां वरच्याच निष्कर्षास दुजोरा मिळतो. बगदादचे खलीफा हे धार्मिक व राजकीय अशा दोनही बाबतीत प्रारंभी अधिकारी मानले जात होते. परतु ११ व्या शतकाच्या प्रारंभीं या खलीफांचे धार्मिक अधिकार तेवढे मान्य करून राजकीय अधिकाराबाबतचें स्वातंत्र्य ठिकठिकाणचे राजे उपभोगू लागले अर्थात इस्लामाचे राजकीय ऐक्य संपून त्यात यादवी युद्धें सुरू झाली या गडबडीच्या काळांत इराणांत इस्लामी धर्माचा प्रसार होऊन ‘सामानी’ घराण्याचें साम्राज्य अस्तित्वात आलें पण तें फारच थोडी वर्षे टिकलें; आणि पुढें बडाळी होऊन त्या साम्राज्याची सत्ता तुर्की गुलामांनी बळकावली; त्यापैकी एकानें गझनी येथें लहानसें राज्य स्थापिले. या राज्यावरील संस्थानिक आपणास बुखारा येथील सम्राटाचे मांडलिक म्हणवीत असत; परंतु हा केवळ देखावा होता. वस्तुतः या बंडखोरांनीं गझनी येथें स्वतंत्र सत्ता निर्माण केली होती. यावेळीं अफगाणिस्थानांतील काबूलचा सुभा पंजाबांतील हिदु राजांच्या राज्यांत मोडत होता. यामुळें आपल्या शेजारी हिंदुकुश डोंगराच्या पलीकडे एक नव्या जोमाचें मुसलमानी राज्य प्रस्थापित झालेलें पाहून पंजाबच्या राजाला त्याची चौकशी करणें भाग पडलें; आणि

इ. स. ९७२ च्या सुमारास त्या भागांत प्रथम हिंदु व मुसलमान राजांचा तंटा झाला. पुढें पांच वर्षांनीं गझनीचें सिंहासन सबक्तगीन यानें बळकाविलें. त्याची पहिली बारा वर्षे आफगाणिस्थान व इराण यांच्या सरहद्दीपर्यंत आपली राज्य-मर्यादा वाढविण्यांत म्हणजे मुसलमानी राजांशीं भांडण्यांत गेली. त्यानतर पंजाबचा राजा जयपाळ याच्याशी त्याचें युद्ध होऊन तहावर प्रकरण मिटले परंतु पुन: तंटे उपस्थित होऊन जयपाळाचा पराभव करून काबूलचा सुभा सबक्तगीनाने आपल्या राज्यास जोडला. पण या युद्धांत धर्मप्रसाराचा सबंध नसून राज्य-विस्ताराचा हेतु होता. यानंतर त्यानें खुरासन प्रांत हस्तगत करून तेथे आपला मुलगा महमूद यास सुभेदार नेमलें. पुढें सबक्तगीन इ. स. ९९७ मध्ये मरण पावला. तेव्हां त्याच्या दोन मुलात गझनीच्या तख्ताविषयी युध्द सुरू झालें. त्यांत महमूद विजयी होऊन त्यानें आपल्या भावास कैदेंत टाकिलें. अशा रीतीने महमूद हा गझनीच्या तख्तावर बसला तेव्हां त्याच्या ताब्यांत अफगाणिस्तान व इराणचा पूर्व भाग एवढा प्रदेश पितृधनाच्या स्वरूपानें आला. त्यानंतर त्यानें खलिफाच्या हातून अधिकाराची वस्त्रें घेण्याचा सामोपचाराचा सभारंभ केला. तेव्हा त्याने हिंदुस्थानांतील मूर्तिपूजकांविरुद्ध दरसाल एक स्वारी करण्याची जाहीर प्रतिज्ञा केली, अशी दंतकथा कित्येक ग्रथकारांनी नमूद केली आहे. ती खरी असो अगर काल्पनिक असो, या महमूद गझनीनें हिंदुस्थानावर बारा पेक्षां अधिक वेळां स्वाऱ्या केल्या व देवस्थानें मोडणे व लूट करणें हा कार्यक्रम त्याने पार पाडला यांत शंका नाहीं या महमूदानें इ. स १००० पासून १०३० पर्यंत केलेल्या अनेक स्वाऱ्यांचें वर्णन येथें देण्याचें कारण नाहीं.* परंतु हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या दृष्टीनें एवढे नमूद केलें पाहिजे कीं त्यानें पंजाब प्रांत आपल्या राज्यात सामील केला व इस्लामी निशाण हिंदुस्थानांत दूरदूरच्या शहरापर्यंत घोडदौडीनें नेण्याचा प्रघात सुरू केला. राजकीय दृष्टया महमूदापेक्षां त्याच्या वंशजांचा संबंध हिंदु-स्थानाशीं जास्त येतो. कारण महंमूदाच्या साम्राज्यापैकी इराण व अफगाणिस्थानचा भाग त्याच्या वंशजांना ताब्यांत ठेवतां आला नाही व ते केवळ पंजाब प्रांताचे एक संस्थानिक होऊन बसले.

---

* मुसलमानी इतिहासकारांच्या मतें महंमूद हा इस्लामी धर्माचा कट्टा पुरस्कर्ता होता. परंतु हें मत सर्वांना मान्य होण्याजोगें नाही. कारण आपल्या सैन्यांत हिंदु सैन्याची भरती तो करीत होता आणि त्यांना बाट-विण्याविषयी तो आग्रह करीत नसे. त्याचप्रमाणें मरणाच्या वेळी त्याला द्रव्याच्या राशी सोडून जाण्याचा प्रसंग मात्र दु:खावह वाटला, यावरून त्यानें केलेल्या स्वाऱ्या धर्मप्रसारापेक्षां द्रव्य प्राप्तीच्या लोभभावनेने केल्या होत्या हें म्हणणें सयुक्तिक दिसतें, असा बहुतेकांचा अभिप्राय आहे.

गझनी वंशांतील इतर राजांचा वृत्तांत येथें देण्याचें कारण नाहीं. पण एवढें नमूद केलें पाहिजे की, हा वृत्तात म्हणजे राजकीय वर्चस्वासाठीं चाललेले खून, विश्वासघात व यादवी युद्धें यांनीं भरलेला आहे. या गडबडीच्या काळांत घोर प्रांतांतील एका लहानशा अधिकाऱ्यानें भावाचा सूड घेण्यासाठीं इ. स. १११५ मध्यें गझनी प्रांतावर स्वारी केली. आणि तेथील अधिपतीचा पराभव करून गझनी शहर जाळून जमीनदोस्त केलें. ही आग सात दिवसपर्यंत चालू होती व या जाळपोळीने सूडाच्या भावनेचें शमन न झाल्यामुळें तेथलीं पूर्वींच्या राजांची थडगीं उकरून त्यानें उधळून टाकली आणि तेथील लोकांना घोर येथें नेऊन त्याची कत्तल करण्यात आली. अशा या 'आगलाव्या' सरदाराच्या परंपरेंत शिहाबुद्दीन जन्मास आला; व त्याने इ. स. ११७५ मध्यें हिंदुस्थानवर पहिली स्वारी केली. त्यानतर तीन वर्षांनी अन्हिलवाड्यावर तो चालून आला. तेव्हां गुजराथचा राजा भीम वाघेला याच्या हातून त्याचा मोड झाला.

या सुमारास पंजाबातील मुसलमानी संस्थानिक व जम्मूचे हिंदु राजे यांच्यांत किरकोळ मारामाऱ्या सुरू होत्या. त्या भरात जम्मूच्या राजानें मुहंमदास पंजाबवर स्वारी करण्यास निमंत्रण दिले. त्याप्रमाणें मुसलमानी सत्ताधाऱ्याविरुद्ध हिंदु राजाच्या सहाय्यासाठी म्हणून मुहमदानें पजाबवर स्वारी केली व तो प्रांत ताब्यात घेतला. यामुळे त्याच्या राज्याची सरहद्द दिल्लीच्या पृथ्वीराजाच्या सरहद्दीशीं भिडली. तेव्हांपासून मुहमद व पृथ्वीराज यांच्यांत युद्धाचे प्रसंग येऊं लागले. त्यांत प्रथम पृथ्वीराजाचा जय झाला असून त्यानें पाठलाग न केल्यामुळे मुहंमद जिवानिशी पळून गेला. आणि पुढच्या वर्षीं त्याने हल्ला करून पृथ्वीराजास पराभूत करून मारून टाकले व मुहंमद दिल्लीचा अधिपति झाला वगैरे हकीकत पूर्वीं सांगितलीच आहे.

यावरून इस्लामी व राजपूती योद्धयांच्या मनोरचनेंतला भेद स्पष्टपणें कळून येण्याजोगा आहे; व तो असा. रजपूत योद्धे मानधन, शूर व नीतीची चाड बाळगणारे होते, तरी विदेशी लोकांशी वागतांना कसें वागणें आवश्यक आहे याची योग्य कल्पना त्यांच्या लक्षांत आली नव्हती. आपसातल्या भांडणांत आपण ज्या परक्याचे सहाय्य घेतों तो शेजारच्या राजापेक्षां किती पटीनें दूरचा आहे व त्याच्या यशानें केवढें राजकीय संकट ओढवणार आहे हें रजपुतांना समजण्याजोगें नव्हतें, हा त्यांच्या अज्ञानाचा परिणाम होता.

उलटपक्षी मुसलमान योद्धे लोभी, धाडसी व न्यायान्यायाची चाड न बाळगणारे असले तरी माहितगार, बुद्धी चालविणारे आणि सावध असे होते. या योद्धयांनीं स्वत:साठी राज्यपद मिळविण्याच्या हेतूनें धाडसाचीं कामें केलीं व डोकें चालविलें. यामुळे त्यांच्या विजयानें हिंदी सिंहासन हें बादशहाच्या

उपभोगाचें स्थान बनलें व विजिगीषा आणि चैन यांवांचून बादशहांना ध्येय राहिलें नाहीं. एका अर्थानें रजपुतांचें देखील हेच गुण होते व त्यांचीच जागा या मुसलमान योद्ध्यांनीं बळकाविली असें म्हणण्यास हरकत नाही. परंतु रजपूत राजे व सामान्य लोक यांची धार्मिक व सांस्कृतिक भावना एक असल्यामुळें आपलेपणास जागा होती. पण इस्लामी बादशहांची धार्मिक भावना केवळ निराळी होती एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष विरोधाची होती. यामुळे लोकांच्या मनांतील राजकारणासंबंधींचा उदासीनपणा वाढला आणि ते पूर्वीपेक्षां अधिक दैववादी बनले.

---

# भाग २ रा

# इतिहास लेखन व संशोधन

[ प्रस्तुत भागांतील बहुतेक लेख शिवकालीन संशोधनासंबंधींचे आहेत. कै. आपटे यांच्या लेखनांत संशोधनविषयक लेखांस विशेष महत्त्वाचें स्थान आहे. त्यांत आलेलीं तपशीलाचीं टिपणें जितकी महत्त्वाचीं आहेत, तितकीच त्या विवेचनांत आढळून येणारी संशोधनाची पद्धति बारकाईनें पाहण्यासारखी आहे. जागजागीं पुराव्याची विश्वसनीयता कशी ठरवावी, त्यावरून अनुमान काढतांना कशा चुका होण्याचा संभव असतो इतिहास लेखन व संशोधन यांचा अन्योन्य संबंध काय आहे, संशोधनाच्याही शाखा उपशाखा कशा वाढत आहेत, त्या सर्वांत नैपुण्य मिळविणें किती कठीण आहे, म्हणून सर्वांच्या अनाग्रही सहकार्याची कशी आवश्यकता आहे, महाराष्ट्रांत कै. राजवाडे यांच्यानंतर संशोधनाचे कोणते नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत, या संबंधींचें विवेचन, ज्याला ज्याला म्हणून मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाची पूर्व तयारी करावयाची आहे त्यानें अगत्य वाचलें पाहिजे असें आहे. अशा रीतीनें विवेचन करीत असतां कै. आपटे यांच्या लेखनावर टीका होणें अपरिहार्य होतें. तसेंच इतिहासलेखनांत सावधगिरी न बाळगणारांवर त्यांनीं टीका करणें हेंहि त्यांना क्रमप्राप्त होतें. कै. आपटे यांनीं प्रो. सरकारवर टीका केली व श्री. वाकसकर यांच्या टीकेस प्रत्युत्तरें दिलीं. टीका वस्तुनिष्ठ असावी व्यक्तिनिष्ठ नसावी. विवेचन आवेशयुक्त असावें, पण टीकेंत शिष्ट- संप्रदायाचें कोठेंहि उल्लंघन होऊं नये, या टीकापद्धतीचा कित्ताच या लेखांतून वाचकास पहावयास सांपडेल. किंबहुना, कै. आपटे जे आम्हांस विशेष प्रिय व आदरणीय वाटतात ते यासाठीं. त्यांच्यावर टीका करणारांनीं अनेक वेळां असे प्रसंग आणले कीं, तोच तोच मुद्दा प्रसंगांनीं उकरून काढून लेखन केलें, पण कै. आपटे यांनीं न कंटाळतां, न चिडतां त्यास पुनः पुनः उत्तरें दिलीं. या दृष्टीनें कै. आपटे व श्री. वाकसकर यांच्यांत इ. स. १९२८ सालीं जून

ते ऑक्टोबरपर्यंत ज्ञानप्रकाशांतून झालेला शिवजन्मतिथीसंबंधीचा वाद मोठा वाचनीय आहे. हा वाद प्रस्तुत लेखसंग्रहांत मुद्रित केलेला नाहीं. कारण त्यांतील बहुतेक मुद्दे नंतर लिहिलेल्या दुसऱ्या लेखांतून येऊन गेले आहेत. पुढील पृष्ठांतून अशा पद्धतीच्या टीकेचे मासले वाचकास पहावयास सांपड-तील. असो. या भागांत पुनर्मुद्रित केलेल्या लेखांखेरीज कै. आपटे यांनीं 'शिवभारत' या ग्रंथास उपोद्घात व प्रस्तावना लिहिलेली आहे, तीही वाच-नीय आहे. विशेषतः प्रस्तावना पृ. ३ ते ७ मधील 'शिवकालीन इतिहासाचें चिकित्सक संशोधन' पृ. ४७ ते ५६ 'शिवचरित्राचे अभ्यासक-डफ, राजवाडे व सरकार,' पृ. ८ ते १३ 'शिवभारताचें स्वरूप' या विषयांकडे आम्ही वाचकांचें विशेष लक्ष वेधूं इच्छितों. सं. ]

# ४

## अितिहास लेखन व संशोधन

अितिहास लेखन व अितिहास संशोधन यांत फार फरक आहे ही गोष्ट पुष्कळ वेळा लक्षात राहात नाही. अितिहास लेखनाची कला हजारों वर्षांपासून रूढ आहे प्रतिभासंपन्न असे अितिहासलेखक हिंदुस्थान, ग्रीस, रोम वगैरे अनेक देशात प्राचीन काळी होअून गेले व त्यांची परंपरा आज तागायत पुष्कळ देशांत चालू आहे. परंतु अितिहास संशोधनासंबधी असें म्हणतां येणार नाहीं. संशोधन हा शब्द आज ज्या अर्थानें वापरण्यांत येतो, त्या संशोधनाची स्पष्ट कल्पना युरोपांत अस्तित्वांत येअून फार तर शभर वर्षे झालीं असतील नसतील; आणि महाराष्ट्रात तर कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे आणि कै. वासुदेवशास्त्री खरे यानीच खऱ्या संशोधनाची प्राणप्रतिष्ठा चाळीस वर्षांपूर्वी केली असें म्हण-ण्यास हरकत नाहीं.

अितिहास लेखनाची परंपरा फार प्राचीन व अितिहास संशोधकाची अगदीं अर्वाचीन असे सांगण्यांत केवळ पौर्वापर्य दाखविण्याचा हेतु नसून त्यांच्यांत जन्य-जनकभाव आहे हेंहि सूचित करावयाचें आहे. बरीच वर्षे अितिहास लेखनाचें काम चालू होतें व आजहि आहे; पण 'तें व्यवस्थितपणें होण्यास आधी संशोधन

भरपूर झालें पाहिजे, ' या गोष्टीस जेव्हां विद्वानांची मान्यता मिळाली, तेव्हां संशोधन जन्मास आलें असें म्हणतां येअील. नाहीं तर प्रत्येक अितिहास लेखकाला थोडे बहुत संशोधन केल्यावाचून गत्यंतरच नाहीं. पण अितिहास लेखकाच्या डोक्यांत संशोधनास प्राधान्य नसतें. याच्या अुलट, संशोधनानें ज्या गोष्टी ग्राह्य ठरल्या असतील त्या अितिहास लेखकानें नमूद केल्या पाहिजेत व अग्राह्य ठरविलेल्या गोष्टींनीं तो आपला ग्रंथ भरून काढीत असेल तर त्या ग्रंथास खरा अितिहास म्हणता येणार नाही, असा कटाक्ष जेव्हां अस्तित्वांत येअू लागतो तेव्हां संशोधनाचें युग सुरू झालें असे म्हणतां येतें. हीच गोष्ट अुपमेनें सांगावयाची झाल्यास असे म्हणतां येअील की बापाच्या पोटी मुलगा जन्मास येतो, पण मुलगा मोठा व कर्तबगार झाल्यानंतर बापाला त्याच्या तंत्रानें कारभार करावा लागतो; त्यांतलाच हा प्रकार आहे. बापलेकाचा व्यवहार अेकोप्यानें चालावा व त्यांच्यांतील मतभेद फारसे चव्हाटयावर येअू नयेत, हे व्यावहारिक दृष्टया अिष्ट असते खरें. पण मुलास मान्य नसलेल्या व त्याला चुकीची वाटत असेल, अशा पद्धतीनें बाप घराची मांडणी करूं लागल्यास ' हे मला मान्य नाहीं ' असे स्पष्ट शब्दात बजावणें मुलाचें कर्तव्य होअून बसतें.

महाराष्ट्राच्या अितिहासासंबंधीं झालेल्या व चाललेल्या अितिहास लेखनाच्या व सशोधनाच्या खटपटीस वरील न्याय लागू केल्यानें कल्पना अधिक स्पष्टपणें सांगण्यास मदत होण्याजोगी असल्यामुळें येथे तेंच अुदाहरण घेतों. त्यांतल्या त्यांत शिवकालीन अितिहासावर सध्या अितर प्रांतात देखील भर देण्यांत येत आहे, व त्यासबधी बरेंच वाङमय प्रकाशित होत आहे; याकरितां शिवकालीन अितिहास असे विषयाचें स्वरूप मी मर्यादित करतों.

## अितिहास लेखनांतील अेकांगीपणा

शिवकालीन अितिहास लेखनास प्रारंभ शिवाजीमहाराजांच्या हयातीत झाला; आणि हे काम तेव्हापासून आतांपर्यंत चालले आहे. शिवभारत, पर्णालपर्वतग्रहणाख्यान, राज्याभिषेककल्पतरु वगैरे ग्रंथ महाराजांच्या दरबारात लिहिले गेले; महंमदनामा, अलीनामा, तारीख-अि-अली वगैरे ग्रथ विजापुरातील लेखकांनी लिहिले. आणि बादशाहनामा, अमल-अि-साली, अलमगीरनामा वगैरे ग्रंथ मोगली दरबारातील लेखकानी लिहिले. तात्पर्य, या लेखकांनी आपापल्या राजाचा किंवा बादशहाचा दरबारीपद्धतीने सजविलेला अेक तर्फी वृत्तांत अितिहास या नांवानें नमूद केला. या लेखकाचा हेतु आपापल्या राजांचें गौरवपूर्ण वर्णन करावें हा होता; सत्यसंशोधन करून हातीं येअील तेवढें सारें व तेवढेंच काटेकोरपणानें लिहावें ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनीहि नव्हती. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सभासदी व ९१ कलमी बखर आणि चिटणिशी बखर वगैरे बखरग्रथ लिहिले गेले.

खाफीखान, भीमसेन, महंमद इब्राहिम झुबैरी वगैरेंनी फारशीत शिवकालीन अितिहासाची माहिती दिली आणि ऑर्म, स्कॉटवेअरिंग आणि ग्रँट डफ यांनी अिंग्रजीत लिहिली. यापैकी कित्येकांनी आपल्या ग्रथांत शिवकालीन पत्रांचा क्वचित अुपयोग केला. यामुळे जुन्या लेखकाच्या अैतिहासिक माहितीत त्याना कांही दुरुस्त्या करणें व कांहीं भर टाकणें या गोष्टी करता आल्या. पण त्याचा मुख्य कटाक्ष पूर्वीच्या अितिहास ग्रथांचा सागाडा बहुतांशी गृहीत धरून थोडा-बहुत फरक करणें व अितिहास लेखन पुरे करणे यावर होता. सामुग्रीचा अभ्यास करणें व त्या साठी अितिहास लेखनाचे काम काही काळ खोळंबून ठेवणें ही गोष्ट त्यांना मान्य नव्हती. डफ नंतर गेल्या शभर सवाशे वर्षांत शिवकालीन अितिहासलेखन तर चाललेच आहे, पण त्याबरोबर नवीन जन्मास आलेले जें संशोधन शास्त्र त्यास अनुसरून संशोधनाचेहि काम ठिकठिकाणी झालेले आहे. पण ठिकठिकाणी चाललेल्या संशोधनाच्या कामाचा प्रकार वेगवेगळा आहे.

अुदाहरणार्थ, बिब्लिओथिका इंडिका सीरीजमध्ये अमल–अि–साली, आलमगीरनामा, मासिरूल अुमरा वगैरे फारशी बखरीचे प्रकाशन झाले; अिलियट डौसन यांनी अनेक फारशी अितिहास ग्रथांतील निवडक भगाचें इंग्रजी भाषातर प्रसिद्ध केले. त्या खेरीज अगदी अलीकडे सर जदुनाथ सरकार यानी फारशी अैतिहासिक ग्रथ तर वाचलेच, पण याशिवाय अिंग्लडात असलेली अिग्रजी वखारवाल्यांची समकालीन आणि मुख्यत्त्वेंकरून जयपूरसंग्रहात असलेल्या हजारों पत्रांच्या नकला त्यानीं मिळविल्या; आणि त्या वाचून त्यांनी औरंगजेब व शिवाजी यांचे चरित्रात्मक अितिहास लिहिले. अर्थात साधन सामुग्री त्यानी जमविली तरी ती त्यांच्या कुलपात असावयाची व ती दुसऱ्यास पहाण्यास मिळाली तरी त्याच्या मेहेरबानीनें मिळावयाची असे तिचे स्वरूप आहे. ही सामुग्री त्यानी स्वतःच्या अुपयोगासाठी मिळविली व तिचा अुपयोग करून त्यानी अितिहास ग्रथहि लोकापुढे मांडले यात शंका नाही. पण ही सामुग्री त्यानी प्रकाशित केली नसल्यामुळे सर जदुनाथ यांनी तिचा कोठे सदुपयोग केला आहे व कोठे दुरुपयोग केला आहे, हें निश्चित करणें कठिण वाहे.

## संशोधनाचा जन्म

महाराष्ट्रांत अि. स. १८८० च्या सुमारास कै. नीलकंठराव कीर्तने, साने व चिपळूणकर यांनी जेव्हां अैतिहासिक सामुग्री प्रकाशित करण्यास सुरवात केली तेव्हां त्याचा रोख देखील प्रथम बखरी छापण्यावर होता, आणि या बखरीच्या आधारें महाराष्ट्राचा अितिहास लिहिण्याचे प्रयत्न अनेकांनी केले; आणि रा. सा. गोविंदराव सरदेसाअी यानी अितिहास लेखनाचें काम रियासतीच्या रूपानें अखड चालविलें आहे. परंतु अितिहास लेखनाखेरीज अितिहासाची साधने प्रकाशित

करण्याचें काम महाराष्ट्रांत गेलीं चाळीस वर्षें चालू आहे. अितिहासास अुपयोगी पडणारें साधन अस्सलपत्र असो, नक्कल असो, काव्य असो, बखर किंवा चंपू असो; पण तें साधन आधी लोकांपुढे मूळ स्वरुपांत छापून मांडलें पाहिजे व त्याच्या आधारें लेखकाने आपले अितिहास लेखन करावें अशी अेक पद्धति महाराष्ट्रांत रूढ झाली आहे. या पद्धतीचे प्रणेते कै. राजवाडे यांना आपलें आयुष्य सामुग्री-प्रकाशनाच्या कार्यास अर्पण करावें लागलें. 'त्यांना अितिहास लेखक म्हणवून घेतां आलें नाही' असा टोमणा सर जदुनाथ यानी राजवाडे यांचा मृत्युलेख लिहितांना दिला आहे. त्यात सत्याचा अंश असला तरी त्यानें राजवाड्यांच्या योग्यतेस कमीपणा येअू शकत नाही. 'अितिहास लेखनापूर्वी सामुग्रीचें संशोधन झाले पाहिजे व संशोधित सामुग्री छापून आधीं प्रकाशित झाली पाहिजे; तरच अितिहास लेखनाचें काम चिकित्सक पद्धतीस धरून व शास्त्र शुद्ध रीतीनें करतां येअील अशी जेव्हां त्यांच्या मनाची खात्री झाली, तेव्हां त्यांनी अितिहास लेखना-पेक्षा संशोधनास प्राधान्य दिले व आजन्म त्या दिशेनें काम केलें. याच्या अुलट अैतिहासिक सामुग्री लोकांपुढे मांडण्यापेक्षां अितिहास लिहून दाखविणें हे अधिक अगत्याचें आहे. असें सर जदुनाथ व रा. सा. सरदेसाअी यांच्या मनानें घेतले असल्यामुळे त्यानी दोन दोन तपे खपून अितिहास लेखनाचें काम पुरें केलें. आणि आतां फुरसत व संधि सापडल्यामुळे त्यांनी पेशवे दप्तरांतील पत्रांचे भाग प्रकाशित करण्याचे कामी संपादक म्हणून नावे घालण्यास मान्यता दिली आहे. पण अेवढ्या-वरून त्यानी आपलें आयुष्य संशोधनाच्या कामास वाहिलें असें म्हणतां येणार नाहीं. राजवाडे यांनी ज्याप्रमाणें कांही प्रबंध लिहिले असले तरी त्यांचें नांव संशोधक या नात्याने मुख्यत्वेंकरून घ्यावें लागते, तसेच सरकार व सरदेसाअी यांचे नांव अितिहास लेखक म्हणून घ्यावें लागेल.

## रंगरंगोटीनें अिमारत नवी ठरत नाहीं

अितिहासलेखन व साधनप्रकाशन यांवर भर देण्यामुळें अितिहास क्षेत्रांत वावरणाऱ्या विद्वानाचे दोन स्वतंत्र वर्ग कसें पडतात व या दोन वर्गांतील विद्वा-नांचा मतभेद कशामुळे होतो याचें मर्म आतां वाचकांच्या ध्यानांत येअील.

अितिहास लेखन व संशोधन या गोष्टींचें नातें बाप लेकाच्या नात्याप्रमाणें अत्यंत निकट स्वरूपाचे असले तरी अेकानें दुसऱ्याचे दोष दाखविले म्हणजे वादाचा प्रसंग अुद्‌भवतो अितिहास लेखनाची परंपरा जुनी असल्यामुळें सभासदावरून चिट-णीस, चिटणीसावरून ग्रँट डफ आणि डफवरून यदुनाथ अशा परंपरेनें मागल्या सांगा-ड्यांत थोडी बहुत दुरुस्ती करून शिवाजी चरित्राची अिमारत नवी दिसेल अशी करतां येते. तसेंच बादशहानामा, आलमगीरनामा, मुतखुल–लुबाब आणि इंग्रजीत लिहिलेलें औरंगजेब चरित्र यांची योग्यता चढत्या प्रमाणांत आहे यांतहि संशय

नाहीं. पण कांही ठिकाणी दुरुस्ती करून व रंगरंगोटी देऊन अिमारतीस नवें स्वरूप देणें सोपें असलें तरी ते कित्येक वेळां हितावह नसतें. मूळ अिमारतीचा पाया जर कांही ठिकाणी कच्चा असेल तर तोहि खणून काढून त्याची नवी रचना करण्याची तयारी पाहिजे. कारण तसें न झाल्यास ती अिमारत अेकसारखी खचतच राहील. आजपर्यंतच्या अितिहास लेखकांनी सशोधनास प्राधान्य न देता अितिहास रचना केल्यामुळे मागल्या पिढीतील अितिहास प्रत्येक पुढल्या पिढीला अपुरे व चुकीचे असेच वाटले. तोच प्रकार या पिढीने लिहिलेल्या अितिहासासबधी व्हावयास नको असेल, तर संशोधनाचें महत्त्व अितिहास लेखकानी मान्य केले पाहिजे पण तसें मान्य करण्याने ज्यांनीं आधी अितिहास अगर चरित्र लिहिले, त्याच्या ग्रंथास कमीपणा येण्याचा संभव असतो; यासाठी संशोधकाच्या कामासंबंधी विपरीत ग्रह फैलावण्याची बुद्धि कांही कांही अितिहास लेखकात उद्भवते.

## सर जदुनाथ यांनीं फैलावलेले विपरीत ग्रह

सर जदुनाथ सरकार यांनीं मराठीत झालेल्या शिवकालीन संशोधनासंबंधी गेल्या पंधरा वर्षांत अनेक गैरसमज पसरविल्यामुळें आज कांही दुष्परिणाम ठळकपणें दिसून येत आहेत ते येथें उदाहरणादाखल देतो

शिवाजी चरित्राची मांडणी करतांना सर जदुनाथ यानी फारशी व अिंग्रजी भाषेंतलें साहित्य हेंच मुख्यत्वेंकरून समकालीन व ग्राह्य ठरविले; बखरी उत्तर-कालीन म्हणून अग्राह्य, शिवभारत हें काव्य म्हणून अितिहास या सदरात पडत नाहीं आणि मराठीं पत्रें अिनामासंबंधीची असून त्यांत सपादकांच्या चुका व बनावट पत्रें यांची भेसळ असल्यामुळें ती जमा धरण्याचें कारण नाही; अशा अर्थाचे शेरे मारून त्यांनी महाराष्ट्रांतील सामुग्री शिवचरित्राच्या दृष्टीनें टाकाअू आहे व फारशी आणि अिंग्रजी सामुग्री आधारास घेणें हेच श्रेयस्कर असें सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रतिपादनाचा स्वाभाविक परिणाम काय झाला तो पहा.

शिवाजी महाराजांना औरंगजेबादि शत्रूंशी युद्ध करणें आणि (त्यांच्या आणि विजापूरकरांच्या आश्रयानें व्यापार करणारे म्हणून) अिंग्रजादि वखार-वाल्यांना लुटणें हीं कामें करावी लागली. यामुळे त्या काळच्या फारशी व अिंग्रजी लेखकांना महाराजांना अुद्देशून चोर, लुटारू, दरवडेखोर वगैरे शब्द योजावे असें वाटणें अपरिहार्य होतें. तेव्हां या सामुग्रीच्या आधारेच बोलावयाचे तर महाराजांना ही विशेषणें जोडणें क्रमप्राप्तच होअू लागलें. पण सर जदुनाथ हे हिंदु असल्यामुळे त्यांच्या हातुन महाराजांना अुद्देशून सरसकट हे शेरे देण्याचें काम झालें नाही. त्यांनी त्वयार्धं मयार्धं या न्यायानें अफझल प्रसंगात शिवाजी महाराजांस निर्दोषी ठरविलें; आणि मोरे प्रकरणांत त्यांच्यावर जाणून बुजून खून केल्याचा आरोप शाबीत

होतो, असें प्रतिपादन केले. मात्र हे ठरवितांना मराठी पत्राचा आधार त्यांनी कोठेहि घेतला नाही. तात्पर्य " महाराष्ट्रांतील सशोधकांची पत्रे मला जमेस धरण्याचे कारण दिसत नाही " अशी सर जदुनाथ यांची मनःस्थिति वाचकास भासते. आणि त्याचें लिखाण अिंग्रजीतून होत असल्यामुळें त्यांची मनःस्थिति हिंदुस्थानभर फैलावू शकते. अर्थात त्या फैलावाबरोबर महाराष्ट्रांतील संशोधना-बद्दलचाहि गैरसमज सर्वत्र फैलाविण्याचेहि काम अनायासे घडते. याचा पुरावा म्हणून गेल्या दोन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या अेकदोन ग्रथांचीं नावें अुदाहरणादाखल सांगतो.

## महाराष्ट्रीयांनीं निर्माण केलेलें संकट

The Real Sevaji नांवाचा अेक ग्रथ अि स. १९३५ मध्ये औध प्रांतांतील अेका मुसलमान वकिलानी प्रसिध्द केला आहे. आपण जातीभावनेने प्रवृत्त होऊन हा ग्रथ लिहीत नाही; तर प्रो. सरकार यांची विचारसरणी ज्यांना मान्य आहे त्यांच्या विचारासाठी हा प्रबध सादर करीत आहो. (My thesis is being submitted for the consideration specially of those who are of Prof. Sarkar's mode of thinking,) असे ते सांगतात. त्याचप्रमाणे सर जदुनाथ यांनी जे आधार विश्‍वसनीय असल्याबद्दल खात्री दिली आहे, त्यांच्या आधारावरच मी आपल्या विधानाची माडणी करतों असे सागून महाराष्ट्रातील इतिहासभक्ताचे व आपले नाते जमण्याजोगे नाही (As to the Maratha school we are separated as poles as under from each other p. 45) असे ते म्हणतात

दुसऱ्या एका ठिकाणी हा लेखक सागतो की, प्रो. सरकार यांनी जो पुरावा ग्राह्य धरला आहे, त्यापासून शास्त्रशुद्ध रीतीनें जो निष्कर्ष निघतो तोच मी मांडीत आहे. किंबहुना हा निष्कर्ष त्यांच्या ग्रंथातच यावयास पाहिजे होता. (In fact, mine is only the logical corollary of his work. I am saying what ought to have formed part of his own conclusions. p. 12) इतके करून या लेखकाने आपल्या ग्रथाचा निष्कर्ष स्पष्टपणें सांगितला आहे, तो असा. (१) शिवाजी ही व्यक्ति हिंदूनीं पूज्य मानावी अशी नव्हती आणि (२) महाराष्ट्रांतील संशोधक कागदपत्र 'शोधून' काढण्यांत गुतले आहेत; पण त्याला तरी कांही सीमा पाहिजे; आतां हें काम बस्स झालें; ही सामुग्री प्रो. सरकार सांगतात त्याप्रमाणें भयंकर आहे हें खरें आहे. (There must be a limit to everything. How long will these gentlemen continue to "discover" and

"unearth" documents of the sort they do. They are worse than useless. Prof. Sarkar is right in characterising them, as sources of danger. p. 44); असे दोन सिद्धात या लेखकानें काढले आहेत. पैकीं पहिल्या सिद्धाताची सर्वच जबाबदारी सर जदुनाथ यांच्यावर लादता येणार नाहीं. समकालीन शत्रूचे अभिप्राय इतिहासलेखकाने निर्णायक धरू नयेत, ही गोष्ट Real Sevaji या पुस्तकाच्या लेखकास माहीत नाही, यामुळे तो पहिला सिद्धात काढतो, असें म्हणण्यास जागा आहे. पण मराठीत शिवाजी चरित्रासबंधी विश्वसनीय सामुग्री बहुतेक नाही आणि आहे तीहि जमेस धरावयास नको आणि महाराष्ट्रात बनावट कागदाचा सुळसुळाट असल्यामुळे अितिहासाच्या क्षेत्रात संकट उत्पन्न होत आहे, असा जो ग्रह सदर लेखकांच्या मनांत ठाम झाला आहे त्याची सर्व जबाबदारी सर जदुनाथ याच्या लिखाण.वर येते.

याखेरीज Aurangzeb and His Times नावाचा दुसरा एक ग्रंथ दीड वर्षापूर्वी मि. फरुकी नांवाच्या विद्वानांनी प्रसिद्ध केला आहे. त्यांत शिवाजी चरित्र हा विषय अनुषगाने आला आहे. या लेखकाला मराठी येत नसल्यामुळे ज्यांचे इंग्रजी भाषातर झालें आहे त्या बखरी व सर जदुनाथ यांनीं मराठी सामुग्रीसंबंधी प्रदर्शित केलेले विचार याच्या आधारें त्याने शिवाजी चरित्राचा भाग लिहिला आहे. शिवाजी महाराज हे युगप्रवर्तक होते व त्यांना हिंदू लोकांनी 'विभूती' म्हणून मान दिला, तर त्यात आक्षेप घेण्याचें कारण नाहीं असेंहि तो म्हणतो. पण शिवाजी हा विश्वासघातकी होता असें त्यास वाटत असून त्याच्याविरुद्ध पुरावा म्हणून जो मराठी पत्राचा आधार देण्यांत येतो त्यासबधी मि फरुकी यांनी असा शेरा मारला की, (But many documents have been 'discovered' recently and they are spurious. p. 351 note) 'पण अलीकडे महाराष्ट्रांतील सशोधकांनीं पुष्कळसे कागद 'शोधून' काढले आहेत, तथापि ते बनावट आहेत'. वरील अभिप्राय सर जदुनाथ यांच्या ग्रंथांतील एका वाक्याचें (These very recent "discoveries" in Maharastra require corroboration before they can be accepted, p. 30 first edition) रूपांतर आहे हे लक्षांत ठेवलें म्हणजे वरील लेखकाच्या मनात महाराष्ट्रांतील सशोधनासंबंधी दूषित ग्रह उत्पन्न होण्यास कोणाचें लिहिणें कारणीभूत झाले हें सहज समजण्याजोगे आहे.

## अितिहासाच्या प्रगतीस अडथळा

महाराष्ट्रीयासंबंधानें अितर प्रांतांत गैरसमज पसरविण्यास सर जदुनाथ कसे करणीभूत आहेत, याचे दिग्दर्शन येथवर केलें. आता अैतिहासिक सामुग्री

प्रसिध्द न करतां त्यांनी ती आपल्याजवळ ठेविल्यामुळें अितिहासाच्या कामांत कशी अडचण अुत्पन्न होत आहे, याची अेकदोन अुदाहरणें देतों. 'महंमदनामा' या नांवाच्या फारशी ग्रंथाची प्रत सर जदुनाथ यांच्या संग्रहीं आहे. त्यांत शहाजीच्या कैदेसंबंधीचा मजकूर विस्तृत रीतीने आला आहे. पण कारण काय असेल तें असो, त्यांतला अेकच परिच्छेद सर जदुनाथ यानी वाचला व त्यांच्या शिवाजी चरित्राच्या पहिल्या आवृत्तीत तो समाविष्ट झाला; बाकीचा मजकूर महत्त्वाचा असून जो त्यांच्या दृष्टीतून निसटला, तो त्यानतर जवळ जवळ ९-१० वर्षांनीं निघालेल्या तिसऱ्या आवृत्तीतहि समाविष्ट होऊं शकला नाहीं. पुढें प्रो. बर्मा या फारशी जाणणाऱ्या प्रोफेसराच्या मागणीवरून सर जदुनाथ यांनीं सदर महंमद नाम्याचे हस्तलिखीत त्याच्याकडे पाठविले होतें; ते वाचून या प्रोफेसरांनीं अेका स्वतंत्र लेखात असें दाखवून दिले की, सर जदुनाथ यानी शहाजीच्या सुटकेसबंधी जो मजकूर तृतीय आवृत्तीत लिहिला आहे तो या महमदनाम्यांतील मजकुरावरूनच अपुरा व चुकीचा ठरतो. अर्थात दाखवून दिलेली चूक कबूल करणें हें सर जदुनाथ याचें कर्तव्य होते; पण त्याऐवजी त्यांनीं यानंतर आपल्या जवळील हस्तलिखित ग्रंथ कोणास द्यावयाचे व कोणास द्यावयाचे नाहीत, यासंबंधी कडेकोट बंदोबस्त केलेला दिसतो; कारण त्यासबधी बोलणें काढलें असतां काहीतरी अशक्य अटी ते घालतात व 'ही अट पुरी करणें अशक्य' असें त्यांना सांगितल्यास 'यापुढें बोलणे बद, तुमचें आमचे जमणार नाहीं' असें सांगण्याचा त्यांचा शिरस्ता आहे. या शिरस्त्याचा अनुभव त्यांच्यावर टीका करणाऱ्यांच्या वाट्यास येत असेल असें म्हणावें तर तेहि म्हणणें टिकत नाहीं. तेव्हां ही त्यांची लहर आहे असें म्हणणें भाग आहे.

## जवळचा पत्रसंग्रह प्रकाशित करीत नाहींत

मराठी पत्रें त्यांना समजत नाहीत, यामुळें ते मराठी पत्राच्या प्रकाशनास विरोध करीत असतील असें म्हणावें तर तसाहि प्रकार दिसत नाही. हें स्पष्ट करण्यासाठी एकच उदाहरण देतों जैपूर येथील दप्तर खात्यांत फारशी पत्रांचा फार मोठा संग्रह आहे. त्यांत इ. स. १६०६ ते १७१७ पर्यंत जहांगीर, शहाजहान, व औरगजेब यांनी लिहिलेली व यांच्या वेळची इतरांचीं पत्रें व मसुदे मिळून दहा ते तेरा हजारांपेक्षा अधिक आहेत. सर जदुनाथ याचाच काय तो आजपर्यंत या दप्तरखान्यांत प्रवेश झाला व त्यांनी त्यांतल्या हजारों पत्रांच्या नकला करविल्या. याखेरीज अितर संग्रहांतील पत्रांच्याहि नकला त्यांनी करविल्या आहेत, पण हा संग्रह प्रकाशित करण्याचें त्यांनीं आजवर मनांत आणलें नाहीं. त्यांच्या अेका स्नेह्यास हा संग्रह पाहाण्याची संधि मिळाल्यामुळें त्यानें

त्याचें वर्णन Indian Historical Quarterly नांवाच्या त्रैमासिकाच्या १९३४ सालच्या सप्टेंबरच्या अंकांत दिलें आहे त्यावरून सदरील संग्रहाची कल्पना कोणासहि करता येईल.

हा संग्रह सर जदुनाथ यांनी पूर्णपणें अुपयोगांत आणला असता तर तो प्रसिध्द न केल्याबद्दल कोणास वाअीट वाटण्याचें कारण नाही. पण असें होणें अशक्य आहे व मूळ कागद अितिहासाभ्यासकांना खुले होणें अगत्याचें आहे ही गोष्ट वर उल्लेखिलेल्या त्यांच्या मित्राने भीतभीत सुचविली आहे तो म्हणतो की, यांतली बरीच सामुग्री सर जदुनाथ यांनी अुपयोगांत आणली आहे हें खरे, पण ती सामुग्री अेवढी मोठी आहे की, सर जदुनाथ यांचें लक्ष राजकीय अितिहास लिहिण्यात गढले असल्यामुळे त्या सामुग्रीचा भरपूर परिष्कार करण्याला ते देखील समर्थ झाले नाहीत (But so vast is the material in the letter–books, that, centred as his attention was, on political history mostly, even he has not been able to make full use of them in his published works. p. 470).

तात्पर्य, मराठीप्रमाणें फारशी भाषेंत लिहिलेली हजारो अितिहासोपयोगी पत्रें अुत्तर हिंदुस्थानांत आहेत; पण ती प्रकाशित करण्याचें काम केले पाहिजे. नवें आजपर्यंत तरी तिकडील विद्वानांना फारसे पटलेले दिसत नाही. 'फारसे' हा शब्द योजण्याचें कारण अितकेच की, अितिहास लेखनावर तिकडील विद्वानाचा भर आहे, तसा सामुग्री प्रकाशनावर नाही; आणि पत्रें छापण्यावर तर जवळ जवळ शून्यच म्हणण्यास हरकत नाहीं. नाहीं म्हणावयास हैद्राबादेकडे काही वर्षा पूर्वी अेकाने फरामीनूस्सलातीन नांवाचा अेक खंड प्रकाशित केला होता आणि अलिकडे अजमगड येथील शिब्ली अॅकॅडमी मार्फत औरंगजेबाच्या २७४ पत्रांचा 'रुकाआत –अि– आलमगीर या नांवाचा अेक खड प्रकाशित झाला आहे. पण त्यांत देखील अस्सल पत्रे संपादकानें पाहिलीं आहेत असे दिसत नाहीं. पूर्वी कोणीतरी नकलून ठेवलेले संग्रह अेकत्र करून पाठभेद देऊन सपादकानीं प्रकाशनाचें काम केलें अितकेंच. तथापि पत्रांच्या प्रकाशनाकडे क्वचित तिकडील विद्वानांची दृष्टि वळेल अशी चिन्हें दिसत आहेत. उदाहरणार्थ, 'दारा शुको'च्या चरित्राचा पूर्वार्ध गेल्या वर्षीं प्रसिद्ध झाला. त्यांत चरित्रकार डॉक्टर कानुनगो यांनीं त्या चरित्राच्या उत्तरार्धांत 'दाराचा' पत्रव्यवहार छापला जाअील असें जाहीर केलें आहे.

या खेरीज सर जदुनाथ यांच्या खास शिष्यापैकीं जोगीद्रनाथ चौधरी यांनी प्रकाशित केलेल्या मलिकंबर चरित्रांत सर जदुनाथ यांनी अविश्वसनीय ठरविलेल्या महाराष्ट्रांतील अेका ग्रंथाचा आधार देऊन मजकूर लिहिण्याचें धाडस केलें आहे. पण याहिपेक्षां महत्वाची गोष्ट अशी की, बनारस येथील हिंदु युनिव्ह-

सिटीत प्रो. पुणतांबेकर हे महाराष्ट्रीय विद्वान् अितिहास शिकविण्याचें काम करीत आहेत व सर जदुनाथ यांनी चालू ठेवलेल्या महाराष्ट्रासंबधीच्या गैरसमाजाचा निरास करण्याची दक्षता ते बाळगतात असे दिसते. ही गोष्ट जर्नल ऑफ इडियन् हिस्टरीच्या अेका अंकात (व्हॉ. १४ पृ. ५४ ते ७०) चद्रराव प्रकरणावर मि. बकी बिहारी मिश्र यांचा प्रबंध प्रसिद्ध झाला आहे त्यावरून स्पष्ट होणार आहे. या सबधांत मराठीत प्रसिद्ध झालेल्या पत्रव्यवहाराकडे सर जदुनाथ याचें दुर्लक्ष झाल्यामुळे त्याच्या हातून काय काय चुकीची विधानें झाली आहेत आणि त्याचे मन पूर्व ग्रहदूषित असल्यामुळें त्यांच्या विधानांत विसंगतता कशी आली हे फार मार्मिकपणे दाखविले आहे.

## विधायक सूचना

तथापि, सर जदुनाथ यांनी फैलाविलेले गैरसमज दूर केले पाहिजेत; व अस्सल फारशी पत्रें प्रकाशित करणे का जरुरीचे आहे हे इतर प्रांतांतील लोकांना महाराष्ट्रियांनी समजावून दिले पाहिजे. अलीकडे 'पेशवे दप्तरातील मराठी व अिग्रजी पत्रव्यवहार प्रसिद्ध होणें अगत्याचे आहे' असे सर जदुनाथ याना काही कारणामुळे सरकारपुढे माडावे लागलें आहे; अशा वेळीं आपल्याच ताब्यातील फारशीं पत्रे अप्रकाशित रहावी असा आग्रह धरणें त्यांनाहि कठीण जाईल. निदान ही सामुग्री ते एखाद्या सार्वजनिक संस्थेच्या स्वाधीन करतील तरीहि चालेल शिवाजी चरित्रविषयक सामुग्री ते मुबई युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन करणार असें ऐकण्यांत आहे, पण त्यांत काय घडेल ते सांगता येणार नाहीं.

## सर जदुनाथ हे संशोधक नव्हेत

कै. राजवाडे, व सर जदुनाथ यांच्या संबंधीची जी हकीकत येथवर दिली, तिचा हेतु इतिहासलेखन व संशोधन यांतील भेद वाचकांच्या ध्यानांत स्पष्टपणें यावा हा आहे. ऐतिहासिक सामुग्री प्रकाशित करण्याचे काम आधी व्यवस्थितपणें पुरेसें झालें पाहिजे आणि त्यानंतर इतिहास लेखनाचे काम हाती घेतलें तरच ते समाधानकारक होऊं शकेल, अशी संशोधकाची खात्री असल्यामुळे तो सामुग्री प्रकाशनाची आस्था बाळगतो, आणि इतिहास लेखकाला आपल्या हातून इतिहास लिहिला जावा अशी प्रबळ इच्छा असल्यामुळे 'सामुग्री माझ्या हाती कशी येईल व तिचा उपयोग माझ्या ग्रंथासाठी कसा करतां येईल' येवढ्यावरच त्याला लक्ष ठेवावें लागते. आधीं सामुग्री प्रकाशित करण्यांत तो आपली शक्ति खर्चण्यास तर तयार नसतोच, पण इतिहास लेखनानंतरहि तो या बाबतीत उत्सुक नसतो, याचें कारण त्या सामुग्रींतून आपण लिहिलेल्या इतिहासांतील विधानास बाधक अशी माहिती बाहेर पडण्याचा संभव आहे

अशी त्याला भीति वाटत असते, हें लक्षांत ठेवल्यास सामुग्री प्रकाशनासाठी राजवाड्यांनीं आयुष्य कां वाहिलें आणि सर जदुनाथ हे त्या कामी तितके उत्सुक कां नसतात याचा उलगडा होईल. हा उलगडा दोन वाक्यांत सांगावयाचा असल्यास, असें म्हणतां येईल की, राजवाडे हे अितिहास लेखक नव्हते तर संशोधक होते आणि सर जदुनाथ हे संशोधक नसून अितिहास लेखक आहेत.

# ५

# शिवाजीचरित्र व चिकित्साशास्त्र

मोठमोठ्या कल्पना मनात घोळविणें व कल्पनांचे मनोरे बांधणें सोपे आहे तें काम कोणीहि करील. पण कल्पनासृष्टीतली अशा प्रकारची गोष्ट प्रत्यक्ष सृष्टींत आणून दाखविणें फार कठीण असून त्याला अनेक प्रकारची अनुकूलता लागते. केवळ अिच्छेच्या अुत्कटपणाने ती घडून येअील असे नाहीं; किंवा मोठ्या बुद्धिमान मनुष्याला योग्य मार्ग हटकून सुचेल असेहि म्हणतां येत नाही. पण कांहीं माणसांना अशी कांही देणगी असते कीं त्यांना प्रसंगाच्या वेळी नेमका अुपाय सुचतो व तो अंमलांत आणण्याचे त्याना साधते, अितर माणसानी ज्या अडचणीच्या नुसत्या वर्णनानेहि गर्भगळित व्हावें, त्या अडचणी अंगावर कोसळल्या असतां हे लोक सहज लीलेने निभावून जातात, यामुळे अशा लोकाची गणना कर्तृत्वशालीच नव्हे तर असामान्य पुरुषात करणें योग्य असतें; आणि त्यांच्या हयातीत व त्याच्या मागूनहि त्यांच्या संबंधीं बारीक सारीक गोष्टीहि समजून घेण्याची जिज्ञासा सर्वत्र आढळून येते.

शिवाजी महाराज हे वर सांगितलेल्या असामान्य कोटींतले पुरुष होते. यामुळें त्याच्या हयातींत अनेक शाहिरानी, कवींनीं व लेखकांनी त्याची चरित्रे लिहिली असतील. त्यांनीं केलेल्या प्रत्येक गोष्टीचें विस्तृत वर्णन आवेशयुक्त व चटकदार रीतीनें त्या वेळच्या ग्रंथकारांनी केले असेल. महाराजांनी पन्हाळा हस्तगत केला त्याचें स्वतंत्रपणें वर्णन करणारें आख्यान जयरामानें लिहिलेलें लोकांपुढें आहे; व सुरतेच्या लुटीचें असेंच आख्यान आपण लिहिलें आहे, असें

तो आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत सांगतो. अफझलखानाचा पोवाडा तर सर्वांच्या परिचयांतला आहे अशा रीतीनें महाराजांच्या हयातींत त्यांच्या चरित्राविषयीं मराठी व संस्कृत ग्रथ निर्माण झाले असें प्रत्यक्ष पुराव्याने दाखवितां येतें पण महाराजाच्या मृत्यूनंतर सात आठ वर्षांत औरंगजेबाची स्वारी दक्षिणेंत झाली. आणि तेथून वीस वर्षेपर्यंत महाराष्ट्रांत धांवपळ व जाळपोळ यांचें राज्य होतें. त्यात अनेक लोक मारले गेले; नांवाजलेल्या घराण्यांचा निर्वंश झाला; आणि ज्या ठिकाणी राजे व सरदार नांदत होते त्या जागीं कोल्हीं व घुबडे खुशाल राहूं लागली. शिवशाहीतला महाराष्ट्र वीस वर्षांत अितका बदलला की, त्यांत पूर्वींचे अवशेष शोधण्याची खटपट करूनहि ते सांपडण्यास अडचण पडली असती. अुद्यां कोणावर कसा प्रसंग येअील याचा नेम नाही; अशी परिस्थिति अुपन्न झाल्यामुळें कवि, शाहीर व ग्रंथकार नष्ट झाले. प्रत्यक्ष छत्रपतींचे चिरंजीव व महाराष्ट्र राज्याचे मालक राजाराम छत्रपती यांच्यावर दक्षिणेत दूरवर जिंजी येथे राहून काळ कठण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला. तेव्हां त्यानी आपल्या पदरच्या सभासदास शिवाजी महाराजांचे चरित्र बखररूपानें लिहिण्यास सांगितलें. महाराजाच्या मृत्यूनतर १५–२० वर्षांनीच ही बखर लिहिली गेल्यामुळें तिच्यांत विश्वसनीय असें शिवचरित्र आढळून येत असले पाहिजे असें कोणासहि वाटण्याचा सभव आहे. आणि अितर बखरींच्या मानाने सभासदाच्या बखरीत बरीच विश्वसनीय माहिती आहे, हे खरें परंतु ती वाचून महाराजाच्या संपूर्ण चरित्र-श्रवणाची खरी जिज्ञासा तृप्त होत नाही. ती बखर लिहिणाऱ्या सभासदाला स्मरणा-खेरीज दुसरी कागदोपत्री सामुग्री अुपलब्ध नव्हती महाराजांच्या वेळचे कागद-पत्र अगर हुकूम पाहून प्रसगाचें वर्णन सभासदाने केले असावे असें म्हणण्यास त्याच्या बखरीत आधार मिळत नाही. महाराष्ट्रापासून अितक्या दूरवर कर्नाट-कांत धामधुमीच्या काळात जुनी शिवकालीन माहिती सांगणारे वृद्ध लोक असण्याचा सभव कमी. बहुतेक मंडळी नव्या पिढीची व त्यांची माहिती कर्णोप-कर्णी मिळविलेली. यामुळे सभासदाची बखर म्हणजे आठवतील तशा क्रमानें शिवाजी महाराजांच्या चरित्रांतील प्रसगाचे टिपण आहे असे म्हणण्यावांचून गत्यंतर नाही

सभासदाच्या बखरीनंतर शिवचरित्राकडे लक्ष देण्यास अनुकूल अशी सधि लवकर मिळाली नाही.शाहूमहाराजाच्या कारकीर्दींत अनेक अुलाढाल्या झाल्या; पण राज्यात स्वस्थता नसल्यामुळें चरित्र लेखनाचे काम कोणी केल्याचे दिसत नाही. पाणिपतच्या सुमारास चित्रगुप्तानें बखर लिहिली. आणि ही बखर म्हणजे सभासदी बखरीचीच पुनरावृत्ति आहे. चित्रगुप्तानें शब्दावडबर पुष्कळ माजाविले आहे. पण शिवचरित्रांतील माहिती या दृष्टीने सभासदी बखरीपेक्षां त्यांत कांहींच जास्त मजकूर नाही. त्या अर्थी चित्रगुप्ताच्या वेळेपर्यंत शिवाजी–

चरित्राची माहिती मिळविण्यासाठी नवा प्रयत्न झाला नव्हता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पाणिपतच्या युद्धानंतर बखरकाराना स्फुरण चढले. पाणिपतचा प्रसग सर्वतोमुखीं गाजला व त्याची चर्चा जिकडे तिकडे होअू लागली, यामुळे अनेक बखरकारांनी आपापल्या मनानें या प्रसगांचें वर्णन करून ठेवलें. पुढें सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत कांहीसें स्वास्थ्य मिळालें, तेव्हां बखरकारांची लेखणी पुन: शिवाजी महाराजांचें चरित्र लिहिण्याकडे वळली. तेव्हांपासून पेशवाई सपेपर्यत २५।३० वर्षें हा शिवचरित्र लेखनाचा ओघ अव्याहत चालला होता. त्यांत रायरीची अथवा अेक्याणव कलमी बखर व चिटणीशी बखर हे दोन ग्रथ मुख्य आहेत. अितर बखरी कमी अधिक प्रमाणाने याच ग्रंथाचे अनुवाद आहेत. पैकी चिटणीसाची बखर शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दींत व रायरीची सवाई माधवरावांच्या वेळी लिहिली गेली. या दोनहि बखरकारांच्या व त्या नतरच्या शिवदिग्विजय, शेडगावकर बखर वगैरे लिहिणाऱ्यांच्या मनात शिवाजी महाराजाविषयी आदरभाव वसत होता व त्यांनी महाराजांचे खरें चरित्र आपल्या हातून लिहिलें जावें या हेतूने आपले ग्रंथ लिहिले याबद्दल शंका नाहीं. त्याचप्रमाणें चिटणीसांची मराठी भाषा शुद्ध, रसाळ, सुबोध व चटकदार आहे हेहि खरें. पण भाषा व हेतु यांची शुद्धता असली म्हणून विश्वसनीय चरित्र लिहिलें जाअील असें समजणें योग्य नाही. त्याला अितिहासशास्त्र अवगत असणें आवश्यक आहे. शास्त्र माहीत नसतां सद्धेतूनें केलेली खटपट पुष्कळ वेळा चुकीची व बाधक अशी असते. मुले पडशाखोकल्यानें आजारी पडली म्हणजे आअी अत्यत शुद्ध हेतूनें व गोड बोलून सुचतील ते औषधोपचार करते व तेवढ्यावर ती बरी होतात. पण तिचे अुपचार नेहमीच मुलाच्या आरोग्यास उपकारक होतात असें नाहीं. कांही रोगाचे वेळी आईचे अुपचार चुकीचे होतात व औषधोपचार योग्य प्रकारचे होण्यास आरोग्यशास्त्र जाणणारा वैद्यच आणावा लागतो. यावरून नुसत्या कळकळीनें नेहमीच काम चोख होत नाही; चोख काम होण्यास कळकळीबरोबर शास्त्राचे ज्ञानहि असावें लागतें असे ठरते. त्याचप्रमाणें सहज स्फूर्तीनेंहि बिनचूक अितिहास लिहिला जाणार नाहीं हे लक्षांत ठेवले पाहिजे. अेखादा मनुष्य पाण्यात पडला व त्याला पोहतां येत नसलें, तर आपण बुडू नये या विषयी अुत्कट अिच्छा व कळकळ त्याच्या मनांत असते; पण तो जी धडपड स्वाभाविकपणें सहज स्फूर्तीने करतो ती त्याला बुडविण्यास कारणीभूत होते! आणि पोहण्याचें शास्त्र माहीत असणारा मनुष्य त्यांतून सहज पार पडतो सारांश, अिच्छा व कळकळ आणि सहज स्फूर्ती या प्रमाणे अितिहास शास्त्राची माहिती असेल, तरच संपूर्ण असें खरें चरित्र लिहिलें जाअील. अशा रीतीनें सभासदी, रायरीची आणि चिटणीशी या ज्या तीन बखरी अुपलब्ध आहेत व ज्यांच्या आधारावर

ग्रँट डफनें आपला अितिहास लिहिला, त्या बखरी चिकित्साशास्त्राच्या कसोटीस अुतरत नसल्यामुळें नव्या दिशेने शिवचरित्रासाठी अुद्योग सुरू करणें प्राप्त झालें आहे. प्रथम बखरीचे सामान्य स्वरूप काय आहे व अितिहास शास्त्राच्या दृष्टीनें या बखरीची योग्यता कां कमी ठरते याचें येथे दिग्दर्शन करूं.

शास्त्रशुद्ध पायावर शिवचरित्र लिहिलें जाण्यास

(१) अस्सल शिवकालीन पत्रे मिळाली पाहिजेत,

(२) शिवकालीन माहितगार लेखकाची टिपणें व त्यांचे ग्रंथ शोधून काढले पाहिजेत,

(३) ही माहिती भरपूर जमली पाहिजे; अपुऱ्या माहितीवर विश्वसनीय चरित्र लिहितां येणार नाही.

या दृष्टीनें शिवचरित्राच्या कामाचे तीन विभाग पडतील.

(१) सामुग्री जमविणे; (२) तिची छाननी करून गाह्याग्राह्य भागाची निवड करणें; आणि (३) ग्राह्य भाग पुरेसा जमला म्हणजे त्याच्या आधारावर शिवचरित्र लिहिणें

कै. राजवाडे यांनी २७ वर्षांपूर्वी सामुग्री या दृष्टीने बखरीची छाननी केली. तेव्हां त्या विश्वसनीय नाहीत व सामुग्री पुरेशी नाही असा निर्णय देअून विश्वसनीय नवी माहिती जमविण्यासाठीं त्यांनी आपल्या हयातीत खटपट केली. या खटपटीमुळे व अितर सशोधनामुळे शिवकालीन अस्सल पत्रें मिळून कित्येक प्रसंगाची माहिती आपणास आता निश्चित स्वरूपानें अुपलब्ध आहे. अुदाहरणार्थ, सुरतेच्या दोन स्वाऱ्या, कर्नाटकची स्वारी, बेदनूरची मोहीम, जयसिंगाचा तह, शृंगारपूरचें युद्ध वगैरे प्रसंग कधी घडले हे अस्सल विश्वसनीय पत्रांच्या आधारावर निश्चितपणें सागतां येते. तेव्हां ही निश्चित माहिती कोणत्या बखरकारानें कितपत बरोबर सागितली आहे हे पाहून बखरीची तपासणी अधिक बारकाअीनें आपणांस करता येते. ही तपासणी करताना मुख्य प्रश्न सोडवावे लागतात ते असे आहेत.

(१) बखरकार शिवाजी महाराजांच्या वेळचा आहे की पेशवाअींतला आहे?

(२) त्याला महाराजांच्या वेळचे पुरेसे कागद पहाण्यास मिळाले होते काय ? आणि

(३) त्याला अैतिहासिक चिकित्साशास्त्राचे नियम माहीत होते काय ? हे तीन प्रश्न विचारून प्रचलित तीन बखरींची योग्यता काय ठरते ते पाहूं.

**सभासदाची बखरः**—(१) महाराजांच्या मृत्यूनंतर १५।२० वर्षांनीं लिहिली; तेव्हां तिची गणना शिवकालीन या सदरात करतां येअील.

(२) तिच्या लेखकानें कागद पत्रांचा आधार घेतला नाहीं; स्मरणानें बखर लिहिली. अशा स्थितीत भरपूर कागदपत्र त्याला मिळाले होते काय, असा प्रश्नच अुपस्थित होत नाहीं.

(३) चिकित्साशास्त्राचे नियम त्याला माहीत नव्हते. माहीत असते तर त्यानें प्रत्यंतर पुराव्यानें निर्णय करण्याची खटपट करून नंतर बखर लिहिली असती. स्मरणावर हवाला ठेवल्यामुळें सभासदाच्या हातून कशा चुका झाल्या आहेत ते उदाहरण घेऊन पाहूं.

महाराजांनीं पन्हाळा दोन वेळां काबीज केला. प्रथम (१) अफझल वधानंतर शके १५८१ अखेर; आणि (२) शके १५९४ मध्ये दुसऱ्यादा आग्र्याहून परत आल्यानतर.

पन्हाळा घेतल्यावर शिवाजी महाराजाना शिद्दी जोहारने किल्ल्यावर वेढले आणि त्यांना किल्ला द्यावा लागला. ही सभासदाची अैकीव माहीती बरोबर आहे. पण दोन वेळां महाराजांनी पन्हाळा घेतला हे त्याला माहीत नाही. दुसरा प्रसंगच तेवढा त्याला माहीत आहे, यामुळे शिद्दीजोहाराचा वेढा त्याने या प्रसंगाशीं जोडून लिहिला. वस्तुतः तो पहिल्या प्रसगी पाहिजे. यामुळें शिद्दी जोहाराच्या वेढ्याचा काळ सभासदाच्या बखरीत तेरा वर्षांने चुकला आहे.

हाच प्रकार सुरतेच्या लुटीसबधी झालेला आहे ही लूट दोन वेळा झाली व पहिल्या लुटीच्या सुमारास शहाजीचा मृत्यु झाला. परंतु सभासदास फक्त सुरतेची दुसरी स्वारी तेवढीच माहिती असल्यामुळे त्यानें त्या सुमारास शहाजीचा मृत्यु सागितला. यामुळें त्याचा काळ सात आठ वर्षांने चुकला. सारांश, केवळ स्मरणावर हवाला ठेवून चरित्र लिहिणाराला सर्व माहिती सागतां येत नाहीं व माहितीचा कालानुक्रम बिनचूक साधाणार नाही.

**एक्याण्णव कलमी बखर**:--ही फारच अव्यवस्थित स्वरूपाची आहे. तिच्यांत वाटतील तेवढ्या चुका आहेत. अफझल प्रसंग १५८१ मध्ये झाला असून त्याचा काल या बखरीत १५७४ दिला आहे. म्हणजे सात वर्षांची चूक आहे! राज्याभिषेक ज्येष्ठ शु. १३ रोजी झाला ही गोष्ट सर्मान्य आहे व इतर सर्व बखरकारानीं ही मिति बरोबर दिली आहे. पण ९१ कलमी बखरीत राज्याभिषेकाची तिथि चैत्र शु. १ दिली आहे. अशा स्थितीत या बखरीची परीक्षा बारकाअीनें पाहण्यांत अर्थ नाही.

**चिटणिशी बखर**—ही यापेक्षां व्यवस्थित आहे. ती अि. स १८१० मध्यें म्हणजे शिवाजीच्या मृत्यूनंतर १३० वर्षांनी लिहिली. शिवाजी महाराजांनीं व्यंकोजीस पाठविलेलें पत्र त्यानें आपल्या बखरींत दिलें आहे. यावरून शहाजी मेल्यानंतर तेरा वर्षांनी कर्नाटकची स्वारी झाली असें ठरतें. त्याप्रमाणें शहाजीच्या मृत्यूनंतर

चिटणीसांनीं तेराव्या वर्षी कर्नाटकची स्वारी वर्णनही केली आहे. पण तेरा वर्षें हे शब्द सापेक्ष आहेत; त्यांचा अुपयोग सशास्त्र रीतीनें करण्यापूर्वी कर्नाटकच्या स्वारीचा अगर शहाजीच्या मृत्यूचा काल स्वतंत्रपणे ठरविला पाहिजे; तो तर्काने गृहीत धरतां कामा नये; आणि तसा धरला तर दोनहि गोष्टीचे काल ठरविण्यात चूक होअील हें चिटणीसाच्या लक्षात आलें नाही. पण त्यांनीं कर्नाटकची स्वारी अथवा दक्षिण दिग्विजय हा राज्याभिषेकापूर्वी झाला असला पाहिजे असें तर्काने गृहीत धरले, आणि त्यापूर्वी तेराव्या वर्षी शहाजीचा मृत्यु मांडला. यामुळे त्यांचा शहाजीच्या मृत्यूचा काळहि चुकला आणि दक्षिणेंतील स्वारीचा काळहि चुकला! साराश, अपुऱ्या माहितीस तर्काची जोड देअून पुरें चरित्र लिहिण्याची खटपट केल्यामुळे चिटणीसाच्या बखरीत विश्वसनीय भाग कोणता व अविश्वसनीय कोणता हे निवडणें फार कठीण पडते अशा रीतीने बखरीची हकीकत सांगितली. त्यावरून या बखरीवर विसबून शिवचरित्र लिहिणाऱ्या आधुनिक लेखकाची निराळी परीक्षा करण्याचे कारण नाही. त्यांच्या लिहिण्यांत बखरकाराचे दोष स्वाभाविकपणेच अुतरले आहेत.

हे दोष नाहीसे होअून खरे शिवचरित्र लिहिले जाण्यास भरपूर शिवकालीन विश्वसनीय सामुग्री मिळविण्यासाठी नेटाने अविश्रात खटपट केली पाहिजे व मिळालेल्या सामुग्रीची योग्यता ठरविली पाहिजे विश्वसनीयतेच्या दृष्टीने सामुग्रीचे चार वर्ग पडतात.

१ शिवकालीन अस्सल पत्रे, मराठी, फारशी, अिंग्रजी व डच,

२ शिवकालीन मराठी व फारशी चरित्रकार व लेखक याचे ग्रंथ,

३ पेशवाअीतल्या अस्सल कागदांत आलेली शिवकालीन माहिती,

४ अितिहासशास्त्र न जाणणाऱ्या बखरकारानी व टिप्पणकारांनीं दिलेली शिवचरित्रविषयक माहिती.

चिटणीशी व ऐक्याण्णव कलमी बखरीची गणना अशा रीतीनें साधनाच्या शेवटल्या म्हणजे चौथ्या वर्गांत करावी लागते. याबद्दल कित्येकांना अद्याप शंका वाटते व अशा रीतीने आपल्या बखरकाराची गणना शेवटल्या वर्गांत घालणारें चिकित्साशास्त्रहि अमान्य करण्याकडे त्याच्या मनाचा कल आहे, यासाठी त्याचें थोडेंसें विवेचन करणे प्राप्त आहे.

शास्त्र माहीत नसले म्हणजे उपलब्ध सामुग्री असून नसल्यासारखी होते व तिचा उपयोग योग्य रीतीने करता येत नाही. उदाहरणार्थ, महाराष्ट्रांत हजारो शिलालेख शेकडो वर्षांपासून ठिकठिकाणी कोरलेले आहेत. मागला सशास्त्र इतिहास लिहिणाराला त्यांतली माहिती जमेस धरली पाहिजे हें उघड

आहे. पण बखरकार कलियुगाच्या प्रारंभापासून माहिती देण्याचा आव घालीत असून त्यांनीं एकाहि शिलालेखाकडे पाहिलें नाहीं. आणि पाहिलें असतें तरी त्यांना त्यांतले काय समजणार होतें ? शिलालेख लावण्यास व उकलण्यास पुष्कळ सामुग्री जवळ असावी लागते. तिच्या अभावी हे शिलालेख म्हणजे शुद्ध फत्तर आहेत. बखरकाराना ते तसेच भासले ! आणि आजचा संशोधक या शिलालेखांतून निश्चित माहिती काढू शकतो; व मोठमोठे विश्वसनीय इतिहास लिहितो; सारांश, इतिहास हे शास्त्र आहे व हे शास्त्र जाणणाऱ्यांस बखरकाराच्या चुका निश्चित करतां येतात आणि खरे शिवचरित्र लिहिण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगीं जास्त प्रमाणात आहे हे अमान्य करतां येणार नाही मलेरियाचे जतू असतात व ते जतू कोयनेलाने मरतात हा आजचा प्रत्यक्ष प्रयोगाने ठरलेला वैद्यशास्त्राचा सिद्धात न मानता, मागल्या जन्मी केलेले पाप अगर ग्रहयोग या सारखी कारणें देण्याची व ताप घालविण्यास मत्र तत्र अगर दाने करण्याची प्रवृत्ति पुष्कळ लोकात आढळते. याचे कारण त्यानी आधुनिक वैद्यकाचे अध्ययन केलेलें नसते व त्या वैद्यकाचा प्रभाव त्याच्या लक्षांत आलेला नसतो. तोच प्रकार इतिहासाच्या बाबतीत आहे मल्हार रामराव हे चिटणीशी घराण्यात जन्मलेले व त्यांच्या वंशांतले लेखक असून त्याच्याजवळ शिवकालीन टिपणें व शकावल्या असल्या पाहिजेत; व त्याच्याच आधारे त्यांनी आपली बखर लिहिली असली पाहिजे, असे कित्येकांनी प्रतिपादन केले आहे; पण ते त्याच्या शास्त्रानभिज्ञतेचे द्योतक आहे. चिटणीशी घराण्यांत बखरकार जन्मला म्हणून त्याच्याजवळ शिवकालीन कागद असण्याचा सभव आहे एवढे फार तर म्हणतां येईल. पण तसें न म्हणता त्याच्याजवळ शिवकालीन अस्सल पत्रे व जत्र्या होत्याच असे गृहीत धरणें शास्त्रशुद्ध ठरणार नाही. नांव सोनुबाई आणि हातीं कथलाचा वाळा, ही म्हण सर्वांच्या परिचयाची आहे त्याप्रमाणें चिटणीशी घराण्यात जन्म होऊन देखील अनेक आपत्ति येऊन गेल्यामुळे त्याच्याजवळ शिवकालीन भरपूर कागदपत्र होते हे म्हणणें टिकत नाही. एक अस्सल पत्र त्याच्याजवळ होते ते त्यांनी ग्रंथांत दिले आहे. इतर पत्रे असती, तर ती साराश रूपानें तरी त्यांनीं दिली असती ; किंवा निदान त्यांच्या आधारावर त्यानी बखरीत विधाने केली असतीं पण त्यांचे लिहिणें अनेक ठिकाणी चुकले आहे, हे प्रत्यंतर पुराव्याने दाखवित येतें. त्याचा मासला वर दिलाच आहे त्याचप्रमाणें शिवकालीन शकावली चिटणीसाच्या जवळ असती तर तिचा उपयोग त्यानी अवश्य केला असता; शक देण्याच्या बाबतीत त्याना हात आखडता ठेवण्याचे कांही कारण नव्हते अगर प्रसंगाच्या पौर्वापर्यांत एवढ्या चुकाहि त्यानी केल्या नसत्या. साराश, लेखक चिटणीशी घराण्यांतला म्हणून तो इतर लेखकांपेक्षां अधिक विश्वसनीय असला पाहिजे हें गृहीत धरणें योग्य नाही.

एक्याण्णव कलमी बखर शिवकालीन आहे व ती इ. स. १६८०-८१ मध्यें लिहिली गेली असेहि कित्येकांनी प्रतिपादन केलें आहे. व मलकरे घराण्यांतील पुरुषाने ती नकलली असल्याचे वाक्य या विधानास आधार म्हणून दाखविलें आहे. परतु ग्रथ शिवाजी महाराजांच्या वेळी लिहिला गेला हे ठरविण्यास एक साधा पण बिनचूक मार्ग असतो तो असा की जो ग्रंथ शिवाजी महाराजांच्या वेळी लिहिला गेला त्यात शिवकालीन माहिती बरीच बिनचूक असावी व त्यांत पेशवाईतली माहिती मुळीच नसावी. पण एक्याण्णव कलमी बखरीत पेशवाईं-तली माहिती बिनचूक आहे. शिवकालीन माहितीत ढोबळ चुका आहेत. राज्या-भिषेकाची मिति देण्यात बहुतेक बखरकारानी चूक केली नाही. पण एक्याण्णव कलमी बखरीत तिची मित्ती ज्येष्ठ शुद्ध १३ च्या ऐवजी चैत्र शुद्ध १ दिली आहे. अफजल प्रसगी आपला बाप महाराजाच्या पदरी होता असे सागणारा मलकरे अफजल प्रसगाची मिति सागताना सात वर्षांची चूक करतो! आणि सर्वांत आश्चर्य हे की हा लेखक शहाजीची माहिती सांगताना शहाजीचा मुलगा व्यकोजी, व्यकोजीला तीन मुलगे, त्याची नावे शहाजी, शरीफजी व तुकोजी, पैकी पहिल्या दोघांचा निर्वंश झाला आणि तिसऱ्याची संतती हल्ली तंजावरास आहे; या पेशवाईतल्या गोष्टी बिनचूक सागतो! इ. स. १६८० मध्ये बखर लिहिणाऱ्याला त्यानतर पन्नास वर्षांची ही तपशीलवार माहिती बिनचूक लिहितां येणें अशक्य आहे; आणि हे शक्य धरणाऱ्यास भूत पिशाच्याच्या सहाय्याने भविष्य सांगतां येते असे गृहीत धरावे लागेल. ते धरण्यापेक्षां लेखकच पेशवाईतला असला पाहिजे असे समजणे जास्त शास्त्रशुद्ध होईल हे उघड आहे.

यावर ही माहिती देणारा भाग 'प्रक्षिप्त' समजावा असेंहि सुचविण्यांत आलें आहे. पण कोणत्याहि ग्रथांतला 'प्रक्षिप्त' भाग कोणता व 'मूळ' कोणता हे ठरविण्यासबंधी नियम ठरलेले आहेत. त्यातला एक नियम असा आहे की, एखाद्या ग्रंथाच्या अनेक सपूर्ण प्रति मिळाल्या असून त्यांत कांही मज-कूर इतर प्रतीत नसून एकाच प्रतीत अधिक असेल तर तो 'प्रक्षिप्त' असण्याचा सभव आहे एक्याण्णव कलमी बखरीच्या संपूर्ण अशा तीन प्रती उपलब्ध आहेत. आणि त्या तीनही प्रतीत व्यकोजीच्या तीन मुलाची नावें दिलेला भाग आहे; हा भाग न दिलेली अशी एकही सपूर्ण प्रत अद्याप सापडलेली नाही. त्याअर्थी हा भाग 'प्रक्षिप्त' मानणें शास्त्रशुद्ध ठरत नाही. सारांश, एखाद्या बखरीचा काळ ठरवितांना तो अमक्याने लिहिला असा शेवटचा शेरा पाहून त्यावर विश्वसून तिचा लेखनकाल ठरविणे योग्य नाही. त्यांत आपण फसण्याचा सभव असतो. उदाहरणार्थ, एक नाना फडणिसांचें लेखी चरित्र आपणांस सांपडले व तें हरीपंत फडक्याच्या मुलानें लिहिले असा शेवटी शेरा आहे अशी आपण कल्पना करूं.

पुढें त्याच्यांतील मजकूर तपासल्यावर नानाच्या संबंधी माहिती देतांना त्यानें ढोबळ चुका केल्या आहेत व नानांचें वर्णन देताना नानांच्या मागे पुण्यास लोकमान्य टिळक झाले, त्याना तीन मुलगे, एक त्यांच्या हयातीत मेला व त्यांच्या तिसऱ्या मुलाच्या मुलाचें नांव अमूक अशी बिनचूक माहिती त्यांत सांपडली! त्या बरोबर आपण निश्चितपणें असें ठरविले पाहिजे की ही बखर आज आपणापुढे आहे या स्वरूपात अगदी अलीकडच्या माणसाने 'लिहिलेली असली पाहिजे. हरिपंत फडक्याच्या मुलाने नानाचें चरित्र लिहिले ही गोष्ट खरी असो अगर नसो. तिची कल्पना आपणांपुढे असलेल्या चरित्र ग्रथावरून आपणांस करतां येणार नाहीं असे कबूल करणे आपणांस भाग पडेल.

ह्याच प्रकार अेक्याण्णव कलमी बखरीचा काल-निर्णय करताना कित्येकांचा झाला आहे. शिवकालीन माहिती चुकीची व पेशवाअीतली मात्र बिनचूक, अशी माहिती ज्या ग्रथांत दिलेली आहे तो ग्रंथ अि स १६८० त लिहिला असला पाहिजे हे म्हणणें केव्हांहि टिकण्याजोगे नाही. तो पेशवाअीत लिहिला गेला हे कबूल करण्यावांचून गत्यतर नाही.

यावरून बखरकाराच्या लिहिण्यांत कोणते दोष आहेत व त्यांची तपासणी करतांना चिकित्साशास्त्र न जाणणाऱ्याच्या हातून शिवचरित्राच्या सामुग्रीची विश्वसनीयता ठरविण्याचे कामी कशा चुका होत आहेत ते सागितले त्यावरून विश्वसनीय शिवचरित्र लिहिण्यापूर्वी भरपूर, पुरेशी शिवकालीन सामुग्री जमविणे व चिकित्सक पद्धतीचें अध्ययन केलेल्या विद्वानाकडून तिचे परीक्षण होणे किती अगत्याचें आहे हे वाचकाच्या लक्षांत येअीलच.

# ६

## शिवाजी महाराजांची खरी जन्मतिथि *

**एकश्चन्द्रस्तमो हन्ति न च तारगणोऽपि च।**

सुभाषित.

**१ पूर्वेतिहास** –श्रीशिवाजी महाराजांचा जन्मकाल आधुनिक चिकित्सक पद्धतीनें ठरविण्याचा पहिला प्रयत्न सुप्रसिध्द इ. सं. वि. का. राजवाडे यांनीं चौथ्या खंडांत प्रस्तावना लेखन प्रसगी पंचवीस वर्षांपूर्वी शके १८२२ मध्ये केला ; आणि कै. लोकमान्यांनी या पध्दतीची शास्त्रशुध्दता सदर खंडाच्या परीक्षण प्रसंगी केसरीतील लेखातून त्याचवेळी जाहीर रीतीने मान्य केली. त्यापूर्वीपासूनहि ही जन्मतिथि वैशाख शुध्द २ शके१५४९ अशी असली पाहिजे असे सामान्यत: मानण्यात येत होते. 'सामान्यत:' असे म्हणण्याचे कारण एवढेच की, त्यावेळीं देखील जन्मतिथीबद्दल एकवाक्यता नव्हती. राजवाडे यानी वैशाख शु. ५ विश्वसनीय धरली; लोकमान्यानी वैशाख शु. प्रतिपदा ही शिवजन्मतिथि असली पाहिजे, असे प्रतिपादन केले आणि सामान्य लोक द्वितीया खरी असें समजून त्या तिथीस उत्सव करीत राहिले. असा मतभेद होण्याचें कारण त्यावेळी या प्रश्नाचा निर्णय करण्यास जो पुरावा उपलब्ध होता तो अपुरा व अविश्वसनीय असा होता आणि याच कारणामुळे "आजच्या अंकांत उपस्थित केलेल्या वादाचा निकाल लागण्यास आणखी थोडा काळ गेला पाहिजे" असा इषारा देऊन ठेवणें लोकमान्यांना आवश्यक वाटलें. पण हा 'थोडा काळ' म्हणजे किती वर्षे याची कल्पना त्यावेळी कोणासच करता येण्याजोगी नव्हती ; ही केवळ योगायोगाची गोष्ट होती.

**२ खऱ्या तिथीचा उदय** –त्यानतर सोळा वर्षांनीं भा. इ. सं. मंडळाच्या चतुर्थ संमलेन प्रसगी लोकमान्यानी 'जेधे शकावली' पुढे मांडल्यामुळें हा योगायोग जुळून आला वस्तुत: हा योग यापूर्वीं ९–१० वर्षे येण्याजोगा होता; कारण कै. दयाजीराव सर्जेराव ऊर्फ दाजीसाहेब जेधे देशमूख यांनी आपल्या संग्रहांतली ही शकावली शके १८२८ च्याच सुमारास लोकमान्याच्या स्वाधीन केली होती. परंतु लोकमान्यावर त्या सुमारास कारागृहाचा प्रसंग आल्यामुळे शकावलीच्या प्रसिद्धीकरणाचा योग ते कारागृहांतून परत येईपर्यंत येऊ शकला नाही.

---

* हा लेख 'शिवचरित्र प्रदीप' या ग्रथातील आहे. लेखात ठिकठिकाणीं नुसते पृष्ठांक दिले आहेत ते या ग्रंथांचे समजावे.नसं

अशीच चुकामूक राजवाडे यांच्याहि बाबतीत यावेळी घडून आली. त्यांनी अठराव्या खंडांत पुण्याच्या होनप देशपांडयांच्या सग्रहांतली जी एक शकावली शके १८३६ मध्ये छापली ती, जेधे शकावलीप्रमाणे शिवचरित्रांतील सूक्ष्म मित्या देणारीच आहे ; व तिच्यात शिवजन्मतिथि जेध्याप्रमाणेच असली पाहिजे, असें आपण आतां, तिच्या दुसऱ्या उपलब्ध प्रतीवरून, निश्चयाने म्हणूं शकतो. पण राजवाडे यांच्या हातीं आलेली शकावली त्रुटीत असून तिचा प्रारंभीचा भाग फाटून गेला होता; यामुळे त्यांत शिवजन्मतिथि प्रसिद्ध होऊ शकली नाही.

अशा रीतीनें होनप शकावलीचा प्रारभीचा भाग फाटल्याने व जेधे शकावली लोकमान्याच्या कारागृहवासाने अप्रकाशित राहिल्यामुळे खरी शिवजन्मतिथि शके १८३८ पर्यंत लोकांपुढें येऊं शकली नाहीं आणि ती लोकापुढे माडतांना देखील लोकमान्यांना ' प्रसिद्ध व अप्रसिद्ध बखरीत या जन्मतिथीबद्दल अत्यंत विसंगतता आहे ; सबब या बाबीचा जितका जास्त खल होईल तितका पाहिजेच आहे ;'' एवढे नमूद करण्यापलीकडे काही अधिक करतां आले नाही. याचे कारण हा खल करण्यास लागणारी साधनसामुग्री त्यावेळी उपलब्ध नव्हती. पण जेधे शकावलीची व त्याबरोबरच त्यांत दिलेल्या शिवजन्मतिथीची विश्वसनीयता सर्वमान्य होईल ही गोष्ट श्री. सरदार मेहेंदळे व कै. पाडुरग नरसिंह पटवर्धन यांच्या लक्षात त्याच वेळी आली होती असे म्हणतां येते. कारण, मूळ शकावली बारकाईनें पाहून तिची नक्कल करण्याचें व तिची चाचणी पाहाण्याचे काम त्यांनी केलें होतें. परंतु या विषयाचा सांगोपांग विचार त्यावेळी त्यांनाहि करतां आला नाही.

ऐतिहासिक तिथिनिर्णयाचा प्रश्न शास्त्रशुद्ध रीतीने सोडविण्यास प्रत्यतर पुरावा व गणिताचीं कांही सूक्ष्म कोष्टकें हाताशी असावी लागतात, त्याच्या अभावी याबाबतींत समाधानकारक काम होऊं शकत नाही. जेधे मिति प्रसिद्ध झाल्यापासून तिची यथार्थता विद्वानांना मान्य होण्यास कांही काळ लोटावा लागला; याचे कारण, प्रत्यंतर पुरावा व गणिताचें साधन त्यावेळी उपलब्ध नव्हतें हें आहे या उणीवा भरून काढण्याचें श्रेय कै. गणपतराव खरे व रा. सदाशिवराव दिवेकर यांना आहे. खरे यांची' शिवकालीन जंत्री 'तयार झाल्यापासून जेधेशकावलींतील मित्या तत्कालीन युरोपियन पत्रे व मुसलमानी लेख यांतून आढळणाऱ्या तारखांशीं ताडून पाहणें शक्य झालें; व दिवेकरांनी 'शिवभारताची' प्रत शोधून काढल्यापासून शिवजन्मतिथीस उत्तम प्रकारचा प्रत्यंतर पुरावाहि मिळाला. या साधनांचा उपयोग करून जेधेमिति ग्राह्य धरली पाहिजे, असें प्रतिपादन करण्याचें पहिलें श्रेय कै. वासुदेवशास्त्री खरे यांचें आहे. त्यानंतर त्यांना दुजोरा देण्याचें काम रा. चांदोरकर यांनी शके १८४३ मध्ये केले व रा. ज. स. करंदीकर यांनी

शके १८४६ मध्यें (२०।५।२४ केसरीतून) ही, गोष्ट जाहीर रीतीनें मांडून 'यापुढें ही तिथि खरी धरून उत्सव केला पाहिजे, असें सुचविले.

या खेरीज रा. डिस्कळकर यानी मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटींतला फोर्ब्स कलेक्शन पाहून त्यातली मिति भा. इ. सं. मंडळापुढें मांडली ; प्रसिद्ध जोतिर्विद वे. बा. केतकर यांनी अनेक उल्लेखांचे सरासरी मानानें १५५१ पक्षास मिळणारें गणित मडळापुढे वाचलें आणि मी जेधे शकावलीतल्या वाक्याचा अर्थ करतांना कोणती पद्धति स्वीकारावी लागते व कित्येक शकाचे निरसन कसें करता येते, याचा विचार समेलनप्रसंगी केला. अशा रीतीने भा. इ. स मंडळापुढें वेळोवेळी आलेला पुरावा ज्याना पाहाण्यास मिळाला त्याना जेधेमितीची ग्राह्यता पटली होती; आणि त्यास अनुसरून शिवजन्मतिथीचा उत्सव ( आधीपासून रा. करंदीकर यानी सुचविल्याप्रमाणें ) फाल्गुन व. ३ रोजी करण्याची कल्पना रा. दिवेकर यांनी गुदस्ता काढली ; तेव्हा ती बहुतेकाना मान्य झाली; ( केसरी १९२४ फेब्रु. ) आणि त्याप्रमाणे शिवनेरीस या तिथीचा पहिला उत्सव करण्यात आला.

**३ आक्षेपक**—तथापि बडोद्यांतील कांही विद्वानांना या बाबतीत घाई होत आहे असें वाटून त्यानी वर्तमानपत्रातून व मासिकातून जेधेतिथीविरुद्ध आक्षेप घेण्यास सुरवात केली. तेव्हा, हे आक्षेप व त्याची उत्तरे लोकापुढे मांडतां आल्यास या प्रश्नाचा साधकबाधक विचार करणाऱ्यास चागले साधन होईल अशा विचारानें मी रियासतकार रा. गोविंदराव सरदेसाई याना असा एक लेख प्रस्तुत पुस्तकात घालण्यासाठी पाठविण्याची विनति केली. तिला मान देऊन रा. सरदेसाई, रा वाकसकर व रा. दा. ना. आपटे यांच्या सहीने एक लेख माझ्याकडे पाठविण्यांतहि आला. परतु त्यानतर या तिघांनी मुबईच्या नव्याकाळांत, लोकमान्यात, श्रीशिवाजीत व केसरीत अनेक लेख लिहून जेधेतिथीवर किती आक्षेप घेतां येतात हे दाखवून दिले, आणि त्या आक्षेपाची उत्तरे मीहि केसरीत दिली. यामुळे रा. सरदेसाई याना लेख पाठविण्याविषयीं विनंती केली तेव्हाच्या परिस्थितीत पुष्कळ बदल झाला. मजकडे लेख पाठविल्यानतर रा. सरदेसाई वगैरे विद्वानांना आणखी काही आक्षेप सुचले व ते त्यानीं जाहीर केले त्या अर्थी ते आक्षेपांच्या बाजूस जमा धरणें प्राप्त झालें. आणि त्याप्रमाणें विरुद्धपक्षाने घेतलेले सर्व आक्षेप जमेस धरून त्याचीं उत्तरे सहज ताडून पाहतां येतील अशा रीतीनें एखाद्या ग्रंथात दाखविणेंच श्रेयस्कर आहे अशी सूचना कित्येकांनी केली व ती मला इष्ट दिसली. याचे कारण वर्तमानपत्रातून कै. लोकमान्यांसारख्या उत्तम अधिकारी पुरुषानी लिहिलेले लेख देखील कालांतराने संदर्भास उपयोगी पडत नाहींत असें प्रस्तुत वादात माझ्या निदर्शनास आलें होतें. तें असें कीं, वैशाख शुद्ध

द्वितीया अगर पंचमी अग्राह्य कां, याचें विवेचन कै. टिळकांनीं पंचवीस वर्षांपूर्वी केसरीत विस्तृत रीतीनें केलें असून ते रा. सरदेसाई यासारख्या कसलेल्या सकलनकारांस वाचावयास मिळालें नाही व त्यामुळें त्याजकडून जुने आक्षेप प्रस्तुत वादांत पुढे मांडले गेले आणि त्यास पूर्वीं देण्यात आलेलीच उत्तरे पुन. काहीं बाबतीत मला द्यावीं लागली; आणि अशा रीतीने चर्वितचर्वण अवश्य झालें. हा प्रसग टाळावा व या बाबतीत पुनः विचार करणारास आजपर्यंतच्या वादाचा निष्कर्ष सहज उपलब्ध व्हावा, या हेतूनें यापुढे दिलेला मजकूर प्रस्तुत ग्रथांत समाविष्ट केला आहे.

**४ आक्षेपकांचे लुले साक्षीदार**-जेधे शकावलि व शिवभारत यांच्या विरुद्ध आक्षेपकांनी वीस साक्षीदार उभे केले आहेत. ही सख्या त्यांना आणखीही वाढवितां आली असती. कारण गेल्या शंभर वर्षांत ज्यानी ज्यानी मराठयांचा इतिहास अगर शिवचरित्र लिहिले त्यानी शिवजन्माचा शक १५४९ च मानला आहे; आणि याची सख्या शेकड्यांनी सांगता येईल हे खरे आहे तेव्हां १५४९ पक्षाच्या साक्षीदाराची सख्या वीस आहे की दोनशे आहे हा मुद्दा वादग्रस्त नसून त्यात मुख्य प्रमाणभूत लेखक कोण आहेत व ग्रथप्रामाण्यशास्त्राच्या दृष्टीनें त्यांच्या एतद्विषयक लेखाची लायकी काय आहे याचा प्रथम विचार करणे महत्त्वाचें आहे.

आधारभूत ग्रथाची योग्यता ठरवितांना ते कोणत्या कालविभागांतले आहेत याचा प्रथमतः निर्णय केला पाहिजे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक कालाचे मुख्य तीन विभाग पडतात. पहिला शिवकालीन म्हणजे शाहूच्या आगमनापर्यंतचा; दुसरा, पेशवाई अखेर ( शके १७३९ ) पर्यंत आणि तिसरा इंग्रजी राज्य सुरू झाल्यापासूनचा. पैकीं शिवजन्माचा प्रश्न शिवकालीन विभागांतला आहे; ह्याअर्थी त्याच्या निर्णयास पेशवाईतला अगर इंग्रजीतल्या साक्षीदारापेक्षां शिवकालीन साक्षीदारांची मातबरी अव्वल दर्जाची समजली पाहिजे. पेशवाईतले अगर इंग्रजी अमदानीतले साक्षीदार पाहूंच नयेत असा या म्हणण्याचा अर्थ नाही. पण शिवकालीन व पेशवाईंतला असे दोन समबल साक्षीदार पुढें आले व त्याचे सांगणें परस्पराशी विरुद्ध असले तर समकालीनत्वामुळें शिवकालीन साक्षीदारांच्या म्हणण्यास अधिक मान्यता मिळणें स्वाभाविक आहे. त्याबरोबर हेहि लक्षांत ठेवलें पाहिजे की, केवळ समकालीन असला म्हणून त्या साक्षीदाराचें म्हणणें सर्वस्वीं प्रमाणभूत असतें असें नव्हे; समकालीनत्वाप्रमाणें साक्षीदाराची माहितगारी, विश्वसनीयता व सुसंगतपणा हेहि ण अवश्य लक्षांत घेतले पाहिजेत. तेव्हां या सर्वच दृष्टीनें जेधे पक्ष व आक्षेपक पक्ष याच्या साक्षी-

दारांचें बलाबल ताडून पाहतांना ज्या मुद्यावर अनुसंधान ठेवणें जरूर आहे ते प्रथम येथें नमूद करून ठेवतों.

| खऱ्या जन्मतिथीचे साक्षीदार | आक्षेपकांचे साक्षीदार |
|---|---|
| १ शिवकालीन आहेत, | १ शिवकालीन नाहीत. पेशवाईंतले व इंग्रजी अमदानीतले आहेत. |
| २ त्याची शिवजन्माची तपशीलवार मिति गणिताच्या कसोटीस तंतोतंत उतरते. | २ एकाचीहि शिवजन्माची मिति गणिताच्या कसोटीस उतरत नाही. (शि. च. प्र. पृ. २०० पहा) |
| ३ ते शिवचरित्रांतील मित्यांचे पूर्ण माहितगार असून दीडशें पेक्षांहि जास्त गोष्टींचे काल बरोबर सांगतात. | ३ ते शिवचरित्रांतील मित्यांविषयीं गैरमाहितगार आहेत; दहांबारापेक्षां अधिक मित्या त्यांना माहीत नाहींत. (पृ. २०० पहा.) |
| ४ त्यांच्या एकमेकांच्या म्हणण्याशी मेळ आहे. | ४ परस्परांत मेळ नाही; यामुळे काहीच निश्चित ठरत नाही. (पृ. २००–२१९) |
| ५ त्यांच्यांत शेकडा २–४ चुका असतील. | ५ त्यांच्यात शेंकडा २–४ मित्या बरोबर असतील (पृ. १९८पहा.) |

**५ साक्षीदारांचा काल**—शके १५४९ पक्षाचे सर्व साक्षीदार पेशवाईंतले व इंग्रजी आमदानीतले आहेत; ते शिवकालीन नाहीत, हे दाखविण्यासाठी त्यांचे काल येथे क्रमानें नमूद करितो,

### आधारग्रंथांचा कालनिर्णय

उत्तर पेशवाईतले

| | शके |
|---|---|
| १ रायरीबखर<br>२ एक्याणव कलमी बखर | १६८२–९२ |
| ३ तरीख–इ–शिवाजी | १६९२–१७०२ |
| ४ प्रभानवल्ली शकावली | १७२० |
| ५ धडफळे यादी | १७२९ |
| ६ चिटणिशी बखर | १७३२ |
| ७ म. सा. छोटीबखर | १७३९ |
| ८ शिवदिग्विजय | १७४० |

| | | |
|---|---|---|
| ९ नागपू. भोस. बखर | | १७४४ |
| १० छत्र. वंशा. यादी | इंग्रजी आमदानीतील. | १७४४ |
| ११ शिवाजी प्रताप | | १७५१ |
| १२ रामदासी शकावली | | १७५३ |
| १३ विजयदुर्गाची हकीकत | | १७५७ |
| १४ पतप्रतिनिधीची बखर | | १७६६ |
| १५ पंडितरावांची बखर | | १७७० |
| १६ शेडगांवकर बखर | | १७७६ |
| १७ भिडे याचा इतिहास | | १७८८ |

वरील यादींत दिलेले बहुतेक काल ज्या त्या ग्रंथांत शेवटी दिले आहेत. तेव्हां ते वादग्रस्त नाहीत. पण तीन चार ग्रथाचे काल कसे ठरविले ते येथे सांगितले पाहिजे.

शिवदिग्विजय हा ग्रथ शके १६४० मध्ये लिहिला असे त्या ग्रंथात म्हटलें आहे. पण ते चुकीचे असून त्याचा खरा शक १७४० हा आहे; ही गोष्ट कै० ज्योतिर्विद शंकर बाळकृष्ण दीक्षित यानी दाखवून दिली होती व राजवाडे यानी चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेत (पृ. १३) यास मान्यता दिली आहे. सबब येथे जास्त विवेचन नको.

'एक्याणव कलमी बखर,' 'रायरीबखर' व 'तरीख–इ–शिवाजी' या तीनहि-बखरी जवळ जवळ एकच आहेत हे त्या एकमेकीशी ताडून पाहणारास सहज दिसून येईल. त्या शिवकालीन आहेत असा कित्येकाचा समज आहे पण तो चुकीचा आहे. कारण या तीनही बखरीतून व्यंकोजीच्या दोन मुलाचा निर्वंश होऊन तिसऱ्याचा म्हणजे तुकोजीचा वश 'हाली असे' बखरकारांनी स्पष्टच म्हटले आहे; व त्यावरून या बखरी पेशवाईतल्या आहेत याबद्दल सशयास जागाच रहात नाही.

'तरीख इ-शिवाजी' ही बखर फारशी असली तरी ती मराठी बखरीचें भाषांतर आहे व त्यातहि वरील उल्लेख आहे (The first two died without issue, but Tukoji had a son whose descendants are still reigning at Tanjore); यावरून याचा रचनाकाल सवाई माधवरावाच्या वेळचा असला पाहिजे असें ठरतें.

विश्वसनीयतेच्या दृष्टीनेहि हा फारशी ग्रथ महत्त्वाचा नाहीं; त्यांत भाकडकथाच फार आहेत, ही गोष्ट या बखरीचे पुरस्कर्ते प्रो. यदुनाथ सरकार यांच्या शब्दांत अशी सांगता येते:

" Legends abound, no critical spirit or sense of proportion is shown in the narrative. " " From internal evidence

I conclude that it is a translation from Marathi Sources and was composed about 1780."

Modern Review Janu. 1910.

बर्जेस शकावलीतील मराठ्यांच्या इतिहासांतल्या मित्या ग्रँट् डफच्या ग्रंथावरून घेतलेल्या आहेत; व ग्रँट् डफनें या बाबतीत चिटणिसांचा आधार घेतला आहे. त्याअर्थी चिटणिसांचा ग्रथ जमेस धरला म्हणजे तदनुयायी इतर ग्रंथांचा स्वतंत्र विचार करण्याचे कारण नाही.

अशा रीतीनें आक्षेपकाचे कांही साक्षीदार उत्तर पेशवाईंतले व बाकीचे (२० पैकी १३ ) तर इंग्रजी अमदानीतले आहेत; त्या अर्थी दीड दोनशे वर्षांपूर्वींची हकीकत सागतांना त्यांच्या हातून पुष्कळ चुका झाल्या यात नवल कसले?

**६ गणिताची कसोटी**.—तिथिनिर्णयाच्या कामी कोणती कसोटी योजावी, हे रा. राजवाडे यांनी चौथ्या खडाच्या प्रस्तावनेंत सांगितले आहे व त्या कसोटीची युक्तता कै. लोकमान्यांनी सदर ग्रंथाच्या परीक्षण प्रसगीं मान्य केली आहे. ती अशी "कालनिर्णयाच्या कामी शक, संवत्सर, महिना, तिथि, वार, नक्षत्र, करण इत्यादि जास्त जास्त तपशीलवार माहिती जर कोणी दिली असेल व ती गणितानें खरी ठरत असेल तर तीच तिथि खरी व विश्वसनीय मानणें अधिक न्याय्य व समजस आहे." (पृ ७ पहा). आणि या कसोटीवर त्या वेळी उपलब्ध असलेल्या चौदा आधारातील मित्या तपासून "तीथ आहे तर वार नाही आणि वार आहे तर नक्षत्र नाही; आणि तीथवार जुळला तर साल जुळत नाही, अशी स्थिति हल्ली उपलब्ध असलेल्या लेखावरून निष्पन्न होते" असा निर्णय तेव्हाच लोकमान्यानी दिला होता ( पृ. ९ पहा.)

हीच गोष्ट स्पष्ट होण्याकरितां, आक्षेपकांच्या सत्राहि साक्षीदारांचें म्हणणें व त्याचें उत्तर येथे देऊन ठेवतों. त्यावरून त्याच्या विधानांतील विसंगतपणा सहज लक्षांत येण्याजोगा आहे. हा विसंगतपणा ओळखण्यास शके १५४९ ला प्रभव संवत्सर होता व त्या वर्षी वैशाख शुद्ध द्वितीयेस शनवार असून भरणी नक्षत्र होतें, आणि पंचमीस मंगळवारीं आर्द्रा नक्षत्र होतें (पृ. ७ पहा) हे विसरता कामा नये.

| **बखरींतील विधान** | **उत्तर** |
|---|---|
| १ रायरी बखर—(फॉरेस्ट प्रत). राजवाडे प्रत शके **१५४८** **१५४८ क्षय** वेशाख शु. ५ **चंद्रवार** | १ शक, संवत्सर व वार तीनहि चुकीचे आहेत. |
| २ एक्याण्णव कलमी बखर ( भा व. ) **१५५९ क्षय** वै. शु. ५ **सोमवार**. | २ शक, संवत्सर व वार तीनहि चुकीचे आहेत. |

| | |
|---|---|
| ३ तरीख-इ-शिवाजी<br>शके १५४९ **क्षय** ( किंवा **जय** )<br>**वै**. शु. ५ | ३ संवत्सर चूक; वार दिला नाही. |
| ४ प्रभानवल्ली शकावली.<br>**१५४९ विभव** | ४ संवत्सर चूक; महिना, तिथी व वार दिला नाहीं. |
| ५ धडफळे यादी.<br>१५४९ प्रभव वै. शु. | ५ वार व तिथी दिली नाही. |
| ६ चिटणीशी बखर.<br>१५४९ प्रभव वै. शु. २ **गुरुवार**. | ६ तिथीचा वाराशी मेळ नाही. |
| ७ रामदास शकावली.<br>१५४९ शके | ७ संवत्सर, महिना, तिथी व वार ह्यापैकी कांहीं दिलेले नाही. |
| ८ शिवदिग्विजय.<br>१५४९ प्रभव वैशा. शु. २<br>**गुरुवार रोहिणी** | ८ तिथी, वार व नक्षत्र याचा मेळ नाहीं. |
| ९ नागपूरकर भोसल्यांची बखर<br>१५४९ प्रभव वै. शु. २ **गुरुवार** | ९ तिथीवारांचा मेळ नाही. |
| १० छत्रपतींची वंशावलीबद्ध यादी.<br>१५४९ वै. शु. ५ | १० संवत्सर व वार दिला नाही. |
| ११ शिवाजीप्रताप<br>१५४९ **रक्ताक्षि** | ११ संवत्सर चुकला. इतर तपशील कांहीच नाही. |
| १२ म. सा. छोटी बखर.<br>१५४९ **क्षय** वै. शु. ५ **चंद्रवार** | १२ संवत्सर व वार चूक. |
| १३ विजयदुर्गाची हकीकत.<br>**समान अशरीन अलफ**,<br>**१५४९** प्रभव वैशाख **बहुल २** | १३ सुहूर सन व पक्ष चुकला. वार दिला नाही. |
| १४ पंतप्रतिनिधींची बखर<br>१५४९ प्रभव वैशा. शु. १५<br>**चंद्रवार** | १४ तिथी व वार चूक. |
| १५ पंडितरावांची बखर. | १५ महिना, तिथी व वार दिले नाहीत. |

| | |
|---|---|
| १६ शेडगावकर बखर. १५४९ प्रभव वैशाख शु. ३ **शनिवार रोहिणी कर्क लग्न.** | १६ तिथिवाराचा व नक्षत्र लग्नाचा मेळ नाही. |
| १७ भिडे याचा इतिहास. १५४९ वै. शु. ३ शनिवार. | १७ तिथिवारांचा मेळ नाही. |

---

यावरून सत्राहि साक्षीदारांचें लिहिणे कालनिर्णयाच्या कसोटीस कसें उतरत नाही हे स्पष्ट होईल. 'शक–संवत्सर–तिथी–वार–नक्षत्र वगैरे तपशीलवार माहिती दिलेली असावी व ती गणितानें खरी ठरावी,' ही कसोटी लावण्याचा हेतु असा असतो की, तत्कालीन अस्सल नोंद पहाण्यास मिळाल्यावाचून हा तपशील बिनचूक देता येत नाही; आणि तत्कालीन नोंद न पाहतां अनुमान धक्क्याने अगर कर्णोपकर्णी मिळालेल्या माहितीवरून तपशील देणाऱ्यांच्या लिहिण्यात विसंगति आल्यावाचून रहात नाही त्यांतून आमच्या परंपरागत पद्धतीत शक आंकड्यात तर संवत्सराचे नाव अक्षरीं; आणि तिथी आकड्यांत तर वार अक्षरात लिहिण्याचा प्रघात असल्यामुळे अस्सल कागदाच्या आधारे कोण लिहितो व तर्काने कोण लिहितो याची परीक्षा तिथिवाराच्या मेळावरून अगर बिनमेळावरून तत्काळ करता येते. हुंडीत ज्याप्रमाणें आकड्यानी व अक्षरानी सागितलेली रक्कम तंतोतंत एक असली पाहिजे; आणि त्यात फरक असला तर हुंडी अग्राह्य ठरते, तोच प्रकार तिथिवाराच्या नोंदीसंबधाने आहे हे लक्षांत ठेवले असता सर्वहि बखरकाराच्या लिहिण्यांत " वदतो व्याघात" आहे व त्यामुळे त्यांचे लिहिणें '**पांडव किती ? तर बाजल्याच्या खुराइतके तीन–दोन–एक**' असें म्हणणाऱ्याच्या विधानाप्रमाणें अविश्वसनीय आहे हे विस्ताराने सागण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणें जेधे शकावली व शिवभारत यांतील शिवजन्मतिथीचे उल्लेख तपशीलवार असून गणिताच्या कसोटीस उतरणारे आहेत यावरून ते तत्कालीन अस्सल कागदांच्या आधारानें लिहिले असले पाहिजेत हेंहि आपोआप ठरत आहे.

वरील सत्रा साक्षीदारांच्या लिहिण्यावरून तिथीनिर्णय होण्याऐवजीं घोटाळा मात्र उत्पन्न होतो; कारण पांच साक्षीदार पचमी देतात; तिघे द्वितीया देतात; दोघे तृतीया देतात, एक जण पौर्णिमा व दुसरा एक वद्य द्वितीया देतो आणि पांच जण तिथीच देत नाहीत ! यामुळे द्वितीया, तृतीया, पंचमी, पौर्णिमा व वद्य २ यांतून कशाची निवड करावी हे ठरविणे दुरापास्त आहे. संवत्सराच्या बाबतीत सहा बखरीत सवत्सर व शक यांचा बिलकुल मेळ नाही; म्हणजे संवत्सर खरा धरल्यास शकाचा आंकडा चुकतो आणि शकाचा आंकडा खरा धरल्यास संवत्सराचें

नांव चुकतें ! याच ठिकाणीं नकलकाराच्या हातून लेखप्रमाद झाला असे म्हणाव तर तेहि संभवत नाहीं; कारण सत्रापैकीं एकाच्याहि लिहिण्यांत शुद्धता नाही! आणि इतर प्रसंगांचे बखरीतले शकहि किती बिसंगत आहेत याचे विस्तृत विवेचन रा. शकरराव जोशी यांच्या निबंधांत (पृ. १९७–२१९ ) आले आहे त्यावरून तिथिनिर्णयाच्या कामी वरील साक्षीदार केवळ कुचकामाचे आहेत हेच ठरतें.

**७ शिवकालीन शकावल्या**—येथे दिलेल्या सहा शकावल्या व अठराव्या खंडांतील एक आणि फोर्ब्‌स कलेक्शनमधील एक, मिळून आठ शकावल्या शिव-कालीन मित्याचा निर्णय करण्यास उपयोगी पडण्याजोग्या उपलब्ध झालेल्या आहेत. त्या सर्व शकावल्यांतून शिवजन्मतिथि दिलेली आहे असे नव्हे; पण हस्तदोष पाहण्यास, पाठातराची शुद्धाशुद्धता ठरविण्यास आणि एकंदरीत शिव-कालीन मित्यांचा विचार करण्यास जितक्या जास्त शकावल्या मिळतील तितक्या मिळवून त्या एकमेकीशी ताडून पाहिल्या पाहिजेत. कालिदासादि कवीचे ग्रथ छापताना असेच अनेक पाठभेद तपासून व्याकरणदृष्टचा व सदर्भदृष्टचा शुद्ध पाठ कोणता याचा निर्णय करतात ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. तोच न्याय प्रस्तुतच्या शकावल्यांना लावून संदर्भ व गणित याच्या साह्याने हस्तदोष निवडून काढून शुद्धपाठ ठरविले पाहिजेत. ही शुद्धता साधण्याची पद्धत सागण्यापूर्वी प्रथम शकावलींची नावें व त्याचा मूळ लेखनाचा काल नमूद केला पाहिजे. नावें दोन पद्धतींनीं देतां येतील :

(१) त्यांच्या रचनाकालावरून; किंवा (२) संग्राहकाच्या नावावरून. यथे सुबोधतेसाठी फक्त एकेकच नांव देऊन ठेवतो.

(१) **शाहाजीकालीन** शकावली (पृ. ७०)

(२) **राज्याभिषेक** शकावली (पृ. ५३–६५)

(३) होनप देशपांडे शकावली (खड १८ पृ. १३–१६)

(४) फोर्ब्‌स अथवा शिवापूरकर वहींतील शकावली.

(५) शिवनिधन शकावली (पृ ५०–५३)

(६) दासपंचायतन शकावली (पृ. ७०)

(७) राजारामकालीन अथवा जेधे शकावली (पृ. १५–३९)

(८) संपूर्ण शिवकालीन शकावली (पृ. ६६–६९)

शकावल्यांचा रचनाकाल ठरविण्यास उत्तम गमक म्हणजे त्यांतली काल-दृष्टचा शेवटली नोंद. त्या नोंदीवरून शकावलीच्या रचनाकालाची पूर्वमर्यादा ठरते; म्हणजे त्या नोंदीपूर्वी ही शकावली रचली गेली नाही असें निश्चितपणें म्हणतां येतें. पण शेवटल्या नोंदीनतर किती वर्षांनें शकावली लिहिली गेली,

याविषयीं म्हणजे तिच्या रचनाकालाची, उत्तर मर्यादा ठरविणें पुष्कळ वेळां अशक्य असतें. तथापि शकावली रचणारे साधारणपणें आपल्या वेळेपर्यंतच्या गोष्टी नमूद करीत, असे धरून चालण्यास हरकत नाही.

नकलेविषयीं मात्र असें म्हणता येणार नाही. मूळ शकावलीत ज्या शका-पर्यंतच्या नोंदी असतील तितक्याच लिहून काढण्यासाठी नक्कल करावयाची असल्यामुळें नकलेचा लेखनकाल व नकलेतील शेवटची नोद यांत कितीहि वर्षांचे अतर असू शकतें. आणि नकलेचा काल अक्षराच्या वळणावरून व अवांतर पुराव्या-वरून ठरवावा लागतो. उदाहरणार्थ–राज्याभिषेक शकावली शके १५९६ च्या सुमारास रचली गेली. कारण त्यात तेथपर्यंतचेच शक दिले आहेत, पण तिच्या तीन नकला उपलब्ध असून त्या नकलांचे काल निरनिराळे आहेत, हें त्यांच्या अक्षरावरून व शब्दाच्या बारीकसारीक बदलावरून ठरतें. यापैकी अठराव्या खंडांत राजवाडे यानीं होनप देशपाड यांच्या कागदांत छापलेली शकावलीची प्रत अगदी जुनी आहे, हे तिच्या भाषेवरून निश्चित होते पण फोर्ब्‌स कलेक्शन मधली प्रत इंग्रजी अमलांतली आहे हे अक्षराच्या वळणावरून ठरवितां येतें. सारांश, नकलेचा काल ठरविण्याची कसोटी रचनाकालाच्या कसोटीहून निराळी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

आणखी एका किरकोळ (परतु प्रस्तुत प्रश्नाशी निकट संबंध असलेल्या अशा) बाबीचा म्हणजे जुन्या पद्धतीचा उल्लेख केला पाहिजे. पेशवाईंत किंवा त्याही पूर्वीच्या काळात अनेक घराण्यांत बाडे लिहविण्याची पद्धति होती. या बाडांत काव्यांचा अगर शकावल्यांचा सग्रह असे. काव्याच्या बाडात ज्याप्रमाणें ज्ञानेश्वरापासून अनंतफदीपर्यंतच्या अनेक कवींनी केलेल्या पद्यांचा संग्रह असे, त्याचप्रमाणें ऐतिहासिक बाडांची स्थिति असे. उदाहरणार्थ–फोर्ब्‌स कलेक्शनमध्यें म्हणजे शिवापूरकरांच्या बाडांत अनेक शकावल्याचा व ऐतिहासिक टिपणांचा एकत्र सग्रह केलेला आहे. त्यावरून त्या शकावल्यांचा, टिपणांचा नकलकाल अक्षर वळणावरून निश्चित होईल; पण त्या सर्वांचा रचनाकाल एकच आहे असें म्हणतां येणार नाही. रचनाकाल ठरविण्यास त्यांत एक शकावली सपून दुसरी शकावली कोठें सुरू होते, हें आधी निश्चित करून प्रत्येक शकावलीचा स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे. एरव्ही त्यांतील भाग विश्वसनीय कोणता व अविश्वसनीय कोणता याची शहानिशा करतां येणार नाही. अशा प्रसंगीं 'सरसकट बारा टक्के' या न्यायानें त्या बाडांतील १५४९ व १५५१ शकांतले उल्लेख पाहून त्यात बहुमत कोणत्या शकाचें आहे एवढेच पाहून निर्णय देणें न्यायाचें ठरत नाही. फोर्ब्‌स कलेक्शनमधील राज्याभिषेक–शकावली संबंधानें विचार करताना तर आणखी एक विशेष आहे तो असा की, या शकावलीची

स्वतंत्र व जुनी प्रत उपलब्ध असून ती १८ व्या खंडांत छापलेली आहे. तेव्हां बाडांत या शकावलीचा प्रारंभ व शेवट कोठे समजावा, हे ओळखण्यास कांहीच अडचण पडण्यासारखी नाही.

**८ शकावल्यांचा रचनाकाल**--आपल्या पुढे आलेलीं शकावली प्रथम केव्हां लिहिली गेली म्हणजे तिचा रचनाकाल कोणता हें निश्चित करण्यास माझ्या मते, असे नियम सागता येतात. त्यात शाहूच्या आगमनापर्यंतचा 'शिवकाल' नंतर 'इंग्रजी' सुरू होईपर्यंत 'पेशवाई' अशी परिभाषा गृहीत धरली आहे.

१ शिवकालीन शकावलींतले सर्व शक शाहूच्या आगमनकालापूर्वीचे असले पाहिजेत.

२ पेशवाईतला अगर इग्रजीतला उल्लेख त्यात एकहि नसावा.

३ तिथि-वार-नक्षत्रापर्यंतची जास्तीत जास्त सूक्ष्म माहिती देणारे कांहीं तरी उल्लेख तिच्यांत असावे व गणितदृष्टया ते बिनचूक असावे.

४ त्यांतील मित्यांची संख्या भरपूर मोठी असावी [ कारण समकालीन लेखकाला पुष्कळ मित्या देणें सुलभ असते ].

५ अस्सल पत्रें, समकालीन व विश्वसनीय तवारिखा किंवा हकीकती यांवरून निश्चित झालेल्या मित्याचा या शकावलीतील नोंदीशी मेळ असावा.

हे पांच नियम लावून पाहिलें असता विशिष्ट शकावली शिवकालीन आहे किंवा नाही हे निश्चित करता येते. उदाहरणार्थ, जेधे शकावलीतले

१ सर्व शक १६१९ पर्यंतचेच आहेत.

२ पेशवाईतला अगर इग्रजीतला उल्लेख तिच्यांत एकहि नाही.

३ तिथि-वार-नक्षत्रापर्यंतची सूक्ष्म माहिती देणारे उल्लेख आहेत.

४ उल्लेखांची संख्या भरपूर मोठी म्हणजे २२१ आहे.

५ प्रत्यंतर पुराव्याने ठिकठिकाणच्या नोंदी खऱ्या ठरल्या आहेत [ त्याचीं उदाहरणें पुढे दिली आहेत ].

राज्याभिषेक शकावली व शिवनिधन शकावली वगैरेना देखील हे नियम पूर्णपणें लागू पडतात हे रा. शंकरराव जोशी यांनीं विस्तरशः दाखविले आहे. [ पृ. १९९ ] याकरितां त्याची पुनरावृत्ति करण्याचे कारण नाही.

प्रभानवल्ली, रामदासी व धडफे यांच्या शकावल्या जेधे शकावलीच्या तोडीच्या किंबहुना कांकणभर अधिक विश्वसनीय म्हणून आक्षेपकांनी म्हटलें आहे. पण तें बरोबर नाही याचें कारण

१ त्यांत इंग्रजींतले व पेशवाईतले शकच मुख्यत: दिले आहेत;

२ जन्म, राज्याभिषेक व मृत्यु या मामुली प्रसंगाखेरीज शिवचरित्रांतले प्रसंग त्यांत दिलेले नाहींत;

३ सूक्ष्म माहित्या देणाऱ्या मित्या त्यांत नाहीत;

४ मामुली प्रसंगापलीकडचे शिवचरित्रांतील उल्लेख नाहीत;

५ इतर नोंदीच नसल्यामुळे प्रत्यंतर पुरावा पाहण्याचें कारणच रहात नाहीं.

या शकावलीतील प्रसगाचे वर्गीकरण पृ. २१५–२१७ वर आहे. तें पाहिलें असतां वरील विधानांची सत्यता पटण्याजोगी आहे.

**९ विश्वसनीय व अविश्वसनीय भागांची निवड**—विशिष्ट शकावली शिवकालीन आहे असे ठरले तरी तिच्यांतील प्रत्येक उल्लेख विश्वसनीय आहे असें म्हणतां येणार नाहीं, ही गोष्ट खरी आहे. त्यांतले प्रत्येक वाक्य वेदवाक्या-माणें सश्रद्ध अंत:करणानें प्रमाण मानावें; त्याविरुद्ध शंकाहि घेऊ नये, असा आग्रह धरणें रास्त नाही. जेधे शकावली ही जेधे घराण्यांतल्या पुरुषाने राजा-रामाच्या कारकीर्दींत व राज्याभिषेक शकावली होनप-देशपांडे घराण्यांतील पुरुषानें शके १५९६ च्या सुमारास लिहिली, हे लक्षांत ठेवले असतां त्यांत विश्वसनीयतेच्या दृष्टीनें तरतमभागाची निवड कशी करावी हे सहज समजण्या-जोगें आहे. शिवचरित्रांतील व त्यापूर्वीच्याहि महत्त्वाच्या गोष्टीचे टिपण काला-नुक्रमें तयार करून त्यांत आपल्या व आपल्या माहितीच्या इतर घराण्यांतील पुरुषांनी काय भाग घेतला हे त्या टिपणात ठिकठिकाणी नमूद करून ठेवावें, हा या शकावल्या लिहिणाराचा स्पष्ट हेतु आहे. पैकीं शिवचरित्रांतले उल्लेख लेखकांनी सरकारी दप्तरांतील अगर अधिकाऱ्याच्या सग्रहातील टिपणांवरून लिहून घेतले आणि घराण्याच्या कर्तबगारीचे उल्लेख घरच्या दप्तरावरून नमूद केले; या खेरीज काही शिवपूर्वकालीन मुसलमानी अमदानीतल्या घडा-मोडीचे उल्लेख हिजरी अगर सुहुर सन देणाऱ्या फारशी कागदावरून शकांत रूपांतर करून दिले. तेव्हां शिवकालीन शकावल्यांतील उल्लेखाचे मुख्य तीन वर्ग पडतात ते असे:—

१ शिवपूर्वकालीन मुसलमानाच्या अमदानीतले व त्यांच्याच हालचाली संबंधींचे उल्लेख; २ शिवचरित्रविषयक उल्लेख; आणि ३ विशिष्ट घराण्या-संबंधीचे उल्लेख. पैकी पहिल्या वर्गांतले उल्लेख पूर्णपणें विश्वसनीय मानतां येत नाहींत; कारण ते ज्या प्रसंगासंबधीचे आहेत ते प्रसग शिवशाहीतले नव्हेत; त्या अर्थी त्या विषयीचे कागद शिवशाहींतील सरकारी दप्तरांत होते असें

निश्चयानें म्हणवत नाहीं; इतकेंच नव्हे तर, मूळ तत्कालीन कागदांतल्या मुसलमानी सनांचे व तारखांचें रूपांतर शालिवाहन शकांत व महिन्यांत बिनचूक केलें असेल असेंही गृहीत धरण्याचें कारण नाही. त्यांतून हे काम त्या वेळच्या जाणत्या अधिकाऱ्यानी केले आहे असे म्हणता आले असते तर गोष्ट निराळी होती; पण या शकावल्या विशिष्ट घराण्यांतील पुरुषांनी तयार केल्या, हे निश्चित असल्यामुळे त्यांतील निजामशाही अमदानीतले जुन्या काळचे मुसलमानी उल्लेख बिनचूक स्वरूपांत आपणापुढे आले आहेत असें म्हणवत नाहीं. त्याअर्थी अस्सल मुसलमानी प्रत्यतर पुरावा या जागीं क्वचित अधिक ग्राह्य मानावा लागेल.

२ शिवशाहीतले उल्लेख समकालीन सरकारी कागदपत्रांधारे केले असल्या-मुळें विश्वसनीय मानले पाहिजेत.

३ घराण्याचे उल्लेखहि विश्वसनीय मानले पाहिजेत; पण कांही ठिकाणीं आपली अगर आपल्या पूर्वजाची कामगिरी तिखटमीठ लावून सजवून सांगितली असण्याचाहि संभव आहे.

**१० शकावल्यांतील चुका**—विश्वसनीयतेच्या दृष्टीनें कमी अधिक महत्त्वाचा भाग कोणता, याची निवड केल्यानंतरहि उपलब्ध शकावऱ्यांतून कांहीं चुका आढळतात त्यांचें स्पष्टीकरण केलें पाहिजे या चुकापैकी काहीं नकल-कारांच्या हातून निर्माण झाल्या आहेत व कांही चुका आहेतशा वाटतात, पण त्या तशा नसून निरनिराळ्या कालगणना पद्धतीचा हा परिणाम आहे. पुढें दिलेल्या उदाहरणांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल—

प्रथम नकलकाराच्या हातून झालेल्या चुकाचे प्रकार व त्या दुरुस्त कर-ण्याचे मार्ग नमूद करतो:—

१ मोडी वाचनाच्या व लेखनाच्या चुका; या, अर्थानुरोधाने व इतर प्रतीशी ताडून शुद्ध कराव्या. उदाहरणार्थ पृ. ५४ वर 'बेनिकटकरून' त्या ऐवजीं 'दोनी कटकें' (पृ १६) असें पाहिजे; व पृ. ५४ वर १५५० शकाच्या पोटशी 'हमुम' आहे तेथे 'दिलीस' असें पाहिजे; पृ. ५४ पासून ६४ पर्यंत जाडया टइपांत दिलेला मजकूर जेत्रे शकावलीतील मजकुराशीं ताडून पाहिला असता नकलकारांच्या हातून झालेल्या अनेक चुकांची यादी तयार करतां येईल.

२ एखादें अक्षर, शब्द अगर सबंध ओळ गळणें; याची दुरुस्ती गळलेला भाग देणाऱ्या प्रतीवरूनच केली पाहिजे. उदाहरणार्थ—जेधे शकावलीतील शके १६०० च्या पोटशी महिना व तिथि न देतां "बुधवारी रात्री २०।४४ श्रृंगारपुरी भवानीबाई लेक सभाजी राजे यासी जाली" असे वाक्य ऐते; तें नीट उलगडत

नव्हतें; पण पुरंदरे संग्रहांतली "संपूर्ण शिवकालीन शकावली" पहाण्यास मिळाल्यामुळें 'भाद्रपद वद्य१४' हे शब्द 'बुधवारीं' याच्या पूर्वी मूळांत होतें असें ठरतें; व त्या वर्षी भाद्रपद वद्य १४स बुधवार असल्यामुळें गणिताचाहि पडताळा बरोबर जमतो. शकेस जागा रहात नाहीं.

३ 'शुद्ध'च्या जागी 'वद्य' अक्षरे पडणे. अशा ठिकाणी गणितानें खरा पाठ ठरवितां येतो उदाहरणार्थ, दिलेरखानाने भूपाळगड घेतला तो शके १६०१ वैशाख 'सुध २' गुरुवारी (पृ. २९) असे जेधे शकावलींत व वद्य द्वितीयेस असें शिवनिधन शकावलीत [पृ. ५३] आहे. पैकी 'वद्य' द्वितीयेचा गणिताशीं मेळ आहे याकरिता तो पाठ खरा धरला पाहिजे.

४ एका शकांतील नोंद चुकून वरच्या किंवा खालच्या शकांत लिहिली जाणे. ही चूक नकलकाराच्या किंवा मूळ लेखकाच्याहि हातून सुहूरसनाचा शक करताना होणे शक्य आहे. जेधे शकावली व गदाधर प्रल्हाद म्हणजे संपूर्ण शिवकालीन शकावली [पृ. ६५] याच्या हस्तलिखित प्रती ताडून पाहण्याने अशा चुकीचें उत्तम प्रत्यतर पहाण्यास मिळण्याजोगे आहे. उदाहरणार्थ, जेधे शकावली शके १६०३ च्या पोटशीं असलेली डावीकडचीं पहिली दोन कलमें [पृ. ३१ पहा दुसऱ्या शकावलीत प्रथम शके १६०२ च्या पोटशीं लिहिलीं गेली होतीं; आणि मागाहून ती खोडून लेखकाने १६०३ मध्यें पुन: लिहिलीं आहेत. ही उलथापालथ नकलकाराच्या हातून होऊं शकेल किंवा सुहूरसनाचा शालिवाहन शक करताना मूळ शकावलीकारांच्याहि हातून होऊं शकेल; याचें कारण सुहुरसन ज्येष्ठांत सुरू होतो व शालिवाहन शक चैत्रात होतो. अशा रीतीनें नोंदीची उलथापालथ झाली असेल व तेथे वार दिलेला असेल तर तिथिवाराचा मेळ पाहून त्या नोंदीचा खरा शक जंत्रीवरून तत्काळ ठरविता येतो. कारण, ही उलथापालथ फार तर एखादे घर मागे पुढें इतकीच असते; आणि ती दुरुस्त करणें मुळीच कठीण नाही. जिवंत शरिरातील हाड ज्याप्रमाणें योग्य ठिकाणाहून किंचित् जरी हलविले गेले तरी ते नव्या जागी खुपतें व थोडीशी चाळवाचाळव केली असतां आपल्या योग्य जागी नेमके बसते, त्याचप्रमाणें वारापर्यंत सूक्ष्म माहिती देणाऱ्या शकावलीतील नोदीत चूक झाल्यास ती जंत्रीच्या सहाय्याने सहज दुरुस्त करतां येते.×

---

×या ठिकाणी शिवजन्मतिथीच्या नोंदीतही अशीच उसकटाउसकट झाली नसेल कशावरून, अशी शंका येण्याचा संभव आहे पण त्याचे उत्तर असें आहे की, श. १५५१ च्या फाल्गुन कृ ३ ला शुक्रवाराचा मेळ बसतो हें गणितानें ठरलें म्हणजे त्याच्या मागल्या अगर पुढल्या (१५५० अगर १५५२)

पुढील पानावर

वरे दिलेले चार नियम लक्षांत ठेवून तपासणी केली असतां आक्षेपकांनीं दाखविलेल्या जेधे शकावलीतील चुका (एकदोन अपवाद सोडून) मूळ लेखकाच्या नसून, ते हस्तदोष आहेत अशी कोणाचीहि खात्री होईल व खरा पाठभेद ठरविण्याच्या सर्वमान्य पद्धतीनें या शंकाचें निराकरण करता येतें;* ते असें:—

**आक्षेप**:—जेधे शकावलीतील जिजाबाईसाहेबाच्या मरणाचा महिना चुकीचा आहे.

**उत्तर**:— जिजाबाईच्या मृत्यूची तीथ '१५९६ ज्येष्ठ वा॥ ९' ही गोष्ट शिवनिधनशकावलीत बिनचूक आहेच [पृ. ५२ पहा]. पण या नोंदीतील 'ज्येष्ठ' शब्द गाळून राज्याभिषेक शकावली-काराने मोघम 'वा॥ ९ बुधवारी' असे लिहून तो मजकूर 'चै. वा॥ १४ राज्याने केलंजा घेतला' या मजकुराशी जोडून लिहिला [पृ. ६४ पहा]; आणि जेधे शकावलीत मोघम 'वद्य ९' च्या मागें महिना पाहिजे या कल्पनेने मागल्या वाक्यावरून 'चैत्र' शब्द घातला [गेला. अशा रीतीने मूळचा 'ज्येष्ठ' एका प्रतीत गळून दुसऱ्या प्रतीत ज्येष्ठच्या जागी चैत्र कसा आला याचा थांग क्रमाने लावतां येतो; आणि ज्येष्ठ वा॥ ९ स बुधवार, जंत्रीत, त्या वर्षी असल्यामुळे 'खरा पाठ' निश्चित होतो.

**आ०** :–जेध्यांची राज्याभिषेकाची तिथि चुकीची आहे.

---

मागील पानावरुन

वर्षीच्या फाल्गुन कृ. ३ ला शुक्रवार येऊं शकत नाही असा आपल्या पचांग-गणितपद्धतीचा नियम ठरलेला आहे. यामुळे अशी चूक कोठे झाली आहे हे जसें जंत्रीने निश्चित होते तसेंच कोठे चूक झालेली नाही, हेंहि जंत्रीने तितक्याच निश्चयानें ठरविता येते. यासंबधी कै शकर बाळकृष्ण दीक्षित यांनी Indian Calendar पृ. १५५ वर नियम दिला आहे तो हा आहे.

According to Hindoo Astronomy a tithi of a bright or dark fortnight of a month never stands at sunrise on the same week day more than once in three consecutive years. For instance if Chaitra sukla pratipada stands at sunrise on a Sunday in one year, it cannot stand at sunrise on Sunday in the year next preceding or next following.

* जेधे शकावलीतील तिथीवरील आक्षेप रा दा. ना. आपटे यांनी २१ एप्रील १९२५ च्या केसरीत मांडले व त्याचीं उत्तरें रा. वा. सी. बेंद्रे यांनी २६ मे १९२५ च्या अंकांत दिलीं.

उ० :—चुकीची नाही. उलट इतरत्र कोठेंहि नसलेली अशी घटी पळांसुद्धा अत्यंत सूक्ष्म रीतीची राज्याभिषेकाची तिथि या शकावलींत दिली आहे. राज्याभिषेकाचा मुहूर्त तीन घटका रात्र उरली होती तेव्हां म्हणजे शुक्रवारी रात्री व उजाडत्या शनिवारी धरला व शुक्रवारीं द्वादशी २१ घटका होती व नंतर ज्येष्ठ शु. १३ लागली; आणि त्रयोदशी साधून शनवारचा दोष टाळण्यासाठी सूर्योदयापूर्वीचा मुहूर्त साधला वगैरे माहिती या शकावलीच्या सहाय्याने मिळते व इतकी सूक्ष्म माहिती देणाऱ्यास राज्याभिषेक-कालीन अस्सल कागद मिळाले असले पाहिजेत अशी आपली खात्री होते.

आ० :—शके १५८२ माघ शु. १४ स शकावलीत मंगळवार आहे तो चुकीचा आहे. त्या दिवशी शनवार येतो [पृ. २१]

उ० :—या ठिकाणची जेधे शकावलीतली नोंद चुकली आहे व तेथें 'पौष' पाहिजे अशी दुरुस्ती दुसऱ्या शकावलीत दिली आहे [पृ. ५८ पहा].

आ० :—' १५८५ माघ शु. ६ शनिवारी शहाजी राजे परलोकवासी गेले. या ठिकाणी ' रविवार ' पाहिजे. [पृ. २२ पहा]

उ० :—' शनवार हेच बरोबर आहे. शनिवारी पंचमी २२ घटका होती, नंतर षष्ठी लागली आणि शहाजीचा मृत्यु षष्ठी लागल्यानंतर सायंकाळच्या सुमारास झाला. त्यामुळे श्राद्धाच्या दृष्टीनें 'षष्ठी' आणि सूर्योदयकालीन तिथिगणनापद्धतीप्रमाणें 'पंचमी' होती' यामुळे 'पचमी' व 'षष्ठी' असे निरनिराळे उल्लेख [पृ. ५१ व ५९ पहा] सांपडतात; पण ते परस्पर विरोधी नसून सुसंगत आहेत. पाश्चात्यांच्या वाराचा प्रारंभ मध्यरात्रीं होतो व हिंदूचा सूर्योदया-पासून होतो, यामुळें रात्री बारावर तीन वाजतां घडलेल्या एकाच गोष्टीच्या नोंदीस ज्याप्रमाणें निरनिराळे वार पडू शकतात त्याच-प्रमाणें हा तिथिभेदाचा प्रकार आहे. ही चूक नव्हे.

आ० :—शके १५८६ ज्येष्ठ शु. १४ स सोमवार दिला आहे तो चूक आहे.

उ०—चूक आहे, व तिचें स्पष्टीकरण समजत नाही. पण जसवंतसिंगानें त्या सुमारास कोंडाण्याचा वेढा उठविला हें शकावलींतलें म्हणणें मात्र बरोबर आहे असें मुसलमानी इतिहासाच्या प्रत्यंतरावरून ठरतें.

आ० :—शके १५९८ कार्तिक शु. ६ रविवार आहे तो चूक आहे. [पृ. १२].

उ० :—संभाजी राजे शृंगारपुरास गेले ते कार्तिक शु. ६ रविवारीं गेले. ही नोंद शके १५९८ मधली नसून १५९९ मधली आहे व तेथें तिचा तिथिवाराशीं बरोबर मेळ आहे.

**आ०** :–शके १६०१ वैशाख 'शु.' २ गुरुवारी दिली आहे ती चूक आहे. [पृ. २९ पहा].

**उ०** :—**दिलेरखानानें** भूपाळगड घेतल्याची मिती १६०१ **वैशाख** '**वद्य**' २ अशी दुसऱ्या शकावलीत दिलेली आहे. [पृ. ५३] व 'वद्य' हा पाठ घेतल्याने तिथिवाराचा मेळ बरोबर बसतो; त्या अर्थी जेधे शकावलीत 'वद्य'च्या जागी 'शुद्ध' ही अक्षरें नकलकाराच्या हस्तदोषाने आलीं आहेत.

**आ०** :—शके १६०५ वैशाख वद्य ४स बुधवार दिला आहे तो चूक आहे. (पृ. ३२.)

**उ०** :—ही नोंद १६०६ शकांत पाहिजे व तेथे तिथिवाराचा मेळ बरोबर आहे.

**आ०** :–शके १६११ मार्गशीर्ष शु. २ रविवारी रायगड मोगलास दिला असें आहे. (पृ. ३५) तेथे वाराचा मेळ नाही.

**उ०** :—मेळ आहे तो असा. खरे जंत्रीत रविवारी प्रतिपदा घटका २॥ दिली आहे; ती उज्जनी रेषेची आहे. इतर ठिकाणी स्थलभेदामुळ रेखांतर–संस्कार होऊन व सारणीभेदामुळें, इतक्या घटकापर्यंत अंतर येऊं शकते असे कै. खऱ्यांनीं जंत्रीच्या प्रस्तावनेत सागितलें आहे त्या अर्थी रविवारी सूर्योदयी द्वितीया शक्य आहे. शिवाय जंत्रीप्रमाणे २॥ घटकेनंतर रविवारी देखील द्वितीया आहे त्याअर्थी जेध्याने सूक्ष्म मानाने मिति घातली आहे असें ठरेल.

**आ०** .–जेधे शकावलीत चंद्रराव मोऱ्याच्या वधाची हकीकत नाही.

**उ०** :—जावळी केव्हां घेतली, चंद्रराव किल्ल्याखाली केव्हां उतरले वगैरे तपशील जेधे शकावलीत आहे. (पृ. १८ पहा). चंद्ररावाच्या वधाची मितीहि शकावलीकाराने दिली असती तर बरें झाले असतें हें खरे. पण ती त्यानें दिली नाही म्हणून त्यानें शकावलीत नमूद केलेली माहिती अप्रमाण ठरण्याचें कांहीच कारण नाही. शकावलीत इत्थंभूत शिवचरित्राची नोंद आहे असें कोणाचेंहि म्हणणें नाही; इतरापेक्षां त्यांत माहिती जास्त आहे इतकेंच. त्याअर्थी हा आक्षेप व्यर्थ आहे.

यावरून आक्षेपकांनीं दाखविलेल्या जेधे शकावलीतील चुका व त्यांचें खरें स्वरूप लक्षांत येण्याजोगें आहे. या शकावलीत अंदाजें १६८ नोंदी शिवाजी महाराजांच्या हयातींतल्या असून त्यांत पांच सात हस्तदोष आहेत व ज्यांचें स्पष्टीकरण अद्याप झालें नाही अशा चुका एक किंवा दोनच आहेत. यावरून

या शकावलीची योग्यता कळून येणार आहे. हिच्या मानाने बखरी वगैरे आक्षेपकांचे आधार किती लेचेपेचे आहेत याचें विस्तृत विवेचन रा. जोशी यांनीं याच ग्रंथांत केले असून त्याचा निष्कर्ष " एकदरीत बखरी इत्यादींतील शें-सवाशें सुटया प्रसंगांपकी कालदर्शित प्रसंग ४५ आहेत, त्यापैकी १२ बरोबर ७ अनिर्णीत व २६ चूक असा इत्यर्थ निघतो " ( पृ २०० ) असा आहे. अशा स्थितीत बखरकारांची शिवजन्ममिति खरी व जेधे मिति अविश्वसनीय असा जो पक्ष आक्षेपकानी उभा केला आहे तो मान्य होणें शक्य नाही.

**११ खऱ्या मितीचे आधार**—जेधे शकावलीवरील आक्षेपांचें निरसन केल्यानंतर तेथे दिलेली शिवजन्माची खरी मिति आणखी कोठे सांपडते व ती कोणत्या स्वरूपात सापडते हे नमूद करतो. त्यावरून खरे वर्ष एखाद्या दुसऱ्याच ठिकाणीं सांपडतें ही तक्रार व्यर्थ आहे असें दिसून येईल.

१ **शिवभारत** —नेवासेकर परमानंद कवि यानें केलेला हा संस्कृत शिवचरित्रपर ग्रंथ मालोजीपासून शाग्ताखानाच्या मोहिमेपर्यंतची म्हणजे शके१५८४ पर्यंतची बारकाईची माहिती देतो, यांत भोसले घराण्याचा संबध उदेपूरकराशी जोडलेला नाही, राजधानीचें नांव रायगड न देतां सर्वत्र राजगड असे दिले आहे; शिवकालीन ताम्रपटात येणारा ' भृशबल ' शब्द ' भोसले ' याचा पर्याय म्हणून यांत योजला आहे ,व आपण प्रत्यक्ष शिवाजी महाराजाच्या सांगण्यावरून ग्रंथ करतों असे कवि प्रारभीच म्हणतो; व खळदबेलसरच्या पहिल्याच मोहिमेचा साद्यंत उल्लेख करतो; इत्यादि पुराव्याव न शिवभारत हा ग्रंथ शहाजीच्या मृत्यूनंतर व राज्याभिषेकापूर्वीं लिहिला गेला असे निश्चयानें म्हणतां येते. त्यांतील अनेक प्रसंगांच्या माहितीचा अस्सल पत्रातून मिळणाऱ्या हकीकतीशीं उत्तम मेळ आहे, अशा या विश्वसनीय ग्रथात शिवजन्मतिथि शके १५५१ फाल्गुन वद्य ३ शुक्रवार रात्री अशी दिली आहे (अध्याय ६ श्लोक २६-३१).

२ **राज्याभिषेक शकावली**—हिच्यात शके १५४६ पासून १५९६ पर्यंतच्या नोंदी असून प्रारभी वारापर्यंतचा तपशील देऊन ( पृ. ५४ ) आणि शेवटी नक्षत्र व योगापर्यंतचा तपशील सागून ( पृ. ६५ ) खरी शिवजन्मतिथि दोन वेळीं सांगितली आहे.*

३ **फोर्बस कलेक्शन**—ही राज्याभिषेक शकावली प्रमाणेच आहे.

---

* खंड १८ मधील होनप देशपांडे घराण्यांतील शकावलीचा उपलब्ध भाग राज्याभिषेक शकावलीशी बरोबर जमतो. त्याअर्थी फाटलेल्या भागांत खरी शिवजन्मतिथि होती हें निश्चित होतें.

४ **जेधे शकावली**—ही राजारामाच्या वेळीं लिहिली असून त्यांत शिव-जन्मतिथि जन्मटिपणावरून उतरून घेतली आहे हे स्पष्ट दिसते.

५ **दासपंचायतन शकावली**— प्रस्तुत ग्रंथात पृ. ७० वर दिलेल्या या शकावलींत शिवजन्माचा शक १५५१ असें नमूद आहे.

६ **थेव्हेनोचे प्रवासवृत्त**— हा युरोपियन प्रवासी इ. स १६६६ च्या जानेवारीत सुरतेस आला व तो १६६७ च्या नोव्हेंबरात मरण पावला. त्याची रोजनिशी छापण्यांत आली आहे. शिवाजी महाराजानी सुरत लुटल्यानंतर दीड वर्षांनी तो सुरतेस आला ; व त्याने शिवाजीमहाराजाना समक्ष पाहिलेल्याच्या तोंडून ऐकलेली हकीकत नमूद केली आहे. त्यांत सुरतेच्या लुटीच्या वेळी म्हणजे इ. स. १६६४ मध्ये त्याचे वय ३५ वर्षांचे होतें असे मोघम म्हटले आहे. यांत ३५ वर्षे पुरी की ३५ चालू याचा स्पष्ट खुलासा नाही ; पण त्याला माहिती देणारे हिंदु लोक ३५ चालू अशा अर्थानें बोलले असतील असाच संभव जास्त. याकरिता ३४ वर्षे पुरी अशा अर्थानें इ. स. १६६४–३४ = इ. स. १६३० हें शिवजन्माचें इंग्रजी साल ठरते. तथापि ३५ हा आकडा पुऱ्या वर्षांचा, युरोपियन पद्धतीचा धरला तरीहि १६६४–३५ = १६२९ हे वर्ष येते. महिना माहीत नसतां शके १५५१ चा इंग्रजी सनांत अर्थ केला असता तो १६२९ किंवा १६३० असा येतो; व हे दोनहि प्रकार युरोपियन लेखकांच्या ग्रथांत आहेत.

७ **ऑर्मचा इतिहास**:- Historical Fragments हा ऑर्मचा ग्रथ इ. स. १७८३ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांत त्याने महाराजांचे मृत्युकालचें वय दोन वेळां सांगितलें आहे. पृष्ठ ११३ वर He expired in the 52nd year of his age असे म्हटले असून, पुनः यावर टिपणी देतांना पृ. ९५ वर " in the fifty-second year of his age असे अक्षरीहि नमूद केलें आहे. येथें ५२ वें वर्ष असे स्पष्ट आहे; मोघम ५२ वर्षे असें नाही. त्यावरून जन्माचा सन १६८० – ५१ = १६२९ इसवी येतो.

८ **स्प्रिंजलच्या इतिहास**:–हा जर्मन ग्रंथ इ. स. १७९१ मध्ये प्रसिद्ध झाला असून त्यांत १७८२ पर्यंतची महाराष्ट्राच्या इतिहासाची माहिती आलेली आहे. यांत हिंदी नांवें देण्यांत बऱ्याच चुका केल्या आहेत; पण ग्रंथकार पाश्चात्य संशोधक होता व त्याच्या लिहिण्यात चिकित्सक सशोधनाची पद्धति आहे. त्यानें शिवजन्माचे वर्ष इ. स. १६२९ असे दिलें आहे ; त्यावरून १६२९–७८ = १५५१ शक येतो.

९ **तंजावरचा शिलालेख**:–हा इ. स. १८०३ मध्ये कोरला; व त्यांत शिवजन्माचा शक १५५१ आहे. ( पृ. २५१ पहा. ) पण संवत्सराचें नांव व

इ. स. आंकडा चूक आहे व जिजाबाई ही शहाजीची दुसरी बायको वगैरे चुकीची माहिती आहे. हा शिलालेख व्यंकोजीनें कोरविला नाहीं किंवा आक्षेपक समजतात त्याप्रमाणें त्यानें शिवजन्मतिथि बदलण्याचा प्रयत्न केल्याचाहि पुरावा त्यात नाही; उलट वयाच्या दृष्टीनें व्यंकोजीपेक्षा शिवाजी महाराज वडील असें या शिलालेखांत नमूद आहे.

यावरून शिवजन्माचे वर्ष शके १५५१ असें म्हणण्यास नऊ आधार असून त्यापैकी चार ठिकाणी महिना, तिथि, वार, नक्षत्रापर्यंत सूक्ष्म तपशील दिला आहे व शिवभारतात 'रात्री' (निशि) हा शब्द जास्तीचा आहे. या साक्षीदारांच्या सांगण्यांत परस्पर विरोध असा कोठेंहि नसून त्यांचें बोलणें सुसंगत व गणिताच्या कसोटीस पूर्णपणें उतरणारे (पृ. ८०–८३ पहा) असें आहे.

**१२ जेधे शकावलीची विश्वसनीयता**:–जेधे शकावलींतील नोंदी तत्कालीन अस्सल पत्रांच्या व टिपणांच्या आधारें केलेल्या असल्यामुळें त्या पूर्णपणें विश्वसनीय आहेत. त्याअर्थी त्यातील उल्लेखाचा समकालीन प्रत्यंतर पुराव्याशी मेळ बसला पाहिजे; किंबहुना तिच्या विश्वसनीयतेची ही एक महत्त्वाची कसोटी आहे असें म्हणतां येईल. याकरिता अशी काही उदाहरणें येथे नमूद करून ठेवतों.

१ औरंगजेबाचा जन्म; जे. श. १५४० कार्तिक व. १ (पृ. १६ पहा). आणि तुझुक (पृ. २५०–२५१) १५ जिलकाद १०२७ हिजरी (स. औ. पृष्ठ १).

२ शके १५७९ ज्येष्ठ मासी नौसीरखान यासी युद्ध (पृ. १८ जे.)आणि औरंगजेबाची पत्रे; सरकार कृत शिवाजी चरित्र पृ. ५८ पहा.

'शके १५८३ वैशाख शु ११ सोमवारीं शृंगारपूर राजांनीं घेतलें,तेथील राजे सूर्याराऊ पळून गेले.' (जेधे.) शृगारपूरच्या स्वारीचें साल ठरवितांना सर्व इतिहासकाराची चूक झाली आहे. पण जेध्यांचें साल बिनचूक आहे; कारण (खड २१ पृ. ५ वर) शिवाजी महाराजांनी पाठविलेलें अस्सल पत्र उपलब्ध असून त्यात जेध्यांचे सालच आहे. शिवाय सोनवड येथील इंग्रज कैद्यानें इ स. १६६१ च्या जूनमध्ये पाठविलेल्या अस्सल पत्रांत "Shivaji hath lately enlarged his country by overcoming the two Rajahs of Dulvice (Dalve) and the Rajah of Singarpur by which means he commands all the coast from Danda Rajpuri castle to Kharepatan" (स. शि. च. पृ. ४८)

४ शके १५८५ पौष वद्य ४ सुरत लुटली (पृ.२२). ही मिति बरोबर असल्याबद्दलचा पुरावा त्यावेळीं सुरतेस वखार चालविणाऱ्या इंग्रजी व्यापाऱ्यांच्या गुप्त सभेच्या लेखी रिपोर्टांत (व्हा. ८६) आहे. (स. शि. च. पृ. ९९ पहा.)

५ शके १५८७ आषाढ शु. १० जयसिंगाशीं तह. (पृ. २३.) या तहाची तारीख निश्चित करण्यास जयसिंगाचेच पत्र उपलब्ध असल्यामुळे शंकेस जागा नाही. (स. औ. च. पृ. १३९)

प्रत्यंतर पुराव्याची अशी उदाहरणें आणखी वाटतील तितकी देतां येतील; पण शकावलीकारांना शिवकालीन टिपणेंच मिळाली होती असें म्हणण्यास आणखी एक चांगला आधार आहे. इतिहासप्रसिद्ध व महत्त्वाच्या गोष्टीच्या नोंदी मागाहून करणें शक्य आहे. पण किरकोळ गोष्टींचें टिपण समकालीन लेखकावांचून इतरांना करण्याची बुद्धि होणार नाही. उदाहरणार्थ शिवाजी महाराज 'जावळीहून स्वार जाले' 'रायरीस आले' 'कल्याणाकडे गड पहावयास गेले' 'सिंहगड पहावयास गेले' 'प्रतापगडी देवालयावर वीज पडली' (पृ. ५०–५३) व 'धरणीकंप जाला' वगैरे ज्या त्या वेळीच टिपल्या जाणाऱ्या व मासाहून टिपण्याइतके ज्यांचें महत्त्व नाही अशा नोंदी शकावलीकारापुढे होत्या हे दिसत असल्यामुळे या शकावलीकारांना कांही ठिकाणी तरी तत्कालीन सरकारी दप्तरांतली टिपणें पहावयास मिळाली असली पाहिजेत असें निश्चितपणें दिसते. सारांश घडलेली गोष्ट जितकी साधी व बारकाईची तितकी ती थोड्या इसमानाच अवगत असणार आणि ती जर त्याच वेळी लिहून ठेविली नाही तर स्मरणांतूनहि नष्ट होण्याचा संभव फार व नष्ट झाल्यास तिचें सुखदुःख कोणासच नाही, अर्थात् अशा गोष्टी ज्या शकावलीत समाविष्ट झाल्या ती शकावली त्या त्या काळीं प्रत्यक्ष हजर असलेल्याने लिहून ठेवलेल्या टिपणावरून तयार केलेली असली पाहिजे व ती शकावली (लेखक व नकलनवीस यांचे दोष वगळून) प्रमाणभूत मानण्यास यत्किंचितहि कांकू करण्याचे कारण नाही.

**१३ शकावल्या स्वतंत्र कीं एकमेकींच्या नकला ?**—प्रस्तुत ग्रंथात छापलेल्या शकावल्यांचे बारकाईने अध्ययन केले असता त्या एकमेकींच्या नकला नसून स्वतंत्र आहेत अशी कोणाचीहि खात्री होण्याजोगी आहे. पण हे श्रम न घेतां जेधे व फोर्ब्स कलेक्शन या दोनच शकावल्या पाहून "या सर्व शकावल्यांचें मूळ एकच आहे असा आमचा सिद्धांत आहे!" असें आक्षेपकांनीं (विविधज्ञानविस्तार १९२५ आगष्ट पृ. ३६१) ठासून म्हटलें आहे. सबब या 'सिद्धांताचा' परामर्ष घेतला पाहिजे.

१ राज्याभिषेक शकावली शक १५४६–१५९६ पर्यंत आहे; शिवनिधन शकावली शके १५७०–१६०२ पर्यंत आहे; आणि जेधे शकावली शके १५४०–१६१९ पर्यंत आहे. अर्थात् या एका मुळाच्या नकला नव्हेत.

२ जेधे व राज्याभिषेक शकावलींत जो कालविभाग सामान्य आहे त्यांत देखील ठिकठिकाणी तफावत आहे; व काही जागी एका ठिकाणीं असलेला मजकूर दुसऱ्यांत मुळीच नाहीं. उदाहरणार्थ (१) 'शके १५६९ राजश्री बापूजी पंतांनी किले सिंहगड घेऊन दिल्हे' असें राज्या. श. मध्यें (पृ. ५५) आहे; आणि हा मजकूर जे श. त मुळीच नाहीं. (२) संभाजीचा जन्मकाल देतांना वार व घटका पळे इत्यादि तपशील जेध्यांत नाही (पृ. १८); पण राज्या. शकावलीत तो आहे (पृ. ५६ व ६५). (३) याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी की, 'फत्तेखानास सोडून मज्यालसी दिल्ही' ही बाब एका शकावलीत शके १५५१ मध्ये आहे. तर दुसरीत १५५२ आहे. (४) इब्राहिम आदिलशहाचा मृत्यु व मुरार-जगदेव कारभारी होणें या गोष्टी एकाच वर्षातल्या व स्वतंत्रपणे निरनिराळ्या कलमांत लिहिण्यास योग्य असें एका शकावलीचे म्हणणें (पृ. ५४) असून दुसरीच्या मताने एतत्संबंधीची चार वाक्ये एका कलमात लिहिली पाहिजेत म्हणजे त्यापैकीं 'मुरार जगदेव कारभारी झाला' एवढीच गोष्ट त्या सालची व बाकीच्या गोष्टी खुलाशादाखल आहेत. (पृ. १६.) (५) जेधे शकावलीत बाजीनाा जेध्याची जन्मतिथि आहे; ती दुसऱ्या शकावलीत नसून 'मोरोबाची मुज' व 'गगाबाईचा मृत्यु' वगैरे खाजगी घराण्यांतील हकीकतीच्या मित्या आहेत. एकंदरीत सर्व शकावल्यांचे मूळ एक, म्हणजे एका मुळावरून या सर्व शकावल्या नकललेल्या आहेत हें म्हणणें टिकण्याजोगे नाही. शकावल्या तयार करण्याचे प्रयत्न त्या वेळी अनेक घराण्यांत झाले, त्यांत सरकारी दप्तरांत मिळणारी माहिती ज्या त्या घराण्यानें आपापल्या गरजेनुसार ग्रथित केली. त्याचप्रमाणें इतर ठिकाणी ज्याला जे कागद मिळाले ते त्याने उपयोगांत आणले आणि आपल्या घरच्या कागदांचाहि उपयोग काहीं ठिकाणी केला. मात्र अस्सल कागदांत जितकी स्थूल अगर सूक्ष्म माहिती सापडली तितकीच त्याने शका-वलीत नमूद केली. प्रत्येक ठिकाणीं अदाजाने सूक्ष्म माहिती देण्याचा आव त्यांनीं घातलेला नाहीं अर्थात् जेथे नुसता शक आहे, महिना व तीथ नाही तेथे सूक्ष्म माहिती शकावलीकारास उपलब्ध नव्हती व ती त्याला हिजरी किंवा सुहूर-सनाच्या रूपाने मिळाल्यामुळे या सनांचें रूपातर त्याला शकांत करणें भाग होते. हे रूपातर करतांना उत्तर दुहेरी म्हणजे सदिग्ध येते त्यामुळे क्वचित् ठिकाणी शकावलीकारांत विशिष्ट नोद कोणत्या शकांत लिहावी याबद्दल मतभेद झालेला आढळतो; व अशा प्रसंगी त्यांच्या हातून चूकहि झालेली असण्याचा संभव आहे. साराश निरनिराळ्या शकावल्यांत काही नोंदी अगदीं सारख्या आहेत; कांही थोडयाशा मतभेद निदर्शक आहेत व कांही प्रत्येक शकावलींत अगदीं स्वतंत्र व निराळ्या आहेत याचा खुलासा या प्रकारचा आहे. सर्व शकावल्यांचा बारकाईनें अभ्यास केल्यास ही गोष्ट सहज पटणारी आहे. प्रस्तुत

ग्रंथांत रा. जोशी यांनीं या दिशेनें केलेले काम वाचकापुढे आहेच. त्यावरून 'सर्व शकावल्यांचें मूळ एक ' हा आक्षेपकांचा ' सिद्धांत ' चुकीचा ठरतो.

**१४. तोतया मितीचा विसंगतपणा**—बखरकारांनी दिलेली शिवजन्माची मिति गणिताच्या कसोटीनें चुकीची ठरते हें मागे दाखविलेंच आहे. त्यानंतर शिवाजी महाराजांचा जन्म ज्या परिस्थितीत झाला त्या परिस्थितीचें बखरकारांनी दिलेले वर्णन कितपत सुसगत आहे याचें परीक्षण करावयाचे आहे. यासंबंधीं बखरकाराचें म्हणणें प्रस्तुत ग्रंथांत (पृ. ७१–७८) आलेंच आहे यावरून त्याचा सारांश असा सांगतां येतो:—

१ निजामशाही तक्तावरील अल्पवयी बादशहास मांडीवर घेऊन शहाजी राजे मसनदीवर बसू लागले; ही गोष्ट जाधवरावांना सहन झाली नाही. त्यामुळे जाधवरावानी दिल्लीहून फौज मागविली.

२ या मागणीप्रमाणें दिल्लीहून फौज घेऊन मीरजुमला आला; तेव्हा शहाजी बादशाही मुलें व बेगम यांसह माहुलीस होता; याकरिता मोगली फौजेनें माहुलीस वेढा दिला.

३ सहा महिने युद्ध केल्यानंतर मोगलांपुढें आपला निभाव लागत नाही व (जाधवरावांनीं बुद्धिभ्रंश केल्यामुळे) बेगम आपल्या मुलासह मोगलाकडे जाणार असें पाहून शहाजीनें विजापूरकराच्या आश्रयास जाण्याचें ठरविले.

४ जिजाबाई व संभाजी याना घेऊन शहाजी माहुलीहून रात्रीच्या वेळी निसटून जात असतां जाधवरावानें त्याचा पाठलाग केला. त्या वेळी जिजाबाई सात महिन्यांची गरोदर असल्यानें तिला घोड्यावरून पळवेना; म्हणून तिला टाकून जाणें शहाजीस भाग पडलें.

५ जाधवरावानें जिजाबाईस सुरक्षिततेसाठी शिवनेरीस ठेविलें व तेथें जिजाबाई बाळंत होऊन शिवाजीचा जन्म झाला.

६ बखरीतील मजकूर अनुवाद रूपाने पांच कलमांत सागितला. आतां प्रत्येक कलमाचा स्वतंत्रपणें विचार करूं.

१. शके १५४८–४९ मध्यें निजामशाही तक्तावर अल्पवयी बादशहा नव्हता. उलट तो धटिंगण, स्त्रीलंपट व व्यसनी असा असल्याबद्दल इतिहासकारांत एकवाक्यता आहे. (पृ. २३७ टीप पहा). तेव्हां त्याला मांडीवर घेऊन बसण्याचा प्रसंग शहाजीवर येणें अगर त्या वैभवाबद्दल जाधवरावांस त्याचा मत्सर वाटणें या दोनही गोष्टी अशक्य कोटींतल्या आहेत. या बुऱ्हाण निजामशाहाला फत्तेखानानें शके १५५३ मध्यें मारला; त्यानंतर निजामशाही तक्तावर अल्प-

वयी मुलगा आला व त्यानंतर दोन वर्षांनी त्या मुलाला मोगलांनीं कैद केल्यावर शहाजीनें पुनः एक पोर निजामशाही तक्तावर उभारलें (पादशाहानामा व १९१७ सप्टं. च्या मॉडर्न रिव्ह्यूमधील प्रो. सरकार यांचा लेख पहा). सारांश, निजामशाही तक्तावर शके १५५३ नंतर पोर वयाचे बादशहा होते, १५४८ मध्यें नव्हते.

२, ३, ४ कलमांत सांगितलेली परिस्थिति खरी ठरण्यास शहाजी माहुलीस वेढला जाण्याचा काळ शके १५४८ हा पाहिजे; पण तो प्रसंग यानंतर दहा वर्षांनी म्हणजे शके १५५८ मध्यें आला. ही गोष्ट (इ. म्हा. ७ पृ. ६०) बादशहानामा व बुसातिने सलातीन (हिं. बु पृ ४९४) यांत असंदिग्ध भाषेंत नमूद केली असून ती प्रो. सरकार (मॉ. रि. १९१७ सप्टं. पृ. ३५३) व राजवाडे (राधा. चं. पृ. ५५) व खरे यांनी मान्य केलेली आहे. यामुळे ही माहुलीच्या वेढयाची १५५८ मधली हकीकत बखरकारांनी गफलतीने १५४८ मध्ये आणून ठेवली असे म्हणावें लागतें.

या ठिकाणी आक्षेपकांनी अशी एक तक्रार पुढे आणली आहे की, "जेधे शकावलीत एक शिवजन्म शक खरा मानण्यासाठी या मुसलमानी तवारिखा प्रमाण मानून आपल्या बखरीतील शहाजी-जाधवरावांची झुज अप्रमाण मानावी, असें आपटे सांगतात. परंतु तवारीखकार तरी इतिहास–लेखनाची कला आमच्या बखरनविसापेक्षां काय अधिक शास्त्रीय पद्धतीने शिकलेले होते ! ! दोघेहि जवळजवळ सारखेच. जर सरसपणा असलाच तर तो आमच्याच पूर्वजांमध्ये विशेष दिसतो; आणि म्हणूनच अन्य मजबूत पुराव्याच्या अभावी आमचा स्वाभिमान व आमचा पूर्वजाभिमान मुसलमान लेखकांचे लेख या बाबतीत प्रमाण मानू देत नाही.*"

आक्षेपकाच्या या तक्रारीस असे उत्तर आहे की, ही त्यांची स्वाभिमानाची व पूर्वजाभिमानाची कल्पना फारच थोड्याना मान्य होईल; निदान संशोधनक्षेत्रात तरी तिचा आश्रय कोणासहि करता येणार नाही. कारण ऐतिहासिक प्रश्नाचा निर्णय करतांना समकालीन साक्षीदारांचें महत्त्व अव्वल दर्जाचे व दीडशे वर्षांनतर मागली हकीकत सागणाऱ्या साक्षीदारांचें महत्त्व दुय्यम दर्जाचें हे सहज समजण्याजोगे आहे. तेव्हां आमचे बखरनवीस तवारीखकारांपेक्षा काय कमी शिकलेले ? '' हा प्रश्न अप्रासंगिक ठरतो. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आक्षेपक म्हणतात त्याप्रमाणें येथें स्वाभिमानाचा प्रश्नच उपस्थित होत नाही. बखरकार जसे आमचे पूर्वज तसे शकावलीकार व शिवभारतकार हेहि आमचे पूर्वजच

* विविधज्ञानविस्तार १९२५ आगष्ट पृ. ३६७.

नव्हेत काय? आणि जर ते आमचे पूर्वज आहेत व ते शिवकालीन आहेत तर पूर्वजापूर्वजांमध्ये मतभेद आला व समकालीन पूर्वजाला मान दिला तर त्यांत स्वाभिमानाची हानि काय म्हणून व्हावी? अशा वेळी समकालीन मुसलमानांचे लेख जमेस कां धरूं नयेत? मुसलमानी लेखकांनी आत्मप्रौढी मिरविली आहे; मराठ्यांना कमीपणा आणणारी विशेषणें लावली आहेत. याकरिता त्या भागांत त्यांच्या आत्मस्तुतीपर भागातील मजकुरात 'नागपुरी आंकडा' बाद करण्यास हरकत नाही. पण शहाजीला मोगली सैन्यानें माहुलीस केव्हां वेढला याची मिति मोगली इतिहासकारानी दिलेली खोटी असून ती ८–१० वर्षे जाणून-बुजून बदलली असेल असें म्हणण्याचें कांहीच कारण दिसत नाही. आणि शकावली व मोगली इतिहासकार याची या बाबतीत एकवाक्यता आहे एवढ्या-करिता ही मिति खोटी व बखरकारांची याहून भिन्न आहे म्हणून ती खरी असा फलितार्थ आक्षेपकांच्या म्हणण्यातून निघू पाहतो! सारांश आक्षेपकांची स्वाभि-मानाची कल्पना शास्त्रशुद्ध नसून विकारदूषित आहे असें म्हणावें लागते.

४ जाधवरावाने सुरक्षिततेसाठी जिजाबाईला शिवनेरीस (जुन्नरास) पोचविले, या बखरकारांच्या म्हणण्यावरहि विश्वास ठेववत नाही. यांचें कारण जाधवरावानें श. १५४७ अखेर बंडखोर शहाजहानाचा पक्ष सोडला व तो तेव्हांपासून बादशाही म्हणजे जहागिरीच्या नोकरीत शिरला[१]. आणि जहागीर मरेपर्यंत (१५४९ अश्विन) तो तिकडेच होता. त्यानतर शहाजहान बादशहा होऊन त्याने निजाम-शाहीवर शस्त्र धरले तेव्हा म्हणजे शके १५५१ मध्ये तो निजामशाहीत आला. अर्थात् त्याला १५४७ अखेर निजामच्या राज्यांत शिवनेरीस येण्याचे कारणच नव्हतें. दुसरे असें की, शके १५४८ च्या कार्तिकानंतर[२] शहाजहान नाशकाहून जुन्नरास येऊन राहिला; नंतर महाबतखान त्याला तेथे येऊन भेटला[३] व जुन्नराहून शहाजहान[४] १५४९ च्या कार्तिकात निघाला. अशा रीतीने शहाजहानाच्या तळाच्या जागेवर सुरक्षिततेसाठी जाधवरावाने आपली मुलगी बाळंतपणासाठी पोचविणें शक्य दिसत नाही.

---

1 The Khan Khana, Abdal Khan, Jado Rai and Udai Ram, like so many others were in the Imperial service (History of Jahangir by Beni Prasad.)

२ इकबलनामा पृ० २७३, २७९–२८० वेणिप्रसाद याचे जहागीर चरित्र

3 According to Tatimma he (Mahabat Khan) had nearly 2000 horse with him when he joined Shah Jahan at Junner. (इ. व्हा ६ पृ ४३४ टीप.)

४ पुढील पृष्ठ पहा

**१५ आक्षेपकांची खरी मतें**—'नवाकाळ' (१७ एप्रील १९२५) व 'विविध-ज्ञान विस्तार' (आगष्ट १९२५) यांमधील लेखावर "वैशाख शु. द्वितीयाच ग्राह्य" असा मथळा आक्षेपकांनी दिला आहे व रा. वाकसकर यांनीं " शके १५४९ वैशाख शु. २ ही जुनी तिथि बडोदेकरास मान्य असून तिचें समर्थन रा. दाजी नागेश यानी केले आहे" [वि. ज्ञा. वि. पृ. २६१] अशी आपल्या लेखाच्या प्रारंभीं व "भारतवर्षाला वैशाख शु २ शके १५४९ हीच तिथि ग्राह्य वाटते" अशी शेवटी ठासून प्रतिज्ञा केली आहे. पण ही त्यांची खरी समजूत दिसत नाही. कारण द्वितीयाच ग्राह्य म्हणणाऱ्यास तृतीया, पंचमी, पौर्णिमा या मित्या व वद्यपक्ष किंवा क्षय संवत्सर व १५४८ शक देणारे आधार आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ आपण देऊं नयेत हे लक्षांत येण्याजोगे होतें. निदान "आतां हे सतरा साक्षीदार एकमुखाने ज्याप्रमाणें शिवजन्मशक १५४९ देतात त्याचप्रमाणें जन्मतिथि द्वितीयाच देतात की काय असे कोणी विचारील. पण तूर्त शकाची वाटाघाट चालू असताना तिथीला महत्त्व देऊन शक नाकारण्यांत कांहीं अर्थ नाही; आणि तसाच प्रसग येऊन तिथिनिश्चय करण्याचा समय आला तर चंद्रबळ पाहून विद्वानाच्या मताने तो सहज करतां येईल" ( नवाकाळ १७।४।२५ ) असा चंद्रबळ पाहण्याचा हवाला देणाऱ्या लेखाखालीं सही करण्यापूर्वीं तरी त्यानी लक्षपूर्वक पहावयास पाहिजे होते त्याचप्रमाणें रा गोविंदराव सरदेसाई यांची गणना आक्षेपकांमध्ये मला करावी लागली आहे तरी हें नमूद करणें न्यायाचें आहे की त्यानीं १४।४।२५ रोजी "शिवजन्माचा शक १५४९च खरा अशीहि आमची बालंबाल खात्री नाही; म्हणून तूर्त अनिश्चितपणात आजपावेतों चाललेला प्रघात बदलू नये एवढेच आमचें म्हणणें आहे" असे मला पत्रद्वारे कळविले होतें; व त्यानंतर अगदी

---

मागील पृष्ठावरून

४ इ. व्हा. ६ पृ. ४२७.शहाजहान जुन्नरास राहिला होता यास मराठींतहि आधार सापडतो [ सनदापत्रे पृ. ७० पहा ] फारशीत काही ठिकाणी 'खेबर' असें आहे त्या जागा 'जुनर' पाहिजे ही गोष्ट प्रो. वेणिप्रसाद यानी सुचविली आहे ती बरोबर आहे, मोडीत जसे 'क' व 'ला' याची वाचनात चूक सहज होते तोच प्रकार या ठिकाणी आहे. बलीच्या कोशात फत्तेखानास Khyber येथें कैदेत ठेवले असें म्हटलें आहे तेथ जूनर पाहिजे. 'ख' व 'ज' ही अक्षरे फारसीत सारखी असल्यामुळे तरीख-इ-- शिवाजीमधील शिवजन्माच्या सवत्सराचे नाव 'जय' (Jai) असें सांगून टिपेंत ' The word may also be read as khai = kshaya असे प्रो सरकार यांना म्हणावे लागले. १७०७ मार्च मॉडर्न रिव्ह्यू पहा ). साराश फारशीतील 'ख' आणि 'ज' या अक्षरांच्या वाचनांत घोटाळा होऊन कांही ठिकाणी शब्दाचें मूळ खरें स्वरूप समजण्याची पंचाईत तज्ज्ञांना पडते असें दिसतें.

अलीकडे म्हणजे ६।९।१९२५ रोजीं " आतांच्या उपलब्ध पुराव्यांत इतर सर्व आधारांपेक्षां जेधे शकावली व शिवभारत यांचें प्रामाण्य मला निःसंशय अधिक वाटतें. तथापि शिवजन्मकालासंबंधी एकदम निश्चित मत बनविण्याइतकी या पुराव्याची योग्यता अजून मला वाटत नाही. शहाजीचा दहा वर्षांचा आयुक्रम फारशींतील जास्त कागद धुंडाळून प्रो. जदुनाथ सारख्यांनीं ठरवून दिला पाहिजे" असें रा. सरदेसाई यानी मला पुनः लिहिले आहे. त्याअर्थीं जेधे शकावली व शिवभारत यांचें प्रामाण्य व शहाजी चरित्रात फारशी आधाराचें महत्त्व या गोष्टी रा. सरदेसाई यांना मान्य असून फक्त शिवजन्मतिथीबद्दल त्यांचें मत अनिश्चित स्थितीत आहे असें म्हणतां येईल. रा. वाकसकर व रा. दाजी नागेश यांच्याप्रमाणें फारशी आधार मान्य करण्यांत " स्वाभिमान व पूर्वजाभिमानाला धक्का बसतो " असें इतिहासाभ्यासी रा. सरदेसाई यांस वाटत नाहीं हें उघड आहे. तात्पर्य बखरकारांनी " वैशाख शुद्ध द्वितीयाच दिली आहे अगर तीच " ग्राह्य " आहे असें मथळ्यांत मात्र आहे; पण तें एकाच्याही मताचे निदर्शक नाही."

रा. सरदेसाई यांनी जेधे शकावली व शिवभारत यांचें प्रामाण्य मान्य केल्यानंतर शिवजन्मतिथीबद्दल शका राहूं शकत नाही हें सागण्यासाठी मी त्याना अशी सूचना करतो कीं,

१ तिथिनिर्णयाच्या कामी गणिताची कसोटी महत्त्वाची असते

२ शिवभारतांतील मजकूर छत्रपतीच्या दरबारात वावरणाऱ्या माहितगार ग्रंथकाराने त्यांच्या अनुज्ञेवरून लिहिलेला म्हणून पूर्णपणे विश्वसनीय आहे.

३ जेधे शकावलीत काही हस्तदोष अगर चुका असल्या तरी त्या कोठें आहेत व कोठे नाहीत हें ठरविण्यास साधन आहे.

४ जेधे शकावलीतील काही नोंदीबद्दल संशयास जागाच नाही; व अशापैकी शिवजन्माची त्याने दिलेली तिथि आहे. याचे कारण ती अस्सल जन्मटिपणावरून नकललेली आहे; म्हणून गणितदृष्टया बरोबर आहे. शकावलीतील इतर जन्ममित्या व राज्याभिषेक मिती याही अशाच आहेत.

५ मुसलमानी लेखकांचे आधार शहाजीच्या हालचाली ठरविण्यास उपयोगी पडतील. पण शिवजन्ममितीबद्दल त्यांचे आधार सांपडणें कठिण दिसतें. त्याअर्थीं प्रो. सरकार यांच्या मताकरता येथे थाबण्याचे प्रयोजन नाही.*

---

* उत्सवाची चालू वहिवाट बदलू नये असे रा. सरदेसाई याना वाटते तें ठीक आहे; कारण त्यांच्या मतानें हा प्रश्न अनिश्चित स्थितीत आहे. पण सर्व विचार करून खरी मिति कोणती याबद्दल 'बालंबाल' खात्री झाल्यावर देखील केवळ चालू वहिवाट म्हणून 'तोतया मितीस' चिकटून राहणे इतिहासदृष्टया मान्य होण्याजोगें नाही.

१६ प्रो. सरकार-प्रो. सरकार यांना सामान्यत: शिवचरित्रविषयक मराठीत प्रसिद्ध झालेली ऐतिहासिक सामुग्री महत्त्वाची वाटत नसून त्यांचा भर पारशी ग्रंथावर आहे. याचें कारण त्यांच्या मते शिवाजी व संभाजी यांच्या चरित्रास उपयोगी पडणारे असे समकालीन कागदपत्र मराठीत मुळीच नसून ते इंग्रजी व पारशी भाषेतच आहेत. ते म्हणतात--

The only contemporary records of Shivaji's and even Shambhuji's times, that now survive are in English and Persian and none at all in Marathi...On the other hand the Persian (and to a lesser extent English) sources were absolutely contemporary, promptly recorded, fully detailed and dated, and carefully preserved.

बखरी संबंधीं त्यांचें मत असें आहे:—

These so called bakhars are evidently the production of some ignorant, credulous, dull-brained writers and not the work of any clever minister of state or scholarly author. They do not make the least pretence of being based upon contemporary written records or authentic state papers. They carry on their faces the suggestion that they were composed after the intellectual brilliancy caused by the Peshwa's rule had passed away and before the rise of the modern school of sound and critical Marathi historians under Khare and Sane, Rajwade and Sardesai. I hazard a guess that they were written between 1820 and 1840 or '50--though the karnel of some of them (almost equally legendary or inaccurate) may have been put down in writting about 1770-1790.

जेधे शकावलीसंबधानें मात्र प्रो. सरकार याचे मत असे आहे.

" Zedhe chronicle is the most valuable and authentic contemporary record of Shivaji and his ancestors. Exact dates are given in every case. It was published in 1918 and hence the idea of deliberate, modern fabrication cannot be suggested." "There are some evident mistakes which

we can detect with the help of English and Persian sources; but they were due to the copyist, and not to any deliberate fabrication. It contains some correct dates which no forger could have known. The dates are given in the Hindu luni-solar era of the Deccan and defy conversion to the Julian calendar except approximately."

(Shivaji & His Times, p 452).

तथापि जेथे शकावलीतली शिवजन्मतिथि चूक आहे असे त्यांनी चरित्रविषयक ग्रथात टिपेत म्हटले आहे; व त्या म्हणण्यास आधार दिला नाही. त्यांची समक्ष गाठ पडल्यावेळी या विषयावर माझे बोलणे झाले त्यावरून " इब्राहिम आदिलशहा मरण पावला वगैरे मजकूर शके १५५१मध्ये आहे; तो तेथें नको; त्याअर्थी त्या शकातील नोंदीत काही घोटाळा झाला असण्याचा संभव आहे. अशा अर्थाचा त्याचा आक्षेप दिसला. त्यास माझे उत्तर असे आहे की १५५१ मध्यें ' मुरार जगदेव कारभारी' झाला हे सागण्याचाच शकावलीकाराचा तेथें हेतु आहे. इब्राहिम आदिलशहा मेला वगैरे वाक्ये तेथे खुलाशादाखल आहेत. तथापि ही 'दूरान्वय' पद्धति या ठिकाणी घ्यावी किंवा नाही याविषयी संशय घेण्यास जागा असल्यामुळे 'शकावलीकार येथे चुकला' आहे असे मान्य केलें तरी त्या चुकीचा ससर्गदोष शिवजन्मतिथीस का बाधावा? कारण इब्राहिमचा मृत्यु व शिवजन्मतिथि यांत कार्यकारण भाव काहीच नाही आणि इब्राहिमाच्या मृत्यूच्या उल्लेखात शकावलीकाराने तिथि, वार दिला नसल्यामुळे ती नोंद ( शकावलीची कडक परीक्षा घेतांना) संशयित सदरांत घालता येईल पण शिवजन्मतिथीची नोंद मात्र तशी नाही. तिच्यात तिथि, वार, नक्षत्र वगैरे सर्व तपशील असून त्याचा १५५१शी गणितदृष्टया उत्तम मेळ आहे; त्याअर्थी येथे नकलकाराची किंवा शकावलीकाराची चूक झाली नाही हें निश्चितपणे म्हणतां येते शिवाय शिवभारतासारख्या ग्रथाचा या मितीस उत्तम आधार आहे हेहि लक्षात ठेवले पाहिजे.

तथापि प्रस्तुत वाद उपस्थित झाल्यानतर प्रो सरकार यानी अद्याप आपलें मत जाहीर केले नाही. याकरितां यापेक्षा जास्त विस्तार येथे करण्याचे कारण नाही जर्धे शकावलीतल्या नोंदी 'विश्वसनीय व समकालीन' लेखकाच्या आहेत; त्या बनावट ( forgery ) नाहीत व त्यात चुका असतील त्या ' नकलकरांच्या ' आहेत या तीन गोष्टी प्रो. सरकार याना मान्य आहेत त्याअर्थी ते शकावलीचें सूक्ष्म अध्ययन करतील तसतसे त्यांतील शिवजन्मतिथी बिनचूक असल्याचे त्यांच्या निदर्शनास येईल असा माझा अदाज आहे. शकावलीतील नोंदी मराठी पद्धतीनें तिथ्यात्मक आहेत यामळे त्याच्या इग्रजी तारखा ठरविणें कठिण पडते अशी त्यांनीं

तक्रार केली आहे. पण खरे व पिले यांच्या जंभ्या झाल्यापासून हीहि अडचण राहिली नाहीं.

**१७ तोतया मितीची तरफदारी**—शिवजन्माची खरी मिती अमान्य करून बखरकारानी दिलेल्या तोतया मितीची तरफदारी करण्यासाठी आक्षेपकांनीं अनेक मुद्द्यावर पूर्वपक्ष केलेला आहे. यासाठीं त्यातील मुख्य मुद्द्यांचा विचार येथें 'आक्षेप' व 'उत्तर' रूपाने देतो.

**आक्षेप**—एक्याणव कलमी ( रायरीची बखर ) शिवाजीच्या मृत्यूनंतर त्वरितच लिहिली आहे ही बखर हल्ली शिवकालीन लेखसंग्रहांत सर्वांत प्राचीन आहे. ( केसरी १२-५-२५ )

**उत्तर**—ही बखर सवाई माधवरावांच्या कारकीर्दींतली आहे. कारण तिच्यांत व्यंकोजीचे तीन मुलगे मरून तिसऱ्याचा म्हणजे तुकोजीचा वंश 'हाली असें' असें बखरीतच आहे. ( पृ १३ पहा. )

**आक्षेप**—एक्याणव कलमी बखर दोनतीन ठिकाणी छापली आहे. त्या सगळ्या प्रतीत वरील मजकूर नाहीं, अर्थात ज्या प्रतीत वरील मजकूर आहे ती तेवढीच प्रत इतर प्रतीहून अर्वाचीन ठरेल. नकलकाराने नकल करताना आपला शहाणपणा दाखविण्यासाठी स्वतःची माहिती मध्ये घुसडून दिली. परतु तेवढ्यावरून मूळ प्रतीचा काळ अलीकडे ओढणे बरोबर नाही. (वि. ज्ञा वि १९२५ आगष्ट पृ ३६५)

**उत्तर**—आक्षेपक सुचवितात त्याप्रमाणें येथें पळवाट निघण्यासारखी नाहीं. कारण ज्या भारतवर्षांतील प्रतीत तुकोजीच्या वंशाचा उल्लेख नाही त्या प्रतीत 'मधली १६–१७ कलमे गहाळ' असा स्पष्ट शेरा आहे व गहाळ भाग 'प्रभात' प्रतीत दिलेला असून त्यात वादविषयक मजकूर आहे; त्याचप्रमाणे या बखरीचें फारशी भाषांतर तरीख–इ–शिवाजी यांतहि हा उल्लेख आहे. तेव्हा तो भारत-वर्षाच्या गहाळ झालेल्या भागात होता हें निःसंशय आहे. इतक्याहि उपर 'गहाळ' भागांत काय असेल आणि काय नसेल याचा अंदाज खात्रीपूर्वक असा कोणी करावा ? अशी शंका घेऊन भारतवर्षांत छापलेलाच मजकूर पुराव्यांत घ्यावा असें कोणाचें म्हणणे असेल तरी त्यास उत्तर आहे ते असे की, या प्रतींत शिवजन्माची मिती "शके १५५९ क्षय संवत्सरे वैशाख शु ५ चंद्रवार" अशी दिली आहे. त्या अर्थी "वैशाख शु २ च ग्राह्य" म्हणणाऱ्याना यातील शक, संवत्सर, तिथी व वार हे सर्व सोडून फक्त "वैशाख" महिनाच तेवढा बरोबर असे म्हणावे लागेल.

**आक्षेप**—शिवाजी व व्यंकोजी यांच्यात वैमनस्य वाढत गेल्यावर व व्यंकोजीनें बापाची सगळीच जहागीर गिळकृत केल्यावर आपलेच करणें न्याय्य आहे असें दर्शविण्यासाठी आपण वयानेहि मोठे आहोंत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न त्यानें

केला असेल; व आपण वयानें मोठें आहोंत म्हणजे शिवाजी लहान आहे, हे व्यंकोजीस सिद्ध करावयाचें होतें व एतदर्थ त्यानें शिवजन्माचा शक १५५१ हा अस्तित्वांत आणला असावा. हा सर्व प्रकार शहाजीच्या मृत्यूनंतर घडला. ही शंका घेण्याचें कारणहि येथेच नमूद करून ठेवणे भाग आहे वाडगोंडपूरच्या लढाईत व्यंकोजीचा पराभव केल्यावर शिवाजीनें त्यास जे पत्र लिहिले त्यांत घडलेला प्रकार अनिष्ट झाला. आता तरी पत्र पावतांच अर्धा वाटा **वडीलकीसुद्धां** द्या असें लिहिले आहे. यांत वडीलकीसुद्धा हे शब्द चित्य आहेत; व यावरून व्यकोजीनें कांही तरी युक्तीनें वडीलकीहि लाटली होती असे दिसते ( वि. ज्ञा. वि. १९२५ आगष्ट पृ. ३६४ ).

**उत्तर**—'हा सर्व प्रकार शहाजीच्या मृत्यूनंतर घडला' असे आक्षेपकच म्हणतात, व जेधे त्यापूर्वीं १५ वर्षे म्हणजे शके १५७१ मध्येच पुण्याकडे आले व शेवटपर्यंत शिवाजीच्या बाजूस राहिले. त्या अर्थी व्यकोजीच्या या युक्तीत जेधे सामील असणें शक्य नव्हते. मग त्याच्या शकावलीत १५५१ हा जन्मशक कसा आला? राज्याभिषेक शकावली १५९६ मध्ये लिहिली; ती पुण्याच्या होनप देशपांडे घराण्याने लिहिली आणि शिवभारत तर नेवाशाच्या परमानंदाने लिहिले; व शिवाजीला जन्म देणारी जिजाबाई या सर्व लेखाच्या वेळी हयात होती, असे असून त्यांनी शिवजन्म शक १५५१ असा का सांगितला आहे ? राज्याभिषेकानंतर व्यंकोजीने प्रयत्न केला म्हणावा तर शिवाजीने त्यास ' चिरंजीव ' म्हटलेच आहे; व त्या वेळचे तंजावरास असलेले जेसुइट लोक शिवाजीला ' वडीलभाऊ ' असें उल्लेखीत असलेली अस्सल पत्रे भा. इ. मं. च्या गेल्या समेलनात फादर हिरास यानी वाचून दाखविली. त्याचप्रमाणें व्यंकोजीचा मुलगा शहाजी याच्या पदरचा कवि ' जन्मत ' म्हणजे जन्मानें संभाजी, शिवाजी व एकोजी असा शहाजीच्या मुलाचा क्रम होता ( पृ. १३१ श्लोक १३ पहा) असें असदिग्ध भाषेंत सागतो आणि खुद्द तजावरचा शिलालेख देखील शिवाजी ' वडील ' असेंच म्हणतो. यावरून वयाने आपण वडील आहो असें सांगण्याचा व्यंकोजीचा प्रयत्न असल्याबद्दल कोठेच पुरावा नाही वर उल्लेखलेल्या पत्रात ' **वडीलकीसुद्धां** ' अर्धा वाटा असे म्हटले आहे त्याचा अर्थ निंमा वाटा देण्याने तटा मिटणार नाही, तर तुम्हापेक्षा मी वडील असल्यामुळे वडीलभावास निंम्याहून अधिक वांटा घेण्याचा वतनदारात व जहागीरदारात जो सांप्रदाय आहे त्याप्रमाणें माझ्या वडीलकीचा जास्तीचा वाटा तुम्हीं दिला पाहिजे हें व्यंकोजीला बजावून सांगण्याचा शिवाजी महाराजांचा हेतु या पत्रांत उघड दिसून येत आहे. त्या अर्थी आक्षेपककल्पित व्यकोजीच्या व्यूहाचा पुरावा कोठेच नाही.

**आक्षेप**—खंड २० ले. २३७ मध्ये " सालमजकुराकारणें मा। दादाजी कोंडदेव सुभेदार यासी देवाज्ञा जाली म्हणून महाली कारकुनु ताजा खुर्दखताचा उजूर

करितातो" असा मजकूर आहे व 'सनदापत्रे' यांतील पृ. १११ वर अशाच अर्थाचा मजकूर आहे. त्यावरून रा. चांदोरकर यानी १५६९ हा दादाजी कोंडदेवाचा मृत्यू शक ठरविला आहे (भा. इ. सं. म. चे त्रैमासिक १८४३ पृ. १० ). त्या ठिकाणीं "सालमजकुराकारणें' याचा सबध' मह्याली कारकुनु ताजा खुर्दखताचा उजूर करितातो' या वाक्यांशी जोडावा. म्हणजे दादाजी शक १५६९ तच मृत्यु पावला अशी निराधार कल्पना करण्यास कारण राहणार नाहीं.....व यावरून शिवाजीचा जन्म शक १५४९ त च ठरतो (नवाकाळ २६ एप्रील १९२५ )·

उत्तर—वरील पत्रावरून दादाजीचा मृत्युशक रा. चांदोरकर यांनीं ठरविला आहे तो निश्चित आहे. त्यावर आक्षेप घेतां येत नाही. पण वादाकरितां आक्षेपकाच्या म्हणण्याप्रमाणे येथे दुरान्वय घेतला तरीहि १५४९ चा जन्म सिद्ध होत नाही. कारण त्याना बखरीतील ज्या विधानांच्या समर्थनासाठी हा खटाटोप करावयाचा आहे ती वाक्यें अशी आहेत:—

(१) फॉरेस्टची रायरीची बखर पृ. ९:—

Shivaji Raja who was then sixteen years old sorrowed greatly at the death of Dadaji.

(२) एक्याण्णव कलमी बखर (प्रभात प्रत पृ. १३):—त्याउपर दादाजी कोंडदेव याणि बदोबस्त कारभार येखतियारीचा केला. त्यांचा मृत्यू जाला ते समयी सोळा सतरा वर्षांचे शिवाजी राजे होते."

(३) मराठी साम्राज्याची छोटी बखर पृ. १५:—दादाजी मृत्यु पावले शिवाजी राजे सतरा वर्षांचे ते समयी होते .

यावरून या आक्षेपकाना आधारभूत असलेल्या बखरकारांच्या मतें दादाजीच्या मृत्युसमयी शिवाजीचे वय १६।१७ वर्षांचें होते. याचा अर्थ १६ वर्षे पुरी किंवा १७ पुरी असा होईल आणि शिवजन्म १५४९तला धरल्यास १५४९ + १६ किंवा १७ = १५६५ किवा १५६६ हा दादाजीचा मृत्युशक येईल. पण खं. १६ पृ. ३६ लेखांक २० हे दादाजी कोंडदेवानें पाठविलेलें अरसल पत्र आहे व त्याची मिती १५६७ पौष शु. ४ आहे. तेव्हां शिवजन्म १५४९ शकांत धरून दादाजी कोंडदेव १५६५ किंवा १५६६त मेला असें सांगणारें बखरकारांचें विधान चूकच ठरलें पाहिजे.

**१८ तोतया * मितीची उपपत्ति**—१५४८, १५४९ व १५५९ हे शक, रक्ताक्षि, प्रभव, विभव आणि क्षय हीं संवत्सरें, आणि वैशाख महि-

* आपल्या मतानें एक मिती खरी ठरल्यानतर इतर मित्यांचा निर्देश करण्यास राजवाडे यांनी 'बनावट हें विशेषण योजलें असून, आक्षेपकांनीं आपल्या लेखांत

पुढील पृष्ठ पहा

त्याच्या शु. २, ३, ५, १५, किंवा वद्य २ या मित्या शिवजन्माच्या म्हणून बखरकारांनीं दिल्या. याची उपपत्ति कशी लावावयाची असा प्रश्न या ठिकाणी उत्पन्न होतो, त्याचे उत्तर असें आहे की, बखरकाराच्या म्हणण्यात इतकें वैचित्र्य असल्यामुळे सर्वांच्या चुकांची उपपत्ति एकाच प्रकाराने लागणार नाही. यांत कांही बखरकाराच्या लिहिण्यांत हस्तदोष असण्याचा सभव आहे. उदाहरणार्थ १५४९ च्या जागी १५५९, 'शुद्ध' च्या जागी 'वद्य' सवत्सराची विविधता मात्र या पद्धतीने व्युत्पादितां येत नाही. कारण 'प्रभव' च्या जागी 'क्षय' किंवा 'रक्ताक्षि' हे शब्द हस्तदोषाने आले असे केव्हाहि म्हणतां येत नाही. वैशाख शुद्ध २ किवा ५ या मित्या बऱ्याच बखरकारानी दिल्या आहेत; पण त्याबरोबर त्यानी वार दिले असून तिथिवाराचा मेळ नाहीं, त्याअर्थी त्यांना अस्सल जन्मटिपण पहाण्यास मिळाले नव्हते हे निश्चित आहे. * मात्र बखरकारांच्या वेळी शिवाजी महाराजाची म्हणून एक कुडली रूढ होती. ( पृ. ५ पहा. ) ती पाहून कोणासही रविचद्राच्या स्थानावरून वैशाख शुद्ध २ ते ५ पर्यंतच्या मित्या सुचणे अगदी साहजिकच आहे. या खेरीज भोसले घराण्यातले एखादे शिवकालीन टिपण बखरकारांना मिळाले

---

मागील पृष्ठावरून

'तोतया मिती' हा प्रयोग नव्यानेच केलेला आहे. पैकी 'बनावट' शब्दात जाणून-बुजून खोटी मिती देणें अशा अर्थाचा ध्वनि निघतो तो मला नको आहे; व तोतयाची बाजू उचलण्याची बुद्धि न कळत प्रामाणिकपणाने बखरकाराना होणे सभवनीय होतें हें दर्शविण्यासाठी मी आक्षेपकांनी योजलेला शब्दप्रयोग पसत केला आहे

* चिटणीसाना बखर लिहितांना साताऱ्याच्या राजवाड्यातील दप्तर खुले होतें त्याअर्थी त्यांना शिवशाहीतील मित्या ठरविण्यास उपयोगी कागद मिळाले असतील, असा कित्येकाचा समज दिसतो. परतु रा. वा. सी बद्रे यानी दाखविल्याप्रमाणें असे कागद त्यावेळी उपलब्ध नव्हते असे म्हणण्यास उत्तम आधार आहे शाहू महाराजाची रोजनिशी ख. १ पृ. ४१ पहा. शिवकालीन कागदपत्र साताऱ्च्या दप्तरांत नाहीत असा शेरा प्रत्येक सदरापुढें या यादीत मारलेला आहे. उदाहरणार्थ पुढील नोद पहा " १ शामराज निळकठ राजेकर.--कधी नेमले त्याजबद्दल शाहूदप्तरी दाखला नसोन कागदपत्र दप्तरी नाहीत. शिवाजी महाराजांचे कारकीर्दीत हे पेशवे होते म्हणोन प्रतापसिंह महाराज याचे खाजगी दप्तरी एक याद आहे त्यांत लिहिलें आहे. सरजाम दिलेबद्दलचे कागद दप्तरी नाहीत." इतिहाससग्रहांतहि अशीच यादी आहे. त्यावरून साताऱ्च्या दप्तरात जुन्यात जुना कागद म्हणजे राजशक ८ चा ( संभाजीच्या कारकीर्दीतला ) होता. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत अष्टप्रधान कोण होते याची एक मोघम यादी प्रतापसिंहानी तयार करविली होती, असे म्हणतां येतें व याखेरीज औरंगजेबाने पाठविलेलीं कांहीं पत्रें त्यांचे दप्तरी होती.

असलें तर त्यावर मुलाचे नांव लिहिलेच पाहिजे असा त्या वेळचा संप्रदाय दिसत नसल्यामुळे ( पृ. २२७ पहा ) ते टिपण शिवाजी महाराजाचें म्हणून बखरकाराना वाटलें असेल असेहि संभवते. याखेरीज दादाजी कोंडदेवाचा मृत्यु काही बखरकारानी शके १५६६ असा दिला असून त्यावेळीं शिवाजी महाराज १७ वर्षांचे होते अशी त्यानी दिलेली माहिती परंपरागत असल्यास त्यावरून १५६६ –१७ = १५४९ हा जन्मशक त्यांनी घेतला असण्याचाही संभव आहे. वरील काहीशा आधारावर उभारलेल्या तर्काखेरीज शुद्धकल्पनेच्या क्षेत्रांत शिरून मंत्रतंत्राच्या व जारणमारणाच्या भीतीनें खोटा शक रूढ केला असेल अशी विचारसरणी कित्येक प्रमुख आक्षेपकानीं मजपुढें तोंडी वादांत मांडली आहे. पण हे कल्पनातरंग त्यानी जाहीर रीतीनें लिपिनिविष्ट केले नाहीत व तोतया मिती एकाहि शिवकालीन कागदात प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें सापडत नाही तोपर्यंत वर सुचविलेल्या व्युत्पत्तीचा विचार करण्याचे कारण नाही शेवटी प्रो पोतदार यांनी सुचविल्याप्रमाणे हे लक्षात ठेविले पाहिजे की, खरी मित्ती निश्चित करणे आणि तोतया मितीची व्युत्पत्ति लावणे हे प्रश्न अगदीं निरनिराळे आहेत. त्यापैकी एक निश्चित झाला तरीहि दुसरा सुटेल असे नाही कारण आपण अशी कल्पना करू की शहाजीचे अस्सल पत्र सांपडून त्यात शिवाजी महाराजाचा जन्म शके १५५१ फाल्गुन कृ. ३ या दिवशी झाल्याचे लिहिलेले आढळले; तर त्यावरून जेधे मितीस चागला दुजोरा मिळेल; पण चिटणिशी मिती कशी रूढ झाली हे कोडे सुटणार नाही ते नाहीच.

**१९ अप्रस्तुत आक्षेप**—शिवजन्माचा वाद वर्तमानपत्रातून व मासिकातून चालला असता माझ्या व पुणेकराच्या वागणुकीसंबंधी व्यक्तिविषयक बरेच मुद्दे आक्षेपकानी मांडून वाचकाचे मन आमच्या हेतूविषयी कलुषित करण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, नव्याकाळातील लेखांत असे सुचविलें आहे की १५५१ ही मित्ती रूढ करण्यासाठी कित्येक वर्षांपासून लोकमत तयार करण्याचे प्रयत्न आडमार्गानें चालले होते; शिवकालीन जत्री याच हेतूने १५५१ पासून छापली व १५४९ च्या मित्या त्यात दिल्या नाहीत; इतिहास-मंजरीत मी १५५१ ही मिति दिली; पुणेकरांनी उत्सवाची तिथी बदलण्या-पूर्वी सगळे आधार पाहिलेच नाहीत ( के. २८ ए. १९२५ रा दा. ना. आपटे याचे पत्र ). हे आरोप आक्षेपकानी वादाच्या भरांत केले आहेत व त्यांचा संबंध शिवजन्मतिथिनिर्णयाशी साक्षात पोचत नाही. हे त्यांनाहि मान्य होईल अशी माझी समजूत आहे. त्याचप्रमाणें 'फाल्गुन' शब्दांवर कित्येकांनीं कोटया केल्या आहेत त्याचाहि संबंध या वादाशी पोचत नाही. व याकरितां या अप्रासंगिक आक्षेपांचा विचार मी या ठिकाणी करीत नाही.

**२० आभार**—शेवटीं या विषयाचा ऊहापोह होऊन साधकबाधक प्रमाणें पुढें आलीं व या प्रश्नास वर्तमानपत्रे व मासिकें यांनी आपली महत्त्वाची जागा देऊन लोकांत या विषयाची जागृति ठेविली याचें श्रेय त्या त्या वर्तमानपत्रकारांना तर आहेच, पण त्याहीपेक्षा बडोद्याच्या तीन विद्वानांनी परिश्रमपूर्वक आपली बाजू माडली याबद्दल त्याचे आभार मानणें अवश्य आहे. रा. सरदेसाई यांनी १७ आधार काढून, रा. वाकसकर यानी जेधे शकावलीतल्या चुका दाखवून आणि रा. दाजी नागेश यानी तोतया तिथीची बाजू उत्तम कसलेल्या वकिलास साजेशा पद्धतीनें मांडून वादाचे मुद्दे निश्चित करण्यास फार मदत केली आहे. या प्रत्येक मुद्यास मी उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे; त्याने आक्षेपकाचें समाधान झाल्यास ठीकच आहे; पण त्यांचे कांही जुने आक्षेप अद्याप शिल्लक असल्यास किंवा त्यांना नवे सुचले असल्यास ते त्यानी पुढे माडण्यास उशीर करूं नये अशी माझी जाहीर विनंति आहे.

**२१ उपसंहार**—या वादाचा निष्कर्ष थोडक्यात सांगता येतो तो असाः—

**शिवभारत व जेधे वगैरे शकावल्या शिवकालीन आहेत**

**त्यांतील अत्यंत विश्वसनीय भागातैकीं शिवजन्माची मिती असून ती गणितदृष्ट्या बिनचूक आहे.**

**∴ ती खरी आहे.**

याच्या उलट **आक्षेपकांना** असे **सवाल** करता येतात **की**

**( १ ) तुमच्या मतें शिवजन्माची मिती कोणती तें निश्चितपणें सांगा.**

**(२) ती कोणत्या ग्रंथांत बिनचूकपणें सांगितली आहे त्या ग्रंथाचें नांव सांगा.**

**आणि ( ३ ) त्या ग्रंथांतील मजकूर प्रमाणशास्त्राच्या कसोटीस उतरणारा आहे असें विस्तृतपणें दाखवून द्या.**

---

# ७

## ' शिवभारत ' व रा. वाकसकर

विविधज्ञानविस्ताराच्या सप्टेंबरच्या अकांत रा. वाकसकर यांनी मालोजी भोसल्याचा मृत्यु शहाजीच्या पाचव्या वर्षी झाला या शिवभारतांतील विधानाची चर्चा करून, शिवभारतातील विधानामुळे सृष्टिनियमाविरुद्ध, भलत्या व असंभाव्य गोष्टी गृहीत धराव्या लागतात, अतएव शिवभारत विश्वसनीय नाहीं, असें तात्पर्य सूचित केलें आहे. याकरिता त्याच्या लेखातील मुख्य विचारसरणी प्रथम संक्षेपानें सागून नंतर माझे म्हणणें माडतो. त्यानी आपल्या लेखास जो आधार घेतला आहे तो भा. अि. स. मंडळाच्या त्रैमासिकांत वर्ष ४ पृ. ४७–४९ वर छापला आहे व तो निबंधरूपी आहे; अर्थांत त्यात प्रतिपादन केलेलीं मतें त्या निबधकारांची आहेत; ती सर्वांना मान्य असलीच पाहिजेत असें गृहीत धरणें न्यायाचें नाही, हे लक्षात ठेवलें पाहिजे. रा. वाकसकराची विचारसरणी अशी आहे.

(१) अ : मंडळाच्या त्रैमासिकांतील लेख निवडून काळजीपूर्वक छापलेले असतात.

आ : मालोजीच्या मृत्यूसंबंधीचा लेख अशाचपैकी आहे. ∴ त्यांतील मत मंडळाच्या अभिमान्यास अमान्य करतां येण्यासारखे नाहीं.

(२) अ : बखरीत मालोजीचा मृत्यु अि. स. १६१९ मध्ये दिला आहे.

आ : पण मंडळाच्या त्रैमासिकांत अि. स. १६२१ मध्ये दिला आहे. पैकी मंडळाच्या अभिमान्यास अि. स. १६२१ मान्य असला पाहिजे.

(३) अ : मालोजी अि. स. १६२१ मध्यें निवर्तला.

आ : मालोजी निवर्तला तेव्हां शहाजी पांच वर्षांचा होता. ( शिवभारत )

(४) ∴ शहाजीचा जन्म अि. स. १६१६ मध्यें झाला.

आ : शिवाजीचा जन्म अि. स. १६३० मध्यें झाला.

∴ शहाजीच्या १४ व्या वर्षी शिवाजी जन्मला.

(५) शिवाजी हा शहाजीचा सहावा मुलगा होता आणि शिवाजीचा जन्म शहाजीच्या १४ व्या वर्षी झाला

∴ शहाजीला ( १४ – ५) नवव्या वर्षी पहिलें मूल झालें.

पहिलें मूल शहाजीच्या नवव्या वर्षी झाले; म्हणजे जिजाबाओीचे वय ९ पेक्षां कमी असताना झाले पाहिजे. अर्थात हे अशक्य आहे. त्या अर्थी शिवभारत अविश्वसनीय आहे, हे रा. वाकसकर यांना सुचवावयाचे आहे. 'शिवभारताची अविश्वसनीयता' हे फळ हाती घेण्यासाठी रा. वाकसकर यांनीं वर दाखविलेल्या पांच पाहिऱ्या चढून जाण्यास वाचकाना सांगितलें आहे. त्याप्रमाणें या पचनदीचें आरोहण करण्याचा प्रयत्न करू; म्हणजे या पाहिऱ्या टिकाअू आहेत किंवा लटपटीत आहेत याची परीक्षा होणार आहे.

( १ ) पहिल्या पाहिरीच्या तीन भागापैकी पहिले दोन भाग (म्हणजे त्रैमासिकांतील लेख निवडक असतात व मालोजी संबधीचा लेख अशाच पैकी आहे हे) यथार्थ आहेत. पण यावरून या निबंधातील मत मंडळाच्या अभिमान्यांस अमान्य करता येणार नाही, हा निष्कर्ष अगदीच चुकीचा आहे. भारत अि. सं. मंडळ हें विशिष्ट प्रकारचीच व अेकतर्फी मतेच तेवढी प्रसिद्ध करण्यासाठी चाललेले नसून त्यांत निरनिराळया लेखकानी प्रतिपादन केलेली निरनिराळया प्रकारची मते माडण्यास पूर्ण स्वातंत्र्य असते. किंबहुना मंडळाचें म्हणून अैतिहासिक वादांत मत प्रसिद्ध करण्यात येत नसतें; मते व्यक्तीची असतात, संस्थेचीं नसतात व एका निबंधकाराने प्रतिपादन केलेले मत मंडळाच्या सर्व सभासदांना मान्य असते, असे केव्हाही समजण्यात येत नाही. अेवढेच नव्हे तर वादविषयक निबधास आधारभूत असा जो मालोजीचा अुल्लेख तो मालोजी "विठोजीचा पुत्र मालबा याचा असेल, अशी शंका अेका मित्राने प्रदर्शित केली आहे". (पृ. ४७) असे त्या निबंधातच नमूद केलेलें आहे अर्थात हा मालोजी म्हणजे शहाजीचा बाप की शहाजीचा चुलतभाअू, यासबधी वादविषयक निबंधकार व त्याचा मित्र यात मतभेद आहे, व निबधकाराचे मत मंडळाच्या सर्व सभासदाना मान्य असलें पाहिजे हे म्हणणें या निबंधावरूनच निराधार आहे हें स्पष्ट ठरते खुद्द निबंधकारांनी देखील आपले मत देताना "चुलता जिवत असतांना त्याचेच नांव पुतण्यास देणें संभवनीय कमी. शिवाय विठोजीचा पुत्र संभाजी व अितर हे कारभार करतात. मालबाही त्यावेळेस (अि. स. १६२२ मध्ये) कर्ता दिसतो; त्यावरून शिवभारतातील अनुमानास पुष्टि मिळते" हे नमूद केलें आहे. पण या गोष्टी दृष्टीआड करून अि. स. १६२१ मध्ये मालोजी निवर्तला या त्रैमासिकांतील अस्सल पत्रातला मालोजी हा शहाजीचा बापच आहे या गोष्टी निर्विवाद रीतीने सिद्ध झाल्याचे रा. वाकसकर गृहीत धरीत आहेत ही त्यांची चूक आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते या पत्रातील मालोजी म्हणजे शहाजीचा चुलत भाअू व हा अि. स. १६२२ च्या सुमारास स्वतंत्रपणें कारभार करतो,

अेवढच नव्हे तर अि. स. १६३३ च्या सुमारास मोंगलांनी दौलताबाद घेतली तेव्हा मालोजी भोसले मोगलाकडे गेला होता व त्याच्या मार्फत अिरादतखान शहाजीला आपल्या बाजूस घेण्याचा प्रयत्न करीत होता, ही गोष्ट विजापूरच्या अितिहासात (बुसातिने सलातीन )स्पष्ट नमूद आहे. हा मालोजी म्हणजे शहाजीचा बाप असे कधीही प्रतिपादन करतां येणार नाही. सारांश, अि.स. १६२२ मधील विठोजीच्या मुलांतील वांटणी सबंधीची दोन अस्सल पत्रे व अि.स. १६३३मधील विजापूरच्या अितिहासातील हकीकत यावरून विठोजीचा मुलगा मालोजी अि. स. १६२२ च्या सुमारास कर्ता सवरता झाला होता हें निर्विवाद आहे त्याच-प्रमाणे शहाजीचा बाप जिवत असतांना विठोजीनें आपल्या मुलाचे नाव मालोजी ठेवण्यापेक्षा, मोठा मालोजी मरण पावल्यानतरच विठोजीने आपल्या मुलाचे हे नाव ठेवणें जास्त सभवनीय; त्याअर्थी इ. स १६२२ मध्ये कर्तबगार झालेला मालोजी, मोठ्या मालोजीचा मृत्यु १६२२ च्या पूर्वी निदान चौदा पंधरा वर्षे आधी झाल्याचे सुचवितो हे उघड आहे. मात्र इ. स. १६२२ मध्यें मालो-जीचे वय निश्चितपणे अमुकच होते हे सागण्यास स्पष्ट आधार नाही. यामुळें थोरल्या मालोजीचा मृत्यु व शहाजीचा जन्म याचा शक ठाम सागता येत नाही, अशी एतद्विषयक पुराव्या संबधीची वस्तुस्थिति आहे. तथापि शहाजीच्या पांचव्या वर्षी थोरला मालोजी निवर्तला व त्या सुमारास जन्मलेला धाकटा मालोजी इ. स. १६२१ पासून१६३३ पर्यंत राजकारणांत व घरगुती व्यवहारात स्वतःच्या जबाबदारीने वावरताना दिसतो त्याअर्थी इ.स. १६२१ च्या सुमारास धाकट्या मालोजीचे वय निदान १५ व शहाजीचे निदान २० असलें पाहिजे. यापेक्षा विश्वासात्मक विधान करण्यास आधार नाही; पण वादविषयक निबधास आधारभूत असलेल्या पत्रांतला (इ. स. १६२१ मधला) मालोजी हा शहाजीचा चुलत भाऊ आहे, हे मला निश्चितपणे वाटते. राजवाडे खड १५ मधील कांही छापील पत्रांवरून हा प्रश्न जास्त स्पष्टपणे माडता येण्याजोगा आहे. पण या छापील पत्राचे मूळ कागद पहाणें अवश्य असल्यामुळे व तसे शक्य असल्यामुळे सध्यां या प्रश्नाचा उहापोह येथेंच थाबवितों.

रा. वाकसकरांच्या विचारसरणीतील पांच पाहिऱ्यांतील पहिली पाहिरी वर सांगतल्याप्रमाणे डळमळीत असल्यामुळेच तदाश्रयानें उभारलेल्या मालोजीच्या मृत्यूसबंधी व शहाजीच्या जन्मासबंधींच्या दुसऱ्या व तिसऱ्या पाहि-ऱ्यांची उभारणी आपोआपच ढासळते, आणि शहाजीचा जन्म इ. स. १६१६ मध्ये झाला हे सिद्ध होत नसल्यावर, इ. स. १६३० मध्ये म्हणजे शिवजन्माच्या वेळी शहाजीचें वय १४ वर्षांचे होतें व जिजाबाईचें अमुक होतें आणि शिव-

भारतांतील विधानें सृष्टीनियमाविरुध्द आहेत, वगैरे तर्क निराधार ठरतात हे विस्तारपूर्वक सांगण्याचें कारण नाहीं.

शिवभारतांतील पांचव्या अध्यायांतला एक श्लोक "जिजाबाईला सहा मुलगे झाले; आणि त्यांपैकीं संभाजी व शिवाजी हे दोघेच वंशवर्धक झाले," अर्थात् मुलगे लहान वयांत वारले असे सांगत आहे. त्यांत शिवाजी हा शेवटला मुलगा असे कोठेहि स्पष्ट अगर अस्पष्टपणें म्हटलेलें नाही; ही माहिती शिवजन्मापूर्वीच्या अध्यायातली आहे. एवढयावरून हे मुलगे आधीचे असले पाहिजेत असेंही म्हणतां येत नाही; कारण शिवभारतातील हकीकत प्रकरणवारीनें मांडली असून एक प्रकरण संपवून नंतर दुसऱ्या प्रकरणाचा धागा प्रथमपासून सांगितला आहे. आणि अवांतर हकीकत मधून मधून प्रसंगानुरोधानें सांगितलेली आहे. यामुळें अमुक अध्यायांतलें प्रत्येक वाक्य कालक्रमाच्या दृष्टीनें अमुक शकांतल्या घडामोडीचे निदर्शक असलें पाहिजे असा तर्क कोणीहि काढणार नाहीं. उलट, शिवाजीला बाराव्या वर्षी बंगळुराहून रवाना केलें, तेव्हां जिजाबाअी देखील शहाजीजवळ होती आणि तिच्यावर शहाजीचें इतर स्त्रियापेक्षांहि प्रेम होते, असें भारतकाराने सांगितले आहे. त्यावरून शहाजी व जिजाबाई याचा वियोग शिवाजी बारा वर्षाचा होईपर्यंत झाला नाही असेंच कबूल करणें भाग आहे. यामुळे या बारा वर्षांत जिजाबाईला कांही मुले झालीं असण्याचा संभव आहे. पण ही वाक्यें लक्षांत घेतलीं असता शिवभारताची निंदा करण्याची हौस—ही हौस कां उत्पन्न झाली आहे कोणास ठाऊक—पुरवून घेता येत नसल्यामुळे रा. वाकसकरांनी ती वगळणें त्यांच्या सोईचे आहे. पण अशा पाहणीनें शिवभारताच्या प्रामाण्यास बाधा येत नसून पाहणाऱ्याच्या दृष्टीलाच बाधा झाल्याचें मात्र दिसून येते.

एकदरीत रा वाकसकराच्या लिहिण्यात आमच्या मतें दोन प्रकारचे दोष आहेत; (१)जाणून आणि दुसरे (२)अजाणपणें केलेले. मंडळाच्या त्रैमासिकात अथवा वार्षिक इतिवृत्तांत किंवा समेलन वृत्तांत तसेंच पुरस्कृत केलेल्या ग्रथांत निरनिराळ्या निबंध लेखकांनी एकाच विषयावर आपापली मते मांडतांना आपल्या पूर्वीच्या निबंधकारकांचीं मतें खोडण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ कै. साने व कै. राजवाडे (चित्पावन वाद); प्रो. ओतुरकर व रा. लेले (धार) (मांडवगडचें खरेदीखत), रा. पुरंदरे व रा. गुब्बी (अंताजी माणकेश्वर घराणें), यांचे निबंध पहा. किंबहुना खुद्द शिवजन्मतिथीच्या वादाच्या प्रकरणांत मंडळाच्या चिटणिसानीं मंडळाचे धोरण दिग्दर्शित करतांना "मंडळाला नूतन प्रमाणांचा आगमन मार्ग सतत उघडा ठेवला पाहिजे. चर्चा कोणी करील त्यास सदैव मोकळीक दिली पाहिजे. ज्ञानाचीं व सत्य निर्णयाचीं द्वारें मंडळासारख्या

शोध संस्थेने निरंतर उघडीच ठेवली पाहिजेत" असें म्हणून तशी तीं उघडी आहेत हें दाखविण्याकरितां पुढेंच " शिष्ट मार्गाचा अवलंब करून १५५१ विरोधी पक्ष जर आपले म्हणणें सप्रमाण पुढे मांडील ........तर मंडळ अत्यंत आनंदानें त्याही ग्रंथाचा असाच पुरस्कार करील यात अगदी संशय नहीं," असें बजावून ठेवलें आहे. अशा स्थितीत मंडळाच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेला एखादा लेख मंडळाच्या अभिमान्यांस 'अमान्य करतां येण्यासारखा नाहीं' असें म्हणण्यांत रा. वाकसकरांनी हेतुपुरस्सर मंडळाच्या पद्धतीविषयीं गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें शिवभारतांत शिवाजी हा शेवटचा म्हणजे ६!वा मुलगा असल्याचें नमूद नाही, ही गोष्ट मी अनेक प्रसंगीं रा. वाकसकरांना उद्देशून लेख लिहितांना मांडलेली आहे. असें असून हा आक्षेप जसा कांही आज आपणांस नव्यानेच सुचला असे भासविणारी माडणी ते करतात, त्याअर्थी हाही विपर्यास जाणून बुजून करण्यांत आला, असे म्हणणें भाग आहे. याखेरीज १५ व्या खंडातील व इतरत्र छापलेली मूळ पत्रे पाहून त्यावरून काय अनुमान निघते वगैरे पाहण्याचे काम त्याच्या हातून घडलें नाही, याबद्दल त्यांना फारसा दोष देता येत नाही. याचे कारण शिवकालीन अस्सल पत्रे वाचण्याचा अगर त्यांचा अर्थ व संगति पाहाण्याचा त्याना सराव नसल्यामुळे त्याना इतरांनी लिहिलेले निबंध व त्यांत प्रदर्शित केलेलीं मते यावर अवलंबून राहणें भाग पडत आहे. पण शिवचरित्रांतील प्रसगाची चर्चा करूं पाहाणाऱ्यानें केवळ इतरानी प्रदर्शित केलेल्या मतांवर नेहमी भिस्त ठेवावी आणि स्वत: मूळ अस्सल साधनाचा अभ्यास करण्याची टाळाटाळ करावी, हे श्रेयस्कर नाही.

शिवाय प्रस्तुत प्रश्न ज्याचा अंगभूत आहे त्या शिवजन्म तिथीच्या वादांत रा वाकसकर यानी आपल्या मताने जन्मतिथि सागून ती आपण अमुक ग्रथाच्या आधारें खरी मानतो व त्या ग्रथाचे प्रामाण्य शिवभारतापेक्षा अगर जेधेशकावलीपेक्षां अमूक कारणामुळे जास्त आहे, असे त्यांनी दाखवून द्यावे अशी मागणी मी अनेक वेळां जाहीर रीतीने केली आहे. पण तें टाळून शिवभारत अगर जेधे शकावली यावर कांहीं आक्षपे घेता येतात, त्या अर्थी ही मिति निश्चित मानता येत नाही; मग जुनी अितक्यात का सोडावी असा विकल्प लोकाच्या मनांत अुत्पन्न करणें, अेवढे धोरण रा. वाकसकरांच्या लिहिण्यात असते. वस्तुत: शिवजन्माच्या म्हणून दोन नोंदी आज लोकांपुढें आहेत. अेक जेध्याची व दुसरी बखरीची. त्यांत प्रामाण्याच्या दृष्टीने कोणती निवडावी, हा प्रश्न सोडवावयाचा आहे. शिवजन्माच्या वेळचें शहाजीचे अस्सल पत्र अुपलब्ध असतें तर पुराव्याची तपासणी करण्याचें कारणच नव्हतें. पण असें पत्र अुपलब्ध नसल्यामुळें प्रत्यंतर पुराव्याचा पाठिबा कोणत्या बाजूस जास्त आहे अेवढेच पाहणें शक्य आहे आणि

सेवढी तपासणी करून बखरीपेक्षां जेधेशकावली शिवभारत यांची विश्वसनीयता अधिक आहे, व भारतांतील शिवजन्मविषयक माहिती सुसंगत व संभाव्य आहे आणि शिवजन्माची तपशीलवार तिथि सांगणारें वाक्य गणितदृष्टया बिनचूक आहे हें मी दाखविलें; आणि उलट पक्षी बखरींत अनेक ठिकाणी चुका केल्या आहेत, शिवजन्माची बखरीतली हकीकत असंभाव्य आहे, आणि जन्मतिथीचें वाक्य गणितदृष्टया चुकीचे आहे, असे सविस्तर चर्चा करून माडले. साराश, दोनही पक्षानीं आपल्या मताने जन्मकाल सांगावा; त्यास मुख्य आधार कोणता तें सागावे, आणि त्यापैकी कोणत्या पक्षाचे आधार तुलनात्मक दृष्टीनें सरस आहेत हे (१) ग्रंथ परीक्षण, (२) प्रसंग परीक्षण, आणि (३) वाक्य परीक्षण करून ठरवावें अशी पद्धति मी या बाबतीत तीन वर्षांपूर्वी पासून सुचविली आहे. तेव्हां हा प्रश्न सोडविण्याची ही पद्धति मान्य असल्यास रा. वाकसकरानी आपल्या बाजूच्या आधारभूत अशा मुख्य अेक दोन ग्रथांची नावे सागण्याच्या कामी टाळाटाळ करूं नये. बखर पक्षास निश्चित मिति सांगतां येत नाहीं व बखरींत दिलेल्या मित्या गणितदृष्टया बिनमेळाच्या आहेत, येथवर त्यांनीं अलीकडे कबुली दिली आहे व रियासतकार रा सरदेसाअी यांनीं जेधे मितीच्या बाजूस प्रामाण्यबळ शेकडा ६० आहे अशी मान्यता दिली आहे. तेव्हा रा वाकसकर यानी (१) एकतर मी सुचविलेल्या पद्धतीहून निराळी पद्धति हा प्रश्न सोडविण्याच्या कामी सुचवावी आणि त्याप्रमाणें हा प्रश्न साधक बाधक प्रमाणाचा विचार करून सोडवून दाखवावा. किंवा (२) रा. सरदेसाअी याच्या प्रमाणें जेधे मितीचें सरसपण मान्य आहे हे अुघडपणें सागावें; अथवा (३) जेधे व शिवभारत याच्यापेक्षा अमूक ग्रंथ शिवचरित्राच्या बाबतीत प्रमाणतर वाटतात हे तरी असदिग्ध भाषेंत सागावें. तसें न करतां केवळ अधून मधून तीच ती शंका जाहीर करीत बसण्याने बखर पक्षाचें समर्थन होणार नाही.

# ८

## शिवाजी महाराजांचीं वसतिस्थानें

शिवाजी महाराजाच्या चरित्राच्या अुत्तरार्धातील महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या वेळीं घडल्या, हे आता निश्चितपणे सागतां येते परतु त्यांच्या आयुष्यांतील पूर्वार्ध म्हणजे अफजल प्रसगापूर्वीचा वृत्तांत अद्याप अनिश्चित स्वरूपांत आहे. अफजल प्रसगापासून महाराजाच्या हालचालीकडे परकीय व शत्रूपक्षीय लोकांचें लक्ष लागले, त्यामुळे अि. स. १६५९ पासून पुढील २१ वर्षांचा वृत्तांत समजून घेण्यास फारशी व (अिग्रजी वगैरे) युरोपीय भाषातील समकालीन पत्रांचें सहाय्य मिळू शकते. पण ही मदत शिवचरित्राच्या पूर्वार्धाबद्दल मिळत नाही; हा पूर्वार्ध केवळ मराठी पत्राच्या आधारे लिहावा लागतो. शिवाय बखरकारांनी दिलेला पूर्वार्धविषयक वृत्तांत बराच काल्पनिक व विपर्यस्त असल्यामुळे शिवकालीन पत्रातील अैतद्विषयक मजकूर ध्यानांत घेण्यास बरीच अडचण भासते. तथापि विश्वसनीय साधनाच्या आधाराने कित्येक घडामोडींचा कालनिर्णय आतां ठोकळ मानाने करता येतो याचे अुदाहरण म्हणून शिवाजी महाराज लहानपणापासून राज्याभिषेक होअीपर्यंत कोठे कोठे रहात होते, म्हणजे त्यांची वसतिस्थाने कोणती, हे ठरविण्याचा प्रयत्न करतो.

महाराजांचा जन्म शिवनेरीच्या किल्ल्यावर झाला व माहुलीच्या वेढ्यानंतर मोगलांशी तह झाला तेव्हा शिवनेरीचा किल्ला शहाजीने मोगलाच्या ताब्यात दिला आणि यावेळी किंवा या वेळेपर्यंत शहाजीच्या कुंटुबातील मडळी शिवनेरीला राहत होती असा उल्लेख पादशाहानाम्यात आहे यावरून जिजाबाअी व शिवाजी याचे राहणे या सहा वर्षांत शिवनेरीच्या किल्ल्यांत होते

यानतर शहाजीच्या ताब्यांतून शिवनेरीचा किल्ला गेला व शहाजी विजापूरकराचा नोकर बनला; तेव्हा त्याला पुणे प्रांताचा मोकासा मिळाला व त्यापैकी कर्यात मावळाचा पोट मोकासा शिवाजीच्या नावाने करण्यात आला (खंड १८, पृ. ४४) शिवाय मावळाचा काही भाग जहागिरीदाखल मिळाला; त्यात खेडे बारे शहाजीच्या ताब्यात आले. दादाजी कोंडदेवाचे रहाणें तेथून जवळच कोंडाण्यावर असे; यामुळे जिजाबाअी व शिवाजी यांना कसबे खेड येथें ठेवण्यांत आले तेव्हा ते बापूजी मुद्गल नऱ्हेकर याच्या वाड्यात रहात होते (पुरंदरे दे. भा. ३ पृ. १३०) पुढे यांच्याकरितां तेथें स्वतत्र वाडा बांधण्याचें

ठरलें; तेव्हां कसब्यांतील कांही वाण्यांची व कुळांचीं घरें अुठवावी लागलीं व या कुळांना वसाहतीला जागा द्यावयाची होती म्हणून कसब्याच्या शिवारांत कांही अंतरावर नवी पेठ वसविण्यात आली; व त्या पेठचे नाव 'शिवापूर' असें ठेवण्यांत आलें. बाल शिवाजीच्या नांवे ही जी शिवारपूरची पेठ वसविण्यांत आली, तेथें राहाणाऱ्यांना बारा वर्षेपर्यंत अनेक प्रकारच्या सवलती दिल्या होत्या. यामुळें तेथे वस्ति झाली.

अशा प्रकारे जिजाबाअी व शिवाजी यांची वस्ति अि. स. १६३७ पासून काहीं दिवस कसबे खेड ेथे झाली असता शहाजी कर्नाटकच्या स्वारीत गुतला होता. त्याला तेथे बंगळूरचा किल्ला जहागिर मिळाला व नंतर तो १६३९ मध्ये देशी आला (प. सं. ले. ४५३); तेव्हा परत तो बगळुरास गेला, नतर जिजाबाअी व शिवाजी ही मंडळी त्याच्याबरोबर गेली होती (शि. भा. अ ९ श्लो. ६०). यानंतर शिवाजीच्या बाराव्या वर्षी म्हणजे अि. स १६४१ मध्ये पुण्याकडील भागाची जहागीर शिवाजीच्या नावे करण्यात आली व तो आईसह बगळुराहून देशी आला. तेव्हा त्याचे राहणे कसबे खेड येथे होते व यानतर शिवाजीचा अेक व त्याचा वडील भाऊ सभाजी याचा अेक असे दोन वाडे पुण्यात बांधण्यास सुरवात झाली असावी (पे. द. भा. २२ ले. २९२). नतर अि स. १६४४ मध्यें शहाजी देशी आला होता तेव्हां त्याच्यावर व दादाजी कोंडदेवावर विजापूर दरबारची गैरमर्जी झाली; (प. सं. ले २४९८); परतु त्याच्यावरील आरोप खोटा ठरून शहाजीची रवानगी पुन: कर्नाटकात झाली. पुढे शिवापूर वसविल्यापासून १०व्या वर्षीं म्हणजे अि. स १६४६ मध्ये दादाजी कोंडदेव शहाजीच्या भेटीसाठी खेडे बाऱ्यातून निघून तिकोट्यावरून बगळुरास गेला त्या वेळेपासून खेडे बारे तर्फेवर शिवाजीच्या नावानें दिलेले हुकूम सापडतात (प. सं ले ५१०). बंगळुरावरून दादाजी परत आल्यानंतर आजारी पडला व अि. स. १६४७ च्या जुलैच्या सुमारास मरण पावला यावेळी शहाजी कर्नाटकात स्वारीवर गुतला असल्या कारणानें पुणे व खेडे बारे येथील व्यवस्था लावण्याचे काम शिवाजीकडे आलें; व या सुमारास त्याने कोंडाण्याचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला परतु तो त्याला या वेळी पचला नाहीं. कारण शहाजीची कैदेतून सुटका करण्यासाठी शिवाजीला कोंडाणा व त्याबरोबर खेडेबारे व शिरवळ येथील ठाणी देखील विजापूरकरांच्या ताब्यांत द्यावी लागली (पुरं. द भा. ३, पृ. १३१) तेव्हांपासून शिवाजी राजे यांची वस्ति खेड कसब्यांतून हालून पुण्यास गेली.

अि. स. १६४९ ते १६५३ पर्यंत चार पांच वर्षे शहाजी व संभाजी देशीं म्हणजे पुणें ते विजापूर भागांत होते. अर्थात् तेव्हां शिवाजी व शहाजी यांचें अधून मधून पुण्याकडे अेकत्र रहाणें असावें. यावेळी शहाजीच्या ताब्यांत

हिरडस मावळचा भाग होता व तेथील व्यवस्था शिवाजी पाहत असे (प. सं. ले. २५७१ ). शिवाजी हा शहाजीच्या तर्फेचा व्यवस्थापक हे नातें अि. स. १६५५ पर्यंत टिकले. त्यानतर शिवाजी महाराजांच्या स्वतंत्र हालचाली सुरू झाल्या. त्या सुमारास महाराजांचें ठाणें पुण्याहून पुरंदर किल्ल्यावर नेण्यांत आलें. ही गोष्ट अि. स. १६५४ च्या ऑगस्ट नतर घडली यांत शंका नाही (प. सं. ले. ६७३ ); परंतु नंतर म्हणजे कोणत्या महिन्यांत हें सांगण्यास साधन नाही. पुढे अि. स. १६५७ मध्ये महाराजांनी खेडे बारें ( व कोंडाणा) या भागांत पुनः अंमल बसविला व राजगड, तोरणा येथे किल्ले बांधण्यास सुरवात केली, आणि ते राहूं लागले. संभाजीचा जन्म अि. स १६५७ च्या मे महिन्यांत पुरंदर येथें झाला, यावरून तोपर्यंत त्या किल्ल्यावर महाराजाचे राहणें असावे असा तर्क करतां येतो. पुढे अि. स. १६५७ पासून शिवाजीराजे राजगडास राहूं लागले.

राजगड येथें त्यांचें ठाणे पुष्कळ वर्षे टिकलें. कारण रायगडावर घरें व तळी बांधण्यास अि. स. १६७१–७२ मध्यें सुरवात झाली ( प. स. ले. १४५९), त्याअर्थी त्यानतर मराठी राज्याचे ठाणें रायगडावर गेले व तो किल्ला राजधानीचें शहर बनला. अर्थात अि. स. १६७२ ते १६८० पर्यंत महाराजाची फक्त शेवटची आठ वर्षे रायगडास गेली. अशा रीतीने शिवाजी महाराजांच्या वसतिस्थानांचा अनुक्रम ठोकळ मानानें सागता येतो तो असा–

| | | |
|---|---|---|
| अि. स. | १६३०–६ | शिवनेरी |
| अि. स. | १६३७–९ | कसबे खेड. |
| अि. स. | १६४०–४१ | बंगळूर |
| अि. स. | १६४२–४९ | कसबे खेड. |
| अि. स. | १६४९–१६५५ | पुणें |
| अि. स. | १६५६–१६५७ | पुरंदर |
| अि. स. | १६५८–७१ | राजगड. |
| अि. स. | १६७२–८० | रायगड. |

वसतिस्थानांच्या अनुक्रमाच्या दृष्टीने सांगितलेले हे कालखंड शिवचरित्रातील घडामोडीच्या दृष्टीने देखील महत्त्वाचे टप्पे आहेत. पण या लेखाचा तो विषय नसल्यामुळे येथे त्यांचें वर्णन करण्याचें कारण नाही.

———

# १

## शिवकालीन मित्यांबद्दल एक प्रश्न

शिवकालीन मित्यासंबंधी कांही विशेष गोष्टी मला येथे नमूद करून ठेवावयाच्या आहे.

१ सुहुरसन अक्षरी व हिजरी सन अंकी लिहिण्याची पेशवाई कालांतली वहिवाट शिवसमकालीन कागदांत बहुतेक ठिकाणी आढळते. पण क्वचित त्यास बाध येतो. सनदेच्या प्रारंभी एक अक्षरी सन व अखेरीस निराळाच आणखी एक अक्षरी सन असा प्रकार आढळतो. त्या ठिकाणी पहिला सुहूरसन व शेवटचा हिजरी असतो असें दृष्टोत्पत्तीस आले आहे. उदाहरणार्थ, चिंचवडच्या देवांचे जे कागद मंडळाच्या त्रैमासिकाच्या (शके १८४३) अंकांत दिले आहेत त्यांत ले. १ मध्ये प्रारंभ सुहूरसन तिसा अशर अलफ असून अखेरीस ६ माहे रबिलावल समान इसरैन अलफ असे म्हटलें आहे. या ठिकाणी पहिला सुहूर व दुसरा हिजरी घ्यावा लागतो हाच प्रकार आणखी पुढल्या ५।६ पत्रांत घ्यावा लागतो. शक १५७० च्या सुमाराच्या कागदांत सुहूरसन अक्षरी व हिजरी सन अंकात लिहिण्याचा प्रघात आढळतो; लेखांक ४ पहा.

२ काही ठिकाणी सुहूरसनाचा एकचा आंकडा तेवढाच अक्षरी देऊन पुढें हिजरी सन दिलेला आहे. उदाहरणार्थ ले. ५ मध्यें सु सलास सन १०७३ असें म्हटलें आहे, त्याचा अर्थ सु. सलास सितैन अलफ व हिजरी १०७३ असा घेतल्यावाचून संगती बसत नाही.

३ कांही ठिकाणी सन हजार अमूक असा उल्लेख असतो. तेथें तो हिजरी घ्यावा लागतो. हे लक्षात ठेवलें असतां खड २० मध्ये छापलेल्या लेखांक ४० मध्ये आलेल्या सनांची संगति बरोबर लागते. या लेखात १५।२० तरी उपयोगी मित्या सापडतात.

४ कर्नाटकांतल्या शकावल्यांतून नुसती सवत्सरे दिली आहेत. धारवाडपासून चिकोडीपर्यंत हा प्रकार मला आढळून आला.

५ जुन्या शकावल्यात एकाच शकात पाच चार गोष्टी नमूद केल्या असतील तर तेथे दिलेला शक त्यापैकीं कोणत्या गोष्टीचा हा प्रश्न विचार करण्याजोगा असतो. काही ठिकाणी प्रारंभीचा एक शद्ब शेवटल्या गोष्टीशीच जोडावा लागतो व मधल्या गोष्टी केवळ स्पष्टीकरणार्थ खुलाशा दाखल दिल्या आहेत असें घ्यावें लागतें. हा प्रकार कर्नाटकांतील शकावलीत विशेष दिसतो. जेथे शकावलींत शके

१५८६ च्या कार्तिक मासी या शब्दापुढें पांच गोष्टी नमूद आहेत (१) येदील-शाहाचा व राजश्री स्वामीचा बिघाड होऊन (२) खवासखान कुडाळास आले (३) राजश्री स्वामी सेनेसह वर्तमान जाऊन घोरपडे मारले (४) खवास खानासी युद्ध केलें (५) तो पळून घाटावरी गेला. यापैकीं कार्तिक महिन्यांत पांचहि गोष्टी घडल्या किंवा त्यापैकी एक गोष्ट घडली अशी शका उद्‌भवते. प्रो. सरकार यांनीं दिलेल्या तत्कालीन इग्रजी पत्रांतील उताऱ्यावरून यदिलशहाचा बिघाड झाल्या-पासून खवासखानाचा पराभव होऊन तो पळून घाटावर जाईपर्यंत सरासारी वर्षभर काळ लोटला असें दिसते. कोल्हापूर व कुडाळ मार्गाने शिवाजी वेंगुर्ल्यास गेल्याचा काळ मे १६६३ (सरकार, चरित्र पृ. २६९) म्हणजे १५८५ वैशाख दिला आहे. त्यापूर्वी बाजी घोरपड्यास मारिले असले पाहिजे, असें इतर आधारावरून दिसतें. तेव्हा या पाच गोष्टींपैकी शेवटच्या म्हणजे खवासखान पळून घाटावर गेला या वाक्याशी " १५८६ कार्तिकात " या शब्दांचा सबंध जोडावा लागतो.

(६) हा दूरान्वय लक्षांत ठेवला असता शिवजन्माच्या जेधे शकावलींतील मितिबद्दलची प्रो. सरकार याची शंका नाहीशी होते.

शके १५५१ चैत्रमासी इभराहीम अदिलशाहा परलोकास गेले. सुलतान महमदशाहा तख्ती बैसले खवासखान प्रधान झाला, मुरार जगदेव कारभारी झाला ' असा मजकूर शकावलीत आहे. पैकी इब्राहीम अदिलशहा शके १५५१ मध्ये वारला नसून १५४९ मध्ये वारला हें इतर पुराव्यावरून ठरलें आहे. तेव्हां १५५१ हा शकाचा आकडा चुकला आहे व त्याबरोबर तेथेंच दिलेला शिवजन्महि चुकीच्या सदरात पडला आहे असे प्रो. सरकार यांचे म्हणणें आहे. त्याची माझी समक्ष गाठ पडल्यावेळी त्यानी मला हे मत सागितलें होते. परंतु वर सागितल्याप्रमाणें शके १५५१ च्या चैत्रातल्या शब्दाचा संबध " मुरार जगदेव कारभारी झाला " या वाक्याशीं घेऊन इतर वाक्ये खुलाशादाखल आहेत असें मानले म्हणजे सर्व विसंगतपणा नाहीसा होतो.

# १०

## कर्नाटकांत शिवपूर्वकालीं मराठीचा प्रवेश

कुंदगोळ, हुकेरी, चिकोडी, धारवाड व विजापूर येथील कागदपत्रांतून आढळणाऱ्या शकावल्यांपैकी कांहीं मला पाहाण्यास मिळाल्या पैकी कुंदगोळ येथील देसायांच्या दप्तरांतील यादींत शके १४९६ पासून १५५५ पर्यंतच्या साठ वर्षांतील कांहीं मित्या दिल्या आहेत. त्या तपासून पाहिल्यावरून विश्वसनीय आहेत असें दिसतें. परंतु मित्यांच्या विश्वसनीयतेपेक्षां यासंबंधी विशेष महत्त्वाची बाब अशी आहे की, त्या शहाजी दक्षिणेंत जाण्यापूर्वीची हकीकत सांगतात. अक्षराच्या वळणावरून देखील त्या तत्कालीन आहेत अशी खात्री वाटते आणि असे असून त्या मोडीत लिहिलेल्या आहेत. यावरून शहाजीच्या पूर्वी, मराठी भाषा कर्नाटकांत सरकारी कागदपत्रातून रूढ झाली होती असें ठरतें. चारहि ठिकाणचे कागदपत्र वाचीत असता शहाजीच्या पूर्वीच्या अंमलदारांचीं नांवें मुसलमानी व कर्नाटकी भाषा बोलणारांचीच असावी असें आढळून आलें. यात ब्राह्मणाची नावें आली आहेत; ते कानडी भाषा बोलणारे दिसतात. मराठा जातीच्या सरदाराचें नांवच त्यांत नाही. तात्पर्य मराठी भाषेचा प्रसार कर्नाटकांत होण्यास धर्माने मुसलमान पण भाषेनें मराठी असे अधिकारी कारणीभूत झाले असावे. मोंगलांचा वकील विजापूरास आला होता. तेव्हां त्याचें फारशी बोलणें आदिलशाहास समजे, पण त्याचें उत्तर तो फारशीत देऊं शकत नसे; कारण त्याला मराठी बोलण्याचाच सराव होता, असें तवारीखकरांनी म्हटलें आहे यावरून मुसलमानी धर्म मराठी भाषेच्या प्रसारास कर्नाटकांत फारसा आड आला नाही असे म्हणावे लागतें. अर्थात ही भाषा शुद्ध मराठी नसून फारशी मिश्रित होती. त्याचप्रमाणें शहाजी व त्याचा मुलगा संभाजी यानी दिलेल्या दानासंबधीचे शिलालेख पाहिले असतां कर्नाटकांत धर्मविषयक लेख कानडीत लिहिण्याचा परिपाठ होता असे दिसते.

# ११

## ज्ञानेश्वरकालीन गोमांतकी ताम्रपट

१ हा ताम्रपट फोंडे महालांतील वेरें गांवचा रहिवासी रा. आत्मारामशेट वेरेकर नांवाचे वाण्याच्या घरी सापडला. हा दोन पत्र्यांवर मिळून लिहिलेला आहे. पत्र्यांची लांबी १२ इंच व रुंदी ९ इंच आहे. पत्रे तांब्याचे असून फारसे जाड नाहीत. याच कालचे एक दोन ताम्रपट गोमांतकांत आढळले ते जाड आहेत. यांची जाडी फक्त १ मिलिमिटर आहे पत्र्याच्या मध्यभागी वरच्या बाजूस भोकें आहेत. ती दोन्ही पत्रे जोडण्यास तार घालण्याकरितां असावीत. पहिल्या पत्र्यांत १७ व दुसऱ्यात १५ ओळी आहेत.

२ याचा शक १२२१ प्रारंभीच दिलेला आहे. 'सावरी' म्हणजे 'शार्वरी' संवत्सर धरून श्रावण वद्य ८ मीस सोमवार कधीं येतो हे दीक्षितकृत जंत्रीवरून पाहतां याचा शक हल्लीच्या पद्धतीने शके १२२२ म्हणतां येईल. त्यावेळी 'तिम्म' नांवाचा मंत्री राज्य करीत होता. तो कोणत्या राजाचा मंत्री यासबधी निर्णय करण्याच्या कामीं मला बऱ्याच अडचणी भासत असल्यामुळे येथें कांहींच लिहिता येत नाही.

३ या ताम्रपटांतील लिपी जुनी कानडी (हळेगन्नड), व भाषा मराठी आणि ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. पोर्तुगीज किंवा अदिलशाहा यांचा अम्मल गोमांतकात बसण्यापूर्वी बरीच वर्षे गोमांतकांत कर्नाटकी राजांचा अम्मल चालत होता यात शंका नाही या कानडी राजांबरोबर कांही कानडी वाणी गोमांतकांत शिरले. त्यांचे लिहिणे, हिशेब वगैरे कानडीतच चाले. पण भाषा मराठी असे. हा प्रकार पाऊणशे वर्षांपूर्वीपर्यंत ह्यापसे येथे प्रचारांत होता. व अशा प्रकारचे बरेच हिशेबी कागद तेथील सरकारी दप्तरात शाबूत आहेत. मूळ कानडी भाषा बोलणाऱ्या लोकानी कालांतराने लिहिण्याच्या कामीं स्वभाषा सोडून मराठीचा आश्रय केला असावा; किंवा कानडी भाषाच अजीबात ते विसरले असावे. सध्यां या लोकाना कानडी भाषा किंवा लिपी कांहीच येत नाही. घरांतले जुने कागद मात्र कानडी लिपित व मराठी भाषेत आहेत. या चमत्कारिक प्रघाताचें मूळ शोधून काढण्यास अधीक शोध केला पाहिजे. तथापि रा. राजपुरोहित म्हणतात त्या प्रमाणें गोंवा प्रांताची भाषा कानडी होती असें मात्र मला वाटत नाहीं.

उलट या प्रांताची पूर्वापार मराठी भाषा (किंवा कोंकणी) अद्याप कायम असून कर्नाटकी राजांच्या अमदानींत देखील कानडी लोकांना (या प्रांतांतील सार्वत्रिक प्रचारांत असलेली) मराठी भाषा उचलावी लागली यावरून कर्नाटकी राजांनी येथें कांहीं काल राज्य केले व येथें काही लोक कर्नाटकी आहेत हें मान्य असलें, तरी गोमांतकाची भाषा मराठीच होती, कानडी नव्हती असे मला वाटते.

४ ताम्रपटांतील मजकुराचा अर्थ मला बरोबर लागला नाही. बरेच शब्द समजत नाहीत. तथापि खाडे गांवचे वाणी व सोनार यांचा तंटा पडल्या वेळी वेरेगांवचे वाणी आपल्या जातीच्या मदतीस धावून गेले, या उपकाराची फेड करण्याकरितां कांही दान व मान ठरवून दिले आहेत असे दिसते.

५ गोवेनगर, नारवेनगर, वेरें व बदवाडग्राम ही गावें पणजी महाल व फाडे महाल यांत सध्यां आहेत. त्याचप्रमाणें, गावेनाथ, सप्तनाथ, कपिलेश्वर, नागनाथ, ही देवळे आजतागायत ह्यात आहेत. हा ताम्रपट जेथे लिहिला ते 'खाडेग्राम' 'खंडोळे' या नांवानें सध्यां ओळखले जातें, ते अन्नुज (फोंडे) महालांत आहे; व तेथें गणनाथाची ( म्हणजे गणपतीची )मूर्ती फार जुनी आहे. त्याच देवाच्या देवळात बसून हा अग्राहार लिहिण्यात आला आहे.

ताम्रपटाची बरोबर कल्पना भा. इ. स मंडळास व्हावी, माझ्या वाचण्यातील चुका दुरुस्त व्हाव्या आणि या ताम्रपटातील मराठी भाषेचा, इतिहासजिज्ञासूंना शक्य तितका उपयोग करून घेता यावा या इच्छेनें त्याची छापिल प्रत पाठविली आहे. ती चार बंदांवर मिळून आहे. १ व २ आडवा जोडला असतां पहिला पत्रा होतो; व ३।४ मिळून दुसरा होतो. जोडाच्या ठिकाणीं ३।४ अक्षरे दुबार आढळतील. ती मुळांत नसून मी मुद्दाम आणली आहेत हे सागावयास नकोच.

१ स्वस्ति श्री साळिवान सक १२२१ वरुसां वरत्तमन सावरी संवदर श्रावण बहु
२ ळ ८ मि सोमवारी तिम्मंतरि धर्माधमि मरिकु भादुरु राज करीत आस
३ तां अग्राहरं खाडेग्रामे वारातु श्री गणनाथा देवाचा देउळीं बइ
४ सिके नगर समस्त मळेयाचा विवरु गोवे नगर पयिकी सेटिया
५ नागसेटी जणु १ तथा नगर पयिकीं गोम सेटी जणु १ तथा भयिरसेटी जण
६ १ तथा कायिसेटी जणु १ तथा लखुसेटी जणू १ यवं गोवेचे नगराचे निन
मिं ( ? यिं )
७ जण ५ नारवें नगर पयिकी सेटिया विठल सेटी जणु १ तथा नगर पयि
८ कीं सात (? ब) सेटी जणु १ तथा सोम सेटी जण १ तथा वजर सेटी जणु १ यं
९ वं नारवे नगराचेनि निमिते जण ४ चवग यवं समस्त आमीं नगरानं

१० वेरेकारासी अंत्रुजे भितरी अग्रारवेरें ग्रामे लकसेटी सिवा चांदसेटी

११ सिवा यिसर सेटीसि यवं जण ३ ती वरगासी लघु नुडि थलादाने मान्य

१२ चावी नरुतं तुमी आमचे जाति समधाचा कारे(?रि)यासि उपगा अलेत क

१३ वण कार्य म्हणाल तरी आमासी आणि सोनारांसि सवादा होउनु

१४ हाणमारी जाले समधीं तुमी वेरेंकार अमचेया वाणियाचा समयाचे

१५ संमदि विढिसि तुमी वाणी समयासि येउनु मानु समेचा राकिला समवी आ

१६ मी नगरा दोसी जानि तुमासी आमी दोसि जा नगरात्तु जातीत्तु कार्य-
विहासी( (?ओ) प्रं

१७ सओ तुमासी आमी दांन मान लुगडी विडा गध आकेत दिधले समं

(दुसरा पत्रा)

१८ धी भूसिता तथाही माने भूसिता येणें प्रमाणे प्रगु पायिले मानेण व (ल ?)

१९ ×नगर पर्यिकि भोगावें दुसरे माने नारवे नगर पयिकि भोगावे

२० तिसरे माने तुमी आमा ओपारि भोगावे आमा दो वरगासीच्यां नगरासी

२१ सलु वेरेतु कामानुपदं तितुमा वेरेकारासी भोगावावा तुमच्या जातप्रं

२२ जातान यणेचि पदेति भोगावे आमी व आमचा जातपरजातान यावचद्र

२३ क पाळावा लिहिले प्रमाणें तुमी वा तुमच्या जातपरजातान यावचद्रक

२४ पाळावे लिहिले प्रमाणे तुमीं वा तुमच्या जातपरजाताना यावचंद्रक भोगा

२५ वे म्हणउनु दिधला दानमानेचा सासनपटु होय भासेसाकी अग्राहारं कटं

२६ (क)ल ग्रामे नगर पर्यिकि विठल सेटी जणु १ तथा ग्रामे केतसेटी जणु १अग्राहा

२७ रं बंदवाडग्रामे बाळसेटी जण १ पारीकरू विठ(ल) सेटी जण १ तथा

२८ ग्रामे सात सेटी जणु १ यवं साकी जण ५ लिहित सेणवी कुळ

२९ तळी ग्रामे सारातु आहेता मांग सेणवी स्वस्ति दोप गोवें नगराचे दो(वो?)प

३० श्री गोवेनाथ देउ नारवें नगराचे दोस श्री सपत (?थ)नाथा देउ साकी दोप श्री क

३१ पिलेस्वरु देउ श्री कपिलेस्वर देउ श्री नागनाथ देऊ श्री गणनाथ देउ

३२ श्री गणनाथ देउ

---

× थें :- किंवा: अशासारखे कांही चिन्ह खोदलेलें दिसते. -सं.

# १२

## शक हें दूषण, सन हें भूषण ?

महाराष्ट्रांतील अितिहास लेखकानीं कालगणनेच्या कामी शक योजावा की सन योजवा, या प्रश्नाचें सविस्तर विवेचन कै. राजवाडे यानी पूर्वी 'ग्रंथमाले'त केलें होतें. त्यानंतर २५ वर्षांनी रियासतकार रा. गोविंदराव सरदेसाई यानी हा प्रश्न पुन. विचारास घेऊन राजवाडे यानी शकगणनेतर्फे दिलेला निकाल फिरवून सनाची बाजू मांडण्याचा प्रयत्न 'रत्नाकर' मासिकाच्या जुलै १९२९ च्या अंकात केला आहे तेव्हा या दोघांपैकी कोणाचें म्हणणें योग्य, या प्रश्नाचा विचार केला पाहिजे हा विचार शास्त्र, परंपरा, स्वाभिमान व सोय अशा चार दृष्टींनी करतां येण्याजोगा आहे.

(१) शास्त्रीय दृष्टीत साध्याचें स्वरूप निश्चित करून साधनाची निवड करण्यावर कटाक्ष ठेवावयाचा असतो तेव्हां युरोपियन अितिहासाचें शास्त्रशुद्ध अध्ययन करणारास युरोपियन समाजाचा व्यवहार ज्या अिसवी पद्धतीत चालत आला आहे त्या पद्धतीत अैतिहासिक प्रसंगाचे स्मरण ठेवणें अुपयोगी ठरेल, तर महाराष्ट्राचा अितिहास अभ्यासू पाहाणारास शकगणनेंत अैतिहासिक प्रसग लक्षांत ठेवणें आवश्यक भासेल; आणि युरोपियन आणि महाराष्ट्रीय अशा दोन अितिहासांचा तुलनात्मक अभ्यास करू पाहणारास दोनहि पद्धती पूर्ण परिचित करून घेअून सव्यसाची बनावें लागेल. सारांश, ध्येय भेदांप्रमाणें साधनात भेद पडणे अपरिहार्य आहे. शकांतला अुल्लेख पाहताच जो बिचकतो, त्याला महाराष्ट्र-अितिहासाच्या अस्सल साधनांचे शास्त्रशुद्ध परिशीलन करतां येणार नाहीं.

(२) महाराष्ट्रांतील अितिहास लेखनाची परंपरा शक पद्धतीस अनुकूल आहे हें तर अुघडच आहे. यादवाच्या वेळेपासून पेशवाअी अखेरीपर्यंतच्या सर्व व्यवहारात महाराष्ट्रीयानी शकाचा अुपयोग केलला आहे. शिलालेख, दानपत्रें, महजर, खरेदी पत्रें, शकावल्या व बखरी यांतील कालोल्लेख शकांतून दिलेले आहेत. यामुळें त्यांच्याशी समरस होअूं पहाणारास अमुक शकात व अमुक तिथीस हा अैतिहासिक प्रसंग घडला हे लक्षांत ठेवावें लागतें व लक्षांत राहतेंहि. अंकगणिताचीं अुदाहरणें सोडविणारास ज्याप्रमाणें पाडे पाठ करण्याचे कामी कंटाळून चालत नाही, त्याप्रमाणें आमच्या परंपरेनें कायम धरलेली शक गणना

अंगवळणीं पडल्यावांचून महाराष्ट्रांतील अस्सल साधनांचें वाचन सफाअीनें करतां येणार नाहीं.

(३) स्वाभिमानाच्या दृष्टीनें ' परस्थ शकांनी आपल्या शालिवाहनांचा पाडाव केल्याची ती खूण आहे ' असें सांगून शकांत ' आपली नामुष्कीच व्यक्त होते,' अतअेव अिसवी सन योजावा असे रा. सरदेसाअी सांगतात. परंतु ही कोटीदेखील चुकीची आहे. कारण मूळचा प्रयोग ' शालिवाहन शाके ' असा असून शालिवाहनाने शकांचा पराभव केल्याचें स्मरण या पद्धतीच्या मुळाशीं आहे. म्हणजे शिवाजीचा जसा राजशक तसा शालिवाहनांचा हा शक असें राजवाडे याचे मत आहे. तेव्हां शक वापरण्यांत स्वाभिमानास धक्का बसण्याचें कारण नसून तो स्वाभिमानास पोषक आहे हे अुघड आहे. आणि रा. सरदेसाअी यांचें मत ग्राह्य धरले तरी शकांनी आमचा पराभव केल्याचें स्मरण देतो म्हणून जर ' शक ' त्याज्य, तर ' सन ' हा हे स्मरण दसपटीने पटवितो म्हणून दसपटीनें त्याज्य म्हणावा लागेल. तेव्हा स्वाभिमानाच्या दृष्टीनें शकाची हीनता व सनाची ग्राहयता ठरविण्याचा रा. सरदेसायाचा प्रयत्न मान्य होण्याजोगा नाही.

(४) शेवटी सोअीच्या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. चालू विश्वविद्यालयाच्या परीक्षेत पास होण्यासाठी ज्याना महाराष्ट्राच्या अितिहासाचें अध्ययन करावयाचें आहे, त्यांना सनावलीच पाठ केली पाहिजे. त्यांची सोय शकावलीने होणार नाहीं. आणि ज्याला अस्सल मराठी साधनांच्या अभ्यासावर कटाक्ष ठेवावयाचा आहे, त्याला शकावली पाठ करणेंच सोयीचें वाटेल. पण या सोयीबरोबर 'संवय' जडते; व संवयीने अेखादी गोष्ट अेकाला लोढण्यासारखी त्रासदायक व दूषणीय वाटेल, तर दुसऱ्याला ती सुकर व भूषणावह भासेल. लुट् या संस्कृत शब्दाचा ' वॅलो' हा अिंग्रजी अर्थ लक्षात ठेवणें बिन आयासाचें व मराठी अर्थ लक्षांत ठेवणें त्रासदायक वाटतें याचें कारण केवळ सवय. संवअीने स्त्रियाना नथ हे भूषण वाटतें, पण संवय नसलेल्यांना ती वेसण वाटेल. तेव्हां राजवाडे म्हणतात त्या प्रमाणें अिंग्रजोच्या कदरीमुळें किंवा खुद्द सरदेसाअी सागतात त्याप्रमाणे पाश्चात्त्याच्या ज्या कित्येक गोष्टी आमच्या बोकांडी बसल्या आहेत त्यांपैकीं अेक म्हणून खिस्ती गणना आमच्यावर लादली गेली व पुढें तिचा प्रसार अिंग्रजी राज्यकर्त्यांनीं स्वतःच्या सोअीसाठी केला व तो संवअीनें आमच्या अंगवळणी पडत आहे. पण त्यावरून महाराष्ट्रेतिहासाच्या प्रगतीस तो अुपकारक होअील असें म्हणतां येणार नाही. किंवा शकाच्या या दुराग्रहामुळे (पुरंदरे दप्तराच्या) संपादनांत चुका होतात हाहि रा. सरदेसायांचा समज साफ चुकीचा आहे. शिवाय आमच्या अितिहासांतले प्रसंग देशी पद्धतीनें लक्षांत ठेवणें सोअीचें असतें किंवा अिंग्रजी तारखेने ही सोय अधिक होते, हें प्रत्यक्ष प्रयोगानें स्वतंत्रपणें ठरवावयाचें असल्यास ' भाअूसाहेब रंगपंचमी करून

पडदुराहून निघाले' हें वाक्य अेका विद्यार्थ्यास समजावून द्यावें व 'भाअूसाहेब मार्चच्या अमुक तारखेस निघाले हें दुसऱ्या विद्यार्थ्यास सांगावें; व कोणाच्या लक्षांत तें सहज रहातें हे पाहावें. सारांश, संस्कृत शिकण्यास मराठी भाषा हें सोअीचें साधन याविषयी ज्याप्रमाणें शंका घेण्यास जागा नाही, त्याप्रमाणें आमच्या विद्यार्थ्यांना शकांत व मराठी महिन्यांत अितिहास शिकण्याची परवानगी मिळेल तर महाराष्ट्राचा अितिहास लक्षांत घेणें अधिक सोअीचे होअील हे निर्विवाद आहे. आता क्रॉमवेल् व शिवाजी याची तुलना करण्याचा प्रश्न सध्या परीक्षेंत विचारण्यांत येतो व दोघांचेहि सन लक्षांत असले म्हणजे या प्रश्नाचे अुत्तर देण्यास सोअीचे पटतें हें खरें आहे. पण हे सन चालू परीक्षांत पास होण्यास अुपयोगी पडतात असें यावरून ठरेल अितकेच. कारण हे सन तयार असणाऱ्यांपुढे अेखादी बखर अगर शकावली टाकली तर ती त्याला बोधप्रद होण्याऐवजी डोकेदुखीस कारण होअील. तथापि प्रचलित परीक्षा पद्धतीच्या दृष्टीने अुपयोगी पडणारी अैतिहासिक पुस्तकें लिहिणाराने सनावली द्यावी व शकावलीचे लोढणें विद्यार्थ्यांच्या गळ्यांत अडकवूं नये हे मत मान्य होण्याजोगें आहे. मात्र, महाराष्ट्राच्या अितिहासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करूं अिच्छिणाऱ्या लेखकानें शकावलीचा परिचय वाढविण्यासाठी झटणें व अितरांनाहि त्या परिचयाची अुपयुक्तता पटवून देणें जरूरीचें आहे. रा. सरदेसायांच्या शब्दांत सांगावयाचे असल्यास सनावली ही 'आमच्या बोकाडी बसलेल्या गोष्टी पैकी एक आहे आणि संवअीने सनावली अधिक परिचयाची व शकावली हें लोढणें अथवा दूषण असें आपणांस भासते. परंतु खरा प्रकार म्हटला म्हणजे सनावली हें लोढणें आहे आणि शकावलीच्या परिचयाने महाराष्ट्राच्या अितिहासाची प्रगति करण्यास मदत होण्याजोगी आहे. यामुळे अशी प्रगति करूं अिच्छिणाऱ्या संशोधकानें व संस्थेनें शकावलीच्या परिचयास आद्यस्थान द्यावें हे क्रमप्राप्तच होय. तात्पर्य--

(१) शास्त्रदृष्टया महाराष्ट्राच्या अितिहासाची प्रगति होण्यास सनापेक्षां शकाचा परिचय अधिक अुपयोगी पडतो (२) परंपरा शक पद्धतीस अनुकूल आहे, (३) स्वाभिमानाच्या दृष्टीने शकापेक्षा सन वापरण्यास कमी हरकत पडेल असें म्हणतां येत नाही (४) चालू शाळा--कॉलेजांतील विद्यार्थ्यांची सोय सनावली पाठ करण्यांत आहे; व महाराष्ट्रांतील संशोधकांची सोय शकावली पाठ असण्याने होण्याजोगी आहे. (५) शकाचा अुल्लेख त्रासदायक भासणे व सनाचा सोअिस्कर वाटणें हा केवळ संवअीचा परिणाम होय.

# भाग ३ रा

# मराठ्यांच्या इतिहासावरील स्फुट विचार

[ दुसऱ्या भागांत संशोधनाच्या फलापेक्षां संशोधनाच्या पद्धतीकडे अभ्यासकाचें विशेष लक्ष वेधतें, व त्यांतील बहुतेक लेख शिवकालीन आहेत. या तिसऱ्या भागांत पद्धतीपेक्षां फलाचें माहितीचें महत्त्व अधिक वाटतें. येथें शहाजी पूर्वकालापासून सवाई माधवरावाच्या मृत्यूपर्यंतच्या दीर्घ कालांतील विविध विषयावर झालेलें लेखन एकत्रित केलें आहे. प्रस्तुत भागांत विस्तारभयास्तव घेतले नाहींत पण ज्यांचें वाचन अवश्य आहे असे अनेक लेख आहेत. 'शिवचरित्र निबंधावलि' या ग्रंथांतील त्यांनीं लिहिलेल्या स्फुट लेखांखेरीज शिवाजीची योग्यता वर्णन करणारा 'उपसंहार' हा त्या ग्रंथांतील लेख विशेष वाचनीय आहे. तसेंच मुधोळच्या घोरपडे घराण्याच्या इतिहासांत 'आदिलशाही राज्याचें स्वरूप' (पृ.९३-१०६) हा भागही वाचनीय आहे. या खेरीज भारत इतिहास संशोधक मंडळाच्या प्रकाशनांतून 'पाटील बोवांचीं चार वर्षें' ( षष्ठसंमेलन वृत्त शके १८४० पृ. १-२० ) 'पाटीलबोवांचें राजकारण' ( सप्तसम्मेलन वृत्त शके १८४१ पृ. १-४८ ) हे विस्तृत लेख महादजी शिंद्याच्या चारित्राचा अभ्यास करणारानें पाहिले पाहिजेत. या भागांत केवळ वानगी दाखल एकच लेख ( नं. १८ ) देता आला. मंडळाच्या त्रैमासिकांत त्यांनीं अनेक बारीक सारीक टिपणें लिहिलीं त्यांतील तपशीलाचें महत्त्व त्या त्या विषयाच्या अभ्यासकास असलें तरी कै. आपटे यांच्या लेखनाचा परिचय होण्यास त्याची विशेष आवश्यकता नाहीं असें वाटून ते लेख पुनः उद्धृत केलेले नाहींत. खेरीज कै. आपटे यांचा 'श्रीरंगपट्टणची मोहीम' हा चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेला ग्रंथ त्यांचा मोहिमांच्या तपशीलाचा सूक्ष्म अभ्यास दर्शवितो. या ग्रंथांतील 'मराठे वीर व मराठे शाहीर' ( पृ. १२९-१४४ ) 'मराठी व इंग्रजी सैन्याची मुलाखत' ( पृ. १४५-१५७ ) हीं दोन प्रकरणें तर मराठ्यांच्या इतिहासाच्या सामान्य अभ्यासकासही अवश्य वाचनीय आहेत. सं. ]

# १३

## शहाजीच्या जन्मापूर्वीची परिस्थिति

व

## निजामशाहीचा अंत

शिवाजी व शहाजी या दोघांनीहि महाराष्ट्राच्या अितिहासांत आपलें नांव चिरस्थाअी करून ठेवलें आहे. दोघेहि पराक्रमी, धाडसी, राजकारणी व स्वाभिमानी होते. दोघानाहि अत्यत अडचणीच्या परिस्थितीतून आपले डोकें वर काढावयाचें होतें आणि ते काढीत असतां दोघांनाहि हिंदु समाजाच्या राजकीय महत्त्वाकांक्षा कशा वाढतील याची चिंता वाहावी लागली. असंतोष हेंच दोघांच्याहि मनोवृत्तीचें बीज होतें आणि दोघांनाहि अनेक प्रकारच्या हिकमती योजून आपलें ध्येय गांठण्याची खटपट चालू ठेवावी लागली. अशा प्रकारें शहाजी व शिवाजी यांच्या राजकीय अुलाढालीत व मनोरचनेत साम्य असून देखील, शिवाजी महाराजांनी राज्यक्रान्ति घडवून आणली, स्वराज्य प्रस्थापित केले आणि महाराष्ट्राच्या अितिहासांत नवा मनु सुरू केला असें आपण म्हणतो. आणि शहाजीच्या हातून असें न घडल्यामुळे त्याचें नाव तादृश महत्त्वाचे गणले जात नाही. शिवाजी महाराजांनी स्वराज्य प्रस्थापित केल्यामुळे त्याच्या हाताखालीं वावरणाऱ्या नोकरांना स्वराज्य संस्थापनेस मदत करणारे, स्वधर्मप्रीत्यर्थ प्राण खर्ची घालणारे धर्मवीर अशी नांवें देण्यांत येतात; आणि शहाजी हा मुसलमानांच्या नोकरींत राहिला व त्याच्या हुकुमानें त्याने दक्षिणेतील अनेक हिंदू राज्यें बुडविलीं, यामुळे त्याच्या हाताखालीं काम करणाऱ्या सैनिकांना भाडोत्री सैन्य ( mercenaries ) आणि शहाजीच्या मारामाऱ्यांना अराष्ट्रीय ( unnational ) असे विशेषण विद्वानांकडून देण्यात येत आहे. आणि या भेदभावाबद्दल फारशी तक्रार करता येणार नाही. दोघांच्याहि अुदयकाली बऱ्याच गोष्टी समान असून परिस्थिति-भेदामुळे शहाजीला व्यापक व स्वाभिमानी राजकारण शेवटपर्यंत रेटून नेतां आलें नाही. आणि शिवाजी महाराजांच्या वेळी परिस्थिती बदलल्यामुळें अिष्ट हेतु सिद्ध करतां आला हें ज्याप्रमाणें खरें आहे, आणि परिस्थितीची अनुकूलता आणि प्रतिकूलता अवश्य विचारांत घेतली पाहिजे हें जरी निर्विवाद आहे, तरी शिवाजी महाराजांचा स्वातंत्र्याविषयींचा निर्धार

जसा खणखणीत होता तसा शहाजीचा नव्हता याबद्दल शंका घेतां येत नाही. तेव्हां शहाजी व शिवाजी यांच्या आयुष्यास विशिष्ट वळण लागण्याच्या वेळी म्हणजे अुदयकाळी ज्या परिस्थितीनें अेकाच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याचा दृढ निर्धार अुत्पन्न केला व दुसऱ्याच्या मनांत स्वातंत्र्याची अिच्छा असली तरी तिला निर्धाराचें स्वरूप न येतां केवळ महत्त्वाकांक्षेचें स्वरूप आले, त्या परिस्थितीची माहिती करून घेणें बोधप्रद व मनोरंजक आहे. पैकी येथें शहाजीच्या कालीं काय परिस्थिती होती याचेंच मुख्यतः कथन करावयाचें आहे.

शहाजीच्या अुदयाची मीमांसा करण्यास भरपूर माहिती उपलब्ध नाहीं. यामुळें ही मीमांसा केवळ रूपेरेखेच्या स्वरूपाची होअूं शकेल, तपशीलवार होणार नाही हे तर अुघडच आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्राची माहिती जेथें अगदी तुटपुज्या स्वरूपाची व वादग्रस्त स्थितीतली अशी आहे, तेथें शहाजी-विषयी तर बोलावयासच नको. बहुतेक ठिकाणी नन्नाचाच पाढा वाचण्याचा प्रसंग आहे. पण अितिहासाचार्य राजवाडे याच्या खटपटीने जे अितिहास संशोधनाचें कार्य गल्या तीस वर्षांत महाराष्ट्रांत चालू राहिलें आहे त्या संशोधनानें शहाजीविषयी माहितीच्या बाबतींत पूर्वीं जो अगदीच काळाकुट्ट अंधार होता तो कमी होअून थोडीबहुत प्रकाश किरणें शहाजी चरित्रावर पडूं लागली आहेत. तेव्हां ती जमेस धरून शहाजीच्या जन्माच्या वेळच्या परिस्थितीचें स्वरूप येथे थोडक्यांत सांगणार आहे.

शहाजी जन्मला तेव्हा दक्षिण हिंदुस्थानांत सर्वत्र मुसलमानांची राज्ये फैलावली होती. विजापूरची आदिलशाही, नगरची निजामशाही, व गोंवळ-कोंड्याची कुतुबशाही, अशा तीन शाह्या त्यावेळी दक्षिणेत नांदत असून त्या सर्वांवर बहिरीससाण्याप्रमाणें झडप घालून त्यांचा नायनाट करण्यासाठीं मोंगलांची सत्ता दिल्लीस वाढत्या जोमाने व " दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा " या थाटाने तळपत होती. यावेळी हिंदुस्थानांत दिल्लीपासून विजापूरपर्यंत मुसलमानी बादशाहा होते हे जरी खरें, तरी सर्व मुसलमानी धर्माच्या अभिमानानें प्रेरित होअून आपल्या हाती असलेल्या राजदडाचा अुपयोग धर्मप्रसारार्थ करीत होते असें मात्र म्हणतां येत नाहीं. अुलट हे बादशाहा मुसलमानी धर्माचे खरे अभिमानीच नव्हते, अशी कडव्या मुसलमानांना तक्रार करण्याची पाळी त्यावेळीं आली होती. राजकीय व धार्मिक भावना नेहमीच अेकमेकांस सहाय्यकारक असतात असें नाही. या दोहोंचे मार्ग कित्येक वेळी अगदीं भिन्न म्हणजे विरुद्ध दिशेनें गेलेले असतात अुदाहरणार्थ, सहाशें वर्षांपूर्वीं ज्ञानेश्वरांच्या वेळीं दक्षिणेंत मुसलमान आले तेव्हां अिकडे महाराष्ट्रांत, गुजराथेंत, तेलंगणांत, कर्नाटकांत व तामीळ अथवा द्रविड देशांत स्वतंत्र व समृद्ध अशी हिंदु राज्यें नांदत होतीं.

त्यांच्याशी लढून खंडणी मागतांना ते हिंदु व आपण मुसलमान हें लक्षांत ठेवणें त्यांना फायद्याचें होतें. राजकीय व धार्मिक अशा दोनहि भावनाचा त्यावेळीं मेळ घालून मुसलमानी योद्ध्यांना हिंदु राजांविरुद्ध लढण्याचा आवेश अुत्पन्न करतां येत होता. परंतु पुढें हिंदु राज्ये बुडवून दक्षिणेंत मुसलमानांनी आपलें राज्य प्रस्थापित करण्याचा अुपक्रम केला, तेव्हापासून परिस्थिती पार बदलून गेली. हिंदु राजापासून खंडणी घ्यावी, व ती जबर खंडणी घ्यावी, असे म्हणण्यांत मुसलमानांत दुमत होण्याचें कारण नव्हतें. परंतु सर्व हिंदु राज्ये बुडवून त्या जागी मुसलमानी राज्ये प्रस्थापित झाल्यापासून 'आता या राज्याची सूत्रे कोणाच्या हातांत असावी व दिल्लीकरांचे अकितत्व यापुढें दक्षिणेतील मुसलमानी राज्यांनी मान्य करावें की नाही' हा वादग्रस्त प्रश्न होअून बसला. धार्मिकदृष्टया, दिल्लीपतीचें अकितत्व दाक्षिणात्यांनी मान्य केले काय, आणि न केले काय, सारखेंच होतें. परतु राजकीयदृष्टया मात्र यात जमीन अस्मानाचे अतर होते. दिल्लीपतीचें अकितत्व झुगारून देण्यास हरकत नाही असें म्हणणाऱ्या पक्षानें दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना केली व दिल्लीपतीचें महत्त्व व सत्ता दक्षिणेंतून हुसकून लावली. अर्थात हें बड शुद्ध राजकीय भावनेचे फळ होते. बहामनी राज्य स्थापन करण्यात धार्मिक हेतु होता असें केव्हाहि प्रतिपादन करता येणार नाही पण ज्या राजकीय भावनेने दिल्लीचे सूत्र तोडून, बडखोरीचा शिक्का पत्करून, गुलबर्गा व बेदर येथें स्वतंत्र मुसलमानी राज्य चालविण्यात आले, त्याच राजकीय भावनेने, तुगभद्रेच्या दक्षिणेस विजयनगरच्या हिंदु राज्याची प्रस्थापना झाली. त्यावेळी दळवळणाचे मार्ग सध्या प्रमाणे सोअीचे नसल्यामुळे दिल्लीपतीस नर्मदेच्या दक्षिणेस आपला अंमल कायम ठेवणे अशक्य झाले व दक्षिणेतील बड मोडता आले नाही. परंतु हीच संधि साधून कर्नाटकच्या होयसळ राजांनी मुसलमानांचा मदुरा येथील सुलतान नेस्तनाबूद केला यामुळे दिल्ली-पासून रामेश्वरापर्यत पसरलेला अेकछत्री मुसलमानी अंमलाचा देखावा बदलून त्याचीं तीन शकले झाली. अेक अुत्तरेस दिल्लीकरांचे नर्मदेपर्यंतचे राज्य; दुसरें तुंगभद्रेपर्यंतचें बहामनी राज्य व तिसरे तुगभद्रेच्या दक्षिणेस विजयनगरचें राज्य. हीं शकलें पाडण्याचा धडा मुसलमानांनीच घालून दिला. आणि तोच धडा गिरवून कर्नाटकाने मुसलमानी सत्तेचे निर्मूलन तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील प्रांतांतून केलें. यानंतर दिल्लीच्या सिंहासनावर दोन अडीचशें वर्षें 'साऱ्या हिंदुस्थानचें साम्राज्य अुपभोगावें' असा म्हणणारा महत्त्वाकांक्षी बादशहा आला नाहीं. यामुळें बहामनी राज्यास महाराष्ट्रांत व तेलंगणांत चिरस्थाअी होण्यास बरीच फुरसत सांपडली आणि तुंगभद्रेच्या दक्षिणेस विजयनगरचें राज्य बद्धमूल होण्यास हीच परिस्थिती अुपकारक झाली.

ही स्थिरस्थावर हिंदुस्थानच्या भूगोलिक रचनेनें घडवून आणलेली होती. त्याकाळी विंध्याद्रि व तुंगभद्रा यांच्या योगानें हिंदुस्थानचे असे स्वाभाविक तीन तुकडे पडत होते व त्यांत अेवढी मोठी राज्ये किंवा साम्राज्यें भरभराटण्यास वाव होता, कीं त्यांनी अेकमेकांशीं मारामारी करण्याचें नैसर्गिक असें कांहीं अेक कारण नव्हतें. परंतु, धर्म अगर साम्राज्य या खेरीज तिसरी व्यापक कल्पना त्या वेळच्या लोकांसमोर नसल्यामुळे शांततेचा काळ त्यांना कंटाळवाणा होअी; आणि धर्माच्या अगर साम्राज्याच्या नांवाखाली ते अेकमेकाशी मारामारी करीत. लोकसत्तेचा प्रसार, अुद्योगधंद्याची वाढ, व्यापाराचा अुत्कर्ष, शास्त्रीय शोध अित्यादि व्यवसायांत गढून जाअून बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी लोकांना आपली कर्तबगारी दाखविण्यास शांततेच्या काळांतहि आज अडचण पडत नाही; तसा प्रकार त्यावेळी युरोपात नव्हता व हिंदुस्थानांत तर नव्हताच नव्हता. अुत्तर हिंदुस्थानांत जमीन सुपीक व मनुष्य संख्याहि भरपूर असे. त्यामुळें तेथें महत्वाकांक्षी राजा दिल्लीच्या पदावर आला की, त्याच्या मनांत दक्षिण हिंदुस्थान काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा अुत्पन्न होअी विजयनगरच्या राज्यात राजा व प्रजा हिंदूधर्मी असल्यामुळे अंतस्थ यादवीचा प्रश्न फारसा अुद्भवत नसे. पण नर्मदा व तुंगभद्रा यांच्यामध्ये असलेल्या बहामनी राज्यात मात्र मध्यवर्तित्वामुळें अनेक भानगडीचे प्रश्न अुपस्थित झाले. बहुतेक प्रजा हिंदूधर्मी असल्यामुळें राज्यकर्ते या नात्याने कडव्या मुसलमानी पक्षाचे धोरण पतकरणे सोअीचें नाही, हें त्यांना समजण्याजोगे होतें. पण हिंदु लोकांना चांगल्या रीतीनें वागविलें व ते समृद्ध झाले तर समान धर्मामुळे ते विजयनगरच्या राजास मदत करतील व आपल्या राज्यावर संकटे ओढवतील, असेंहि त्याना भय वाटणे सहाजिक होतें. अुलट पक्षीं दिल्लीपतीनें दक्षिणेवर स्वारी केली, तर त्याच्यापासून निभाव लागण्यास शूर शिपायाचा व शूर सरदाराचा आरणाम पाठिंबा पाहिजे; मग ते शिपाअी हिंदू असोत की मुसलमान असोत, धर्माचें महत्त्व नाही हें तत्त्व ज्यांना पटलें आहे असेहि मुत्सद्दी या राज्यांत वावरत होते. यामुळें हिंदू लोकांशी कोणत्या धोरणानें वागावें आणि दिल्लीकराच्या हल्ल्यापासून आपले रक्षण कसें करावें या दोन मुद्द्यांवर मतभेद माजण्याजोगा होता. परंतु बरीच वर्षेपर्यंत दिल्ली व विजयनगर येथील सिंहासनावर चढाअीचें धोरण स्वीकारणारे राजे आले नाहीत; यामुळें वर सांगितलेले दोनहि मुद्दे प्रामुख्याने अुपस्थित न होतां तिसराच मुद्दा निर्माण झाला. व तो मुसलमानातील पोटभेदासबधीचा होता. बहामनी राज्याच्या प्रस्थापनेस व वाढीस ज्याचे मुख्यत: सहाय्य झाले, असे मुसलमान तुर्कस्थान, अिराण वगैरे देशातून आले होते; व ते स्वभावत: शूर व धाडसी असल्यामुळे त्याना राज्यातील महत्त्वाच्या जागा मिळत; ते आपणास मुसलमानी धर्माचे व राज्याचे आधारस्तंभ मानीत आणि आपल्या मानानें अितरांस 'दक्षिणी'

व कमी प्रतीचे लेखीत. आणि 'दक्षिणी' मुसलमान आपणांस कमी लेखणाऱ्या या बाहेरच्या मुसलमानांना 'परदेशी' म्हणत. अशा रीतीनें मुसलमानांत 'दक्षिणी' व 'परदेशी' असे पक्ष (राज्यांतील अधिकारांच्या जागा कोणास मिळाव्या या संबंधीं) अस्तित्वांत आले होते. हे पक्ष राजकीय महत्त्वाकांक्षेचे द्योतक होते; त्यांत धर्माचा फारसा संबंध नव्हता. पण परदेशी पक्ष अधिकारारूढ झाला म्हणजे बादशहांस अिस्लामी धर्माच्या प्रसारार्थ खटपट करण्याची सल्ला मिळे व कित्येक हिंदूंच्या कत्तली होत. फिरिस्तानें अशा कित्येक कत्तलीची वर्णने दिलीं आहेत व महंमद गवानानें बहामनी राज्याची मर्यादा वाढवून परदेशी पक्षाचें अैश्वर्य परमावधीस पोचविल्याचे वृत्त दिले आहे. पण गवानाच्या चढेल व पक्षपाती वर्तनाने चिडून जाऊन 'दक्षिणी' पक्षानें त्याचा खून केला आणि बहामनी राज्य मो ून त्याच्या पांच शाह्या बनल्या.

या पांच शाह्यांपैकी गोवळकोंडें येथील कुतुबशाहीचा संस्थापक व विजापूरच्या आदिलशाहीचा सस्थापक हे 'परदेशी' म्हणजे कडव्या मुसलमानी पक्षाचे; आणि अहमदनगर येथील निजामशाहीचा सस्थापक निजामशहा हा 'दक्षिणी' पक्षाचा पुढारी होता. विजापूर व गोवळकोंडे येथील शाह्यांची सरहद्द विजयनगरशी भिडली असल्यामुळें व विजयनगर येथें हिंदू राज्य असल्यामुळे त्याच्याशी शत्रुत्वाची भावना जागृत राहून गोवळकोंडे व विजापूर येथें 'हिंदूना डोकें वर काढूं द्यावयाचें नाही' या गोष्टीवर राज्यकर्त्यांना कटाक्ष ठेवावा लागला पण अहमदनगरच्या निजामशाहीत मात्र अुलट प्रकार अस्तित्वांत आला. या राज्याच्या सरहद्दी चोहोकडून मुसलमानी राज्याला भिडल्या होत्या; आणि या सभोवारच्या शत्रुपासून आपले संरक्षण करावयाचें, तर त्यास हिंदू व मुसलमान हा भेदभाव लक्षांत न घेता, केवळ लढाऊपणाचा गुण ज्याच्या ठिकाणी अुत्कटपणें वसत असेल त्यांचा संग्रह करण्याचे धोरण पत्करण्यावांचून निजामशाही मुत्सद्यांना गत्यतर नव्हतें. राज्यविस्तार हे निजामशाहीचे धोरण नव्हते. राज्यघटना हे त्यांचें ध्येय होतें. विजयनगरचें राज्य बुडविल्यावर दक्षिणेंतील मुलुख पचविण्यांत आदिलशाही व कुतुबशाही मुत्सद्यांचे बुद्धिसर्वस्व खर्ची पडण्यासारखें होतें. याचा अर्थ तेथें संघटनेपेक्षां राज्यविस्ताराची तृष्णा वाढण्यास अनुकूल अशी परिस्थिती होती. मिळून अकबरानें दक्षिण जिकण्याचा संकल्प केला तेव्हां त्याला प्रथम संघटित असें निजामशाहीचें राज्य बुडवून नतर विजापूर व गोवळकोंडे येथील राज्ये घेण्याचा प्रश्न सोडवावयाचा होता.

निजामशाही राज्य संघटित होतें असें वर सांगितलें त्याचा अर्थ तारतम्यानेंच घ्यावयाचा आहे. बिजापूर व गोवळकोंडा येथील राज्यांत हिंदू व मुसलमान यांच्यांत तेढ होती, शिया व सुनी असे भेद पडले होते, आणि अंतस्थ

सुधारणेपेक्षां बाहेरचा मुलुख काबीज करण्याकडेच अधिक प्रवृत्ति होती, त्या मानानें निजामशाहीत हिंदूच्या कर्तबगारीस प्रतिबंध नव्हता. लोकांत अेकोपा राहून शत्रूशीं ते कसें तोंड देतील याचीच चिंता तेथील मुत्सद्द्यांना वाटे आणि हिंदु व मुसलमान बरेच सलोख्याने वागत. राज्यरक्षणाच्या चिंतेने निजामशाही मुत्सद्यांना सावधानता शिकविली होती व धर्माच्या नांवाखालीं गबाळ लोकांना निशाणाचें धनी बनविलें असतां मोगलांच्या माऱ्यापुढे आपला निभाव लागणार नाही हे त्यांच्या लक्षांत आले होते. व यासाठी त्याच्या राज्यात अनेक हिंदु व मुसलमान फौजबंद सरदार निर्माण झाले. निजामशाही पदावर कर्ता पुरुष असणें अगर नसणें ही योगायोगाची गोष्ट असली तरी, निजामशाहीत आपल्या गुणाच्या जोरावर महत्त्वास पावलेल्या सरदारात क्षात्र तेज कायम राहण्याचा संभव जास्त होता. आणि हे क्षात्र तेज वाढण्यास निजामशाहीत अनुकूल परिस्थिती असल्यामुळे निजामशाही पदावरली अेक व्यक्ति बुडविली तरी दुसरे बाहुले पुढें करून निजामशाही राज्य कायम ठेवण्यासाठी अनेक कर्ते पुरुष पुढें सरसावल्याची हकीकत निजामशाच्या अखेरीस वाचावयास मिळते.

निजामशाही राज्यासभोवतालची परिस्थितीच अशा खडतर स्वरूपाची होती की तेथें काटक मनोवृत्तीचा परिपोष व्हावा व सौम्यवृत्ती लुप्तप्राय व्हावी. अुत्तरेस मोगली, पूर्वेस कुतुबशाही, दक्षिणेस आदिलशाही आणि पश्चिमेस फिरंगी सैन्ये वावरत असल्यामुळे सदैव सैन्य ठेवणें हे तर निजामशाहीचें ब्रीदच बनलें होते, व डोंगरी किल्ले लढविणें. कूटयुद्ध करणें, घोडेस्वारानी गनीमी पद्धतीचें अवलंबन करून शत्रूस जेरीस आणणें अित्यादि प्रकारांत निजामशाही सरदारांचा हातखंडा असे. पण अशाहि निजामशाहीचा निभाव त्याकाळी लागला नाही. यासंबंधी शिवभारतकाराने म्हटल्याप्रमाणें—

यस्याशीतिसहस्राणि तुरगाणां तरस्विनाम ।
अशीतिरद्रिदुर्गाणां चतुर्भिरधिका पुनः ॥
स्थले जले च यस्यासन् बत दुर्गाण्यनेकशः ।
समृद्धो विषयो यस्य वशे विद्वेषि दुर्ग्रहः॥
येन येदिलशाहस्य दिल्लीन्द्रस्य च मानिनः ।
पदे पदे बलं सर्वं जीवग्राहं व्यसृज्यत ॥
यस्याकस्मिकझपस्य इयेनस्येवोत्पतिष्यतः।
प्रभावेण न्यलीयन्त परिपन्थिविहगमाः ॥
स निजामस्तदा येन हेतुना विलयं गतः ।
शुश्रूषमाणान् नः सर्वान् कवीन्द्र तमुदीरय ॥

ज्या निजामशहाजवळ अंशीं हजार चलाख घोडा होता, ज्यांच्या राज्यांत जलदुर्ग, स्थलदुर्ग व गिरिदुर्ग म्हणजे डोंगरी किल्ले चौऱ्याअेंशी होते, ज्यांच्या ताब्यांत समृद्ध व [illegible] अजिक्य असा प्रदेश होता, ज्यानें आदिलशाहाच्या आणि मानी दिल्लीपतीच्या सैन्याचा पावलोपावली फडशा अुडविला होता, भयावह ससाण्याच्या झडपेप्रमाणें ज्याच्या आकस्मिक छापाच्या जोरामुळें शत्रुरूपी पक्ष्यांवर लपून बसण्याचा प्रसंग येअी, त्या निजामशाहाचा नाश कोणत्या कारणामुळें झाला याची चर्चा मनोरंजक होण्याजोगी आहे यांत शंका नाही. या चर्चेंतूनच शहाजीच्या उदयाची मीमांसा निष्पन्न होत असल्यामुळे ती विषय स्वतंत्रपणें मांडणें श्रेयस्कर होअील.

---

# १४

## थोरल्या बाजीरावाच्या ध्येयाची मीमांसा

सुमारें पस्तीस वर्षांपूर्वी कै. पारसनीस यानी ब्रह्मेंद्रस्वामीचा पत्रव्यवहार प्रसिद्ध केला तेव्हां बाजीराव बल्लाळ पेशवे यास कर्जाच्या विवंचनेने किती ग्रस्त केलें होतें यासबंधीचीं अस्सल पत्रे मराठी वाचकांना अुपलब्ध झाली; व अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पेशवे दप्तरातील कांही पत्रांत बाजीराव–मस्तानी संबंधाची कांही नवी माहिती बाहेर आली. परतु बाजीरावाची योग्यता ठरवितांना या दोन्हीहि गोष्टींना महत्त्व देण्याचें प्रयोजन नाही. कारण बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनतर बाजीरावाने पेशवेपद वीस वर्षें जे चालविलें, तेवढ्या अवधीत त्याने मराठ्यांचा दरारा आपल्या कर्तबगारीने वाढविला किंवा नाही या प्रश्नाचें अुत्तर शोधणें अधिक महत्त्वाचें आहे. आपणास या ठिकाणी याच प्रश्नाचा म्हणजे बाजीराच्या राजकीय ध्येयाचा व धोरणाचा विचार करावयाचा आहे.

कामगिरीच्या स्वरूपावरून बाजीरावाच्या कारकीर्दीचे दोन भाग कल्पितां येतात. शाहूच्या दरबारात आपलें महत्त्व प्रस्थापित करणें हे बाजीरावाचें प्रारंभीचें ध्येय दिसतें; आणि मराठ्यांचें नांव किंवा दरारा दिल्लीपर्यंत पोंचविण्याच्या कल्पनेस त्यानें अुत्तराधींत प्राधान्य दिलेलें आढळतें. अेका कल्पनेच्या पोटीं दुसरी

कल्पना जन्मास येते, या न्यायानें शाहूच्या दरबारांत बाजीरावाचें वजन वाढूं लागलें, त्या मानानें दिल्लीच्या राजकारणांत हात घालण्यास लागणारा आत्मविश्वास त्याच्या अन्तःकरणात वाढू लागला, असें म्हणण्यास हरकत नाही.

पेशवाओची वस्त्रे मिळाली तेव्हां बाजीरावास शाहूच्या दरबारांत मान्यता नव्हती. प्रतिनिधि, दाभाडे, बांडे, भोसले, सरलष्कर वगैरे अनेक सरदार शाहूच्या पदरी असून कर्नाटक, कोल्हापूरकर, जंजिरेकर व औरंगाबादचा नबाब याच्या संबंधींचे अनेक गुंतागतीचे प्रश्न सोडविण्यांत हे सरदार गुंतले होते. त्यांत कोणती स्वारी कोणाकडे सोंपवावयाची हे ठरविणें शाहूच्या मर्जीवर असे. अर्थात् बाजीरावाला कोणत्या स्वारीत कोणत्या सरदाराशी सहकार्य करावें लागेल किंवा कोणाच्या हाताखाली दुय्यम म्हणून वागावें लागेल, आणि शाहू त्याला स्वारी अर्धीच टाकून परत केव्हां बोलवील, याचा मुळिच नेम नसे. अेवढेच नव्हे, तर भेटीला जाण्यास अुशीर होताच शाहू किती कडक शब्दांनी बाजीरावाची हाजिरी घेत असे हें पाहिलें, म्हणजे बाजीरावाचे महत्त्व यावेळी शाहूला फारसें वाटत नव्हतें हें अुघड दिसते अशाच अेका प्रसंगी अुशीर होतांच शाहूने, अेका पत्रांत पुढील वाक्यें योजिली आहेत: " कितेक अर्थ समक्ष बोलावे म्हणोन तुम्हांसच हुजूर येण्याची आज्ञा करून वरचेवर पत्रें सादर जाली असता अद्याप येण्याचा विचार दिसत नाही यावरून काय म्हणावें ?......अेक वेळ तुम्ही येअून समजोन घेअून करावें. काही दिवस अेक वेळ समक्ष ( भेट ) झाल्या व्यतिरिक्त कोणतेहि कर्तव्य स्वामीस नाही पुढें तुम्हापासून घडतच नाही असा विश्वास जालिया स्वामीस विचार करणें प्राप्त होअील. तो दिवस अवघड वाटेल. मग धावा धावा करूं लागाल म्हणोन वारवार सुचवितों. तुमचे वडिलांनी निष्ठा धरून चालल्या कल्याण जालें न जाले हे तुम्हींच चित्तांत आणावें. (खंड ६, ले. १६)

यावरून आपल्या मर्जीविरुद्ध वागणाऱ्या नोकराची भीडमुर्वत आपण धरणार नाही, असें यावेळी शाहू स्पष्टपणें बजावीत असे. शाहूच्या दरबारात कोणीहि जबाबदार कारभारी किंवा दिवाण नसून कारभाराचे धोरण स्वत तोच ठरवी असें दिसते यामुळें कोणाकडे सोंपविलेले काम तडीस गेले व कोणाकडचें गेलें नाहीं याची हाजिरी शाहू जवळ लागे; आणि यशस्वी सरदाराचे महत्त्व सहजच त्याला अधिक वाटे अर्थात् बाजीरावासारख्या नव्या माणसासंबधानें शाहूच्या मनात गैरसमज अुत्पन्न होण्याचाहि बराच संभव असे. पण महादबा पुरंदरे या धोरणी व वजनदार मुतालिकाची नेमणूक लौकरच त्याजकडे करतां अत्यामुळें त्याची मर्जी सभाळण्याचें व बाजीरावाची बाजू त्याच्या पुढें मांडण्याचें काम अुत्तम रीतीनें होअूं लागलें. शाहूच्या दरबारांत चालणाऱ्या वाटाघाटींची अित्थंभूत माहिती बाजीरावास कळविणें आणि बाजीरावासंबधीं निघणाऱ्या आक्षेपांस

समर्पक व समयोचित अुत्तरें देअून पेशव्यांच्या हेतूविषयी व कर्तृत्वाविषयी शाहूच्या मनांत आदरभाव वाढविणें या गोष्टी पुरंदऱ्याने किती अुत्तम रीतीने पार पाडल्या याची साक्ष पटवून देणारी अनेक पत्रे पेशवे दप्तराच्या प्रकाशित भागांत छापली गेलीं आहेत.

दिवाण न नेमतां राज्यव्यवस्थेची सूत्रे स्वत: हाकणे व अनेक सरदाराच्या हातून निरनिराळया मोहिमा करविणें ही दुहेरी जबाबदारी पार पाडीत असतां, "सरदारांनी मतभेद विसरून काम करावें," अशी शाहूची अिच्छा होती. मात्र त्याप्रमाणें घडत नाही असे दिसून आले तरी, त्या सरदाराना जरबेत ठेवून मोहीम स्वत: चालवून यशस्वी करून दाखविण्यास लागणारे सेनापतीचे गुण त्याच्या अंगीं नसल्यामुळें, त्याला अुपदेशपर शब्दावर भागविण्यावाचून गत्यतर नव्हतें. अुदाहरणार्थ, जंजिऱ्याच्या मोहिमेत शाहू बाजीरावास लिहितो, "तुम्ही कार्यकर्ते बुद्धिमंत सेवक आहां; कार्यसिद्धि होअून ये तोच अर्थ सपादाल हा स्वामीस निशा आहे. तुम्ही सामदामभेद बुद्धि कर्तव्य तैसी करून महद्यश सपादणें. सर्वांचे मनोधारण करून कार्यसिद्धि करणें. रा. श्रीनिवास पडित प्रतिनिधीकडील जमाव व सचिव पंताकडील जमाव तुम्हासनिध आहे. त्याचा व जे मराठे लोक भेटले असतील त्यांचा, बहुता प्रकारें दिलदिलासा करून खर्चा वेचास देत जाणें. अुभयतां अेक मुखें वर्तोन मजुरा करून घेणें."

परंतु या अुपदेशपर शब्दांचा अुपयोग होत नव्हता सरदाराची परस्परांत चुरस असल्यामुळे, मोहिमेंत यश आल्यास त्याचें श्रेय कोणास मिळणार, या प्रश्नास प्राधान्य येअून अैनवेळीं अेका पक्षाने जमवून आणलेला घाट बिघडविण्यास दुसरा पक्ष झटत असे; आणि प्रत्येक पक्षातर्फे शाहूजवळ दुसऱ्या पक्षाविरुद्ध तक्रारी जात, तेव्हां बाजीरावाच्या बाजूचे समर्थन करण्याचें काम पुरंदऱ्यास करावे लागे

पण कांही सरदाराचे मतभेद शाब्दिक अुपचाराने शमण्याजोगे नव्हते. पेशवे अुत्तरोत्तर फौजबंद व जबरदस्त होअू लागल्यामुळे त्याच्या शब्दाला शाहू मान देतो व आपल्या न्याय्य हक्काची पायमल्ली होते, असे दाभाडयाला वाटू लागल्यामुळें त्याने निजामाचे साहाय्य घेअून शाहूस व बाजीरावास फौजेच्या जोरावर वठणीस आणण्याचा विचार केला. त्याहि वेळी तडजोडीचा प्रयत्न शाहूने केला. परंतु त्याचा अुपयोग न होतां भांडण निकरावर आले; आणि त्याचा शेवट डभअीच्या युद्धांत होअून त्रिंबकराव दाभाडे वगैरे ठार झाले. तात्पर्य, शाहू स्वत: लढवय्या नसल्यामुळें अेका फौजबद सरदारास वठणीवर आणण्याचे काम दुसऱ्या फौजबंद सरदाराच्याच हातून करावें लागे. यामुळें सर्वांत मोठी फौज बाळगणारा बाजीराव शाहूच्या दरबारांत महत्त्वाचा होअून बसला.

यानंतर फौजेला कोणती कामगिरी द्यावयाची हा प्रश्न सोडवितांना अुत्तरेकडील मोहिमा बाजीरावाने पत्करणें श्रेयस्कर आहे किंवा नाहीं याचा विचार करावा लागला. हा विचार सांगोपाग रीतीनें होअून बाजीरावाची अुत्तरेकडील मोहिमांची योजना शाहूला संमत झाली, किंवा निदान त्यानें आक्षेप घेण्याचें सोडून दिलें, असें अुपलब्ध पत्रव्यवहारावरून म्हणतां येतें. अुत्तरेकडील मोहिमांत मोठमोठ्या जबरदस्त अशा मुसलमान सरदारांशी भांडण्याचे प्रसंग अुद्भवणार, पण पैशाची प्राप्ति मात्र होणार नाही. याकरितां त्या मोहिमांचें काम न पत्करतां दक्षिणेकडील मोहिमाच बाजीरावाने कराव्या, म्हणजे त्याला कर्जबाजारी होण्याचा प्रसग येणार नाही, असे पुरदऱ्याचें मत होतें

दक्षिणेची कामगिरी बाजीरावानें पत्करावयाची तर प्रतिनिधीची चुरस आड येत होती; व प्रतिनिधीस गप्प बसवून बाजीरावास तिकडील सेनाधिपत्य आपण देणार, असें ठासून सागण्याचे काम शाहूच्या हातून होण्याचा फारसा सभव नव्हता. तथापि शाहूचें मन या बाबतींत वळविण्याचा अेक प्रयत्न करून पाहावा, असें महादोबा पुरंदरे यास वाटत होते. आणि महत्त्वाच्या बाबतीत, बाजीरावास पटत नसेलली गोष्ट देखील मोकळेपणाने त्याला लिहून कळविण्यास हरकत नाहीं असा त्याला अनुभव आला असल्यामुळे, त्यानें त्यास खुलासेवार पत्र लिहून कळविलें. त्या पत्रातील महत्त्वाचा भाग असा:—"दक्षण प्रांतीच्या मनसब्याची कल्पना आमच्या (पुरदरे याच्या) चितात येअून गोविंदराव चिटणीस यास सांगून राजश्रीस (शाहूस) हटकविले त्याचा अुग्दार निघाला ते वर्तमान पूर्वीं लिहिलेंच आहे. त्यानंतर पुनः गोविदरावाकडून विनती करविली. (शाहूकडे विषय काढला ) ते वेळेस राजश्री (शाहू) बोलले की, ' नारबावा आलियावर सिद्धांत करून सांगतों. हा विचार (बाजीरावाने दक्षिणेकडील मोहिम करण्याचा) अुत्तमच आहे' सारांश, राजश्रीच्या (शाहूच्या) चित्तांत आले आहे कीं, स्वामीच्या (बाजीरावाच्या) चित्तांत आले आहे तो मनसबा तुम्ही करालच; व फौजा जातात, याणी मोंगलाची व मुलकांची हृद घेतलियामुळें हावभरी होतील आणि केवळ दिल्लीस ढेहा लावली म्हणजे कोणे वेळेस तरी नाही कोणे वेळेस तरी अरिस्ट येअील. स्वामीस (बाजीरावास) नका म्हणावें तरी फौजेस पोट भरावयाची जागा नाही; यामुळें आपणहि काहीं आअिकणार नाहींत. यास्तव कर्नाटक प्रात आपले (बाजीरावाच्या) स्वाधीन करावा म्हणजे तिकडील ( = अुत्तरेकडील स्वाऱ्या करण्यानें प्राप्त होणारें) अरिस्ट वारेल व फौजहि मातबर पदरी होअील येसा विचार आहे. परंतु सामादिकास ( =सुमंताचा) विचार पुसतां दक्षण प्रांत स्वामीच्या तालुका (बाजीरावाच्या ताब्यात) द्यावा हें कदापि सांगणार नाहीत. तेव्हां केवळ खावंदाणीच (शाहूनें) सुभासुभ (योग्यायोग्य) विचार करून साहेब येल्त्यारीनें (मालक या नात्यानें)

करणें तें करावें तव्हांच होओल तरी होओील. यास्तव अितका प्रसंग घडोन मनसबा सिधीस जाओील न जाय हें न कळे. परंतु स्वामीचे (बाजीरावाचे) हस्त गालीब (= मजबूत) आहेत व राजश्रीच्या (शाहूच्या) चित्तांत तिकडील (अुत्तरेकडील मोहिमांत उभ्दवणारे) अरिस्टांचें भय (वाटतें), याजमुळे कार्य जाहाले तरी होअील.''

कर्नाटकाकडील मोहिमाची कामगिरी बाजीरावाकडे सोपविली जाण्यास शाहूच्या सल्लागारांची समति मिळणें कठीण, व त्यांचा सल्ला न जुमानतां आपल्या मतानें या प्रश्नाचा निकाल शाहूनें करणें त्याहून कठीण, हे महादोबा पुरंदरे यास दिसत होतें, तरी या बाबतीत त्याची निराशा झाली नव्हती. निदान प्रयत्न करून पाहावा असें त्यास वाटत होतें. पण आपल्या प्रयत्नास यश आले तरी बाजीराव अुत्तरेकडील मोहिमांचा नाद सोडून देण्यास तयार होणार नाही, अशी त्यास भीति वाटत होती. याकरितां बाजीरावाचे मत खोडून काढण्यासाठी तो वर अुध्दृत केलेल्या पत्रात शेवटी लिहितोः–''स्वामीच्या (बाजीरावाच्या) चित्तात अुत्तरेकडील मनसबियाचा विचार पूर्ण आला असेल. यास्तव हे गास्टीचा (दक्षिणेकडील मोहीम पत्करण्याचा) विचार ध्यानांत येणार नाही (पटणार नाही) तर अुत्तर प्रांतीचा येक परगणा व दक्षिणेकडील येक गाव यैसा बराबर आहे फौजा तिकडे (अुत्तरेकडे) जातात त्यास पैका (कितपत) मिळतो ते कळतच आहे (म्हणजे मिळत नाही हें अुघड आहे). तो मुलूक मोगलाचे तोडीं आहे; यास्तव दक्षण प्रांतीचा तालुका (मोहिमेचा अधिकार) स्वामीचा (बाजीरावाचा) जाहालियानें अुत्तम आहे (श्रेयस्कर होओील). अिकडील (कर्नाटकाकडील) पैका मिळावयाचा म्हणावें तरी स्वामीचा तालुका नसता नांवाचे सलाबतीनेच तमाम वकील येअून बाज खातात व तालुका जाहाला आणि फौजसहवर्तमान पनालियापर्यंत स्वामी गेलियानें तमाम पाळेगार व यवन रुजू होतील. घोरपडे व अुदाजी चव्हाण आदिकरून तमाम फौज स्वामीचे (बाजीरावाचे) पदरी पडेल. हा विचार स्वामीच्या चित्तांत नयेसा काय आहे? (ही गोष्ट सहज लक्षात येण्याजोगी आहे.) परंतु आधीं तो येथून (शाहूच्या दरबारांतून) होणें (संमति मिळवणें) मुस्कील. कदाचित् येथील विचार घडोन आला तर लक्ष प्रकारे करावा (बाजिरावानें मान्य करावा). अुतरे कडोल मनसबा चित्तांत आणून (त्या विषयी आग्रह धरून) हे गोस्ट टाकावी (दक्षिणेकडील मोहीम अमान्य करावी) यैसे नाहीं (हे योग्य होणार नाहीं असें महादोबाचें मत). पत्राचे अुत्तर पाठवावे तदनुरूप येथें बोलू. राजश्री (शाहू) बोलले आहेत की, बाबा आलियावर सिधात करू (निकाल करूं) यास या विचारास कोणी संमत देणार नाहीत. महाराजानीच (शाहूनें) विचार ध्यानात आणून करणें ते साहेब येल्स्यारीनें (मालक या नात्याने) हुकूम केलिया

अवघे संमत देतील. या गोष्टी ( शाहूजवळ आम्ही ) बोलाव्या तर स्वामींची ( बाजीरावांची )मर्जी कळली नाही ( मत काय आहे तें मला माहीत नाहीं ).तरी अुत्तर पाठवावें. तदनुरूप वर्तणूक करू " ( पे. द. १७ नं ४७ ).

यावरून हे स्पष्ट आहे की, राज्याची मालकी शाहूकडे होती; पण त्या काळांत अवश्य असणारा लष्करी पेशा पत्करण्याची योग्यता त्याच्या ठिकाणीं नव्हती. अुलटपक्षी, बाजीरावाच्या ठिकाणी वीरवृत्ति होती, पण राज्यांत कोणतें धोरण असावें व ते पार पाडण्याची जबाबदारी कोणावर टाकावी, हे ठरविण्यास लागणारा अधिकार त्यांच्याकडे सोपविण्यास शाहू तयार नव्हता. यामुळें आपण आपल्या पराक्रमास स्वतंत्र क्षेत्र आखून घेऊन त्यात कामगिरी करावी या विचारास बाजीरावाच्या मनात प्राधान्य मिळाले. ही दिशा धरण्यांत आपलें नांव गाजेल, पण आपण कर्जबाजारी होअू, हे बाजीरावास समजण्याजोगें होतें; निदान महादोबा पुरदरे याने तरी हे स्पष्टीकरण असंदिग्ध शब्दात केले होतें. पण नाव गाजण्याजोगी कृति व पैशाची प्राप्ति याचा नेहमीच मेळ बसतो असें म्हणतां येत नाही. दोहींपैकी बहुधा अेक गोष्ट साधतां येते या न्यायानें ज्या फौजेच्या जिवावर आपणांस शाहूच्या दरबारांत महत्त्वाचें स्थान मिळू शकले, तर फौज कायम ठेवावी व तिच्या हातून होअील ती कामगिरी करवावी, हा हिमतीचा मार्ग बाजीरावाने पत्करला त्यायोगे त्याला व्यापक कल्पना सुचल्या. पण त्याचा मेळ मराठी राज्यातील अितर सरदारांच्या कल्पनेशीं बसला नाही

अुत्तर हिंदच्या उलाढालींत बाजीरावाला मुख्यत्वेंकरून निजाम, रजपूत व दिल्ली दरबारातील मुत्सद्दी या तिघांचे डावपेच लक्षात घ्यावे लागले. रजपुतांपैकी सवाअी जयसिंग हा बाजीरावाचा पक्षपाती होता; आणि दिल्ली येथील मुत्सद्यांपैकीं सादतखान हा निजामाचा पक्षपाती व खानडौरान हा जयसिंगाच्या आधारावर बादशहाला वळवू पाहणारा होता. अर्थात बाजीरावाला अुत्तरेकडील राजकारणांत सवाअी जयसिंग आणि खानडौरान याचे अंतःस्थ साहाय्य मिळण्याजोगें होतें; आणि निजाम सादतखान हे बाजीरावाचे प्रतिस्पर्धी होते. पैकीं सवाअी जयसिंगामार्फत दिल्लीचा प्रश्न तडजोडीने सुटणें शक्य आहे किंवा काय याची चौकशी बाजीरावाने अि. स. १७३६ मध्ये अुत्तरेस जाअून केली; आणि युद्धाच्या तयारीवाचून याचा निकाल लागणार नाही हे लक्षात येताच, स्वदेशी परत जाऊन त्याने या प्रश्नाची आपल्या मंडळीत चर्चा केली. अुत्तरेकडील मोहिमांचा विचार करताना चिमाजीआप्पांचा सल्ला व साहाय्य यांची मातब्बरी बाजीरावास वाटत असे. त्याप्रमाणें अधिक सैन्याची जमवाजमव करण्याचें व तें घेअून लागेल तेव्हां मदतीस येण्याची तयारी ठेवण्याचें धोरण त्यानें मान्य

करतांच बाजीराव अुत्तरेच्या स्वारीवर दसऱ्यानंतर निघाला. तेव्हां बाजी भिवराव व मल्हारराव होळकर वगैरेनी बुंदेलखडात व दुआबांत आपलीं सैन्यें नेलीं. पैकी मल्हाररावाच्या सैन्याचा मोड सादतखानाच्या फौजांनी केला, आणि तेवढ्या विजयावर सर्व मराठ्याच्या सैन्याचा आपण पराभव केला अशी फुशारकी लिहून सादतखानाने बादशहाकडे पत्रे रवाना केलीं. बादशहादेखील कर्तृत्वशून्य असल्यामुळें सादतखानाच्या विजयीपक्षाचे अभिनंदन करण्यास ताबडतोब तयार झाला. परतु असल्या बादशहाचे मत बदलण्यास व सादतखानाचे लिहिणें खोटें असून 'मराठे जिवंत आहेत' ही गोष्ट पटवून देण्यास अुत्तम अुपाय म्हणजे आपण साक्षात् दिल्लीस जाणें हा आहे, असे बाजीरावाने ठरविले. सादतखानास गांठून त्यालाच बुडविणें हाहि अेक अुपाय होता परतु सादतखान आग्ऱ्याच्या आश्रयानें राहिला असल्यामुळे त्याच्याशी झगडण्यांत कालहरण होण्याचा सभव होता. याकरितां तो विचार सोडून दिल्ली गाठण्याचा निश्चय कायम करण्यांत आला. त्याप्रमाणें दिल्ली गाठल्यानंतर तेथें जाळपोळ करणे सोपें होते; पण तसे करणें कां अिष्ट नव्हे याचे, कारण सागताना बाजीराव लिहितो, "पुऱ्यास आगी देअुन खाक शहर करावें तर दिल्ली महास्थळ. पादशाही बरबात जालियास फायदा नाहीं. दुसरे, पादशहाचें व खानडौराचे चित्तात (बाजीरावाशी) सलूख करावयाचे आहे. मोगल (सादतखानाच्या पक्षाचे मुत्सद्दी) यास सलुख करू देत नाहीत; व अमर्यादा केल्यास राजकारणाचा दोरा तुटतो. याकरिता आगी लावावयाचें तहकूब करून पादशहास पत्रे पाठविली." (ब्रम्हेंद्र च पृ.२१)

यावरून आपल्या विरुद्ध पक्षाच्या सरदारापेक्षां आपण प्रबळ आहों हें सिद्ध करून व शाहूचा मान राखून सातारा दरबारांत जसे आपणांस महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेता आले, त्याचप्रमाणे सैन्याच्या जोरावर सादतखान पक्षाचा पराभव करून बादशहाचा मान ठेवून दिल्लीदरबारांत देखील आपलें वजन कायम करतां येअील, अशी विचारसरणी बाजीरावाच्या अुत्तर हिंदुस्थानांतील धोरणाच्या मुळाशी होती असे म्हणण्यास हरकत नाहीं,

या धोरणास अनुसरून यानंतर भोपाळ येथें निजामास बाजीरावानें कोंडून धरलें, तेव्हां दिल्लीकडील लष्करी मदत निजामास पोंचू न देण्याची खबरदारी खानडौरान हा घेअील, हे बाजीराव जाणून होता. मात्र निजामाच्या मदतीस आलीच तर फक्त दक्षिणेतून फौज येअील व तीहि त्याचा मुलगा नासरजंग हा पाठवील, अेवढा सभव दिसत होता, त्याकरितां चिमाजीनें सैन्यानिशीं तापीतीरावर राहून नासरजगास अडवावें अशी व्यवस्था बाजीरावानें केली; व यामुळें शेवटीं निजामाचा पराभव झाला.

यावेळीं निजामाचा पराभव झाल्यानंतर त्याच्याशी केलेल्या तहाची मीमांसा करतांना बाजीराव चिमाजीअप्पास लिहितो, " नबाबास ( निजामास ) अड॰ चणीचा प्रसंग प्राप्त झाला म्हणून आपण ह्रावभरी होऊन ( झिरेस पेटून ) त्याला ( सर्वस्वी ) बुडबावयाच्या अुद्योगास लागावें तर, " नबाबाजवळ फौज मोठी व तोफखाना चागला, यामुळे त्याच्याशीं लढताना " माणूस बहुत खर्च होअूं लागले." " काही द्रव्य नबाबाजवळ मागावें ही अिच्छा होती; परंतु नबाब द्रव्याचा लोभी. तो पदरचे द्रव्य देणार नाहीं." ( ब्रम्हेंद चरित्र पृ. ५० ) यावरून आपलें सैन्य व्यर्थ खर्ची पडूं न देता व द्रव्याचा लोभ न धरतां यश संपादण्यावर बाजीरावाची दृष्टि होती; किंवा पैशापेक्षां आपल्या सैन्यांतील माणसांच्या जिवाची व यशाची किमत त्याला अधिक वाटत होती हे अुघड आहे.

---

# १५

## पाणिपतचा फेरविचार

पाणिपतचें युद्ध मराठ्यांच्या इतिहासांतील एकदर घडामोडीपैकी अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळें ते आटपून लोक परत येतांच दोन तीन वर्षांच्या अवधींत बखरी व कैफियती या रूपाने त्यासंबंधीच्या हकीकती लिहिल्या गेल्या. परंतु त्या वेळी भाऊसाहेब मेले किंवा नाही याची शका व मल्हारराव होळकर वगैरेच्या विरुद्ध बोलणें धोक्याचे इत्यादि कारणामुळे व महाराष्ट्रांत निजामाची धामधूम माजल्यामुळे याची जास्त शहानिशा झाली नाही. पण पुढें यानंतर वीस वर्षांनीं सुजाचा वकील काशीराज यानें आपल्या आठवणी फारशीत बखररूपांत लिहिल्या. त्याचे इंग्रजी भाषान्तर Brown याने Asiatic Researches मध्यें प्रसिद्ध केलें आहे. त्याखेरीज सैर मुताखरीनमध्ये याची कांहीशी हकीकत इ. स. १७९०सुमारास लिहिली गेली. नंतर डफनें त्यांत थोडीशी भर घालून आपला इतिहास लिहिला· त्यानंतर या प्रश्नास इतिहासाचार्य राजवाडे यांनीं तीस वर्षांपूर्वीं चालना देऊन मांडणी केली. ती आजपर्यंत विशेष फरक न करतां ग्राह्य धरावी लागते. अलोकडे बरेच कागद पाणिपतासंबंधी प्रसिद्ध झाले, पण त्या योगानें राजवाडे यांच्या

विधानास फारसा बाध आलेला नाहीं. बडोद्याचे कर्नल शिंदे वगैरेंनीं या युद्धासंबंधी लष्करीदृष्ट्या काहीं विचार मांडले. त्याशिवाय रा. चिंतामणराव वैद्य आणि गोविंदराव सरदेसाई यांनी, लोकाना सहज समजेल अशा रीतीनें हा विषय दोन वर्षांपूर्वी मांडल्यामुळे व केसरीकारांनी त्याची विस्तृत चर्चा केल्यामुळें लोकांची मोठी सोय झाली 'दुर्दैवी रंगू' व 'पाणिपत प्रकरण' ही पुस्तकें सध्यां बहुतेक मराठी वाचकांच्या अवलोकनांत येऊन पाणिपत प्रकरणाचें मुख्य स्वरूप महाराष्ट्रांत आतां सर्वांना माहीत झाले आहे. मराठ्याच्या इतिहासांतील कोणत्याही प्रकरणापेक्षां पाणिपताची माहिती महाराष्ट्रांत आज मितीस अधिक झाली आहे, याचें श्रेय मी या दोन ग्रथांना व राजवाड्यांच्या पहिल्या खडास देतो. आणि त्याच साठीं त्यांतील विधानाचा विचार करून त्यांत शकास्थानें आढळल्यास ती त्यांच्यापुढे माडून निरसन करून घेणें मला आवश्यक दिसते.

पाणिपतच्या युद्धात गोविदराव बुंदेले याने कुचराई केली किंवा नाहीं, भाऊसाहेबांनी त्याच्याकड कोणती कामगिरी सोपविली होती आणि अबदाली यमुना उतरून पश्चिम तीरास आला ही गोष्ट भाऊसाहेबाच्या अदाजाप्रमाणें झाली किंवा अंदाजाबाहेरची झाली याबद्दल रा. राजवाडे व रा. गोविंदराव सरदेसाई यानी आपले विचार विस्तृतपणे माडले आहेत. पण माझ्या मते दोघांच्याही लिहिण्यांत एका भौगोलिक स्थळाच्या गैरसमजामुळे दोष राहिले आहेत.

अबदाली बागपतावर यमुना उतरला व गोविंदपतानें बागपताच्या रोखानें येऊन अबदालीची रसद बद करावी असें भाऊसाहेब वारंवार लिहित होते, येथपर्यंत सर्वांचे मतैक्य आहे. परतु भाऊसाहेबाचा हुकूम गोविदपताच्या हातून पाळला गेला नाही हा दोष गोविंदपंताच्या माथी मारावयाचा किंवा भाऊसाहेबाच्या माथीं मारावयाचा हा काय तो वादाचा प्रश्न आहे. रा. राजवाडे यांच्या मतानें गोविंदरावाने कुचराई केली व सेनापतीचा हुकूम पाळला नाहीं यामुळें तो दोषी ठरतो. रा. गोविंदराव सरदेसाई याच्या मताने "एकट्या बुंदेल्याच्या हातून मुसलमानमय मुलखातील रसद बद होणें शक्य नव्हते, यांत बुंदेल्याची कुचराई म्हणता येत नाही. प्रत्यक्ष सदाशिवराव नजीक असतां त्याजकडून बागपतावर यमुना उतरतांना अब्दाल्लीस अटकाव जर होऊं शकला नाही, तर एकटा बुदेला मुसलमानाच्या जुटीस केवळ त्यांच्या नजरेखाली कितीसा पुरा पडणार ?" (पाणिपत प्रकरण पृ २२१). हीच गोष्ट पुन्हां स्पष्टपणें (पृ. १७१ वर) सागतांना ते म्हणतात " थोडया फौजेनिशी अबदालीचे तोंडावर बागपतावर यमुना उतरणे पतास शक्यच नव्हतें. रसद मारण्याचें काम त्यास शक्य होते व अबदालीस यावेळी रसद पोचत नव्हती यावरून गोविंदपंत हें काम थोडे बहुत करीत होता.' याचा अर्थ असा

कीं, यमुना उतरून अलीकडे येणें व रसद बंद करणें हीं दोन कामें गोविंदपंताकडे सोंपविली होती. पैकी उत्तरार्धाची बजावणी पंतानीं थोडी बहुत केली व पूर्वार्धाची बजावणी करणें अशक्य होतें अर्थात तो हुकूम सोडणाऱ्याचा ( भाऊसाहेबाचा ) अडाणीपणा समजला पाहिजे, असे रा. गोविंदराव याच्या म्हणण्याचे तात्पर्य दिसतें. पण माझ्या मतें त्यांनी केलेला हा अर्थ चूक आहे. बागपत यमुनेच्या पूर्वेस आहे, पश्चिमेस नाही. रिसायतकारांनी हा गांव पश्चिमेस धरला आहे. त्यांच्या पुस्तकांतील नकाशांत तो त्यांनी पश्चिमेस दाखविलाही आहे व तो पश्चिमेस आहे असें धरून त्यांचे विवेचन झाले असल्यामुळे वरील चुकीची विधाने त्याच्या हातून केली गेली. एवढेच नव्हे तर, भाऊसाहेबांच्या पत्रातील उतारा देताना त्यानी स्पष्टीकरणार्थ जे शब्द पदरचे घातले आहेत ते देखील बरोबर उलट अर्थ दाखविणारे पडले आहेत. पहिल्या खंडातील २६१ व्या लेखांकातील भाऊसाहेबाच्या पत्रात गोविंदपंतास उद्देशून शब्द आहेत ते असे : "तुम्ही जलदीने यमुने पलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून यास रसद न पोचवे, फौजेस शह पडे ऐसें करावें" हे वाक्य देताना "यमुनेपलीकडून येऊन" या दोन शब्दामध्ये कंसांत "अलीकडे" असा शब्द रा. सरदेसाई यानी ( पृ. १७१ वर ) स्पष्टीकरणार्थ घातला आहे परतु बागपत यमुनेच्या पूर्वेस असल्यामुळे पतास अलीकडे येण्यास सांगण्याचा भाऊसाहेबाचा हेतु असणें शक्य नाही. भाऊसाहेब फक्त त्याला यमुनेच्या पलीकडून येऊन अबदालीची रसद बागपतच्या उतारानें अबदालीकडे पोचत होती ती, उताराजवळ दगाधोपा करून बंद पाडण्यास सांगत होते; त्यात अलीकडे येण्याचा प्रश्नच नव्हता यमुनेच्या पूर्वेस मुसलमानी सैन्य शिल्लक नसल्यामुळे पंताने बागपतपर्यंत येण्याचे धाडस करण्यास हरकत नाही, असा भाऊसाहेबाच्या लिहिण्याचा इत्यर्थ होता. ही गोष्ट अबदालीचा जम पश्चिमेस बसण्यापूर्वी करणे अवश्य होते, त्यावेळी पताच्या हातून ती झाली नाही. आपण इतके उत्तरेस गेलों तर खालचे जमीदार आपली ठाणीं बळकावतील अशी त्यास भीती वाटत होती. आणि जमीदाराचा बंदोबस्त झाल्यावर जेव्हां पंतानें उत्तरेस जाण्याचे ठरविले तेव्हा अबदालीचा जम पश्चिमेस चागला बसला होता. शिवाय भाऊसाहेब पंतास कोणती कामगिरी सांगत आहेत याची वाच्यता थोड्याच दिवसात झाली आणि पताच्या हालचालीवर अबदालीची सक्त नजर राहून ही हालचाल होताच आठ दहा हजार फौज पाठवून पतास चुरडून टाकण्यास त्याला मुळीच अडचण पडली नाहीं. बागपताजवळ अबदालीचें सैन्य यमुना उतरून पलीकडे गेले, तेव्हां नदीस पाणी भरपूर असल्यामुळें भाऊसाहेब समोर असतां गोविंदपताच्या शासनार्थ मोठी

फौज तावडतोब पुन्हां अलीकडे रवाना करणें अबदालीस कठीण पडलें असतें. पण पुढे पाणी उतरल्यावर असे सैन्य रवाना करण्यास अबदालीस कांहींच जड नव्हतें.

रा राजवाडे यांनी देखील बागपत यमुनेच्या पश्चिमेस आहे असें गृहीत धरल्याचा संशय घेण्यास जागा आहे. " अबदाली यमुना उतरून बागपत, गणोरावरून, संभाळकियास आला, तेव्हां भाऊनें गोविंदपताला अबदलीची रसद मारण्यास पुन्हां हुकूम केला. " ( खंड १ पृ. ३ प्रस्तावना ) या वाक्यांत यमुना उतल्यानंतर बागपत व पुढे गणोर असा अर्थ निघतो; पण तें कसेहि असलें तरी गोविंदपंताकडे रसद मारण्याचेंच काम होतें, हे त्यांनीं स्पष्ट सांगितले आहे; यमुना उतरून पश्चिमेस गोविंदपतानें यावे असा भाऊसाहेबांच्या म्हणण्याचा अर्थ त्यांनी काढलेला नाही.

तथापि ' पुनः ' या शब्दानें गोविंदपतास भाऊसाहेबांनी पूर्वीं एकवेळ अशीच रसद मारण्याचा हुकूम केला होता असा ध्वनि निघतो. परतु पूर्वींच्या कामगिरीचें स्वरूप माझ्या मतें कांहीसें निराळे होतें. अबदाली यमुना उतरण्यापूर्वीं, गोविंदपंतानें गंगेच्या किनाऱ्यास जाऊन पलीकडे उतरण्याची आवई घालावी, म्हणजे गंगेच्या पलीकडचे रोहिले जे अतर्वेदीत आले असतील ते आपल्या मुलुखाच्या बचावासाठी परत जातील, जे पलीकडे असतील ते अतर्वेदीत येणार नाहीत, आणि ज्यांना मराठ्याचा पक्ष धरावयाचा असेल त्याना गोविंदपताकडे जाऊन मिळणे सोईचे पडेल, असें भाऊसाहेबाचे पहिलें सागणें होते पण गोविंदपंतांच्या मनांतून (अबदाली आपल्या अंगावर चालून येण्याचा संभव असल्यामुळे) यमुना ओलांडून पश्चिमेस यावें असे होते त्याचा निषेध करून, त्यानें तिकडेच राहावें असें भाऊसाहेबांनी लिहिले.

दिल्लीहून कुंजपुऱ्याकडे निघण्यापूर्वीं भाऊसाहेबांनीं २ सप्टेंबर १७६०च्या पत्रांत (ख. १ पृ. ३४३) हा मजकूर खुलासेवार लिहिला आहे. ते म्हणतात " आम्ही सर्व घाटाचे बंदोबस्त केलेच आहेत. तूर्त त्याजकडील राजकारणाचा बनाव बसतो न बसतो हे पहात येथें बसल्यानें ठीक नाही, याकरिता कुंजपुऱ्याकडेहि जाणार आहो, येथील बंदोबस्त तर केलाच आहे व आम्ही तिकडे गेल्यानंतर ते हि इकडे राहात नाहीत. त्या रोखे सहजांत येतील. तेव्हां दिल्लीकडील शह चुकला. आपला मुलूख पाठीस पडोन लढाई पडली तरी तिकडेच पडेल असाहि प्रकार योजिला आहे. करू. तुम्ही यावयाचा मजकूर लिहिला तरी तूर्त इकडे न येणें. तुम्ही व राजश्री गोपाळराव गणेश ऐसे मिळोन दहा बारा हजार फौजेनिशी कनोजेजवळ पलीकडील दबावास जाऊन राहावे. म्हणजे सहजच पलिकडून रोहिले इकडील गेले आहेत ते व तिकडून येणार त्याजवरी

दबाव पडेल ते इकडे यावयाचे करणार नाहीत. सुज्यातदौले ममतेनें बोलतात. परंतु मोगली लोकांचा विश्वास नाही यास्तव तुम्ही तेथे जवळोन असल्यास याच्याही मुलुखात शह पडेल. याची वर्तणूक ठीक न जहालिया मुलुखाची जप्ती अगर जमीदाराकडून फिसाद करावयास येईल. सर्व गोष्टीने ठीक पडेल. बंगसाकडील व सादतखान अफरादी वगैरे यांजकडील राजकारणें आली आहेत जे "आम्ही येथून हरएक बहाणा करून तिकडे निघोन जाऊन गोविंद बल्लाळ याजवळ जमा होऊ" ऐसे आहे. यास्तव जो त्याचा सरदार तुम्हास सरकारचे पत्र घेऊन येईल त्याजला आपल्या जवळ जमा करून ठेवणें इकडे हुजूर येऊ म्हणतील तरी हुजूर पाठविणें याप्रमाणें येतील त्यांचा बंदोबस्त करणें, तुम्हां-कडे यावयाविषयी राजश्री गोपाळराव गणेश यास लिहिले आहे; तेहि फौजसुद्धां येतील तुम्ही त्यांनी मिळोन गंगा किनारा धरून पलीकडे दबावास रहावें. म्हणजे पलीकडील येणाऱ्यास पायबंद बसून येऊ पावणार नाहीत." इत्यादि

यावरून कुंजपुऱ्यास जाण्यापूर्वी गोविंदपंताकडे सोपवलेली कामगिरी रसद मारण्याची नसून गंगा किनाऱ्यास राहून अबदलीच्या सैन्यांत सुजा उद्दवला व रोहिले यांना सामील होऊ न देण्यासाठी व प्रसग पडल्यास गगेपलीकडे जाऊन दंगा करण्याची तयारी ठेवण्यासंबंधीची होती.

गोविंदपताच्या कामगिरीचें स्वरूप लक्षांत घेतल्यानतर कुंजपुऱ्याकडे जातांना भाऊसाहेबानी पुढील युद्धाचा कयास काय केला होता व बागपतावर अबदाली यमुन उतरला ही गोष्ट भाऊसाहेबाच्या अंदाजाप्रमाणें घडली की अंदाजाबाहेरची घडली याचा विचार करावयाचा आहे. ही गोष्ट भाऊसाहेबानी पेच घालून अबदालीस करावयास लावली असे रा. राजवाडे याचे म्हणणें आहे.

"सदाशिवरावानें मुद्दाम उत्तरेकडे कुजपुऱ्यास जाऊन अबदालीला दिल्ली येथील सैन्याच्या व आपल्या पाणिपत येथील सैन्याच्या मध्ये धरलें होते" (ख.१ प्र पृ ८४) असें रा. राजवाडे यांचे शब्द आहेत. परतु भाऊसाहेबांच्या पत्रातील मजकूर असा आहेः--

"आम्ही कुजपुऱ्याकडे गेलों. इकडे अबदालीचे कुच होऊन आलियावरी उत्तमच जाहाले दिल्लीकडील मुलुख मागें मोकळा राहिला. इकडेच लढाई पडेल. कदाचित ते इकडे न येता तिकडे तुमचे रोखें जाहले तरी बरेच आहे. आम्ही पाठीवरी यमुना उतरून अतरवेदीतून येऊन पारिपत्य करू. कुजपुरेवाला ठेहरत नाही. डावाडोल होऊन दमवायाच्या मुद्यावरी आहे. ठेहरला तरी मोर्चे लावून यथास्थितच पारपत्य करू. तुम्ही तिकडे सत्वर जाऊन पोहचणें. केवळ छोटया-मोठया कामास गुंतोन न राहणे *तुम्ही पेशजी लिहिलेप्रमाणें गनीमी मेहनत

*येथून अक्षर भाऊसाहेबांचे,

करून रोहिले सुज्यादौला यांचे प्रांतांत धामधूम होऊ असे करणें. किरकोळ गढियाचे कामास न गुंतणें. अबदली आम्हाकडेच येईल. तिकडे आला तरी पाणी आहे तो आहे. चार रोजांत कुंजपुरियाचे पारपत्य करून सांरगपुराकडे उतरून नजीबखानाचे विल्हे लाऊन पुढे अबदालीचे पाठीवर येऊ. रवाना छ४रावल (खंड १ पृ. ३६२)

यावरून अबदाली यमुना उतरून पश्चिमेस येणार नाहीं; त्याला उत्तरेस तरी जावे लागेल किंवा दक्षिणेस तरी जाता येईल तिसरा मार्ग नाही, अशी भाऊसाहेबांची खात्री होती असें या पत्राधारें म्हणावें लागतें. तो बागपताजवळ यमुना उतरून पश्चिमेस आला ही गोष्ट भाऊसाहेबांच्या अदाजा बाहेरची झाली. दिल्लीमधील फौज व पाणिपतावरील फौज यांत अबदालीस भाऊसाहेबांनी आणिलें म्हणावें तर दिल्लीस फक्त दोन चार हजार फौज होती. ती इतकी थोडी होती की, तिनें शहराबाहेर निघणे शक्य नव्हतें आणि तिनें बाहेर यावें असें भाऊसाहेबांनी केव्हाही लिहिलें नाहीं. यमुनेस पाणी अपरंपार असल्यामुळें अबदाली पश्चिमेस येऊं शकणार नाही हा केवळ भाऊसाहेबांचा अंदाज होता असे नव्हे तर, काशीराजाच्या बखरीवरून व 'सैरमुताखरीन' वरून देखील अनेक लोक व घोडी बुडाली तरी कल्पनेवरची गोष्ट केली पाहिजे या निश्चयानें अबदालीने हे पाऊल टाकून दाखविले असे म्हणावें लागते. कुंजपुरा दोन दिवसांत घेऊन जसें अबदालीस भाऊसाहेबानी चकविले त्यास तोडीस तोड म्हणून अबदालीने ही गोष्ट करून दाखविली, तिची बातमी समजताच भाऊसाहेब कुजपुऱ्याहून अबदालीची गांठ घेण्यासाठी दक्षिणेस आले. परतु अबदालीने त्याना रेटीत संभाळकिया, गणोर पर्यंत नेले. तेव्हां आपणास आणखी मागे हटावे लागू नये म्हणून भाऊसाहेब पाणिपताजवळ तळ देऊन खंदक खणून राहिले. माझ्या मसे याचें कारण बागपताजवळ यमुनेस उतार नाहीं अशा कल्पनेवर मराठ्यांनी या उताराचा बंदोबस्त केला नव्हता हे आहे. यावरून असे म्हणता येईल की, यमुनेच्या उताराची माहिनी मराठ्यांपेक्षां अबदालीकडच्या लोकांना अधिक बारकाईची होती. या लहानशा गैर माहितीचे फार मोठे परिणाम झाले ही गोष्ट खरी. पण तिची जबाबदारी भाऊसाहेबावर प्रमाणाबाहेर लादतां येत नाहीं. या उताराची माहिती असून त्यानी तिकडे दुर्लक्ष केले असे ठरलें तर गोष्ट निराळी; पण याची माहिती त्याना नव्हती यामुळें त्याची व्यवस्था भाऊसाहेबांनीं केली नाहीं असें दिसत आहे तोपर्यंत भाऊसाहेबांच्या दोषाचें स्वरूप सौम्य भासतें.

याच वेळीं अबदालीशी युद्ध करण्याची तडफ भाऊसाहेबांनी दाखविली नाहीं याबद्दल पुष्कळांनीं दोष दिला आहे. परंतु उपलब्ध पत्रांतून व काशीराजाच्या बखरीवरून अबदालीशी लढण्याचा अनेक वेळां प्रयत्न झाला, पण अबदालीनें

मोठें युद्ध टाकून किरकोळ चकमकी केल्या व कालहरण केलें असें दिसतें. अशी दिरंगाई करण्यात मराठ्यांचें नुकसान व अब्दालीचा फायदा होता. हे भाऊसाहेबांच्या लक्षांत आलें असतें तरी फळी फोडून जाण्याचा प्रयत्न करणें हें निर्वाणीचें शस्त्र, ते इतर सर्व उपाय हरल्यानंतर उपसावयाचें असतें. आणि शेवटीं त्यांनीं हा उपाय योजला तेव्हां देखील, आणखी चार दिवस थांबा, असें म्हणणारे बरेच वजनदार सरदार होते. यावरून फळी फोडून जाण्याचा प्रयत्न फार उशीरा झाला असे म्हणणें कठीण दिसतें.

यासंबधी दुसरी एक गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे ती ही कीं, मराठे व अफगाण यांच्यामध्ये तहाची बोलावाली शेवटपर्यंत चालू होती. अब्दालीचा वजीर शहावलीखान व सुजाउद्दवला यांचा कल तहाकडे होता आणि नजीबखान व अब्दाली हे मात्र याच ठिकाणी सोक्षमोक्ष करून टाकावा या मताचे होते, असें काशीराजाच्या म्हणण्यावरून दिसतें. उलट भाऊसाहेबांच्या मनांत तह करावा असें असून त्यांनीं आपले हें मत नानासाहेबांना कळवलें होतें; परन्तु तहास त्यांनीं मान्यता दिली नाही, असें भाऊसाहेबांच्या कैफियतकारानें लिहिलें आहे. या बाबतीत तीन पत्रें भाऊसाहेबांनी पाठविली असें कैफियतकार म्हणतो आणि त्याच पैकी एक पत्र गेल्या वर्षीं प्रसिद्ध झाले असल्यामुळें कैफियतकाराच्या लिहिण्यात तथ्य असावें असें म्हणणें भाग आहे.

अगदीं शेवटच्या दिवशी रात्री "भांडे काठोकाठ भरलें; आतां त्यांत एक थेंबही मावत नाहीं, जें काय करावयाचे असेल ते आता करा" वगैरे अर्थाची चिठी भाऊसाहेबांनी पाठविली होती असें काशीराजानें म्हटलें आहे आणि लढाईसाठी सैन्य उभे राहिल्यावर 'आजचा दिवस थांबा,' असें म्हणण्यास मोंगलाकडून जासूद आला असें बखरकार म्हणतात. तात्पर्य, तहाच्या वाटाघाटीमुळें हें प्रकरण निर्वाणीच्या युद्धावाचून मिटेल असे दोन्ही बाजूकडील पुष्कळ लोकांना वाटत होतें. शिवाय नानासाहेब सैन्यासह येऊन पोहचतील असेंहि भाऊसाहेबांना वाटत असावे.

यानतर शेवटच्या प्रसंगी सैन्याची मांडणी कशी होती व या युद्धांत मराठ्यांचा रोख कोणत्या दिशेस होता याचा विचार करूं. सैन्याच्या मांडणीचा काशीराजानें दिलेला नकाशा सर्वांनी मान्य केला आहे. परंतु चमत्कार हा की, त्या नकाशाचा अर्थ लावताना काशीराजानें म्हणणें इतिहासकारांनीं अमान्य केलें आहे. कवीनें आपल्या काव्याचा अर्थ अमुक आहे असें सांगावें आणि टीकाकारांनीं "छे तुझ्या काव्याचा अर्थ तूं सांगतोस तसा नसून आमच्या मतास जमेल असाच असला पाहिजे" असें म्हणावें, यासारखा येथें प्रकार आहे. काशीराजानें आपल्या बखरीत पाणिपतची हकीकत लिहिली व ती स्पष्ट समजण्या-

साठीं नकाशा जोडला तेव्हां नकाशाचें स्पष्टीकरण बखरींतील मजकुरावरून समजून घेतलें पाहिजे. युद्धाच्या वेळी मराठ्याचे तोंड पूर्वेस व अफगाण सैन्याचे पश्चिमेस होते असें काशीराज स्पष्टपणें म्हणतो; अर्थात नकाशाच्या दिशा य अनुरोधानें घेतल्या पाहिजेत. पण युरोपियनाना नकाशांत ' वरची उत्तर खालची दक्षिण ' हें सूत्र लहानपणापासून परिचयाचे असल्यामुळे त्याच सूत्रानुसार त्यांनी काशीराजाच्या नकाशाच्या दिशा ठरविल्या. इतकेच नव्हे तर, काशीराज आपल्या वर्णनांत पूर्व पश्चिम दिशा बोलतो ही त्याची चूक आहे असें म्हणण्यासहि त्यांनी कमी केलें नाहीं! तसेच हा इतिहासलेखकाचा आग्रह निराधार असावा असे मराठी बखरकारांच्या लिहिण्यावरून देखील दिसते.

भाऊसाहेबांची बखर व कैफियत असे दोन आधारभूत ग्रंथ आहेत या दोघांच्या लिहिण्यांत काहीशी तफावत आहे. आदले दिवशी केलेला बेत दुसरे दिवशीं भाऊसाहेबांनी आयत्या वेळी बदलला असा बखरकाराचा आशय आहे; पण कैफियतीत याबद्दल अवाक्षरहि नाही. नाना फडणिसाच्या आत्मचरित्रांत किंवा दुसऱ्या कोणत्याहि अस्सल पत्रात बखरकाराच्या आरोपास दुजोरा देणारे वाक्य आढळत नाही. तथापि आयत्या वेळी हा बेत बदलला किंवा नाही हा माझा मुद्दा नसून सैन्याची तोंडे कोणत्या दिशेस होती या संबधीचा आहे. आणि त्याचा निर्णय करण्यास उपयोगी पडणारा भाग बखरीत व कैफयतीत एकसारखा आहे. आदले दिवशीची वाटाघाट बखरीत पृ. १४१ वर व कैफयतीत पृ. २१।२२ वर दिली आहे.

दुसरे दिवशी सैन्याची मांडणी कशी होती हे सांगताना बखरकार म्हणतो, ' तोफखाना व इब्राहीम गाडदी (पुढे). उजवे बाजूस शिंदे होळकर होते, डावे बाजूस दमाजी गायकवाड व यशवतराव पवार व अंताजी माणकेश्वर व विठ्ठलराव शिवदेव व समशेर बहाद्दर व आणखी लहान थोर डावे बाजूस होते. '

कैफयतीत असे शब्द आहेत " पुढें तोफखाना, इब्राहिमखान गारदी, डावे बाजूस, शिदे होळकर, उजवे बाजूस; वरकड कित्येक पिछाडीस, बुणगे मध्ये याप्रमाणें रचना करून गोलचा गोल चालत सहा घटका दिवसानंतर निशाणें हत्तीवर देऊन नौबत चौघडा सुरू केला. रघुनाथ यादवाच्या मतें तीन टोळ्या केल्या होत्या. पृ. २८९.

अशा रीतीने दीड कोस गेल्यानंतर लढाईस तोड लागण्यापूर्वी भाऊसाहेबांनीं मसलत केली ती अशीः " आपण नीट चालून जावें, आम्हास गिलच्याने वाट देऊन एकीकडे बगल मारून जाहाला तरी यासी आपले लढाईचे प्रयोजन नाहीं आणि मार्ग मोकळा करीत नाही तरि मधीचे घोडे घालून मारामार करीत उधळून मार देत नीट निघोन जावे."

कैफियतींत जवळ जवळ हेच शब्द आहेत, "आपण नीट चालून मार्गानें जावे. गिलच्या वाट देऊन एकीकडे जाला तरी लढाईचे प्रयोजन नाही, मार्ग मोकळा करीत नाही, तरी मध्ये घोडी घालावी, मारामार करून उफळून मार देत जावे."

यावरून गिलच्या वाट देईल तर लढाईचे प्रयोजन नाही, न देईल तर मारामारी करावी असा भाऊसाहेबाचा बेत होता; याचा अर्थ प्रथम मराठ्यांनी मार मारी सुरू करावयाची नाही असा दिसतो 'अराबा अवघा मागें टाकून, निशाणें सोडून फौजा पुढे चालल्या' असे बखरकार म्हणतो त्याचे तात्पर्य हेंच दिसते.

रघुनाथ यादव याच्या मताने मल्हारराव होळकर याच्या सांगण्यावरून भाऊसाहेबांनी मराठा सैन्याच्या तीन टोळ्या केल्या पहिली विश्वासरावाची टोळी डावे बाजूस. त्यांत यशवतराव पवार, इब्राहिमखान गारदी वगैरे सत्तर हजार. मध्यभागीं भाऊसाहेब पन्नास हजारासह होते. तिसरी उजवीकडील टोळी शिंदे होळकर वगैरे साठसत्तर हजाराची. मल्हारराव दहा हजारासह कबिल्याच्या संरक्षणार्थ. इराणीनें देखील आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या केल्या होत्या पैकी एक टोळी त्याचा मुलगा तेजूरशहा याच्या हाताखाली होती तिने पन्नास हजार फौजेनिशी "दिन्‌दिन्" म्हणून चालून घेतले.

यावरून युध्दास प्रारभ इराण्यानी केला असे ठरते. तेव्हा कदाचित् इराणी वाट देईल तरी लढाईचें प्रयोजन नाही, हे भाऊसाहेबाचे सांगणे होते या म्हणण्यास दुजोरा मिळतो.

यानंतर युद्धातून जे लोक परत तळावर आले त्याची माहिती सांगताना बखरकार म्हणतो–'झुजातून मातबर सरदार व लहान थोर कित्येक पळोन आले. ते पश्चिमेकडे जुन्या तळावर खदकांत येऊन दाखल झाले.' यावरून लढाईतून परत येताना पश्चिमेकडे जावें लागले, त्या अर्थी तळ व रणाची जागा पूर्वपश्चिम होती असें म्हणावें लागते

यापेक्षां पुष्कळ मुद्दे उपस्थित करून मी या प्रसंगी आपला वेळ घेत नाही. पण माझें म्हणणे काय हे चटकन ध्यानांत यावें व ज्या मुद्द्यावर मला जोर द्यावयाचा आहे ते दृष्टीआड होऊं नयेत, या साठी त्याचें परिगणन संक्षेपानें करतों.

(१) बागपत यमुनेच्या पूर्वेस आहे; पश्चिमेस नाहीं.

(२) दिल्लीहून कुंजपुऱ्यास निघण्यापूर्वी गोविंदपंतानें गगातीरीं दबावास रहावें, यमुनेच्या पश्चिमेस येऊं नये, हें भाऊसाहेबांचें म्हणणें होतें; त्यावेळी अबदालीची रसद मारण्याचा प्रश्न नव्हता.

(३) बागपतेवर अबदाली यमुना उतरल्यानंतर गोविंदपंतानें ताबडतोब तेथपर्यंत यावें या भाऊसाहेबांच्या हुकुमात अशक्यता नव्हती.

(४) दिल्लीहून कुंजपुऱ्याकडे भाऊसाहेब निघाले तेव्हां त्यांच्या मतानें अबदाली उत्तर किंवा दक्षिण दिशेने हालचाल करील. तिसरा मार्ग त्याला मोकळा नव्हता.

(५) अबदाली यमुनेच्या पश्चिमेस उतरून आला ही गोष्ट भाऊसाहेबांच्या अंदाजाबाहेर घडली.

(६) पानिपत व दिल्ली येथील मराठी सैन्याच्या मध्ये अबदालीस आणून चिरडण्याचा भाऊसाहेबाचा बेत नव्हता.

(७) तहाची वाटाघाट शेवटपर्यंत चालू होती. व नानासाहेब सैन्यासह येऊन पोचण्याची आशा वाटत होती, यामुळें अबदालीच्या अंगावरून जाण्याचा निर्वाणीचा उपाय योजण्याचा घाई भाऊसाहेबानी केली नाही.

(८) युद्धास सैन्य उभे राहिले तेव्हां त्याच्या सापेक्ष दिशा ठरवितांना काशीराजाचा नकाशा आधारास घ्यावयाचा तर दिशाविषयक त्याचाच खुलासा मान्य केला पाहिजे.

(९) मराठे पूर्वाभिमुख व गिलचे पश्चिमाभिमुख हें काशीराजाचें म्हणणें मान्य केल्यास बखरीचे म्हणणें समजते; नाहीतर ते विसगत भासतें.

(१०) 'दुर्दैवी रंग'त दिलेला नकाशा बदलला पाहिजे.

---

# १६

## मराठेशाहींतील उत्तरदक्षिण वाद*

शाहूच्या दरबारात झालेल्या उत्तरदक्षिण वादाचें स्वरूप बरोबर बरेच ठरवावयाचें असेल तर प्रतिनिधीने ज्याप्रमाणें शिवाजी महाराजाचे नाव आपल्यापक्षाच्या समर्थनार्थ घेतले त्याप्रमाणे बाजीरावाने देखील उत्तर जिंकणें हाच शिवाजी महाराजाचा हेतु होता म्हणून तो पार पाडला पाहिजे असे प्रतिपादन केलें

---

* इ. स. १९२७ साली भा. इ. सं. मंडळाच्या चाविसाव्या संमेलनात या विषयावर व्याख्यान दिले; त्यानंतर झालेल्या चर्चेत श्री. आपटे यांनी केलेल्या भाषणाचा सारांश.

व त्यालाहि महाराजांच्या राजकारणाची माहिती होती असें म्हणावें लागेल. पण आतां बखरीतील मजकुरापेक्षा अस्सल पत्राच्या आधारे या वादाचे स्वरूप माडण्याची सोय झाली आहे ( पे. द भा १७ ले. ४७ ). त्यावरून असें दिसतें कीं, उत्तरेकडील स्वाऱ्यापेक्षा दक्षिणेकडील स्वाऱ्या आर्थिक दृष्ट्या फायदेशीर होण्याचा संभव आहे ही गोष्ट बाजीरावास माहीत होती तरी बाजीरावास तिकडे स्वाऱ्या करण्याची संधि देण्यास शाहूच्या दरबारातील सल्लागार कबूल नव्हते आणि शाहू हा 'साहेबयेख्त्यारीने' म्हणजे आपला अधिकार गाजवून व त्या सल्लागारांना बाजूस सारून 'मी बाजीरावाकडे दक्षिणेकडील स्वारी करण्याचे काम सोंपवितों' असें सांगण्याचा संभव नव्हता. यामुळे हा आग्रह धरून आपसांतील चुरस वाढविण्याऐवजी दक्षिण जिंकण्याचे काम प्रतिनिधी वगैरे मंडळीकडे सोपवून आपल्या पराक्रमास स्वतंत्र क्षेत्र निर्माण करणे बाजीरावाला अवश्य होतें. शिवाय मराठेशाहीतील पक्षभेदास फुंकर घालून तो वाढविण्यासाठी झटणाऱ्या निजामाला शह देण्यासाठीं दिल्लीतील निजामाविरुद्ध पक्षास प्रोत्साहित करणें बाजीरावाला क्रमप्राप्तच होते. प्रतिनिधीला दक्षिणेकडील स्वाऱ्यांचे महत्त्व पटले होते व तो ते काम करण्यास उत्सुक होता असेंहि म्हणण्यास आधार नाहीं. या बाबतीत त्याने स्वतः च फत्तेसिंग भोसल्याजवळ असे उद्गार काढले कीं "प्रधानपंत आपल्या फौजाचे मनसबे करितात. त्यामुळे त्याचे नांव लौकिक आहे व फौजहि पदरी आहे. तुम्ही व आम्ही उगेच घरी बसलो ; यामुळे फौज पदरची तुटली, सर्व विमी पगपणहि पदरास आले. तरी याउपर तुम्ही दुसरा विचार न करिता खामखा बाहेर निघणे तुम्ही व आम्ही येकत्र होऊन फौज जमा करून पुढें नबाबाचे अनुमत जाहाले तरी दक्षण प्रांते जाऊं, न जाहाले तरी वराड देवगड गढे वगैरे मुलूक उदंड आहे." ( पे. द. १४ ले. ३२ ). यावरून निजामाची संमति मिळाली तर प्रतिनधी दक्षिणेच्या स्वारीवर निघणार होते. नाहीं तर तेही वराड देवगडाकडे जाण्यास तयार होते. तात्पर्य शाहूची मर्जी राखून व दरबारातील पक्षभेद ओळखून आपल्या फौजेस जिवंत ठेवावयाचे तर बाजीरावाला निजामाशी लढणें व उत्तरेकडे स्वाऱ्या करणें भाग होते. शिवाय शिवाजी व बाजीराव याच्या अधिकारात व परिस्थितीत फार मोठे अंतर होतें. स्वराज्याची स्थापना केल्यानंतर ते टिकवावें कसें हा विचार मुख्यतः शिवाजी महाराजाच्या वेळीं करावा लागला. सर्व हिंदुस्थानभर हिंदुपदपादशाही स्थापण्याचें ध्येय जाहीर करणें व उत्तर हिंदुस्थानात ढवळाढवळ करून औरंगजेबास मुद्दाम चिडविणें असें धोरण त्यांनी स्वीकारले होते असें म्हणण्यास आधार नाहीं दिल्लीच्या यवनी बादशाहीखेरीज देशात दुसरे कोणतेंहि स्वतंत्र राज्य नसावें हें जें औरंगजेबाचें ध्येय होतें, त्याला विरोध करण्यासाठी दक्षिणेंतील दोन मुसलमानी राज्यें व

मराठ्यांचें राज्य यानी एकजूट करावी अशी महाराजांची खटपट राज्याभिषेकानतर चालू होती. म्हणजे मराठ्यांचे या वेळचे राजकारण संरक्षक स्वरूपाचें होतें, चढाईच्या स्वरूपाचें नव्हते. मात्र औरंगजेब हा मुसलमानी धर्माचा प्रसार राज्ययंत्राच्या आधारे करीत असल्यामुळें त्यास प्रत्युत्तरादाखल दक्षिणेत एक हिंदी राज्य स्वतंत्रपणें नांदत आहे ही गोष्ट जाहीर करण्यासाठी राज्याभिषेकाचा समारंभ महाराजानी केला औरंगजेब मेल्यानतर मुसलमानी धर्माचा प्रसार करूं पाहणारा बादशहा दिल्लीस राहिला नाही; यामुळें बाजीरावाच्या वेळी धार्मिक भावनेचा उच्चार पूर्वीसारखा करण्याचें कारण राहिले नाही. त्याचप्रमाणें शिवाजी महाराजाच्या मावळांतील व कोकणातील राज्यास समुद्रकिनारा लागत असल्यामुळे पोर्तुगीज, शिद्दी व इंग्रज हे शत्रु एकसारखे दृष्टीसमोर होते व त्यांच्याशी सामना करण्यासाठी आरमार तयार करणें त्याना जरूरच होते पण बाजीरावाच्या वेळी पोर्तुगीजांचा बदोबस्त करण्याइतकेच किंबहुना त्याहून अधिक महत्त्व निजामादि शत्रूशी लढण्याच्या कामास प्राप्त झाले होते. तात्पर्य, शिवाजीमहाराजांच्या वेळची परिस्थिति व धोरण ठरविण्याच्या कामी त्याना असलेले सर्वाधिकारित्व आणि बाजिरावाच्या वेळची बदललेली परिस्थिती आणि शाहू हा मालक आहे हे लक्षात ठेवून राजकीय धोरण ठरविण्याची बाजीरावास भासणारी आवश्यकता ध्यानात ठेवल्यास शिवाजी व बाजीराव या दोघानीहि आपला काळ ओळखून योग्य ते धोरण स्वीकारले असे म्हणणें भाग आहे.

---

# १७

## सखारामबापू, माधवराव व राघोबा

[ सखारामबापू घरभेद्या होता काय ? पेशवाईतील गृहकलहाची जबाबदारी माधवरावावर कितपत पडते ? या दोन मुद्यांची चर्चा या लेखांत केली आहे. सं.]

प्रस्तुत ग्रंथांतील* वादविषयक मुख्य मुद्यासबंधी माझे मत असें आहे कीं, पटवर्धनी दप्तरांतील पत्रातून सखारामबापूसंबधीं जी मते प्रसिद्ध झाली व ज्यांच्या आधारावर तो 'घरभेद्या कलिपुरुष होता, दुटप्पी होता' वगैरे मतें रूढ झाली

* श्री. स. अ. सहस्रबुद्धेकृत 'थोरले माधवराव पेशवे चरित्र'

आहेत ती, अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पुराव्यावरून निश्चितपणें बदलण्याची वेळ आली आहे. पटवर्धनाच्या मनात दादासाहेब व सखारामबापू याच्यासंबंधी विलक्षण आढी होती व बापूचे नाव घेतांना प्रत्येक पत्रांत निंदाव्यजक विशेषण लावण्याचे केव्हाहि पटवर्धन विसरले नाहीत हे खरे आहे. पण ही त्याची आढी चुकीची आहे व ती त्यानी सोडली पाहिजे असा नानासाहेब पेशवे यांनींच अभिप्राय दिलेला स्पष्ट शब्दात आढळतो (ऐ. ले. स. नं. २७). यानतर नानासाहेब वारले व पुणे दरबारात सखारामबापूविरुद्ध जो पक्ष अस्तित्वात आला त्यांत पटवर्धन प्रमुख असल्यामुळे त्याच्या मनांतली बापूविरुद्धची आढी द्विगुणित झाली. या विरुद्ध पक्षाची चिकित्सा करताना " कोकणस्थ मुत्सद्दी व सरदार यांस सखारामबापू कारभारात नको होता. आणि दादासाहेबाच्या हुकमतीत सारें राज्य चालावे व आपला पुत्र माधवराव यानें गादीचा मालक असून निर्माल्यवत रहावें ही गोष्ट गोपिकाबाईस आवडण्यासारखी नव्हती हे उघडच आहे. तिने कोंकणस्थ सरदार व मुत्सद्दी याच्या नादी लागून दादासाहेब व सखारामबापू याचें महत्त्व अगदी नाहीसे करण्याचा प्रयत्न आरंभिला," असा मजकूर कै० खरेशास्त्री यांनीं लिहिला आहे. त्यावरून कोकणस्थ मुत्सद्याना व सरदाराना कारभारांत सखारामबापू नको होता व गोपिकाबाईला राघोबाचे महत्त्व नको होतें, यामुळे पक्षभेद अस्तित्वांत आला हे शास्त्रीबोवाचे मत स्पष्ट दिसते. पण असे थोडे प्रसंग सोडले असता शास्त्रीबुवाच्या लिहिण्यात बापूसंबंधीं विरुद्ध अभिप्राय अनेक ठिकाणी आला आहे यात शका नाही.

तथापि अलीकडे पुढे आलेला पुरावा लक्षांत घेतला असता या बाबतींत मत बदलण्याची आवश्यकता मला भासते. तिचें कारण असें सांगता येईल.

पटवर्धनी पत्रे सोडून इतर समकालीन लोकांचीं पत्रे वाचली असतां, सखारामबापू हा घरभेद्या अगर फूट पाडणारा अशी मुख्य तक्रार नसून, तो राघोबाचा पक्षपाती आहे असें म्हटलेले आढळते. पण राघोबाचा पक्षपाती असला तरी माधवराव व राघोबा यानीं मिळून कारभार करावा, त्याच्यातील वैमनस्य विकोपास जाऊं नये, आणि मतभेद उद्‌भवला तर समेट घडवून आणावा अशी बापूची इच्छा अनेक पत्रावरून आढळते. उदाहरणार्थ, घोडनदीच्या लढाईनतर माधवराव राघोबाच्या स्वाधीन झाला तेव्हां तेथें बापू कारभारी होता. त्याच्यासंबंधी माधवराव स्वत आपल्या आईकडे पाठविलेल्या पत्रांत लिहितो, " सखारामपंताचेहि लक्ष वरकड मडळीसारखें नाही. वडिलांचे ( राघोबाचे ) व आमचें नीट असावें हेंच लक्ष प्रस्तुत दिसतें " (ऐ. ले. सं. नं. ९८). यानंतर तीन वर्षें तो कारभारी होता. तेव्हा तर राघोबा व माधवराव यांचें सख्यच होतें. पुढें चुलत्यापुतण्याचा निकराचा वाद सुरू होऊन आनंदवल्ली येथे समेटासंबंधीं पूर्ण

निराशा झाली होती. तेव्हां सखारामबापूनें रात्रीचा दिवस करून दोघांची समजूत घातली आणि तडजोड घडवून आणली (पे. द. भा १९, ले. ५९). आणि पुढे घोडपच्या प्रसंगी माधवराव लढण्याच्याच तयारीने निघाले व समेटाची आशा दिसेना तेव्हां माधवरावाच्या बरोबर जाण्याचे त्याने नाकारलें. यानंतर माधवरावानी राघोबास कैदेंत ठेवलें व त्याच्या सर्व पक्षपात्याना त्यांनीं कडक शासने केली पण सखारामबापूस यत्किंचित् हात लावण्याचा विचार केला नाही. यावरून सखारामबापूचा ओढा राघोबाकडे असला तरी त्याचा हेतु दोघांत वितुष्ट वाढविण्याचा नसून समेट घडवून आणण्याचा होता याची जाणीव माधवरावास होती हे दिसतें.

तथापि बापू व माधवराव यांनी समरस होऊन कारभार करणे शक्य नव्हते. सखारामबापू स्पष्टवक्ता किंबहुना बोलण्यात किंचित् फटकळ होता असे म्हणतां येईल. त्याने एका पत्रात स्वत च म्हटल्याप्रमाणे श्रीमतानी एकादी चूक केली तरी इतर लोक त्यांच्याशी आर्जवाने बोलत; पण बापू मात्र तोंडदेखले बोलण्यास तयार नव्हता. यामुळे तो 'गर्विष्ठ' आहे असे श्रीमताना वाटत असे (पुरं. भा. ३, ले. २०४). त्याचप्रमाणे राक्षसभुवनच्या लढाईंत माधवरावाने पराक्रम गाजविल्यामुळे मराठ्याना यश आले असे सर्वजण ज्यावेळीं अहमहमिकेनें प्रतिपादन करीत होते त्याच वेळी सखारामबापू "(निजामानें) बेतरतुदीने लढाई केली म्हणून यश प्राप्त जाहले" अशी मीमासा चार मंडळीसमक्ष करीत होता. अर्थात बापूविषयी विरुद्ध मत फैलावू पाहणाऱ्यांना या मीमांसेचा विपरीत अर्थ करण्यास सहजच फावले (ऐ. ले. स. पृ. ५८५). पण लोकाना आपल्याविषयी कांहींहि वाटो, आपला अभिप्राय निर्भीड शब्दात व्यक्त करणें हे तो आपले कर्तव्य समजत असे हे कर्तव्य करीत असतांना लोकाचा गैरसमज होतो हे त्याला माहीत होते. पण त्याचें म्हणणे असे दिसते की 'एखाद्याने विशिष्ट प्रसगी विरुद्ध मत प्रतिपादन करीत असताना, चार कमीअधिक कडू शब्द उच्चारले तर तेवढ्यावरून तो आपला शत्रू आहे असे समजणें मूर्खपणाचे आहे; किंबहुना तोंडावर असे बोलणारा मनुष्य अतःकरणापासून आपले हित घडवून आणण्यासाठी झटणारा असू शकतो.' या गोष्टीचा उलगडा सखारामबापूने एका पत्रात इतक्या मार्मिकपणें केला आहे की, त्यावरून त्याला मनुष्यस्वभावाची उत्तम पारख होती व पोक्त मनुष्याचें खरें कर्तव्य काय हे तो जाणून वागत होता, याविषयी शंका रहात नाही. (पुरं. दप्त. भा. ३, ले १९९).

खुद्द माधवरावांच्या पराक्रमाविषयी व कर्तृत्वाविषयी या पुस्तकात जो अभिप्राय व्यक्त करण्यांत आला आहे तो केव्हांहि मान्य होण्याजोगा आहे. पानिपतसारख्या घोर आपत्तीमुळे मराठी राज्याची पत ज्यावेळी अगदी रसातळास गेली होती

त्यावेळी राज्याची सूत्रें हाती घेऊन दहाबारा वर्षांत ज्यानें मराठ्यांचा दरारा श्रीरंगपट्टणापासून दिल्लीपर्यंत उत्तम रीतीने प्रस्थापित करून दाखविला, त्याच्या कर्तबगारीची कितीही स्तुति केली तरी तिच्यात अतिशयोक्ती होईल असे समजण्याचें कारणच नाही. तथापि माधवरावाच्या कारकीर्दींत पूर्वपेशवाईंतलें एक उज्ज्वल असे वैशिष्ट्य नाहीसें झालें हे नमूद करणें इतिहासलेखकाचें काम आहें, याकरितां या विषयीचे थोडें स्पष्टीकरण करतों.

राज्याची मालकी एका विशिष्ट घराण्याकडे वंशपरंपरेने चालत येते ही समजूत या देशांत शेकडो वर्षांपासून चालत आली आहे यामुळे राजानें आपल्या भावाशी अगर चुलतभावाशी कसे वागावे हा प्रश्न मोठा गुतागुतीचा होऊन बसतो. रामलक्ष्मणांप्रमाणें एकोप्याने वागावें किंवा कौरवपांडवांप्रमाणें आपसांत यादवीयुद्धे करावी असें दोन मार्ग पुराणांनी वर्णिले आहेत. मुसलमानी अमदानीत तर बादशहाने आपल्या भावांना ठार मारावें किंवा त्यांच्या डोळ्यांत सळई फिरवून त्यांना आंधळे करावे असा क्रूरपणाचा शिरस्ता होता खुद्द मराठी राज्यांत देखील शिवाजी व व्यंकोजी, संभाजी व राजाराम, शाहू व ताराबाई यांचे संबंध पाहिले असतां अधिकारारूढ व्यक्तीने भावाशी लढावें अगर त्याला कैदेंत टाकावें हाच प्रघात असल्याचे दिसून येते. याला अपवाद काय तो पहिल्या दोनतीन पेशव्यांच्या कारकीर्दींचा सांगता येतो बाजीराव व चिमाजी यांचे संबंध रामलक्ष्मणांप्रमाणें एकोप्याचे होते हे प्रसिद्ध आहे. नानासाहेबांच्या वेळी भाऊबंदीचे प्रश्न उपस्थित होण्याची वेळ आली असून देखील भाऊसाहेबांना कारभारी नेमून व दादाकडे उत्तरेकडील स्वाऱ्यांचे काम सोपवून नानासाहेबांनी त्यांच्या कर्तबगारीस पूर्ण वाव दिला. यामुळे त्यावेळी भाऊबंदीने वर डोके काढले नाही. माधवरावांच्या वेळी परिस्थिति निराळी होती. राधाबाई जिवंत असल्यामुळे बाजीराव चिमाजी यांचा एकोपा राहणें फारसे कठिण गेले नाही; आणि नानासाहेबांचे नाते वडीलपणाचें असल्यामुळे त्यांना भावास व चुलतभावास आवरणे शक्य झाले. परंतु माधवरावांच्या वेळी या बाबतीत फारच अडचणीची स्थिति होती. गोपिकाबाईच्या मनांत राघोबाविषयी तीव्र भाऊबंदीची भावना व राघोबाची बुद्धि अत्यंत क्षणभंगुर आणि पटवर्धनासारखे फौजबंद सरदार राघोबाच्या सर्वस्वी विरुद्ध अशा कठिण परिस्थितीत फारच थोड्या अनुभवानंतर, भाऊबंदीची भावना राजकारणात आड येऊं न देण्यासाठी माधवरावांनी जी तोड काढली ती लक्षात ठेवण्याजोगी आहे नानासाहेबांना वडीलपणाच्या नात्यामुळे राघोबास आवरता आले, तसे आपणाकडे लहानपणाचें नाते घेऊन आणि वडील या नात्याने राघोबाचा मान ठेवून माधवरावांनीं दादांस वागवून घेण्याचा मार्ग काढला. घोडनदीच्या लढाईनंतर भाऊबंदीचें युद्ध विकोपास गेल्यावेळी माधवरावांनी या मार्गाने जाऊन हा प्रश्न उत्तम रीतीने सोडवून

दाखविला. त्यांनी स्वतःच आपल्या आईस त्यावेळी लिहिल्याप्रमाणें राज्यास बाह्य शत्रु अनेक असले व सांपत्तिक अडचण भयकर स्वरूपाची असली तरी " दादासाहेब व आम्ही एक झालों हीच करोडाची गोष्ट जाहली" व हिच्या जोरावर बाकीच्या सर्व अडचणी दूर करता येतील, असा त्याचा अदाज होता आणि अनुभवानें तो खराहि ठरला. बाह्य शत्रूना जिकताना पराक्रम गाजवून जशी माधवरावांनीं आपल्या धैर्याची साक्ष पटविली तशीच राघोबाशी वागताना जळतें घेण्याची प्रवृत्ति ठेवून त्याला त्यानी आपलासा केला, हा माधवरावाच्या मनोनिग्रहाचा व खंबीर मनाचा पुरावा म्हणून सागता येईल

" माधवरावांच्या कर्तेपणाचा भरंवसा आम्हास आला, साप्रत कारभार तेच करतात; आमचे मर्जीप्रमाणें वर्ततात; तिळमात्र वाकडे चालत नाहीत' (ऐ. ले स. पृ. ५८७) असे राघोबास म्हणावयास लावणाऱ्या माधवरावाच्या बुद्धीची कोणीहि थोरवीच गाईल. ही स्थिती इ. स १७६५ पर्यत कायम होती " चिरंजीव (माधवराव) बहुत शहाणे जाले आहेत कारभार आमचे मर्जीप्रमाणें करतात. श्रीकृपेनें उभयता तीर्थरूपापेक्षा (भाऊसाहेब व नानासाहेब यांच्यापेक्षा) अधिक करीत आहेत ''असे राघोबा गोपिकाबाईस यावेळी लिहितो (ऐ. ले. सं. पृ. ९९४). यानतर आठ महिन्याने देखील "उभयता श्रीमत बहुत सतोषें एक विचारे आहेत. काही तिळमात्र दुजाभाव नाही" असे गोविंद शिवराम लिहितो ( पृ. १०२७) यानतर मतभेदाचे प्रश्न उभ्दवले तरी इ स १७६७ च्या आक्टोबरात आनंदवल्ली येथे राघोबाचे २५ लाख कर्ज फेडण्याची जाबाबदारी उचलून माधवरावांनीं तडजोडीस मान्यता दिली. याबद्दल लिहिताना घरातील कलह टाळल्याबद्दल माधवरावास लोकांनी शहाणाच म्हटले आहे. पण यावेळी ही तडजोड मोठ्या कष्टाने झाली. (पे भा १९ ले. ५९). यानतर राघोबाने दत्तक मुलगा घेतला व शिंदे होळकरांच्या सबधीं दोघात मतभेद वाढला, वगैरे सामान्य कारणामुळे इ. स १७६८ च्या जून मध्यें माधवरावानी सैन्यानिशी चालून जाऊन राघोबास धोडप येथे ताब्यांत घेतलें व त्यास कैदेंत ठेवले. अर्थात् 'दोघातील मतभेदास तीव्रता येऊ न देतां सामोपचारानें प्रकरणें मिटविणें व दादास वडीलपण देऊन त्याला आपलासा करणें हा मार्ग राजकारणाच्या दृष्टीने आवश्यक आहे' असे माधरावांनीच पूर्वीं ठरविलें होते व त्याप्रमाणें आचरूनहि दाखविले होते, तो मार्ग यावेळीच माधवरावास अशक्य कां वाटला ? याची कारणें बारकाईने शोधली पाहिजेत. येथे सभव असा दिसतो कीं, स्वाऱ्याशिकाऱ्या याच्या दगदगोने व मनास ताण देणाऱ्या विवंचनेनें माधवरावाची शरीरप्रकृति या सुमारास स्पष्टपणें क्षीण होत चालली होती. (ऐ. ले. सं. पृ. १२३५ व पे. द. भा. २० ले. २०८). यामुळे पूर्वीं जी गोष्ट आपण निभवून नेऊ असें त्यांना वाटत होते, त्याच गोष्टीनें ते आतां चिडूं लागले. गंगाधर

यशवंत चंद्रचूड यानें दंडाची रक्कम भरली नाही याबद्दल त्याला यावेळीं माधवरावांनी आपल्या हाताने शेंकडों लोकांसमक्ष अशा छड्या मारल्या की, त्याच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या व बाजी विठ्ठल याला तर तीनशें छड्या मारल्या तेव्हा तो रक्त ओकूं लागला. इत्यादि वर्णनें अस्सल पत्रांतून वाचलीं म्हणजे ( पे द ख १९ ले ९१ ) माधवरावास यावेळीं आपला राग आवरता येत नव्हता, व ते प्रमाणाबाहेर चिडत यांत शंका रहात नाहीं. माधवरावाच्या खालावत चाललेल्या प्रकृतीचा हा परिणाम असावा असें मला वाटतें. कारण काहींहि असो. पण राघोबास माधवरावांनी कैदेंत ठेवले तेव्हां पूर्व पेशवाईत चालत आलेले एक नांवाजण्याजोगे वैशिष्ट्य लुप्त झाले व मतभेद उत्पन्न झाला असता शिरजोर व्यक्तीने कमजोर व्यक्तीस कैद करण्याची 'मोगलाई' पद्धत पेशवाईतहि सुरू झाली व ती पेशवाई अखेर चालली. यात दोषाचा वाटा राघोबाकडे कितीहि दिला, तरी माधवराव यावेळी सर्वाधिकारी होते त्या अर्थी कांही जबाबदारी याच्याकडे येणारच

---

# १८

# पाटीलबावांचें दिल्ली येथील राजकारण

मराठ्यांच्या बादशाही धोरणास जे विशिष्ट रूप पेशवाईच्या उत्तरार्धात प्राप्त झाले, त्याची जबाबदारी मुख्यत्वेंकरून शिंदे घराण्याकडे होती. नानासाहेबांच्या कारकीर्दींत जयाप्पा, दत्ताजी व जनकोजी यांनी दिल्लीचा कारभार मराठ्याच्या हाती आणण्यासाठी आपले प्राण खर्ची घातले आणि नतर माधवरावाच्या व सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत महादजी शिंदे ऊर्फ पाटिलबावा यानीं दिल्लीचा कारभार प्रत्यक्ष ताब्यांत घेऊन व बादशहाची वजीरी मिळवून आपल्या वाडवडिलांची इच्छा सफल केली.

सालबाईच्या तहानंतर पाटिलबावा दिल्लीकडे गेले आणि आठ वर्षेपर्यंत त्यांनीं दिल्लीचा कारभार चालविला. या अवधीचे ठोकळ मानानें दोन खंड पडतात. लष्कराच्या जोरावर अनेक सरदारांचा पाडाव करून त्यांनी पादशाही

सत्ता हाती घेतली, यामुळे मुसलमानी व रजपूत सरदार यांनीं एकदम उठाव करून लालसोटच्या लढाईत पाटिलबावाचा पूर्ण पराभव केला आणि गुलाम-कादराने दिल्ली हस्तगत केली, येथपर्यंतचा पहिला खंड पुढे त्यांनी पुनः सैन्याची जमवाजमव करून दिल्लीत मराठ्याचे बस्तान बसविले आणि ते संतापानें व वैतागाने तेथील कारभार सोडून पुण्यास परत आले तेथपर्यंतचा दुसरा खंड. पैकीं पहिल्या खंडाची हकीकत पाच वर्षापूर्वीं वाचली होती; दुसऱ्या खंडाचा कांहीं भाग शके १८४१ च्या समेलनात वाचला आणि आज त्याचीच अशत. पूर्तता करणार आहे दिल्ली येथील कारभार मिळविल्यापासून तो चार वर्षांनी हातचा जाई-पर्यंत पाटिलबावाना पुण्याहून मदतहि झाली नाही व विरोधहि झाला नाही. त्यांचा कारभार पूर्णपणे एकतन्त्री होता. नानानी पाटिलबावाच्या कारभारातील चुका त्यांच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न दोन तीन वेळां केला, पण या सल्ल्याबरोबर पैशाचा किंवा लष्कराचा पुरवठा पुण्याहून दिल्लीकडे रवाना न झाल्यामुळे या सल्ल्याकडे पाटिलबावाचे लक्ष वेधले नाही दिल्लीकडील कारभारात येणाऱ्या यशाची व अपयशाची जबाबदारी सर्वस्वी पाटिलबावानी पत्करली होती परंतु चार वर्षा-अखेर परिस्थितीत काहीसा फरक पडला. पहिल्या चार वर्षांत पाटिलबावाचे पाऊल एकसारखे पुढे पडत होते, ते लालसोट येथील पराभवानंतर एकदम मागे आले. पुढे काय धोरण स्वीकारावे हे एकदम ठरविता येईना. तथापि अशा कठिण परिस्थितीतहि पाटीलबावानी निराश न होता, उत्तर हिंदुस्थानात पुन्हा सैन्याची उभारणी सुरू केली व सैन्याची रवानगी करण्याविषयी पुण्यासहि पत्रे पाठविली. ही पत्रे पोचताच नानांनी "अल्लीबहादर व तुकोजी होळकर यानी दिल्लीकडील घडी बसविण्यास पाटिलबावाना मदत पोचवावी" असे ठरविले.

अल्लीबहादर उत्तरेस जाण्यासाठी निघाल्यापासून पुढील चार पाच वर्षांत त्यास नानानी पाठविलेली पत्रे रा. सदाशिवराव दिवेकर याच्या खटपटीने उपलब्ध झाली आहेत. त्याच्या सहाय्याने या स्वारीसंबधाने खुलासेवार माहिती येथें नमूद करीत आहे.

अल्लीबहादर कर्नाटकच्या स्वारीतून परत आला व तेथून १७०९ च्या कार्तिक मार्गशीर्षांत उत्तरेस जाण्यासाठी निघाला. त्याने तावडतोब गंगातीरास म्हणजे गोदा-वरीच्या काठी टोक्यापर्यंत जावें असा नानांचा हुकूम होता. परंतु मार्गशीर्ष महिना संपत आला तरी बहादर भीमातीरीच रेंगाळत होता या सुस्तीबद्दल नाना रागावले आहेत असे हरीपंत फडक्याचे पत्र आलेले पाहून तो घाईने पुढे निघाला. सैन्याच्या खर्चास लागणारा ऐवज गंगातीरी तुम्हास मिळेल व आपण वाढ काढली म्हणजे तमाम लोक येऊन मिळतील असेहि हरीपंताने लिहिले होते. पौष वद्य ७ मीस बहादर गंगा उत-रून जेऊर मुक्कामी पोचला, आणि पागा व पथके अद्याप आली नाहीत. खजीनाहि

गोचरा नाहीं, दिवाणाची नेमणूक झाली नाही; भोसले व निंबाळकर यांच्या कही-कबाडाचा उपद्रव रयतेस होतो; वरचेवर ताकीद करतो, परंतु ते ऐकत नाहीत वगैरे तक्रारी बहादराने पत्रद्वारे केल्या. व त्यास योग्य ती उत्तरें देऊन नानांनी बहादरास बराणपुरापर्यंत जाण्याविषयीं लिहिले. यावेळीं बहादराकडे खर्चासाठी जो ऐवज आला तो दौलताबादी होता व त्यास शेकडा १९ रुपये बट्टा पडत असे. यामुळे हे रुपये सैन्यास काय भावाने द्यावे असा त्याने प्रश्न विचारला होता. त्यास नानांनी कळविलें कीं "इतका बट्टा सोसण्यास लोकाना भाग पाडावे तर ते तक्रार करतील; तेव्हां ६ रुपये बट्टा लोकांवर घालून बाकीचा सरकारी खात्यात खर्च घालावा."

यापेक्षा नाजूक असें एक प्रकरण यावेळी उपस्थित झाले होते ते अंतस्थ पैसा घेण्यासबंधीचे. ज्या परगण्यांतून सैन्य जाई त्या परगण्यात पिकाची नासाडी होण्याचा व इतर रीतीने लष्करी लोकाचा त्रास पोचण्याचा संभव होता. यामुळें हा त्रास चुक-विण्यासाठी परगणेकरी बहादरास अंतस्थ रक्कम देत असत तेव्हा तो ऐवज सरकारात जमा धरावा किंवा त्याची एक निराळी यादी ठेवून ती शेवटीं फडणीसाना समजा-वून द्यावी? असा बहादराचा प्रश्न होता त्यास नानानी असे उत्तर लिहिले आहे की, 'या रकमा अंतस्थ आहेत व त्या सरकारास कळणार नाहीत असे तुम्हास वाटते तें बरोबर नाही, कारण काही परगणेकरी सरकारी भरण्यात ही रक्कम कमी करण्या साठी अर्ज घेऊन आले आहेत.' साराश, परगणेकऱ्याकडून मिळणारी रक्कम 'अंतस्थ असो, काही असो; आम्हाकडील फडणीस आहेत त्याशी प्रतारणा न करता ऐवज सरकारात जमा धरवीत जावा, त्यास कलमे जेव्हाचे तेव्हांच कळवीत जावी. निराळ्या यादीचे कारणच नाही' असे नानांनीं कळविले आहे.

गोदावरी ओलांडल्यानतर बऱ्हाणपुरावरून अलीबहादर चैत्र शु. १२ स महेश्वरास पोचला. होळकराना मिळवून घेऊन बहादराने पाटीलबावाकडे जावें असे नानाचे सांगणें होते. व त्याप्रमाणे लौकर निघण्याविषयी होळकराना आधी कळविलें होते. परंतु तुकोजीने आज निघतो उद्या निघतों असे सागत फारच सुस्ति केली. यामुळे बहादरास काय करावे ते समजेना. एकटेच निघावे तर सैन्य थोडे; आणि होळकरांना घेऊन जावे तर ते अनेक सबबी पुढे करूं लागले. इतक्यात पाटीलबावाकडून पत्रे आली की 'जोधपूरकर व जैपूरकर माळव्याकडे चाल करणार असे दिसते; आणि आग्र्याकडे इस्माइल बेग व गुलामकादर यांनी दंगा मांडला आहे. त्यास या तोंडावर आम्ही आहो; माळव्याकडील बदोबस्तास फौज नाही; दोन तोंडें आम्हास सभाळणार नाहीत याजकरिता तिकडील बदोबस्त जाला पाहिजे.' या पत्राच्या जोरावर होळकरांनी असे बोलणें लावले की, आधीं आपण रजपुताचा बदोबस्त करण्यास जावें आणि तो झाल्यानंतर आग्र्याकडे जावें. परतु हें बोलणें शुद्ध भावाचे नसून शिंद्यांच्या जवळ गेल्यास आपणास

त्यांच्या हाताखाली राहण्याचा प्रसंग येणार अशी त्याला भीति वाटत होती, यामुळें तो परस्पर राजपुतान्यांत राहून वेळ घालवू पहात होता. पाटिलबावांना देखील तुकोजी आपणाजवळ यावा असें वाटत होतें किंवा नाहीं हे सांगणें कठीण होतें. याकरितां नानांनी अलीबहादरास कळविलें कीं 'तुम्हांस पाटिलबावाच्या मदतीसाठी रवाना केले आहे. तेव्हां त्याना विचारून काय ते करावें. तथापि सध्यां माळव्याकडील दगा शमला आहे याकरितां दोनही सैन्यांनी एकदम पाटील-बावाकडे जाऊन पोचावे हा उत्तम पक्ष. पण होळकरांनी रजपुताच्या बदोबस्ता-साठी रहावें असें पाटिलबावाचे पत्र आले असल्यास त्यानी ते काम करावें; पण तुम्ही (म्हणजे अलीबहादरानी) ताबडतोब पाटिलबावाकडे जावें विशेष दगा माळव्याकडे नसतां एवढया फौजेने उगाच कालहरण करीत माळव्यात बसावें ही गोष्ट मसलतीस उप योगी नाही.' नानांच्या सांगण्याप्रमाणें ताबडतोब पाटिल-बावाकडे जाऊन पोचावे हे फार चागले' असे हरीपत फडक्यानेंही बहादरास स्वतंत्रपणें कळविलें, परतु तुकोजीची भीड बहादरास मोडवेना. यामुळे तो शेवटी पाटिलबावाकडे जाण्याचे सोडून राजपुतान्यांत होळकराबरोबर गेला व ४-५ महिने तेथें अडकन पडला. यामुळे नाना बहादरावर फारच रागावले. त्याचा वकील पुण्यास लष्कराच्या खर्चाची मागणी करीत असे, त्यास नाना काहीच उत्तर देईनात शेवटी श्रावण शु. ६ स त्याने तिसरे प्रहरीं नाना माडीवर बसले होतें तेव्हा निरोप पाठविला की, 'कांही जरूर विनति करावयाची आहे.' त्याप्रमाणें विठल खंडेरावास माडीवर येण्यास परवानगी मिळाली. तेव्हा तो म्हणाला 'एजमानाची पत्रें येतात की खर्चाची ओढ फार बसली आहे, लोक उठोन जाणार स्थिति राहत नाही' नानानी उत्तर केले की 'खर्चाविषयी आम्हास हटकू नये. सरकार चाकरीवर पाठविले असता चाकरीस सामील न झाले. खर्च सर-कारांत किती पडला त्याचे रूप कोणते केले? त्याचे सरकार चाकरीवर लक्ष नाही. मनास येईल तें करितात.' ही हकीकत लिहून विठ्ठल खंडेरावाने असें कळविले की "आपण राजश्री पाटिलबावाचे लष्करांत रात्रीचा दिवस करून पोहोचावे. येथे दरबारांत लोक बोलतात की त्यांची स्वारी नवी; केलेला पुरूष पाठविला असता तरी इतके दिवस मध्ये कशास घालता?" यानंतर १५।२० दिवसांनी विठ्ठल खंडेराव पुन: लिहितो "श्रीमत राजश्री नाना व तात्या श्रीमतांचे वाड्यात दिवाण-खान्यात होते. तेव्हा आम्ही आपले कडील यादी नेल्या होत्या. ते समई मजला जवळ बोलावून फजित केले व आपणास बोलले, तें पत्री कोठवर लिहावे? लिहिता येत नाही. ते बोलिले. परंतु अमर्यादा होईल यास्तव मी लिहित नाही; 'या उपरी आम्हास पत्र लिहिणें नाही; व पत्राची उत्तरें हि देत नाहीं. आठ पंधरा दिवस पाहूं, नाहीं तरी तजवीज करणें प्राप्त. कारण सरकारची पत्रें पैदरपै लोकर दाखल

होण्याविशीं गेली असतां जाऊन दाखल जाहाले नाही. पाटिलबावांची पत्रे वारंवार येतात त्यास लौकरच घेऊन दाखल होतील ऐसें याचे लिहिण्यावरून लिहित गेलों. या उपर तजवीज करणें प्राप्त ' असे नाना म्हणाले. "

नानांचा राग या थरावर गेलेला पाहून अल्लीबहादर उदेपुराहून निघून मथुरेस शिंद्याच्या लष्करात जाऊन पोचला. या कामी मदत करण्यासाठी शिंद्याचा सरदार अंबाजी इंगळे उदेपुरास आला होता. यामुळें बहादरास, तुकोजीच्या सांगण्याची पर्वा न करता, आपले सैन्य घेऊन मथुरेस जाण्याचे धैर्य झालें. तथापि गेल्या पांच सहा महिन्यांत अल्लीबहादराकडून जी सुस्तपणाची हालचाल झाली त्याचे कारण नानानी त्यास ' होळकराच्या फौजेबरोबर तुम्ही जावें, एकटे जाऊ नये ' अशी ' शिक्षा ' म्हणजे हुकूम दिला असला पाहिजे असा ठपका पाटिलबावांनी ठेवला ! आणि पुण्याहून सरकारी मदत आली नाही तरी आपण इस्माइलबेग व गुलामकादर यांचें जूग फोडले व गुलामकादरास दिल्लीतून घालवून आपण पादशाही कारभार पुनः हस्तगत केला; असे लिहून पाटिलबावा नानाना बजावून लिहितात की "श्रीमताचे प्रतापेकरून पूर्वीपेक्षा बदोबस्त जाला सरकारचा पक्ष राहिला. याउपर आमची फौज राहणार नाही याकरिता अली-बहादर यास पत्र लिहून सरकारांतून दिल्लीचा व पादशाही मुलकाचा बदोबस्त व्हावा. आम्ही येऊन श्रीमंतांचे दर्शन घेऊ. नंतर जशी आज्ञा होईल तसे करू. फितुरी होते ते मोडले. पातशाहातीचा बदोबस्त होळकर व अल्लीबहादर राहिले असता होईल आम्ही इतके दिवस राहिलो, इतःपर होळकरानी राहून चाकरी करावी " या पत्रांत अल्लीबहादराच्या दिरगाईचे खापर नानांच्या डोक्यावर फोडण्याचा प्रयत्न केलेला असून पाटीलबावानी दिल्लीचा कारभार टाकून देशी परत येण्याचा निश्चय स्पष्टपणें जाहीर केला आहे. याखेरीज जामगावातील बाळाजी जनार्दन व रामजी पाटील या दोघांनी पुण्यास पाटिलबावा तर्फे याच अर्थाचे बोलणे लावले होते. त्यांना नानानी दिलेले उत्तर समर्पक आहे. ते शिंद्याना लिहितात " आपण यावयाचें चित्तात आणू नये. आपण आले असता इतके दिवस श्रम व मेहेनत करून स्थळे व मुलुख मिळविला तो जाऊन पादशाही संस्थानहि आपले हाती राहात नाही. इतके करून केले श्रम व्यर्थ होतात. मसलती पडत गेल्यामुळें पैक्याची ओढ पडली व फौजेस छावण्या पडल्या; यामुळें लोक राहाणार नाहीत हें खरे, त्यास याची तोड हेच की जोधपूरकर व जैपूरकर या संस्थानिकासीं तूर्त वाकडे दाखवू नये. म्हणजे ते आपला मेढा सोडून येऊन मसलत करीत नाहीत. पादशाही मुलकाची छावणी करून नवी फौज देसीहून नेली त्यासुद्धां दहा बाराहजार ठेवावी. जुने फौजेस निरोप द्यावा म्हणजे दाब राहील व पादशाही संस्थान हातीं राहील." सारांश, पाटिलबावांनी दक्षिणे-

कडे निघून येऊं नये हे स्पष्टपणें नानांनी प्रथम लिहून अल्लीबहादराच्या दिरंगाईची मीमांसा करताना ते म्हणतात " टिपूकडील मसलत भारी पडली, याकरतां लोकाची देणी फार चढली. त्यास ऐवज नाही, तोड पडेना. याकरता अलीबहादर यास श्रावण मासी बाहेर डेरेदाखल केले कीं, मार्गशीर्ष पावेतों तरी तोड पडून जानील. तथापि तोड पडेना, तेव्हा नवी इनलाख फौज पांच हजार ठेवली व काही पागांची तोड पडली. त्या व काही सरंजामी फौज मिळोन रवानगी केली. जाते समई अलीबहादर यास हेच सांगितले की तुम्ही पाटीलबावाकडे जावें. होळकर व तुम्ही एक होऊन गेले असता भारी जमावानसी जाणें होऊन येखादे सरकार काम चांगले होईल. तुम्ही तों जावेच; ते मागाहून येतील. त्याप्रमाणे अलीबहादर दर मजल गेले मागाहून होळकरास निरोप जाहाला. तेव्हां होळकर बोलले की अलीबहादरानी पुढे जाऊ नये. आम्ही ते एक होऊन जाऊं त्यास सांगितलें कीं बरें आहे, तुम्हा लौकर जावें. तो पावेतों अलीबहादर महेश्वरास असतील. तुम्ही लौकर जाऊन ते व तुम्ही मिळोन पाटिलबावांकडे जावे त्यानीं कबूल केले. अलीबहादरास लिहिले की होळकर लौकर येणार. आल्यावर तुम्ही व हे मिळोन जावे. यास विलंब लागल्यास तुम्ही जावें. मागाहून होळकर महेश्वरास गेले. अलीबहादरानी जावयाची निकड केली. तेव्हां येतो म्हणून करार करून दिवसगत लावली. तेव्हां अलीबहादर कुच करून उजन पावतो गेले. तो मागाहून होळकरानी पाराजीपतास व अंबाजी इंगळे यास पाठविलें कीं आम्ही येतो. तुम्ही आम्ही मिळोन मेवाडकडून जाऊ. तथापि अलीबहादरांनी ऐकिले नाही. तेव्हां अंबाजी इंगळे यांस आपण पाठविले. त्यानी अलीबहादरास आपले पत्र दिले. त्यांत इंगळे सांगतील त्याप्रमाणें येणे व्हावें असें होते. इंगळयानीहि सांगितले कीं, मेवाडाकडून जावें. तेव्हां होळकर व अलिबहादर येक होऊन मेवाडाकडे गेले. यांत अलीबहादर चुकले नाहींत " यावरून अलीबहादर मेवाडाकडे गेला तो पाटिलबुवांच्या तर्फे अंबाजी इंगळे बोलत होता त्याच्या सांगण्यावरून गेला; अर्थात् त्याची जबाबदारी नानाकडे येत नाही.

पाटीलबावाकडे हा खुलासा पाठवून नानांनी त्याची माहिती अलीबहादरासहि दिली त्यांनीं पुढें असेहि म्हटले आहे की " पाटीलबावांचे मदतीकरितां ओढीत ओढ करून तुमची रवानगी केली शिक्षा किंवा पाटीलबावाची उपेक्षा असें मनांत असते तर रवानगीचें कारण काय होते ? पाटीलबावाची मदत व्हावी, सरकार काम चांगले घडावें हें स्वच्छतेचें करणें आमचें. परंतु पाटीलबावांचे चित्त उगेच तर्क करून संदेह घेत असावें. तुम्ही होळकरांचें येणें होत नाही असें पाहून पुढें जाऊन पाटीलबावास भेटल्याची पत्रे आली तेव्हा त्यांचे संदेह निवारण जालेच असतील. व तुम्ही खानरजमा केली असेल. पाटीलबावांची मसलत

थोडीशी विलग पडली. हें ऐकतांच ऐवज कर्ज घेऊन पाठविला तुमची रवानगी केली मध्ये होळकर येतात या आशंकेस्तव चार दिवस अधिक जावयास लागले. इतकाच प्रकार. यांत त्यानी सदेह घेऊ नयेत असा, घेतले तर गेले असतील. जातील. आमचे करणें त्यासी सरळ, त्यापक्षी चिंता नाहीं. पुढे तुम्हास मोठेपण देऊन तुमचे गळी बंदोबस्त घालावा असे करतील. तर हे ओझें त्यांजखेरीज दुसऱ्याच्याने होणार नाही. परिणाम लागणार नाही. त्यापक्षीं तुम्ही बरे समजतां, हे कबूल करणार नाही व करू नये

तथापि हे पत्र पुण्याहून मार्गशीर्ष व ८ मीम निघाले तें अलीबहादराच्या हाती एक महिन्यानतर पौष वद्य १२ पडले, तोपर्यंत पाटिलबावानी अलीबहादरावर बरीच छाप पाडली त्यानीं परस्परास मेजवान्या दिल्या आणि पाटिलबावांनी बहादरास एकांती देऊन सागितले "आपण दिल्लीस जावें. तेथील बदोबस्त करावा. सरकारी मुलूख आम्हाकडे चाळीस लक्षाचा आहे; व बादशहाकडे चाळीस लक्षाचा; व बादशाही सरदार याजकडे जायदाद सासष्ट लक्षांचा आहे. आम्हाकडे मुलूख आहे त्याची वाटणी आम्हांस नको. आम्ही घेत नाही, सरकारांत लावतो आमचे भाऊ सुभेदार त्यास वाटा सरकारांतून द्यावयाचा असल्यास द्यावा. आमचा आग्रह नाही पुण्यास लिहून आणखी फौज आणवावी व खर्चाची तजवीज करावी" अलिबहादराने उत्तर केले की, "सरकारांत ओढ कोणे नऱ्हेची ही आम्ही पाहिली आहे. आपणांसही माहित आहेच. तेव्हां तेथे खर्चाविशीचे काय ल्याहावें? आपण खर्चाची सोय करावी. आपण जिकडे पाठवितील तिकडे जावयास सिद्ध आहो" तेव्हां पाटीलबावा म्हणाले "तुम्ही सरकार. आमचे कुमकेस आला तुम्हाजवळ चौघडा व जरीपटका नाहीं. आम्ही देतो." बहादर म्हणाला "आम्हांस सरकारची आज्ञा नाही. आम्ही घेत नाहीं. चाकरी सांगाल ती करू. तथापि पाटीलबावानीं फार आग्रह करून बहादराच्या डेऱ्यास जाऊन चौघडा व जरीपटका दिला."

याननर बहादर मथुरेहून गुलामकादरच्या पारपत्यासाठी सबलगडावरून फरीदाबादेजवळ यमुना उतरून गेला. परंतु फार पुढे जाणे बरे नव्हे अशी नानाची सूचना गेल्यामुळे बहादर परत मथुरेस आला. तिकडे गुलामकादर सर्व सैन्य टाकून पळून गेला व एका खेड्यात लपला होता, त्याचा शोध बहादराचा सरदार आपाजीपत दामले याने लावला; व त्यावरून गुलामास पकडण्यांत आले. या कामगिरीबद्दल आपाजीपतास पालखी व यशवंतराव नाईक निंबाळकर यांस एक लाख रुपये देण्यात आले.

गुलामकादरचा बदोबस्त होऊन रजपुताशी सलोख्याचें बोलणें सुरू झालें, तेव्हां पाटीलबावांनी बहादरकडे दिल्लीचा कारभार सोंपवून देशी जाण्याची

खटाघाट सुरू केली. त्यावर नानाच्या सांगण्याप्रमाणे हा कारभार आमच्या हातून सुटणार नाहीं असे बहादरानी सांगितले. याच सुमारास हिंदुपत बुंदेले मृत्यु पावला. व बुंदेलखंडात बेबंदशाही माजली. तेव्हा तेथील बंदोबस्तासाठी पाटीलबावांची परवानगी घेऊन बहादरानें जावें अशी नानांची इच्छा. परंतु बुंदेलखंडांतील बंदोबस्त किरकोळ सरदारानी करावा आणि बहादराने मथुरा, दिल्ली या प्रांतीं राहून आपणास मोकळे करावें, असा पाटीलबावांचा आग्रह होता. अलीबहादरांस असे वाटत होते की, पाटीलबावानी फौज व फौजेच्या पैक्याचा बंदोबस्त करून दिल्यास, आपल्या हातून दिल्लीचा कारभार आटोपला जाईल. पण नानाच्या आग्रहामुळे पाटीलबावाचे म्हणणें बहादरास मान्य करवेना. तो म्हणाला मला सरकारचे पत्र आणवा, म्हणजे मी येथे राहतों तात्पर्य नानाच्या मनांतून आपणास देशी येऊ द्यावयाचे नाही अशी पाटीलबावांची खात्री झाली. तेव्हां ते संतापून बोलले "नानासी माझा इतका स्नेह आणि मी सरकारांत चोरी किंवा हरामखोरी केली नाही की मला धन्याचे पाय नजरे. न पडावें. यावेळी पाटीलबावाने बहादरास फौज, पैसा पुरविण्याचे अभिवचन दिले आणि राहिल्याबद्दल सरकारातून दोष आल्यास त्याची जबाबदारी स्वत वर घेतली. तेव्हा बहादरने एक महिन्याची मुदत मागून घेतली व पुण्यास सर्व हकीकत कळविली. तेव्हा नानानी पाटीलबावाच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्याची सोय नाही असें बहादरास लिहिले.

अशा प्रकारे बोलाचाली वाढून परस्पराची मने खट्टु होत असता पाटिलबावा एकदम आजारी पडले. औषध उपचाराने त्याना गुण येईना तेव्हां हा रोग शारीरिक नव्हे, कोणी प्रयोगादिक केले आहे असा ज्योतिषानें निर्णय दिला. तेव्हां अनुष्ठानास ब्राह्मण घातले आणि त्यानंतर पाटिलबावाच्या शरीरास आराम वाटूं लागला. यामुळें प्रयोग करणाऱ्याचा तपास लावणे आवश्यक वाटले. यापुढची हकीकत अलीबहादरच्या पत्रांत आहे. ती अशीः---

'नागरीण बायको वृंदावनास प्रयोग करीत होती तिजला धरून आणिली. मारहाण करून चौकशी केली. दात पाडले. हातास पलीते बांधून बोटे जाळली तिने गुलजार खाजा दि॥ हिंमत बहादर गोसावी याचे नाव घेतले. तेव्हा आम्हांकडील रा. सदाशिवपंत यास बोलावून सांगितले कीं या प्रो गोसावी याचे कर्म आहे. तुम्हांस समजावें. याचें उत्तर आम्ही सागून पाठविले की या प्रो त्याचे आंगी दोष असल्यास पारपत्य करावें. दोष नसल्यास उगेच दुखावू नये. नंतर त्यांनी चौघास बोलावून, पंचाईत करून त्याजवडे दोष ठरविला. आणि आम्हास बलाविलें. सविस्तर वर्तमान सांगितले. काय करावें म्हणोन बोलले. आम्ही उत्तर केले की अन्यायाप्रमाणें पारपत्यहि करावे. त्याजवरून रा. रायाजी पाटील व लखबा यास हिंमत-

बहादूर याजकडे बोलावयास म्हणौन पाठविलें. याणी बोलण्याचा नाद करून त्यास धरावा असे ठरविलें. ही बातमी त्यास कळली. नंतर तो तयार होऊन गोटाबाहेर आला, तों हेहि जाऊन पोहोंचले. गोसावी यासी बोलले की, तुम्हासी कांही बोलावयाचें आहे. त्याणे उत्तर केलें की आम्हीच तेथें येतो. असे म्हणोन चालला. पुढे पाटीलबावाचे डेऱ्याची वाट सोडून आमचे डेऱ्याची वाट धरली. तेव्हां रायाजी पाटील आडवे जाले त्यांस धक्का देऊन घोड्यावरून कुदोन (उडी मारून) आमचे डेऱ्यांत आला. बरोबर दोन अडीचशे लोक होते. त्यापैकी दहावीस लोक डेऱ्यात आले. बाकीचे बाहेर राहिले. रायाजी पाटील व लखबाहि मागाहून जातीनिशी आले. आम्हास बातमी काहीच कळली नव्हती. गडबड जाल्यावर मग लोक जमा केले. रायाजी पाटील व लखबा यास पुसिले की यास आमचे डेऱ्यास कां आणिले; आणिला तसा पाटीलबावाकडे घेऊन जावा. परतु गोसावी जाईना. जरीपटक्याजवळ जें होणें तें होईल. तुम्ही सरकार आहा, माझा इनसाफ करावा, मी दिव्य करीन. नाहक तुफान मजवर आहे. तुमचे पाठीं निघालों मी येथून जाणार नाही. हे बोलणे उभयतांसमक्ष बोलला. तेव्हां त्यानी पाटीलबावाकडे सांगून पाठविलें की 'याप्रमाणें बोलतो.' अशा भानगडीखाली सायकाळ जाला. आम्ही पाटीलबावाकडे सांगून पाठविलें की 'ही मलामत आमचे डेऱ्यातून घेऊन जावी.' त्याणी सांगून पाठविलें की 'उदईक बेत करणें तो केला जाईल.' नतर आम्ही फौज सुधा तयार राहिलो. व पाटीलबावाकडीलहि फौज आणून उभी करविली. दिवस उगवताच पाटीलबावाकडे सांगून पाठविले की राणेखान व जिवबा व कृष्णोबा व बाळोबा व रायाजी पाटील यांस पाठवून द्यावे. त्यावरून दीड प्रहर दिवसास कृष्णोबा चिटणीस व लखबा व सदाशिव मल्हार चौघेजण आले, त्यास आम्ही सागितलें की 'काय करणे ते लौकर करावे.' ते बोलले की, तुम्ही त्यासी बोलावें कीं, 'तुजला मारीत नाही; व आबरुहि घेत नाही' असे आम्ही पहिलेंच बोललो आहों व आजहि आपण बोलून पहावे. अथवा आमचे डेऱ्यातून तुम्ही आपले गोटास जावे. मग करणें ते केले जाईल. याप्रमाणे आम्ही गोसावी याजकडे सांगून पाठविले, त्यानें उत्तर केले की 'आम्हास पाटीलबावाचा विश्वास येत नाही. तुम्ही आपला जिमा करून घेतल्यास मग चिंता नाही.' हे बोलणे पाटिलबावाकडील कारभारी यास सांगितले. त्यानी उत्तर केले की, आपल्याजवळ असल्यास चिंता नाही; कैदेंत मात्र पक्का असावा त्यावरून गोसाव्यास सागून पाठविले की, तुम्हास शासीस कैद करून चार महिने ठेऊ. निखालस राहिल्यास पाटिलबावाजवळ रदबदल करून तुजवर गौर बरदास्त करू. त्याने सांगितलें की येथेंच अटकेंत ठेवल्यास ही गोष्ट पुरवत नाही पुण्यास पाठवावें. तेव्हा सागितले कीं पुण्यास लिहून पाठवितों. आज्ञा येईल त्याप्रमाणे रवानगी करावयास येईल. नंतर पाटिलबावांची फौज आणविली. आम्ही आपली तयार केली. यास मारून टाकावा असा

बदोबस्त करून मग त्याजला आम्ही सांगून पाठविले की गोष्ट मान्य करावयाची असल्यास बरें, नाहीं तर पारिपत्य होतें. त्यानें उत्तर केले जें जें करणें तें माझें पुण्यास करावें. झासीस पाठविता तर पक्के आश्वासन द्यावें कीं चोहो महिन्यांत पुण्याहून जाबसाल आणून रवानगी करू, नाहीतर येथें बदोबस्त करून द्यावा, असें बोलणे घातलें. तेव्हां पाटिलबावाचे कारभारी बोलले की या गोष्टीस चिंता नाहीं. आपण त्यास कौल द्यावा, तेव्हां आम्ही विचारले की याचे फौजेची वाट काय? त्याणी उत्तर केले की फौजेने येथें राहूं नये. आम्ही त्यास लुटीत नाही व गोसावीयासहि लुटीत नाही. खातरजमा असावी. तेव्हा गासावी याजकडे फिरान सांगून पाठविलें. परतु तो न ऐके. तेव्हां त्यास मारल्याखेरीज परिणाम नाही असा निश्चय जाला. परतु हत्यार चालवावें, तर सायकाळ जाला फौज जमा होती व सोदे हि जमा जाले होते हत्यार चालविलें असतां लष्कर लुटलें जाईल गुल पडेल. यास्तव ये वेळेस महकुफ करावे. प्रात:काळी उद्योग करावा. याप्रमाणें त्यांचे आमचे विचारे ठरून कारभारी गोटास गेले. नंतर गोसावी याचे बोलणे लागलें की आश्वासन देत होता ते द्यावे. म्हणजे कबूल. तेव्हां आम्ही आश्वासन दिले जे तुझे मुलामाणसास व चीजवस्तेस उपद्रव होणार नाही. लोक मात्र ठेऊं नयेत. आणि महाल खाली करून द्यावेत. तुम्हास झाशीस पाठऊं हे बोलणें त्याणें मान्य केले. तेव्हां हे बोलणें व याप्रमाणें करार केला म्हणून पाटिल-बावाकडे सांगून पाठविले त्याचे उत्तर केले की करार केले ते बरे व आणखीहि करार करावा. परतु तीन चार जाबसाल त्याजकडून करून घ्यावे तोफा त्याज-कडे आहेत त्या व वृंदावनी देवास आम्ही पडदे व विझ्यान वगैरे सरंजाम करून दिला होता, तो व दोन मूर्ती नेल्या आहेत व आमचे बसावगाचे घोडे याप्रमाणें आम्हांस द्यावे. याचे उत्तर आमच्या कारभाऱ्यानी केलें की त्याजवळ असेल ते देईल चिंता नाही वचन द्यावें की काय? त्याणीं उत्तर केले की वचन द्यावें. नतर मागाहून चोहो घटकानी कृष्णोबा चिटणीस आले. त्याजबरोबर एक कलम जाजती सागून पाठविले की, त्याजकडील घोडी वगैरे सरकारात आणावी. याचे उत्तर आम्ही केले की, वरकड कलमास चिंता नाही. परतु घोड्याचा करार आम्ही त्यासी केला आहे की तुझी तुजकडे राहतील. तेव्हा आमचा करार तुम्हास निभावला पाहिजे, नाहीतर तुम्ही सांगावें की तुमचा करार यमुनेंत राहू द्यावा मग जे करणें ते करावें. असे कित्येक जाबसाल गरमनरम जाहाले, व उमरावगीर याचा बदोबस्त करून द्यावा म्हणून पाटीलबावांनी आम्हांकडे सागून पाठविले असें कितेक तऱ्हेचे बोलणें पडले आहे.'

या प्रकरणासंबधी सविस्तर माहिती मागील हप्त्यात दिली आहे. यामुळें याची द्विरुक्ति येथ करीत नाहीं. पाटीलबावाच्या सागण्यावरून आपण अभय

देले; तेव्हां हिंमतबहादराची घोडी व भाऊ ताब्यांत घेण्याची नवी कलमें मान्य करतां येणार नाहीत असे अलीबहादराचें म्हणणें. उलटपक्षी आमच्या माणसासमक्ष वचन दिले असते तर ते आम्हास बंधनकारक झालें असतें असे पाटीलबावाचें म्हणणें होतें. नानांनी प्रथम बहादराचा पक्ष धरला; परतु हिंमतबहादर हातीं न आल्यास आपण सर्व कारभार टाकून पुण्यास येऊं असे पाटीलबावा म्हणू लागले. तेव्हां अलीबहादराने मिटते घ्यावें असे नाना सांगू लागले. कारण पाटीलबावाची दरबारात भीड फार मोठी होती. यासबंधी बहादराची आई यास लिहिते "तुम्ही प्रथम शपथ केली ते समई दूरदेशी नजर देऊन प्रसंग पडला असता निभावयास मार्ग राखून कोणी एक गोष्ट करावी ते न करतां दुसऱ्याचे स्वार्थासाठी आपण पेचांत पडावयाची गोष्ट घडली. त्यास तेथेंच हरयुक्त राजनीतीतील मार्गाची करून आपण निखालस व्हावें, तेंहि हा वेळ पावेतो केले नाही येथील भरवशावर राहिला तुम्हांवर ममता आहे ही खरी. परंतु या प्रसगी त्यांची (पाटीलबावाची) भीड व इभ्रत पडेल ती तुमची पडणार नाहीं. तुम्ही शपथ केली ती दुमऱ्याचे सांगितल्यावरून केली. ती त्यांणी निभवावी ती न निभावली; व तुम्हीहि आपले वचनाकरितां पराकाष्ठा होती ती केली. त्यास हें राजकरण आहे एकच गोष्ट धरून बसावें ही मसलत नव्हे. जसा रग पडेल तसा कारभार करावा लागतो. राजकारभाराचे शपतीच्या गोष्टी तुमचे ऐकण्यात बहुत आल्या असतील व काहीं पाहाण्यांतहि आल्या असतील." दुसऱ्या एका पत्रात या बाईने राजकारणात शपतेची मातबरी नाहीं असें साधार दाखविले आहे ती लिहिते "राजकारणास शपथ कोठें धरून बसतात ? रंग पाहून काम करतात. प्रस्तुत निजामअलीखा यांनी तुमचे देखत श्रीमत कैलासवासी दादासाहेब यास शपथ कुराण उचलून हातीं दिल्हे पुढें वर्तणुक जाहाली ती तुम्हांस माहिनच आहे. व दमाजी गायकवाड यास शपथ देऊन लुटिले; व बाबूजी नाईक याजबरोबर मराठ्यास शपथ देऊन आणिला आणि डोकें मारिले अशा गोष्टी राजकारणाच्या आहेत राजश्री पाटीलबावांनीहि तुम्हां कडून शपथ देववून गोसावी हाताखाली घालण्याची काबू केली होती. परतु तुम्ही त्याचा दस्तऐवज पक्का न घेता शपथ देऊन चुकला" पाटिलबावाशी वागताना तोंडी व्यवहारावर विश्वासून न राहतां "कोणाचें राजकारण करा म्हणाले अथवा पत्र ल्याहा म्हणाले तर तुम्ही त्या मजकुराची याद लिहून त्यावर त्याचे हातचें कांही करून घेऊन मग करणें ते करावें" असें बहादरास एक वर्षापूर्वी लिहिले होतें. या प्रकरणी बहादर नानाच्या पत्रात पाटिलबावांच्या उणेपणाच्या गोष्टी लिहीत असे त्याबद्दल नानांनी असा इषारा दिला आहे की "कदाचित् पत्र हरबहाण्यानें धरावयास पाटिलबावा चुकणार नाहींत. याकरितां पत्रांत अशा गोष्टी लिहूं नयेत. इतबारी तसाच कोणी आला तर मुखजबानी सांगून पाठवावें"

हें प्रकरण पुष्कळच वाढलें. शेवटी सवाई माधवरावानीं स्वत: मध्यें पडून गोसाव्यास झाशीस ठेवावें; लवाजमा आहे तसा असो द्यावा; महाल व ठाणी यांच्या सोडचिठ्या घेणें, असे ठरलें. याशिवाय शिंदे होळकर जैपूरच्या मसलतीस जातील तर अलीबहादरानें जावें; नाही तर त्यानें बुंदेलखडांत जावे असेंहि पेशव्यांनी लिहून कळविले. बुदेलखंडांत बहादरास पाठविण्याचे कारण नानानी तुकोजी होळकरास असें लिहिलें आहे :–

"गोसावी प्रकर्णावरून पटिलबावाजवळ राहिल्याचा अलीबहादरास संतोष नाही, त्यापेक्षा राहिले असतां रोज उठोन पचाईती पडतील. बुदेलखंडांत कोणी तरी सरकारांतून गेले पाहिजे, त्याअर्थी यांस तिकडे पाठविलें असता ठीक पडेल"

परतु पाटिलबावाचें म्हणणे असे की, बुदेलखंडाचाच बदोबस्त परस्पर सरकारांतून कां व्हावा ? आम्ही सर्व उत्तर हिंदुस्थानाचा कारभार करतो तो सरकारी नव्हे की काय ? त्यावर बहादर म्हणाला 'बुदेलखडांत सरदार आजवर कोणी गेले नाहींत, आमचे तीर्थरूप समशेरबहादूर गेले होते.' यावर पाटिलबावा रागावून म्हणाले 'कीं, समशेरबहादराची रवानगी शिंद्यानीच केली. याविसींची पत्रें चांभारगोंद्यास असतील ती आणवितो.' यावरून शिंद्याचे दप्तर चाभारगोंद्यास होतें असें दिसते.

अशी पुष्कळच बोलाचाली झाली. गोसावी झाशीस ठेवावा असे पेशव्यांचे सांगणें. परतु गोसावी काही केल्या हालत नाही असे बहादराचे म्हणणे पडले. शेवटी पाटिलबावानी पड घेऊन कांही दिवस गोसाव्याची मुक्तता करावी असे कबूल केले. कारण या भाडणाचा फायदा घेऊन रजपूत व मुसलमान डोके वर काढू लागले होते. प्रथम जयपूरकरावर सर्वांनी मिळून स्वारी करण्याचे ठरले अलीबहादरास पाटीलबावानी लाख रुपये खर्चास दिले. तरीहि त्याने कुचराई केली, इतकेच नव्हे तर जैपूरकराचे वकीलाशी आपण व हिमतबहाद्दर यांची उघड खलबतें सुरू झाली. पुढे पुढे तर तो परत पुण्यास निघून जाणार व जाताना शिंद्यांचा माळव्यांतील मुलुख लुटणार असेहि पाटिलबावाना समजले तेव्हा बहादराच्या या दाडगाईच्या मुळाशी नाना असले पाहिजेत अशी त्याची खात्री झाली. त्यानी पुण्यांतील आपल्या वकिलास लिहिले की 'आलीबहादर असे करू लागल्यास आम्हास इकडील मसलत सोडून माळव्याचे सरक्षणार्थ जाणे प्राप्त आहे. लिहिल्याप्रमाणे तुम्ही सविस्तर नानांस सांगावे. पहिले याचे चालीचे लिहिले होते ध्यानात आले नाही; हाली लिहिलें आहे. त्याचे ध्यानात येणारच नाही. तथापि आपले तर्फेने श्रुतं हरति पापानि याकरितां अगोदरच सागोन ठेवावे. याणी येथे असा विचार केल्यास आम्हास करणें प्राप्त या उपरि आम्हांकडे शब्द नाहीं. सरकारचे पत्रावरून इकडील मसलतीसंबंधें करोडो रुपयेचे पेचांत येऊन मलख सोड-

विला; दोनी संबस्थानियाचे पारिपत्य करून सरकारचा नक्ष राहिला. जरब बसली. या दाबांत दाब देऊन चार रुपये घ्यावे असा प्रसंग असता सरकारांतून कुमकेस सरदार पाठविले त्याणी फंदफितूर राजे रजवाडे यासी केला व करवितात. त्याचे बारीक मोठे कोठवर ल्याहावे ? त्याची वर्तणूक असी. असो. चिंता नाहीं. श्रीमंताचे पायासी आमची निष्ठा आहे. तीच तारक आहे."

हे पत्र रामजी पाटलानी नानास दाविखलें. तेव्हा नानांनी बहादरास परत येण्याविषयी लिहिले. रजपुताशी लढाई चालू असतां भांडून निघाले असा लोकांत गवगवा होऊ नये, याकरिता पाटिलबावानी जाहीर रीतीनें बहादरास संतोषानें निरोप द्यावा असे सुचविलें होतें.

त्याप्रमाणें निरोप घेण्यासाठी बहादर पाटीलबावाकडे जात होता, तेव्हां त्याला आपल्यावर दगा होईल असा संशय आल्यावरून तो परतला. उलटपक्षी बहादराच्या मनांत आपणावर दगा करावयाचा विचार होता अशी तक्रार पाटीलबावानीं केली. तेव्हा 'दग्यापावेतो गोष्टी परस्परे वाढून चित्तांत आल्या तेव्हा पुढें स्वच्छतेचें वागणे कठीन', असे नानानी ठरविले. परंतु रामजी पाटलाच्या मध्यस्तीनें अशी तोड निघाली की बहादराने गोसाव्यास स्वाधीन करावें आणि पाटीलबावांनी बहादरास वीस लक्षाची जहागीर द्यावी. तथापि समेट घडला नाहीं. यामुळें बहादर मथुरेहून निघाला; आणि जाता जाता पाटिलबावाच्या स्नेहांतील कृष्णगडवाला याचे गांव जाळले व लुटले; आणि नजफकुली वगैरे शत्रुपक्षांतील मुसलमानांशी गुप्तपणें बोलणें लाविलें. यामुळे पाटिलबावानी समेट करून पाहणाऱ्यास श्रीमताच्या पायाची शपथ घेऊन स्वच्छ असें सांगितले की," एक गोसाव्याचा लढा आहे असें नाहीं. अनेक कारणांमुळें समेटाचे बनणार नाही " शेवटी अलीबहादर डंघई प्रांतात जाऊन गोसाव्यास स्नेही या नात्याने वागवू लागला; आणि या दोघांनी मिळून नाना महादजी या दोघांच्याही सांगण्याकडे लक्ष न देतां विरुद्धपणें वागण्यास सुरवात केली.

शिंद्याच्या मदतीसाठी नानांनी अलीबहादर व तुकोजी होळकर यांची रवानगी केली होती, पैकी बहादराच्या हालचालीची हकीकत आज वर्णन केली. याबरोबर होळकराच्या हालचालीचें वर्णन द्यावयास पाहिजे. परंतु तेहि प्रकर्ण असेंच मोठें आहे; व चंद्रचूड दप्तरातील या विषयीचे कागदहि पुष्कळ आहेत. याकरितां त्यांचा समाचार घेण्यास आणखी एक वर्षाची हप्तेबंदी करणें भाग आहे.

ही पत्रे वाचीत असताना शिंदे परत देशीं येण्यास उत्सुक झालेले होते व नाना त्यांना हरतऱ्हेनें अडवू पहात होते अशी मनाची खात्री होते. शिंदे परत आले तर उत्तरेकडचा बंदोबस्त राहणार नाही असें नाना म्हणत; आणि आपण श्रीमंताचें दर्शन घेण्यासाठीं देशी येणार असा शिंदे यांचा आग्रह होता. एवढें मोठें राज्य मिळा-

लेलें असून शिंद्यांना परत देशी जावेसें वाटत होते, याचे इगित काय असा साहजिक प्रश्न उपस्थित होतो. अलीबहादर मदतीस म्हणून आले व शिंद्याना शत्रुवत् झाले, यामुळे शिंदे उत्तरेकडे राहण्यास कंटाळले असे म्हणता येत नाही. कारण बहादर मथुरेस पोंचताच किंवा त्यापूर्वींच शिंद्यानी देशी जाण्याचा निर्णय केला होता. देशी जाण्याची ही उत्सुकता बहुतेक सरदारांच्या ठिकाणीं दिसून येते. सामान्य प्रवासी ज्याप्रमाणें कांही दिवस परठिकाणी राहिल्यानतर परत आपल्या घरी येण्यास आतुर होतो त्याप्रमाणे मराठ्याना केवढेहि ऐश्वर्य मिळाले तरी परत स्वदेशी यावें असे वाटत असे. परदेशी राहण्यांत आपण आपली बुद्धि व शक्ति गमावीत आहो आणि ती परत कमावण्यास स्वदेशी जाणें हेच खरें औषध आहे असें त्यांना वाटे. नाना व महादजी हे दोघे त्यावेळचे कर्ते पुरुष. दोघेहि कर्ते व विचारी असल्यामुळे त्याची मतें कधी जुळत तर कधी तीव्र मतभेद होई आणि दहा वर्षेपर्यंत यांच्या भेटीचा योग आला नसल्यामुळे एकमेकाच्या हेतूविषयी बराच गैरसमज उत्पन्न झाला होता. किंबहुना हे दोन स्वतत्र पक्ष निर्माण झाले होते असें म्हणण्यास हरकत नाही. तथापि पक्षभेदाच्या जाणिवेबरोबर परस्पराविषयीची आदरबुद्धि मात्र अजिबात नाहीशी झाली नव्हती. "नानाचा आमचा भाऊपणा असून त्यांनी आमच्या विरुद्ध अलीबहादराकडून असा फद उभारावा हें आश्चर्य आहे. याचा जाबसाल आम्ही देशी गेल्यावर त्याना विचारू" असे पाटिलबावांचे उद्गार निघत आणि 'आमचे करणें सरळ असून पाटिलबावा उगाच तर्क वाढवितात; तथापि सर्व संदेह जातील' असें नानानी वारवार लिहिले आहे. सारांश, दोघांचाहि हेतु स्वराज्याची वाढ करावी हाच असल्यामुळे, गैरसमज नाहीसे होऊन खरा मार्ग सुचण्यास एकमेकाची भेट होणें हाच राजमार्ग मोकळा आहे याची जाणीव दोघांनाहि होती. आणि शेवटी दोघेहि पुण्यास भेटले तेव्हा प्रथम वर्ष दीड वर्ष भाडण्यात गेले खरे, पण शेवटी त्यांची दिलसफाई झाली. यावरून त्यांची भेट बारंबार होत गेली असती तर सफाई होण्यास इतका अवधि लागला नसता. एकाच हेतूनें प्रेरित झालेल्या दोन पक्षांच्या पुढाऱ्यानी अधून मधून खासगी रीतीनें धोरणाचा खल करणेंच श्रेयस्कर असतें असे यावरून दिसतें.

# ११

## होळकरांच्या इतिहासावरून सुचणारे कांहीं विचार

पेशवाईंत मराठ्याचें राज्य वाढून त्यास साम्राज्याचे स्वरूप प्राप्त होण्यास ज्या कर्त्या घराण्याचे परिश्रम उपयोगी पडले त्यात होळकर घराण्याची गणना प्रामुख्याने केली पाहिजे. ही साम्राज्याची कल्पना थोरल्या बाजीरावापासून खर्ड्याच्या लढाईपर्यंत स्पष्टपणें अस्तित्वात होती व तेवढ्या अवधीत मल्हारराव व देवी अहिल्याबाई यांच्या हातून इतिहासात नमूद होण्याजोगी कामगिरी झाली आहे मराठ्यांच्या पराक्रमास उत्तरेकडे चागला वाव मिळण्याजोगा असून तेथे पराक्रम गाजविण्यांत मराठ्याचा दरारा सर्वत्र वाढणारा आहे ही गोष्ट थोरल्या बाजीरावाच्या लक्षांत प्रथम आली. 'या उत्तरेकडल्या मोहिमात पैसा मिळणार नाही व कर्जबाजारीपणा पत्करावा लागेल' वगैरे विचार पुरंदरे मडळीनी स्पष्टपणें त्याना बजाऊन सागितले. परतु पैशाच्या विचारापेक्षां यशाचा विचार बाजीरावांच्या मनाला आवडता असल्यामुळे त्यानी उत्तरेचाच मार्ग धरला, आणि या त्यांच्या कार्यक्रमात बाड्याची नोकरी सोडून मल्हारराव सामील झाले. ' गुणी गुणं वेत्ति ' या न्यायाने बाजीरावाच्या धोरणाचे मर्म मल्हाररावास पटलें होते. यामुळे या दोनहि पुरुषाचे सहकार्य घडून आले. शाब्दिक संबधच पाहूं गेल्यास या दोघात धनी व नोकर असे नाते होतें; पण मल्हाररावाची कर्तबगारी व महत्त्वाकांक्षा, त्याची दूरदृष्टी व धाडस आणि त्यांची स्वतत्र विचारसरणी व मनुष्यस्वभावाची ओळख इत्यादि गुणांमुळे हा इतर नोकरासारखा सागकाम्या नव्हे, हे लौकरच बाजीरावाच्या देखील ध्यानांत आले. यामुळें सेव्यसेवक नात्यावरून क्रमाने सहकार्याचे स्वरूप प्राप्त होऊ लागले उत्तरेकडे मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी रजपूताशी वागतांना काय धोरण ठेवावें हा प्रश्न सोडविणें फार कठीण होते. हिंदु म्हणून उराशी धरावे तर त्यांची आपसात एकी नाही आणि त्याना जमेस न धरावे तर त्यांची वीरवृत्ति मराठ्यांना साक्षात् विरोधक होण्याचा संभव होता. शिवाय प्रारंभी बाजीरावाना शाहू महाराजाची मर्जी संभाळून राजकारण करावें लागे. यामुळे उत्तरेकडील स्वाऱ्यांत त्यांना सर्व वेळ घालवितां येईना; दक्षिणेतील कामगिरी देखील त्यांना आधून मधून सभाळावी लागे यासाठी त्यानी आपल्या सरदारांकडे उत्तरेकडील राजकारणाचा धागा अखंड ठेवण्याचें काम सोंपविले होतें. त्यांत मल्हारराव रजपूतांच्या राजकारणांत अधिक लक्ष घालीत; व प्रसंगानुसार कोणाशीं स्नेहाची तर

कोणाशीं विरोधाची भाषा ते बोलत. अशा रीतीनें तेथील प्रश्न गुंतागुंतीचा होत चालला तरी तो सोडविण्यांत व रजपूत व दिल्लीकर यांच्याशी मराठ्यांचे संबंध ठरविण्यांत बाजीरावांना मल्हाररावांचें चांगले सहाय्य झाले. त्यानंतर पुढच्या कारकीर्दीत म्हणजे नानासाहेबाच्या वेळी हा विषय अधिकच गुतागुतीचा झाला. यामुळें मल्हाररावाच्या वागणुकीविषयी पुणें दरबारात गैरसमज झाला. तो घालविण्यासाठी ( नानासाहेबांच्या पत्रातील एका मुद्यास उत्तर देतांना ) मल्हाररावांनीं जें उत्तर दिलें आहे ते फार मार्मिकपणाचें आहे. नानासाहेबाच्या लिहिण्यांत असें आले होतें की, "राठोड बेइमान, याची माया किमपि न धरतां साफ उत्तर लिहिणें." त्यावरून मल्हारराव उत्तरादाखल असे कळवितात की, "स्वामीचे नांव आमचे पदरी याजमुळेच या रजपुतांसी स्नेह अगर कोणासी विरुद्ध, त्यास हे रजपूत ज्यापासून निर्माण झाले अथवा साक्षात् बधु ते परस्परांचे एकाचे एक नव्हेत, तेथे ते आमचे कोठून होणार? आम्ही याचा भरंवसा कोठून धरणार! अभेंसिगानें आपणावरी कधी कधी कृतोपकारहि केला नाही, अथवा लालचेचा प्रसंगहि आहे नाही, मग कोणे गोष्टीनिमित्य स्वामिसेवेस चुकावे? त्यास कायावाचामनकरून येकनिष्ठा, स्वामीचे पायी आहे. येविमी लिहावे ऐसे नाही." (पेशवे दप्तर २७, अनुक्रमांक २)

यावरून मल्हाररावांच्या स्वमिनिष्ठेविषयी नानासाहेबाच्या मनांत या सुमारास ( इ. स. १७४२ ) शका उत्पन्न झाली होती, हे उघड आहे. त्यास उत्तर देतांना मल्हारावानीं दोन महत्त्वाच्या गोष्टी सागितल्या आहेत. रजपूत लोकांत एकी होऊ शकत नाही; ते बापास बाप म्हणत नाहीत किंवा भावास ओळखीत नाहीत; तर केवळ वैयक्तिक उत्कर्षासाठी धडपडणारे आहेत. त्याअर्थी त्याच्या शब्दावर विश्वासून स्नेह अगर विरोध करणें शहाणपणाचे ठरणार नाही त्याचप्रमाणें उत्तरेकडे वावरणाऱ्या सरदाराना जे महत्त्व होते व त्यांचा जो दरारा तिकडे लोकाना वाटत होता तो त्यांच्या वैयक्तिक पराक्रमावर उभारलेला असला तरी त्या सर्वांना 'मराठ्याच्या राज्यातले सरदार' हे जे उपपद होते तेंहि फार सहाय्यकारक होते. आपण मराठी राज्यातलें अथवा साम्राज्यातले अंशधारी आहों हे लक्षात ठेऊन वागण्यात आपले हित आहे याची जाणीव बहुतेक मराठे सरदारांना होती. मराठे सरदाराना वैयक्तिक महत्त्वाकाक्षा होती यांत शका नाहीं त्याचप्रमाणें त्याना स्वत विचार करण्याची सवय असल्यामुळे मतभेद पडेल तेव्हा स्वतःच्या अगावर काम घेऊन यश मिळवून दाखविण्याची हौसहि त्याना होती हेहि खरें आहे. पण एवढ्या बाबतीत रजपूत व मराठे यांच्या वागणुकीत साम्य असलें तरी सर्व मराठे सरदार कांहीं महत्त्वाच्या प्रसंगी मतभेद विसरून एकोप्यानें वागलेले जसे दिसत, तसें रजपुतांचें नव्हतें. भोपाळ, उदगीर, पाणिपत, राक्षसभुवन, तळेगांव, आणि खर्डें येथील युद्धांची हकीकत लक्षांत घेतली असतां त्या वेळच्या मराठे

सरदारांना समानशत्रुत्वाच्या प्रसंगीं जुटीने वागण्याची बुद्धी सुचत होती हें निःसंशय आहे, आणि यांसारखे प्रसंग रजपुतांच्या इतिहासात आढळत नाहींत. यामुळें बाजीरावांच्या उपक्रमाने मराठ्यांच्या राज्याचें साम्राज्य होऊं शकले; पण सवाई जयसिंगासारख्या पराक्रमी व बुद्धिमान राजाला रजपूतांचे साम्राज्य अस्तित्वांत आणतां आलें नाही.

हे खरे आहे की, युरोपात 'राष्ट्र' ही जी कल्पना उत्क्रांत झाली व देशभक्तीची भावना फैलावली ती पेशवाईंत वावरणाऱ्या सरदारांना माहीत नव्हती. यामुळे देशभक्तीने अथवा राष्ट्रबुद्धीने प्राप्त होणारें ऐक्य मराठी राज्यास आलेलें नव्हते. किंवा शिवाजीमहाराजाच्या सारख्या असामान्य पुढाऱ्याच्या नेतृत्वामुळें उत्पन्न होणारा अगर औरंगजेबासारख्या कडव्या धर्मभावनेनें आघात करूं पाहणाऱ्या बादशहाच्या सैन्याशी प्रत्याघात न्यायाने तोंड देण्याच्या प्रसंगी 'धर्मसंरक्षणासाठीं मारीन किंवा मरेन' या विचाराने भरणारा आवेश मराठ्यांच्या ठिकाणी दिसून येण्यास पेशवाईंत अवसर नव्हता. धर्माच्या नावाखाली मराठी राज्यावर चढाई करण्याचें धोरण, औरंजेबाच्या मृत्यूबरोबर लयास गेलें. त्यानतर पेशवाईच्या काळांत जो प्रश्न निरनिराळ्या राजकर्त्यांना सोडवावयाचा होता तो धार्मिक स्वरूपाचा नसून राजकीय महत्त्वाकाक्षेचा होता. वसईचा वेढा आणि छत्रसालास मदत या दोन प्रसंगी धर्माच्या नावानें मारलेल्या हाकेस मराठ्यांनी ओ दिली. परंतु हे दोन प्रसंग अपवादादाखल होते इतर सर्व वेळी त्याच्या हालचाली प्राधान्याने राजकीय स्वरूपाच्या होत्या.

हे राजकीय स्वरूप, मागे सांगितल्याप्रमाणे, राष्ट्रीय कल्पनेमुळें प्राप्त झाले नसून, राज्यविस्ताराच्या कल्पनेनें आले होते. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांनी एकमेकाशी आपलेपणाच्या भावनेनें वागावे आणि मराठी राज्याची मर्यादा मराठी भाषा बोलणाऱ्या प्रांताना व्यापणारी अशी असावी ही आजची राष्ट्रीय कल्पना पेशवाईतल्या लोकाना स्पष्टपणें सुचलेली नव्हती. त्याना राज्याची कल्पना समजत होती व राज्याचे साम्राज्य बनविणे आणि साम्राज्याची सूत्रे हातांत घेऊन आपले बळ वाढविणें या दृष्टीने मराठ्याची खटपट सुरू होती. ज्या राज्याला लष्करी बळ अधिक असेल ते राज्य या चढाओढीत चक्रवर्ती बनणार हें त्या वेळच्या महत्त्वाकांक्षेचें पर्यवसान विचारी माणसांना दिसूं लागलें होतें. चढावाचें धोरण ठेवण्यानेंच खरा बचाव होतो हे त्यावेळच्या राजनीतीचें सूत्र मराठ्यांच्या पूर्णपणें लक्षांत आपले होतें. रजपुताना हें चढावाचें अथवा साम्राज्याचें धोरण माहीत नव्हते. आपल्या संस्थानाचा बचाव करावा, एवढीच त्यांची संकुचित दृष्टि होती. यामुळें ते या वेळच्या इतिहासांत गाजले नाहींत. निजामाचें राज्य पेशवाईच्या जन्मापासून अस्तित्वांत होतें व तो मराठा राज्य

खाऊन फस्त करील किंवा काय अशी भीति सुरवातीस वाटण्याजोगी परिस्थिति होती, परंतु निजामुल्मुल्काच्या अंगी धडाडी कमी; यामुळे त्याच्या हातून राज्य-विस्ताराचे धोरण स्वीकारलें जाण्याऐवजी शुद्ध बचावाचे धोरण स्वीकारलें गेले.

उत्तरेस दिल्लीच्या नामधारी बादशहाची वजीरी कोणाच्या हाती असावी या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी अनेक पक्ष अस्तित्वात आले होते. पण त्यापैकी कोणताहि पक्ष स्वसामर्थ्यावर जगण्याची हिंमत धरीत नसून अबदाली किंवा मराठे यांच्या आश्रयाने ते अधिकाररूढ होऊं पहात होते. म्हणजे त्यांचीहि दृष्टि फार संकुचित स्वरूपाची व परावलंबी अशी होती

अशा प्रकारे रजपूत राजे, दिल्लीचे सरदार व निजाम याच्यापेक्षां मराठ्यांची महत्त्वाकाक्षा व्यापक स्वरूपाची असल्यामुळे तिचा राजकीय व्याप कोणत्याही एका व्यक्तीच्या लक्षात येण्याजोगा नव्हता किंवा त्यांत उत्पन्न होणाऱ्या अनेक अडचणींचें निराकारण करण्यास एका व्यक्तीची मुत्सद्देगिरी किंवा एकाचे लष्करी कौशल्य पुरे पडण्याजोगें नव्हते पंजाबपासून श्रीरंगपट्टणापर्यंत व वसई-पासून मखसुदाबादेपर्यंत जेव्हा मराठ्यांचा संचार होऊ लागला तेव्हा मध्यवर्ति सत्ता व स्थानिक सरदार याच्या मधील सेव्यसेवकभावाचे नाते कमी पडले व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास महत्त्व येऊ लागले आणि ज्यात प्रामाणिक मतभेदास भरपूर जागा राहाते असे कठीण प्रश्न वारवार उपस्थित होऊ लागले.

ही परिस्थिति लक्षात घेतली असता मल्हाररावांच्या वर्तनाचा उलगडा होऊं शकतो. दिल्लीच्या राजकारणात नजीबाला हाताशीं धरावा किंवा त्याला विरुद्ध पक्षांत सामील होऊ द्यावा याविषयी एकमत होणे अशक्य होते. नजीब कर्तृत्ववान् व महत्त्वाकांक्षी आहे ही गोष्ट सर्वमान्य होती तेव्हां त्याच्याशी आपण गोडीगुलाबी ठेवल्यास तो अबदालीस, आपल्या साहाय्यासाठी बोलवणार नाहीं असा मल्हाररावाचा अदाज होता. परंतु त्याच्याशी गोडीनें वागण्याची कल्पना इतराना पसत नसल्यामुळे 'नजीब हा मल्हाररावाचा मानसपुत्र' असा गैरसमज पक्षभेदाच्या आरडाओरडीत अस्तित्वात आला. पण तो समज वस्तु-स्थितिनिदर्शक नव्हता मागे सांगितल्याप्रमाणे, 'रजपूतांच्या शब्दावर विश्वास न ठेवतां मराठ्यांचें पाऊल पुढे पाडण्यासाठी ज्याप्रमाणे एक रजपूत राजाशी स्नेह तर दुसऱ्याशी विरोध पत्करणें' मल्हाररावाना इष्ट वाटत होते, त्याप्रमाणें 'दिल्लीच्या कारभारांत आपले पाय प्रमाणाबाहेर गुतू न देता मराठ्याचा फायदा होण्यास नजीब यास हाताशी धरणें बरें' असा मल्हाररावांचा अभि-प्राय दिसतो. मनुष्यस्वभावाची यथार्थ पारख करण्यास लागणारे चातुर्य त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें त्याचा हा अभिप्राय बनला होता, आणि त्यात बरेच तथ्य होते ही गोष्ट, पाणिपत येथें घडलेला प्रकार व माधवरावांच्या कारकीर्दीअखेर

शिंदे व बिनीवाले याना नजीबाशी वागताना पत्करावे लागलेलें धोरण यावरून सहज दिसून येण्याजोगी आहे. तात्पर्य वादाच्या भरांत ' नजीब हा मल्हार-रावाचा मानसपुत्र ' असे जरी प्रतिपक्षांतील लोक टोचून बोलत होते तरी मल्हाररावाच्या मनांत नजीबाविषयी कळवळा असणें अशक्य होतें; त्याचा उप-योग हस्तक या नात्याने आपण करून घेतला पाहिजे, इतकाच त्यांच्या मताचा इत्यर्थ होता

अशा रीतीने मराठे सरदारात मतभेद व अहमहमिका यांचे प्राधान्य होतें तरी स्वत. बलिष्ठ बनावे अशी जी त्यांची खटपट चालली होती तिचे पर्यवसान एकंदरींत मराठ्याचा दरारा सर्वत्र वाढविण्यांत होत असे. दिल्लीकडील उमराव व वजीर आपसांत भांडण्याच्या कामीं मराठ्यांची मदत मागत व ती देतां देतां मराठे प्रबल झाले व मुसलमान सरदार निर्बल झाले असे तात्पर्य त्या वेळच्या घडामोडीवरून निघते.

देवी अहिल्याबाई यांच्या तोडचे शब्द म्हणून देवराव महादेव हिंगणे यानी इ. स. १७९४ नोव्हेंबर २ तारखेस लिहिलेल्या एका पत्रांत उद्धृत केले आहेत. (होळकर दरबारातील हिंगण्यांची वकीली पृ. १) त्यात ही गोष्ट स्पष्टपणें आली आहे. शिंदे होळकरांतील मतभेदाचें पर्यवसान त्याच्यांत प्रत्यक्ष खडा-जंगीची युद्धे जुपण्यांत होऊ लागले तेव्हा नाना व पाटीलबावा याना ही यादवी घातुक होईल हे दिसून आले. तेव्हा त्याच्यात तडजोड घडवून आणण्यासाठी वकिली करण्याचे काम हिंगण्याकडे देण्यात आले होते. त्याप्रमाणे ते गेले असता त्यांच्याजवळ अहिल्याबाईनी प्रसगानुरोधानें मराठ्यांची सत्ता कशी वाढली याचें विवेचन केले. त्यात त्यानी असें सागितले की, हिंदुस्थान प्रातात पादशाही सर-दार आपसात लढू लागले तेव्हा दक्षिणच्या फौजा तेथे गेल्या; व तिकडील सर-दारांनी 'एकमेकांची घरें दाखवून, एकमेकास जरब द्यावी ' असें धोरण पत्करले यामुळे " पैका, प्रांत आम्हास (मराठ्यांस) मिळाला, व कांही दिवसांत (शिल्लक) राहिला. (असेल त्या सरदाराचा) हलकेपणा पाहून आमचे फौजांनी त्याचाहि निर्वाह करावा ( = निकाल लावावा), असें होत होत आम्हास मोठेपणें मिळाली. पराक्रम जाले. पादशाई घरात येऊन श्रीमताचे राज्याची व आमचे सरदाराची वृद्धीच आजपर्यंत जाली आणि मराठे ज्याचा पक्ष करतील तोच सबळ ठरेल असें होऊन दक्षिणी फौजास आब चढला. सरकारात कोट्यावधीचा प्रांत व द्रव्य व सरकार वाटणीचे कमावीसदार गोविद बल्लाळ आदिकरून बसून कोडो रुपये रसदा बैलावर गोण्या भरून रुपये जात होते. ' इत्यादि.

यावरून मराठ्यात मतभेद व भांडणें होतीं व ते स्वतःचे बळ वाढविण्यासाठी झटत तरी, तुलनात्मकदृष्टीने पाहूं गेल्यास रजपूत व मुसल्मान याच्यापेक्षां मरा-

ठ्यांच्या वागणुकीत ऐक्याची भावना बलवत्तर होती; यामुळे इ. स. १७९५ पर्यंत त्यांचा दरारा हिंदुस्थानभर कायम होता. त्यानतर तो कां कमी झाला, याचे विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु होळकरांचें नांव काढतांच त्यांनीं मराठ्यांचे साम्राज्य वाढविण्याच्या कामात कुचराई केली व त्यांनी दुही माजविली असा जो समज बऱ्याच लेखकांनी पसरला आहे तो चुकीचा असून मराठ्यांचे राज्य वाढावे ही गोष्ट होळकरांना पूर्णपणें मान्य होती. मात्र ते कसें वाढावे याविषयींच्या उपायाबद्दल मतभेद झाल्यास तो होळकर स्पष्टपणें बोलून दाखवीत, इतकेच. आपले निराळे मत असल्यास ते होळकर स्पष्टपणें बोलून दाखवीत, यामुळें त्यावेळच्या लोकांत कधी कधी गैरसमज पसरत होता. परतु शेवटी हा गैरसमज दूर होऊन होळकरांच्या मतात बराच सत्यांश असल्याचें अनेक वेळां निदर्शनास येत असे.

---

# २०

## मराठी रियासत, उत्तरविभाग भाग, १ व २: पुस्तकपरीक्षण

[ कै. आपटे यांनी या विषयावर ज्ञानप्रकाशांत एकंदर सहा लेख लिहिले. त्यापैकी पहिल्या तीन लेखाकांतील मुद्दे प्रसगवशात् इतर लेखातून येऊन गेले असल्यानें येथें पुनर्मुद्रित केले नाहीत. सं. ]

### लेखांक ४ था

रियासतकारानी आपल्या नव्या ग्रथांत राजवाडे यांच्या 'झोड उठविण्याच्या' पद्धतीचें अवलंबन केलें आहे, हें मागच्या लेखाकांत सांगितलें. आता या पद्धतींतले गुण दोष कोणते व ती स्वीकारणें केव्हां योग्य असते हे ठरविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथाचें परीक्षण करूं. अितिहासकारानें ज्या विषयावर ग्रंथ लिहावयाचे ठरविलें असेल, त्या विषयाचें साहित्य व अितर लेखकांचें लिखाण बारकाअीनें वाचून आखून घेतलेल्या मर्यादेपुरतें कां होअीना, पण आपलें मत बनवून नंतर ग्रंथलेखन केलें पाहिजे. अेखादें पत्र वाचलें किंवा अेखाद्या ग्रंथकाराचें मत वाचलें

तर त्यावेळेपुरतें आपणास त्याचें म्हणणें खरें वाटतें; पण पुढे दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आपणास वाचावयास मिळाल्याने आपणास पूर्वींचें मत बदलणे भाग पडते. आपला पूर्वींचा ग्रह अेकतर्फी होता किंवा चुकीचा होता किंवा सर्वस्वी खोटा होता, अित्यादि निर्णय आपण आपल्या मनाशीं करूं शकतो आणि असा निर्णय केल्या-नंतर आपण तें प्रकरण लिहिण्यास हातीं घेतलें म्हणजे आपल्या पुढे शेवटचा निर्णय पक्का असल्यामुळें मध्यंतरीं अितर, विरूद्ध पक्षाच्या मजकुराचा अुल्लेख करावा लागला तरी, त्याविषयी ग्रंथकाराच्या मनात जी निश्चितता असते ती सर्व प्रकार-णांत सगति कायम ठेवते. म्हणजे अितिहासकाराने प्रथम विद्यार्थी बनावें; आणि या नात्यानें प्रकरणांचा अभ्यास करीत असता पुरावा पुढें येअील त्याप्रमाणे मत बदलण्यास तयार असावें; पण असें मत बदलीत मनाचा निर्णय झाला म्हणजे तो निर्णय ग्रथित करण्यासाठी ग्रंथकार बनावें. विद्यार्थीदशेत पूर्वग्रह सोडण्यास व नवे घेण्यास तयार असणें हा गुण आहे. त्याच्या जोरावर सर्व सामुग्रीचे मनन केल्यावर जी मतें बनतात ती मांडतांना भूमितीच्या सिद्धांताप्रमाणे सुसगत पद्ध-तीनें माडणे हे ग्रथकाराचें मुख्य लक्षण आहे. हे मनन होण्यापूर्वी लिहिण्याची घाअी केल्यास वाचकांचा गोंधळ होतो व लेखकाच्या हातून विसंगत विधानें होतात. पुरें न शिजलेलें अन्न वाढण्यांत स्वयपाक्याची घाअी प्रत्ययास येअून जेवणाराचे नुकसान ज्या कारणामुळें होते त्याच कारणामुळें विषयाचे मनन पुरे करण्यापूर्वी ग्रंथलेखन करण्यानें वाचकांचें होते. लेखकाचे मन पूर्वग्रह दूषित नसावे व त्याचे लिहिणें सुसंगत असावे या अैतिहासिक नियमाचा येथवर सांगितलेला अर्थ लक्षांत ठेवला असता ज्या झोड अुठविण्याच्या पद्धतीचे राजवाडे व सरदेसाअी यानी अवलंबन केले आहे तिचा अेकाच्या हातून सदुपयोग कसा झाला व दुसऱ्याच्या हातों तिचा दुरुपयोग कसा झाला तें लक्षात येण्याजोगे आहे

अुदाहरणार्थ, राजवाड्यांनी पहिल्या खडाच्या प्रस्तावनेत गोविदपंत बुंदेल्यास दोषी ठरविले त्यासंबधीची हकीकत पहा. डफ व बखरकार यांचे लिहिणें राजवाडे यानी वाचले तेव्हा पानिपतच्या पराभवाची कारणें त्या ग्रंथकारानीं कोणती दिली आहेत याचे बारकाअीचे टिपण त्यांनी तयार केलें व ते वाचकांपुढे ठेवले आणि अस्सल पत्र वाचल्यानंतर भाअूसाहेबानी गोविदपतास दिलेला दोष त्यांच्याच शब्दांत वाचकाना सादर केला. पुढे त्या परिस्थितीत भाअूसाहेबाचें मत आपणास ग्राह्य मानलें पाहिजे, असें स्वतःचे मत सागितले. मराठ्यांच्या सैन्याची त्यावेळीं जास्तींत जास्त माहिती जर कोणास असेल तर ती सेनापति भाअूसाहेब यांना असली पाहिजे असे गृहित धरून राजवाडे यानी निर्णय दिला. यामुळें त्यांचें विवेचन वाचीत असतां डफ व बखरी यांचें मत आपण कोठें वाचीत आहों, भाअू-साहेबांच्या पत्राचा अुतारा काय नवीन माहिती सांगतो आणि त्यापैकीं राजवाडे

कोणाचे मत ग्राह्य धरतात व कां धरतात हे समजण्यास वाचकाना अडचण पडत नाही; अेवढेंच नव्हे तर राजवाडे यांचें मत आम्हांस मान्य नाही; कारण भाअूसाहेबांनाच त्यावेळी चुकीची माहिती मिळाली असेल असेहि वाचकाच्या मनांत यावयास अडचण पडणार नाही. तात्पर्य राजवाडे यांच्या लिहिण्यांत गोविंदपंताविषयी अथपासून अितिपर्यंत कांहीतरी संगतवार रीतीनें आढळून येते. याचें कारण लेखणी हातीं घेण्यापूर्वीं त्यांनी त्यांच्याविषयी मत बनविले होते. त्यांत त्याना सदेह राहिला नव्हता.

आता रियासतकाराच्या लिहिण्याचा प्रकार पहा आपण गिबनसारखे अधिकारी अितिहासकार नव्हे हें सागताना ते स्वतःसंबंधी म्हणतात “ हा माझा प्रयत्न पहिला कच्चा खर्डा म्हणून अुपयोगी पडावा अेवढीच अपेक्षा मी बाळगतो. यास्तव पुष्कळ वेंचे व मिळाले तितके भरपूर तपशील थोडासा विस्तार सोसूनहि मी मुद्दाम दिले आहेत. ” (पृ. ८) यापैकी निवडक वेचे त्यानी दिले ही वाचकांची सोय झाली यात शंका नाही; कारण साधनांची अनेक पुस्तकें सग्रहीत करणे सामान्य वाचकाना बहुधा कठिण असते; मग त्यातला विशिष्ट प्रकरणांतला विषय जेथें जेथे आला असेल तेथून तो नेमका निवडून काढणें तर अशक्यच म्हणण्यास हरकत नाही. तेव्हा प्रकरणवारीने या ग्रथांत अैतिहासिक पत्रांतील अुतारे रियासतकारानी अेकत्र आणले, यासाठी ग्रंथ संग्रहीत करण्याची शिफारस करण्याजोगी आहे. पण त्यानी अुताऱ्याबरोबर स्वतःचा जो मजकूर लिहिला आहे तो त्यांच्याच शब्दात सागावयाचा म्हणजे ‘ पहिला कच्चा खर्डा ’ या स्वरूपाचा आहे असें म्हणणें भाग आहे. ग्रथ व कच्चा खर्डा यात अंतर का पडते, तें वर सक्षेपाने सागितले व राजवाडे याचे लिहिणें ग्रथनिविष्ट होण्याच्या योग्यतेचे का तेंहि सागितले. आता रियासतकाराचे लिहिणें कच्चा खर्ड्याच्या स्वरूपाचें कां झाले आहे ते पाहू. अेक प्रकरण म्हणजे भूमितीच्या अेका सिद्धाताच्या माडणी—प्रमाणें संगतवार असलें म्हणजे तें पूर्ण मननाचे निदर्शक समजतां येते. त्याप्रमाणें अुपमा देअून विषय स्पष्ट करावयाचा असल्यास असे म्हणता येअील; अितिहासाचा कच्चा खर्डा हा अकगणितातील अेखाद्या प्रकरणात असलेल्या अुदाहरणसंग्रहासारखा असतो. या सग्रहांत ज्याप्रमाणें ‘ अ ’ ला अेक काम करण्यास पहिल्या अुदाहरणांत ४० दिवस लागले म्हणून दुसऱ्या अुदाहरणात ४च दिवस लागण्यास काहीच हरकत पडत नाही; किंबहुना ‘अ’ हा अेकदां ४० दिवसांत काम करणारा ४च दिवसांत काम कसे करील अशी शंका कोणी अुपस्थित करील, तर शका घेणाऱ्याचा अरसिकपणा दिसून येअील, त्याप्रमाणे अितिहासाच्या कच्चा खर्ड्यांत मजकुराच्या बाबतीत म्हणता येते त्यांत विसंगति आहे असें कोणी म्हणूं लागल्यास कच्चा ह्या शब्दाकडे बोट दाखवून लेखकाला जबाबदारींतून मोकळे होतां येतें.

पण सामान्य वाचकाच्या मनाची सुटका मात्र अेवढ्याने होणार नाहीं. कारण 'पुष्कळ लोक माझ्या रियासतीवर अवलबून निर्धास्त राहतात, यांमुळे मला आपली जबाबदारी विशेष जड वाटते आणि विवेचनाच्या भरांत निदान माझ्या कृतीने भावी अभ्यासकाची दिशाभूल होअू नये अशी धास्ती मात्र सदैव मला मनांत बाळगावी लागत आहे.' असे रियासतकारांनी सांगितले आहे. म्हणजे आपल्या विवेचनाच्या भरांत भावी अभ्यासकाची दिशाभूल होअू नये हें तत्त्व त्यांना मान्य आहे. आणि अशी दिशाभूल झाली असेल तर तो दोष पदरांत घेण्यास ते तयार आहेत.

दिशाभूल, विवेचनाच्या भरात अेखाद्याचे गुण अगर दोष अतिशयोक्तीने वर्णन करावयाचे असतील तेव्हां होअू शकते किंवा वर सांगितल्याप्रमाणें पूर्ण मनन होण्यापूर्वी ठिकठिकाणीं सुचेल ते मत नमूद करीत गेल्याने होणाऱ्या विसंगतीने तरी वाचकाचा घोटाळा उडतो. पैकी महादजीचे गुण व नानाचे दोष अतिशयोक्तीनें वर्णन करण्याच्या भरीस पडल्यामुळे लेखकाच्या हातून कशी दिशाभूल घडते याचा नमुना पृ ४३३ वर पाहता येण्याजोगा आहे. तेथे महादजीचें वर्णन करतांना ते चित्र अुठावदार करण्यासाठी लेखकाने नाना फडणीस, पटवर्धन, तुकोजी, वगैरेचे नुसते अवगुण सांगण्याची अशी गर्दी अुडवून दिली आहे की हा अितिहास नव्हे, ही नुसती तरफदारी आहे हे सहज लक्षात येतें. कारण "शिवाजी महाराजांनंतर 'महाराज' नावास शोभणारा अखिल मराठेशाहीत हा अेकच पुरुष झाला यांत संशय नाही" हे सदर रकान्यांतले शेवटले वाक्य वाचीत असतां त्याच्या सिद्धी-साठी ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्यातील पक्षपातीपणा लक्षांत येण्यास फारशी अडचण पडत नाही. अेका कादंबरीकाराने ललितागौरीचें पात्र रंगवून नाना फडणिसाची नालस्ती केली, पण तेवढ्या आधारावर नानानें गर्ह्य मार्ग स्वीकारला असें ठरविण्यास रियासतकारांना हरकत दिसत नाही; पण 'तुळजापुरास भोप्या-च्या मुलीवर नजर गेली' याबद्दल महादजीला दोषी न ठरविता 'त्याने तिला योग्य मार्गाने जवळ केले' म्हणून त्याचे ते बेधडक समर्थन करतात. गुरु करणें अगर न करणें ही माणसाच्या योग्यायोग्यतेची कसोटी असण्याचे वस्तुतः कारण दिसत नाही. पण महादजीने गुरु केला असे पाहताच त्याचे करणे रियासतका-रांना अत्यावश्यक दिसलें. पण त्याबरोबर जरूर त्या प्रमाणात ब्राह्मणानाहि दोष देण्यास त्यांना संकोच वाटला नाही कारण ते म्हणतात, 'मनसूरशहा किंवा दत्तनाथ यांच्या योग्यतेचे साधु पुरुष तत्कालीन ब्राह्मण मुत्सद्यांचे सुद्धां गुरु नव्हते.' अेकूण तत्कालीन ब्राह्मण मुत्सद्यांना गुरु केला नव्हता म्हणावा तर त्याचा अुणेपणा अुघड ठरला, आणि केला होता म्हणावें तरी तो मनसूरशहा सारखा मुस-लमान होता हें सिद्ध झाले नाही तोपर्यंत त्याला जोडीदार म्हणून अुभे करण्याची

पंचाअीतच पडणार आहे. अकूण नानाचा कमीपणा दाखविण्यासाठी जी जी कसोटी रियासतकारांनी मांडली आहे ती अितकी विचित्र व अप्रस्तुत आहे की केवळ 'नावडतीचें मीठ आळणी ' हा न्याय पत्करून त्यानीं ही अतिशयोक्तिपूर्ण तुलना केली आहे, असें म्हणणे भाग आहे अहिल्याबाअीच्याहि वाटयाला असाच प्रसाद आला आहे. ' महादजी प्रेमळ भगवभ्दक्त होता, आपला पुष्कळ वेळ तो अिश्वर-भजनांत घालवी. स्वतः भक्तिपर पदे रचून तो ती म्हणत असे' हे वर्णन रियासत-कारांनी कौतुकपूर्ण शब्दात केले आहे व साधूंच्या आशिर्वादाने आपणास यश मिळतें अशी त्याची दृढ समजूत होती व साधु आणि ज्योतिषी याच्या भेटीस तो जाअी हे सांगतांना त्यांनी आक्षेपाचा शब्द काढला नाही. पण अहिल्याबाअीसंबधी लिहितांना हेच त्यांना अवगुण भासले " अैहिक कर्तव्यापेक्षा पारमार्थिक पुण्या-र्जनाकडेच तिने सर्व लक्ष दिलें. देशभर पसरलेले घाट, मंदिरें आणि अन्नछत्रे मराठशाही तारण्यास समर्थ झाली नाहीत; अुलट अद्याप पावेतो त्याच्या चाल-वणीचा बोजा दरिद्री राष्ट्रास साभाळावा लागत आहे" असा कोरडा ओढून ' तटलेल्या राष्ट्रकाजास अुघड अुघड अुपाशी मारून कोटयावधि पैसा केवळ स्वतःच्या लहरी खातर ब्राह्मणभोजनासारख्या लौकिक कृत्यांत सारखा तीस वर्षे पावेतों अुडविण्याचा तिला काय हक्क होता ! ' असा प्रश्न रियासतकारांनी विचारला आहे. आणि राष्ट्रकार्याची आजची कल्पना मनापुढे ठेवली म्हणजे अहिल्याबाअीने बाधलेले घाट, व तिनें घातलेली ब्राह्मण भोजने ही अुधळपट्टी झाली असें म्हणण्यास हरकत नाही हे खरे. पण शंका अेवढीच की, आजची राष्ट्र-कार्याची कल्पना अहिल्याबाअीच्या डोक्यांत नसताना तिने आपल्या वेळच्या कल्पने-प्रमाणें पुण्यकर्म म्हणून जे आचरण केलें, त्याबद्दल अितिहासकाराला तिला दोषी ठरवि-ण्याचा हक्क पोंचतो किंवा काय ? अितिहासकाराने आजच्या कल्पनेने मागल्या लोकाना दोषी ठरवावयाचे झाल्यास त्यातून कोणीच सुटणार नाही; आणि खुद्द महादजीला देखील 'ही कसोटी मला लावू नका व रियासतकाराच्या तरफदारी-पासून मला वांचवा असे म्हणावें लागेल ! सारांश, अतिशयोक्तीचा आश्रय करून नानावर झोड अुठविण्याच्या अिच्छेने रियासतकाराना या ठिकाणी दगा दिला आहे. आतां विसगत विधानाचा विचार पुढील लेखांकांत करूं

❀ ❀ ❀ ❀

## लेखांक ५ वा

मेकॉलेच्या पद्धतीचें अनुकरण करून अतिशयोक्तीच्या आश्रयानें भडक चित्र रंगविण्याचा प्रयत्न रियासतकारांनी कसा केला, ते मागील लेखांकांत सांगि तलें. आतां नाना व महादजी यांची तुलना करून इंग्रजांशीं त्यांनीं ठेवलेल्या वर्तनाच्या कसोटीवरून त्यांची योग्यता अजमावण्याचा अेक मार्ग रियासतका-

यांनी पत्करला आहे त्याचें परिक्षण करूं. वस्तुतः अिंग्रजांचे राज्य महाराष्ट्रावर झालें तें नाना व महादजी हे दोघेहि मरण पावल्यानंतर झाले. तेव्हां या नंतरच्या अिंग्रजांच्या सरशीबद्दल मागल्या मुत्सद्यांना दूषण अगर भूषण बहाल करणे अितिहास पद्धतीस धरून होणार नाही. अहिल्याबाअीने केलेल्या दानधर्माचे पैसे आमच्या स्कॉलरशिपा किंवा अितिहासाची चळवळ यांना लागू शकत नाहींत, याबद्दल अहिल्याबाअीच्या नावाने तडफडण्यांत ज्याप्रमाणें अर्थ नाहीं, त्याप्रमाणें अिंग्रजांना मराठ्याचें राज्य घेता आले याचा दोष नाना व महादजी यांच्या माथी मारतां येत नाही. या राज्यक्रांतीचें प्रत्यक्ष अवलोकन करणारे लोक देखील ‘ खूप शर्तीनें राज्य राखिलें यशवंत फडणीस नाना ’ असे गात होते; व बाजीरावाला अिंग्रजानी चीत केले असा त्यानीं सरळ अभिप्राय दिला आहे. तो बदलून श्रीरंगपट्टणाच्या मोहिमेत नानाने अिंग्रजाची बाजू अुचलली, त्यामुळे अिंग्रजांचा मार्ग सुकर झाला, असे रियासतकराच्या लिहिण्यात ठिकठिकाणीं ध्वनित केले आहे. त्याचप्रमाणें अिंग्रजांचा खरा डाव महादजीने ओळखला होता, तो नानाला मात्र ओळखता आला नाही असेंहि त्यानी सुचविले आहे. अर्थात महादजी शहाणा किंवा नाना शहाणा असा प्रश्न उपस्थित करून महादजीच्या बाजूस हे पारडे झुकते असे दाखविण्याचा प्रयत्न रियासतकारानीं केला आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते ही तुलना चुकीची आहे दोघाच्या कर्तबगारीची क्षेत्रें अितकी भिन्न होती व अेकाच्या साहाय्यावाचून दुसरा अितका लगडा होता की त्या दोघांच्या संयुक्त कामगिरीमुळे सवाअी माधवरावांच्या कारकीर्दीत मराठ्यांचें नांव हिंदुस्थानात गाजत राहिले. बालक अस्तित्वात येण्यास व त्याचे योग्य सगोपन होण्यास ज्याप्रमाणे आअी अुपयोगी की बाप अधिक अुपयोगी असा प्रश्न अुपस्थित करणे असमंजसपणाचे होअील व कोणी अुपस्थित केल्यास त्याचे अुत्तर देतां येणार नाही, त्या माणे नानाची मुत्सद्देगिरी व पाटीलबावांची तरवार या दोहींचाहि अुपयोग मराठ्याच्या राज्याला झाला असें म्हणण्याअैवजीं त्याची तुलना करण्याचा खटाटोप अितिहासकाराला भलत्या दिशेनें विचार करावयास लावतो, असे रियासतकाराच्या लेखावरून म्हणावे लागतें. शिंदेशाहीची तरफदारी करण्याचा मोह त्यांना अनावर झालेला दिसतो. खरे ज्याप्रमाणें पटवर्धनी दप्तराशीं समरस झाल्यामुळें नानाचे पक्षपाती बनले त्याप्रमाणें कोटा येथील दप्तराने रा. सरदेसाअी याना महादजीचा वकील बनविल्याचा भास होअू लागला आहे. पण ही वकिली अितिहासकाराला दूषणास्पद आहे व तिच्यापासून अलिप्त राहाण्याचा प्रयत्न रियासतकारांनीं केला पाहिजे असा स्पष्ट अिशारा देणें भाग आहे. महादजीला युद्ध शास्त्रांतली दृष्टि होती हें खुद्द नानानें देखील ‘ दीक्षीत ’ या शब्दानें गौरव करून मान्य केलें आहे.

त्याचप्रमाणें नानाची श्रेष्ठ मुत्सद्देगिरी देखील महादजीला मान्य होती हेंहि स्पष्ट आहे. अशा स्थितीत रियासतकारांनीं पत्करलेला मार्ग ग्राह्य धरतां येत नाही. सालबाईच्या तहापर्यंत नानाने फार शहाणपणानें कारभार केला; पण पुढे तो इंग्रजांना भाळला; महादजी मात्र शेवटपर्यंत त्यांना ओळखून होता असें रियासतकार म्हणतात पण अशी वस्तुस्थिती नसून फ्रेंच राजकारणाची माहिती नानाला होती ती महादजीला नव्हती हे रियासतकारानी लक्षांत घेतले नाही. डिबाअिनला नोकरीस ठेवल्याबद्दल ते महादजीला प्रमाणाबाहेर शहाणा ठरवीत आहेत; पण फ्रान्समधील राजकीय घडामोडी लक्षांत घेअून आपणांस वागलें पाहिजे ही गोष्ट नानाने ओळखली. ती महादजीला समजली नाही याबद्दल ते अवाक्षर उच्चारीत नाहीत सरदार आबासाहेब मुजुमदार यांनी भा. अि. सं. मंडळाच्या मालेतल्या २८ व्या ग्रथात जो 'फारशी पत्रव्यवहार' छापला आहे तो जर रियासतकारानी वाचला असता व " राखीव रानातला " मजकूर म्हणून त्यावर बहिष्कार घालण्याचा भलता आग्रह त्यानी धरला नसता, तर नानाच्या वर्तनातील कित्येक गोष्टींचा अुलगडा त्यांना सहज झाला असतां. अिंग्रजांच्या अुच्चाटणासाठीं हैदर, निजाम, भोसले व मराठे यांची जूट घडवून आणणारा नाना पांच सात वर्षांनतर अिंग्रजांशी जोराचा विरोध करण्याची भाषा बोलत नाही, याचें कारण अिंग्रजांशी जोराचा डाव खेळण्यास राजकारणी फ्रेंच हाताशी पाहिजेत तसे ते पूर्वी होते व नतर फ्रेंच राज्यक्रांतीमुळे त्याचा हिंदुस्थानाशी संबंध तुटला ही गोष्ट रियासतकार लक्षांत घेत नाहीत. अेका ठिकाणी ही गोष्ट त्यानी ओझरती अुल्लेखिली आहे, पण मुजुमदाराचे पुस्तक न वाचल्यामुळें त्यांना हा धागा शेवटपर्यंत पोचविता आला नाही.

सालबाईच्या तहाच्या सुमाराची माहिती सांगताना रियासतकारांनींच या बाबतीत असें म्हटलें आहे की बुसीचें पत्र नानास ( ३०—३—१७८३ रोजीं ) आलें की ' तुमचें उत्तर वाचून बहुत खुशाल झालों. आम्हांस आमचे खावंदांनीं बहुत फौज व मजबूत सरंजाम देअून या प्रांती पाठविले. अिंग्रजास तंबी करून मारून काढावा; हिंदुस्थानातील सरदारांचे मुलुख त्यानी घेतले असतील ते ज्यांचे त्यास द्यावे असा आमचे खावंदाचा आम्हास हुकूम आहे. मौसम येतांच आम्ही मजबुतीनें तिकडे येतो. तुम्ही आम्ही मिळोन अिंग्रजास खस्त करून टाकू. तुम्हांपासी मुसामुनीन आहे ते पादशाहाचे अितबारी— तसेच वजीराचे व आमचेहि इतबारी आहेत. ते तुम्हांस सर्व सांगतील ' हे पत्र आल्यावर अिंग्रजांचा स्नेह फायद्याचा की फ्रेंचांचा फायद्याचा याविषयी नानाने महादजीचा पत्रद्वारें अभिप्राय विचारला. परंतु ' महादजीस हेस्टिंग्जनें पूर्णपणें मारून आपल्या बाजूस वळविलें होतें; आणि त्यास फ्रेंचांच्या हालचाली माहीत नव्हत्या. यामुळे मराठे

शाहीत अेक प्रकारची फूटच उत्पन्न झाली (भाग १ पृ ४०७). पुढे 'महादजीच्या सालबाअीच्या तहाने असा हा चहूंकडे घोटाळा अुत्पन्न झाला ' असेहि अुद्गार रियासतकारांनी काढले आहेत पण या गोष्टीचा त्यांना विसर पडून दुसरीकडे त्यांनी नानाला डावपेच कळत नव्हते असें म्हटले आहे. वास्तविक प्रकार असा होता की, दिल्लीच्या राजकारणांत यश मिळवून दाखविण्याची अीर्षा शिंदेशाहींत वशपरंपरा होती. ती पुरी होण्यास हेस्तिंग्जनें वाव करून देतांच महादजीनें दिल्लीकडे धाव घेतली; व नानानेहि त्याला अडविलें नाही; कारण तें महादजीने अैकलें नसते. पाणिपतात जी गोष्ट बिघडली ती आपण करून दाखवावी ही अुमेद महादजीच्या मनांत अुत्पन्न झाल्यावेळी त्याला अिंग्रजांचें संकट देखील त्या मानानें अुपेक्षणीय वाटले व तो अुत्तरेस गेला. यामुळे अिंग्रजाविरुद्ध सर्वांनी जी जूट केली होती ती ढासळली दिल्ली या शब्दात अितका अितिहास भरला होता की, हेस्तिंग्जने महादजीला या बाबतीत वाव देण्याचे अभिवचन दिल्यावर त्याने ते अेकदम मान्य करावें व नानानेहि जास्त वाटाघाट न करता ही गोष्ट कबूल करावी हे ओघाने घडून आले. यामुळे महादजीने ओलीस आलेले अिंग्रज कां सोडले याची अुपपत्ती लावण्यास खोल पाण्यांत शिरण्याचे प्रयोजन नाही. असें असता रियासतकार म्हणतात, 'महादजी गॉडर्डला मिळाला, दोघे मिळून नानांना कारभारातून काढणार अशी बातमी गुजराथेतून नानाच्या हस्तकाकडून त्यास पुण्यास गेली, परतु ती खरी की खोटी याची स्पष्टता मुद्दामच कांहीं दिवस नानाने केली नाही ' अर्थात् खरा प्रकार नानाच्या लक्षात आला होता असा ध्वनि रियासतकाराच्या लिहिण्यात आहे. पण महादजीने ओलीस असलेले इंग्रज मुद्दाम सोडून गॉडर्डकडे परत पाठविले आणि नानाचे व आपले वाकडे आहे असा वकिलामार्फत देखावा केला. तेव्हा रियसतकाराच्या मते 'नानाला खरेच वाटले की महादजी अिंग्रजाकडे फितूर झाला. महादजी मात्र मनाचे मनात हसत असेल. नाना हें राजकारण आहे, असेहि बनावट पुकारे मुद्दाम करावे लागतात. त्यामुळें तुम्ही आपल्या अंत:करणाची चलबिचल कां करता ? तुम्ही आम्ही शपथेने भाअू झालो अहो त्यास बाध नाही. असें महादजीने नानास सांगितले.'

'अिंग्रजाचे वकील जवळ ठेवून पोसण्याचा खर्च करण्यांत कांही हाशील नव्हतें. ओलीस आलेले अिसम मारून टाकण्याची ताकद असेल तर त्याचा अुपयोग. तशी ताकद मराठ्याची नव्हती, म्हणून ते सोडले; महादजीचा हा शहाणपणाच म्हटला पाहिजे' (पृ. २५४). हे विवेचन अप्रस्तुत आहे.

महादजी शिपाअी गडी होता व नाना त्याला कामापुरता बेतानें वागवून घेत असे. म्हणजे वयाने महादजी वडील असला तरी व्यवहारात वडीलपणाचें

नाते नानाकडे होते व महादजीलाहि तें माहीत होते, अित्यादि विवेचन रियासत-कारांनीच कांही ठिकाणी केले आहे. नानाच्या पोक्तपणाची कबुली देताना ते म्हणतात

"नानाशी महादजीची स्पर्धा नेहमींच चालू होती, आणि कधी म्हणजे खुल्या दिलानें नानाने सांगितलेली कामगिरी त्याने अुचलली असे झाले नाही. तथापि नानाचें शहाणपण तो पूर्णपणें ओळखून होता आणि त्याच्याशी विरोध करितांना अेकंदर राज्याचे ज्यांत नुकसान होओील असे वर्तन महादजीने कधी केलें नाही. नाना महादजीस चुचकारून वागवीत असे. चुका निदर्शनास आल्याने महादजी जेव्हां चिडे तेव्हां पुन: तिखट गोड शब्दानी नाना त्याची समजूत पाडी." (पृ.४०३)

महादजी दिल्लीस गेल्यानंतर नानाने अिंग्रजाशी सलोखा ठेवला ही त्याची चूक झाली असे रियासतकार सुचवितात. पण ही चूक दाखविण्यासाठी त्यांनी जो पुरावा माडला आहे तो पटण्याजोगा नाही दक्षिणेतील परिस्थिती नानाला जशी बारीक माहिती होती तशी महादजीला नव्हती असे असून रियासतकार म्हणतात:—

'टिपूवर युद्ध पुकारण्यास अेकटया नानाशिवाय बहुतेक सर्व मराठे मंडळ विरुद्ध होते. शिंदे, होळकर, हरिपंत, परशरामभाअू वगैरे सर्व या मोहिमेच्या विरुद्ध होते, अेकटा नाना मात्र अिंग्रजास भाळून गेला होता, अर्थात अिंग्रजांचे हृद्गत त्याला अुमगलें नाही. परशरामभाअूचे व त्याचे या पूर्वीपासूनच फाटत चाललें होतें. महादजीच्या स्पर्धेने नाना किती गांगरला ते यावेळी व पुढे हरअेक बाबतीत स्पष्ट होअू लागतें.' (पृ. २९७) यानंतर पुढच्याच वाक्यांत रियासत-कार म्हणतात " खुद्द महादजीला पुणेंकराच्या बेताची माहिती होतीशी दिसत नाही " पण महादजी या युद्धांत अिंग्रजांस मदत करण्यास सर्वथा नाखूष होता असेंहि तेच म्हणतात (पृ. २९४). त्याचप्रमाणें हरिपंत, परशरामभाअू वगैरे या मोहिमेविरूद्ध होते हें रियासतकाराचे म्हणणे खरे नाही. बदामीच्या स्वारीत टिपूचे शासन न झाल्यामुळे त्याचा पक्ष मराठयांना घेता येत नव्हता. यामुळे तो नरम होओीपर्यंत वाट पाहून नंतर हरिपंताने निजामास गुप्तपणे भेटून त्याच्याशी करार केला होता की, अिंग्रज जर टिपूस साफ बुडवू पाहतील तर आपण दोघांनी त्यास विरोध करून टिपूचा बचाव करावा. असाच प्रकार शेवटी घडून आला.' हे सांगून देखील 'कार्नवालीसनेंच नानावर मात केली' असा रियासत-कार निर्णय देतात (पृ. २९५). सारांश युरोपांतील बातमीवर लक्ष ठेवून अिंग्रज हिंदुस्थानांत पाऊल पुढे टाकीत होते व फ्रेंचाच्या आश्रयावर जोर धरणारा टिपू कमजोर पडत चालला हे नानाने ओळखलें. यामुळे अिंग्रज टिपूला गिळणार हे दिसत असल्यामळे त्याला अर्धा तरी कसा वाचवावा याचा विचार नानाने ठर-

विला व शेवटी तो यशस्वी करून दाखविला टिपूवर हात टाकूं देत नाहीं असें म्हणण्याचा जोर यावेळीं मराठ्यात नव्हता.

नानाला फ्रेंच राज्यक्रांतीची बातमी होती. त्याचा मासला येथें देऊं. " अलीकडे तीन चार वर्षे झाली असतील तेव्हांपासून फ्रान्स देशांतील हलक्या प्रतीच्या रहिवाशांनी आपला जुलमी हात बादशहाच्या मदतगार मंडळाच्या पदरा पावेतों घातला व त्यांचा अपमान केला. अखेर त्यांनी आपल्या जुलमाचे निशाण येथपावेतो अुभारले की त्या दुर्दैवी जमावानें निर्भयपणें तरवारीच्या घावाने सदर बादशहास ठार केले. त्यांनी कायदेकानूचें बंधन तोडलें आहे; व बुद्धिमान, चतुर मंत्री आणि अधिकारी यांसहि त्यांनीं नाहीसे केलें. आपल्या स्वतःच्या देशात भयंकर अविचारी वर्तन त्यांनी ज्याअर्थी अमलात आणलें आहे त्याअर्थी दुसऱ्या जातीच्या बाबतीत ते तसेच करतील यांत नवल तें काय ? ... या कृत्याचे निराकरणार्थ व्यवस्था लावणें जरूर जाणून विलायतेंत व हिंदुस्थानात तजवीज केलेली आहे. विलायतच्या वर्तमान पत्रांवरून ही खबर समजून घेऊन बंगाल्यांतील फ्रेंचांच्या ताब्यांत असलेलीं बंदरे वखारी आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत. " (पृ. ६५–६६ 'फारशी पत्रव्यवहार'). ही बातमी पुरवून फ्रेंचांची ठाणी कॉर्नवालीस हस्तगत करूं लागला तेव्हा नानाला त्याच्या आड जातां येण्याजोगे नव्हते नाना व महादजी दक्षिणेंत एकत्र होअून दिलसफाअी झाल्यानंतर कॉर्नवॉलिसला अितकी धिटाअी करता आली नसती; पण त्यापूर्वी ती करण्यास त्याला हरकत नव्हती सारांश, यावेळी टिपूच्या मोहिमेंत नानानें अिंग्रजांना हात दिला असा अर्थ नसून, अपरिहार्य होती ती गोष्ट त्याने केली अितकेंच. याचा विशेष खुलासा पुढील अंकी करू.

* * * *

## लेखांक ६ वा

फ्रेंच राज्यक्रान्तीची बातमी नानाला जशी बारकाअीची होती तशी महादजीला नव्हती; यामुळे सालबाअीच्या तहाच्या वेळीं अिंग्रजावर चढाअीचें धोरण स्वीकारावे असें आग्रहाने सागणारा नाना पुढे अिंग्रजांशीं खटका टाळण्याचें धोरण स्वीकारू लागला व ते महादजीस प्रारंभी पटलें नाही. यामुळें दोघांतील मतभेद विकोपास गेला अित्यादि विषयाचें दिग्दर्शन मागील लेखांकांत केलें. आतां नाना व गोविंदराव काळे याना निजामाचा कावा ओळखतां आला नाहीं यामुळें खर्ड्याच्या लढाअीतला जय व्यर्थ गेला असें जे रियासतकारानीं प्रतिपादन केलें आहे त्याचा विचार करूं. निजामुल्मुलकाच्या वेळी पेशव्यांच्यापेक्षां निजाम सर्वतोपरी बलिष्ठ होता त्याचा मुलुख सुपीक, त्याला दिल्लीपर्यंतचीं राजकारणें

बारकाअीने माहीत, आणि त्याचा अनुभवहि ५०।६० वर्षांचा, यामुळे मराठ्यानी त्याच्यापुढे टिकाव धरला हीच त्याच्या पराक्रमाची सीमा. पुढे अुदगीरच्या युद्धापर्यंत भाअूसाहेबांनी व रघुनाथरावानी त्याला बराच हलका केला होता; परंतु त्यावेळेपासून त्याने आपला कमजोरपणा ओळखून परेचाच्या आश्रयाने टिकाव धरण्याचें धोरण पत्करले होते. पुढे परेच मागे पडल्यावर तो अिंग्रजाना जवळ करूं लागला. यामुळे मराठ्याना निजामाचा प्रश्न फार नाजूकपणाने सोडवावा लागे. त्याच्याशी विरोध वाढवावा तर तो अिंग्रजाचा निकट मित्र बनतो; आणि विरोध न करावा तर तो मराठ्याना मोजीत नाही असें दुहेरी संकट पुण्याच्या मुत्सद्यांवर आले होतें. याकरिता त्यानी खर्ड्याच्या युद्धात निजामाचा चागला पराभव तर करून दाखविलाच; पण त्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की या आणि बाणीच्या प्रसगी त्याला अिंग्रजांनी मदत केली नाहीं, अेवढेच नव्हे तर निजामाच्या खर्चाने ठेवलेली अिंग्रज फलटणे देखील युद्धाच्या अुपयोगी पडली नाहीत. यामुळे मराठ्यांशी भांडण अुपस्थित झाल्यावेळी अिंग्रज आपणास मदत देत नाहीत हे निजामाच्या लक्षांत आणून दिल्यानतर भांडण विकोपास नेण्यांत मतलब नव्हता निजामाच्या मुलुखारेक्षा व खंडणीपेक्षां निजामाच्या मनात बदल घडवून आणणे अधिक महत्त्वाचे होते. तो बदल या युद्धाने घडून आला व त्याने अिंग्रजाची फलटणे घालवून देण्याचे कबूल केलें. साराश, पेशवाअी व निजामशाही यांनी अेकदिलाने वागावें व दोघानीं मिळून अिंग्रजाशी प्रसग पडल्यास सामना देण्यास जुटीनें तयार व्हावें तर ही दोनहि राज्यें टिकतील असा गोविदरावाच्या धोरणाचा ध्वनि आहे. तो रियासतकारानी लक्षांत घेतला नाही, यामुळे गोविदरावाला निजामाने फसविलें असें ते प्रतिपादन करतात.

याखेरीज मराठ्यांचे राज्य हे राष्ट्र होते किंवा साम्राज्य होते याची कल्पना स्पष्ट न करतां त्यानी बरेच विवेचन केले आहे वस्तुतः सवाअी माधवरावाचे वेळी मराठ्यांचे साम्राज्य म्हणजे अनेक राज्याचा सघ होता. शिदे, होळकर, गायकवाड व पटवर्धन वगैरे सरदार नावाने पुण्याची गादी मानीत असले, तरी व्यवहारतः स्वतंत्र होते. त्यांची स्वतंत्र अशी राज्येंच होती; व त्यात ते मालक बनले होते. अशा वेळीं रजपूत, अिंग्रज, निजाम, टिपू या बाह्य सत्ताधाऱ्यांशी मराठ्याचें संबंध कसे असावे या प्रश्नाला मराठ्यांनी जितके महत्त्व दिलें त्यापेक्षां आपसांतले संबंध व नातें कोणत्या प्रकारचें असावें या विषयींचा विचार त्यांनी अधिक करावयास पाहिजे होता पण तसें प्रारंभी घडलें नाही, फार अुशीरा घडले असें म्हणण्यास हरकत नाही. महाराष्ट्रातील लोकांच्या स्वभावांतील हा विशेष परेंचांच्या स्वभावातील विशेषासारखा आहे, तो हा की, त्यांनीं बाहेरच्या लोकांवर चढाअी केली किंवा त्यांच्याकडून वाहवा मिळविली

म्हणजे त्यात त्यांना विशेष आनंद वाटतो. फरेंच व अिंग्रज यांची तुलना करताना अेका मार्मिक ग्रंथकाराने म्हटले आहे की अिंग्रजांनी अंतर्गत संबंधास अधिक महत्त्व दिले व राजा व पार्लमेंट किंवा पार्लमेंट आणि मतदार यामधील नाते ठरवून घेण्यासाठी वाटेल तो स्वार्थत्याग केला, जरूर ती मारामारी केली आणि लागेल तितका वेळ घालविला; पण राजाचे हक्क या सीमेपर्यंत, प्रधानमंडळ अशा प्रकारें बनवावें आणि मतदार अमुक प्रकारचे असावे अित्यादि प्रश्नाचा निकाल त्यांनी लावून घेतला; असे अंतर्गत संबंधाचे प्रश्न सोडविताना अमेरिकेच्या वसाहती त्यांच्या राज्यांतून गेल्या तरी त्यांनी त्याचे वैषम्य मानले नाही. हे आपसांतले संबंध कसे असावे हे वेळोवेळी ठरवून नंतर साम्राज्य वाढविण्याच्या अुद्योगास ते हात घालीत. यामुळे बाह्य संकटाचे वेळी अिंग्लंडचे राज्य खिळ-खिळें अगर फुटीने कमजोर झालेलें आहे अशी ओरड करण्याचा प्रसंग केव्हाही आला नाही अुलट फरेंचांची तऱ्हा पाहिल्यास असे दिसते की, त्यांनी आपल्या राज्ययंत्राच्या घटनेचा बारकाअीने विचारच केला नव्हता. लुअीच्यावेळी ते अेकतंत्री राज्यव्यवस्थेखाली नांदण्यास मनापासून तयार होते; पुढे अमेरिकेंत लोकसत्ताक राज्याची स्थापना होतांच आपल्याहि देशात तसेच असावे या अनु-करणाच्या भावनेने त्यांनी राजास मारून लोकसत्ताक म्हणून राजयंत्र अुभारले. पण त्या यंत्रावर नेपोलियन आरूढ होअून प्रत्यक्ष बादशाहा बनला तरी आपण काय करण्यास निघालो होतो व करीत आहो काय याचा आढावा घेण्याची बुद्धि त्यांना सुचली नाही; आणि नेपोलियनला काढून पुन. जुन्या वंशांतला बादशाह त्यांच्यावर लादण्यात आला तोहि त्यांनी काही दिवस मान्य केला. सारांश, राज्य-यंत्राचें चालकत्व ज्याच्या हाती द्यावयाचे ती व्यक्ति अमुक अमुक गुणांनी युक्त असावी व त्या अधिपतीने अमूक निर्बंध मानावे अित्यादि गोष्टींत फरेंचांनी लक्ष घातले नव्हतें. यामुळे नेपोलियन विजयावर विजय मिळवू लागला तेव्हां त्याचा जयजयकार करण्यांत ते गढून गेले, आणि त्याचा पराभव होताच सर्व राज्ययंत्र ढासळून पडले. हाच प्रकार जर्मनांचाहि झाला. लोकशाही आणि संपत्ती अशा दोन गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठी ६०।७० वर्षामागें जर्मनीने प्रारंभ केला होता.पैकी बिस्मार्कने त्यांना संपत्ती किंवा वैभव प्राप्त करून दिले, पण लोकशाही प्राप्त करून घेण्याची जर्मन लोकांची अिच्छा कमजोर करीत त्याने अेकतंत्री राजसत्तेस लोकमताचा पाठिंबा मिळविला. यामुळे गेल्या महायुद्धाच्या वेळी जुनी खरूज बाहेर पडली व आम्हाला अेकसत्ताक राजा नको, लोकशाही पाहिजे या मुद्यावर राज्ययंत्र उलथून पडू शकलें. पण बाह्य जय अगर अपजय यांनीं अिंग्रजांचे राज्ययंत्र मात्र गेल्या कित्येक शतकांत आमूलाग्र डळमळून गेले असे घडले नाही; याचे कारण अंतर्गत राजकीय संबंधाची निश्चिति ही इतर बाह्य संबंधांपेक्षा अधिक महत्त्वाची व तिची उपेक्षा करता

उपयोगी नाही, हे अिंग्रजांनी उत्तम प्रकारें ओळखलें आहे. वरील भेद लक्षात घेतला असतां सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतील एका महत्त्वाच्या मुद्याचा खुलासा होतो. शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, हे पुणें येथील पेशव्यांना तात्विक दृष्टया तरी आपले मालक मानीत होते, तेव्हा त्याचा अधिकार कोठवर चालावा आणि सरदारांना स्वतःच्या तंत्रानें चालण्याचा हक्क कोणत्या बाबतीत असावा याचा निर्णय जर वेळोवेळी झाला असता तर अनेक भानगडी सहज मिटल्या असत्या. पण दिल्ली हस्तगत करणे अगर राजपूतावर विजय मिळविणें म्हणजे एक अद्‌भूत गोष्ट अशी भावना रूढ असल्यामुळे ते करणाऱ्याच्या पराक्रमाचे कौतुक प्रमाणाबाहेर झाले पण हा साम्राज्यविस्तार म्हणजे वाळवेवरचें सारवण होते. त्यांच्याविषयी रजपुताच्या अंतःकरणातहि आपलेपणाची भावना नव्हती आणि मुसलमानाच्या तर नव्हतीच नव्हती केवळ फलटणीच्या जोरावर ही दिल्लीची चढाई उभारली होती आणि फलटणीतील भरती मराठयांची नसून परप्रांतस्थ रांगडे वगैरे भाडोत्री लोकांची होती आणि फलटणीचें सेनापतित्व तर डिभाईसारख्या परदेशी माणसाच्या हाती होतें सारांश, ही चढाई केवळ जबरदस्तीच्या स्वरूपाची असल्यामुळे महादजीला दिल्ली येथील आठ वर्षांच्या अवधीत केव्हाही स्वस्थता अशी मिळालीच नाही. रोज बडे, युद्धे आणि बखेडे याच्याशी झगडावे लागले; यामुळे तो तेथील परिस्थितीला कंटाळून गेला. अल्लीबहादरावर सर्व जबाबदारी टाकून मी दक्षिणेत येतो असे जे पाटीलबावानी उद्‌गार काढले आहेत, त्याला अितर कारणे आहेत पण दिल्लीकडे आपला जम बसत नाही व पुणें येथील मुत्सद्यांशी असलेले आपले संबंध निश्चित करून घेण्याची आवश्यकता आहे या महत्त्वाच्या गोष्टी पाटीलबावाच्या लक्षांत आल्या यात शंका नाही. पुण्यास आल्यावर देखील दीड दोन वर्षे वादविवाद झाल्यानंतर नाना व महादजी यामधील भांडण मिटलें होते आणि होळकर व शिंदे यांमधील तटयाची प्रकरणे नानांनी निकालांत काढावी व त्याचा निकाल आपण मान्य करावा अशी पाटीलबावानी मान्यता दिली होती, अित्यादि गोष्टी रियासतकारांनी लक्षात घेतल्या असत्या तर बरें झाले असतें. मराठयांच्या राज्याची घटना कशी असावी, त्यांचे राज्य वाढले कोणत्या पद्धतीनें व अिंग्रजांशी तोंड देण्यास कोणत्या पद्धतीने गेले पाहिजे अित्यादि तात्विक प्रश्नाचा विचार महादजी, नाना व अहिल्याबाई यांच्यामध्ये सुरू झाला होता हें 'होळकर दरबारांतील हिंगण्याची वकीली,' या अितिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या पत्र सग्रहांत कोणासहि दिसून येणार आहे व नाना महादजी यांनी आपसांतील मतभेदाचा निकाल लावून देवराव महादेव हिंगणे यांस अहिल्याबाईकडे पुढील धोरण ठरविण्यासाठीं पाठविलें होतें तेव्हा त्या अनुभविक व मार्मिक स्त्रीनें एकंदर मरा-

ठ्याच्या राज्याच्या गुणदोषांची मीमांसा फार उत्तम प्रकारची केली आहे. उत्तरेकडील मुसलमान व रजपूत सरदार आपसात झगडू लागल्यामुळें मराठ्यांना त्यांपैकी काहींनी निमंत्रण केलें; यामुळे सैन्य उभारून उत्तरेकडील भांडत्या सरदारांकडून सैन्याचा खर्च घेता आल्यामुळे मराठ्याचें राज्य दिवसेंदिवस प्रबळ होत चाललें. आणि 'असे होत होत आम्हास (मराठ्यांस) मोठेपणें मिळाली पादशाई घरात येऊन श्रीमताचे राज्याची व आमचे सरदाराची वृद्धीच आज पर्यंत झाली आणि मराठे ज्याचा पक्ष करतील तोच पक्ष सबळ असेहि कांही दिवस होऊन दक्षिणी फौजास आब चढला; हेहि दिवस पाहिले.' पण ते दिवस जाऊन 'अिंग्रजी सामान बरोबर बाळगील त्यालाच विजय प्राप्त होतो असा अनुभव येऊं लागल्यामुळे अिंग्रजी फौजा 'पुस्तपन्हचास' ठिकठिकाणचे सरदार घेऊ लागले आहेत' अित्यादि वर्णन करून शिंदे होळकर यांच्यामधील संबंध कसे असावे याचा निकाल लावणे व नंतर अिंग्रजाशी तोंड देण्यासाठी सर्वांनी मिळून काय करावें हे पाहाणें महत्त्वाचे आहे अित्यादि मुद्यांची चर्चा अहिल्या बाईने देवराव हिंगण्यांशी केल्याची माहिती उपलब्ध आहे. तात्पर्य नाना, महादजी व अहिल्याबाई याच्या मधील विरोधाचे वर्णन खुलाशानें देऊन त्या संबंधीचे तुलनात्मक प्रश्न रियासतकारानी विचारांत घेतले आहेत तसे त्यांच्यांतील भाडणें मिटून महादजीच्या मृत्यूपूर्वी नानाशी त्याची दिलसफाई झाली होती व एकदर मराठ्याच्या सत्तेचा व्यापक दृष्टीने विचार करण्यास त्यांनीं प्रारंभ केला होता ही गोष्ट रियासतकारानी लक्षांत घेतली नाही. किंबहुना मराठ्यांतील दोषाची चर्चा या ग्रंथात आहे त्या मानानें गुणाचा उल्लेख फार थोडा आहे असे म्हणण्यास हरकत नाही. आता रियासतकारांचा संकल्प पुरा होण्यास शेवटच्या बाजीरावाची कारकीर्दच काय ती लिहावयाची राहिली आहे. तेव्हां त्यांत मराठ्यांचे दोष, पुणेकराचा भांडखोरपणा व ब्राह्मणातील फूट त्यांना सहजच वर्णन करावी लागणार आहे. त्याकरिता एवढी सूचना देऊन ठेवणें आवश्यक दिसते की, अितिहासकाराने गुणदोषाचे प्रमाण ठरविताना समतोलपणा राखला पाहिजे. मराठ्याचे राज्य रावबाजीच्या कारकीर्दीत नष्ट झाले त्याअर्थी मराठ्याच्या अंगात काही दोष असले पाहिजेत व तुलनात्मक दृष्टीने अिंग्रज काही बाबतीत श्रेष्ठ होते हे खरे. पण मराठ्यांनी दोनशे वर्षे राज्य टिकविलें व साऱ्या हिंदुस्थानभर त्याचे नाव गाजले त्याअर्थी त्याच्या अंगी कांहीं चांगले गुण असले पाहिजेत हेंहि निर्विवाद आहे. ते गुण कोणते व ते गुण असूनहि ते मातीमोल ठरून अिंग्रजांची सरशी कशी झाली याचे विवेचन रियासतकार पुढील भागांत करतील अशी आम्हांस आशा आहे. शेवटी रियसातकारांनीं आपला ग्रंथ लेखनाचा संकल्प दोन अडीच तपें अव्याहत चालविल्यामुळें मराठी वाचकांना

रियासतीसारखे माहितीने भरलेले ग्रंथ मिळत आहेत याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून व महाराष्ट्रांतील संशोधक व संशोधन मंडळ याविषयी केलेली सूचना ते लक्षांत घेतील अशी खात्री बाळगून हा परीक्षणात्मक लेख पुरा करतो.*

---

## भाग ४ था

# समाजशास्त्र व राजकारण

[ कै. आपटे यांचा निकट परिचय असणारांस हें ठाऊक आहे कीं, ते राजकीय जीवनांतून इतिहासाच्या आभ्यासाकडे वळले. मराठ्यांचें स्वातंत्र्य कां गेलें याची मीमांसा करणाऱ्या आपट्यांचें अंतर्मन गेलेलें स्वातंत्र्य भारतास पुनः कैसें लाभेल या चिंतनांत गुंतलेलें असे; व या दृष्टीनें ते चालू राजकीय घटनांसंबंधीं अनेक वेळां खाजगी वाटाघाट करीत. कै. आपटे यांच्या स्वभावाची ही बाजू या भागांत वाचकांस पहावयास सांपडेल. समाजशास्त्र विषयक अभ्यासांतून भावी पुनर्घटनेची दिशा दाखविणारीं अनुमानें त्यांच्या 'परांजपे घराण्या' वरील लेखांत सांपडतील. या भागांत पुनर्मुद्रित केलेल्या लेखांखेरीज कै. आपटे यांनीं 'केसरी प्रबोध' ग्रंथांत लिहिलेला 'राजकीय विचारांची उत्क्रांति' (पृ. ११२-१२६) हा लेख व केळकर ग्रंथांत 'केळकर व इतिहास' हा लेख, हे वाचनीय आहेत. पहिल्या लेखांत 'केसरीं' त गेल्या ५० वर्षांत आलेल्या राजकीय लेखांचें मंथन करून दोन पिढ्यांच्या अंतरानें राजकीय विचारांत पडलेलें स्थित्यंतर दाखविलें आहे व दुसऱ्या लेखांत चालू राजकारणांत आघाडीवर असणारास इतिहासाचा कसा उपयोग होतो तें दाखविलें आहे. सं. ]

---

* ज्ञानप्रकाशांत 'एका सन्माननीय मित्राकडून' या नांवाखालीं प्रसिद्ध झालेली लेखमाला.

# २१

## परांजपे घराण्याच्या अभ्यासावरून सुचणारे महाराष्ट्रीय समाजासंबंधीं स्फुट विचार *

परांजपे घराण्यासंबधी (१) ऐतिहासिक पत्रे, (२) वशावळी व (३) अवांतर माहिती याचे संकलन येथवर केले. आता या सकलनावरून काय निष्कर्ष निघतो याचे विवेचन या प्रकरणात करावयाचे आहे सकलनासाठी घेतलेली माहिती यद्यपि विशिष्ट आडनांवाच्या लोकासबधी असली तरी ती एकदर सामाजिक विचारसरणीची काही अंशी निदर्शक असल्यामुळे अशा विशिष्ट प्रकारच्या माहितीच्या अभ्यासावरुन व्यापक सिद्धाताचे प्रस्थापन किंवा दृढीकरण होऊं शकते; तेव्हा याच दृष्टीने आपणांस या माहितीकडे पहावयाचे आहे

वंशावळीतील पिढ्याची सख्या आणि कागदपत्रांतील स्पष्ट उल्लेख लक्षांत घेतले असता पराजपे आडनावाचे ब्राह्मण तीन चारशे वर्षांपूर्वीपासून आजतागायत रत्नागिरी जिल्ह्यातील अडिवरे, गोवळ, पावस, नेवरे वगैरे गावातून रहात आले आहेत हे निश्चित आहे. त्याचप्रमाणे येथील माहितीच्या आधारें पराजपे हे आडनाव ‘पारायणजपे’ या शब्दावरून व्युत्पादिता येईल पण चित्पावन ब्राह्मणांची वस्ती चिपळूणच्या आसपास प्रथम अडीच हजार वर्षांपूर्वी झाली किंवा काय, याविषयी काहीहि निश्चितपणे सांगण्यास उपयोगी पडणारा पुरावा प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट झाला नसल्यामुळे त्याची चर्चा येथे करण्याचे कारण नाही. ‘वशावळी’ या प्रकरणांत कांही नांवे जाड्या ठशांत छापली असून त्याच्यापुढे शकांचे आकडे व गांवांची नांवे दिली असून नांवे व शक ही त्र्यबकेश्वरच्या उपाध्यायांच्या वह्यांवरून उतरून घेतली आहेत त्यांची माडणी कालानुक्रमाने केली असता असे दिसून येईल कीं, परांजपे याची वस्ती कित्येक शतके फक्त कोकणांत होती; तिची वाढ नानासाहेब पेशव्याच्या अमदानीत पुणे प्रांताकडे होऊं लागली, नतर तेथून वाई, सातारा मार्गाने पटवर्धनाच्या जहागिरीतून ती कर्नाटकात पोंचली. पेशवाई सपून इग्रजी अमदानी सुरू झाल्यावर देखील शहापूर, तासगाव, रामदुर्ग, मागली, मेल-

---

* ‘पराजपे घराण्याचा इतिहास’ या श्री. वि. वि. पराजपेकृत पुस्तकात कै. आपटे यांनी लिहिलेले प्रकरण चौथे, ‘विवेचन’.

कोर्टे वगैरे संस्थानी मुलुखाच्या आश्रयानें परांजपे घराण्याचे लोक मुख्यत्वेंकरून दक्षिणेकडे वावरत होते; त्या मानाने त्यांचा प्रसार इतर दिशांस झाला नाही. पूर्वेस धुळ्यापर्यंत आणि शेवटचे बाजीरावसाहेब यांच्याबरोबर उत्तरेस चित्रकूट-पर्यंत, तसेच पुढे ग्वाल्हेर-उज्जनीपर्यंत एखादें घराणें गेल्याचें आढळते; पण मुंबई इलाख्यांतील बहुतेक जिल्हे आक्रमून वऱ्हाड नागपूरपर्यंत अगर मुलतान-पेशावर-पर्यंत यानी जो पल्ला गाठला, तो इ स. १८७०।८० नतरचा आहे. युनिव्हर्सिटचाची स्थापना व प्रवासाच्या साधनाची वाढ, यांमुळे ही गोष्ट घडून आली. सध्या तर पूर्व आफ्रिकेंत देखील एकदर ब्राह्मण कुटुबांत कोकणस्थांची ६१ कुटुबे (म्हणजे २३५ व्यक्ति) असून त्यांत ४।५ पराजप्यांचीहि आहेत. त्याप्रमाणें इराण, फरान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका व जपान या देशात कित्येक वर्षे राहून किंवा प्रवास करून आलेल्या परांजपे घराण्यांतील पुरुषांची व स्त्रियांची माहिती या पुस्तकांत ग्रथित झालेली वाचकांस आढळेल.

पेशवाईच्या मध्यापर्यंत कोंकणांत व नतर ५० वर्षे पुण्यापासून बेळगाव-पर्यंतच्या टापूत, इग्रजी आमदानीत पहिल्या ५०।६० वर्षात मुबई इलाख्याबाहेर किंबहुना युरोप, अमेरिका, आफ्रिका वगैरे निरनिराळ्या खंडांत पराजपे पोचले असे जे विधान येथें केलें, ते विशिष्ट घराण्याच्या नांवानें केलें असले तरी ही स्थलांतर-प्रवृत्ति, कोंकणस्थाच्या किंबहुना महाराष्ट्रांतील इतरही ब्राह्मण समाजाच्या दृष्टीत येत चाललेल्या व्यापकपणाची सूचक आहे. ही घराणी कोकणस्थ समाजांतील असून हा समाज धर्माने, प्रचंड अशा, हिंदु समाजाशीं निगडित झालेला आहे. यामुळें 'स्थालीपुलाकन्यायानें' एकदर ब्राह्मण अगर हिंदु समाजातील बदलणारी विचारसरणी व आकांक्षा या ओळखण्यास या घराण्यांतील लोकांच्या हालचाली उपयोगी पडतील.

तथापि विचारसरणी व आकांक्षा याची ओळख, वस्तीच्या भौगोलिक वर्णनापेक्षां, धद्यांच्या विविधतेवरून व स्वरूपावरून आधिक चांगल्या रीतीने करतां येते. धंदा व जात याची सांगड असावी, म्हणजे विशिष्ट धंदा विशिष्ट जातीनेच करावा, असें आमच्या धर्मशास्त्राचें सांगणें आहे. पण गेल्या हजार दीड हजार वर्षांचा इतिहास पाहिला असतां ही सागड कमी अधिक मानानें विस्कळित झाल्याचेंच दिसून येते. उदाहरणार्थ, मुसलमानी अमदानीपूर्वी देखील ब्राह्मणानी राजपद व अमात्यपद स्वीकारल्याचे कांही दाखले उपलब्ध आहेत. पुढें मुसलमानी अमदानींत बादशाही व वजीरी मुसलमानांकडे असली, तरी सरदारी मराठ्याकडे व कारकुनी ब्राह्मणांकडे असल्याचे आणि त्याच्यामुळें मराठी भाषेचा प्रचार झाल्याचे दिसून येतें. त्याचप्रमाणें शहाजीच्या सरदारीच्या आश्रयावर कित्येक देशस्थ ब्राह्मणांनी तंजावरापर्यंत वसाहत केली व अनेक राजकारणांत भाग घेतला, हे इतिहासप्रसिद्ध

आहे. शिवाजी महाराजांच्या वेळी तर मराठे सरदाराच्या बरोबरीने देशस्थ सरदारानी राजकीय कामें केली आणि चंपूकार वेंकटाध्वरी याने म्हटल्याप्रमाणे ब्राह्मणी आचार पाळण्यापेक्षां व वेदाध्ययनापेक्षां लेखणीचें व तरवारीचें शिक्षण घेण्याकडेच त्यांची अधिक प्रवृत्ति दिसून येत होती. तसेच शिवाजी महाराजांचा अमल चालू झाल्यानंतर देशस्थ ब्राह्मण अधिकारी या नात्याने तर कोकणांत गेलेच पण याखेरीज इतरहि काही देशस्थ घराणी कोकणांत जमिनी घेऊन व वसाहत करून राहिल्याचे आढळते. चिपळूणचे कुलकर्ण व कुलाबा जिल्ह्यांतील जोसकीच्या वृत्य, देशस्थ ब्राह्मणाच्या ताब्यांत शिवशाहीपूर्वीच गेल्या होत्या. यावरून कोकणस्थांनी पेशवाईत देशावर वसाहत केली व राजाश्रयाच्या जोरावर त्याना इतर प्रांतांत आश्रय मिळू शकला, ही गोष्ट ब्राह्मण समाजात रूढ झालेल्या प्रवृत्तीस अनुसरूनच होती असें म्हणण्यास हरकत नाही. किंबहुना शहाजीच्या आश्रयाने तंजावराकडे किंवा होळकरांचे दिवाण जे चंद्रचूड त्यांच्या आश्रयाने होळकरांच्या राज्यांत देशस्थ व गोविंदपंतांच्या आश्रयानें बुंदेलखंडात कऱ्हाडे ब्राह्मण, वसाहतीसाठी जितके दूरवर गेले, तितके दूरवर कोकणस्थ पेशवाईत गेले नाहीत. पण याचे कारण देखील पेशव्याची राजधानी पुण्यास जवळ होती आणि शहाजी, होळकराचे दिवाण चंद्रचूड व गोविंदपंत यांच्या ताब्यातील मुलूख महाराष्ट्राबाहेर होता हे आहे. देशांतर करण्याने आपली स्थिति सुधारण्याजोगी आहे असे दिसल्यावर त्या संधीचा फायदा घेण्याची अक्कल व तयारी देशस्थात अगर कऱ्हाड्यात अधिक आहे आणि कोकणस्थात ती कमी आहे असे म्हणण्यास इतिहासाचा आधार नाही. निरनिराळ्या काळी ही प्रवृत्ति निरनिराळ्या ज्ञातीत कमीजास्त प्रमाणात दिसून येते हें खरे; पण याचे कारण सभोवारची राजकीय परिस्थिति कधी एका ज्ञातीस अनुकूल तर दुसऱ्या ज्ञातीस प्रतिकूल अशी होती एवढेच आहे. तसेच निरनिराळ्या प्रांतांत राहणाऱ्या एकाच ज्ञातीतल्या गटात स्थानांतर प्रवृत्तीच्या बाबतीत विषमता आढळते, याचा उलगडा देखील स्थानिक परिस्थितीनेच करतां येतो.

देशस्थ, कोकणस्थ व कऱ्हाडे ब्राह्मण पूर्वी विशिष्ट प्रांतांतच रहात होते,पण ते आता पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही देशात गेले आहेत व जाण्यास तयार आहेत, हा केवळ बदलत्या राजकीय परिस्थितीचा परिणाम असेल व त्याचे श्रेय धार्मिक आचारास यत्किंचितहि देतां येणार नाहीं, अशी शंका या ठिकाणी येण्याचा संभव आहे. तिच्या निरसनार्थ, येथे हे नमूद केलें पाहिजे की, वसाहतीची पद्धति व प्रवासाचे महत्त्व या गोष्टी आमच्या धर्मशास्त्रकारानी बीजरूपाने सांगून ठेवल्या आहेत. यात्रेच्या रूपाने पेशवाईच्या पूर्वी कांहीं परांजपे घराणीं नाशिक त्रिंबकेश्वरास गेली आणि कांही घराणी त्याहिपूर्वी प्रत्यक्ष काशीक्षेत्रात कायमची राहिलीं. यावरून धार्मिक भावनेंत प्रवासजन्य व्यापक दृष्टि प्राप्त करून देणारे बीज अस्तित्वांत होते असें कबूल केले

पाहिजे. देशस्थ, कोकणस्थ व कऱ्हाडे हे भेद स्थानिक असून ब्राह्मण्याच्या दृष्टीनें हे सर्व एकसारखे आहेत याची जाणीव दर बारा वर्षींनीं, सिंहस्थाच्या वेळी नाशिक व त्रिंबकेश्वर येथे जमणाऱ्या लोकांत, एकसारखी वाढत असली पाहिजे. तसेंच देशावरील राजकीय परिस्थिति कोकणांतल्या ब्राह्मणांना व कोकणांतील परिस्थिति देशस्थ ब्राह्मणांना कळण्याचेंहि हे एक साधनच होतें.

वसाहतीच्या बाबतीत तर धर्मशास्त्रानें फारच बारीक विचार केला आहे. राजाने ब्राह्मणांना अग्रहाररूपानें भूमिदान करावे व या दानाचा उपभोग पिढ्यानु-पिढ्या त्याच्या भावी संततीने घ्यावा ही प्रथा कौरवपांडवाच्या काळापासून शेकडों वर्षे चालत आली होती. आणि त्याच्या मुलाबाळाची लग्ने होण्यास अडचण पडू नये यासाठी निरनिराळ्या गोत्राचेच ब्राह्मण निवडण्याची खबरदारी हे भूमिदान करणारे घेत असत असें म्हणण्यास आधार आहे. तेव्हां अशा रीतीने राजापासून रकापर्यंत सर्वांनीच आपला एकदर आयुष्यक्रम कशा रीतीने ठेवावा याचे नियम ठरविण्याचा प्रयत्न प्राचीन शास्त्रकारांनी केला आणि त्याच्या वचनाचें प्रामाण्य राजाज्ञेपेक्षाहि अधिक मानले गेले. पण कितीही बारीक विचार करून शास्त्रकारांनी आचाराचे नियम बाधून दिले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात अकल्पित परिस्थिति निर्माण होते आणि त्यातून मार्ग काढताना लोकाना शास्त्रापेक्षां प्रसंगावर अधिक भिस्त ठेवावी लागते. यामुळे धर्मशास्त्राचें प्रामाण्य ज्यात मानावयाचे त्या बाबीचा पसारा आकुंचित होऊन 'व्यवहारापुरते आचार स्वातंत्र्य घेण्यास शास्त्राने आड येऊ नये' या मताचा पगडा लोकाच्या मनावर वाढत गेला. साध्य मान्य करून साधनांची निवड करण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीकडे सोपविण्याची आवश्यकता व्यवहारज्ञ माणसांना आजच्याप्रमाणें पूर्वीहि भासत गेली. यामुळे 'धर्मशास्त्राचें प्रामाण्य विशिष्ट मर्यादि-पर्यंत मानावे आणि इतरत्र आपद्धर्म म्हणून सांगितलेल्या सवलतीचा आश्रय करावा' हा नियम लोकाच्या आचरणांत वाढत्या प्रमाणात उतरूं शकला. कारण राज्यक्रांति झाली किंवा दरपिढीस संततीचे मान वाढू लागलें, म्हणजे त्या सर्वांच्या पोषणास मर्यादित स्वरूपाचा अग्रहार अपुराच ठरतो. अशा स्थितीत अग्रहाराची व्यवस्था टिकावी कशी ? तात्पर्य, धर्माची आज्ञा म्हणून किंवा शास्त्राने सांगितलेला विहित धर्म म्हणून नव्हे, तर केवळ ऐहिक उत्कर्ष साधण्यासाठी स्थलांतर करणें किंवा नवीन धंदे पतकरणें प्राप्त असते. ही गोष्ट ब्राह्मण लोकाच्या ध्यानांत कित्येक शतकांपासून थोड्याबहुत प्रमाणांत आली होती व अलीकडे ती अधिकच स्पष्टपणें प्रत्ययास येऊं लागली आहे.

क्षत्रियांच्या म्हणजे मराठ्यांच्या ध्यानांतहि ही गोष्ट कोणत्या क्रमानें आली तें पहाण्या जोगे आहे. 'मुसलमानांनी यादवाचा पराभव करून दक्षिणेंत आपलें राज्य कायम केल्यानंतर अनेक मराठे लोक त्यांचे सरदार बनून राहिले व कालांतरानें

त्यांनीं पुनः डोकें वर काढले. यावरून 'प्रसग ओळखून वागावें' या तत्त्वाचाच अंगीकार मराठ्यांनी राजकारणात केला हे स्पष्ट दिसतें. राजकीय व्यवहार करतांना व चरितर्थाची सोय लावतांना परिस्थितीवर तोड करण्याचें ध्येय प्राधान्यानें दृष्टीपुढे ठेवलें पाहिजे व यश मिळाल्यानंतर देवाचे व धर्माचें स्मरण करण्यास विसरूं नये, असा समन्वय महाराष्ट्रातील लोकांच्या विचारांत दिसून येतो. या समन्वयाचा अर्थ त्याच्या अतःकरणात शास्त्राज्ञेविषयीं आदरभाव कमी होता असा करावयाचा नसून, शास्त्राज्ञा पाळणारे लोक जिवंत व सुस्थितींत असतील त्या मानाने शास्त्राज्ञापालनाचें क्षेत्र वाढू शकेल याची त्याना जाणीव होती असा केला पाहिजे. धर्मशास्त्राचे परिपालन हे ध्येय मान्य असून देखील धर्माचाराचा संकोच किंवा विस्तार करण्याचा अधिकार मराठ्याच्या अमदानीत व्यक्तीकडेच सोंपविल्यासारखा झाला होता.

समाजाच्या धार्मिक समजुतीत हे स्थित्यतर होण्यास कित्येक शतके लागली. 'धर्मपरिपालन हेच समाजाचे व राजाचे एकमेवाद्वितीय असें ध्येय असलें पाहिजे,' या समजुतीत वाढलेला हिंदुसमाज व 'तरवारीच्या जोरावर धर्माचा प्रसार करावा' असें चढावाचें तत्त्वज्ञान स्वीकारणारा मुसलमान समाज यांची गांठ पडली तेव्हा प्रथम त्याचा झगडा होणें स्वाभाविक होते. पण काहीं वर्षे झगडा चालल्यानंतर मुसलमानांची धडाडी ओसरली आणि हिंदूना आपले राज्य उभारणें महाराष्ट्रात शक्य झालें या राज्याचा उच्छेद करण्याचा जोराचा प्रयत्न औरगजेबानें करून पाहिला, पण त्यात त्याला यश आले नाहीं एवढेच नव्हे, तर दिल्लीची बादशाही सभाळण्याची ऐपत देखील औरगजेबाच्या वंशजात राहिली नव्हती. अशा स्थितीत हिंदुमुसलमानानी राजकारणातील अग्रेसरत्वाच्या प्राप्तीसाठी आरंभिलेल्या डावाचा शेवट कांही अशीं अनपेक्षित असा झाला. हिंदुस्थानातील हिंदु व मुसलमान सत्ताधाऱ्यानीं परदेशस्थाचे हल्ले थाबविण्यासाठीं एकजुटीने वागले पाहिजे या धोरणाची आवश्यकता हिंदु व मुसलमान मुत्सद्याना एकसारखी भासू लागली. थोरले बाजीराव, भाऊसाहेब, नाना फडणीस, हैदर व पाटीलबावा याच्या पत्रांत नादिरशहा व अबदाली याच्या स्वाऱ्या आणि इंग्रजाचे आक्रमण याच्यासंबधानें जे विचार आढळतात, त्यावरून हिंदी मुत्सद्यांना व्यापक दृष्टि येऊं लागली होती याविषयी संशय रहात नाहीं. जात व गोत किंवा हिंदु व मुसलमान या धर्मभावनेस प्राधान्य न देतां या देशांतले कोण आणि परदेशांतले कोण या दृष्टीने राजकारणांत आपपरभाव ओळखावा या विचाराचा तुरळक कां असेना, पण स्पष्ट शब्दांत उच्चार होऊं लागला होता. तथापि राजकारणाचे केंद्र त्या वेळी हिंदुस्थानात राहिलें नसून अंशतः युरोपात गेलें आहे, हें त्या वेळच्या हिंदी मुत्सद्यांच्या लक्षांत आलें नाही. इंग्रजी सत्तेचें एक पाऊल हिंदुस्थानांत असलें

तरी दुसरे युरोपांत होते, त्या अर्थी हिंदुस्थान व यूरोप या दोनहि ठिकाणच्या घडामोडी लक्षांत घेऊन इंग्रजांशी विरोधाची अगर सलोख्याची भाषा वापरावयास पाहिजे होती. पण परदेशातील घडामोडीपर्यंत नजर पोंचण्यापूर्वी इंग्रज व मराठे यांचा सामना जुपून मराठी राज्याचा अंत झाला.

इंग्रजी अमदानीत राजकीय सूत्रे इंग्रजाच्या हाती गेल्यामुळे हिंदी लोकाच्या दृष्टीला व्यापकपणा येण्याचा एक मार्ग खुंटला. पण युरोपियन वाङ्मयाच्या मननाने व परदेशांत प्रत्यक्ष जाऊन आल्याने प्राप्त होणारा व्यापकपणा मात्र काही अंशी वाढत आहे.

महाराष्ट्रांत पूर्वी एकधर्मी राज्ये नादत होती, नतर मुसलमानी अमदानी झाली आणि पुढे मराठेशाही झाली; यामुळे लोकांच्या विचारसरणीत वसकशी क्रांति होत गेली याचें दिग्दर्शन येथवर केले. आता मराठेशाही संपून इंग्रजी राज्य सुरू झाल्यामुळें लोकाच्या विचारसरणीत काय बदल होत आहे याचा विचार केला पाहिजे. या विचारक्रांतीची दिशा लक्षात घ्यावयाची म्हणजेच इंग्रजाचे ध्येय समजून घ्यावयाचे. ' राजा कालस्य कारणम् ' हा सिद्धान्त हजारो वर्षांपासून आजपर्यंत येथील कालमान निश्चित करण्यास उपयोगी पडला आहे ' तरवारीचा उपयोग मुसलमानी धर्माच्या प्रसारास होऊ शकतो ' हे जसे मुसलमान राजानी दाखवून दिले, त्याप्रमाणे ' तरवारीच्या जोरावर हिंदू राजे या धर्मप्रसारास अडवून हिंदू धर्माचे परिपालन करू शकतात ' ही गोष्ट महाराष्ट्रातील स्वराज्याच्या चालकांनी सिद्ध केली. पण धर्मप्रसार असो किंवा धर्मसरक्षण असो तरवारीचा उपयोग धर्माच्या कामी करण्यास राज्यकर्त्यांनी तयार असले पाहिजे, ही विचारसरणी बहुतेकांच्या मनात पूर्वी रूढ झाली होती. पण इंग्रजाची तरवार धर्माच्या प्रसारासाठी किंवा धर्माच्या रक्षणासाठी पुढे येत नसून धार्मिक बाबतीत उदासीन वृत्ति धारण करण्यास ती तयार आहे. तिचा मुख्य रोख इंग्रजाचे व्यापारी हितसंबंध राखणें व वाढविणे यावर आहे तथापि आपले व्यापारी हित कशाने साधेल याविषयी इंग्रजी मुत्सद्यातच एकवाक्यता नाही. खुल्या व्यापाराची पद्धति आपणास फायदेशीर पडेल असे मानणारा उदारमतवाद्याचा पक्ष बरीच वर्षे इंग्लडांत सूत्रचालक होता. पण महायुद्धापासून ती विचारसरणी चुकीची ठरून साम्राज्यवादी पक्ष अधिकारारूढ झाला. यामुळे इंग्रजी राजकारणात त्या धोरणाने अनेक बाबतीत स्पष्ट असा बदल होत आहे. त्यापैकी हिंदुस्थानच्या दृष्टीनें महत्त्वाचा ठरणारा बदल राष्ट्रीयत्वासंबधींचा आहे. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचें जनकत्व व हिंदुस्थानांत त्या कल्पनेची प्रतिष्ठापना करण्याचे श्रेय इंग्रजांकडे देण्याचें कारण नाही हे खरें; पण उदारमतवादी मुत्सद्यांनी या कल्पनेच्या वाढीस आपल्या अमदानींत धारेवर धरले नाही हें विसरतां येणार नाही. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची वाढ हें

गेल्या शतकांतील जागतिक राजकारणाचे सामान्य लक्षण होतें. यामुळें इटली, जर्मनी व जपान या देशांत राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची वाढ झपाट्यानें झाली व या वाढीस विरोध न करण्याचें धोरण जसें इंग्लंडांतील उदारमतवादी पक्षानें पत्करलें, तसेंच त्यानें हिंदुस्थानांतील राष्ट्रीयत्वाच्या बाबतींतही पत्करलें. राष्ट्रीयत्वाची वाढ–मग ती जपानांत असो किंवा हिंदुस्थानांत असो—इंग्रजी साम्राज्याच्या राजकीय वर्चस्वास व व्यापारी हितसंबधास बाधक ठरणार नाहीं असें जोंपर्यंत इंग्रजी मुत्सद्यांना वाटत होते, तोंपर्यंत त्यांनीं हिंदुस्थानांत वाढत चाललेल्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस उघड विरोध केला नाही. पण उदारपक्षाचीं मते हितकारक ठरत नाहींत, असे दिसून आलें, तेव्हांपासून इंग्रजी जनतेचा दृष्टिकोन बदलला. हिंदुस्थानात राष्ट्रीय कल्पनेची वाढ होऊं देणें म्हणजे जर इंग्रजांच्या व्यापाराची पिछेहाट आणि ब्रिटिश साम्राज्यातून फुटून निघण्याच्या हक्काचें प्रतिपादन असाच अर्थ मुख्यत्वेंकरून असेल, तर या कल्पनेच्या प्रसारास शक्य त्या मार्गानें उघडपणें प्रतिबंध करणें प्राप्त आहे, असे महायुद्धानंतर अधिकारारूढ झालेल्या इंग्रजी मुत्सद्यांच्या धोरणाचे तात्पर्य दिसतें. मुसलमानांच्या आगमनापासून हिंदी राजकारणाचे स्वरूप जसें धार्मिक विरोधाच्या भावनेनें व्याप्त झाले होतें, त्याप्रमाणें महायुद्धोत्तरच्या अमदानींत व्यापार व राजकीय वर्चस्व यांच्या विरोधानें राज्ययंत्र अंतर्बाह्य लिप्त होत चालले आहे.

या गडबडींत ' कोणाचे किती प्रतिनिधि कौन्सिलांत असावे ' या मुद्द्यास प्राधान्य येईल असें मध्यतरी वाटू लागले होतें; पण तो मुद्दा गौण ठरून ' हिंदुस्थानचे आर्थिक व राजकीय धोरण येथील लोकमतास अनुसरणारें असेंच पाहिजे' या पालुपदावर वादाचा भर पुन: येऊ लागलेला दिसतो. आणि या विचाराचे पर्यवसान जर इग्रजी व्यापारास धक्का व स्वातंत्र्यप्रवृत्तीची वाढ यांत व्हावयाचे असेल, तर हा विचार दडपून टाकण्यासाठी इंग्लंडातील साम्राज्यवादी पक्ष प्रयत्नाची पराकाष्ठा करील याविषयी यत्किंचित् सशय वाटण्याचें कारण नाहीं

परांजपे घराण्यातील शिवरामपत व बाबासाहेब या व्यक्तीनी ज्या राष्ट्रीयत्वाच्या जोपासनेसाठी खडतर तपश्चर्या केली व राजकारणाचें गाडे वर सांगितलेल्या थरावर आणून ठेवण्याच्या कामी कायावाचामनेकरून अहर्निश खटपट केली, त्याचें सार संक्षेपानें आतांपर्यत नमूद केलें, यापुढे अपवादात्मक व्यक्तींचा विचार सोडून, परांजपे घराण्यांतील सर्वसामान्य व्यक्ति काय करीत आहेत यासंबंधींचा हिशेब पाहूं.

या पुस्तकांतील पाचव्या प्रकरणांत परांजपे उपनांवाच्या विद्यमान व्यक्तीची नोंद अक्षरानुक्रमानें केली आहे. या नोंदीत यच्चयावत् सर्व विद्यमान परांजपे समाविष्ट झाले आहेत असें जरी म्हणतां येणार नाहीं, तरी हजार

दीड हजार व्यक्तींच्या माहितीवरून तयार केलेले आकडे सामान्य विवेचनांत स्थूल मानाने प्रमाणभूत धरण्यास हरकत नाही यापुढील भागांत आपणांस विशिष्ट व्यक्तींच्या योग्यायोग्यतेचा विचार करावयाचा नाही, तर महाराष्ट्रांतील ब्राह्मणसमाजाचा सामग्र्याने विचार करण्यासाठी ठोकळ मानाने एका घराण्यांतील व्यक्तींचा समाचार घ्यावयाचा आहे. एकदर प्रकृतिमान अजमावण्यासाठी नाडीपरीक्षा करण्याची जी वैद्याची पद्धत असते, त्यांतलाच हाहि एक प्रकार आहे. एवढी पूर्वसूचना देऊन पराजपे घराण्यातील विद्यमान व्यक्तीचे आंकडे काय सुचवितात तें पाहू. त्यांच्या धंद्याची आकडेवारी येणेप्रमाणे आहे:--

| | |
|---|---|
| २३२ विद्यार्थी | १० वैदिक |
| ११९ सरकारी नोकर | ९ कीर्तनकार, पुराणिक |
| ५६ खाजगी नोकर | ९ वैद्य |
| ४६ पेन्शनर | ८ दलाल |
| ३६ वकील | ८ सुखवस्तु |
| ३३ व्यापारी | ५ शास्त्रज्ञ |
| २८ शेतकरी | ५ नट |
| २७ मराठी शिक्षक | ४ सपादक व ग्रंथकार |
| २५ रेल्वेत नोकर | ४ प्रोफेसर |
| २५ एंजिनिअर | ४ सावकार |
| २५ डॉक्टर | ३ कारखानदार |
| २१ स्वतंत्र धदेवाले | ३ गवई |
| २० दुकानदार | ३ खोत |
| १६ इंग्रजी मास्तर | २ परमार्थी |
| १५ भिक्षुक | २ इनामदार |
| १५ सरकारी अधिकारी | १ चित्रकार |
| १३ हॉटेलांचे मालक | ८३२ एकूण |

पांचव्या प्रकरणात दिलेल्या १५९२ विद्यमान व्यक्तींपैकी फक्त ८३२ लोकांसंबधी माहिती मिळू शकली; तिची धंद्याच्या दृष्टीनें वर्गवारी करून संख्यानुक्रमानें वरील यादी दिली आहे. तीनशे वर्षांपूर्वी धर्मकर्म व शेती या दोन सदरांखाली पडणारेच धदे परांजपे मंडळी मुख्यत्वेकरून कोकणांत करीत होती, परंतु देशावर आल्यापासून गेल्या दोनशे वर्षांत नोकरी व व्यापार या गोष्टी त्याना पतकराव्या लागल्या. या दृष्टीनें वरील यादीची चार सदरात मांडणी करतां येते, ती अशी:--

| | |
|---|---|
| * ३२६ नोकरी | ३१ शेतकरी |
| २०७ व्यापारधंदा | ३६ वैदिक |

मिळून ६००

या चार आंकड्याचा हिशेब आणेवारीने मांडल्यास असें म्हणतां येईल की, पराजपे उपनावाच्या घरधन्यापैकी १ आणा ब्रह्मकर्म करणारे व १ आणा शेती करणारे एवढे लोक सोडल्यास बाकी चौदा आणे लोक व्यापार व नोकरी या 'उपरी' स्वरूपाचे धंदे करून पोट भरीत आहेत. त्यांतल्या त्यात + 'उत्तम शेती, मध्यम व्यापारधंदा, काणि कनिष्ठ नोकरी' ही व्यवहारज्ञ लोकांची कसोटी मान्य केल्यास चौदा आण्यांपैकी आठ आण्यापेक्षा अधिक लोक कनिष्ठ प्रकारचा जो नोकरीचा धंदा त्यात गुतले आहेत आणि सहा आण्यापेक्षा कमी लोक व्यापार अगर स्वतंत्र धंदे करून पोट भरीत आहेत.

आता वरील आकडे कमी सदरात समाविष्ट करून मुबई इलाख्यांतील जिल्हे, दक्षिणी सस्थाने, वऱ्हाड, मध्यप्रांत, आणि इतर प्रात अशा स्थलवारीने त्यांची माडणी करू (पृ १९६ पहा) या मांडणीत पेन्शनरांची गणना स्वतत्रपणें करून पुनः एकदा सरकारी नोकरात त्यांना धरले आहे. वगैरे कारणामुळे मागल्या यादीतल्या आंकड्यात व या कोष्टकातील बेरजेच्या आंकड्यात किंचित अंतर पडले आहे. 'इतरत्र' याचा अर्थ मुम्बई इलाखा व मध्यप्रांत यांखेरीज हिंदुस्थानातील सर्व इलाखे आणि ब्रह्मदेश, इराण व आफ्रिका असा समजावा आणि 'सु इग्रजी धंदे' याचा अर्थ 'वकील, डॉक्टर व इंजिनियर यासारखे सुशिक्षिताचे इग्रजी धंदे' असा करावयाचा आहे.

---

* सविस्तर यादीतील ८३२ या सख्येतून विद्यार्थ्यांचा आकडा २३२ हा वजा करून बाकी राहिलेल्या ६०० ची ही विल्हेवारी दिली आहे.

+ गोखले–रास्ते घराण्याच्या इतिहासात शेवटी १७३१ व्यक्तींची यादी दिली असून, सरकारी नोकर ३४३, खाजगी नोकर ८६, व्यापार ३३०, शेती २८१ आणि विद्यार्थी ७२३ असे खानेवारीचे आकडे दिले आहेत. त्यावरून विद्यार्थी सोडून धंद्याचे तीन भाग केल्यास आठ आणे नोकरी, चार आणे व्यापार आणि चार आणे शेती असे प्रमाण पडेल. यावरून या आडनांवाच्या लोकांना पराजपे मडळीपेक्षा शेतीचा आसरा अधिक प्रमाणात मिळाला असावा असे दिसतें.

## स्थलवारीनें धंदेवारी

| धंदे | रत्नागिरी | कुलाबा | ठाणें | पुणें | सातारा | सोलापूर |
|---|---|---|---|---|---|---|
| (११०) सरकारी | ४ | ५ | ११ | ११ | २ | ३ |
| (१७) निमसरकारी | .... | १ | ... | १ | ४ | १ |
| (३३) पेनशनर | २ | ३ | ४ | ६ | १ | ... |
| (४९) शिक्षक | ५ | १२ | ३ | ६ | ३ | .... |
| (२८) रेलवे | .... | २ | ३ | ... | ... | १ |
| (५६) खासगी | ... | ३ | ५ | ८ | ... | २ |
| (१८) किरकोळ नोकरी | १ | ३ | ... | ३ | २ | ... |
| (३११) नोकरी | १२ | २९ | २६ | ३५ | १२ | ७ |
| (६५) सु. इंग्रजी धंदे | १ | १ | ४ | १७ | ३ | ४ |
| (५५) स्वतंत्र धंदे | ३ | १ | ३ | १५ | ... | ... |
| (५) लेखक | .... | २ | ... | ... | ... | ... |
| (४५) व्यापारी | ८ | ४ | ७ | ८ | ... | ४ |
| (२६) शेती | १० | .... | ८ | २ | ... | १ |
| (३०) धार्मिक | ८ | ३ | १ | १ | २ | ... |
| (९६) इतर | २९ | ११ | ५ | १० | २ | ... |
| ६३३ = | ७१ | ५१ | ५० | ८८ | १९ | १६ |

## स्थलवारीनें धंदेवारी

| नगर | नाशिक | खानदेश | द. संस्थानें | वऱ्हाड सी. पी. | मुंबई शहर | इतरत्र | धंदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ... | ४ | ७ | ६ | २० | २९ | ८ | (११०) सरकारी |
| ... | १ | २ | ३ | १ | २ | १ | (१७) निमसरकारी |
| ... | ... | २ | ४ | ३ | ५ | ३ | (३३) पेनशनर |
| ... | ... | .. | ६ | ५ | ८ | १ | (४९) शिक्षक |
| ... | १ | १ | १ | ४ | ११ | ४ | (२८) रेलवे |
| .... | ... | १ | २ | ७ | १५ | १३ | (५६) खासगी |
| ... | ... | .... | ... | ... | ... | ९ | (१८) किरकोळ नोकरी |
| ... | ६ | १३ | २२ | ४० | ७० | ३९ | (३११) नोकरी |
| .. | .. | .. | ३ | २० | ५ | ७ | (६५) सु इंग्रजी धंदे |
| ... | २ | ७ | ४ | ११ | ७ | २ | (५५) स्वतंत्र धंदे |
| ... | ... | ... | १ | १ | १ | ... | (५) लेखक |
| ... | ... | ... | १ | ४ | ७ | २ | (४५) व्यापार |
| ... | १ | २ | ... | ३ | ... | ३ | (२६) शेती |
| ... | .... | .... | ५ | ३ | ... | ७ | (३०) धार्मिक |
| २ | ३ | ७ | ५ | १० | ८ | ४ | (९६) इतर |
| २ | १२ | २९ | ४१ | ९२ | ९८ | ६४ | = ६३३ |

या वृत्तान्तावरून पराजपे घराण्यांतील लोक कोंकणापासून दूरवर पुष्कळ प्रातांत पसरले आहेत, व ते अनेक प्रकारचे धंदे करीत आहेत, एवढें सामान्य वर्णन करतां येतें; आणि धदा व वसतिस्थान याविषयींचे निर्बंध त्यांनीं पार झुगारून दिले, असा सकृद्दर्शनीं तरी भास होतो. यांची गणना 'कोकणस्थ-ब्राह्मण' या सामाजिक शब्दांच्या सदरात झालेली पाहून 'कोकणस्थ' व 'ब्राह्मण' या शब्दाचा कांहीं विशिष्ट अर्थ आहे किंवा नाही, याविषयी कित्येकांचें मन साशंक होईल. पण शब्दांचे धात्वर्थच तेवढे लक्षांत घेणाऱ्यास वरील शब्द संशयाच्या गटांगळ्या देतील. इतरांना ही संशयाची बाधा होणार नाही हा विरोध वास्तविक नसून आभासरूपी आहे हे व्यवहारज्ञ माणसाच्या सहज लक्षांत येण्याजोगे आहे. 'परांजपे' हे उपनांव सुरू झाले तेव्हा 'पारायण' व 'जप' या शब्दसमुच्चयाच्या अर्थाशी विशिष्ट व्यक्तीचा सबध जोडता येण्याजोगा होता, तरी त्या व्यक्तीच्या वशजांना या उपनांवाने पिढ्यानुपिढ्या ओळखण्यात एक प्रकारची व्यावहारिक सोय असते तीच सोय त्याना कोंकणस्थ व ब्राह्मण या शब्दानीं संबोधण्यांत साधत असते. शिवाय सोयीबरोबर व्यक्तीच्या सामाजिक व अनुवशिक प्रवृत्तीचाहि निर्देश या शब्दानी होऊ शकतो त्याअर्थीं 'आडनांव, जात व देश' या तिहेरी सकेताने ओळखला जाणारा हा व्यक्तिसमूह मूळ प्रांतात न राहतां इतस्ततः हिंदुस्थानभर कां वावरू लागला, या प्रश्नाचें उत्तर आधी शोधलें पाहिजे.

हा शोध करण्यासाठी फारसे खोल पाण्यांत शिरण्याची आवश्यकता नाहीं. कारण चरितार्थाची सोय कोठे लागेल व कोणत्या धंद्यात लागेल याचा शोध प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणें करावा लागत असल्यामुळें या लोकांना निरनिराळ्या प्रांतांत जावें लागले व त्याना जमेल तो धदा पतकरावा लागला, हे उत्तर कोणासहि सुचण्याजोगें आहे. पण 'पूर्वीच्या मानाने ही स्थलांतरप्रवृत्ति वाढत आहे की कमी होत आहे' या प्रश्नाचे उत्तर देणें काहीसे कठिण आहे. राहता गांव न सोडतां, बापाचाच धदा करण्याने मुलाच्या चरितार्थाची सोय लागत असेल तर स्थलांतर करण्याची प्रवृत्ति वाढणार नाहीं; आणि अशी सोय लागत नसेल तर ही प्रवृत्ति वाढेल; या नियमानुरोधाने, मुबई इलाख्यांतील कोंकणस्थांच्या चालू पिढीत ही प्रवृत्ति कमी होत चालली आहे व पुढील पिढींत ती याहीपेक्षां कमी होईल असें दिसतें. 'माहिती' या प्रकरणांत आलेली निरनिराळ्या घराण्यांची हकीकत वाचून पाहिली असतां वरील म्हणण्याची सत्यता कोणासहि पटण्याजोगी आहे. एकाच घराण्यातल्या चौघांनी चार दिशास जाऊन इंग्रजी शिक्षणाच्या जोरावर तेथे मोठ्या हुद्याची जागा मिळविणें गेल्या पिढीत शक्य झाले (प.घ.इ.पृ. २८६). पण त्या चौघांचे मुलगे आज पदवीधर असले तरी ते सर्वच्या सर्व बापाच्या हुद्यावर नेमले जाणार नाहींत हें निश्चित दिसतें. यामुळें चालू पिढीतील बऱ्याच लोकाना मागल्या पिढीचा धंदा

चालवितां येणें अशक्य आहे. अर्थात् त्यांना सरकारी नोकरीवांचून अन्य मार्गच शोधणें भाग पडेल. हा अन्य मार्ग शोधीत असतां ' आपले पाय कोठें टेकतील' या विवंचनेनें व्यग्र झालेले हे लोक जेव्हां सभोंवार पाहूं लागतात, तेव्हां त्यांचें मन गोंधळून जातें. शहरोशहरीं हायस्कुलें व ठिकठिकाणीं कॉलेजें सुरू झाल्यामुळें आंग्ल-शिक्षित पदवीधरांची संख्या सर्व प्रांतांत भरपूर झाली; त्या अर्थी एका इलाख्यांतील पदवीधरांना इतर प्रांतांतून सरकारी नोकऱ्या मिळण्याचा संभव मुळींच राहिला नाहीं. ही गोष्ट चालू पिढीच्या ध्यानांत आल्यानें त्यांची अडचण कमी होण्याऐवजीं अधिकच वाढते. सरकारी नोकरीचा नाद सोडून वकीली व डॉक्टरी या धंद्यांची परिस्थिति पाहिली तरी देखील हा प्रश्न सुटत नाहीं. त्याहि धंद्यांत स्थानिक पदवीधरांना आधीं स्थान मिळूं शकतें व परस्थांचा समवेश होण्यास कोठेंहि अवसर रहात नाहीं. अशा परिस्थितीमुळें गेल्या पिढीत आढळणारी स्थलांतर-प्रवृत्ति या पिढींत झपाट्यानें कमी होत आहे. एवढेंच नव्हे, तर इतर प्रांतांत केवळ सरकारी नोकरीसाठीं गेलेले कांहीं कोंकणस्थ, पेनशनींत निघाल्यावर, पुण्याकडे घरें बांधूं लागले आहेत. आपल्या मुलांबाळांचें शिक्षण करण्यास व त्यानंतर त्यांनीं कोणता आयुष्यक्रम पतकरावा हा प्रश्न सोडविण्यास पुण्यांतील रहाणें जितकें सोईचें पडेल, तितकें इतरत्र पडणार नाहीं, असे विचार जन्मभर परप्रांतांत सरकारी नोकरी केलेल्या कांहीं अनुभविक लोकांच्या तोंडून बाहेर पडतात.

ही प्रवृत्ति एका उपनांवाच्या गटांतली नसून एकंदर कोंकणस्थ ज्ञातीची आहे, किंबहुना त्याहीपेक्षां व्यापक आहे. गेल्या पन्नास वर्षांतले खानेसुमारीचे आंकडे तपासण्यानें ही गोष्ट सहज ध्यानांत येईल. या कामासाठीं सबंध मुंबई इलाख्याचे आंकडे फारसे उपयोगी पडणार नाहींत. या इलाख्यांत सिंध, गुजराथ महाराष्ट्र व कर्नाटक या चार गटांतील लोकांचा कसा तरी समावेश केलेला आहे. त्यांतील प्रत्येक गटाचा अभ्यास स्वतंत्रपणेंच करणें अवश्य. येथें त्यांतील फक्त मराठी जिल्ह्याचे ब्राह्मण ज्ञातीचे आंकडे सांगण्यानें काम भागेल. पैकीं उदाहरणादाखल, प्रथम कोंकणस्थांच्या लोकसंख्येंत कोंकणांतील व देशावरील तीन तीन जिल्ह्यांतून, कालानुक्रमानें काय चढउतार होत आहे तें पाहूं.

## कोंकणस्थांची लोकसंख्या (आंकडे हजाराचे)

| सन | १८९१ | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ |
|---|---|---|---|---|---|
| रत्नागिरी | ३१ | ३१ | ३० | २८ | २८ |
| कुलाबा | १४ | १३ | ११ | १२ | १३ |
| ठाणे | ८ | ६ | ५ | ८ | ९ |
| कोंकण | ५३ | ५० | ४६ | ४८ | ५० |
| **देश** | | | | | |
| पुणें | १४ | १४ | १५ | १६ | २१ |
| सातारा | ९ | ८ | ७ | ६ | ६ |
| नाशिक | ४ | ३ | ४ | ४ | ४ |
| देश | २७ | २५ | २६ | २६ | ३१ |

कोकणस्थाची मुख्य वस्ती कोकण व पुणे–सातारा या भागात आहे. त्यातल्या त्यांत रत्नागिरी व पुणें या जिल्ह्यात ती विशेष आहे. शिवाय बहुतेक जिल्ह्यातील कोकणस्थाची संख्या गेल्या चाळीस वर्षांत वाढलेली नसून फक्त पुणे जिल्ह्यांत मात्र ती एकसारखी वाढत आहे याच्या उलट रत्नागिरीकडे त्याची संख्या स्पष्टपणे घटत आहे. याखेरीज अधिक बारकाईने पाहणी केल्यास रत्नागिरीकडे स्त्रियाची सख्या अधिक व पुण्याकडे पुरुषांची अधिक आहे. पराजपे (प.घ इ.पृ. ३९६). यावरून रत्नागिरीकडचे कोंकणस्थ पुरुष शिक्षणासाठी व नोकरी-साठी परप्रातात जातात आणि इतर जिल्ह्यातले पुरुष याच दोन कामासाठी पुण्याकडे येतात असें म्हणता येईल. यापेक्षा बारकाव्यात जाऊन रत्नागिरीकडचे किती कोकणस्थ पुण्यात आले व इतर जिल्ह्यातले किती आले याचे मोजमाप करण्याचें साधन खानेसुमारीच्या ग्रथात उपलब्ध नाही. आणि आपणास येथे जो सर्वसामान्य दृष्टीने विचार करावयाचा आहे, त्या विचाराचे काम या बार-काव्याच्या माहितीवाचून तादृश अडण्याजोगे नाही. कोकणस्थाची वस्ति पुण्या-कडे वाढत आहे व इतरत्र राहाणाऱ्या कोकणस्थांची नवी पिढी पुण्याकडे येत असल्यामुळे ही वाढ विशेष रीतीनें दिसत आहे, एवढं गृहीत धरण्यास हरकत नाही.

परांजप्याची काही घराणी वऱ्हाड–नागपूराकडे स्थाईक झाली असून त्यांचाहि विचार करणे जरूर आहे परंतु मध्यप्रांताच्या खानेसुमारीत अलीकडे 'कोंकणस्थ' हे सदर अजिबात काढून टाकले आहे. त्या भागात इतर ज्ञातींच्या मानाने कोंकणस्थांची सख्या उपेक्षणीय असल्यामुळें असा प्रकार झाला असावा.

तथापि एकंदर कोंकणस्थ ज्ञातीचे मध्यप्रांतांतील आंकडे उपलब्ध नसले तरी प्रस्तुत ग्रथांतील पांचव्या प्रकरणांत समाविष्ट झालेल्या विद्यमान व्यक्तींच्या विल्हेवारीवरून परांजपे उपनांवाचे ९२ लोक तेथे आहेत, हे पृ. १९६ मधील तपशिलावरून ठरतें. त्याचे धंदे व मुंबई इलाख्यांतील परांजपे मंडळीचे धंदे यांची तुलना करण्याजोगी आहे.

वऱ्हाड मध्यप्रांतातील परांजपे मुख्यत्वेकरून सरकारी नोकरी, वकिली, डॉक्टरी यांसारख्या आंग्लशिक्षितांच्या धंद्यांत आहेत. पण यावरून त्यांच्या मुलांना हेच धंदे करण्यास यांच्या इतकी अनुकूलता सांपडेल किंवा परांजप्यांप्रमाणे इतर उपनांवाचे कोकणस्थ देखील याच प्रमाणांत तेथे हे धंदे करीत असतील असे समजतां येणार नाही वाई क्षेत्रात जशी कांही ब्राह्मणाची घराणीं अग्रहार पद्धतीनें वसविली गेलीं किंवा आपल्या ज्ञातीच्या राजाश्रयास म्हणून पेशवाईत पुण्यास कोंकणस्थ घराणी येऊन राहिली, तसा प्रकार वऱ्हाड–मध्यप्रातात गेलेल्या कोकणस्थ घराण्यांचा नव्हे. 'ब्राह्मण' किंवा 'कोकणस्थ' यापैकी कोणत्याहि नात्याने ते तेथे गेले नाहीत; केवळ सुशिक्षित म्हणून ते तिकडे गेले. कारण, ब्राह्मण जातीची म्हणून वसाहत करण्याचा मनु जाऊन कित्येक शतके झाली आणि कोंकणस्थ ज्ञातीचा म्हणून राजाश्रय मिळण्याचा काळ सपूनहि शे–सवाशे वर्षे लोटली. आंग्लविद्याविभूषित म्हणून पुण्याकडून वऱ्हाडमध्यप्रातात जाण्यास अनुकूल परिस्थिति पचवीस वर्षांपूर्वीपर्यंत वहावीस वर्षे होती; पण तिकडेहि सुशिक्षिताची सख्या वाढल्यामुळे यापुढे अधिक कोकणस्थाना तेथे प्रवेश मिळण्याचा संभव राहिला नाही.

येथे एका प्रश्नाचा उलगडा अनायासें होण्याजोगा असल्यामुळे तो सागून ठेवला पाहिजे. इंग्रजी शिकलेल्या कांहीं लोकांना पुण्याकडून उठन वऱ्हाडमध्यप्रांतांत जाण्यास अनुकूल असा काही वर्षांचा काल होता व तेवढ्यांत जी कोंकणस्थ घराणी तेथे घरदार करून स्थाईक झाली, तेवढ्याच उपनांवाचे लोक तेथें कांही पिढ्यानतर प्राधान्यानें आढळवयाचे व ज्यांना हा स्थाईकपणा लाभला नाहीं, ती घराणी गांवोगाव विस्कळित व अल्पसख्याक अशीं बनावयाची. पण एवढ्यावरून अल्पसंख्याक गांवातील वस्ती मागाहूनची आणि बहुसंख्य लोकांची वस्ती आधीची, असे निश्चयाने म्हणवत नाही. मुले कमीअधिक होणें आणि स्थाईकपणा लाभणे या दोनही गोष्टीचा योग जुळून येईलच असे नाहीं. शिवाय स्थाईकपणा व खाण्यापिण्याची अनुकूलता असून देखील मुलें कमी होतील आणि उलट स्थितीत देखील प्रजेची सख्या वाढेल, हे लक्षांत ठेवले असता अमुक आडनांवाच्या लोकाचे कोकणांतील मूळ गाव अमुक असा जो कांही लोकांचा समज झालेला दिसतो तो अंशतः चुकीचा आहे असे म्हणावें लागेल. उदाहरणार्थ, परांजपे हे अडिवऱ्याचे, लिमये कर्ल्याचे, गोखले घालवलीचे, आपटे

व साठे देवाच्या गोठ्याचे, बापट पुळ्याचे, बरवे गावखडीचे, अभ्यंकर व केळकर आंबेऱ्याचे आणि पटवर्धन हे गुळें, जानशी किंवा कोतवडें येथचे असा जो समज चालू आहे तो ठोकताळ्यापुरता ठीक आहे. पण अमुक राण्याचा कालदृष्ट्या अमुक गाव प्राचीन वसाहतीचा असे विधान करणें शास्त्रशुद्ध ठरणार नाही.

वऱ्हाड-मध्यप्रात व रत्नागिरी येथील कोंकणस्थ घराण्याच्या लोकसंख्येचें वैशिष्ट सांगितल्यानंतर, पुण्यामुबईकडील कोकणस्थांचें वैशिष्टय सागितलें पाहिजे पेशव्यांचें भट घराणें, फडणीसांचे भानु घराणें किंवा रास्ते, बरवे वगैरे सावकार घराणी आणि जोशी, पटवर्धन वगैरे तुरळक व्यक्ति यांचें कोंकणांतून देशावर आगमन पेशव्याचा जम बसण्यापूर्वी झालें. नतर नानासाहेबांच्या कारकीर्दींत पंचवीस तीस आडनांवाचे तरी कोकणस्थ आले असावे. पुढे पाणिपतच्या युद्धांत देशावरील अनेक घराण्यांचा सहार झाला, पण त्याचा धक्का रास्ते व पटवर्धन या सरदाराना बसला नाही. यामुळे पुण्यापासून मिरजेपर्यंतच्या भागांत आणखी काही घराणी कोकणातून येऊन राहिली पुढे माधवराव व राघोबा याच्या भाऊबदकीत माधवराव व नाना फडणीस याचा पक्ष यशस्वी झाल्यामुळें पुण्यात फडणीशी कचेरीत इ. स. १७७५ मध्ये ६६ आडनांवांचे १४५ कोंकणस्थ कारकून दिसूं लागले. आणि इ स १७९३ मध्ये पुणें मुक्कामी राहणाऱ्या गृहस्थाच्या यादीत कोंकणस्थाची सुमारे शभर उपनावे येऊं शकली. अशा प्रकारच्या याद्यांवरून कोणत्या आडनांवाचे लोक पुण्याकडे आधीं आले व कोणत्या आडनावाचे नतर आले याचा निर्णय करतां येतो. पण तेवढ्यावरून जी घराणी आधी आली त्याची संख्या अधिक असली पाहिजे व मागाहून आलेल्या घराण्यांची सख्या कमी असली पाहिजे असे अनुमान करणे बरोबर होणार नाही. उदाहरणार्थ, भट घराणे प्रथम आले व या घराण्याशी त्यांच्याबरोबर आलेल्या सावकार घराण्यांचा शरीरसबंध झाला हें खरे. पण पेशवाई व सावकारी हे धदे वंशवृद्धीच्या ऐवजी वंशक्षयास अनुकूल होते असे म्हणावें लागतें. कारण पेशव्याचा साक्षात् वंश खुटला हे इतिहास प्रसिद्ध आहे आणि जुन्या सावकार घराण्याची आजची खानेसुमारी देखील इतराच्या मानाने कमी भरेल असें वाटते.

मुबई युनिव्हर्सिटीतील पदवीधरांच्या संख्येवरून एखाद्या उपनांवाच्या बहुसंख्यत्वाबद्दल निर्णय देताना देखील अशाच प्रकारची अडचण भासते. युनिव्हर्सिटी सुरू होतांच ज्या आडनांवाचे लोक पहिल्या पाच वर्षांत पदवीधर झाले त्यांत कोकणस्थांपैकीं रानडे, मोडक, बापट, कुंटे, गाडगोळ, काणे, परांजपे हीं आडनांवे आढळतात. पण या आडनांवांचे लोक युनिव्हर्सिटीत आधीं शिरले असून आज त्यांपैकीं कित्येकांची संख्या, पंन्नास वर्षांच्या एकुणांतीत अधिक

भरत नाही. पुण्यास फर्ग्युसन कॉलेज व न्यू पूना कॉलेज सुरू झाल्यापासून मधुकरी मागून कित्येक लोक पदवीधर झाले. यामुळे पूर्वी पदवीधरात श्रीमतांचें प्रमाण बरेंच होते ते कमी होऊन पुण्याकडील गरीब घराण्यांतले लोक पदवीधर होऊ लागले. कोल्हापूर, सांगली, बेळगांव, धारवाड वगैरे गावातून कॉलेजे सुरू झाल्यापासून पुण्यांतील पदवीधराचे प्रमाण कमी होत आहे व कर्नाटकांतल्याचे वाढत आहे. यावरून अमुक आडनावाच्या लोकांना पदवीधर होण्यास लागणारी बुद्धि अधिक आहे आणि इतरात ती कमी आहे; किंवा पुण्याकडेच लोक हुषार आहेत आणि कर्नाटकाकडचे मठ्ठ आहेत असे म्हणण्यास काडी इतकाहि आधार दिसत नाही. इच्छा असेल त्याला पदवीधर होता येईल; फार तर दोन वर्षे कमी किंवा अधिक लागतील इतकेच. अशी वस्तुस्थिति असल्यामुळे हायस्कूल–कॉलेजाची स्थापना ठिकठिकाणी होणार आणि तेथे तेथे सुशिक्षिताची संख्या वाढणार असें दिसते. पिठाच्या गिरण्या जशा लहानसहान गावातूनहि गेल्या आणि त्यातून दळून घेणाऱ्यांची सख्या वाढली, त्याचप्रमाणे आजकाल इग्रजी शिक्षणसस्थाची संख्या झपाटाने वाढून त्यातून हजारो सुशिक्षित बाहेर पडणार! वेदाध्ययनाचा अधिकार पूर्वी फक्त द्विजाना अथवा त्रैवर्णिकांनाच होता, तसा पक्षपात इंग्रजी विद्यादानांत बिलकुल नाही मनुष्य कोणत्याहि ज्ञातीचा असो किंवा धर्माचा असो, तो कुलीन असो किंवा नसो, त्याच्या गावाच्या जवळपास इंग्रजी शाळा झाली की, त्याला तेथे जाऊन सुशिक्षित झालेंच पाहिजे. आणि अशा रीतीने बहुनेक जाती सुशिक्षित झाल्या म्हणजे बेकाराची सख्या वाढण्यावाचून गत्यंतर नाही.

सुशिक्षिताच्या बेकारीचे स्वरूप हे अशा प्रकारचें आहे. या शर्यतीत कोकणस्थ आधी शिरले, यामुळे हा चक्रव्यूह कोठे संपतो हे त्यांना आधी समजले. पण देशस्थ व कऱ्हाडे यानाहि हाच अनुभव येणार आहे. आणि ब्राह्मणांप्रमाणेच मराठे व हरिजन याच्याहि वांटयाला हे ठेवलेलेच आहे 'जात्यांतले रडतात सुपांतले हासतात' या न्यायाने कोठे चिता तर कोठे हास्य असा प्रकार यद्यपि आज दिसत आहे, तरी थोड्याच काळात हा भेदभाव नाहीसा होऊन समतेचे राज्य नांदणार हे निश्चित आहे.

ही भावी आपत्ति टाळण्यास किंवा तिचा प्रखरपणा कमी करण्यास काय करतां येईल असा प्रश्न यापुढे साहजिकच उद्भवतो त्याचे उत्तर देणें कठिण आहे. पण हें उत्तर सांपडण्यासाठी कोणत्या दिशेने खटाटोप करणे चुकीचें होईल व कोणत्या दिशेने प्रयत्न करणें फलप्रद होईल, एवढें सुचवितां येण्याजोगें आहे. वेदान्तांत 'नेति नेति' पद्धतीनें प्रथम समजूत पडल्यानतर आत्मानुभवाचा विचार सुचणें सुकर होते; तोच न्याय येथे लागू करावा.

इंग्रजी शिक्षणाने पोटाचा उद्योग मिळू शकतो असा पूर्वी अनुभव आला व आजही थोडासा येत आहे. पण सरकारी नोकरी व वकील, डॉक्टर, एंजिनियर यांसारखे इंग्रजी पदवीधराचे धंदे यांत किती लोकांचें पोट भरूं शकेल याचा आकडा लक्षात घेतल्यास त्या मानाने दरसाल तयार होणाऱ्या पदवीधराचा आकडा बेसुमार मोठा भरतो. यामुळे सर्व घोटाळा झाला आहे. हा हिशेब समजण्यास कठिण नाही. असें असताहि सुशिक्षित होऊन बेकार बनविण्याची प्रवृत्ति कां कमी होत नाही ? याचे उत्तर असे दिसते की 'माबाप सरकारच्या ठिकाणी काही अद्‌भुत सामर्थ्य साठविलेले असते. त्यानीच लोकाच्या पोटापाण्याची तजवीज केली तर होईल एरव्ही ती होणार नाहीं,' असा चुकीचा समज लोकाच्या हाडीमाशी खिळलेला आहे; तो कमी होत नाही. इंग्रजी शिक्षण संपादण्यास जात-गोत आड येत नाही हे खरे, पण माजी अमदानीत राज्यकर्त्याच्या व्यवहारांत जसे विशिष्ट धर्माच्या लोकांना सहज प्रोत्साहन मिळत होते, तसे अिंग्रजी अमदानीत विशिष्ट देशाच्या लोकाना सवलती मिळणें स्वाभाविक आहे. "हिंदुस्थान देश हा ब्रिटिश साम्राज्याचा एक अविभाज्य भाग (Integral part) आहे" असें जे अिंग्रजी मुत्सद्दी बजावून सांगतात, त्याचा अर्थ देखील हाच असतो. मुसलमानी अमदानीत मुसलमानी धर्माच्या लोकांना महत्त्वाच्या जागा मिळून त्याखालच्या जागा मुसलमानी अधिकाऱ्यांच्या तंत्राने वागणाऱ्या सरदाराना मिळूं शकत, आणि मराठेशाहीत राज्यतंत्र हिंदूच्या वर्चस्वाकडे झुकते होते. तोच प्रकार अिंग्रजी राज्यात आहे. राज्यकर्ते व अधिकारी वर्ग हे मनुष्यकोटीतले असल्यामुळे आत्मीयत्वाची भावना पूर्णपणे विसरून त्यानी राज्यशकट हाकावा अशी अपेक्षा करता येत नाही. राज्ययंत्राचे हे वास्तविक स्वरूप लक्षात घेतले असतां लोकांनी आपला प्रश्न आपणच सोडविण्यासाठी कंबर बांधणें हे शास्त्रशुद्ध होणार आहे. आपले प्रश्न सरकारी अधिकाऱ्यांनी सोडवावे असे ज्या मानाने लोक घोकीत बसतील, त्या मानाने त्याची दिशाभूल अधिकच होईल. हरएक बाबतीत सरकारच्या तोंडाकडे पाहण्याची प्रवृत्ति आमच्या समाजात आढळते, याचे कारण जुन्यापुराण्या राजनैतिक समजुतीचा अवशेष आमच्या डोक्यात अद्याप बराच शिल्लक आहे हे दिसते. 'राजा हा परमेश्वरी अंश असतो व अडचणीच्या वेळी तो मनुष्य रूपानें अवतरतो' ही भोळेपणाची समजूत कांही प्रसंगी आम्हास थोडीशी फायद्याची वाटली; पण ती मुळांतच चुकीची असल्यामुळें एकंदरीत तिने नुकसानच झाले आहे. कारण असा अवतारी राजा किंवा निदान लोकोत्तर पुरुष दृष्टीपुढे नसला की, सामान्य लोक आकाशाकडे डोळे लावून बसतात. लोकोत्तर पुरुष दिसले म्हणजे त्यांचें सांगणें शिरसावंद्य मानणें हे कर्तव्य ; कारण, नाही-होय म्हणून चर्चा केल्यास बुद्धिभेद

होतो व कार्यनाश होतो. यासाठी अशा पुरुषांच्या हयातीत सामान्य लोकांना विचार करण्याचें कारण नाहीं. आणि अशा पुरुषाच्या अभावी 'आमच्यासारख्यांनी करून कितीसें निभणार आहे?' असा प्रश्न करून स्वस्थ रहावें; किंवा सरकारावर जबाबदारी लोटावी! पण सरकार ही संस्था मानवी असल्यामुळे तिच्या हातून किती कामे होऊ शकतील याला मर्यादा असते. 'मनुष्याची कोणतीहि इच्छा तत्काळ पुरविण्याचें सामर्थ्य कल्पवृक्षांत आहे' हे खरे असो वा खोटें असो; पण असें सामर्थ्य कोणत्याहि राज्यसंस्थेंत असू शकत नाही तेव्हा परकीयांचे हल्ले परतविण्याचें व देशांतील बंड मोडण्याचें एवढे दुहेरी काम राजकीय सत्ताधाऱ्याच्या ताब्यांत ठेवून बाकीच्या कामांची जबाबदारी लोक जितकी अधिक उचलतील तितकी त्याच्या उन्नतीची इमारत भक्कम पायावर उभारली जाणार आहे. हरणास मारण्याची कामगिरी दुसऱ्याकडे सोंपविल्यामुळें जसें लगामाचें बंधन पतकरणे व स्वाराच्या तंत्राने वागणें घोड्याच्या वाट्यास आले, तसें आपला प्रश्न सोडविण्याची जबाबदारी दुसऱ्याकडे सोंपविण्याच्या प्रवृत्तीने सामान्य लोकाच्या अडचणी वाढविल्या आहेत. आपले प्रश्न सोडविण्यासाठी सरकारी कमिशन नेमले जाण्याची किंवा अलौकिक पुढारी जन्मास येण्याची वाट पहाणे एकसारखेंच चुकीचें आहे, कारण कमिशन व पुढारी यांचे आगमन प्रासंगिक स्वरूपाचें असणार आणि परिस्थितीत बदल रोजच्यारोज होणार. तेव्हा मार्ग शोधण्याचे काम लोकांनीच अखंड रीतीने चालविल्यावांचून ते समाधानकारक रीतीने होणें शक्य नाही.

याच्या उलट 'सर्वच जबाबदारी सरकारावर सोंपवून आपण फक्त कांही तास चाकरी बनण्यास राजी असलों म्हणजे लोकांचा प्रश्न सुटेल' असें एक मत ऐकू येते. पण तें आम्हांस तारक होईल असे वाटत नाही. या मताच्या प्रसाराने झालें तर आमचे नुकसानच होईल विचाराच्या बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची आमची घातुक प्रवृत्ति या विचारसरणीने आणखी एवढी वाढेल. त्या ऐवजी सरकार या संस्थेच्या अधिकाराचे क्षेत्र शक्य तितके कमी करून लोकांना आपला व्यवहार कसा चालवितां येईल व समाजव्यवस्थेची नवी मांडणी कशी होऊं शकेल, हे पाहणें श्रेयस्कर दिसते असो.

इंग्रजी शिक्षण हें पोटाची सोय लावून देणारें मोठे साधन आहे, हा समज रूढ झाल्यामुळे आमच्या समाजाचे आणखी एका प्रकाराने मोठे नुकसान होत आहे. ते नुकसान असें की, या समजामुळें आमच्यात ज्ञातिमत्सराची तीव्रता वाढली. शिवाय ज्ञातीतल्या ज्ञातीत स्थानिकपणाच्या मुद्यावर भेदभावना अस्तित्वांत येऊं लागली. मुसलमानी व मराठी अमदानीत घडलेल्या प्रकारांची ही पुनरावृत्ति इंग्रजी अमदानींत निराळ्या स्वरूपांत होत आहे. निजाम, मराठे व टिपू अशीं परस्परांशीं

चढाओढ करणारी राज्ये अस्तित्वांत असल्यामुळे आणि तीनही राज्यांत मुसलमान, मराठे व ब्राह्मण सरदार असल्यामुळें स्वामिनिष्ठेच्या काळांत धर्म व जात यांच्या विचारास गौणत्व द्यावें लागले. एवढेच नव्हे, तर भावाभावांत किंबहुना बापलेकांत परस्परांशी युद्ध करण्याचे प्रसंग ओढवले. राजकीय विचारांचा पगडा मनावर बसल्यामुळे अन्नपूर्णाबाई नवऱ्याशी घटस्फोट करण्याच्या गोष्टी बोलूं लागली होती, ही हकीकत प्रस्तुत पुस्तकांत नमूद झालेलीच आहे. (प घ.इ.पृ. २४३). तसा प्रकार आतां इलाखाभेदामुळे घडू लागला आहे. उदाहरणार्थ, परांजप्यांपैकीं कित्येक लोक वऱ्हाडांत घरदार करून स्थाईक झाले, हे मागें दिलेल्या कोष्टकांवरून लक्षांत येण्याजोगें आहे. पण या लोकांना आपल्या आडनांवाचा व ज्ञातीचा विचार बाजूस ठेवून, इतर प्रातांतले पदवीधर वऱ्हाडमध्यप्रांतांत वकीलीस यापुढे येऊं नयेत या तत्वास संमति देणें भाग पडेल. यावरून मुंबई इलाख्यातील कोंकणस्थ व वऱ्हाडांतील कोंकणस्थ यांची एकमेकांस मदत होण्याच्या कामी इलाखाभेदाची विचारसरणी मोठाच प्रतिबंध निर्माण करीत आहे असें म्हणावें लागते. देशावर स्थाईक झालेले कोंकणस्थ जसे कोंकणची आठवण आत. विसरून गेले, तसे वऱ्हाडातील कोंकणस्थ मुंबई इलाख्यांतील कोंकणस्थांशीं असलेले नातें लौकरच विसरतील यांत शंका नाही. कोकणातील कऱ्हाडे व सागरकडील कऱ्हाडे जसे अनेक कारणांमुळे एकमेकांस पारखे झाले, तद्वत् कोंकणस्थांतला हा प्रकार आपल्यासमोर घडत आहे

ज्ञातीच्या दृष्टीने सामाजिक हालचालीचे निरीक्षण केल्यास सर्वत्र वाताहत होत आहे हे येथवरच्या विचारसरणीने कोणाच्याहि लक्षात येण्याजोगे आहे. राजकारण व शिक्षण यांना रोजच्या रोज इतका जोर चढत आहे की, त्यांच्या माऱ्यापुढे ज्ञातीच्या व धर्माच्या कल्पनांना पाऊल मागे घेण्यावांचून गत्यतर राहिलें नाही. या कल्पनांना राजकीय कामात महत्त्व आणू पहाणाऱ्याचे प्रयत्न तर निष्फळ होतातच; पण उलट असा प्रयत्न करणारा मनुष्य लोकांच्या दृष्टीने मागसलेला ठरतो व त्याची लोकांना कींव येते. यावरून ज्ञाति व धर्म यांच्या विचारास प्राधान्य देण्याचे व त्या दृष्टीनें सामाजिक एकीकरण करण्याचे दिवस मागे पडले, याबद्दल सशय वाटण्याचे कारण नाही. तेव्हां धर्मदृष्ट्या समाजाची जुनी मांडणी मोडून टाकणाऱ्या या नव्या विचारसरणीनें केवळ विध्वंसक कामगिरी केली आहे की कांही विधायकही केली आहे हें पाहिलें पाहिजे. जुनी इमारत पाडून नव्या इमारतीचा भक्कम पाया रचला जात आहे असें दिसल्यास जुनी इमारत गेल्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाही. पण तसें होत नसल्यास जुनें गेल्याबद्दल हळहळ वाटणें योग्य ठरेल.

अशा मोकळ्या मनाने या प्रश्नाचा विचार केल्यास केवळ हळहळत बसण्याची वेळ आहे असे विचारांती कोणासहि म्हणतां येणार नाहीं. आजकालच्या

शिक्षणानें व राजकीय चळवळीने धार्मिक व ज्ञातिविषयक कल्पनांचें क्षेत्र संकुचित केलें व मागल्या पिढींत सुशिक्षित लोकांना मिळणारा पगार या पिढींत मिळण्याची शक्यता नाहींशी केली, या गोष्टी सर्वतोपरी खऱ्या आहेत, पण त्याबरोबर शिक्षणाच्या प्रसाराने सार्वजनिक कामाची आस्था उत्पन्न केली आणि दृष्टीला व्यापकपणा आणला हे कोणास नाकारता येईल? आणि या व्यापकपणामुळे लोकांच्या अगों एक प्रकारची निर्भय वृत्ति आली नाही असें कोण म्हणेल? पगार कमी मिळूं लागला यामुळे झालेले नुकसान वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्वरूपाचे व तात्पुरते आहे. आणि शिक्षणाच्या व राष्ट्रीय विचाराच्या फैलावाने आलेली व्यापक व निर्भय वृत्ति हजारों लोकाच्या अंतःकरणांत टिकाऊ असें चैतन्य भरीत आहे. जुन्या राजकीय कल्पना मागें पडून नव्या राष्ट्रीय कल्पना लोकांच्या मनांत बिंबू लागल्यामुळें देखील आमची दृष्टि निवळण्यास अत्यंत मदत झाली आहे. 'राजकीय घटनेंत धर्म किंवा ज्ञात यांच्या विचारास यत्किंचित् थारा मिळता कामा नये व असा थारा देऊं पहाणाऱ्या योजनेस आम्ही मान्यता देणार नाही' या म्हणण्यास आज जो मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे तो, शेकडो लोकांना राजकीय घटनेचे तात्त्विक स्वरूप ओळखतां येऊं लागले, याचेंच चिन्ह आहे. त्याचप्रमाणें इंग्रजी साम्राज्यवाद्यांच्या कोटिक्रमात कोठें चूक आहे हें आता लोकाना चांगलें समजू लागले. हिंदी राज्यघटनेत विशिष्ट धर्माच्या लोकाना सवलती देण्याचा विचार जसा चुकीचा, तसा इंग्लंडांत जन्मलेला शिपाई किंवा तेथें होणाऱ्या परीक्षात पास झालेला पदवीधर राज्ययंत्र चालाविण्यास अधिक योग्य आणि हिंदी मनुष्य कितीहि शूर व बुद्धिमान असला तरी त्याला त्याची बरोबरी करता येणार नाही, इत्यादि तत्वे चुकीच्या व मागसलेल्या राजनैतिक विचारसरणीचीं चिन्हें आहेत हें लोकाना ओळखतां येऊन या विचारसरणीचे समूळ उच्चाटन करण्याचा त्यांचा निश्चय बळावत आहे.

भावी काळांत कोणती विचारसरणी बळावणार आणि कोणती कमजोर होणार हें सांगितल्यावर चांगल्या प्रवृत्तीस अधिक जोर चढण्यास आणि वाईट प्रवृत्तीना अधिक पायबंद बसण्यास काय केलें पाहिजे याचाहि विचार करणें ओघानेच प्राप्त होतें.

राष्ट्रीय कल्पनेचा व शिक्षणाचा प्रसार करण्याने समाजाच्या भावी इमारतीचा पाया भक्कम रीतीने रचला जातो हे मान्य केल्यानंतर धर्म व ज्ञात यांची व्यवस्था कशी लावावी हें पाहिलें पाहिजे. गेल्या पन्नास वर्षांत या दिशेनें झालेले प्रयत्न लक्षांत घेतले असतां लोकांची धर्मभावना दुखविणारे प्रश्न हातीं घेणाऱ्याकडून फायद्यापेक्षां नुकसानच अधिक झालें आहे असे म्हणावें लागेल. राष्ट्रीय विचाराचा मुख्य विषय म्हणजे राजकारण; व यांत लोकांचे अधिक लक्ष कसें लागेल

हें पाहिलें पाहिजे. ज्ञात व जात यांचा विचार फक्त रोटीबेटीव्यवहार आणि पारलौकिक कल्पना यांच्यापुरता व्हावा आणि इतर सर्व सार्वजनिक व्यवहारांत यासंबंधीच्या विचारांना अवसर मिळू नये ही गोष्ट आपोआप घडत आहे; त्यासाठीं मुद्दाम प्रयत्न करण्याचें कारणच नाही.

आतां हे शिक्षण देण्याचे काम शिक्षणसंस्थांकडून होत आहे त्यापेक्षां, मोठ्या प्रमाणांत वर्तमानपत्रादिकांकडून होत आहे. लोकांना व्यापक दृष्टि प्राप्त होण्यास जगांतील घडामोडीचे वर्तमान रोजच्यारोज लोकांच्यापुढें येण्यानें मदत होत आहे. पण व्यापकपणाबरोबर दृष्टीला मार्मिकपणा आला पाहिजे. तो नुसत्या तारांची भाषांतरें छापण्यानें येणें कठिण दिसतें. तथापि वर्तमानपत्राची संख्या वाढली म्हणजे त्यांत निवड करण्याचा अधिकार वाचकाकडेच येतो. यामुळे लोकस्थितीचा बारकाईनें विचार करून सार्वजनिक हितास मदत करणारे वर्तमानपत्र कोणतें आणि केवळ तारा आणि मनोरंजन यांवर जगू पहाणारें वर्तमानपत्र कोणते याचा विवेक वाचकात उत्पन्न होईलच.

शिक्षणप्रसाराची व राष्ट्रीकरणाची ही जबाबदारी अर्थातच मुख्यत्वेंकरून सुशिक्षितांवर पडणार आहे यात जातीच्या व धर्माच्या विचारांस प्राधान्य देता येणार नाही; पण जात व धर्म याचे उच्चाटनहि होऊं शकणार नाहीं व तसे उच्चाटन करण्याचा प्रयत्न करणेंहि श्रेयस्कर नाही हे मागे सांगितलें याकरितां ज्या जातीच्या लोकात शिक्षणाचा प्रसार अधिक झाला आहे त्या जातीने म्हणजे ब्राह्मणवर्गाने हे काम केले पाहिजे.

राजाश्रय व लोकाश्रय या दोनच व्यापक कल्पना सध्यां दृष्टीपुढे असल्यामुळें राजभाषा व लोकभाषा या दोहींचा आश्रय करून सद्यःस्थितीचे आकलन करण्याचे सामर्थ्य लोकांच्या ठिकाणी आणण्यासाठी ब्राह्मणवर्गाला आपलें बुद्धिसर्वस्व वेंचावें लागेल. हे काम मनाजोगे करता येण्यास राजकीय विभाग लोकभाषेच्या अनुरोधानें पाडता आले तर सोईचें होईल. त्या योगाने 'मराठी बोलणाऱ्या लोकांचा महाराष्ट्रदेश' ही व्याख्या अनुरूप ठरेल. पण आज तरी ही गोष्ट प्रत्यक्ष सृष्टीत आढळत नसल्यामुळे आपल्या कल्पनेतला महाराष्ट्र सध्यां तिभगलेला आहे हे ध्यानांत ठेवून, या तीन पोटभागांचा विचार स्वतंत्रपणें करावा लागेल. त्यांचा पूर्वेतिहासहि एकसारखा नसल्यामुळें त्यांच्या विचारसरणीत बरेंच अंतर पडतें. मोंगलाईतला मराठवाडा गेली सहाशे वर्षे एकसारखा मुसलमानी राजांच्या अमलाखालीं आहे व मराठेशाही व इंग्रजी अमदानी याचा प्रत्यक्ष अनुभव तेथील लोकांना नाही. वऱ्हाडातील मराठवाड्याला स्वराज्याचा थोडाबहुत अनुभव होता; पण त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की, तेथील लोकांना

इंग्रजी रियासतीचें ज्ञान अनुभवजन्य आहे व जनतेला लोकशाहीची कल्पना समजावून देण्यासाठी तेथील पुढाऱ्यानीं अलीकड कसून खटपट केली आहे. मुंबई इलाख्यांतील मराठवाड्याला स्वराज्याचा अनुभव अथपासून इतिपर्यंत होता आणि इंग्रजी अमदानीत देखील प्रतिभासंपन्न पुढारी या भागांत निपजले व त्यांचे लेख लोकांना वाचण्यास मिळाले पण पुढारी व गावोगांवचे लोक यांच्या भेटीगांठी वारंवार होण्याने विचारसरणीत जी एकवाक्यता होत जाते, ती येथील जनतेंत झालेली नाही. शहरांतील लोकाना वर्तमानपत्रद्वारा सद्यःस्थितीची कल्पना आलेली आहे पण खेड्यांपाड्यांतील लोकांनी पुढारी पाहिलेहि नाहीत आणि वर्तमानपत्रें काय म्हणतात याचीहि कल्पना त्यांना नाही. तात्पर्य, लोकशाहीच्या दृष्टीनें महाराष्ट्राचे तीनहि पोटविभाग अथवा मराठवाडे निरनिराळ्या पातळीवर उभे आहेत. त्यांपैकी मुंबई इलाख्यांतील मराठवाड्याची जनता व त्यांतील ब्राह्मणवर्ग याची आंकडेवारीनें मांडणी पुढे दिल्याप्रमाणें करतां येईल.

## मुंबई इलाख्यांतील मराठवाडा

| जिल्हे | क्षेत्रफळ | गावें | घरे | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| रत्नागिरी | ३९८९ | १३११ | २५८८०८ | १३०२५२७ |
| कुलाबा | २१६६ | १४७६ | १३२३२५ | ६२८७२१ |
| ठाणे | ३५७६ | १६४७ | २०९२९० | १०१६,४९ |
| कोंकण | ९७३१ | ४४३४ | ६००४२३ | २९४७३९७ |

### देश

| जिल्हे | क्षेत्रफळ | गावें | घरे | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| पुणे | ५३३२ | ११४४ | २४५९३८ | ११६९७९८ |
| सातारा | ५०५३ | १३४१ | २५८८६२ | ११७९७१२ |
| खानदेश | १०९५२ | २९८३ | ३७८२६६ | ११७७८२९ |
| नाशिक | ५८२२ | १६४६ | १९५८३२ | १०००४८ |
| नगर | ६६११ | १३५७ | २०१'१९५ | ९८८२०६ |
| सोलापूर | ४५६९ | ७१७ | १७२२३९ | ८७७५२० |
| देश | ३८३९९ | ९१८८ | १४५२७३२ | ७१९३११३ |
| एकूण | ४८१३० | १३६२२ | २०५३१५५ | १०१४०५१० |

धर्माश्रय व राजाश्रय यांचा अनुभव घेतल्यानंतर ब्राह्मणवर्ग आतां लोकशिक्षणाचीं व लोकसत्तेची महती ओळखूं लागला आहे. त्याचप्रमाणें इतर वर्गदेखील आम्ही अमुक ज्ञातीचें किंवा धर्माचे म्हणून आम्हांस विशेष सवलती किंवा विशेष राजाश्रय मिळावा असें प्रतिपादीत आहेत. पण या आश्रयाच्या मर्यादित

स्वरूपाचा अनुभव घेतल्यानंतर त्यांनाही लोकशाहीचें महत्त्व पटल्यावांचून राहाणार नाही. तोंपर्यंत राजकीय घटनेत किंवा राजकीय व्यवस्थेत धर्म किंवा ज्ञात यांना सवलती देण्याच्या कल्पनेस थारा असूं नये; आणि प्रतिनिधीची निवड केवळ योग्यता व सार्वजनिक कार्याची आस्था यांकडेच लक्ष पुरवून झाली पाहिजे, इत्यादि तत्त्वांची शिकवण मुंबई इलाख्यांतील मराठवाड्यांतल्या लोकांना देत राहणें जरूर आहे.

तथापि या प्रश्नाचा विचार केवळ राष्ट्रीय व ऐतिहासिक दृष्टीनें कितीहि केला तरी सामान्य लोकांना तो आज तितका मार्गदर्शक ठरणार नाहीं. " फार पूर्वीं आपल्या देशांत अनेक राज्ये नादत असलों तरी त्या वेळचे राजे एका धर्माचे होते, त्यामुळे समाजाची मांडणी धर्मतत्त्वावर करण्यास अडचण वाटली नाहीं. पण परदेशी व परधर्मीं लोकांच्या हाती या देशचे राज्ययंत्र गेल्यामुळें समाजाची धार्मिक घडी बिघडली व राजकर्त्यांशी धर्म अगर देश यांचें नातें लागू पडेनासे झाले " येथपर्यंतचा इतिहास सर्वांना मान्य आहे त्याचप्रमाणें येथील अधिकारीवर्गाची निवड देश व धर्म याविषयीच्या पक्षपाती भावनेनें न होतां केवळ पात्रतेच्या कसोटीने करण्यात यावी हे ध्येयहि सर्वसंमत होण्याजोगे आहे. पण इतिहास व ध्येय यांच्या निश्चितीने आजचा सामान्य लोकांचा प्रश्न सुटत नाही; त्याचा विचार स्वतंत्रपणेंच केला पाहिजे. त्यात धर्म व राज्य याची जी बंधने प्रत्यक्ष व्यवहारांत आज शिल्लक आहेत ती जमेस धरून हा प्रश्न सोडविला पाहिजे. पैकी आपल्या समाजात जात किंवा ज्ञात याविषयीचे निर्बंध पाळले जातात त्या-अर्थीं जात हा गट धरून लौकिक व्यवहार कोणीकडे झुकेल हे पाहण्यास हरकत नाही. हे मान्य केल्यास सामान्य लोकाचा आयुष्यक्रम अजमावण्यास या पुस्त-कांतली पराजपे घराण्यांतील मंडळी उदाहरणादाखल उपयोगी पडतील

पृ. १९६ वर दिलेलें धंदेवारीचे कोष्टक लक्षांत घेतलें असता शेती व ब्रह्मकर्म करणारे स्थाईक लोक सोडले असता बाकीचे १४ आणे म्हणजे ७/८ परांजपे उपरी स्वरूपाच्या धंद्यात पोट भरतात; आणि हे धंदे शिक्षणाच्या आधारावर शहरांत राहून ते चालवितात पैकी उच्च शिक्षणाने करतां येणारें धंदे–सरकारी नोकऱ्या, वकिली, डॉक्टरी, इंजिनियरी वगैरे–इतर ज्ञातींच्या हातीं जाऊ लागल्यामुळे हे शिक्षण संपादन करण्याची धडपड ब्राह्मणवर्गांत दिवसें-दिवस कमी होईल. उच्च शिक्षण फार खर्चाचें होत चाललें हेंहि कारण या प्रवृत्तीस मदतच करणारे आहे. यामुळें पृ. १९६ वरील सुशिक्षितांचें इंग्रजी धंदे सरकारी व निमसरकारी नोकऱ्या आणि रेल्वे या सदरांतले आंकडे कांहीं वर्षांनीं कमी होणार आणि खाजगी नोकरी, स्वतंत्र धंदे व व्यापार यांतील

प्रमाण वाढणार असें म्हणण्यास हरकत नाही. कोंकणस्थांची देशावरली बहुतेक वस्ती शहरांत आहे. यामुळे प्रथम शहरांत करतां येणारे धंदे यांना पत्करणें पुरवत आहे. खाजगी शिक्षण वर्तमानपत्रें, भुसार माल, स्टेशनरी व कापड यांची दुकानदारी, शिंपीकाम, खानावळ, हाटेल चालविणें किंवा तेथें कपबशा धुणें, मोटारी व टांगे हाकणें,छापखान्यात खिळे जुळविणें वगैरे शहराऊ धंद्यांत ते शिरलेले दिसत आहेत. पण लौकरच मोठमोठ्या शहरातील या धंद्यांत पोट भरण्याचा वाव संपून जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या गांवांत यांना जाणे भाग पडेल. हे स्थलांतर करतांना त्यांना आपले नातें कोठे लागू शकेल हा विचार करावाच लागेल. आणि या विचारांत राजभाषा किंवा ज्ञातिसंबंध यांच्यापेक्षां लोकभाषेचेंच नातें अधिक उपयोगी पडेल. खासगी शिक्षण, दुकान, खानावळ वगैरेसारखा कोणताहि उपरी धंदा करताना तेथील लोकांची व तेथें नव्यानेच धंदा मांडणाऱ्या धंदेवाइकांची भाषा एकसारखी असणें सोईचें असतें. तात्पर्य, लोकाश्रयावर चालणारे व्यवहार लोकभाषेच्या नात्यावर एकमेकांशी संबद्ध असणें स्वाभाविक आहे. सामाजिक व्यवहाराची आर्थिक बाबतीतली वाढती गुतागुंत लक्षांत घेतली, असतां देखील भाषावारीनें हिंदुस्थानचे विभाग ध्यानांत ठेवणेच श्रेयस्कर ठरेल. तात्पर्य, शिक्षणांत पुढारलेल्या ब्राह्मणवर्गाला सरकारी नोकरी व शहराऊ धंदे यांत ज्याअर्थी पोट भरण्यास कमी अवसर राहणार आहे, त्याअर्थी त्यांनीं "मराठी भाषा बोलणारा समाज हा आपला, व या समाजाशीं समरस होऊन त्याच्या उन्नतीवर आपली उन्नति व त्याच्या अवनतीवर आपली अवनति अवलंबून आहे" हे तत्त्व ओळखणें अवश्य आहे. यापूर्वी ब्राह्मणवर्गानें राजभाषेची आराधना करण्यांत जें बुद्धिसर्वस्व खर्चले ते यापुढे 'महाराष्ट्र' ही कल्पना दृश्यसृष्टींत आणण्यासाठी खर्चावें लागेल.

परांजपे घराण्यातील सुशिक्षित लोकांची व त्यांतील पुढाऱ्यांची जी माहिती या पुस्तकांत समाविष्ट झाली आहे, तिच्या अनुरोधानें सुचणारे विचार येथवर सांगितले. आतां आणखी एकदोन मुद्दे उल्लेखून लेखणी खाली ठेवू.

'कोंकणस्थ' हा शब्द सध्यां विशेष रूढ असल्यामुळें, तो येथें योजला आहे. पण या शब्दाचा प्रचार पेशवाईपूर्वी फारसा नव्हता, व चित्पावन हा शब्द त्या वेळी कोंकणांत रूढ असावा असें वाटते. कऱ्हाडे ब्राह्मणांचा उल्लेख मुसलमानी अमदानीपूर्वीपासून सांपडतो. आणि 'देशस्थ' शब्द शिवशाहींतल्या एका ज्योतिष्यानें इ.स.१५७५ च्या सुमारास योजलेला आढळतो. पण 'चित्पावन' हा शब्द कधींपासून प्रचारांत आहे व त्याची व्युत्पत्ति काय तें समजत नाहीं. सह्याद्रिखंडांत या ज्ञातीचे उल्लेख आहेत. पण सह्याद्रिखंडांत व भविष्योत्तर पुराणांत वेळोवेळीं

इतकी भर पडली आहे कीं, त्यांतला जुना पाठ कोणता आणि नवा कोणता हें ठरविणें कठिण आहे. पहिल्या बाजीरावाच्या वेळीं 'कोंकणस्थ' व 'चिपळुणे' हे दोनहि शब्द आढळतात. आणि कोंकणस्थ हे मूळचे चिपळूणच्या आसपास समुद्रापर्यंतच्या पट्टींत राहणारे ब्राह्मण या अर्थानें 'चिपळुणे' व 'चित्पावन' हे शब्द प्रचारांत असावे असें दिसतें.

परांजपे मंडळींच्या नांवांत कालमानानें कसा फरक पडत गेला आहे हें पाहण्याचें साधन या पुस्तकांत आहे. प. घ. इ. पृ. २०५–७ वर दिलेल्या यादीवरून शंभर सवाशें वर्षापूर्वी अडिवऱ्यांत राहणाऱ्या मंडळींत अंतो, नारो, विष्णु, बाबदेव आणि रामचंद्र या नांवाचा प्रचार जास्त असून गणेश, मादो, विसो आणि बाळ हीं नावें संख्येच्या मानानें त्यांच्या खाली होती. परंतु विद्यमान व्यक्तीच्या सूचीतली १५९२ व्यक्तींची यादी पाहिल्यास त्यात १४१ नावें आढळतात. त्यापैकीं बहुसंख्य अशा पहिल्या १० नांवाची मांडणी अशी करतां येईल–

| | | | |
|---|---|---|---|
| दत्तात्रेय | ७४ | महादेव | ४१ |
| रामचंद्र | ६२ | कृष्ण | ४० |
| विष्णु | ६० | शंकर | ४० |
| नारायण | ४८ | वामन | ३७ |
| विनायक | ४५ | वासुदेव | ३७ |
| गोविंद | ४२ | एकूण | ५०६ |

कोकण सोडून पराजपे मंडळी देशावर आल्यापासून त्यांच्या जुन्या देवतांत नव्या देवताच्या नांवाची भर पडली हे अन्यत्र सांगितलेंच आहे (प.घ.इ. पृ. ३०५); तोच प्रकार व्यक्तीच्या नावाच्या बाबतींत झाला. देशावर आल्यापासून सभोंवारचें वातावरण व स्थानिक देवता यांची छाप मनावर बसल्यामुळें व्यक्तींची जुनीं नांवें मागें पडून नवीं प्रचारांत आली

कोंकणस्थांत बहुसंख्य आडनावें कोणती याचाहि विचार करतां येण्याजोगा आहे. कोकणस्थाची चोदा गोत्रे व त्यांचे सात गट आहेत. कोंकणस्थांतील विवाहविषयक निबंधामुळें एका गटांतील मुलाचें लग्न त्याच गटांतील मुलीशीं न होतां निराळया गटांतील मुलीशींच झालें पाहिजे ही अट पाळली जाते. यामुळें कोणत्याहि घराण्याचे शरीरसंबंध इतर कोणकोणत्या गटांशीं झाले हे सहज शोधतां येतें. पितृतर्पणांतील नांवें व युनिव्हर्सिटीतील पदवीधरांच्या याद्या या दृष्टीनें उपयुक्त ठरतात. रा.मुकुंद नारायण परांजपे (जबलपूर) यांनीं परिश्रमपूर्वक दिलेल्या माहितीवरून असें दिसून आलें कीं, त्यांच्या घराण्याचा शरीरसंबंध इतर पांच गटांतील गोत्रांशीं झालेला आहे. वत्स व जामदग्न्य गोत्रांच्या गटाशीं मात्र त्यांचा संबंध

झालेला दिसत नाहीं. सवाशें वर्षांपूर्वी रास्त्यांनी वाई येथे अग्रहारदानासाठी निवडलेल्या कोकणस्थ ब्राह्मणांत देखील इतर सहा गटांतले ब्राह्मण असून याच गटांतलीं गोत्रे त्यांत नाहीत. (श्रीक्षेत्र वाई वर्णन, पृ. ५० पहा.) इंग्रजी पदवीधरांच्या यादींत देखील याच गोत्रांचीं आडनांवे अल्पसंख्य आहेत. यावरून तेव्हांपासून या गोत्रांतील लोकांची संख्याच कमी असली पाहिजे असें म्हणतां येतें. त्याचप्रमाणें वासिष्ठ, कौशिक, शांडिल्य, व काश्यप गोत्राचे लोक पुष्कळ आहेत असें दिसतें. तेव्हां लोकसंख्येची वाढ कमी अधिक होण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत होत व देशांतराचे परिणाम काय होतात, इत्यादि बाबतीतले नियम शोधून काढण्यास या दिशेनें अवसर आहे.

---

# २२

## स्वराज्याची अखंड आकांक्षा

महाराष्ट्राचे पाऊल पुढें पडत आहे कीं त्याची पिछेहाट होत आहे, हा प्रश्न अनेक वेळां चर्चेस निघतो; तेव्हां चर्चेचा रोख स्वराज्याच्या काळांत मराठ्यांच्या हातून झालेल्या पराक्रमांच्या मानाने 'आजच्या घडामोडीत महाराष्ट्रातील जनता आपली जबाबदारी ओळखून वागत आहे किंवा नाही?' या प्रश्नाचें उत्तर शोधून काढण्यावर असतो

वस्तुतः ही तुलना करण्याच्या कामी अनेक अडचणी आहेत. अडीचशें वर्षांपूर्वी स्वराज्यांत असलेला लोकसमाज ज्या प्रदेशांत होता त्याची व्याप्ति व आज मराठी भाषा बोलणारा महाराष्ट्रीय समाज ज्या प्रदेशांत राहतो त्याची भौगोलिक व्याप्ति निरनिराळी आहे. त्याचप्रमाणें त्या वेळच्या मराठ्यांच्या आकांक्षा व आजच्या आकांक्षा यांच्या स्वरूपांत मोठें अंतर पडलें असून परिस्थितीहि निराळी आहे. तथापि कालमानामुळें कितीहि फरक पडला तरी आंब्याच्या झाडास जसे केव्हांही आंबेच येतात व दहा वर्षांपूर्वीचे आंबे व आजचे आंबे यांची तुलना करणें शक्य असतें, त्याप्रमाणें 'महाराष्ट्रीय समाज'

जर अेकजिनसी असेल व त्याचें सातत्य गेल्या दोन–तीन शतकांत कायम असेल, तर स्वराज्यकालीन महाराष्ट्र व आजचा महाराष्ट्र यांची तुलना करण्यास अडचण पडण्याचे कारण नाही. मात्र ही तुलना विशिष्ट मुद्दा दृष्टीपुढें ठेअून तेवढ्यापुरती करावी व अप्रस्तुत मुद्दे मध्यें येऊं देऊं नयेत; तरच ती अुपयुक्त होअील. नाहीतर मराठ्यांचे पराक्रम लक्षांत घेतांना त्याचे दोषहि सांगितलेच पाहिजेत आणि त्यांनीं स्वराज्य चालविलें हें सांगतांना त्यांनी तें कोणत्या अवगुणामुळे घालविले याचेहि सविस्तर विवेचन केलें पाहिजे; तरच ते खरें अैतिहासिक विवेचन अशी जी आज कित्येकांची समजूत दिसते, ती मान्य केल्यास कांहीच निष्पन्न होणार नाही. मराठ्यांच्या स्वभावांत कांहीं गुण आहेत तर कांही दोष आहेत अेवढेंच ज्या विवेचनांतून तात्पर्य निघतें ती विवेचन पद्धतीच निष्फळ म्हटली पाहिजे. त्यापेक्षां जी स्वराज्याची आकाक्षा महाराष्ट्रीय समाजात कमी अधिक मानाने गेल्या अडीचशें वर्षांत अखंड राहिली आहे त्या आकांक्षेच्या पूर्ततेसाठी या समाजातील पुढाऱ्यांनी व जनतेनें पूर्वीं काय प्रयत्न केले ते पाहणें व आज काय करीत आहेत यांचे दिग्दर्शन करणें अधिक अुपयुक्त होण्याजोगे आहे.

## शिवाजी महाराजांची अलौकिक कल्पना

या ठिकाणी महाराष्ट्रातील जनता व पुढारी असा जो भेद केला, त्याची फोड करणे अवश्य दिसते. जनतेची म्हणजे समाजातील बहुतेक लोक समूहाची सर्वसाधारण योग्यता अेकाअेकी कमी अधिक होणे शक्य नसते. स्वराज्यांत ही जनता अनेक पराक्रम गाजविताना आढळेल तर स्वराज्य जातांच ती कांहीं काळ पराक्रमशून्य झालेली दिसेल. याचा अर्थ या जनतेची योग्यता स्वराज्याच्या वेळी मोठी होती व ती मागाहून अेकाअेकी कमी झाली असा करावयाचा नाही. संकट फार मोठे व त्यातून वाट काढू शकणाऱ्या पुढाऱ्यांचा अभाव असा योग जुळून आला म्हणजे समाजाची बुद्धि कांही काळ कुंठित होते. पण समाजाच्या बद्धमूल आकांक्षा कायमच्या नष्ट होऊं शकत नाहींत. तात्पर्य जनता, पुढारी व परिस्थिति या त्रयीच्या योगावर जनतेची विशिष्ट वेळची कर्तबगारी अवलंबून असते, हें नेहमी लक्षांत ठेवले पाहिजे.

या दृष्टीने महाराष्ट्रातील जनतेच्या राजकीय आकांक्षेंत व वृत्तींत स्वराज्याच्या काळात कोणता फरक पडला याचा विचार करण्याजोगा आहे. स्वराज्य स्थापले जाण्यापूर्वी मुसलमानी अमदानींत कित्येक मराठे सरदारांनी पराक्रम गाजविले हें खरे पण त्यात त्याचा हेतु स्वतःच्या कुटुंबास कांही वतन मिळावावें व आपलें महत्त्व वाढवावें या पलीकडे कांहीं अुच्च प्रकारचा होता असें म्हणतां येत नाहीं. स्वराज्याच्या स्थापनेमुळें, मराठ्यांनी ज्यासाठीं आपलेपणानें झटावें,

असें नवें केंद्र निर्माण झालें. अितरत्र यवनी राज्य आहे पण शिवाजी महाराजांनी स्थापलेलें हें ' मऱ्हाष्ठ राज्य आहे ' त्याअर्थी ' वतनाची किंवा अितर कोणतीहि स्वार्थी आशा न धरता देखील या राज्यासाठी प्राणार्पण करण्यास आपण तयार असलें पाहिजे ' असे जे अुच्च विचार जेधे वगैरे मडळींना सुचले त्याचें श्रेय, स्वतंत्र राज्य स्थापण्याचें जे ध्येय शिवाजी महाराजांनी दृष्टीपुढें ठेवले त्यास दिलें पाहिजें. हें ध्येय त्यानी निश्चित केले यांतच त्यांचे अलौकिकत्व होतें. शहाजी देखील पराक्रमी होता व मानी स्वभावाचा होता. पण स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याचा प्रयत्न आपण करावा असें त्यास वाटले नाही. आदिलशाहीत अगर मोंगलाअींत त्यावेळी अनेक फौजबंद सरदार होते, पण त्यापैकी कोणालाहि ही स्वतंत्र राज्य स्थापण्याची कल्पना सुचली नाही. अेवढेच नव्हे तर अशा राज्याची स्थापना झाल्यावर देखील आपण शिवशाहीत जाअून मिळावें अगर आपणहि असा निराळा प्रयत्न करावा असा धीर त्याना वाटला नाहीं. यावरून स्वतंत्र राज्य स्थापण्याची शिवाजी महाराजाची कल्पना किती असामान्य होती हे सहज दिसून येणार आहे. तात्पर्य, ' महाराष्ट्रीय समाज स्वराज्यासाठी आतुर झाला होता व तें प्रस्थापित होतांच सर्व मराठे त्याच्या झेड्याभोवती जमा झाले ' असें म्हणण्यास मुळीच आधार नाही. पण स्वराज्य निर्माण झाल्यानंतर त्यात काम करण्यास ज्यांना अवसर सापडला त्यांना स्वराज्य टिकविण्याचीहि कामगिरी करतां आली. आणि कुतुबशाही अगर आदिलशाही सरदाराना मात्र ती करता आली नाही. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबासारखा जबरदस्त शत्रु दक्षिणेंतील राज्यें बुडविण्यासाठी चालून आला; तेव्हां आदिलशाही व कुतुबशाही त्याला बुडवितां आली, पण मराठ्याचें राज्य त्याला नष्ट करतां आलें नाही; याचें कारण मराठी राज्यात वावरणाऱ्या सरदाराच्या अंतःकरणांत आपलेपणाच्या भावनेमुळें जे आवेशाचे वारे सळसळत होते ते आदिलशाही व कुतुबशाही यांमधील सरदारात नव्हते शिवाय औरंगजेब हा कडवा मुसलमान असल्यामुळें त्याचा जय होऊं देण्यांत आपणावर धार्मिक सकट ओढवणार आहे, असें मराठी राज्यांत त्या सरदारांना वाटत होते, तसें दक्षिणतील यावनी राज्यातल्या मुसलमान सरदारांना वाटण्याचें कारण नव्हतें. याचा अर्थ असा होता की, राजकीय दृष्टया दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांना औरंगजेब हा शत्रु वाटत होता, तरी धार्मिक दृष्टया त्याना तो तसा वाटत नव्हता. यामुळें धार्मिक कर्तव्य व राजकीय कर्तव्य यांत विरोध निर्माण होअून मुसलमानी सरदार किंकर्तव्यता मूढ झाले. पण स्वराज्यातल्या मराठ्याना औरंगजेबाशी लढतांना धार्मिक व राजकीय कर्तव्यांचा मेळ घालता येण्याजोगा असल्यामुळे निर्धारानें शत्रूशीं झगडून त्याला जेरीस आणण्याची कामगिरी यशस्वी रीतीने पार पाडतां आली.

## धर्मरक्षणाचें सूत्र

स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या कल्पनेचें श्रेय सर्वस्वी शिवाजी महाराजांस होतें व त्याच्या हयातीत त्यांच्या आज्ञेनुसार वागण्याऱ्या 'स्वामिनिष्ठ' अधिकाऱ्याच्या हातून स्वराज्य स्थापनेच्या कामास मदत होऊं शकली. त्याचप्रमाणे काशीचें देवालय पाडून मशीद बांधण्यांत आली, तेव्हां 'मोंगल बादशहा विरुद्ध लढणे म्हणजेच धर्म रक्षणार्थ लढणें' हें जें सूत्र शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीच्या शेवटी सांगून ठेवले ते पुढे औरंगजेब मरेपर्यंत मराठ्यांना अुपयोगी पडलें. कारण संभाजीच्या वधानंतर मराठी राज्याचा मालक राजाराम हा जिवंत होता, तरी त्याच्याशी स्वामिनिष्ठ राहाण्याने म्हणजे त्याने सोडलेले हुकूम पाळण्यानें स्वराज्य टिकले नसते. राजाराम जिंजीस जाअून वेढ्यांत सापडला व औरंगजेब स्वराज्यांतला प्रदेश हस्तगत करूं लागला, तेव्हा 'राजनिष्ठे' अैवजी 'राज्यनिष्ठा' ही नवी भावना मराठ्यांच्या अंत:करणांत अुदीत झाली.

## स्वराज्य रक्षणासाठीं साम्राज्य

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापले, तेव्हा राजकीय स्वातंत्र्याचा हेतु त्याच्यापुढे प्रामुख्याने होता. परंतु औरंगजेबाचा साम्राज्य तृष्णा व त्याचा कडवा धर्माभिमान याची झळ दक्षिणेंत पोचू लागली, तेव्हां स्वराज्य टिकवावयाचे तर त्यास साम्राज्याचे स्वरूप देणें अवश्य आहे हे स्वराज्यांतील पुढाऱ्यांच्या लक्षात आलें. दक्षिणेंतील मुसलमानी राज्ये साफ बुडवून, अेक प्रबळ मुसलमानी साम्राज्य अखिल हिंदुस्थानावर प्रस्थापित करण्याचा, दिल्लीपति या न्यायानें, औरंजेबाने जो प्रयत्न केला त्यानें हिंदुस्थानच्या राजकीय कल्पनांत फार मोठें स्थित्यंतर घडवून आणले. 'दक्षिणेत अेक मराठ्याचा राजा व दोन मुसलमानी राजे होते व या तीन राजांनी मिळून औरंगजेबाच्या साम्राज्य सत्तेशी झगडावें' अशी राजकीय कल्पना शिवाजी महाराजाच्या अंतकाली रूढ होती. व पुढें विजापूर व गोवळकोंडा येथील राज्यें औरंगजेबाने बुडविली व त्याच्या पुनरुद्धाराकरितां कोणीच पुढें येईना. तेव्हा दक्षिणेतील मुसलमानी राजे किंवा तेथील प्रमुख मुत्सद्दी यांनी निरुपाय म्हणून किंवा सधर्मीय म्हणून, उत्तरेकडील मुसलमानांचे आधिपत्य मान्य केलें व त्याच्यांत ते मिसळून गेले शेवटी मुसलमान अेक होअून 'मुसलमान विरुद्ध हिंदु' असे झगड्यास स्वरूप आले; अेवढेच नव्हे तर हिंदूंचें स्वतंत्र असें दुसरें राज्य अस्तित्वांत नसल्यामुळें औरंगजेबाशी लढण्याचे काम केवळ मराठ्यांच्या अंगावर पडले. तेव्हां आपल्या कार्याचा व्याप स्वराज्याच्या सीमेपुरता किंवा दक्षिणेपुरता न ठेवतां औरंगजेबास पायबद देण्यासाठी माळव्या पर्यंतच्या स्वाऱ्या करण्याची अवश्यकता मराठ्यांना भासली. तात्पर्य, औरंगजेबाशी झगड-

तांना मराठ्यांना आपलें राज्य जिवंत ठेवण्यास अत्यंत कष्ट पडले हें खरे असलें, तरी यावेळी वर सांगितलेले महत्त्वाचें राजकीय तत्त्व मराठ्यांच्या लक्षांत आलें. कडवा मुसलमान सम्राट दिल्लीचा अधिपती असल्यानें हिंदुस्थानवर राजकीय व धार्मिक दृष्टीने जी आपत्ति ओढवते असें अनुभवानें ठरलें, ती न ओढवण्यासाठी हिंदु धर्माभिमानी अशा प्रबळ सत्ताधिकाऱ्यांच्या हातांत दिल्लीची सूत्रे असणें अवश्य आहे ही कल्पना राजारामाच्या कारकीर्दींत दिलेल्या सनदांतून 'दिल्ली-पर्यंत आक्रमण करील त्यास अमूक सरंजाम देण्यांत येअील' वगैरे शब्दांत प्रथम सूत्ररूपानें ग्रथित झालेली आढळते. तथापि त्यावेळी ही कल्पना व्यवहार्य ठरली नाही; आणि औरंगजेबाच्या मृत्यूनतर दिल्लीच्या तख्तासाठी भांडणें सुरू झालीं व मराठी राज्यांतहि यादवी माजली यामुळे व्यापक राजकीय तत्त्वाकडे दृष्टि देण्यास कांही काळपर्यंत कोणासच फावले नाही.

## निजामानें अुपस्थित केलेला प्रश्न

निजामुल्मुकाच्या दक्षिणेंतील आगमनानें व्यापक राजकारणाचा तात्त्विक प्रश्न पुनः अुपस्थित झाला हा निजाम दिल्लीपतीचा सुभेदार म्हणजे अंकित म्हणवीत होता, तरी त्याची महत्त्वाकांक्षा मोठी होती. औरंगजेबाच्या कारकीर्दींत त्याने दक्षिणेंतील परिस्थिति बारकाअीनें पाहिली होती, आणि मराठ्यांचें राज्य बुडवि-ण्याचें जे कार्य औरंगजेबास पार पाडता आले नाही, तें आपण पार पाडावें अशी त्याची मनापासून अिच्छा होती. दक्षिणेंत राहून दिल्लीची सूत्रे आपल्या हातांत ठेवावी असाहि त्याचा डाव होता. तात्पर्य, दिल्लीपतीचें नामधारी अंकितत्व मान्य करून आपण हिंदुस्थानातील अत्यंत प्रबल असा सत्ताधारी बनावें असें निजामु-ल्मुल्काचे ध्येय होते. थोरल्या बाजीरावाची तात्त्विक भूमिका देखील जवळ जवळ हीच होती. औरंगजेबाच्या मृत्यूनतर दिल्लीचा बादशहा म्हणजे अेक बाहुलें होतें. पण दिल्लीची बादशाही कित्येक शतकें टिकल्यामुळे त्या बादशाहीच्या नांवाचा अुपयोग करीत आपलें महत्त्व वाढविणें व्यावहारिक दृष्ट्या फायद्याचें दिसत होतें. या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी निजामुल्मुल्क व बाजीराव हे दोघेहि पुढे सरसावले. त्यावेळीं दिल्लीदरबारात जसे पक्षोपपक्ष होते तसेच मराठ्यांच्या दरबारातहि होते. यामुळे औरंगजेबाच्या हयातीत राजकीय महत्त्वाकांक्षेस धार्मिक विचाराचा पाठिबा दोनहि पक्षास जितक्या प्रमाणांत मिळविण्याजोगा होता तितक्या प्रमाणांत निजामुल्मुल्क व बाजीराव यांच्या झगड्यांत मिळण्याचा संभव नव्हता. पण याचा अर्थ या झगड्यांत धार्मिक भावना मुळीच नव्हती असें म्हणणें मात्र चुकीचे आहे.

औरंगजेबासारखा कर्ता पुरुष बादशाहीवर नसल्यामुळें दिल्ली दरबारांतील मुसलमानांत यादवी माजली तेव्हां त्या गडबडींत आपले महत्त्व वाढविण्याची

कल्पना कित्येक रजपुतांना सुचली, अर्थात् त्यांना मराठ्यांचें लष्करी सहाय्य आपल्या बाजूस असावें असें वाटू लागलें. यामुळें रजपूत व मराठे यांनीं अेक विचारानें वागून म्हणजे हिंदूनीं हिंदूशी अेक होअून मुसलमानांशी झगडण्याची तयारी होअूं लागली, तेव्हां या युद्धाच्या मुळाशी धार्मिक हेतु आहे असे ठरणें क्रमप्राप्त झालें. सवाअी जयसिंग व बुंदेलखंडाचा छत्रसाल यांच्याशी बाजीरावाचा झालेला पत्रव्यवहार वाचला, म्हणजे त्या वेळच्या राजकारणांत हिंदु विरुद्ध मुसलमान ही भावना कांही प्रमाणांत दिसत होती- याविषयी शंका राहात नाही तथापि दिल्ली दरबारांतील कित्येक मुसलमान सरदार निजामास हाणून पाडण्याच्या खटपटींत होते व सवाअी जयसिंगाचें महत्त्व वाढलेले कित्येक रजपुताना खपत नव्हतें, यामुळे या वेळच्या राजकारणास 'हिंदुविरुद्ध मुसलमान,' हें सूत्र स्पष्टपणें लागू पडण्याजोगें नव्हतें.

## बाजीरावाचा नवा मंत्र

अशा प्रकारे राजकारणांत गोंधळ माजला असतां बाजीरावानें अेक नवा मंत्र सांगून विजिगीषु मराठ्यांच्या पराक्रमाला वाट दाखवून दिली. स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या शिवाजी महाराजांच्या ध्येयाने मराठ्यांच्या पराक्रमाला जसें आपलेंपणाचें केंद्र निर्माण केलें, त्याप्रमाणें 'मराठ्यांचे घोडे दिल्लीपर्यंत फिरूं लागल्यावांचून व दिल्लीचें राज्य मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आणल्या वांचून मराठी राज्याची अिति कर्तव्यता पुरी होणार नाही' हें ध्येय बाजीरावानें मनांत निश्चित केल्यापासून मराठी राज्यास साम्राज्याचें स्वरूप येत चाललें. 'बाजीरावाची ही कल्पना अफाट आहे, ती सिद्धीस जाणें कठिण, त्यांत बाजीरावास कर्जबाजारी मात्र व्हावे लागेल' वगैरे युक्तिवाद जवळच्या आस्थेवाअीक मुत्सद्यांनीं बाजीरावास सांगितला. पण राजकारणात कित्येक वेळां आर्थिक विचारापेक्षां आक्रमणाच्या कार्यक्रमास प्राधान्य देणें अिष्ट असते असें बाजीरावास वाटत असल्यामुळ, त्यानें दिल्लीपर्यंत पहिली स्वारी स्वतः नेअून दाखविली आणि मराठ्याच्या स्वाऱ्याना अडविण्याचा विडा अुचलून आलेल्या निजामुल्मुल्काचा भोपाळच्या युद्धांत पुरा पराभव करून पुढील दिल्लीकडील स्वाऱ्यांची वाट मोकळी करून ठेवली.

## मुसलमानांनीं घेतलेली परकीयांची मदत

अशा रीतीनें दक्षिणेंतील अगर अुत्तरेकडील मुसलमान सरदारांच्या अंगी मराठ्यांना अडविण्याचें सामर्थ्य नाही असें दिसून येताच परदेशांतून फौजबंद 'शहांना' दिल्लीस आणण्याची कल्पना कित्येक मुसलमानांनीं काढली. त्याप्रमाणें प्रथम नादिरशहा आणि नंतर अहमदशहा अबदाली यांना दिल्लीस पाचारण करण्यांत आलें. अर्थात् या परक्याच्या स्वाऱ्यांपासून दिल्लीची बादशाही राख-

ण्याची जबाबदारी मराठ्यांना पत्करावी लागली. ती पार पाडताना मराठे कर्जानें बेजार झाले, व पानिपत येथें त्यांचा मोठा पराभव झाला; तरी त्यांनी पुन: डोकें वर काढून माधरावांच्या करकीर्दीच्या अखेर दिल्लीच्या तक्तावर आपल्या तर्फेचा बादशाहा बसविला. आणि मध्यंतरी अनेक अडचणी आल्या तरी शेवटी महादजी शिंदे यांनी दिल्ली येथील सर्वसत्ता मराठ्यांच्या हातीं आणण्याचें काम पुरें केलें. अशा प्रकारें मराठ्यांचें राज्य नामशेष करूं पाहणारे औरंगजेब व निजामुल्मुल्क याच्याशी लढतांना शत्रूस पायबंद देण्यासाठीं मराठ्यांना प्रथम अुत्तरेकडे हल्ले करण्याची योजना सुचली आणि तिचेंच पर्यवसान दिल्लीची राज्यसूत्रें मराठ्यांनीं आपल्या हातीं घेण्यांत झाले

## पाश्चात्यांना पाचारण

तथापि हिंदुस्थानांतील मुसलमानानी अफगाणिस्थान व अिराण येथील आपल्या स्वधर्मीय शहांना हिंदुस्थानात बोलावून आपली बाजू सावरण्याचा जो प्रयत्न केला तो यशस्वी झाला नाही, तरी ते अेवढ्यावर थांबले नाहीत. त्यानी पाश्चात्यांच्या आश्रयाने जगण्याचा व मराठ्याचा पाडाव करण्याचा प्रयोग केला. अुत्तरेकडे अबदालीला बोलवण्याचा प्रयोग नजीबाने केला व त्याच्या साहाय्याने मराठ्यांचा यद्यपि अेक मोठा पराभव होअू शकला, तरी शेवटी मराठ्यानी दिल्ली आपल्या ताब्यांत आणली हें सांगितलेच आहे. अर्थात तेथे मुसलमानाचें राजकारण यशस्वी झालें नाही. पण दक्षिणेत प्रथम फरेंचाचे आणि नतर अिंग्रजांचें साहाय्य घेण्याचा प्रयोग निजामाने करून पाहिला. यामुळें निजाम व अिंग्रज अशा दोन शत्रूशीं अेकाच वेळी झगडण्याचा प्रसग मराठ्यांच्यावर आला. त्यांत निजामाशी बिघाड न करता किंबहुना त्याच्याशी व हृदराशी मैत्री ठेवून अिंग्रजी राज्याचें हिंदुस्थानांतून अुच्चाटण करण्याचा प्रयत्न नाना व महादजी यानी अि. स. १७८१ मध्यें केला. पण अिंग्रजांचा पाडाव झाल्यास मराठे फार प्रबल होतील हे भय निजामास असल्यामुळे तो अिंग्रजाविरुद्ध लढण्यास मनापासून तयार नव्हता आणि अिंग्रजानी प्रसंग ओळखून तहाचे बोलणें लावले. यामुळें अिंग्रज-मराठे युद्ध त्यावेळी तात्पुरतें थाबले. त्यानंतर अिंग्रजांनी निजामाशी तह केला, अर्थात् निजामाच्या मनात या तहाचा अुपयोग अिंग्रजांच्या मदतीने मराठ्यांचा पराभव करण्यासाठी करावा असें होते. परतु खडर्याच्या लढाअीत आयत्या वेळी मराठ्याच्या विरुद्ध निजामाच्या मदतीस जाण्याचे अिंग्रजांनी नाकारले व मराठ्यांच्या हातून निजामाचा पुन: अेकवार पराभव झाला.

तथापि या सुमारास महादजी शिंदे, नाना, अहिल्याबाअी, हरीपंत फडके वगैरे मराठी राज्यातले अनेक कर्ते पुरुष पाच सात वर्षांच्या अवधीत अेका मागून

अेक मरण पावले व मराठी राज्याचें चालकत्व रावबाजीच्या हातीं आलें. आणि वेलस्ली, अेल्फिन्स्टन यांच्यासारख्या असामान्य अिंग्रज लढवय्यांशीं झगडण्याचा प्रसंग बाजीरावावर आला. तेव्हां त्या प्रसंगांतून पार पडण्यास लागणारें कर्तृत्व बाजीरावाच्या अंगात नव्हते. आणि योग्य पुढाऱ्याच्या अभावी थोड्याबहुत झगड्यानंतर मराठे सरदारांनी पराभव कबूल केला

## पराभव झाला !

पण पराभव झाला म्हणून मराठ्याच्या अतःकरणांत बद्धमूल झालेली स्वराज्याची आकांक्षा कायमची नष्ट झाली असें म्हणणे योग्य नाही. पराभवानंतर योग्य पुढाऱ्यांची जोड मिळाली असता मराठे आपले ध्येय गांठण्यासाठी निकराचा प्रयत्न करतात हें राजारामापासून महादजीपर्यंतच्या काळात अनेक प्रसगी दिसून आले. तथापि अितर समाजाप्रमाणे स्वराज्यातला मराठा समाज व पुढारी यांच्यात परस्परावलबित्व होतें. लोहचुंबकाच्या सांनिध्यांत लोखंडाचे कण हालचाल करूं शकतात; पण त्या चुंबकाच्या अभावी त्यांची गति स्तभित होते. तसा प्रकार मराठ्याचा होता. नेपोलियनसारख्या प्रख्यात वीरास पराभूत केल्यामुळे ज्या वेळी अिंग्रजी समाजाच्या अतःकरणात आत्मविश्वास ओतप्रत भरला होता त्या वेळी त्यांच्याशी युद्ध करण्याची पाळी मराठी राज्यावर आली; आणि तीहि रावबाजी मराठ्याच्या गादीवर असताना. यामुळे मराठा समाज त्यावेळी किंकर्तव्यतामूढ बनला व त्याने पराभव कबूल केला यात आश्चर्य वाटण्याचें कारण नाही.

महायुद्धाच्या वेळी जर्मनीवर देखील हीच पाळी आली. ज्या जर्मनांनी अनेक लढायात विजयामागून विजय मिळविले तेच जर्मन 'आतां शत्रु आटपण्याजोगा नाही' असे दिसून येतांच कुंठित झाले व त्याचा बादशाहा देश सोडून पळून गेला. पण या पराभवाचा अर्थ साम्राज्य कमावण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या अतःकरणातून कायमची नाहीशी झाली असा नव्हे. तर त्यांची दबलेली महत्त्वाकांक्षा अनुकूल संधि मिळतांच प्रकट झाली व हिटलर सारखा पुढारी मिळताच जर्मन समाजानें आपली महत्त्वाकाक्षा पुरी करण्याची खटपट दुप्पट जोरानें चालविली आहे. तोच न्याय मराठ्यांना लावतां येण्याजोगा आहे. अटकेपासून रामेश्वरापर्यंतचे साम्राज्य मराठ्यांच्या हस्तगत होण्याचा डाव रंगास आला असतां अिंग्रजांनी तो अेकदम अुधळून टाकला व मराठ्यांना पराभव कबूल करावा लागला!

## पण संधि मिळतांच

अंतःकरणांतली महत्त्वाकाक्षा पुरी करून घेण्याची खटपट योग्य पुढाऱ्याच्या नेतृत्वाखाली मराठा समाज केल्यावांचून राहाणार नाही, याचें प्रत्यंतर 'स्वराज्य

हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तें मी मिळविणारच ' या लोकमान्यांच्या मंत्रानें महाराष्ट्रांत जें चैतन्य दिसलें त्यावरून कोणासहि ध्यानांत येण्याजोगे आहे. त्याचप्रमाणें कोरा चेक देऊनहि राष्ट्रीय झगड्यांत मुसलमान समाज सामील होत नाहीं हें अनुभवांती ठरले तरी हिंदू मुसलमानांच्या अेकी वांचून राष्ट्रीय प्रगति होअूं शकणार नाही म्हणून पुढारी कुंठित मति झाले असतां, " हिंदू संघटित व प्रबळ होण्यानेंच हिंदुस्थान हे राष्ट्र प्रभावी ठरेल ' असें असंदिग्ध शब्दांत सांगणाऱ्या तात्याराव सावरकरांच्या शब्दानें आजहि महाष्ट्रांतील जनतेंत नवशक्ति दिसू लागली आहे.

तात्पर्य, स्वराज्याच्या व साम्राज्याच्या राजकारणांत आपली जबाबदारी अुचलण्यास महाराष्ट्रीतील समाज पूर्वीप्रमाणें आजहि योग्य पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं अुत्साहानें झटत आहे; तेव्हां त्याच्या राजकीय आकांक्षेचा धागा अखंड आहे व महाराष्ट्र प्रगति पथावर आहे, हें निश्चित विधान करण्यास हरकत नाही.

------

# २३

## पाश्चात्त्यांची यादवी व आमच्या पुढचा प्रश्न

[ दिनाक २० ऑगस्ट १९४० रोजी महाराष्ट्र ज्ञानवर्धक मंडळातर्फे केसरी कार्यालयाच्या सभागृहांत श्री. द. वि. आपटे यांचें ' पाश्चात्यांची यादवी व आमच्या पुढचा प्रश्न ' याविषयावर व्याख्यान झालें. त्याचा सारांश असा– ]

### गतेतिहासाच्या रहस्यासाठीं चालू घटना लक्षांत घ्या

आजकाल युरोपांत व तदनुषंगाने हिंदुस्थानांतहि युद्धमूलक ज्या महत्वाच्या घडामोडी होत आहेत व ज्यांचा निश्चितपणें अितिहासांत समावेश होणार आहे त्याच्या मननाने गतकालीन अितिहासांतील कांहीं प्रश्नांचा अुलगडा सहज होतो; अुदाहरणार्थ, फरान्ससारख्या शूर राष्ट्राला शत्रूच्या अफाट व अभेद्य सैन्यापुढे आपला निभाव लागत नाहीं असे दिसतांच खिन्न अंतःकरणाने शस्त्र खालीं ठेवावें लागलें. हें वाचल्यानंतर शिंदे–होळकर–गायकवाड–भोसले यांनीं अिंग्रजांशी लढून

आपला टिकाव लागत नाहीं हें स्पष्ट दिसल्यामुळें पराभव मान्य केला या गोष्टीचें आश्चर्य वाटत नाही. वेव्हां गतेतिहासाचें रहस्य समजून घेणाऱ्याला आजच्या महत्त्वाच्या घटना लक्षांत घेणें आवश्यक असते. या दृष्टीने युरोपांतील युद्धा-संबंधी अिंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका येथील विद्वानांनी आपआपली तात्त्विक भूमिका काय आहे, याचें जे दिग्दर्शन ग्रंथांतून केले आहे तें आपण लक्षांत घेऊं.

## युद्धकारणाविषयीं जर्मन ग्रंथकाराचें मत

जर्मन ग्रंथकार स्पेंग्लर याच्या मताचा परिचय श्री. तात्यासाहेब केळकर यानी मराठी वाचकांना करून दिलाच आहे. "पाश्चात्य संस्कृति ही अुत्कर्षाचा अुच्च बिंदू ओलांडून आतां अवनतीला लागली आहे; याचें कारण ( अिंग्लंडातील लोकशाही व तेथे बोकाळलेला अुदारमतवाद व याच अुदार-मताचा परिपाक बोल्शेव्हिझम् या सारख्या ) समाजविध्वंसक मताचा फैलाव हें आहे. या मतानी अिंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांना निःसत्त्व व क्षीण केले आहे. अशा वेळी आर्यवंशी, क्षात्र वृत्तीच्या व ताज्या रक्ताच्या जर्मनांना अग्रपूजेचा मान मिळणें व अितरांनी त्याच्या वर्चस्वाखाली राहणें यांत सर्वांचें कल्याण असून व्हर्सायच्या तहाने अगदी याच्या अुलट माडणी करून ठेवली आहे; यासाठी ती पुनः सुलट करून जर्मनीला आपले मानाचें स्थान प्राप्त करून घेण्यासाठीं युद्ध करणें भाग झाले आहे; ही जर्मनाची भूमिका आहे

## जर्मन हे विज्ञानांत शोधक, राजकारणांत अल्लड

अमेरिकन ग्रंथकार ह्यू मिलर याला यातले कांहीच मान्य नाही. लोकशाही ही राज्यपद्धति खरोखरच मानव्याच्या दृष्टीने श्रेयस्कर आहे व ती शुद्ध स्वरूपांत फक्त अमेरिकेंत मात्र विद्यमान आहे अितर देशांत लोकशाही असली तरी तिच्यांत हिणकस भाग फार आहे. लोकशाही पेलण्यास समाज राजकीय विचारात अमेरिकेप्रमाणें प्रौढावस्थेस पोंचलेला पाहिजे. जर्मन हे रसायनादि विज्ञानाच्या बाबतीत कितीहि जबरे शोधक असले तरी राजकारणांत अजून ते अल्लड आहेत. यामुळे त्याच्या अंगावर बळेंच घातलेला लोकशाहीचा अंगरखा त्यांनी फेकून दिला व अेकशाहीचें टोपलें डोक्यांवर घेअून ते नाचत आहेत. पण अनुभवा-नंतर म्हणजे मोठेपणी त्यांनाहि लोकशाही ध्यावी असेच वाटेल. तोंपर्यंत त्यांना टोपी घालूं देण्यास हरकत नाही" असें मिलर म्हणतो.

## राष्ट्राभिमानाची संकुचित भावना

अिंग्लंडांतला टॉअिनबी हा या प्रश्नाकडे संस्कृतीच्या दृष्टीने पहातो. पाश्चात्य संस्कृतीचें अेकाग्र मनानें चिंतन केलें असतां जी व्यापक दृष्टि येते व

ारस्परांतील बंधुभाव ठसतो ती दृष्टि व तो भाव टाकून देऊन राष्ट्राभिमा-
ऱ्याची संकुचित भावना अुराशी बाळगूं लागल्यामुळें या यादवी युद्धांत पाश्चात्य
ञमाज सर्वस्वीं नष्ट होअील कीं काय, अशी भीति वाटू लागली आहे. दोन अडी-
वशें वर्षांपूर्वीं धर्मविषयक पंथभेदाच्या भुतांनीं लोकांच्या अंतःकरणांत धिगाणा
ग्रालून यादवी माजविली होती. सहिष्णुतेचा सद्विचार सुचल्यामुळे ती त्यावेळीं
ग्रांबली. पण माणसाच्या अंतःकरणाला अुच्च भावनेची अनावर तहान व भूक अस-
ऱ्यामुळें धर्मभावनेच्या जागीं पाश्चात्यांनीं राष्टीय भावनेला थारा दिला आहे.
ाण हेहि भूत आहे, देवता नव्हे. या भूतानें पछाडलेले पाश्चात्य समाज देशा-
भिमानाच्या नांवाखाली सम सस्कृतीच्या आपल्या बांधवांचा संहार करीत आहेत
ा शुद्ध पाण्यानें तहान भागविण्याचें सोडून यादवी युद्धाच्या रक्ताने लाल झालेल्या
ोढ्याचें गढूळ पाणी पिण्यासाठीं ते अहमहमिकेने पुढें सरसावले आहेत. अितर
ंस्कृतींचा नाश बिनसुधारलेल्या रानटी लोकांनीं केला; पण पाश्चात्य सस्कृतीनें
ाह्य जगांतल्या रानटी जाती नाहीशा केल्या असल्या, तरी तिने आपल्याच
ोटांत जर्मन व अिटालियन या रानवटांना जन्मास घातले आहे तेव्हां पुन:
ाहिष्णुतेचा सुविचार पूर्वींसारखा न सुचल्यास ही पाश्चात्य संस्कृति या रानवटा-
ऱ्या यादवींत धुळीस मिळेल असा सभव दिसतो" या अिंग्रजी विचारसरणीत
शाभिमानापेक्षां संस्कृतीची कल्पना श्रेष्ठ प्रकारची असून ती अिंग्लडखेरीज
अतर देशांतील पाश्चात्य राष्ट्रें मान्य करीत नाहीत, हे त्यांचे चुकत आहे हें
ांगण्यावर मुख्य कटाक्ष आहे.

## ुद्ध हेंच निसर्गास धरून आहे

पण फ्रेंच तत्त्वज्ञ बर्गसन याची दृष्टि सर्वस्वी निराळी अहे. "कुटुबांतील
ळींत ज्याप्रमाणे परस्परांविषयीं प्रेमभाव असतो व आअीला मुलासाठी पान्हा
ुटणें हें जसें निसर्ग सिद्ध आहे, त्याप्रमाणें अेका समाजांत किंवा राज्यांत अस-
ाऱ्या लोकांनी बंधुभावानें वागावें हे म्हणणेंहि निसर्ग सिद्ध दिसते. पण याच्या
ढें जाअून ही बधुत्वाची भावना सम सस्कृतीच्या समाजापर्यंत किंवा अखिल
ानव जातीपर्यंत विस्तृत होअू शकेल, असें मानणें कल्पनेच्या राज्यांत शक्य
ाहे. पण तें मत प्रत्यक्ष सृष्टीत उतरणें शक्य दिसत नाही. उलट, एक समाज
दुसरा समाज ह्यांच्यांत राजकीय दृष्टचा युद्धें व मारामाऱ्या होणें हेंच निर्स-
सि धरून आहे. जगांत राज्यरूपी अनेक भांडी आहेत; पण ती भांडी अधून
धून एकमेकांवर आपटून त्यांनीं एकमेकांची शकलें उडवावी, असाच अितिहासाचा
ाम दिसतो. रानांत ज्याप्रमाणें एका कळपांतील हरणें शक्तिवान काळविटाला
ढारपण देऊन हौसेनें त्याच्या आज्ञेंत राहतात व दुसरा कळप दिसला कीं
ाच्याशीं शत्रुत्वाची भावना ठेवूनच सावधपणें राहतात, किंवा प्रत्यक्ष त्याच्याशीं

लढतात, त्याच नैसर्गिक प्रवृत्तीने प्रत्येक राष्ट्र एका पुढाऱ्याच्या हुकमतीखालीं वागून सभोंवारच्या राष्ट्राशी शत्रुत्वाच्या भावनेनें वागण्यास शिकतें. बायकांना बाळंतपणांत अत्यंत यातना सोसाव्या लागत असल्या, तरी त्या यातनांतील तीव्र-पणा तत्कालीन गुंगीच्या रूपानें फारसा भासू न देता पुढेहि तो फारसा लक्षांत राहूं नये, अशी नैसर्गिक रचना बायकाच्या मेंदूत केलेली असल्यामुळें त्या अनेक मुलांना जन्म देऊन जगाची रहाटी चालवितात; त्याचप्रमाणें युद्धाच्या वेळच्या हालअपेष्टांनी समाजाला प्रसूतिवैराग्य येत असताहि त्याचा विसर पडून राष्ट्रा-तील लोक दहावीस वर्षांनी एखादे युद्ध करण्यास प्रवृत्त होतात; याचे कारण वीरश्रीचा उन्माद चढणें हा समाजाचा नैसर्गिक धर्म दिसतो. आपलेंपण विशिष्ट मर्यादेंतील लोकांपुरते ठेवून त्याबाहेरच्या लोकांशी 'लढावेंच लढावें' या युयु-त्सतेस उपयोगी पडणाऱ्या अशा भावना सृष्टीनें समाजास दिल्या आहेत; त्या-ऐवजी मानवांच्या व्यापक कल्पना समाजावर लादल्या तर त्यांनीं समाज मरून जाईल. समुद्राच्या तळाशी राहणाऱ्या माशाची शरीररचना, पाण्याचा मोठा दाब सोसूनच, त्या विशिष्ट स्थितीत जिवंत राहण्यास योग्य अशी केलेली असते व त्या माशास पाण्याच्या पृष्ठभागावर आणले तर तो मोकळ्या हवेंत न जगतां मरून जाईल. तसाच विशेष रीतीचा प्रकार राष्ट्राच्या अगर समाजाच्या जीव-नाचा सृष्टीने बनविलेला आहे." इत्यादि मतें या परेच तत्त्वज्ञानें मांडली आहेत.

## समाजांतील जिवंतपणाचें लक्षण

या परस्पर विरोधी मतांवरून युरोपांत चाललेलें चालू युद्ध हें यादवी स्वरूपाचे म्हणजे शोचनीय आहे असें अिंग्रजांस वाटतें; पण जर्मनांस तें अत्या-वश्यक व हितावह वाटत असून फरेंच विद्वान हें युद्ध म्हणजे निसर्गांतील एक नेहमीची घडामोड आहे असें म्हणेल. याच म्हणजे फरेंच तत्त्वज्ञानाच्या न्यायानें हिंदुस्थानच्या दीडशें वर्षांपूर्वींच्या अितिहासाकडे पाहिल्यास त्या वेळीं 'मराठे, टिपू. अिंग्रज व निजाम हे यादवी युद्धें करण्याच्या भलत्या खेळांत गुतले होते,' असें जें अितिहासकारांनी लिहिलें आहे तें चुकीचें असून त्यावेळी हिंदुस्थानात अनेक राज्यें होतीं व ती एकमेकांशी वारंवार लढत होतीं यांत अस्वाभाविक असें कांहींच नव्हतें, असें म्हणणें योग्य दिसतें. आतां शेवटीं त्यांत अिंग्रजांचा जय झाला व त्यांचें अेकछत्री राज्य झाले म्हणून दीडशें वर्षांपूर्वींचीं हिंदुस्थानां-तलीं युद्धें यादवीच्या स्वरूपाचीं होतीं असें ठरत नाहीं. हा प्रकार त्या वेळच्या समाजांत जिवतपणा होता याचेंच लक्षण म्हणतां येईल.

## रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?

तात्पर्य, राजकीय क्षेत्रांत अखंड शांतता व तीहि जगभर शांतता हें जें ध्येय अिंग्रजी मुत्सद्द्यांच्या व तत्त्वज्ञांच्या डोक्यांत असल्याचें आढळतें, तें अशक्य

कोटींतलें, अव्यवहार्य व सृष्टिक्रमास सोडून आहे. हे लक्षात घेतले असतां 'आमच्या पुढचा प्रश्न काय,' हे सांगणें फारसें कठीण नाही. हा प्रश्न म्हणजे "स्वराज्य कसें मिळेल हा आहे व तें स्वराज्य अिंग्रजन्न 'देतों' म्हणतात; तेव्हां आम्ही एकमतानें खर्डा लिहून त्यांच्यापुढे टाकला की, ते त्याच्यावर स्वाक्षरी करणार हे प्रसिद्ध झाले आहे. त्या अर्थी आम्ही अेकी केली की काम झालें" असा समज रूढ झालेला दिसतो. पण ही विचारसरणी महाराष्ट्रीयांना तरी अितिहासशुद्ध वाटणार नाहीं. रणावीण स्वातंत्र्य कोणास मिळत नाही, यासारख्या सामान्य सिद्धान्ताला अपवाद असतात व अडचणीच्या वेळी मोगलांनीं शाहूची स्वराज्याचा हक्क मान्य केला हें आठवून रणावांचूनहि स्वराज्य मिळू शकतें व राजकारणांत प्रत्यक्ष शत्रूशींहि मनापासून वचनबद्ध राहणें शक्य व अिष्ट असतें हे महाराष्ट्रीय जाणतात. कारण शिवाजी महाराजानी स्वराज्य स्थापलें व नंतर जन्मभर ज्याच्याशी शत्रुत्व केले त्या विजापूरकरावर अडचणीचा प्रसंग येतांच त्यांच्या मदतीसाठीं मोंगलाशी लढून त्या दगदगीने त्यांना मरण आलें. त्याचप्रमाणें शाहूनें अनेक अटी मान्य करून व बादशहास प्रसंगीं मदत देण्याचे कबूल करून स्वराज्य हाती घेतलें. आणि बाळाजीने, बाजीरावाने, नाना-साहेबाने व महादजीने बादशहाच्या मदतीस जाण्याचें वचन पाळण्यात केव्हांही कुचराअी केली नाहीं.

## आधीं शस्त्र मग स्वराज्य, नंतर एकी

लो. टिळकांनी देखील अनेक वर्षे कैदेत ठेवणाऱ्या अिंग्रजावर युद्धाचा प्रसंग येतांच 'आम्ही त्यांना मदत केली पाहिजे' असे असंदिग्ध भाषेत सांगितले. तेव्हां शत्रुत्व विसरून देखील स्वराज्यासाठीं जमतील त्या अटीवर युद्धांत सह-कार्य करावे हें पटण्यास अडचण पडणार नाही. पण टिळकानी देखील सहकार्य मान्य केलें त्याच वेळी 'आमच्या लोकांनी खांद्यावर बंदूक घेतली पाहिजे' असें सांगितले. म्हणजे शिवाजी, बाजीराव व टिळक याच्या विचारसरणीत स्वराज्य व सशस्त्रस्थिति याचे साहचर्य असले पाहिजे असें गृहीत धरलेलें आढळतें. किंबहुना, 'नि:शस्त्र स्थितीत स्वराज्य' ही कल्पना जगावेगळी व सृष्टिक्रमाविरुद्ध आहे असे महाराष्ट्रीयाना भासते. आतां 'एकी झाल्याने स्वराज्य मिळेल', हाही समज असाच चुकीचा दिसतो, कारण स्वराज्यानंतर एकी होऊं शकते, आधीं होऊं शकत नाही. बिस्मार्कच्या पूर्वी जर्मनीत अनेक संस्थानें स्वरा-ज्याचा उपभोग घेत असून त्याच्यांत बेकी होती. पण तरवारीच्या बळावर पर-राज्यांशी युद्ध करून प्रशियानें जय मिळवितांच अितर संस्थानांनीं जर्मनीचें ऐक्य घडवून आणण्यास आपण होऊन संमति दिली. अमेरिकेंत देखील स्वातंत्र्य मिळाल्या-

नंतर कित्येक वर्षे राज्याच्या घटकांत बेकी होती आणि गुलामगिरीच्या प्रश्ना-वर दक्षिणेंतील संस्थाने फुटून निघत होती. पण लिंकनने पुढाकार घेऊन व घनघोर युद्ध करून दक्षिणेतील संस्थानांना पराभूत केलें आणि मग त्यांना एकत्र नांदणें भाग पाडलें. यावरून आधी शस्त्र, नंतर स्वराज्य आणि नंतर एकी असा जगाच्या अितिहासातला क्रम असल्यामुळे प्रथम आधी एकीची अपेक्षा करणें म्हणजे 'आधीं कळस बांधा मग पाया घालू' म्हणण्यासारखे आहे. तेव्हां आजचा प्रश्न 'आम्ही सशस्त्र कसे बनू' हा आहे. प्रश्न कोणता हे सांगणें अितकीच आजच्या व्याख्यानाची योजना होती. तो प्रश्न कसा सोडवावा हे सांगण्यासाठी निराळे व्याख्यान देणे योग्य होईल.

---

# २४

## लोकमान्यांचें स्मरण

लोकमान्यांचे निकट साहचर्य मला नव्हते. पण प्रसंगोपात त्यांना एकटे गाठून वाटेल ती शंका विचारण्याअितका त्यांचा माझा परिचय होता; व असे करतां यावें या हेतूने मी १९१५ सालापासून पुण्यास काही वर्षे रहाण्याचे ठरविलें. त्याप्रमाणें १९१५ व १९१६ या दोन वर्षांत त्यांच्याशी सात आठ वेळां माझें बोलणें झालें, व त्यात कित्येक नाजूक प्रश्न विचारले तरी त्यांनी सविस्तर अुत्तरे दिली. पण पुढे पुढे माझे मलाच असें दिसून आलें की, एका महाकवीने म्हटल्याप्रमाणें "ब्रुवते हि फलेन साधवो न तु कंठेन निजोपयोगितां" या न्यायानें लोकमान्याच्या थोरवीची कल्पना त्याच्याच तोंडून निघणाऱ्या खाजगी संभाषणांतील शब्दावरून करण्यापेक्षा त्याच्या जगप्रसिद्ध चरित्रावरून व सार्वजनिक भाषणावरून करणेंच सोयीचे आहे. त्याच्या राजकारण विषयक मतांसंबंधी तरी खाजगी रीतीनें खुलासा करून घेण्याचें कांही कारण नव्हतें. तीं त्यांनी अनेक प्रसंगी भाषणांतून व लेखांतून खुलासेवार मांडली होती. तेव्हां एकदोन वर्षांनंतर त्यांना व्यक्तिविषयक प्रश्न विचारण्याचें सोडून मला माझ्या विषयांत ज्या शंका अुपस्थित झाल्या असतील त्याच विचारण्यासाठीं मी त्यांच्याकडे जाऊं लागलों. पण शेवटल्या तीन वर्षांत राजकारणाची चर्चा,

सभा, परिषद, दौरे व चिरोल केस यांच्या गडबडीमुळे ते अितक्या गर्दीत असत की, चार लोकांबरोबर जाऊन त्यांचें बोलणें अैकण्यापलिकडे मला बहुधा कांही साधले नाही. तथापि अनुकूलता पाहून अितिहास व सशोधन या विषयासंबधी त्यांची मतें समजून घेण्याचा मी प्रयत्न केला पैकी महाराष्ट्राच्या इतिहासासबधी सध्यां काय संशोधन चाललें आहे याचें सामान्य स्वरूप त्यांनी दोन तीन वेळां विचारून घेतलें; आणि 'मराठ्यांचें राज्य कशामुळे गेले' या माझ्या प्रश्नास उत्तर देण्याऐवजी, 'या बाबतींत कोणाचा काय अभिप्राय आहे ते मला आधी समजू द्या' असें म्हणून ते बोलण्याचा ओघ बदलीत. पण संशोधनाच्या आवश्यकतेसबधी सामान्य प्रश्न विचारला म्हणजे ते बराच वेळ मनापासून आपलें मत समजावून सागण्याचा प्रयत्न करीत. सारांश पहिल्या दोन वर्षांतील माझे प्रश्न कोणत्याही विषयासंबंधी असत. पण शेवटच्या तीन वर्षांत संशोधनाखेरीज दुसरा विषय मी त्यांच्याकडे सहसा काढीत नसे. अशा प्रकारच्या सभाषणानतर मला चार आठ दिवस तरी त्यांची आठवण पक्की असे नतर ती सहजच अधुक होअी. तथापि तीन चार प्रसंग तरी माझ्या मनावर फारच स्पष्टपणे बिबलेले असल्यामुळे त्यांचे स्मरण मी या प्रसंगी करीत आहे यांतील शब्द अगदी जशास तसे मी येथें दिले आहेत असें म्हणणे धाडसाचें होअील; पण लोकमान्याच्या म्हणण्याचा भावार्थ हुबेहूब वाचकांच्यापुढें ठेवण्याच्या बुद्धीनें मी या आठवणी येथे लिहीत आहें एवढे निश्चयपूर्वक म्हणू शकतों

अि स. १९१६ किंवा १७ साली 'फुरसुतीच्या वेळी तुम्ही काय करीत असतां' असा त्यानी मला सहज प्रश्न केला त्याचे उत्तर देतां देता आमच्या देशांतील बुद्धिमान लोकांनी कोणता धंदा स्वीकारावा असे मी विचारलें, तेव्हां लोकमान्य म्हणाले "हा प्रश्न ज्याचा त्याने सोडविला पाहिजे. आपली बुद्धि सरकारास विकू नये अेवढें मात्र निश्चयपूर्वक म्हणता येअील. पण आमच्यांतील उत्तम बुद्धिवान वर्ग अद्याप सरकारी नोकरीच्या जाळयांत गुरफटलेला आहे, पहिल्या नंबरच्या विद्वान माणसांना मी चांगला पगार देण्यास तयार आहे पण त्यांचा ओढा सरकारी किंवा निमसरकारी संस्थांकडे दिसतो ही स्थिति पालटण्याला अद्याप दहा पंधरा वर्षे गेली पाहिजेत." हे मला पटलें नाही. मी उलट प्रश्न केला की "पुस्तकी बुद्धीला तुम्ही अितकें महत्त्व देतां व दहा पधरा वर्षांत विद्वानांची बुद्धि देशकार्याकडे वाहूं लागेल असे म्हणता याचा अर्थ मला कळत नाही. उतम विद्या संपादन केली तरी स्वार्थत्यागाची प्रवृत्ति व मनाचा खंबीरपणा याचा अंकुर जातिवंत असावा लागतो. नाहीं तर बुद्धीला वाटेल तेवढें पटलें तरी, ऐन प्रसंगीं

बहुतेकाचे हातपाय लटपटतात व अनेक सबबींवर सार्वजनिक कामांतून लक्ष काढून सरकारी नोकरीचा आश्रय करण्याची इच्छा होते. सध्यां आमच्या देशांत सार्वजनिक कामात पडणे बरेंच धोक्याचे आहे. व कदाचित जन्माचें मातेरें होण्याचा सभव आहे; ही भावी स्थिति पुस्तकी विद्वानांच्या लवकर ध्यानांत येते. यामुळें ते या फदांत पडत नाहीत अितर लोकांना बहुधा अितकें दूरचे दिसत नाहीं म्हणून म्हणा, किंवा दिसले तरी आम्ही देशहितासाठीं अेवढा स्वार्थत्याग करणार अशी मनपूर्वक त्याची अिच्छा असते म्हणून म्हणा, पण ते या कामांत पडतात. तथापि त्यापासून फलप्राप्ति बेताचीच होते. तेव्हां उत्तम विद्या, स्वार्थ-त्यागाची कल्पना व न डगमगणारें धैर्य यांचा सगम फार क्वचित व्हावयाचा व यालाच ईश्वरी देणगी असें म्हणतां येणार नाही कां? माझ्या बोलण्याचा रोख कोणास अनुलक्षून आहे हे लोकमान्यांनी ओळखून स्वतःची थोडीशी हकीकत सागितली ती विसरणें अशक्य आहे. ते म्हणाले "जन्मतः माणसांत थोडाबहुत भेद असतो हे मान्य करतां येईल. पण धैर्यशाली माणसें म्हणजे जन्मापासूनच खबीर मनाची असतात, प्रत्येक प्रसगी ती खांबासारखीं निश्चलच राहतात असें तुम्हास वाटत असेल तर तें चुकीचे आहे. थोडाबहुत संशय व विचार अडचणीच्या वेळी प्रत्येकास पडावयाचाच. पण त्यातून कोण कोणत्या वाटेनें बाहेर पडतो हे पाहून लोक त्याच्या स्वभावाची परीक्षा करितात. अुदाहरणार्थ, पहिल्या एकदोन प्रसगीं भोवतालच्या मंडळीचा आग्रह पाहून मला कांही वेळ विचारच पडला. पण विवेक व विचार यांच्या जोरावर 'आपल्या जागेवरून हलणे योग्य नाही' असे माझें मत झालें. याप्रमाणे एकदोन वेळ वागल्यानतर मला अशा प्रसगाचा बाऊ वाटेनासा झाला. बुद्धिवानावर अशा रीतीने धैर्य दाखविण्याची विशेष जबाबदारी असते. यावरून ईश्वरदत्त देणगी म्हणण्यापेक्षां धैर्य हे विचाराचे फळ आहे हे तुम्ही लक्षांत ठेवा."

या उत्तरानें माझे समाधान झालें नाहीं. आणीबाणीच्या वेळी मनाची धादल उडणें किंवा निश्चल राहणें हे जन्मसिद्ध स्वभावावरच बहुतांशी अवलंबून आहे अशी माझी शंका कायमच होती. पण त्याच्या तोंडून माझ्या अपेक्षे-पलीकडे मला माहिती मिळाली होती. तेव्हां त्यातच समाधान मानून मी बोलणे वाढविले नाहीं. तथापि त्याचा अभिप्राय वर दिला आहे त्यास अनुसरून त्यांचें वागणें होतें, असे त्याच्या समकालीन व निकट परिचयाच्या माणसाच्या तोंडून ऐकलेल्या हकीकतीवरून दिसतें. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं न्यू इंग्लिश स्कूल काढण्याचें ठरविले, तेव्हां ज्या तीन चार मडळींनीं त्यांना येऊन मिळण्याचें आश्वासन दिले होतें, त्यांत लोकमान्य व आगरकर हे दोघेही होते. नंतर शाळेची जाहिरात देण्याच्या वेळी शास्त्रीबोवानीं 'तुमचीं नांवें

जाहिरातीत घालावयाचीं किंवा नाही' असे विचारण्यासाठी सर्वीकडे मनुष्य पाठविला. तेव्हां कोणीही सही दिली नाहीं. लोकमान्यानी देखील 'घरच्या मंडळींना विचारून सांगतों' असे उत्तर दिलें. त्यावेळी पुण्यात ज्याच्या त्याच्या तोंडीं नवीन शाळा हाच विषय झाला होता; व अितर पोक्त मंडळीप्रमाणें लोकमान्यांना घरची वडील मंडळी या नव्या फंदात न पडतां सरकारी नोकरी धरण्याचा आग्रह करीत होती. त्यांच्या आग्रहामुळें त्यांनी शास्त्रीबोवांना वर सांगितल्याप्रमाणें अुत्तर दिलें. तेव्हां शास्त्रीबोवांनी जवळच्या मंडळीस बोलूनही दाखविले कीं "मी कोणाच्याही आश्वासनावर अवलंबून न राहता स्वतःच्याच जोरावर शाळेची अुभारणी करण्याचें ठरविले म्हणून ठीक झाले." काहीं दिवसांनी लोकमान्य वडील मंडळीच्या म्हणण्यास न जुमानतां शाळेंत शिकविण्यास येअू लागले. व प्रथम अेकच वर्ष राहीन असें सांगून आले, पण नंतर कायम राहिले.

यावरून अेखादी नवीन कल्पना निघाली म्हणजे तिने हुरळून जाअून ते संकटांत अुडी घेत नसत; तर साधक बाधक गोष्टींचा पूर्ण विचार करून नव्या मार्गानें जाण्यांत पुष्कळ संकटे असलीं तरी देशहितार्थ ती पत्करणें प्राप्त आहे असा बुद्धीचा निश्चय करून ते कामास हात घालीत आणि यामुळेच त्यांना संकटास भिअून माघार घेण्याची बुध्दी केव्हांही झाली नाही

याचा अर्थ लोकमान्याचें अंत.करण भावनाप्रधान नव्हते असा मात्र नव्हे. त्यांचें सार्वजनिक व खाजगी चरित्र बारकाअीने अवलोकन करून जर कोणती गोष्ट आपणास ढळढळीतपणें स्पष्ट दिसत असेल तर ही की, त्याचे अंतःकरण स्वाभिमानाने व देशहितार्थ आकाशपाताळ अेक करण्याच्या जबर महत्त्वाकांक्षेने ओतप्रोत भरलेलें होते. त्यांचें शिक्षण, त्यांचे व्यासंग, त्याचे वाचन व त्याचे अनुभव कितीही जबर असले तरी त्यांनी लोकमान्यांच्या (स्वाभिमान व देशहितसाधनेच्छा) या दोन भावना कमजोर होण्याऐवजी प्रज्वलित मात्र झाल्या आणि त्यानी ज्या चळवळी केल्या, लेख लिहिले, भाषणे केली, संकटे सोसलीं आणि कर्मयोगाची महती प्रतिपादन केली ती या दोन भावनानी प्रेरित होअून केली यांत शंका नाहीं.

अशा रीतीनें त्याच्या चरित्राचे रहस्य या दोन भावनांत आढळत असलें तरी काम पार पाडतांना ते प्रयत्नास व विवेकास प्राधान्य देत असत. अमूक काम करावयाचें असें ठरलें म्हणजे त्याच्या सिद्धयर्थ किती खटपट करावी आणि किती लगबगीनें त्या कामास लागावे याचा लोकमान्यांच्या जवळ कांही सुमार नव्हता. ते रात्रीच्या रात्री जागून, वाटेल त्याच्या भेटी घेअून व वाटेल तसा पैसा खर्च करून हाती घेतलेलें काम शेवटास नेत. अितर लोकांनी देखील काम पत्करलें म्हणजे आपल्या कामी असेंच तद्रूप व्हावें अशी त्यांची अपेक्षा असे. यामुळे,

त्यांच्याजवळ अेखाद्यानें ‘ मी अमूक काम करतों’ असें कबूल केले म्हणजे ‘ निघा नर कामाला ’ असे म्हणून ते त्याला अुठावयास लावीत; अितकेंच नव्हे तर तो लोकमान्याच्या माडीवरून जिना अुतरून दरवाजांत पोचेपर्यंत ते दोन तीन वेळां वरून डोकाअून पहात. न. जाणो, तो वाटेंत बोलत अुभा राहावयाचा आणि त्यामुळे गाडी चुकून काम बिनसावयाचें तात्पर्य कामास हात घातल्यावर तें केव्हां अेकदां नीट रीतीनें शेवटास जाअील अशी तळमळ लागली पाहिजे असें त्यांना वाटत असे.

* * * *

आतां लोकमान्याच्या अितिहाससंशोधनविषयक अेका प्रश्नोत्तराचे वर्णन देतों.

‘ अितिहास सशोधन म्हणजे नुसता काथ्याकूट आहे, त्यापासून म्हणण्याजोगी फलप्राप्ति काही नसून अुगाच डोके पिकवावे लागतें, तेव्हा हा छंद मी सोडावा ’ असें माझे स्नेही मला सागत व त्यास सयुक्तिक अुत्तर मला सुचत नसे हा प्रश्न लोकमान्याना विचारला तेव्हां त्यांनी असें अुत्तर दिले.

‘ तुमच्या स्नेह्यांना तुम्ही काही अेक अुत्तर देअू नये; नुसते त्यांचें अैकून घ्यावें आणि तुम्हास करावयाचे आहे ते तुम्ही अधिक नेटाने करावें म्हणजे झाले. या गोष्टी वादानें पटवून देणे कठीण असते. आमच्या येथे चाललेल्या अितिहासाच्या सशोधनापासून साक्षात् फायदा काय आहे हे दाखविता येअील हा भाग निराळा; पण अेकदरीत संशोधन हा विषय असा की, त्याची ज्याला अभिरुची असेल त्याने ती पुरवून घेतल्यावाचून राहू नये. सर्वच गोष्टी फायद्याकडे, तात्कालिक फायद्याकडे, नजर देअून करावयाच्या नसतात. मनुष्यस्वभावच असा आहे की, त्याला काही गोष्टी अुदरभरणासाठीं किंवा उपयोगाकडे लक्ष देऊन कराव्या लागतात. आणि काही शुद्ध ज्ञान प्राप्तीसाठी करण्याचा अुमाळा येतो. प्रत्येक मनुष्यात या दोनही वृत्ति कमी जास्त प्रमाणानें असतातच; पण प्रसंगानुसार कोणाच्या पहिल्या वृत्तीची वाढ होते, तर कोणाच्या दुसऱ्या वृत्तीची वाढ होते. प्राचीन काळी आमचे ऋषी अरण्यात बसून “ हे जग म्हणजे काय, ते कसें अुत्पन्न झालें, पुढें याचें काय होणार’ याचा अहर्निश विचार करण्यांत तपेच्या तपें घालवीत. त्यांना जर कोणा अुपयुक्ततावाद्यानें विचारले असते की, ‘ अुगाच आपले शरीर का कष्टवितां ? ’ तर त्यानी असे सागितले असते की, ‘ बाबा, जें मी करतो त्याचे सुखदु:ख तुला कळण्याजोगे नाही. तू तुझ्या वाटेने जा, मी माझ्या वाटेने जातों. मला तत्त्वविचार करण्यांत आनद वाटतो म्हणून मी करतो ’ सशोधनांत जाणाऱ्या काळांत संशोधकाला जो आनंद वाटतो त्याची कल्पना व महत्त्व हीं संशोधनाची अभिरुची नसलेल्या लोकांना पटवून देतां येणार नाहीत. ‘ युरोपात रसायनशास्त्र व यंत्रशास्त्र यात रोजच्या रोज नवे शोध होत आहेत व संशोधकांच्या प्रयत्नामुळें

त्या त्या देशाचा प्रत्यक्ष फायदा होतो ' असे कोणी म्हणतील. पण असे म्हणणाऱ्यांना तिकडील संशोधनाची फार थोडी माहिती आहे असे म्हणावे लागते. रसायनशास्त्र व यंत्रशास्त्र यांतील शोधाचा साक्षात् फायदा त्या देशांना होत असला तरी तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, नीतिशास्त्र, भाषाशास्त्र वगैरे शेकडों विषयांत तेथील विद्वान् गढलेले असून त्यांच्या शोधांचा साक्षात् फायदा कांही अेक दाखवितां येणार नाही. ' केवळ जगाच्या ज्ञानांत भर पडली यांत आपल्या श्रमांचें सार्थक झाले ' असें हे संशोधक मानतात व तेच खरे आहे. संशोधकाने केव्हाहि नफ्यातोटयाकडे पाहूं नये. त्याच्या बुद्धीस ज्या विषयात स्फुरण होत असेल त्या विषयाचे त्याने परिशीलन करावें. जात, गोत किंवा राष्ट्र वगैरे सर्व विचार बाजूस ठेवून सत्यसंशोधनासाठी आपल्या बुद्धीचा ओढा असेल तिकडे तिला वाहू देअून डोक्यांत प्रकाश पडल्यास आपले भाग्य समजावे या बाबतीत शोधकाने आपल्या मनावर सक्ती करूं नये. अमुकच विषयांत तू संशोधन कर असा एकाने दुसऱ्यास आग्रह करणें व्यर्थ आहे. आपापल्या अंतःकरणाची प्रवृत्ति ओळखून तिला शक्य तितका स्वैरसंचार करण्यास आपल्या बुद्धीस पूर्ण वाव द्यावा. या कामी अडथळे फार पोटभरूपणा, अनुकरणेच्छा, स्नेह्याची भीड, व पूर्वग्रह वगैरे अनेक प्रतिबंध आपल्या बुद्धींत सत्याचा प्रकाश पडू नये म्हणून टपून बसलेले असतात. पण ते बाजूस सारून आपल्यास संशोधनाने सत्याचा अेखादा किरण लाभला तरी जो आनंद होतो त्यापुढे सर्व गोष्टी तुच्छ भासतात. चित्ताची अितकी अेकाग्रता होण्यास पुष्कळ गोष्टी अनुकूल असाव्या लागतात; पण संशोधनाची सवय ही त्यांतली अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे ती वाढविण्याचा तुम्ही प्रयत्न करा. ही एकाग्रता बाह्य गडबडीने बिघडता कामा नये. पाणिनी अष्टाध्यायीचीं सूत्रें करीत असतांना तो ज्या खोपटींत बसला होता त्या आवारांत त्याच वेळीं दोन सैन्यांची गांठ पडून खडाजंगी युद्ध झालें व शेकडों लोक मृत्युमुखी पडले पण सायंकाळी ही स्वारी खोपटीबाहेर पडली, तेव्हा मुडदे पडलेले पाहून पाणिनीस मोठें आश्चर्य वाटले, कारण तेथें युद्ध झालें या गोष्टीची त्याला वार्ता देखील नव्हती. सारांश, संशोधनाच्या वेळी चालू व्यवहारांतून मन निघून अेकाच विषयाशी तादात्म्य पावलें पाहिजे '

* * * *

लोकमान्य चहा पीत असत हे पाहून मला मनापासून वाईट वाटे. त्याना याबद्दल कांही खुलासा विचारावा असें बरेच वेळा माझ्या मनात येअी. या हेतूनें मी तीन चार वेळां त्यांच्याकडे गेलो होतों. पण हा ' लहान तोंडीं मोठा घांस होईल ' असें वाटून आयत्या वेळीं मला दुसराच विषय काढून वेळ मारून नेणें अिष्ट वाटे. पण अेक वेळ मला आपोआप संधि मिळाली ती अशी. चिरोल खटल्यांतील कांही कागदांच्या नकला करावयाच्या होत्या. त्यासाठी अगदीं सकाळीं

मला बोलावणें आले. तेव्हां नुकताच अुठलों होतो; तसाच वाड्यात गेलों. मजकडे पाहतांच त्यांनी माझ्यासाठीं चहा आणावयास सांगितला. तेव्हा ' मी चहा घेत नसतों, ' असें सांगून मला ' आणखी एक प्रश्न विचारावयाचा आहे ' असें म्हटलें. व त्यांनी ' बोला ' म्हणताच " चहा विरुद्ध अेवढी चळवळ होअून या वाड्यांत चहा होतो याबद्दल पुष्कळ लोकांना वाअीट वाटते." असे मी निक्षून सांगितले. तेव्हा त्यानी मजकडे निरखून पाहिलें व ' तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे, पण सध्यां तो विषय राहूं द्या ' असे म्हणून त्यांनी दूध आणण्यास सांगितले. त्यानंतर दोनतीन वेळां सकाळच्या वेळी मी वाड्यांत त्यांच्याकडे गेलों होतों, तेव्हा ते स्मरणपूर्वक दूधच आणण्यास सांगत व सांगताना मजकडे अेक वेळ निरखून पाहात. यामुळे माझ्या प्रश्नाचें अुत्तरही मिळाले नाही आणि वर अुद्धटपणाचा आरोप स्वीकारावा लागला याबद्दल मला हळहळ वाटत असे.

---

# २५

## एक खाजगी पत्र*

श्री

पुणें, आनंदाश्रम
ता २८-३-४३

सा. न. वि. वि. तुमचें सविस्तर पत्र पोचले. ते रा. वामनराव जोशी यांनी पाहूनच मजकडे पाठविले. यामुळे त्यांना पाहण्यासाठीं पुन: त्यांच्याकडे पाठविण्याचें कारण नाही. वामनरावांचा सत्कारसमारंभ झाला. योग्य माणसाचा सत्कार झाला असें मला वाटतें. मला अलीकडे अेकूं बरेच कमी येतें. यामुळें

---

* सदरहु पत्र प्रो. पोतदार यांनी श्री. ××× याचे कडून मिळविले. प्रो. पोतदार यांस हे पत्र पाठविताना लिहिलेल्या ता. ७-७-४५च्या आपल्या पत्रांत ते म्हणतात ' जीवनसिंधूचा पार दिसूं लागल्यामुळे आपल्या बरोबरीच्या लोकांचे जीवनविषयक विचार कळून घ्यावे म्हणून मी वामन मल्हार जोशी, दत्तोपंत आपटे इत्यादिकाना पत्रे लिहिली होती. दुर्दैवाने हे दोघेहि लौकरच अस्तंगत झाले. मी तरी काय, अस्ताचलावरच आहे. Longing lingering look टाकतों ती फक्त भारतभूमीच्या स्वातंत्र्याकडे. एरव्ही तरी आपण काय घेऊन येतों ? व काय घेऊन जाणार ?

कोणत्याहि सभेस जाऊन उपयोग नसतो. म्हणून मी सभेस जात नाही. त्याप्रमाणें याही सभेस गेलों नव्हतों.

तपस्वी बाबासाहेब परांजपे यांच्या सत्कारसमारंभावरून तुम्हास माझी आठवण झाली व असे होणें साहजिक आहे. तुमच्याप्रमाणें मलाहि सार्वजनिक आयुष्यक्रमाची गोडी लावण्यास बाबासाहेबच कारणीभूत झाले यांत शंका नाही तथापि गुरुशिष्यांत अतर रहावयाचें ते राहिलेच आहे. सार्वजनिक आयुष्य-क्रमांत लक्ष घालणाऱ्या मनुष्याने क्रमाक्रमाने आपले लक्ष अधिकाअधिक सार्वजानिक विषयांत घालण्याचा अभ्यास कायम ठेऊन ससारातून मन आधिका-धिक काढले पाहिजे; हें व्रत बाबासाहेबांनी पाळले तसे मी पाळले नाही. बायका-मुलाच्या सुखदुःखाकडे पाहण्यात वेळ मोडला तरी तो मोडावयाचा; आणि त्यांतून जो वेळ काढता येईल तो मात्र समाजाच्या प्रगतीच्या कामासाठी घालवावयाचा असा तडजोडीचा मार्ग सुमारे १५।२० वर्षा पूर्वीपासून पत्करला. बाबासाहेबांनी मात्र तसे केले नाही. ते आपल्या घरात मुलांबाळात बसले असले तरी देशाच्या विचारालाच प्राधान्य देतील व सार्वजनिक विषयाची चर्चा करीत राहतील ही माझी खात्री आहे. तात्पर्य, सार्वजनिक हिताचा विचार शक्य तितका जास्त वेळ डोक्यात घोळवावा हे जे व्रत खडतर रीतीने त्यानी पाळलें तसे माझ्या हातून होऊ शकले नाही

हे मान्य केल्यानतर देशस्थितीसबधाने तुम्ही आपली मते मला लिहून कळविली; व माझी काय आहेत ते लिहिण्याची अिच्छा दर्शविली. त्या अिच्छेच्या पूर्ततेसाठी मी माझी मते थोडक्यात येथे लिहितों.

राजकारणांत आमच्या समाजातील विचारी माणसानी लक्ष घालावे ही मागणी कॉंग्रेसच्या स्थापनेपासून म्हणजे गेल्या ६० वर्षे सारखी चालू आहे; व आमच्या समाजांतील पुढारी लोक अखिल भारतीय राजकारणाचा खल करीत असतात पण राजकारणात हस्तक्षेप करण्याची हौस महाराष्ट्रात अिंग्रजी अमदानीतच सुरू झाली असे नसून ती पेशवाओीतहि होतीच अटकेवर झेंडे लावण्यात मोठा पुरुषार्थ आहे व दिल्लीची सूत्रे हाती घेणाऱ्या महादजी शिंद्याचें कौतुक स्वराज्यांतील लोकांना अधिक वाटत होते यांत शंका नाही. शहाजीचे कौतुक करणाऱ्या राधामाधवविलास-चंपूच्या कर्त्याने देखील अुत्तरेस शहाजहान आहे, त्याच्या तोडीचा दक्षिणेंत शहाजी आहे असे म्हटले आहे. यावरून शहाजीच्या वेळी देखील दिल्लीचे पद म्हणजे फार मोठें व त्याच्या बरोबरीचा शहाजी असे म्हणण्यात त्याला आपण शक्य तितका मोठा मान देतो अशी कवीची कल्पना दिसते. पुढें शिवाजीच्या वेळी देखील ' दिल्लीद्रपदलिप्सु ' म्हणजे दिल्लीच्या बादशहाचें पद आपण घ्यावें अशी शिवाजीची अिच्छा होती अशी कल्पना त्या वेळच्या अेका कवीने केली आहे.

राजारामाच्या वेळी देखील अेका अस्सल सनदेंत दिल्ली जिकून घेणाऱ्यास अमुक मनसब देऊ असे राजारामाने वचन दिले आहे. पुढें शाहू हा मोंगलांच्या कैदेतून सुटण्यासाठीं दिल्लीकरांचें अंकितत्व मान्य करून आला व ते पर्यायाने त्याने पेशव्यांच्यावर बंधनकारक ठेवलें. यामुळे यद्यपि दिल्लीपतीच्या मदतीस जाण्याची भाषा रूढ झाली, तरी तेथला सर्व कारभार आपल्या हातीं असला पाहिजे हा आग्रह वर सांगितल्याप्रमाणे बाळाजी विश्वनाथापासून महादजी शिंद्यापर्यंत कायम राहिला.

पुढे शेवटच्या बाजीरावाच्या वेळेपासून मराठ्यांच्या राजकीय हालचालीला काही वेळ खंड पडला. पण पुढें अिंग्रजी शिकण्यापासून जी देशाची कल्पना आली तिला धरून 'हिंदुस्थान' हे अेक असे समजून त्याच्या राजकारणाचा विचार राष्ट्रसभेंत सुरू झाला व आजपर्यंत आमच्या पुढाऱ्यांच्या मनांत सर्व देशाची अेकी कशी घडवून आणतां येईल हा अेकच विचार घोळत आहे. पण अनुभव मात्र अेकीच्या बरोबर अुलट येत आहे. म्हणजे पुढाऱ्याच्या मनांत अनेक प्रकारचे भेद स्पष्ट दिसतात यामुळें अेकी घडवून आणावी म्हणून जिवाचे रान करणाऱ्या पुढाऱ्यांच्या वाट्याला अेकी दूर चाललेली पाहून हळहळत बसण्याचा प्रसंग येत आहे.

तथापि अखिल भारतीय राजकारणात हात घालून त्यात यश मिळविण्याचे ध्येय अितकें आकर्षक आहे की ते महाराष्ट्रात दोन अडीचशें वर्षे व अितर प्रांतात निदान पन्नास वर्षें अेकसारखे चालल्यामुळें ते यापुढेंहि चालेल याबद्दल मला शंका नाहीं. मोठे ध्येय साधण्याची खटपट करताना पराभव झाला तरी हरकत नाही, पण त्या ध्येयावरून दृष्टी ढळून द्यावयाची नाही, असेंच आमच्या राजकीय पुढाऱ्याच्या कृतीचें सूत्र दिसतें व पुढेंहि ते तसेंच राहील,

वरील विचारसरणीत मी थोडा तटस्थ रीतीने लिहितो, हे तुमच्या लक्षांत येण्याजोगे आहे व मी कांही अंशी तसा आहेहि. तो प्रकार असा.

प्रथम अखिल भारतीय राजकारण किंवा सर्व हिंदी पुढाऱ्याची अेकी करण्याचा प्रयत्न होत आहे तो अवेळी आहे असे मला वाटतें. आधी प्रांताप्रांतांची अेकी करूं, त्यांचें संघटन करू. त्यानंतर अेका प्रांताचे दुसऱ्या प्रांताशी सहकार्य घडवून आणण्यास काय करावे हे ठरविण्याची वेळ येअील. याकरिता अखिल भारतीय चळवळ थांबवावी असे मी म्हणत नाही पण ती ज्या प्रांतिक संघटनेच्या पायावर अुभारली जावी तो पाया चांगला रचण्यात अधिक लक्ष घालणें जरूर आहे हे विचारी माणसांनी ओळखलें पाहिजे.

हें प्रांतिक संघटनेचें काम महत्त्वाचें आहे असें ठरल्यास त्यांत अनेक लोक भाग घेऊं शकतील. भारतीय विचारास अिंग्रजी भाषेचे प्राविण्य पाहिजे व प्रवा-

सास पैसा पाहिजे; यामुळे संघास वर्गणी देणे व पुढाऱ्याच्या भाषणाचे अहवाल वर्तमानपत्रांतून वाचणे हे अेवढेच काम अितराच्या वांट्यास येते. पण प्रांतिक संघटनेचें ध्येय धरल्यास या अडचणी राहात नाहीत. त्याला मराठी भाषा चालते व आपण असूं तेथें दुसऱ्याला आपला विचार सांगणें हें कर्तव्य करण्यास अवसर अुत्पन्न होतो. हिंदुस्थान अभंग कसा राहिल ही चिंता अखिल भारतीय पुढारी वाहत आहेत ती वाहोत. त्याप्रमाणे महाराष्ट्रीय विचारी लोकांना तिभंगलेला महाराष्ट्र विचाराने अेकमेकांच्या जवळ कसा येअील व त्यांच्यांत सहकार्याची भूमिका कशी अुत्पन्न होअील ही चिंता वाहण्याजोगी आहे. अेकंदरीत प्रत्यक्ष अखिल भारतीय राजकारणांत ज्यांना भाग घेतां येण्याजोगा नाही व समजा-संबंधी आस्था ज्यांच्या अंतःकरणात कायम आहे त्यांनी 'महाराष्ट्र' हे ध्येय मानणें मला अिष्ट दिसते. तेव्हां या महाराष्ट्रात अैक्याची भूमिका कशी होअील, त्यांत विद्येची जोपासना कशी होअील, महाराष्ट्रांतील लोकांनी अिंग्रजी शिकण्याच्या मागें कितपत लागावें अित्यादि विचार करणें हे काम अवश्य वाटू लागते. पण माझी ही भूमिका स्पष्ट करण्यासाठी मी हे लिहिले. त्याचा विस्तार करण्याचे कारण नाही. ही माझी भूमिका तुम्हास पटेल किंवा नाही हे मला माहीत नाही यामुळें येथे पत्र संपविण्यास हरकत नाहीं.

— द. वि. आपटे.

## भाग ५ वा

# गणित व ज्योतिष

कै. आपटे यांनीं आपल्या आयुष्याच्या उत्तर कालांत गणित व ज्योतिष विषयाचा ध्यास घेतला होता. इतिहास संशोधनांत आलेल्या कालगणनाविषयक प्रश्नांनीं त्यांचें इकडे लक्ष वेधलें असल्यास न कळे. या विषयांत त्यांनीं केलेल्या लेखनाखेरीज आनंदाश्रम संस्थेमार्फत भास्कराचार्यांच्या 'सिद्धांत शिरोमणि' या ग्रंथाचें प्राचीन टीकाकारांच्या टीकासह केलेलें संपादन व प्रकाशन विशेष महत्त्वाचें आहे. 'चित्रमयजगत्' इ. स. १९२२ पृ. २३२ वर 'इंग्लडांतील शास्त्रज्ञांची पुराणप्रियता' हा याच भागांत येण्याजोगा लेख येथें पुनर्मुद्रित केलेला नाहीं. सं. ]

## २६

# ज्योतिर्वित् कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित

शंकर बाळकृष्ण दीक्षित याचा जन्म दापोली तालुक्यांतील मुरूड गावी शके १७७५ आषाढ शु. १४ ( २४।७।१८५३) या तिथीस झाला. दीक्षितांचे मूळचे उपनांव वैशपायन असे असून या घराण्याकडे मुरूड गांवचा उपाध्येपणा आणि धर्माधिकारीपणा आहे. लहानपणीं इ. स. १८६८ पर्यंत शंकरराव यांचें मराठी शिक्षण मुरूड येथील शाळेत झाले; याच वेळी थोडासा संस्कृताचा अभ्यास व कामापुरते वेदाध्ययनहि तेथे झाले. पुढे दोन वर्षे दापोली कोर्टांत उमेदवारी करण्यांत व इंग्रजी शिकण्यांत गेली. इ स. १८७० पासून तीन वर्षें ते पुणें ट्रेनिंग कॉलेजांत होते व तिसऱ्या वर्षाचें पहिल्या प्रतीचें सर्टिफिकीट

त्यांनी मिळविलें. ट्रेनिंक कॉलेजांत असतां सुमारें दोन वर्षे सकाळीं एक तास ते इंग्रजी शाळेत जात, व तेवढ्या आधारावर त्यांनीं १८७४ साली मॅट्रिक्यलेशनची परीक्षा दिली. त्यानंतर रेवदंडा, ठाणें, बार्शी, धुळें येथें शाळेंत व ट्रेनिंगमध्ये १८९४ पर्यंत ते शिक्षक होते. पुढे त्याची नेमणूक पुणें ट्रेनिंग कॉलेजांत झाली. व ते यापुढें चार वर्षे म्हणजे शेवटपर्यंत तेथेच होते.

त्यांनी ८।९ ग्रंथ लिहिले. त्यापैकी ज्योतिर्विलास, हिंदु-पंचाग आणि भारतीय ज्योतिःशास्त्र हे ज्योतिषविषयक असून विशेष महत्त्वाचे असे आहेत. शंकररावांना गणित विषयाची आवड पहिल्यापासून होती; परतु ज्योतिषाचा नाद लागण्यास वर्तमानपत्रातील लेखांचे वाचन कारणीभूत झाले ते रेवदंड्यास असताना कै विसाजीपंत लेले यांचे 'स्फुट वक्ता अभियोगी' या सहीनें सायन वादावर वर्तनमान पत्रात लेख येत असत; ते वाचून शंकररावाचें लक्ष प्रथमतः ज्योतिषाकडे लागले. पुढे ठाण्यास जनार्दन आबाजी मोडक यांचा स्नेह जमून आल्यापासून शंकररावांचा ज्योतिषाचा अभ्यास फार वाढला. तो पाहून मोडक म्हणत की "शंकरराव यांना ज्योतिषाची गोडी लागण्यास माझा स्नेह कारण झाला; पण आतां ते त्या विषयात माझे गुरु आहेत."

मोडक व दीक्षित या अुभयताचा आणि लेले यांचा वाद होअून शेवटी या दोघांनाहि सायन पक्ष मान्य झाला, व पुढें तिघानी मिळून सायन मताचा प्रसार करण्यासाठी सायन पचाग प्रसिद्ध करण्याचा अुपक्रम केला, तो शंकरराव दीक्षितानी सुमारे १०।१२ वर्षे चालविला. दीक्षिताच्या मागे सायन पचागाचे काम बंद पडले.

कै. दीक्षित याच्या चरित्राची सामान्य रूपरेषा येथवर सागितली आता ज्या त्याच्या गुणामुळे त्याचे नाव महाराष्ट्राच्या आधुनिक अितिहासात कायम झाले त्याचे दिग्दर्शन करू. पोटाचा अुद्योग सभाळून विद्याव्यासंगाचे काम खऱ्या आवडीने प्रौढपणीं चालू ठेवणारा मनुष्य भरीव कामगिरी करू शकतो हें कै. दीक्षितांच्या आयुष्यक्रमावरून दिसून येते. पोटाचा अुद्योग व ससारचा गाडा सर्वांच्या मागे लागलेलाच असतो. परतु त्यातून वेळ काढून गणितासारख्या विषयात प्रावीण्य मिळविणे आणि त्यात अधिकाराने बोलण्याची योग्यता संपादन करणें या गोष्टी विद्येची खरी अभिरुची किंवा विद्येचे व्यसन असल्यावांचून कोणाच्याहि हातून होणार नाहीत लहानपणी धाकामुळे किंवा चढाओढीमुळे अभ्यास होतो; त्यानंतर अुद्योगधंदा मिळविण्याचे साधन म्हणून परीक्षेसाठी कसून अभ्यास करणारे लोक पुष्कळ आढळतात; परतु पोटापाण्याची व्यवस्था लागल्यानतर अभ्यासाची दगदग करणारा व पैशाची हाव न धरता विद्यार्जनाची वृत्ति कायम ठेवणारा मनुष्य सांपडणें कठीण. शिवाय अशी अिच्छा असणाऱ्याला कुशाग्र बुद्धीची देणगी.

आणि मनाला पटेल ते निर्भीडपणें लोकापुढें माडण्यास लागणारे धैर्य, यांची जोड असावी लागते. तरच त्या माणसाच्या हातून टिकाऊ स्वरूपाची कामगिरी होऊ शकते. कै. दीक्षितांच्या ठिकाणीं अशा रीतीने विद्येचे व्यसन, बुद्धीची तरतरी आणि निर्भीड व निर्भय अशी अंतःकरण वृत्ति याचा सगम झालेला होता. यामुळे भारतीय ज्योतिषाच्या बाबतं त त्याना महत्त्वाचे ग्रथ लिहितां आले. अेवढेच नव्हे तर अनेक वादग्रस्त विषयांवर युरोपियन विद्वानाची मते खोडून किंवा त्यांची खात्री पटेल अशीं प्रमाणें देअून हिंदी विद्वानाला योग्य तो मान देण्याची आवश्यकता युरोपियन विद्वानांना त्यांनी पटवून दिली. अुदाहरणार्थ डॉ.फ्लीट यांनी आपल्या ' गुप्ताचे शक ' या ग्रंथांत " मि दीक्षीत यांची मदत नसती तर मला गुप्तांचा शककाल निश्चित करतां आलाच नसता, " अशी स्पष्ट शब्दात कबुली दिली आहे. त्याचप्रामाणें ' अिंडियन कॅलेंडर ' या ग्रथाची योजना ठरवून त्याचे गणित देखील पुरे करण्यापर्यंत सुअेलनें मजल गांठली होती; त्यानंतर कै. दीक्षितांची व त्याची गाठ पडली. त्याबरोबर मेष संक्रांतीचे व अितर काही आंकडे देअून सदर ग्रथाची अुपयुक्तता पुष्कळच वाढविण्याची युक्ति दीक्षितांनी दाखविली व ती सुअेललाहि अितकी महत्त्वाची वाटली कीं 'तो भाग दीक्षितानी तयार करावा व ग्रंथ दोघांच्याहि नांवाने जोड संपादकत्वाखाली प्रकाशित व्हावा' असें ठरले. तथापि या ग्रंथाच्या प्रास्ताविक भागांत बहुतेक टीपा (S. B. D.) दीक्षितांच्या सहीच्या आहेत. आणि ' त्यातील कांही माहिती युरोपियनांना नवी वाटणारी किंवा न पटणारी असली तरी त्याची जबाबदारी माझ्यावर आहे' (I am responsible for all information given in this work which is either new to European scholars or which differs from that generally received by them.) असे नमूद करून त्यानीं ती ग्रथात घातली आहे. अर्थात युरोपियन विद्वानांना हे वादास आव्हानच होते. असे असून त्यांच्या हयातीत किंवा त्यांच्या मागून दीक्षितांनी केलेल्या विधानातील चूक दाखविणारा कोणी निघाला नाही हे लक्षात ठेवण्याजोगे आहे.

बरोबरीच्या नात्याने वागणाऱ्या सुअेलसारख्या अगर फ्लीटसारख्या युरोपियन विद्वानांशी सहकार्य करण्यास कै दीक्षित तयार असत हे वर सांगितले. त्याचप्रमाणें संशोधनाच्या बाबतीत कोणाची चूक आढळल्यास तो सशोधक युरोपियन असला तरी त्याची चूक स्पष्ट शब्दात, भीडभाड न धरतां लोकांपुढे मांडण्याचा दीक्षितांचा स्वभाव विशेषच कौतुकास्पद होता. ते शेवटपर्यंत सरकारी नोकरीत होते व साहेब लोकांच्या अनुकूल अभिप्रायानें त्यांना बढती करून घेण्याचा मार्ग मोकळा होता. परंतु असा विचार त्यांच्या मनास शिवलाच नाहीं असे दिसतें. अुदाहरणार्थ ' भारतीय ज्योतिःशास्त्र' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत हे

लिहितात, " येथे माझें मत सांगितल्यावांचून रहावत नाहीं की, आमच्यांतील कांही कांही मोठ्या विद्वानास देखील युरोपियनाचें वाक्य म्हटलें कीं ते कसेंहि असलें तरी वेदवाक्य वाटतें, ही गोष्ट स्वतःचे योग्यतेचा भरंवसा व विद्वत्तेची खात्री नाही, असे दाखविणारी आहे."

युरोपियनांवरील टीकाविषयक वादग्रस्त भाग या ग्रंथातून काढावा व त्याची चर्चा अिंग्रजी मासिकांतून करावी अशी सूचना अेका विद्वानाने त्याना केली होती. तिचा अुल्लेख करून दीक्षित भारतीय ज्योतिःशास्त्राच्या प्रस्तावनेंत लिहितात, "सूचनेप्रमाणे अिंग्रजी पुस्तकांतून कांही गोष्टींची चर्चा मी केली आहे. तरी या पुस्तकातून तो भाग काढून टाकावा हे मला ठीक दिसले नाही. सर्व वाचकाना तो अुपयोगी न वाटला तरी कांहीना तरी वाटेल. कदाचित या पुस्तकाचें अिंग्रजी भाषांतर होण्याचा सुयोग आल्यास माझें सविस्तर म्हणणें युरोपियन विद्वानांपुढें जाअून त्याचा योग्य विचार होअील. या पुस्तकाचें अिंग्रजी भाषांतर लवकर न छापल्यास याच्या काहीं भागाचें भाषांतर मुद्दाम करून घ्यावें लागेल असें अेका युरोपियन विद्वानाने मला लिहिले आहे "

वरील अवतरणात सागितल्याप्रमाणें 'भारतीय ज्योतिःशास्त्र' या विषयाचा व्यासग करणारे युरोपियन विद्वान, दीक्षिताचे समकालीन होते व त्यांनी हा ग्रंथ अिंग्रजीत लिहिला गेला असता तर दीक्षिताचें कौतुक केलें असते परतु त्या कौतुकापेक्षां आपणास मिळालेले ज्ञान व आपली मते आपल्या मातृभाषेत नमूद करून मराठी भाषेत विद्वत्ताप्रचुर ग्रथ निर्माण करण्याची संधी साधण्याची आवश्यकता दीक्षितांना अधिक आकर्षक वाटली. यावरून मराठी भाषेची सेवा आपल्या हातून व्हावी ही तळमळ त्यांच्या अतःकरणास लागलेली होती व कालातराने तरी आपला 'समानधर्मा' म्हणजे ज्योतिषशास्त्राचा खरा भोक्ता महाराष्ट्रात निपजेल अशी त्याची श्रद्धा होती असें म्हणण्यास हरकत नाही.

वैदिक कालापासून तों दीक्षितांच्या वेळेपर्यंतच्या अनेक भारतीय ग्रंथांतून ज्योतिष विषयक माहिती काय काय आढळते व तिच्यावरून अनुमाने काय निघतात या संबधींचें विवेचन करणें हा 'भारतीय ज्योतिःशास्त्राचा अितिहास' या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. तो मांडण्याकरितां दीक्षितांनीं पाचशेपेक्षां जास्त अितक्या संस्कृत ग्रंथाचें बारकाअीनें वाचन केलें. शेकडो दुर्बोध स्थळे सुबोध केली, आर्यभट्ट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य वगैरे ग्रंथकारांचा परिचय करून घेण्याचें सुलभ साधन मराठीत निर्माण केले आणि पंचांग शोधन विचार सर्व बाजूनें करतां येण्यास अुपयोगी पडणारी माहिती व पक्षोपपक्षास आपापल्या बाजूनें मांडतां येणारे मुद्दे या ग्रंथांत संग्रहित केले. सारांश, या ग्रथाचा विषय फार व्यापक व विविध स्वरूपाचा आहे.

विविधतेबरोबर दीक्षितानीं आपली विशिष्ट मतें या ग्रंथांत ठिकठिकाणीं मांडली आहेत त्यापैकी (१) सायन पंचांगाची ग्राह्यता, (२) वेदांचें प्राचीनत्व आणि (३) ज्योतिषशास्त्रांतील गणित भागाचे भारतीयत्व हीं तीन मतें महत्त्वाची आहेत. पहिल्या मतामुळे हिंदी विद्वानाशी वाद करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला; आणि दुसऱ्या व तिसऱ्या मतांमुळे युरोपियन विद्वानांचे सिद्धांतवत् मानले गेलेले अभिप्राय त्यांना कोठे व कसे चुकीचे आहेत हें दाखवावें लागले. कृत्तिका पूर्व दिशेस अुगवतात, तेथून त्या चळत नाहीत या अर्थाच्या शतपथ ब्राह्मणांतील अुल्लेखावरून त्यानी त्याचा इ. स. पूर्वी दोन हजार वर्षे हा जो काल ठरविला तो कसा खोडावा हे युरोपियनांना कोडे पडले आहे.

त्याचप्रमाणें "ग्रीक ज्योतिष आणि हिंदी ज्योतिष यांत साम्य आहे याचें कारण ग्रीक ज्योतिषाची मूलतत्त्वें हिंदुस्थानांत आली हें होय" असें जें मत थीबोनें मांडले होते त्याचें बारकाअीनें परीक्षण करून कै. दीक्षितांनीं असें दाखवून दिले की "अर्वाचीन काळीं हिंदूंनी ग्रीकापासून कांही घेतलें असें म्हणावें तर घेतलें काय ? हें सांगणें कठिण आहे. कारण दोघांच्या सख्या मुळीच मिळत नाहींत (भा. ज्यो. पृ. ५१३)." अुलटपक्षी 'टॉलेमीच्या ग्रथात मात्र अंशाचे ६० भाग ही पद्धति आहे. यावरून टॉलेमीपासूनच- हिंदूस ज्योतिषाचें सर्वस्व मिळालें.' असें बर्जेसनें प्रतिपादन केलें होतें. त्यासंबंधीहि दीक्षितांनी असे दाखवून दिलें की, "टॉलेमीच्या पूर्वीच्या वासिष्ठ सिद्धांतांत अंशाचे साठ भाग आहेत, आणि दिवसाचे ६० विभाग ही कल्पना मूळची आमची आहे हे निर्विवाद आहे. यावरून आमच्यापासून टॉलेमीने अंशाचे साठ विभाग मानण्याची पद्धति घेतली हे अुघड आहे."

सारांश, ज्योतिषविषयक प्रश्नाच्या वादांत कै. दीक्षित हे अधिकारयुक्त वाणीने बोलू शकत. याचे कारण युरोपियन व हिंदी अशा दोनहि भाषेंतील या-संबंधीची गणित पद्धती अनेक ग्रंथाच्या वाचनाने व मननाने त्यानी आत्मसात् करून घेतली होती. हें सव्यसाचित्व त्याच्या विद्वत्तेचें विशेष अग होते; आणि हें ओळखून दीक्षिताच्या मृत्यूनंतर अुपलब्ध झालेल्या भारतीय व युरोपीय ज्योतिषशास्त्राची पुरवणी त्याच्या ग्रथास देण्याची जबाबदारी महाराष्ट्रीय विद्वानांनीं पार पाडली पाहिजे.

# २७

## भारतिय ज्योतिर्गणिताचा अभ्यास

बरोबर दोनशें वर्षांपूर्वीं ( म्हणजे इ. स. १७४३ मध्ये) जयपूरचा सवाई जयसिंग मरण पावला. हा राजा थोरल्या बाजीरावाचा स्नेही व समकालीन आणि अनेक वेधशाळा स्थापणारा व विद्येचा पुरस्कर्ता म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्याच्या कारकीर्दींत पाश्चात्यांचें ज्योतिर्गणित समजून घेऊन भारतीय ज्योतिषाशीं त्याचा मेळ घालण्याचा पहिला प्रयत्न झाला; परंतु तो यशस्वी झाला नाही. पाश्चात्याचे गणित समजावून घेण्यासाठी त्याने ज्या पोर्तुगीज विद्वानांच्या द्वारे प्रयत्न केला ते पोर्तुगीज, रोमन कॅथोलिक पंथाचे अभिमानी असल्यामुळें, केप्लर व न्यूटन याच्या मतांना ते पाखंड मानीत, तेव्हा त्यांनी युरोपांतले जुन्या मताचे गणित जयसिगाच्या पदरच्या विद्वानापुढे मांडले. ते त्याना फार कमी प्रतीचे अर्थात अग्राह्य वाटले यात नवल नाही. यानतर युरोपात जयसिगानें दुसरी स्वारी पाठविली असती तर यश येण्याचा सभव होता. पण जयसिंग लौकरच मरण पावला व त्याच्या मागून राजपुतान्यांत यादवी माजली यामुळे जे थोडेबहुत पाश्चात्य ज्ञान जयसिंगाने करविलेल्या ' सिद्धान्त सम्राट ' वगैरे ग्रथांतून समाविष्ट झाले होते त्याची विचारपूसहि करणारा कोणी राहिला नाही. अर्थात युरोपवर दुसरी स्वारी करून तेथील नवीन उदयास आलेले ज्ञान हस्तगत होण्याचा सभव मुळातच नष्ट झाला हे सागावयास नकोच.

पण यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभी पाश्चात्यांनी भारतीय ज्योतिष ज्ञान मिळविण्यासाठीं स्वारी काढली. त्यांत कोलब्रुक हा अग्रेसर असून ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीत तो इ. स. १७८२ ते १८१४ पर्यंत बऱ्याच वरच्या हुद्यापर्यंत चढला. ' भारतीयांचें ज्योतिषग्रथ बारकाईने वाचण्याच्या योग्यतेचे आहेत ' असें त्यास वाटत असल्यामुळे त्याने अनेक पोथ्या मिळविल्या व त्यावरून पंडितांच्या सहाय्यानें त्यांतील विषय समजावून घेतला. ' हिंदुस्थानांत विद्येची जोपासना पूर्वीपासून होत आलेली आहे; तेव्हां त्या विद्येची परंपरागत पद्धतीने जोपासना व वाढ होण्यास इंग्रज सरकारने प्रोत्साहन द्यावें, ' असें त्यांचें मत होतें. परंतु भारतीयाच्या परंपरागत विद्येंत अर्थ नाही; व हिंदुस्थानावर पाश्चात्यांची संस्कृति व ज्ञान लादण्यांत हिंदी जनतेचें कल्याण आहे असें म्हणणारांहि

एक दुसरा पक्ष इंग्रजांत उत्पन्न झाला व मेकॉलेच्या वक्तृत्वामुळें या पक्षाची सरशी होऊन परंपरागत पद्धतीनें हिंदी ज्योतिषज्ञान विकसित होण्याची आशा समूळ नाहींशी झाली.

अशा रीतीनें राज्ययंत्र विरुद्ध पक्षाच्या हाती गेल्यानंतर कांही व्यक्तींनीं हौस म्हणन पाश्चात्य व पौरस्त्य ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्याचा काळ आला. इंग्रजी शाळा व कॉलेजे यांतून इतर शास्त्रांबरोबर ज्योतिषशास्त्रहि देशी भाषेतून शिकवावे लागत असल्यामुळें शिक्षकांना देशी परिभाषा लक्षात घ्यावी लागली; व त्यासाठी सिद्धान्त ग्रथ पाहूं लागले. त्याचप्रमाणें इंग्रजी ज्योतिष शिकलेल्या हिंदु सुशिक्षिताना आपलें पचांग नॉटिकलसारखें दृक्प्रत्यय देणारें व्हावें असें वाटूं लागल्यामुळें तेहि तेवढ्यापुरतें आमचे सिद्धान्त ग्रंथ किंवा करणग्रंथ चाळूं लागले. तेव्हां सायन निरयन वाद सुरू झाला. पुढें आमच्या ग्रंथांचें थोडेबहुत संशोधन सुरू होतांच ' भारतीय ज्योतिर्ज्ञान हें भारतीयांच्या बुद्धींत स्फुरलेल्या कल्पनेचा विकास आहे कीं ग्रीकाच्या उसनवारी ज्ञानावर भारतीयांनी मुलामा चढवून ' हे आमचें नाणें म्हणून थाटलेला व्यवहार आहे' व एकंदरीत भारतीयांचें जुन्यांत जुनें ज्ञानाचें भांडार म्हणजे वेद याचा काळ तरी कोणता ? या प्रश्नांची चर्चा करण्यात कित्येक विद्वान गढून गेले. या वादांतील कित्येक प्रश्न ज्योतिषशास्त्राचें असल्यामळे भारतीयांच्या सिद्धांत ग्रंथांतील वचनें विद्वानांना धुंडाळावीं लागलीं. तेव्हां अशा प्रसंगानें आमचे ज्योतिषविषयक ग्रंथ विद्वानांच्या दृष्टीखालून गेले तरी त्या ग्रथाचा बारीक अभ्यास त्यांना करतां आला नाही. आपल्या मुद्यापुरतें वचन त्या ग्रथांत कोठें आहे तें शोधून तेवढें उध्दृत करण्यावर त्यांना अवधान ठेवावें लागे. शिवाय, यांतले बहुतेक ग्रंथ हस्तलिखित पोथ्याच्या स्वरूपांत असल्यामुळे त्यांतले जेवढें अवतरण कोणी छापून ठेवलें असेल तेवढ्यावरच पुष्कळ वेळां काम भागविले जात असे. तथापि हे ग्रंथ छापून निघावे व त्यांचा स्वतंत्रपणें संपूर्ण अभ्यासहि कांहींनीं केला. पाहिजे ही कल्पना देखील यावेळी उद्‌भूत झाली. पण त्या कल्पनेचे प्रत्यक्ष कृतीत रूपातर होण्यास अनेक अडचणी असल्यामुळें, हे अभ्यासाचें व ग्रंथ प्रकाशनाचें काम फार मंदगतीनें चालले आहे. तथापि जें काम झाले आहे तें कशा प्रकारचें आहे व तें कसकसें होत गेले याचा वृत्तांत लक्षांत घेतल्यानें पूर्वीपेक्षां अधिक वेगानें काम होण्यास काय केलें पाहिजे, याचा उपाय सुचविण्यास मदत होण्याजोगी आहे. यासाठी येथे तो वृत्तांत थोडक्यांत सांगतो.

महाराष्ट्रांत इंग्रजी अमदानी सुरू झाल्यानंतर शिक्षणाचें काम मिशनरी मंडळींनीं प्रथम व्यवस्थितपणें आरंभलें. त्यांत अमेरिकन मिशन मार्फत नगर येथें बर्जेस नांवाचा शिक्षक इ.स. १८३९ मध्यें नेमला गेला होता, तो गणितज्ञ

होता. इंग्रजीतले ज्योतिष मराठी भाषेंत शिकवितांनां परिभाषेची अडचण भासूं लागली म्हणून परिभाषा करण्याचें काम बर्जेसकडे सोपविण्यांत आलें. त्या निमित्ताने त्यानें पुण्यास पंडितांकडे चौकशी केली; तेव्हां सूर्यसिद्धान्त हा ग्रंथ सर्वमान्य आहे असे त्यास कळले; त्यावरून त्याचे वाचन सुरू केलें; आणि १५ वर्षें खपून त्यानें सूर्यसिद्धान्ताचें इंग्रजी भाषांतर व त्यावर विस्तृत टीपा देणारा स्वतंत्र ग्रंथ तयार केला. पुढे तो अमेरिकन मिशनने छापला. पण छापण्यापूर्वी मिशनने एक कमिटी नेमून ग्रंथास पुरवणी व प्रस्तावना जोडण्याचा अधिकार प्रो. व्हिटने यास दिला होता. त्याप्रमाणें बर्जेसचें भाषांतर बारकाईनें वाचल्यानंतर व्हिटने याच्या मतें जो निष्कर्ष निघाला तो बर्जेसच्या मताच्या अगदी विरुद्ध होता. " हिंदूचे सिद्धान्त ग्रंथ ग्रीकापासून चोरलेल्या ज्ञानावर उभारलेले आहेत " असें व्हिटनेचे मत; आणि " भारतीयांनीं स्वतंत्रपणें ज्योतिषज्ञान मिळविलें व वाढविलें हें निश्चित असल्यामुळें कांहीं साम्यावरून उसनवारी मानावयाचीच असेल तर ग्रीकांनींच प्राचीनकाळीं हिंदू लोकांपासून उसने ज्ञान घेतलें असण्याचा संभव अधिक आहे " असा बर्जेसच्या मतानें ठाम सिद्धान्त आहे.

उत्तर हिंदुस्थानांत काशी वगैरे ठिकाणच्या पाठशाळेत शिकविण्यासाठीं म्हणून अशाच रीतीनें सिद्धान्त ग्रंथांची इंग्रजी भाषांतरें व त्यावर टिपणें प्रसिद्ध होऊ लागली. त्यात सूर्यसिद्धान्त व भास्कराचार्यांचा गोलाध्याय यांचे इंग्रजी भाषांतर विल्किन्सननें करून त्यावर टीपा देऊन सुधारलेली आवृत्ती काढण्याचें काम बापूदेवशास्त्री यानी इ. स. १८६१ मध्यें केलें. इ. स १८७४ मध्यें केर्न याने सटीक आर्यभटीय हा ग्रंथ हॉलंडमध्ये लाइडन येथे छापला. त्यानंतर पंचसिद्धांतिकेची मूळसंहिता व त्याचें इंग्रजी भाषांतर देणारा ग्रंथ थिबो व सुधाकर द्विवेदी याच्या जोड संपादकत्वाखाली इ. स. १८८८ त प्रसिद्ध झाला. तेथून पुढें या कामांत लक्ष घालणारा पाश्चात्य पंडित फारसा झाला नाही. आणि मूळ ग्रंथ छापण्याचें काम हिंदु पंडितांकडे आलें. यामुळे इंग्रजी भाषांतर व इंग्रजी टीपा यांचें लोढणें कमी झालें व सिद्धान्त ग्रंथ पुढच्या काळांत मूळ संस्कृत स्वरूपांत व संस्कृत टीकेसह प्रसिद्ध होऊ लागले. काशी येथें संस्कृत पोथ्या मिळण्याची सुलभता व थिबो सारख्याच्या सहाय्यानें इतर प्रांतांतील हस्तलिखित पोथ्या आणविण्याची सोय असा योग जमल्यामुळे बनारस येथील संस्कृत ग्रंथमालेंतून भास्कराचार्यांचे समग्र ग्रंथ ब्रह्मसिद्धान्त, (इ. स. १९०२) लल्लकृत शिष्यधीवृद्धिदसिद्धान्त, (इ. स. १८८६) आर्यसिद्धान्त, द्वितीय आर्यभटाचा महासिद्धान्त (इ. स. १९१०) व कमलाकराचा सिद्धान्ततत्वविवेक (इ स १८८५) ...इत्यादि ग्रंथ प्रकाशित झाले. मात्र हे प्रकाशित होताना इंग्रजी ज्योतिष जाणणाऱ्या वाचकासाठी आपण ग्रंथ प्रकाशित करीत आहों असें सुधाकर द्विवेदी

वगैरेना माहीत असल्यामुळें ते टीका लिहीत ती इंग्रजी ज्योतिष ज्ञानावर आधारलेली असे.

म्हणजे संहिता संस्कृत भाषेंतली आणि त्या खालची टीका ही संस्कृत भाषेंतली असा देखावा असला तरी संहितालेखकाची कल्पना संस्कृत टीकेंत प्रतिबिंबित झाली आहे असे काही ठिकाणी म्हणतां येण्याजोगें नव्हतें. त्याचप्रमाणें सुधाकर द्विवेदी हे पाठ ठरविण्याच्या बाबतीत विशेष काळजी घेत नसत व अर्थानुसधानाने आपला काल्पनिक पाठ देण्यास त्यांना हरकत वाटत नसे. यामुळें त्यांनी दिलेल्या टीका व पाठ आधुनिक पाश्चात्य गणितविषयक कल्पनांनीं भरलेल्या व कांही प्रसंगी प्राचीन भारतीय कल्पना समजण्यास प्रत्यक्ष अडथळा करणाऱ्या झाल्या आहेत. तथापि हा दोष स्वतः सुधाकरांच्याहि लक्षांत आला असावा असें दिसते; कारण आयुष्याच्या उत्तरार्धांत सिद्धान्त ग्रंथावर स्वतःची टीका लिहिण्याऐवजी, जुनी टीका मिळाल्यास ती प्रकाशित करण्यास त्यांनी आरंभ केला; आणि टीका प्रकाशित करण्याचें महत्त्व आपल्या शिष्यांना पटवून दिलें. त्याप्रमाणें पंडित मुरलीधर झा यांनी (इ. स. १९१७ मध्यें) ग्रहगणितावरील मरीची टीका व वासनावार्तिक मध्यमाधिकारापर्यंत छापले आणि पं. बबुआ मिश्र यानी खंडखाद्यकावरील आमराजांकृत टीका (इ. स. १९२५) छापली. श्रीपतीच्या सिद्धान्तशेखरावरील मक्किभटाची टीका इ. स. १९३२ मध्ये कलकत्ता विश्वविद्यालयाने प्रकाशित केली. याशिवाय त्रिवेंद्रग्रंथमालेंत आर्यभट्टीय ग्रंथावरील नीलकंठाचें भाष्य (इ स. १९३१) प्रकाशित झाले आहे. आणि पुणें येथील आनंदाश्रमग्रंथमालेंत प्राचीन टीकासह बीजगणित (इ. स. १९३०), लीलावती (इ स १९३७) व ग्रहगणित (इ. स १९३९) हे भास्कराचार्यांचे ग्रंथ छापून निघाले. तात्पर्य, पाश्चात्य गणिताच्या आघातानें हिंदुस्थानांत जी जागृति झाली तिचे पर्यवसान सिद्धान्त ग्रंथांचे व त्यांच्यावरील प्राचीन टीकांचे प्रकाशन करण्यात काही ठिकाणी झालें आहे. त्या मानाने ग्रंथातील गणिताचा अभ्यास मात्र खोलवर झालेला दिसत नाहीं.

महाराष्ट्रांतील प्रतिक्रिया यापेक्षां निराळ्या स्वरूपाची दिसते. पाश्चात्य ज्योतिर्गणित शिकून "नॉटिकल प्रमाणे आमचे पंचांग दृक प्रत्यय देणारे असावें" असें जें एकदा छत्रे याच्या मनाने घेतलें त्या कल्पनेच्या सिध्यर्थ आतांपर्यंत महाराष्ट्रांत ज्योतिर्विदांची खटपट सुरू आहे इ. स. १८६०।६१ मध्ये ग्रहगणिताचीं व पंचांगसाधनाचीं कोष्टकें केरोपंत छत्रे यानी इंग्रजी ग्रंथाच्या आधारें रचून मराठीत प्रसिध्द केली. आणि इ. स १८८० मध्ये पटवर्धनी पंचांग छापण्यास प्रारंभ केला. त्यापूर्वीं विसाजी रघुनाथ लेले, यानी सायन निरयन वादास इ. स. १८७४ मध्यें सुरुवात केली. त्यांत निरयन पंचांगास बहुमत अनुकूल असल्यामुळें

अयनांश किती धरावे हा घोटवाद निर्माण झाला. अशा वेळी इ. स. १८९८ मध्ये रैवत व चैत्र या दोनही पक्षाचें गणित ज्यावरून करतां येईल असा "ज्योतिर्गणित" हा केतकरांचा ग्रंथ आनंदाश्रम संस्थेतर्फे छापून प्रकाशित झाला. हा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिलेला असल्यामुळें तो महाराष्ट्राबाहेरील प्रांतांतहि विद्वानांच्या वाचण्यांत आला. यात पाश्चात्य ज्योतिष्यानी निश्चित केलेले मूलाङ्क घेऊन पंचांगाचें गणित व ग्रहांची स्थाने नॉटिकलच्या बरोबरीने आणण्याची व्यवस्था केली आहे. या ग्रंथात कोष्टकावरून गणित कसे करावे हेच मुख्यत: सांगितले असलें तरी तीं कोष्टकें ज्या सूत्रांच्या आधारे रचलीं त्याचेंहि दिग्दर्शन ठिकठिकाणीं केलें आहे. इ. स. १९२४ मध्यें छापिलेला करणकल्पलता ग्रंथ निरयन पचागांत अयनाश शुद्धता, दृकप्रत्यय व सूक्ष्मता यावी, या हेतूनें प्रकाशित झाला. आणि १९३१ मध्यें प्रि. गोविंदराव आपटे यांचा सर्वानन्द करण हा ग्रंथ बाहेर पडला. यांत अयनांशाचा वाद बाजूस सारून सायन ग्रह आणण्याचें गणित दिलें आहे व त्यापेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या सूत्रांच्या आधारावर कोष्टके रचण्यांत येतात त्या समीकरणाची गोलीय भूमितीच्या पद्धतीनें उपपत्ति दिली आहे. कै. पवार यांनी केलेले ग्रथहि याच स्वरूपाचे आहेत. मिळून आमचे पंचांग दृकप्रत्यय देणारें होण्यासाठी पाश्चात्य गणित कसे उपयोगांत आणावें या संबंधीचा महाराष्ट्रांत अभ्यास बारकाईने झाला आहे. आणि नवीन पंचांग करण्याचा प्रश्न हिंदुस्थानांत कोणत्याहि प्रातांत निघाला असता तेथील लोकांना महाराष्ट्रांतील विद्वानांनीं केलेले ग्रंथच हातांत घेणें भाग पडेल अशी योग्यता या ग्रंथांची आहे.

आतां भारतीय ज्योतिर्गणिताचा अभ्यास महाराष्ट्रात कोणी कोणी केला ते पाहूं. इ. स. १८७७ मध्ये ज. बा. मोडक यांनी "भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष" हे पुस्तक प्रसिद्ध केलें. विनायकशास्त्री खानापूरकर यांनी लीलावतीच्या मराठी भाषांतरास व उपपत्तीस आरंभ करून बीजगणित (इ. स. १९१३) ग्रहगणित व गोलाध्यायाचा पूर्वार्ध या क्रमाने आजीव हे काम केले. आणि अलीकडे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी भास्कराचार्यांची गणितपद्धति पाश्चात्य पद्धतीशी ताडून पाहण्यासाठीं 'भारतीय ज्योतिर्गणित' हा ग्रंथ इ. स. १९१३ त छापला. शुद्धपंचांग तयार करण्याची "पंचांग चिंतामणि" सारिणी १९३५ मध्यें पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन यांनीं छापिली.

रामचंद्र विनायक पटवर्धन यांनी सन १९३५ मध्यें सूर्यसिद्धांताच्या पहिल्या ३ अध्यायांचे सोपपत्तिक मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें असून त्यांत प्राचीन भारतीय ज्योतिषाचार्यांनी त्या त्या काळीं ग्रहगतिमानें सूक्ष्म दृष्टीनें व स्वतंत्र बुद्धीनें ठरवून दिली असल्याचें दाखविलें आहे. त्यापूर्वीं ग्रहलाघव ग्रंथाचें मराठी

भाषांतर शके १८७८ मध्यें कृष्णशास्त्री गोडबोले व वामन कृष्ण गद्रे जोशी यानी सोदाहरण छापले आहे.

तथापि या दिशेने प्रयत्न करणाऱ्यांत शंकर बाळकृष्ण दीक्षित हे प्रमुख अधिकारी असे विद्वान होऊन गेले. त्याचा 'भारतीय ज्योतिःशास्त्र' हा ग्रंथ सर्वांच्या परिचयाचा असल्यामुळे त्याचें वर्णन देण्याचें कारण नाहीं. पण हें काम करताना ठिकठिकाणीं असलेल्या हस्तलिखित पोथ्यांच्या नकला करण्यांत त्याना बराच वेळ घालवावा लागला. आणि त्यानंतर ग्रथकाराचा कालनिर्णय व प्रत्येकानें केलेल्या ग्रथांचें पौर्वापर्व निश्चित करण्यांत त्यांना पुष्कळ वर्षे घालवावी लागली. "भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास" लिहावयाचा हे ध्येय त्याच्या दृष्टीपुढें असल्यामुळे प्रत्येक ग्रथातील विषयाची रूपरेषा मात्र त्यानीं सांगितली, त्यांतील ज्योतिर्गणिताचे सागोपाग विवेचन त्यांनी केलेलें नाही. प्रसंगोपात्त त्यांनी निरनिराळ्या सिद्धातानुसार गणित केल्याची उदाहरणें त्यांच्या ग्रथात आलीं आहेत; त्यावरून हे काम त्याना उतम रीतीने करता आले असते. पण त्यांच्या मृत्यूमुळे ते कार्य झाले नाही.

त्यांच्या मागून नागपूरचे विद्वान् संशोधक डॉ. केशवराव दप्तरी यांनीं या दिशेने महत्त्वाचे काम केलें आहे. 'भारतीय ज्योतिःशास्त्र निरीक्षण' या १०४ पानांच्या लहानशा ग्रंथात भारतीय ज्योतिर्गणिताचा बारीक अभ्यास कसा करावयाचा हें सोदाहरण दाखवून दिले आहे. या ग्रंथांत दीक्षिताच्या ग्रथांतील उणिवांचें व चुकाचें आविष्करण केले असल्यामुळे त्यास "भारतीय ज्योतिःशास्त्र परीक्षण" हे नांव देणे योग्य होते असे प्रस्तावनाकार श्री. कृ. कोल्हटकर यांनीं म्हटले आहे. इ. स. १९२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या निबंधांत कै. दीक्षित यानीं दिलेले कांही ग्रथकाराचे काळ चुकीचे ठरविले आहेत. उदाहरणार्थ मूलसूर्यसिद्धांताचा काळ दीक्षितानी शकपूर्व ठरविला आहे तर दप्तरी यांनीं तो शकोत्तर असा निश्चित केला आहे. बगालचे विद्वान् सशोधक प्रबोधचंद्र सेनगुप्त यांनींहि इ. स. १९३५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या निबंधांत मूलसूर्यसिद्धातांचा शक ४२१ हाच काळ मान्य केला आहे. तथापि 'भारतीयांनी ज्योतिःशास्त्र ग्रीकांपासून घेतले की काय ? या प्रश्नाचा निर्णय करणें,' 'कलियुगारंभी ग्रह एकत्र होते ही गोष्ट कल्पित नसून प्रत्यक्ष पाहिलेली आपल्या ज्योतिष्यास परंपरेनें माहीत होती' आणि "शुद्ध मध्यमगति, मदशीघ्रपरिधि व उच्चे पाश्चात्यांची घेणें व स्पष्टगति प्रमेयांत युरोपीय ज्योतिषशास्त्रानुसार बदल करणें ही भारतीय ज्योतिष्यांचीं कर्तव्ये आहेत," या मुद्यांचे विवेचन करणे हा दप्तरी यांच्या निबंधाचा हेतु आहे. म्हणजे एकीकडून युरोपियनांच्या आक्षेपास उत्तर देणें व दुसरीकडून आजचे पाश्चात्यांचे शद्ध आकडे व त्यांची प्रमेयें आमच्या लोकांनीं घेतली पाहिजेत

हे सांगणें या प्रीत्यर्थं आमच्या ज्योतिष ग्रंथांतील मूलाकाची तपासणी यांत आहे. मिळून दीक्षित, दप्तरी व सेनगुप्त यांनी एकमताने हाच सिद्धांत प्रस्थापित केला आहे कीं, "भारतीयांचे सिद्धान्त ग्रंथ टॉलेमीच्या मागून लिहिले गेले असले तरी ते भारतीयानी केलेल्या अवलोकनावर व त्यांच्या स्वतंत्र सुचलेल्या कल्पनावर आधारलेले आहेत. कारण भारतीयांचे मूलाक ग्रीकाच्या मुलांकाहून निराळे आहेत. ग्रीकांकडून अगर खाल्डियनाकडून त्यानी कांही उसने घेतलें असले तर प्रतिवृत्ताची केवळ कल्पना मात्र घेतली. पण त्या कल्पनेप्रमाणे जे मदकलादिकांचे आकडे मानावे लागतात ते भारतीयांनी स्वतंत्रपणें निश्चित केले."

अशा रीतीने मूळ वसिष्ठापासून भास्कराचार्यापर्यंतच्या आमच्या ज्योतिष ग्रंथांत एकेक सुधारणा कमाक्रमाने सुचत गेल्याचा पुरावा आहे हे आतांपर्यंतच्या विद्वानांनी केलेल्या विवेचनावरून निश्चित झाले आहे. अर्थात् भारतीय ज्योतिर्गणित हे हजार बाराशें वर्षे स्वतंत्रपणे विकसित होत गेलेल्या पद्धतीचें परिणत फल आहे असा याचा अर्थ होतो. तेव्हा ही पद्धति कोणत्या क्रमाने उत्क्रात होत गेली याचा बारीक अभ्यास करणें हे काम अजून व्हावयाचें आहे. गेल्या चाळीस पन्नास वर्षांत झालेल्या सिद्धांत ग्रंथ, करण ग्रथ व टीका ग्रंथ याच्या प्रकाशनाने हे काम करण्यास उपयोगी पडणारी बरीच साधनसामुग्री, अभ्यासकांच्या हाती दिली आहे. ती वाचून भारतीय ज्योतिर्गणिताचा सविस्तर इतिहास लिहून दाखविणे आवश्यक आहे.

हा इतिहास लिहितांना केप्लर किंवा न्यूटन याना सुचलेली प्रमेयें भारतीयांना सुचली नाहीत या गोष्टीला प्राधान्य देण्याचें कारण नाही; कारण भारतीयांना सुचलेल्या प्रमेयांचा संग्रह व त्यांची उत्क्राति दाखविणें हे इतिहास लेखकाचें मुख्य काम असते. प्रत्येक काळांत कांहीं गोष्टी गृहीत धरूनच शास्त्राचा विचार करावा लागतो; व या विचारात जी प्रमेये सुचतात त्यास अनुसरून गणित करतांना कांही पद्धति निर्माण होते. आणि त्या पद्धतीने कांही प्रश्न बरोबर सुटतात, म्हणून त्या काळी त्या पद्धतीला मान्यता मिळालेली असते. पण पुढें अधिक बारकाईत शिरण्याची साधने अस्तित्वात आली व त्या बारकाईला पटणारें उत्तर जुन्या गणितानें येईनासें झाले म्हणजे जुन्या गृहीत गोष्टीहि सोडणें क्रमप्राप्त असतें.

उदाहरणार्थ, आर्यभट लंबन संस्कार करीत नव्हता; यामुळे त्याच्या उत्तरांत बरीच चूक रहात होती. पण लंबनसंस्कार केल्यानें दृक्प्रत्यय येतो हे लक्षांत आल्यावर पुढच्या ग्रंथकारांनीं तो संस्कार मानला व ठोकळ मानाने त्याचे प्रमाण सुचविलें. पण त्याच्याहि नंतरच्या गणितवेत्यांनी त्यांत बारकाई आणली. उदाहरणार्थं पंचजीवा पद्धतीनें आर्यभट, श्रीषेण व विष्णुचद्र हे सूर्य ग्रहणाचें गणित करीत;

पण यानें गणित फार स्थूल होतें म्हणून ब्रह्मगुप्ताचें म्हणणें सयुक्तिक आहे असे पट-ल्यामुळें मीहि ती पद्धति स्वीकारली आहे असें तो म्हणतो *

त्याचप्रमाणें बारकाईचें गणित साधण्यासाठीं 'असकृत् कर्म' (Successive Approximation) या नांवाची जी योजना ब्रह्मगुप्तापासून अनेक सिद्धांतकारानी प्रत्यक्ष कृतीत आणली होती, ती आजहि सूर्य ग्रहणाचे गणित करण्याच्या कामी पाश्चात्य गणित्यांना वापरावी लागते. तात्पर्य भारतीयाची गणित पद्धती आजहि विद्वानांनी अभ्यासावी अशा योग्यतेची आहे. तिचा बारीक अभ्यास केलेल्या लोकांना त्या रीतीनें कोठवर दृक्प्रत्यय साधता येतो हे समजेल व त्यापेक्षां अधिक बारकाई साधण्यासाठी पाश्चात्य कल्पनेतील कोणता भाग पत्करला पाहिजे हे नेमकें सागतां येईल केवळ पाश्चात्य पद्धतीच्या अभ्यासकाला आमच्या समाजास पटेल अशा रीतीने ज्योतिर्गणिताचा विषय सागता येणार नाही. कारण भारतीय समाज हा कांही ज्योतिर्गणित मुळीच न जाणणारा अशा अडाणी स्थितीतला नव्हे. त्यांत परंपरेने काही सीमेपर्यतचे ज्योतिषशास्त्रविषयक ज्ञान पायाशुद्ध रीतीने फैलावलेले आहे, तेव्हा त्या ज्ञानाचा सागोपाग इतिहास लक्षांत घेईल त्याला आमच्या समाजाशी समरस होऊन देखील समाजाला पुढे नेता येईल.

मिळून (१) सिद्धान्त ग्रथ छापणे, (२) पाश्चात्य गणिताशी आमची पद्धति ताडून पाहणे, (३) पाश्चात्याच्या आक्षेपास उत्तर देणें, (४) आमच्या ग्रंथकाराचें पौर्वापर्व ठरविणे व (५) अयनाशाच्या वादात कांही नक्षत्रांचे भोग पाहण्यासाठी सिद्धान्त ग्रथ हाती घेणे, हीं जी कामे आजवर झाली आहेत त्यांत आमच्या ग्रंथांची पाहणी अगदीं स्थूल स्वरूपाची होती; व ग्रथातील विषयावर मनाची एकाग्रता रहात नव्हती. यासाठी यापुढे भारतीय ज्योतिर्गणिताचा स्वतंत्रपणें अभ्यास करणें हे आमच्या विद्वानांचे कर्तव्य आहे.

---

* न स्फुटं भवति पंचजीवया । लम्बनं न हि यतस्ततः कृतम् । युक्तमुक्तमिति जिष्णुसूनुना । तन्मयाऽपि कथितं परिस्फुटम् ।। श्लोक १८ सिद्धान्तशेखर सूर्यग्रहणाध्याय.

# २८

## अंकगणिताची प्रगति व भास्कराचार्यादिकांचे ग्रंथ

लीलावती या ग्रथाचें नांव व ग्रह लाघवी पंचाग याची माहिती महाराष्ट्रांत आबालवृद्धांना आहे; परंतु भास्कराचार्याने केलेल्या 'लीलावती' ग्रथास एवढें महत्त्वाचें स्थान का देण्यात येते व लीलावतीवर अनेक प्राचीन लेखकांनीं टीका लिहिल्या असल्या तरी ग्रहलाघवकार गणेश दैवज्ञ याची 'बुद्धि विलासिनी टीका' ही सर्वात श्रेष्ठ कां गणली जाते या शकाचे समाधान करता येण्याजोगी माहिती सामान्य मराठी वाचकाना उपलब्ध नसते. याकरिता ती या ठिकाणी द्यावयाचें योजिलें आहे

### 'लीलावती'

भास्कराचार्याने आपल्या वयाच्या ३६ व्या वर्षी शके १०७२ मध्य (इ स. ११५०) 'सिद्धांतशिरोमणी' हा ग्रंथ रचला. या ग्रथाचे पाटी गणित (Arithmetic), बीजगणित (Algebra), ग्रहगणित (Mathematical Astronomy) व गोलाध्याय (Spherical astronomy) असे चार भाग आहेत. यापैकी पाटी गणितालाच 'लीलावती' हें टोपण नाव दिलेले आहे. लीलावतीत आजच्या दृष्टीने सारे अकगणित आणि बीजगणीत व रेखागणित यातीलहि काही भाग याचा अतर्भाव झालेला आहे श्रेढी व्यवहार ((Progressions) व अकपाश ( Permatations ) ी प्रकरणें पाश्चात्य पद्धतीने बीजगणितात अतर्भूत होतात आणि क्षेत्र व्यवहार ( Mensuration ) हे भूमिति शास्त्राचें अग समजतात. तथापि भास्कराचार्याने हे विषय पाटी गणितात धरले आहेत. याचें कारण भारतीय गणितिकाच्या मते समीकरणाच्या आश्रयानेच जे उदाहरण सोडवावें लागते त्याचाच अतर्भाव बीजगणितात व्हावा. रेखागणित अथवा भूमिति अशी गणिताची स्वतत्र शाखा भारतीयानी मानलेली नाही यामुळें तो विषय पाटी गणितात धरणें त्यांना भाग पडले. शिवाय हे लक्षात ठेवले पाहिजे की, अकगणित हे शास्त्र भारत वर्षांत प्रथम ५ व्या शतकापूर्वी जन्मास आले व येथील बुद्धिमंतांनी पाच सहाशे वर्षें एकसारखे परिश्रम करून त्याला प्रौढावस्थेस पोचविले. तेव्हां येथील गणितज्ञांची कीर्ति परदेशांत पोचून अरबानी प्रथम हें शास्त्र ८ व्या

शतकांत भारतीयांकडून समजावून घेतलें आणि तेथून त्याचा प्रसार १० व्या शतकांनंतर युरोपांत झाला. त्याचप्रमाणें बीजगणितांतील साधी समीकरणें मात्र सोडविण्याची माहिती ज्यावेळी युरोपांत होती त्या काळांत प्रथमार्यभट्ट, ब्रह्मगुप्त, श्रीधराचार्य, पद्मनाथ, द्वितीयार्यभट्ट आणि भास्कराचार्य यांनीं अनेक वर्ण समीकरणें व वर्गसमीकरणें सोडविण्याचे नियम शोधून सूत्रबद्ध केले होते. तात्पर्य, पाचसातशें वर्षे पाटीगणित व बीजगणित, या शाखांचें पाऊल पुढें पाडण्याकरितां गणितज्ञांची जी अखंडपरपरा भारत वर्षांत निर्माण झाली तिच्यातील शेवटचा पुरुष म्हणजे भास्कराचार्य.

## प्रगतीची परंपरा

अर्थात त्याच्या ग्रंथात पूर्वींच्या ग्रथातील ग्राह्य भागाचा संग्रह असून, प्राचीन ग्रथकाराच्या दोषाचें आविष्करण व खंडन हेहि ठिकठिकाणी त्याने केलेलें आहे. जुन्या ग्रथकारांच्या दोषाचें अविष्करण भास्कराचार्याने केले ते आत्मप्रौढी मिरविण्याकरिता केले नसून आपल्या लक्षात आलेल्या सिद्धाताचे प्रस्थापन करण्यासाठी असें करणें त्याला प्राप्तच होते. भास्कराचार्याने ज्यास गुरुस्थानी मानले तो ब्रह्मगुप्त तर पहिल्या आर्यभट्टाचे दोष दाखविण्यासाठी अनेक स्वतंत्र अध्याय खर्ची घालतो आणि बराच तपशील दिल्यानंतर 'आर्यभट्टदूषणाना सख्या वक्तु न शक्यते' असे शेवटी बजावून ठेवतो. या नतरच्या काळांत ब्रह्मगुप्ताच्या काही चुका दाखवून वास्तविक सिद्धांत अमूक आहे हे प्रतिपादण्याचा प्रसग द्वितायार्यभट्ट व भास्कराचार्य याच्यावर आला; तेव्हां त्यांनींहि अशीच कडकडून टीका केली आहे. उदाहरणार्थ, चतुर्भुजाच्या नुसत्या बाजूची लांबी सागितली असता चतुर्भुजाचे क्षेत्रफळ काढण्याचे नियम ब्रह्मगुप्तादिकांनी दिले होते. परतु भुजाच्या लाबी खरीज कर्ण किंवा लब यांचे मान दिल्यावांचून निश्चित क्षेत्रफळ काढणे अशक्य आहे ही गोष्ट पुढील गणितज्ञांच्या लक्षात आल्यामुळें त्यांना पूर्वींच्या ग्रथकाराना दोष देणें भाग पडलें. तेव्हा केवळ चार बाजूची लांबी सागून क्षेत्रफळ विचारणारा पृच्छक 'पिशाच' असला पाहिजे आणि अशा पृच्छकाला निश्चित उत्तर देणारा हा तर 'सवाई पिशाच' म्हटला पाहिजे असे उद्‌गार भास्कराचार्यांनी आपल्या ग्रंथांत काढले आहेत. (स पृच्छकः पिशाचो वा वक्ता वा नितरां ततः। – आनंदाश्रम 'लीलावती' पृ. १६०). तात्पर्य, गणित शास्त्रात नवे नवे सिद्धांत शोधण्याची व प्रस्थापित करण्याची अहमहमिका चार पांचशे वर्षे चालू असल्यामुळें पूर्वींच्या ग्रथकारांनी लिहिलें असेल त्याचा' 'बाबावाक्यं प्रमाणं' या न्यायाने स्वीकार न करतां आपल्या बुद्धीला पटेल तें मान्य आणि न पटेल त्याचा स्पष्ट शब्दांत निषेध करण्याचा प्रघात रूढ होता.

## देशी गणिताचा पडता काळ

परंतु भास्कराचार्यानंतर डिशे वर्षांनी परिस्थिती अेकदम पालटली. अल्लाउद्दीनानें दक्षिणेंतील राज्ये बुडवून जे मन्वतर घडवून आणलें त्यांत वर सांगितलेली गणितज्ञांची परंपरा सर्वस्वी बंद पडली. ब्रह्मसिद्धान्त मागे पडून भास्कराचार्यांच्या सिद्धान्तशिरोमणीने जसें आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केले, तसे सिद्धान्तशिरोमणीला मागें टाकणारा गणिती निर्माण होण्याचें तर दूरच राहिलें; पण भास्कराचार्यांचे ग्रंथ देखील समजण्याची मारामार पडू लागली. तेव्हां हे ग्रथ समजावून सागण्याची योग्यता परपरेने ज्या थोड्या घराण्यात होती, त्यांनी भास्कराचार्यांच्या ग्रथावर टीका लिहिण्याचे काम पत्करलें. यामुळें लीलावती वगैरे ग्रंथांत कोणता विषय प्रतिपादला आहे याची परपरित माहिती समजण्यास साधन निर्माण झालें लीलावतीतील सूत्रें व उदाहरणे याच्या स्पष्टी-करणासाठी स्वतः भास्कराचार्यांने कांहीं भाग टीकात्मक लिहिला आहे त्याला 'वासनाभाष्य' म्हणतात. या वासनाभाष्याच्या आधारावर व शब्दास प्रतिशब्द देऊन आणि उदाहरणें सोडवून बहुतेक टीकाकारांनी आपले काम भागविलें आहे. परंतु टीकाकारात देखील सरस निरस कार असावयाचेच; या दृष्टीने 'वर सांगितलेलें साधे काम करण्यास मोठेसे बुद्धिकौशल्य लागत नाही; तर भास्करा-चार्यानें दिलेल्या सूत्रांची उपपत्ति समजावून सांगणे हे बिकट पण अग-त्याचे काम करून दाखविण्यात विशेष महत्त्व आहे' हे ज्यांनी ओळखले असेहि कांहीं श्रेष्ठ टीकाकार होऊन गेले. अशा टीकाकारांत गणेश दैवज्ञ याची गणना प्रामुख्याने केली पाहिजे. या गणेश दैवज्ञाचा बाप केशव हा मोठा विद्वान व वेधकुशल ज्योतिषी होता; आणि मुलाने बापाची सर्व विद्या आत्मसात् करून व स्वतःच्या विचाराने त्यात थोडी भर घालून मुहूर्त व फलित यांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्या खेरीज 'ग्रह लाघव' हा करण ग्रथ त्यानें केला तो आजपर्यंत पंचांगें करण्यास आधारभूत होऊन बसला आहे. अशा विद्वानाने भास्करा-चार्यांच्या ग्रंथांवर उपपत्ति सागणारी टीका शके १४६७ मध्ये लिहिली. तिच्या प्रारंभीं गणेश दैवज्ञ म्हणतो—

श्रीभास्करोक्तवचसामपि सस्फुटानां
व्याख्याविशेषकथनेन नचास्ति चित्रम्
अत्रोपपत्ति कथनेऽखिल सारभूते
पश्यन्तु सुज्ञगणका मम बुद्धिचित्रम् ।।

## भारतीयांचे संकेत

आणि या प्रतिज्ञेस शोभण्याजोग्या मार्मिक रीतीने त्यानें उपपत्तीचे काम पार पाडलें आहे. भास्कराचार्यांच्या ग्रंथांत जी सूत्रें अथवा जे नियम सांगितले

आहेत ते त्रोटक स्वरूपाचे आहेत; म्हणजे अमूक जातीचा प्रश्न असल्यास त्यांत अमक्याने गुणावें, भागावें किंवा मिळवावे असें मोघम सांगितलें आहे. पण हा नियम कशावरून बसविला हें समजण्याचे साधन त्या सूत्रांत नसते. भास्कराचार्यांच्या वेळी हा उलगडा 'आचार्य म्हणजे शिक्षक हे विद्यार्थ्यांना तोंडी सांगत होते; यामुळें अडचण भासत नव्हती. पण पुढें मुसलमानी अमदानींत अशा पाठशाळा व गुरुपरंपरा दुर्मिळ झाल्या. याकरितां उपपत्ति सांगणें गणेश दैवज्ञासारख्याला अवश्य वाटले. या उपपत्तीच्या बाबतीत वैशिष्ट्य आहे ते हें की, त्यात कांहीं सूत्रांची उपपत्ति बीज पद्धतीनें दिली आहे, कांहींची भूमिती पद्धतीनें दिली आहे आणि काही ठिकाणी तर दोनहि पद्धतीचा उपयोग करून इष्टसिद्धि केली आहे. त्यामुळे भारतीयाचें गणितविषयक संकेत काय होते, ते कोणती चिन्हे उपयोगात आणीत, समीकरणे कशी लिहीत, भूमितीसबंधी कोणता भाग त्यांना माहीत होता अित्यादि संबंधी सांगोपांग माहिती या टीकाग्रंथाच्या बारीक अध्ययनाने वाचकांस मिळू शकते. हे खरें आहे की, आज आपल्या परिचयाची पाश्चात्य गणिताची पद्धती व त्यातली अधिक, उणें, गुणिले, वर्गमूळ अित्यादि चिन्हे या जुन्या हस्तलिखित ग्रथांत आढळत नाहीत; यामुळे त्यातील आशय लक्षांत घेण्यास पुष्कळ अडचण पडते. परंतु भारतीय गणितशास्त्राचा अितिहास जर यथार्थ रीतीने लिहिला जाणे अवश्य असेल आणि आमच्या प्राचीन ग्रथांतील ग्राहय भाग टिकवून पुढे पाऊल टाकावयाचें असेल तर या प्राचीन गणित ग्रंथविषयक टीका लक्षपूर्वक वाचणे, समजावून घेणें आणि त्या छापून अभ्यासकांना उपलब्ध करणें अत्यंत जरूरीचे आहे. अस्सल पत्राच्या व अितर जुन्या हकीकतीच्या साहाय्यानें जसा राजकीय व सामाजिक अितिहास रचावा लागतो व त्या संबंधीचे जुनें कागद वाचण्यास कंटाळा करून चालत नाही, तोच प्रकार आमच्या गणितशास्त्रासंबंधी झालेला आहे.

## अुपेक्षा थांबवा

गणित शास्त्रांत शोध लावणाऱ्या आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त व भास्कराचार्य यांची परंपरा बाराव्या शतकानंतर प्रतिकुल परिस्थितीमुळे बंद पडली. तरी अनेक टीकाकारांनी मूळ ग्रंथ व त्यावरील परंपरागत माहिती टीकाग्रंथरूपानें संग्रहित केली. पुढे त्याहीपेक्षां कठीण धामधुमीचा काळ आला तरी जुन्या ग्रंथाच्या प्रती तरी कित्येक भाविक लेखकांनी केल्या. त्या गणित न जाणणाऱ्या लेखकांनी केल्यामुळे त्यांत अनेक चुका व अशुद्धें आहेत. पण अनेक प्रती मिळविल्या असतां ग्रंथकाराचा आशय बहुतांशी समजून घेण्यास अडचण पडत नाही. अर्थात् हे काम न केल्यास ही ग्रंथसंपत्ति कायमची नष्ट होअील. गेल्या शंभर वर्षांत पाश्चात्य

पद्धतीनें गणिताचे अध्ययन आमच्या देशांत चालू आहे. पण गणितात नवीन शोध लावणारा भारतवर्षांत अेकहि भास्कराचार्य निघाला नाही. याचा अर्थ पाश्चात्य पद्धती आम्हांस मानवली नाहीं किंवा पचली नाहीं असा होतो. तेव्हा अकगणित व बीजगणित यांचा पाया घालणें व त्याची वाढ करणें ही कामें ज्या ग्रथांनी केलीं त्या ग्रंथांत आमच्या बुद्धीला चालना देणारा भाग आहे किंवा काय, हे आपण अवश्य पाहिलें पाहिजे. प्रवेश परीक्षा व कॉलेजांतील पहिले वर्ष या अवधीत अंकगणित व बीजगणित याचा जो भाग सध्या पाश्चात्य पद्धतीनें शिकविला जातो. तो आमच्या प्राचीन ग्रंथोक्त पद्धतीनें शिकविल्यास विद्यार्थ्यांची या विषयातील ग्राहकता निश्चितपणें वाढेल आणि पुढें ते पाश्चात्यांचे ज्ञानहि सहज पचनी पाडतील. या करितां आमच्या देशी गणितिकाची जी अुपेक्षा करण्यात येते ती थांबवून अध्यापक वर्गाने त्याच्या ग्रंथाचे परिशीलन केले पाहिजे.

भास्करार्यांच्या ग्रंथाची भाषातरे आजपर्यंत अनेकांनीं निरनिराळ्या भाषांतून केली आहेत; व त्यास स्पष्टीकरणाचा व अुपपत्तीचा भागहि कित्येकांनीं जोडला आहे. पण या अुपपत्त्या पाश्चात्य पद्धतीच्या आहेत. त्या आधुनिक शिक्षितांना समजण्यास सोप्या असतात यात शंका नाही. परंतु त्या अुपपत्त्या भास्कराचार्यांच्या किंवा भारतीयाच्या डोक्यांतल्या नव्हेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

## मूळ ग्रंथ छापण्याची आवश्यकता

भारतीयाची गणितसरणी समजून घेण्यास जुने टीकाग्रथ वाचण्यावाचून गत्यंतरच नाही, या जुन्या पोथ्याचा संग्रह करून त्यातील पद्धतीचे दिग्दर्शन अि. स. १८१७ मध्यें कोलब्रुकने प्रथम केले. ' ब्रह्मगुप्त व भास्कर ंचे पाटीगणित व बीज गणित' या नांवाचा भाषातर रूपी अिग्रजी ग्रंथ लंडन येथे त्यावर्षी त्याने छापला. त्यात त्याने लीलावतीवरील गंगाधर, सूर्यदास, गणेश रगनाथ, रामकृष्णदेव या टीकाकाराचा व गणित कौमुदी नावाच्या टीकाग्रंथाचा अुल्लेख करून त्या टीकातील काही भाग पादटीपात भाषांतर करून दिला होता. कोलब्रुकचा ग्रथ दुर्मिळ झाल्यामुळें श्री. हरनचद्र बानर्जी यांनी अि. स. १८९२ मध्ये या ग्रंथाची जी पुनरावृत्ति काढली तिचे पुनर्मुद्रण अि. स. १९२७ मध्यें झाल्यामुळें, हा ग्रथ सध्या मिळू शकतो. अिंग्रजीतून या विषयाची त्रोटक माहिती करून घेण्यास हा ग्रथ अुपयोगी पडेल. परतु त्यानें खऱ्या अभ्यासूची तृप्ति होअू शकत नाही. प्राचीन ग्रथाचें खरें मर्म लक्षात येण्यास तो सबध ग्रथ मूळस्वरूपांत छापून काढणें अवश्य असतें. यासाठी **बुद्धिविलासिनी** व **लीलावतीविवरण** या दोन टीकासहित लीलावती ग्रथ नुकताच छापला आहे, त्यावरून चिकित्सक वाचकांना या संबंधीची यथार्थ कल्पना येअू शकेल. गगाधर, सूर्यदास, व रंगनाथ यांच्याहि टीका अशा रीतीनें छापून निघणें अवश्य आहे. त्यांतल्या त्यांत सर्वांत जुनी म्हणजे शके १३४२

मधली गंगाधराची टीका तरी मिळविली पाहिजे म्हणजे त्यांत प्रक्षिप्त भाग कमीत कमी सांपडेल. गणेश दैवज्ञाच्या वेळी ' शेर ' हा शब्द रूढ झाला होता (लोके प्राकृत भाषया शेर तुल्योऽयं भवति' पृ. ३०); परंतु तो शब्द लीलावतींत घुसडला गेला नव्हता. त्यानंतरच्या कित्येक प्रतींतून ७२ टाकी शेर, ४० शेरी मण वगैरे ' तुरुष्क संज्ञा ' सांगणारीं पद्यें मूळच्या ग्रंथांत समाविष्ट झालेली दिसतात.

## बहुश्रुत 'गाणितिक'

शेवटी भास्कराचार्यादि ग्रंथकार व गणेश दैवज्ञादि टीकाकार यांच्या संबंधाच्या अेका विशेष गोष्टीचा निर्देश करावासा वाटतो तो हा की, हे जरी गणित शास्त्रावर ग्रंथ लिहीत असले तरी अितर अनेक शास्त्रे पढलेले असत व अनेक वाङमयाचे व तत्त्वज्ञानाचेहि ग्रंथ त्यांच्या वाचनांत आलेले असत. अुदाहरणार्थ, गणेश दैवज्ञाने आपल्या टीकेत आर्यभट्ट, श्रीधर, नारायण वगैरे गणितज्ञांच्या सूत्रांचा तर अुल्लेख केलाच आहे; पण त्याशिवाय लीलावतीतील प्रत्येक पद्याचें वृत्त कोणतें ते सांगितले आहे. मध्ये ऐका अुदाहरणाच्या प्रसंगाने वृत्तरत्नाकर व छन्दःशास्त्र यांतील अुतारे दिले आहेत. भारत व भागवत यांतील भाग आहेतच, वैद्यशास्त्रांतील प्रश्नांचाहि अुहापोह आहे, पाणिनीची सूत्रें तर शेंकडों आहेत, अमरसिंहादि कोशकारांचे आधारहि आहेत. अशा रीतीने सुमारे दहा निरनिराळ्या शाखांतले सुमारें पंचवीस ग्रंथांचे अुल्लेख या टीकेंत आले आहेत. हा गणेश दैवज्ञ औरंगाबादेकडील नांदगावाचा राहणारा असावा असे जे क्वचित् प्रदिपादन करण्यांत आले आहे तें चुकीचे असून तो समुद्रकांठी आजच्या जंजिरा संस्थानाकडील रहिवासी होता असे म्हणण्यास त्याच्याच ग्रंथांत आधार सांपडतो. तो असा--.–

> श्रीमत्सज्जनधामवृन्दरुचिरे क्षीरांबुधे. प्राक्तटे ।
> नन्दिग्राम अिहावसन् द्विजवरः श्रीकेशवोऽस्यात्मजः
> तस्यावाब्जयुगाप्तशास्त्रविभवः श्रीमद्गणेश. कृती ।
> नानायुक्तिमतीमिमां हि कृतवान् लीलावतीव्याकृतिम् ॥

# २१

## पाश्चात्यांच्या पंचांगाची सुधारणा

ग्रहलाघवपद्धतीनें पंचांगाचे गणित केल्यास दृक्प्रत्यय येत नाहीं; यासाठी आमच्या देशांत पंचांगाच्या सुधारणेचा प्रश्न अुपस्थित करावा लागला. परंतु युरोपांतील आजकालचीं पंचागें दृक्प्रत्यय देणारी असून देखील त्यांत सुधारणा करण्याची आवश्यकता सुधारलेल्या राष्ट्रांना भासू लागली आहे. याचे कारण युरोपीय कॅलेंडर व्यवहारिक दृष्ट्या जितकें नियमबद्ध व सुटसुटीत असावें तितके नाही. त्यांत महिन्याचे दिवस कधीं ३१ तर कधीं ३० आणि कधी २९ तर कधी २८ असतात; अेवढेच नव्हे तर महिन्याच्या पहिल्या तारखेस कोणता वार यावा याबद्दलहि त्यांत कांही अेक निर्बंध नाही. शिवाय जगाच्या व्यवहारास अनुभवानें अत्यंत सोअिस्कर ठरलेला 'आठवडा' व 'महिना' यांचेंहि कोष्टक चालू पद्धतीत जमत नाहीं. यामुळें अेखाद्या महिन्यांत चार रविवार येतात तर दुसऱ्यांत पांच येतात. यामुळें सुट्यांचे दिवस वजा जातां महिन्यांत कामाचे दिवस अेकसारखे पडत नाहीत व मोठमोठ्या कारखान्यांतून निघणाऱ्या मासिक कामाचे प्रमाण ठरवितां येत नाही. अशा अनेक अडचणीमुळें युरोप व अमेरिका या खंडांचें कॅलेंडर सुधारण्याची आवश्यकता विशेष तीव्रतेनें भासू लागली आहे.

ही आवश्यकता सर्व राष्ट्रांना पटवून देअून कॅलेंडराची सुधारणा कोणत्या दिशेनें करतां येअील हें सांगण्याचें काम मोसेस बी. कॉटस्वर्थ यांनीं पत्करले आहे. प्रत्येक महिना चार आठवड्याचा असावा, महिन्याची पहिली तारीख रविवारी असावी, वर्षांचे महिने १२ असण्याअैवजीं १३ असावे व दरसाल वर्षअखेरीचा अेक दिवस म्हणजे डिसेंबरची २९ वी तारीख बिनवाराची आसावी असें त्यांच्या योजनेचें तात्पर्य आहे. या योगानें दर महिन्याचे बरोबर चार आठवडे होतील व त्याचे २८ दिवस ठरीव वारी येतील आणि १३ महिन्याचे (२८ × १३) ३६४ दिवस होअून त्यांत अेक शेवटचा 'वर्षाचा दिवस' किंवा वर्षवार (year day) घातला म्हणजे ३६५ दिवसांची बेरीज होअील. महिन्यांची नांवें जानेवारी, फेब्रुवारी या क्रमानेंच राहावीं; पण जून नंतरचा म्हणजे ७ वा महिना अधिक समजून त्याचें नाव 'सोल' म्हणजे 'सौर' असे देण्यांत यावें आणि लीप वर्षीं जून महिन्याची २९ वी तारीख बिनवाराची असावी असेंहि

कॉटस्वर्थ यांच्या योजनेंत सुचविलेलें आहे. या पद्धतीप्रमाणें कोणत्याहि महिन्यांत वार व तारखा यांचा मेळ घालणारें कॅलेंडर ठरीव राहील व तें या स्वरूपाचे असेल :—

## कायमचें कॅलेंडर

| रवि. | सोम. | मंगळ. | बुध. | गुरु. | शुक्र. | शनि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ |

ही सुधारणा घडवून आणण्यासाठीं कॉट्सवर्थ यांनी गेलीं चाळीस वर्षें अेकसारखे परिश्रम केले आहेत ! त्याचें वय सध्यां ७५ वर्षांचें असून प्रत्येक महिना बरोबर चार आठवड्यांचा असण्यानें जगाच्या सुखसोअीत निश्चितपणें भर पडेल अशी त्यांची खात्री झाल्यामुळें त्यांनी आपलें आयुष्य या कामाकडे वाहिलें आहे व आपली कल्पना समजावून देण्यासाठीं आणि लोकांच्या सूचना अैकण्यासाठीं त्यानीं जगभर प्रवासहि केला आहे. अुदाहृणार्थ, तेरा महिन्या अखेर ज्या अेका दिवसाची भर घालावयाची त्या बिनवाराच्या दिवसास 'ख्रिस्तमस दिवस असें नाव देण्याचें त्यांनी अि. स. १८९१ मध्यें योजलें होतें. परंतु हिंदू व मुसलमान समाजांतील पुढाऱ्यांच्या गांठी पडल्यानंतर त्यानी हें ख्रिस्ती नांव देण्याची कल्पना सोडून त्या दिवसास 'वर्षवार' (year day) हे सामान्य अभिधान निश्चित केलें.

कांही वर्षांमागे राष्ट्रसंघाच्या कॅलेंडर–सुधारणा कमिटीकडून कॉट्सवर्थ यांना मुद्दाम निमत्रण पाठविण्यांत आलें. कारण या सुधारणेची आवश्यकता ३३

राष्ट्रांना भासली असून १८५ सूचना यासंबंधीं राष्ट्रसंघाकडे पाठविण्यांत आल्या होत्या. या सूचनांची छाननी करण्याचें काम कॉट्सवर्थ यावर सोपविण्यांत आलें. त्यावरून १९२२ च्या जानेवारी ११ तारखेस कॉट्सवर्थ अमेरिकेतील व्हँकूव्हर येथील आपल्या घरांतून वॉशिंग्टन येथील या कामानिमित्त भरलेल्या तज्ज्ञ सभेस हजर राहाण्यासाठी निघाले; तेव्हां या सभेच्या कामी आपले फक्त पांच दिवस मोडतील असें त्यांना वाटलें होतें. पण वॉशिंग्टन येथील सभेस कॉट्सवर्थ यांची योजना सर्वसंमत झाली एवढेंच नव्हे तर अमेरिकेंतील पार्लमेंटच्या दोनहि सभागृहांतील प्रतिनिधींना आपली कल्पना त्याच वेळी समजावून देऊन त्यांनी सरकारी अधिकारी व कारखानदार याचीहि मान्यता मिळविली. यामुळे ही जगव्यापी सुधारणा घडवून आणणें शक्य आहे असा विश्वास कॉट्सवर्थ याच्या अंत:करणांत उत्पन्न झाला.

या विश्वासाच्या जोरावर कॉट्सवर्थ यांनी आपल्या पत्नीस पत्रद्वारे कळविलें कीं, ' ही सुधारणा व्हँकूव्हर येथे बसून राहण्यानें होणार नाही, तिच्या-साठी जगभर हिंडून सर्व राष्ट्रांना ती समजावून दिली पाहिजे; तिनेंहि ताबडतोब उत्तर पाठविले कीं, ' चांगले काम आहे, तर ते करण्यासाठी अवश्य झटा. मी घरची व्यवस्था चालवीन; त्याप्रमाणें पांच दिवसांच्या सभेसाठीं घरातून बाहेर पडलेले कॉट्सवर्थ हे पाच वर्षांनी अनेक देशांत प्रवास करून मग घरी आले आणि तेव्हां देखील कामाच्या ध्यासामुळें त्यांना घरी राहण्यास फारशी सवड मिळाली नाहींच.

गेल्या १३ वर्षांत त्यानीं अेकंदर ५९ देशांत प्रवास करून अनेक लोकांच्या गांठी घेतल्या व ते या अवधींत घरी फक्त ६ आठवडे, आणि त्यातलाहि अेक आठवडा बायको आसन्न मरण असल्या वेळी तिची शेवटची भेट घेऊन तिचा अंत्यविधि करण्यासाठी त्यांना घालवावा लागला. त्यांच्या पत्नीने पाच मुलाचे संगोपन व शिक्षण अनेक अडचणी सोसून पार पाडलें आणि कॉट्सवर्थ यांनीं आरं-भलेल्या कार्याचें महत्त्व ओळखून आपल्या अडचणीची तक्रार पतीकडे केव्हांहि केली नाहीं.

कॉट्स्वर्थ यांना आपल्या कल्पनेच्या प्रसारार्थ प्रवासादि कामांत जो खर्च करावा लागला तो जॉर्ज ईस्टमन या कल्पक व सधन गृहस्थानें पुरविला आहे. फोटो-ग्राफीस लागणाऱ्या अनेक यंत्रांचा (कोडॅक कॅमेराचा) शोध ईस्टमन यांनीं लाव-ल्यामुळें त्यांना पुष्कळ संपत्ति मिळाली; त्यांतला बराच भाग त्यांनीं अनेक देशांत शिक्षणाचा प्रसार व दंतवैद्यकाचा प्रसार करण्याच्या कामीं खर्चला आहे; त्याच प्रमाणें यांचीहि कल्पना त्यांना पटल्यामुळे त्यांनीं या कार्याच्या प्रसारार्थ देणगी दिली. कॉट्सवर्थ यांची योजना अनेक राष्ट्रांना मान्य झाली असून अमेरिकेंतील शेंकडों

कारखाने, आपल्या व्यवहारात या योजनेप्रमाणें तारखांची व महिन्यांची मांडणी करू लागले आहेत; आणि 'या योजनेनें पुष्कळ घोटाळा नाहीसा होतो' असें त्यांनीं अनुभवान्तीं जाहीर केलें आहे. ब्रिटिश रेल्वे कंपन्या व जर्मन शास्त्रज्ञ यांनीं 'ही सुधारणा अवश्य अंमलांत आणावी' असा अभिप्राय दिला आहे यामुळें राष्ट्रसंघांत अि स. १९३५ अखेर या संबधीचा ठराव करण्यांत येऊन पुढें १९३६ च्या सप्टेंबर मध्ये या कामाचा रिपोर्ट तयार होअील. पुढें १९३७ साली सर्व राष्ट्रांचे तहनामे होतील; आणि १९३८ साली नवीं सुधारलेली कॅलेंडरे छापून १९३९ च्या जानेवारी १तारखेस रविवारी सर्व राष्ट्रांचा व्यवहार या नव्या कॅलेंडरा प्रमाणें होऊं लागावा अशी योजना प्रस्तुत आंखण्यांत आली आहे.

या योजनेस ख्रिश्चन धर्मांतील धर्मगुरू अथवा पोप याची संमति मिळण्यास अुशीर लागत आहे. विशेषत: 'वर्षाचे महिने बारा' ही गोष्ट शेंकडो वर्षांपासून अंगवळणीं पडली असून ती सोडणे व वर्षाचे तेरा महिने मानणें पुष्कळांना जड वाटत असल्यामुळें अनेक आक्षेप घेण्यांत आले आहेत. परंतु या आक्षेपांचें खंडण करतांना कॉट्सवर्थ यांनी हे दाखवून दिले आहे की, हिंदु लोकाना अधिक महिना घालून तेरा महिन्याचें वर्ष मानण्याची पद्धति हजारों वर्षापासून माहीत आहे. व या पद्धतीमुळें आपला घोटाळा झाला असे ते म्हणत नाहीत. त्याच प्रमाणें वेदांगज्योतिषकाली वर्षाच्या भरतीसाठी अेक दिवस अधून मधून जास्त धरून त्याचे नांव "दिनंत्यज" देण्याची कल्पनाहि आमच्या ज्योतिष्यांनी अमलांत आणली होती. ती निराळ्या स्वरूपांत आज युरोपियन लोकांना व्यवहारात आणावी लागत आहे.

# ३०

## भास्कराचार्यांचीं कोष्टकें

* भास्कराचार्यकृत लीलावतीत प्रारंभी कोष्टकें आहेत तीं अशीं:--

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० कवडया | = | १ काकिणी | | ८ वाल | = | १ धरण | |
| ४ काकिणी | = | १ पण | | २ धरण | = | १ गद्याणक | |
| १६ पण | = | १ द्रम्म | | १४ वल्ल | = | १ घटक | |
| १६ द्रम्म | = | १ निष्क | | ५ गुंजा | = | १ मासा | |
| २ यव | = | १ गुंज | | १६ मासे | = | १ कर्ष | = १ सुवर्ण |
| ३ गुंजा | = | १ वाल | | ४ कर्ष | = | १ पल | |

सिमंतकमाणी १ भार सुवर्ण प्रसवे. त्याची संख्या श्लोक--

"भार देतचि सिमंतक सोनें। सांगती वजन ते अनुमानें।
पस्तिसा मणि उणे अकरा हे। शेरमाससह बत्तिस आहे॥"

एकूण वजन १॥ ४॥८॥।३।१ म्ह. दीड खंडी, साडेचार मण, पावणेनव शेर, सव्वातीन तोळे, एक मासा इतके भारास वजन.

---

* ज्योतिर्गणित ग्रंथांत भास्कर या नांवानें ओळखले जाणारे सध्यां दोन 'भास्कर' ज्ञात आहेत. पहिला भास्कर (इ.५२२) म्हणजेच 'लघुभास्करीय' व 'महाभास्करीय' या ग्रंथांचा प्रणेता व वृद्धार्यभटाच्या (इ. ४९९) साक्षात् शिष्यांपैकी होता तो. आणि दुसरा भास्कर म्हणजे 'सिद्धान्तशिरोमणिकार' भास्कर (इ.११५०) हा होय. याची कीर्ति तर भरतखंडांबाहेरहि युरोपियन विद्वानास झालेली आहे. त्यांची माहिती सांगण्याची आवश्यकता नाही. पहिल्या भास्कराची मात्र त्रुटितच माहिती आहे. यासंबंधीची माहिती I. H. Q. Vol. 1930 पृ. 727–736 मध्ये पहावी.

* या ठिकाणी ५ गुंजा = १ मासा म्हटले आहे. परंतु इतर ठिकाणीं निरनिराळें प्रमाण दिलें आहे. याचें कारण गुंज लहान मोठी असते. यामुळे हा विरोध वास्तविक नाही, असें बुद्धिविलासिनी टीकेंत गणेश दैवज्ञ म्हणतो. त्याचे शब्द असे आहेत,

"अत्र किल पंच गुंजो माष उक्तः। वैद्यकशास्त्रे तु सप्त सप्तगुंजः धर्मशास्त्रे तु सार्धं सप्तगुंजः। एतद् बृहत् मध्य लघु गुंजाभिप्रायेण न विरुध्यते। यथा एकैव पृथ्वी त्रयस्त्रिंशत् शत योजन मित्युक्ता ३३००। शिरोमणो तु सप्तारिनंदाब्धयः ४९६७ अन्यत्र तु द्विद्विशरर्तवः ६५२२। एतद् बृहन्मध्यलघु यवोत्थ योजनाभिप्रायेण न विरुध्यते। तद्वदिदं माषादिकमपि। शेषं कर्षादिकं सर्वत्र सममेव" ८ यव = १ अंगुल असे जें वर सांगितलें त्याबद्दल देखील गणेश दैवज्ञानें विकल्प सांगितलेला आहे. 'यवोदरैस्तिर्यग्यवैः अष्टभिरंगुलं स्यात् उर्ध्वैस्त्रिभिर्वाव्रीहिभिर्वा। तथा च स्मृतिः—तिर्यग्यवोदराण्यष्टा ऊर्ध्वा वा व्रीहयस्त्रयः इति।

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ यवोदर | = | १ अगुल | २० वंश चौरस | = | १ निवर्तन |
| २४ अंगुल | = | १ हात | १ घनहात | = | १ मागधखारिका |
| ४ हात | = | १ दंड | १/१६ खारिका | = | १ द्रोण |
| २००० दंड | = | १ कोस | १/४ द्रोण | = | १ आढक |
| ४ कोस | = | १ योजन | १/४ आढक | = | १ प्रस्थ |
| १० हात | = | वंश = काठी | १/४ प्रस्थ | = | १ कुटक |

---

* लीलावतीच्या मराठी टीकाकारानें वजनाच्या कोष्टकांत थोडी भर घातली आहे. ती अशी—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० पल | = | १ विशी | १०० तुला | = | १ भार |
| ५ विशी | = | १ तुला | ५ भार | = | १ महाभार |

| | | |
|---|---|---|
| ३/४ गद्याणक | = | १ टंक |
| ७२ टंक | = | १ शेर |
| ४० शेर | = | १ मण |

इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या मध्यभागीं ह्यूएनत्संग नांवाचा चिनी प्रवासी हिंदुस्थानांत आला होता. तो म्हणतो, "प्राचीन पद्धतीप्रमाणें योजन, ४० ली इतकें आहे. हिंदुस्थानांतील सांप्रतच्या राजव्यवहारांतील योजनाचे ३० ली होतात. परंतु शास्त्राच्या पुस्तकांत लिहिलेले योजन १६लीचे आहे."(भारतीय ज्योतिषशास्त्र पृष्ट ३२०–३२१) यावरून योजनाचें मान एकसारखे नव्हते हे उघड आहे.

# ३१

## शिवशाहींतील पंचांगशुद्धि

शिवशाहीत भाषा शुद्धीसाठी 'राजव्यवहारकोश' तयार करण्यात आला; त्याचप्रमाणें 'पंचांगशुद्धीसाठी 'करणकौस्तुभ' नांवाचा ग्रंथ मुद्दाम कृष्ण-ज्योतिष्यानें रचला; ही गोष्ट कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी भारतीय ज्योतिः-शास्त्र या ग्रंथांत (पृ. २९०।२९१) प्रथम मराठी वाचकापुढे मांडली. तेव्हा-पासून गेल्या तीस वर्षांत हा ग्रंथ मिळवून प्रकाशित करण्याची व्यवस्था झाली नाही; याचें कारण, सदर करणग्रंथ 'तंत्ररत्न' नांवाच्या ह्याच ग्रंथकाराच्या मोठ्या पुस्तकाचा संक्षेप आहे; व या मोठ्या ग्रथाची हस्तलिखित प्रत कै. दीक्षितांच्या किंवा इतर कोणाच्याहि पाहण्यात अद्याप आलेली नाहीं. यामुळे करणकौस्तुभांतील शंकाचें निरसन करून घेण्याचे उत्तम साधन अज्ञात स्थितींत आहे. हें मराठी वाचकांपुढे मांडून त्यांना 'तंत्ररत्ना'ची प्रत मिळविण्याची विनंति करण्यासाठी मी येथे 'करणकौस्तुभा'संबधी कांही माहिती नमूद करून ठेवतों.

या ग्रंथांत चौदा भाग ऊर्फ अधिकार आहेत. त्यांची नावे अशी--

१ मध्यमग्रहसाधन. २ सूर्यचंद्रस्पष्टीकरण
३ पंचतारास्पष्टीकरण. ४ त्रिप्रश्न.
५ चंद्रग्रहण. ६ सूर्यग्रहण.
७ तिथिपत्रावरून ग्रहणसाधन.
८ उदयास्त. ९ ग्रहच्छाया
१० चंद्रशृंगोन्नति. ११ ग्रहयुति.
१२ नक्षत्रछाया. १३ पात.
१४ पातसंभवासंभवलक्षण.

यावरून याची मांडणी ठोकळ मानाने ग्रहलाघवी पद्धतीची आहे हें दिसून येईल. प्रारंभीं,

'वंदे केशवदैवज्ञसार्वभौमपदांबुजम् ।'

असें नमन केलें आहे. यावरून कृष्ण ज्योतिषी ग्रहलाघवकाराच्या पंथाचा म्हणजे केशवाच्या ग्रंथाविषयीं आदरभाव बाळगणारा दिसतो. परंतु ग्रहलाघव

ग्रंथ शके १५४२ मध्यें रचला गेल्यानंतर, शें-सवाशें वर्षांत त्याचा दृक्प्रत्यय येत नाही, अशी तक्रार सुरू झाली. पण ही तक्रार दूर होण्यासाठी नवीन ग्रंथ-रचना करणारा नामांकित ज्योतिषी स्वयंस्फूर्तीनें पुढें आल्याचें दिसत नाहीं. तथापि शिवाजी महाराजांच्या दरबारात विद्यावृद्धीकडे लक्ष देणारे लोक असल्यामुळें त्यांनीं असा ग्रंथ रचण्याचें काम कृष्णज्योतिष्यास सांगितल्यावरून त्यानें हा ग्रंथ रचला असें

**प्रकुरु तत्करणं ग्रहसिद्धये । सुगमदृग्गणितैक्यविधायि यत् ।**
**इति नृपेंद्र शिवाभिधनोदितः ।। प्रकुरुते कृतिकृष्ण बिबिज्ञराट् ।।**

या श्लोकावरून दिसते.

यात गणिताचे प्रारंभीचे वर्ष १५७५ धरले असून क्षेपक त्या सालच्या मेषसंक्रमणाच्या वेळचे दिले आहेत. पण इतरत्र न दिसणारी गोष्ट अशी की, त्यांत सप्तर्षींचें क्षेपक ६ रा. ११ अं ३० क. दिले असून त्यांची वार्षिक गति ८ कला म्हणजे १०० वर्षांत एक नक्षत्र अशी सांगितली आहे. सप्तर्षि कालाची गणना काश्मीराखेरीज इतर प्रदेशांत असल्याचें दिसत नाही. असें असून महाराष्ट्रांतील या ज्योतिष्यानें ही कालगणना कां सांगितली तें समजत नाहीं.

ग्रहलाघवकारानी ज्याचापावांचून गणित करण्याचा पाया घालून आमच्या ज्योतिष्यांना शास्त्राच्या उपपत्तीकडे दुर्लक्ष करण्याची सोय करून ठेविली, असा जो आरोप गणेश दैवज्ञावर केरोपंतांनीं आणला होता, तो या ग्रंथाच्या बाबतींत लागू पडत नाही. कारण यांत ज्याचापाचें सहाय गणितास घेतलें आहे, आणि ज्यापिंड १० अंशाचा मानून त्याचा उपयोग बऱ्याच ठिकाणीं केला आहे.

ग्रहलाघवाने ११ वर्षाचें चक्र मानून अहर्गण ४०१६ पेक्षा वाढू न देण्याची व्यवस्था केली आहे; करणकौस्तुभकारानें १ वर्षाचेंच चक्र योजल्यामुळें अहर्गण ३६५ पेक्षां वाढणार नाहीत व अहर्गणाचे गणित करण्यास त्रास कमी पडेल हे खरें. पण वर्षगति काढण्यास अधिक खटाटोप पडेल असें वाटतें.

यात वर्षमान सांप्रतच्या सूर्यसिद्धांतानुसार म्हणजे ३६५ दि. १५ घ. ३१ प. ३१ वि. २४ प्र. वि. आहे. शून्यायनांशाचें वर्ष शके ४५० धरलें असून वर्ष-गति ६० विकला धरली आहे. नक्षत्रभोग ग्रहलाघवाप्रमाणें आहेत; मात्र भरणी (२० अं.) व आश्लेषा (१०८ अं.) यांच्या भोगांत १ अंशाचा व मघांच्या (१९७ अं.) भोगांत २ अंशाचा फरक आहे.

कृष्णदैवज्ञाने ग्रंथाच्या शेवटी स्वतःची माहिती सागतांना प्रारंभी कश्यप ऋषीचे महत्त्व वर्णन करून अशी हकीकत दिली आहेः–

तदन्वये पावन एव तत्र वंशावतंसो भवदुन्नतांसः ।
श्रीमन्महाज्योतिषि विद्वदग्र्यो नाम्ना महादेव इति प्रसिद्धः ।।
तज्जाया किमु जान्हवी विजयते बर्वाई नाम्नी सदा ।
तस्यां तज्जनितः सुपुण्यनिचयः श्रीरंगनाथानुजः ।।
कृष्णः कौंकणसत्तटाकनगरे देशस्थवर्यो वसन् ।
तेनायं करणेषु कौस्तुभ इति ग्रंथः कृतो धीमता ।।

यावरून कृष्ण दैवज्ञाच्या बापाचें नांव महादेव, आईचे बर्वाई, वडील भावाचें रगनाथ, असे असून हा देशस्थ ब्राह्मण ' सह्याद्रिसनिध मावळात राहणारा ' होता असा कै. दीक्षितांचा अभिप्राय आहे. पण कोकणसत्तटाकनगरे याचा अर्थ अद्याप मनाजोगा लागला नाही असें मला वाटते.

---

# ३२

## शिवकालीन ग्रहसाधन

१ मध्यम ग्रहः– जुन्या कुंडल्याची सत्यता पाहतांना रविचंद्र यांची स्थिति महिना व तिथि यावरून तपासतां येते. शनि व राहु यांची स्पष्ट स्थाने निश्चित करणें तितकें सोपे नसते; त्याकरितां पुष्कळ आंकडेमोडी करावी लागते. तथापि, मध्यममानानें या ग्रहांची स्थानें ठरविणें कठिण नाही; व पुष्कळ वेळां मध्यम ग्रह साधनावरून आपणापुढें आलेली कुंडली काल्पनिक आहे किंवा काय हे ठरवितां येतें. याकरितां या तीन ग्रहांची अंशात्मक मध्यम स्थिति साधण्याची कोष्टके देऊन ठेवतों. राहूची गति ऋण असते ( वजा करावी लागते ) हे या कोष्टकावरून गणित करतांना लक्षांत ठेवलें पाहिजे.

| वर्ष | गुरु | शनि | राहु | वर्ष | गुरु | शनि | रा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३० | १२ | १९ | १० | ३०३ | १२२ | १९४ |
| २ | ६१ | २४ | ३९ | २० | २४७ | २४८ | २७ |
| ३ | ९१ | ३७ | ५८ | ३० | १९० | ७ | २२१ |
| ४ | १२१ | ४९ | ७७ | ४० | १३४ | १२९ | ५४ |
| ५ | १५२ | ६१ | ९७ | ५० | ७७ | २५१ | २८८ |
| ६ | १८२ | ७३ | ११६ | ६० | २१ | १३ | ८२ |
| ७ | २१२ | ८६ | १३६ | ७० | ३२४ | १३५ | २७५ |
| ८ | २४३ | ९८ | १५५ | ८० | २६८ | २५८ | १०९ |
| ९ | २७३ | ११० | १७४ | ९० | २११ | २० | ३०२ |
| शके १५०० | १७३ | २७४ | ३८८ | शके १६०० | ३२७ | ५६ | २०९ |

# ३३

## पेशवाई कालगणनेविषयीं टिपणें

पेशवाईतील कागदपत्रांतून कांही ठिकाणी शक व तिथी दिलेल्या असतात. पण पुष्कळ ठिकाणीं सुहूरसन व मुसलमानी महिना व त्याची तारीख म्हणजे चंद्र हेच दिलेले असतात. यामुळें सुहुरसन, त्याचा महिना व तारीख यांचा प्रारंभ केव्हां होतो याचा निर्णय करणें अवश्य आहे. आजपर्यंत उपयोगांत असलेल्या जंत्र्या काही ठिकाणी चुकल्या आहेत हें सिद्ध करता येण्याजोगे आहे. उदाहरणार्थ, दीक्षित व पिले यांनीं मोहरमचे ३०, सफरचे २९ अशा रीतीने इतर महिन्याचे ३० व २९ दिवस अनुक्रमाने धरावे व कांही ठरीव वर्षांनीं शेवटच्या महिन्याचे म्हणजे जिल्हेजचे २९ च्या ऐवजी ३० दिवस धरावे असें सांगितलें आहे. परतु मोडकांनी ही पद्धति पत्करली नाही त्यांनी कांही ठिकाणी लागोपाठ दोन महिने ३० तारखांचे धरले आहेत. (सु. ११२९ रजब व साबान पहा.) खरे जंत्रीत चंद्रदर्शन ज्या दिवशी संध्याकाळी होऊं शकेल म्हणजे संध्याकाळी द्वितिया असेल, त्याच्या दुसरे दिवशीं मुसलमानी पहिली तारीख धरावी असे ठरवून मी तारखा मांडल्या आहेत. पण दीक्षित पिले व मोडक यांच्या जंत्रीतील तारखांचा व वारांचा मेळ पेशवेकालीन पत्रांतील तारीख वाराशी कांही ठिकाणी बसत नाही. अशा स्थितीत पत्रांत असलेल्या चं ाचा व वाराचा मेळ जत्रीतील उल्लेखाशी पाहून कांही ठिकाणीं पत्राचें वर्ष ठरविण्यांत येते व ठरवावें लागतें. पण अशा वेळी साशंक राहणें अवश्य आहे. पेशवाईतील जुनीं पंचांगे पाहून किंवा जमाखर्चांचे अगर मुक्कामाचे रोजचे चंद्राचे व वाराचे आकडे पाहून आपल्या जंत्र्या सुधारणें अवश्य आहे. भा. इ. सं. मंडळांत बाजीरावकालीन पांच पंचांगे मी जंत्रीशी तपासून पाहिली. तेव्हां बहुतेक ठिकाणीं मेळ आहे असें दिसलें. पण मोडक जंत्रीत पृ. २४, वर मोहरम २९, सफर २९ व रबिलावल ३० अशा तारखा दिल्या आहेत, त्या ऐवजी पंचांगांत अनुक्रमे ३०, २९ व २९ अशा दिल्या आहेत. यामुळे या वर्षींच्या सफर व रबिलावल महिन्याच्या प्रत्येक तारखेस मोडकांनी जो वार दिला आहे त्याहून पंचांगांतला प्रत्येक वार निराळा आहे. आणि रबिलाखर पासून पुनः पंचांग व जंत्री याचा मेळ बसतो. तात्पर्य पेशवेदप्तरांत कागद पाहून अगर जुनीं पंचांगें पाहून आपल्या जंत्र्या दुरुस्त केल्या पाहिजेत.

सुहूरसनाच्या सुरुवातीच्या दिवसाबद्दल अशीच अडचण आहे. मृग लागेल त्या दिवशीं नवें सुहूरसनाचें वर्ष धरीत असतील असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण तशी वस्तुस्थिति दिसत नाही. मृगनक्षत्र लागतें ते सूर्योदयानंतर अमूक घटकांनीं लागतें असे दर वर्षीं गणिताने निरनिराळें घटिकात्मक उत्तर येतें. यामुळें एखाद्या वर्षी मध्यरात्री मृग लागत असलें तर त्यापूर्वींचा सूर्योदयापासूनचा दिवस नवीन वर्षाचा धरीत किंवा नाहीं असा प्रश्न उपस्थित होतो. त्याच्या निर्णयासाठीं राजवाडे खं. ६ मध्यें व एका जुन्या वहीत मला दोन तीन उपयोगी उल्लेख सापडले ते येथें उद्धृत करतों.

रा. ख. ६ पृ. ३२ मधील उल्लेखः—

यादीस्मरण सुहरसन इह्दिदे आर्बैन मया अलफ सन हजार ११५० छ ८. रावल जेष्ठ शुद्ध ९ सह १० मी मंदवार रोज गुदस्ती रात्री अवशीच म्रग निघाला शके १६६२ रौद्र नाम संवत्छरे अवल साल

पिले जत्रींत ज्येष्ठ शुा ९ मी ३ घटका शनवारी सूर्योदयापासून दिली आहे. त्यानतर १० मी आहे. पण मुसलमानी तारीख रबिलावल ९ दिली आहे. वरील उल्लेखांत ती ८ आहे.

मोडक जंत्री शनिवारी १० मी व रबिलावल ९ असे आंकडे आहेत. त्या दोहोंचा वरच्याशी मेळ नाहीं.

रा. खं. ६ पृ. ४१ मधील उल्लेखः—

यादी स्मरण सुा सन इसने आर्बैन मया अलफ सन हजार ११५१ छ १९ रावल ज्येष्ठ वद्य ६ रविवार रोज गुदस्ती मध्यरात्री म्रग निघाला शके १६६३ दुर्मत नाम सवत्छरे अवलसाल

पिले जत्री —रविवार ५ मी १६ घ. १९ रबिलावल हे आंकडे आहेत. वरच्याशीं तिथीचा मेळ बसू शकेल.

मोडक जंत्री— रविवार वद्य ५ मी व रबिलावल १९ या तारखा आहेत.

जुन्या वहींतील उल्लेख असे आहेतः—

खमस खमसैन

माहे साबान

तेरीख १२ ज्येष्ठ शुध चतुर्दसी भोमवासरे मुा पुणे छ मजकुरी मृग—सकाळचे नव घटिका अडतीस पलानी निघाले अवलसाल जाले.

खमस खमसैन

माहे साबान अखेर साल

तेरीख २३ रोज अधिक ज्येष्ठ बहुल दशमी सौम्यवासरे छ मजकुरी पंचविसा घटके दिवसा मृग लागले अखेर साल जाले असे

सुा सीत माहे साबान

तेरीख २४ रोज अधिक ज्येष्ठ बहुल येकादसी गुरुवासरे मुा कसबे सासवड छ मजकुरी अवलसाल जाले. यावरून ज्या दिवशीं नऊ घटकांनी मृग निघाला तो दिवस अवलसाल पैकी धरला म्हणजे नव्या वर्षातला धरला. आणि त्यानंतर वर्ष सपण्याच्या सुमारास २५ घटकेस मृग निघाला तेव्हा तो दिवस जुन्या वर्षांत धरला आणि दुसऱ्या दिवशी नव्या वर्षास प्रारभ केला. रात्री मृग निघाला तरी देखील दुसरे दिवशीच सुहूरसनाच्या वर्षास प्रारभ करीत असे वरील उताऱ्यात आहे. ह्या अर्थी दोन प्रहरच्या पूर्वी मृग निघाल्यास तो दिवस नव्या वर्षाचा धरावा व दोन प्रहरानंतर निघाल्यास तो जुन्या वर्षात धरावा, म्हणजे त्याला अखेर साल अर्से म्हणावें ही पेशवाईतली पद्धति दिसते

आतां मुसलमानी तारखा व वार सूर्योदयाबरोबर सुरू करीत, की सध्याकाळी सुरू करीत याचा विचार केला पाहिजे. सध्याकाळी यांचा ारभ करीत अशी मुसलमानी वहिवाट असल्याचें ग्रंथकारानी सागितले आहे. पण पेशवाईतली वहिवाट अशी दिसत नाही. ‘ उदयात् उदयं वारः’ म्हणजे सूर्योदयापासून वाराचा प्रारंभ करावयाचा ही मराठ्यांची पद्धति होती हे निश्चित आहे.

पेशवे दप्तर पृ. २५९० ( न. ३७३) “ बुधवारीचे रात्री तिसरे प्रहरी वारिली; गाडियावारी घालून नदीस नेऊन दहन केले; सकाळ दिवस उगवता गुरुवार लागला असे ” अशी वाक्यें आहेत. त्यावरून वार सूर्योदयास बदलत होता असे म्हणता येते.

पे. द. पृ. १८३२ ( नं. ६५ ) छ. ९ जावल मदवार उज्याडता रविवार सकाळची रात्र घटिका तीन. यावरूनहि वरच्या निर्णयास दुजोरा मिळतो. आता मुसलमानी तारीख दिवे लावणीस किवा सूर्योदयास बदलीत याविषयी शंका आहे.

उदाहरणार्थ, पे. द, पृ. १८३ वर न. ६४ च्या पत्रात ‘ आज विजयादशमी ’ असे शब्द असून छ. ८ ( जावल) प्रहर रात्र आवशीस असें म्हटले आहे. ऐ. ले. सं. पृ. ९३२ व ९४२ मधील उल्लेख व वरील उल्लेख याचा विचार केला असतां सकाळी मुसलमानाची तारीख सुरू करीत असे वाटते. तथापि एकाच दिवसाची दोन तीन पत्रे सापडून त्यातले एक तारीखवार व दिवसाच्या घटका दिलेले आणि दुसरें तारीख वार व रात्रीच्या घटका दिलेले आढळल्यास या प्रश्नाचा समाधानकारक निर्णय लागेल.

मराठी महिन्याच्या तिथी व वार याचा मेळ पाहून पत्राचे वर्ष ठरविण्यात अशीच चूक होण्याचा सभव असतो. कारण जत्रीत वारासमोरचा तिथीच

आकडा सूर्योदयव्यापिनी असतो आणि पत्र लिहिणारा पुष्कळ वेळां लेखनकालाची तिथी मांडतो.

जंत्रीतील अधिक महिन्यांची देखील जुन्या पंचगांशीं तुलना करून पाहणें अवश्य आहे. क्षयमासांचा संबंध पेशवाईच्या कालांतील जत्रींत दाखविलेला नाही. कारण इ. स. १६८१-२ व इ. स. १८२२-३ या वर्षी पौषक्षय दीक्षितांनी दिला आहे ती वर्षे पेशवाईतली नाहीत.

पेशवाईतील पचांगे व मोडक जंत्री याचा मेळ मुसलमानी तारखा व वार याच्याशी बसत नाही हे वर उदाहरणें देऊन दाखविले आहे त्याप्रमाणे चंद्र-दर्शनास अनुसरून मुसलमानी महिन्याची पहिली तारीख माडणें अवश्य आहे.*

---

* यापुढे मूळ लेखांत कोष्टके देऊन मुसलमानी तारीख व विशिष्ट वार यांची इ. स. १७२०-४० या वीस वर्षांतील जुळणी उदाहरणादाखल मांडून दाखविली आहे सं.

# सूचि


अग्रहार पद्धती १९०
अजमीर राज्यस्थापना २९
अनंगपाल २९
अन्वय पद्धति ९८,११५
अपकर्षाचें विवेचन १६,१७
अन्हिलवाड भीम वाघेला ४७
अलउल्बी २८, २९
अली बहादर १५४–१६३–ची फंदफि॰ तुरी १६४
अशोक–साम्राज्यवाद व धर्मप्रसार ४३
अष्टप्रधान–१९,२०
अहल्याबाई १७६,१८५
इतिहास तरंगिणी ३
—कीर्तन पद्धती २,३
—लेखन ६३–एकांगी ५१,५२
—संशोधन ५०–६०, वर्ग ५३
—शास्त्रज्ञान ६२
—सारंग व नवी रचना-अंतर५३,५४
—प्रगतीस अडथळा ५६,५७
—साधन रचना व नकला–काल ७९
इस्लामियाचा प्रतिकार ३५
—धर्मसेवा-लूट व धर्मक्षेत्र विध्वस ३८
—सुधारणा ५,६,३३,३४,४४–४५
उत्तर की दक्षिण–शिवाजी व बाजीराव १४६,१४७,प्रतिनिधी,–शाहू १४७
एकदेशी राजकारणाचा पाडाव ३६,४४ ४८
एक धर्मीपणा व विध्वंसन ३९
एक्याण्णव कलमी बखर ६४,६५,६६, ७४,९९
औरंगजेब २१४, २१८
अंकगणिताची प्रगती २४९
इंग्रज व फरेंच स्वभाव भेद १८३ व गुलामगिरी८
कनोजचे साम्राज्य ३२
कानडी लेख–धर्म विषयक ११६
काबूलचा सुभा–पंजाबच्या हिंदूराजांचा मांडलीक ४५–४६
कॉटस्वर्थ–पंचांग सुधारक २५४, २५७
कोष्टकें-भास्कराचार्य २५८–२५९
कोंकणस्थांचीं वास्तव्यें वाढ व संकोच १९९,२००
खलिपा–बदल,–नामधारी ४५
खुरासन प्रात ४६
गझनीचा महमूद २६,२७,४६,४७, राज्य ४५, –घोरी वश उत्कर्षापकर्ष
गणिताची कसोटी ७५ ७७
गणेश दैवज्ञ २५०–२५३
गुप्तराज्य ४३
गुरु करणें १७५
गुलामगिरी उत्पादक व संरक्षक इंग्रज ८
गोत्र–गट व आडनावें व्यक्ति नामे २११–२१२
गोमातक व मराठी आणि कानडी भाषा ११७–१२०
गोविंदपंत बुंदेले–द्विविध कामगिरी १३८–४१
ग्रहसाधन–शिवकालीन २६०–२६१
ेड–व हुत्ती–दळ २६, २७
घोरी घराणें– आगलावे– ४७
चढाव व बचाव ४४
चिटणिसी बखर ६४, ६५, ७५
चंद्रगुप्त व सेल्युकस ४२–४३
जदुनाथ–ची चूक ९५, ९७, ९८
– व राजवाडे ५९–६०
जम्मूचा राजा ४७
जयचंद गहडवाल ३५, ३६
जयपाल–पंजाब राजा व सबक्तगीन ४६
जयपूर दप्तरखाना ५७

जयसिंग–सिधराजपुत्र ४५
जरीपटका १५९, १६१
जात व धंदा १८८
जातीभेद २२–२३–स्थानिक १९०
जिजिया कर ३५, ३७
जुनैद–हिंदुस्थानवर स्वारी ३२
जेसुइट लोक १००
जंत्र्यांची दुरुस्ती २६४
ज्योतिर्गणिताचा अभ्यास २४०–२४७
टॉइनबी–ज्ञान, सुधारणा चरित्र २, ३
ठाणेश्वर लढाई ३०
तरीख–इ–शिवाजी ७४, ९९
तिम्म–मंत्री ११७
तुकोजी होळकर १५५, १५६
तुरुष्क दंड ३५
तुर्क–गुलाम राज्य १०, ११, ४५
दादाजी कोंडदेव १०१
दाभाडे व निजाम १३२
दिल्लीचा कारभार २१५–२१६, २१८
२३३
दुही राखणें–महमूद धोरण ३९
धर्मभावना व राजकारण १९१
— ३०, ३६–३९, ४४
— राज्य, मान, हिंदु मुसलमान
४१, ४४
धद्यांत बदल २०९– २१०
नकला ७९
नागभट्ट प्रतिहार ३२
नाना फडणीस १७, २३, १५५–१५८
१६५—व महादजी १७७, २१८
नानासाहेब पेशवे १४९, १५१
निजाम धोरण १६९–१७०
— व नाना १८१–१८२, २१६, २१८
नैतिक अज्ञान व बौद्धिक आलस्य
रजपूत ४४–४७
नैसर्गिक स्थिति व वंश ७–९
पचपट्टण ३५
परक्यांचा प्रवेश ४३
परमदेव–अबचा राजा २
पाणिपत–फेरविचार १३७–१४६
— नकाशा १४३ १४४
पाश्चात्य–पंडितांची इतिहासविषयक
विविध मतें २२१–२२३
,,–सुधारणा ५
पुलकेशी–अवनी जनाश्रय ३२
पचांग सुधारणा २५४–२५७
––शिवशाहीतील २६०–२६२
पृथ्वीराज २७, ३०, ३५, ४१, ४२, ४७
प्रतिनिधी व उत्तर दक्षिण १४७
प्रतिहार सम्राट ३२, ३३-चार राज्यें
३४
प्रत्याघात न्याय ५–६
प्रक्षिप्त भाग– नियम ६७
फिरिस्ता २८–२९
फरेंच राजकारण– निजाम १८२
— महादजी आणि नाना १७८,
१८०, १८१
बखर पक्ष १०४, ११०
– ग्रंथ निष्कर्ष ६३, ६४
बट्टा १५५
बाजीराव ध्येय मीमांसा १३०–१३७,
१६७
– व निजाम १४७, २१४–२१७
–साम्राज्य १६९
बाजीराव दुसरा २३, २१९
बाबासाो परांजपे २३२
बाल्खयुद्ध २६–२७
बाळाजी विश्वनाथ व्यापक व निःस्वार्थ
१५–१६, २३३
बुद्धमत साम्राज्य ४
बेकारी उपाय २०४
ब्राह्मण–धंदा १९५
भाऊबंदकी २०
भाडोत्री सैन्य २१–२२
भास्कराचार्य गणितशास्त्रज्ञ २४९
भिनमाल राजघराणें ३२
भीमदेव– मुसलमानं पराभव (११७८)
२९, ३०

भौगोलिक स्थल- गैरसमज १३८ १४३-१४४
मराठ मंडळ ऐक्य २१, २२, १७२
—भाषा कर्नाटक व मुसुलमान ११६
—शाहीतील पक्षभेद व निजाम १४७
—इतिहासाचें महत्त्व १३, १४, २४
—उत्कर्ष १४-१६
—वाडे तीन व त्याचे भिन्न विचार २०७-२०८
--साम्राज्य व फ्रेंच १८२
मल्हारराव होळकर १६७
—नजीबखान १७०, १७१
महमद कासीम-अरब आणि सिंध उच्छेद (७१२) ३१, ३९
--मूर्ति पूजा- ३७, अंत ४४, ४५
--गझनी व तुर्क पंजाब उच्छेद (१००९) ३१, ३९
--घोरी व अफगाण आणि उत्तर हिंदुस्थान (१२००) ३१
महमूद- राजकीय धोरण वैद्य-मत ३८-३९
--स्वाऱ्या ४६-वंश ४७-रजपूत २८, २९ ४६
महादजी शिंदे १८, २१, २२, १५३,-१६६ १७५, २३३
महादाजीपंत पुरंदरे १३१, १३२-मत १३३, १३४
महाभारत २
माधवराव पेशवे- सखाराम बापू १४९-५० -राघोबा १५१-१५२
मालोजी भोसले १०६-१०७
मुलतान-सूर्यमूर्ति ३३, ३५
मुसलमान-भेद दक्षिणी व परदेशी १२८
--सत्ता प्रसार व वेग ३१, ३२, ३९
--इतर वर्ग ३७
--दिवस मोजणी २६६
--परकीय मदत घेणें २१७-१८
मूर्तिपूजा ४, ६, ३३, ३७
मोहेंजोदारो ४
मंडळ- भा. इ. सं.-पद्धती १०६, १०८ — १०९
यदुनाथ सर. विपरीतग्रह ५४-५९;
--अपकर्ष मीमांसा १९, २४
युद्ध हे निसर्ग मान्य २२२-२२३
-- व प्रसूति वैराग्य एकच २२३
योजक २२-२३
रजपूत पराभव २५-४८
--मराठे १६७- १६८,-साम्राज्य १६९- मुसलमान-स्मिथ, २५, युद्ध २७
नीति ४१,४२,४४ -तुलना ४७,४८
राघोबा दादा २०, २१, १५१
राजकारण-दैववाद व उदासीनपणा ४८
--शपथ १६३
—महत्त्वाकांक्षा सावधानता ३२
राजनिष्ठा व राज्यनिष्ठा २१५
राज्यक्रांती (३) २५
--धर्म ६-७
राजवाडे-व सरदेसाई-लेखन १७३-४
रानटी लोक १०-१२
रानडे-मराठे उदय, अपकर्ष १४-१७
राष्ट्रवाद-राज्यवाद १६९
राष्ट्रकूट व इस्लाम ३३
—प्रतिहार ३२
रियातसकार-२२, २३
रोमन कॅथोलिक व प्राटेस्टंट ७
ललित विघ्नराज ३५
लोकमान्य २२०, २२५ -व संशोधन २२९-२३०
वतन प्राप्ती २१३
वॉरन् हेस्टिंग्स व महादजी १७८-१७९
विचारक्रांती १९२
विष्णुशास्त्री चिपळुणकर २२७-२२८
वेल्स-इतिहास २
वेलस्ली २२
वंशक्षय २०१
शक की सन भूषण १२०-१२२
शकावली ७८-९१

शहाजीपूर्व व मध्यकाल १२५–१३०
शहाबुद्दीन घोरी ३५, व रजपूत (११७८) २९, ३०, ४७
शास्त्र व रुढी १९०
—आज्ञापरिपालन व स्वास्थ्य १९१
शाहू छत्र. १३१ सेनापती १३२, १३५; १४७–१४८ व ताराबाई १५१
शिवाजी १३, १५ १९
—उत्तर की दक्षिण १४६
—जन्मतिथी ६९–१०४
—चरित्रे ६१, ६२–नवे केंद्र २१४ सार६० प्रसंग, ६३
—व बाजीराव १४७–१४८
—व्यंकोजी १६१
—वसतिस्थाने १११–११३
—वैशिष्टय १४–१५
—काल व पेशवे काल १६९
— मिती ११४, ११५
—सूत्रे व उल्लघन १७, १८
शंकर बा. दीक्षित २३५–२३९
शिंदे–दप्तर १६४
सखारामबापू १४८ – व माधवराव १४९–समेट १६०
सत्ता केंद्रे (३) व संक्रमण २२
सदाशिवराव धोरण १४१, १४३
सबक्तगीन ४६
सभासदी बखर ६४
समाजशास्त्र व राज्यकारण १८६
—च्या कर्तबगारीची कारणत्रयी २१३
सरकार संस्था क्षेत्र संकोच २०४
सर जॉन शोअर २३
सरदेसाई गो. स. १७२–१८६
सवाई जयसिंग–ज्योतिषशास्त्र २४०
सहिष्णुतेचा सद्विचार २२२
सातारा दप्तर १०२
सामानी व तुर्की गुलाम ४५
साम्राज्यवाद व नीति ४०
सावरकर तत्त्व २२०
सुधारणा (२१) ३, ५, २१
—गतिमान ११, १२
सुशिक्षित बेकारी २०२
सुरेंद्रनाथ, डॉ सेन १८
सुलेमान (प्रवासी) वृत्त (८२१) २
सुहूरसनाचा आरंभ दिवस २६६
सोरटी सोमनाथ २९
संशोधन कल्पना ५०–५२
स्कदगुप्त ४३
स्थलांतर प्रवृत्ति १८८– १८९, १९ १९८
स्वराज्य व सशस्त्रस्थिति २२४
हिंदु– वैदिक–सुधारणा ४
—स्थान साम्राज्यवाद व जनता ४०–४४
—सात्ताधारी मराठे २३–२४
हिमतबहादर १६०
हूण ४३
ज्ञानेश्वर–गोमंतक ११७–११९